# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभा इतिवृत्त

## दिनांक २०/०९/२००० ते ०१/०३/२००१

## रजिष्टर क्र. ०२

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २० स्पटेंबर २००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त. बुधवार दि. २० स्पटेंबर २००० रोजी महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मा. महापौर डॉ. भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली सभेला अधिकारी वर्ग यांच्यासह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. वसंत पांडुरंग नरवडे
२) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
३) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
४) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
५) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
६) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
७) स.स.सौ. साजेद बेगम विखार अहेमद
८) स.स.श्री. शे. इलियास किरमानी शे. ऊमर
९) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
१०) स.स.सौ. शंकुतला सांडुजी इंगळे
११) स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी
१२) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१३) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१५) स.स.सौ. धायतिलक लिलावती बाळासाहेब
१६) स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१७) स.स.श्रीमती. किवळेकर जयश्री सारंग
१८) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१९) स.स.श्री. शे. शकिल पटेल शे बुढण पटेल
२०) स.स.श्रीमती . डॉ. आशा उत्तम बिनवडे
२१) स.स.श्रीमती. मानकापे पार्वती लहानु
२२) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२३) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२४) स.स.सौ. ॲड. सुवर्णा उमेश चंदात्रे
२५) स.स.श्रीमती. जाबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२६) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२७) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२८) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२९) स.स.श्री. अय्युब खॉ सरदार खॉ
३०) स.स.श्री. अ. रशिद अ. सल्लार
३१) स.स.श्री. जैन विकास रतनलाल
३२) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
३३) स.स.श्री. सिरसाठ संजय पांडुरंग

३४) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३५) स.स.सौ. रशिदा बेगम गफफार यारखान
३६) स.स.श्री. वडागळे सुनिल बुथवेल
३७) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३८) स.स.श्री. नासरेखॉन सरदारखॉन
३९) स.स.श्री. थोरात दत्तात्रय उर्फ बाळासाहेब रामराव
४०) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४१) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
४२) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलीक
४३) स.स.सौ. नुसरत बानो फिरोजखॉन
४४) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
४५) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४६) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४७) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४८) स.स.श्री. सुरगोंणीकर नारायण यंद्रय्या
४९) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
५०) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
५१) स.स.श्री. अ. कदिर मौलाना सय्यद
५२) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
५३) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५४) स.स.सौ. संगिता बाळु मेद
५५) स.स.श्री. नासीरखॉन अ. रहेमानखॉन कुरैशी
५६) स.स.सौ. शाहीन जफर महमुद जफर
५७) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५८) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५९) स.स.श्री. स. सलिम स. युसुफ
६०) स.स.श्री. तकीहसन खान कासिमहसन खान
६१) स.स.श्री. गाजी सावोद्दीन गाजी जहीर अहेमद
६२) स.स.श्री. मिर हिदायत अली मिर बसालत अली
६३) स.स.सौ. नफिसुन्नीसा बेगम हबीबखॉ
६४) स.स.श्री. शे. इसाक जैनोद्दीन शे.
६५) स.स.श्री. अफसखान यासीनखान
६६) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६७) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
६८) स.स.श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान
६९) स.स.श्री. तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
७०) स.स.श्री. जगदिश कन्हैय्यालाल सिध्द
७१) स.स.सौ. बबीता सुभाष
७२) स.स.स. अली सलामी स. मीरा सलामी
७३) स.स.सौ. निखत परवीन ईजाज अली

**स्विकृत सदस्य**

१) स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
२) स.स.श्री. खुंगरे सुरलितसिंग तिलकराज
३) स.स.सौ. सलमाबानो मिर मो. अली

**संवाद :**

श्री. शे. इसाक शे. जैनोद्दीन : आजच्या सभेतील पुरवणी विषय पत्रिकेतील विषय क्र. ३४ मधील इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १२ मध्ये प्रस्तावात औरंगाबाद ऐवजी संभाजीनगर असे टंकलिखित करुन इतिवृत्त सभागृहात सादर केलेले आहे, जे की, मा. उच्च न्यायालयाचा अवमान असुन न्यायालयाने दिलेल्यानिर्णयाची या ठिकाणी अंमल होत नसल्याचे दिसुन येते.त्यामुळे आजच्या सभेमध्ये कोणत्याही प्रस्तावावर चर्चा न होता सभेतील इतिवृत्तात "संभाजीनगर" हे वाक्य टंकलिखित करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही व्हावी. जोपर्यन्त सदरील प्रस्ताव रद्द करीत नाही किंवा इतिवृत्तातुन ते शब्द गाळुन टाकित नाही तो पर्यन्त आजची सभा आम्ही होऊ देणार नाही. कारण या प्रशासनामध्ये मा. उच्च न्यायालयाचे निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसुन येते व ही बाब जाणीवपुर्वक करण्यात येत असलयाचे निदर्शनास येते. ज्यामुळे शहरातील वातावरण दुषित होण्याचा संभव होतो याबाबत मी मा उच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी जाईल.

मा. महापौर : स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता प्रस्तावातील "संभाजीनगर " हे नांव जोपर्यन्त जाणार नाही तोपर्यंन्त सदरचा विषय चर्चेला घेतला जाणार नाही. सदरिल विषयात दुरुस्ती करावी.

श्री. अंबादास दानवे : मराठवाडयातील जवान भारतीय सिमेवर शत्रुशी लढतांना शहिद झाले त्यांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

मा. महापौर : सभागृहात ००.०१ मिनिट श्रध्दांजली वाहण्यात यावी.(याचवेळेस सभागृात ००.०१ मिनिट श्रध्दांजली वाहण्यात आली)

श्री. अंबादास दानवे : सिडनी ऑलीपिक- २००० मध्ये भारतीय महिला कर्नम मलेश्वरी यांनी कास्यपदक मिळवुन दिले ही बाब भारतीयाच्या दृष्टीने अभिमानाची असुन त्यांचे अभिनंदन या सभागृहात करावे.

मा. महापौर : भारतीय महिला कर्नम मलेश्वरी हिने ऑलिपिक मध्ये कास्यपदक पटकावल्याबद्दल सभागृहातर्फे तीचे अभिनंदन करण्यात येतो.

श्री. शे. इसाक शे. जैनोद्दीन : जोपर्यन्त संभाजीनगर हे शब्द वगळुन येत नाही तापर्यंन्त इतिवृत्तावर चर्चा करु देणार नाही. या इतिवृत्तामुळे मा. उच्च न्यायालयाचा अवमान झालेला आहे. याची आपण दखल घ्यावी. या संदर्भात मी न्यायालयात धाव घेणार आहे. विषयपत्रीकेतील विषय क्र. ३४ वर "संभाजीनगर" असे लिहिले आहे. त्या वेळेस तपासणी करुन ठेवावयास पाहिजे होते ते केलेले दिसुन येत नाही. आणि मा. महापौरांनी सुध्दा स्वाक्षरी करुन सभागृहा समोर इतिवृत्त चर्चेसाठी ठेवले. या बाबत संबंधितावर कार्यवाही करावी.

श्री. प्रकाश निकाळजे : संभाजीनगर वाक्य प्रस्तावात असल्याने व मा. उच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही म्हणुन सदरील वाक्य इतिवृत्तातुन वगळण्यात यावे अशी सुचना करावी.

मा. महापौर : झालेली चुक मान्य करुन टंकलिखित झालेली चुक आहे, ती दुरुस्ती करुन प्रस्ताव सादर करण्यात येईल.

श्री. अफसरखान : सभागृहामध्ये चुक मान्य करीत आहात. परंतु चुक होते कशी सदरची चुक जाणीपुर्वक केली जाते. याबाबत ज्या स.सदस्यांनी प्रस्ताव ठेवला त्यांचेवर काय कार्यवाही करणार? याची माहिती द्यावी.

श्री. शे. इसाक शे. जैनोद्दीन : या संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी मी जाणार आहे. सभागृहात संभाजीनगर या इतिवृत्तातील शब्द जाणीपुर्वक टाकल्याने मी निषेध व्यक्त करतो.

मा. महापौर : इतिवृत्तातील संभाजीनगर हे नांव टंकलिखीत चुक झालेली असुन ते वगळुन प्रस्ताव सादर करण्यात येईल. व यापुढे अशी चुक होणार नाही याची दखल संबंधितांनी घ्यावी यावर आता चर्चा नको.

(याच वेळेस स. सदस्य श्री. इसाक जैनोद्दीन हे मा. महापौरांच्या डायसकडे धाव घेतात. व काही स.सदस्य आपसात जोरजोरात बोलतात काहीही ऐकु येत नाही.) सर्वसाधारण सभेमध्ये महिन्यातुन एकदाच सर्व स. सदस्य आपआपला वार्डातील समस्या विषयी चर्चा घडवुन विकास कामे करण्यासाठी सभागृहात जमतात. आणि चर्चा करीत असतांना काही सुचना असल्यास संबंधित अधिकाऱ्यांकडुन त्याच वेळेस मागविल्या जातात अशा परिस्थितीत विकास कामांची चर्चा न करता इतर मुदयावर चर्चा करणे बरोबर नाही. यासाठी सर्वांचे सहकार्य व नागारिकांचे समस्या सोडुन घेणेसाठी प्रयत्न करण्यासाठी आपण या सभेला येत असतो. त्याप्रमाणे गांभीर्य लक्षात घेऊन आपले प्रश्न मांडावेत मी उशिरापर्यंन्त चर्चा करु देण्यास तयार आहे मात्र सर्वांच्या सहकार्याशिवाय काही शक्य नाही.

श्री. तकी हसनखान : संभाजीनगर हे वाक्य वारंवार लिहुन घेणे किंवा तोंडी उच्चारणे ही बाब बरोबर नाही. यासाठी असे शब्द लिहणेसाठी सभागृहाने थांबवावे. कारण मा. उच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे तर पुन्हा पुन्हा तीच रिघ ओढणे बरोबर नाही. ज्यामुळे न्यायालयाचा अवमान होतो. हे प्रशासनाने लक्षात घ्यावे कोर्ट आपले असतांना त्यांनी दिलेला निर्णय आपण नाही मानणार तर कोण मानणार हे सांगताना आम्हाला जरासाही दुरावा वाटत नाही काय ? भारतीय घटना ही सार्वभौम आहे आणि जर आपण भारताच्या घटनेला मानतो भारतीय घटने प्रमाणे कामकाज करतो तर भारतीय घटनेच्या मुल्यानुसारच न्यायपालिकेने दिलेल्या निर्णयाची अंमल आपण करणार नाही का ? याचे उत्तर आपण द्यावे. यासाठी आपले जे कर्तव्य आहे त्याचे परिपुर्णपणे पालन करावे.

(याच वेळेस स. सदस्य श्री. जयवंत ओक हे मा. महापौर यांचा आसनासमोर येऊन बसतात व इतर काही स.सदस्यांमध्ये जोर जोरात बोलण्याचा आवाज होतो. काहीही ऐकु येत नाही.)

श्री. काशिनाथ कोकाटे : सभागृहात चर्चा चालु असतांना सभागृहात स. सदस्य ओक येऊन मा महापौरांच्या डायस समोर येऊन बसतात याचे कारण काय?

मा. महापौर : स.सदस्य श्री. जयवंत ओक यांनी आपल्या जागेवर बसुन घ्यावे.

श्री. जयवंत ओक : या शहरातील ज्या अनधिकृत वसाहती आहेत. त्याच्या न्यायमागण्या व नागरिकांच्या समस्या मांडण्यासाठी मी याठिकाणी खाली बसलेलो आहे.

मा. महापौर : प्रथमतः स. सदस्यांनी आपल्या जागेवर बसुन घ्यावे. सर्वसाधारण सभेमध्ये सर्व स. सदस्यांनी विकास कामाबाबत चर्चा करावी. इतर अनावश्यक बाबींवर चर्चा करु नये. याची खबरदारी घ्यावी.

श्री. तकी हसानखान : संभाजीनगर हे शब्द कोणत्याही स. सदस्यांनी उच्चारु नये. याची दक्षता घ्यावी. याबाबत सर्वसाधारण सभेमध्ये मा. महापौर यांनी सुध्दा मज्जाव करावा. कोर्टाने निर्देश दिल्याप्रमाणे सर्व सभागृहानी मान राखावा व कोणत्याही प्रकारे व्देष होईल असे कृत्य करु नये व शब्द उच्चारु नये.

मा. महापौर : या शहराच्या नावाबद्दल सुप्रिम कोर्टात याचिका दाखल झालेली आहे. त्यामुळे संभाजीनगर हे नांव अधिकृतरित्या झालेले नाही त्यामुळे या सभागृहात व चर्चेला जाणाऱ्या इतिवृत्तांमध्ये औरंगाबाद हेच नांव लिहिणे जरुरीचे आहे. याशिवाय विषय पत्रिकेमध्ये व ठरावामध्ये सुध्दा औरंगाबाद हेच नाव लिहिणे जरुरीचे आहे.

श्री. सुदाम सोनवणे : स. सदस्य श्री. तकिहसन यांनी सभागृहात सुचनांचे अभिनंदन करतो. परंतु मागील महिन्यातील दि. २०.८.२००० च्या सर्वसाधारण सभेमध्ये यासभागृहात केलेल्या जेष्ठ सदस्य श्री. अफसरखान यांचे बाबतीत सभागृहात मुद्दा उपस्थित झालेला होता. परंतु एकही सदस्यांनी त्या बाबतीत पाठींबा दिलेला नाही. मात्र आजच्या सभेमध्ये स. सदस्य श्री. तकीहसन यांनी जशा सुचना आज मांडल्या तशा प्रकारच्या सुचना त्यावेळी मांडल्या असल्या तर कदाचित तो प्रकार घडला नसता व आजच्या विषयपत्रिकेत संभाजीनगर हे शब्द असलेले विषय आला नसता त्यानंतर ही आम्ही प्रस्तावामध्ये संभाजीनगर हेच वाक्य लिहिणार मात्र तुम्हाला इतिवृत्तामध्ये काय नोंद घ्यावयाची ती घ्यावी. तो तुमचा प्रश्न आहे.

श्री. संजय शिरसाठ : औरंगाबाद शहराचे नामांतर संभाजीनगर करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाने मंजुर करुन केंद्र शासनाकडे पाठविलेला आहे. याबाबत कोर्टात रिट याचिका दाखल झाल्याने त्यावर कोर्टाने स्टे आणलेला आहे. प्रस्ताव नामंजुर केलेला नाही. त्यामुळे संभाजीनगर हे नाव घेणे आम्हाला उचित वाटते कारण संभाजी महाराजच्या प्रति आम्हास अभिमान असुन त्यांचे नांवास विरोध करण्याचा प्रश्नच नाही. सध्या या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे. संभाजीनगर हेच नांव घेऊन या ठिकाणी व्यवहार करण्यास काहिच हरकत नाही. व ते आम्ही करणार.

श्री. अंबादास दानवे : आपण जे संभाजीनगर नांव घेण्यासाठी मनाई केलेली आहे. याबाबत प्रथमतः मी मा. महापौरांचा निषेध करतो. आपण संभाजीनगर नांव घेण्यासाठी आपण रोखु पाहत आहात ते योग्य वाटत नाही. कारण या सभागृहाने संभाजीनगर हे नांव देण्यासाठी प्रस्ताव मंजुर करुन राज्य शासनाकडे पाठविलेला आहे व महाराष्ट्र शासनाने सुध्दा तो प्रस्ताव मंजुर केलेला आहे. आणि सुप्रीम कोर्टाने या प्रस्तावास नामंजुर (रद्द) केलेले नाही. सुप्रीम कोर्टाने तात्पुरते असे सांगितलेले आहे की, तुम्हाला या शहराचे नांव बदलण्यापेक्षा दुसरे काही काम नाही का ? तेव्हा असे करु नका असे कुठेही सुप्रीम कोर्टाने म्हटलेले नाही. या जरी बाबी असल्या तरी या शहराचे नांव आम्ही संभाजीनगर घेणार. कारण औरंगजेबाच्या नावाने या शहराचे नांव औरंगाबाद आहे. ज्या औरंगजेबने धर्माचे रक्षण करणाऱ्या संभाजी महाराजाचे डोळे फोडलेले आहे आणि म्हणुन धर्मावर संभाजी महाराज यांचे

नांव शिवसेना प्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे यांनीच हे नामांतर करण्याचे ठरविले आहे आणि हे संभाजीनगर हेच नांव आम्ही घेऊ यात किचीतही शंका नसावी.

श्री. प्रकाश निकाळजे : कोर्टाने शासनाला निर्देश दिलेले आहेत आणि शासन त्याची अंमलबजाणी करत मात्र त्या निर्णयाची पायमल्ली आपणाकडुन होऊ नये याची खबरदारी घ्यावी. कोण काय होते किंवा काय होणार याची सभागृहाला. माहिती नको. कोर्टाच्या आदेशाची पायमल्ली होणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी.

श्री. स. अली मिरा सलामी : स. सदस्य श्री. तकीहसन व स. सदस्य श्री. सुदाम सोनवणे यांनी सभागृहात शहराचे नामांतर बाबत वेगवेगळी चर्चा केली. व या चर्चेतुन धार्मिक भावनेच्या बाबतीत गंभीरता दर्शविली.आजच्या पुरवणी पत्रिकेतील पृष्ठ क्र. १२ इतिवृत्तातील विषय क्र. ३३ मध्ये स. सदस्यांनी मांडलेल्या प्रस्तावात असे लिहिले आहे की, न्यु समर्थनगर भागात सांस्कृतीक व धार्मिक कार्यक्रम साजरे करणे बाबतच्या सभागृहाच्या प्रस्तावास मंजुरीस्तव ठेवलेले आहे. तेंव्हा जेवढे काही वादग्रस्त प्रस्ताव असतात जसे की, संभाजीनगर असो किंवा धार्मिक बाबतीत असो असे प्रस्ताव मांडु नये व चर्चाही करु नये एखादयाने सभागृहात नमाज अदा करण्याचा किंवा पुजापाठ करण्याचा प्रस्ताव ठेवला तर ते आपण करायचे काय ? याचाही विचार व्हावा. औरंगाबाद शहराचा सुप्रीम कोर्टाने जरी स्थिती जैसे थे ठरविले तरीही आम्ही त्यांचे काहीही ऐकावयाचे नाही उल्लघन करायचे असे वादग्रस्त मुद्दयांवर वाद न करता संबंधित अधिकाऱ्यांनी अशा कोणत्याही प्रस्तावा बाबतीत बारकाईने पाहणी करुनच व तपासणी करुनच प्रस्ताव ठेवावा सुप्रीम कोर्टाने जसे निर्देश दिलेला की, अगोदर महाराष्ट्राचा विकास झाला काय ? विकासाचे कामे करावे नंतरच नामांतर विषयाचे प्रस्ताव पाठवावे त्यानुसार या शहराच्या विकास कामांचे बाबतीत चर्चा करावी. या सभागृहात वादग्रस्त मुद्देच बाबती जे प्रस्ताव येतील त्यावर काटाक्षाने संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावयास पाहिजे.

श्री. काशिनाथ कोकाटे : आजच्या बैठकीत मा. महापौर यांनी सभागृहात "जमलेले" शब्द उच्चारले तेंव्हा या सभागृहात कुणीही जमा केलेले नाही किंवा स. सदस्य जमलेले नाहीत. नियमाप्रमाणे बैठकीसाठी स. सदस्य उपस्थित आहेत. तेंव्हा जमलेले हे शब्द परत घ्यावे. अशी मी आपणास विनंती करतो. दुसरे असे की, आजच्या सभेमध्ये जी चर्चा चालु आहे. त्या चर्चेच्या अनुषंगाने स. सदस्या कडुन जे काही प्रस्ताव नगरसचिवा मार्फत मा. महापौर यांचेकडे स्वाक्षरीसाठी येतात तेंव्हा नगरसचित यांनी व त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचारी वर्गाने असे काही धार्मिक किंवा वादग्रस्त मुद्यांचे शब्दरचना असल्यास तसे वाक्यांची तपासणी करुन दुरुस्ती करुनच त्या प्रस्तावाची व्यवस्थित मांडणी करावी जेणे करुन कोणत्याही प्रकारे वाद उपस्थित होणार नाही याची खबरदारी घ्यावी.व कुणाच्या भावना दुखावणार नाही याचीही दक्षता घ्यावी. सभागृहात वेगळे वळण लागु नये फक्त विकास कामाबाबत चर्चा करावी कोणत्याही प्रकारे राजकारण करु नये. राजकारण करण्याचे व्यासपीठ बाहेर आहे. सर्वांनी आपआपल्या वार्डातील विकास कामाबाबत चर्चा करावी.

श्री. जयवंत ओक : शहराच्या विकास कामाबाबत चर्चा करित असतांना या शहरामध्ये मा. आयुक्त गेल्या ५-६ महिन्यात किती विकास कामाबाबत दक्षता घेऊन काम करीत आहेत. जवळपास आतापर्यंन्त मा. आयुक्तांच्या दालनात ५०० ते ६०० संचिका पडुन आहेत मा. आयुक्त यांनी स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत त्यामुळे नागरिकांच्या विकास कामामध्ये अडथळे येत आहेत. नागरिक स. नगरसेवकांच्या नावांने आरेडत आहेत. सध्या मा. महापौरांचा कालावधी ५ महिन्याचा लोटला अद्यापही वार्डातील विकास कामांना गती नाही. स्वेच्छा निधीचे प्रकरणांतुन बऱ्याचशा संचिका धुळखात पडलेल्या आहेत. अनेक नगरसेवकांनी पत्र दिलेले आहे मात्र त्यांच्या पत्राबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही प्रशासनातर्फे नाही. सगळे कामे ठप्प झालेली आहेत. वार्ड क्र. १४ जयभवानीनगर येथील ड्रेनेजचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. २५% लोकवर्गणी भरणा करुनही काहीही उपयोग नाही. या भागातील अनेक समस्या व त्रुटया नागरिकांना भेडसावित आहेत. या भागात अनधिकृत वसाहती जवळपास २५-३० वर्षापासुन झालेल्या आहेत. त्यांच्या समस्या सुटणे अत्यंत आवश्यक आहे. सर्व सुविधा पुरविल्यानंतर उदा. पाणी/लाईट व रोडच्या सुविधा होत असतांना ड्रेनेजचा प्रमुख प्रश्न भेडसावित आहे. या सर्व सुविधा तेथील नागरिकांना महानगरपालिकेतर्फे पुरविणे आवश्यक आहे. व स्वेच्छा निधीच्या माध्यमातुन येथील सुविधा सोडविता येतील. सिडको येथील डि नोटीफाईड एरियातील भाग असुन या भागातुन लोकवस्ती फार मोठया प्रमाणात वाढलेली असुन स. नगरसेवक त्या-त्या भागातुन प्रतिनिधीत्व करतात त्यांना तेथील नागरिक सारखे भांडतात त्यामुळे स. नगरसेवकांना वेळोवेळी प्रश्न विचारणा करणे भाग असते. यासाठी स्वेच्छा निधीतुन तेथील समस्या सोडविता येऊ शकते. (याच वेळी स. नगरसेवक मा. महापौरांच्या डायससमोर येऊन बसण्यासाठी पुढे सरकतात व बसतात)

मा. महापौर : स. सदस्य श्री. जयवंत ओक यांना विनंती की, आपण आपल्या जागेवरुन बोलावे. आपणास बोलण्याचा संधी दिलेली आहे. सिडको डिनोटीफाईड एरियातील लोक वस्तीतुन निवडुन आलेले स. नगरसेवकांना याची जाणीव आहे. व स. सदस्य श्रीमती शिंदे यांनी त्यांच्या वार्डातील ड्रेनेजच्या प्रश्ना बाबत प्रस्ताव ठेवलेला आहे तो सभेमध्ये घेणार असुन या भागातील समस्या सोडविण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्यात येतील. सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. या भागामध्ये अनधिकृत वसाहती वाढलेल्या आहेत. ज्या भागामध्ये ले आऊट मंजुर आहेत. तेथील समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिकातर्फे तातडीने कार्यवाही होते. परंतु अनधिकृत वसाहती बाबत प्रशासनाला निधी अभावी कामे प्रलंबीत राहतात. या भागातील नागरिक ५२% लोकवर्गणी भरण्यास तयार असलयास उर्वरित ७५% निधी गृहीत घरुन महानगरपालिका नागरी सुविधा पुरविण्याची कार्यवाही करु शकते. असा प्रस्ताव मंजुर झालेला आहे.

श्री. प्रकाश जावळे : स. सदस्यांच्या भावना प्रशासनाने लक्षात घ्याव्यात की, अनेक वार्डातील नागरी सुविधा नसल्याने स. नगरसेवक यांचेकडे नागरिकांची सारखी ओरड असते कारण गेल्या ५/६ महिन्यापासुन आजपर्यंन्त ३ मा. आयुक्त या ठिकाणी येऊन गेलेत. जवळ जवळ ४५२ संचिका आयुक्त दालनात पडुन आहेत. सभागृह नेता यांनी सांगितले की, जवळपास १३००

संचिका मा. आयुक्त यांचेकडे पडलेल्या आहेत. त्या सर्व संचिका मिळाली कधी काढणार आहात या ठिकाणी वार्डनिहाय विकासांचे कामे तसेच पडुन आहेत. तेंव्हा माझी सभागृहाला विनंती की, या महानगरपालिकेमध्ये अधिकाराचे विक्रेंद्रीकरण झाले पाहिजे. कारण प्रत्येक गोष्ट आपण मा. आयुक्त यांचेकडे जाऊन विचारणा करणे संयुक्तीक नाही यासाठी की, मा. आयुक्त यांचेकडे वेगवेगळया विभागांचा अतिरिक्त भार आहे. प्रत्येक वेळी जोही आयुक्त या ठिकाणी येतो. त्यांचेकडे सिडकोचा भार आहे. या ठिकाणी मा. जिल्हाधिकारी यांना महानगरपालिकाचा चार्ज दिलेला आहे. त्या सोबतच सिडकोचाही आहे. त्यामुळे या महानगरपालिकेला कायम स्वरुपी आयुक्त असणे आवश्यक आहे. जेणे करुन नागरिकांची कामे सुरळीत होतील. तेंव्हा वार्डातील सुखसोयी पुरविण्यासाठी प्रशासन काय प्रयोजन करणार आहे. या ठिकाणी अनुकंपा धर्तीवरिल प्रकरणे गेले काही दिवसापासुन प्रलंबित आहेत. ज्या नागरिकांनी २५% लोकवर्गणी भरण्यास तयार आहेत. त्या भागासाठी ७५% निधीची तरतुद करुन प्रशासन कार्यवाही करणार काय ? याची माहिती द्यावी कारण आतापर्यंन्त ३ आयुक्त या ठिकाणी येऊन गेलेत मात्र कामे होत नाहीत. वसुलीवर परिणाम होत आहे. माहिती सभागृहाला सांगावे.

श्री. जयवंत ओक : या सभागृहामध्ये काही स. सदस्य दिशाभुल करीत आहेत २५% लोकवर्गणी फक्त जो सिडकोतील डिनोटीफाईड एरियासाठी आहे इतर भागासाठी नाही. कारण मागील सर्वसाधारण सभेमध्ये २५% लोकवर्गणीची प्रस्ताव मंजुर झालेला आहे. याबाबतची प्रत मी सभागृहात दाखवितो कृपया ते पहावे व कार्यवाही करावी. ज्या भागामध्ये अनधिकृत वसाहती झालेल्या आहेत त्या भागामध्ये महानगरपालिकातर्फे रोड/लाईट/पाणी/व ड्रेनेज पुरविल्या आहेत परंतु आणखी काही सोयी पुरवावयाच्या झाल्यास त्यास प्रशासन भुमिका घेणार याची माहिती द्यावी.

मा. महापौर : स. सदस्यांना विनंती की एका सदस्याने जास्त न बोलता थोडक्यात आपआपल्या वार्डासंबंधी सांगावे व अनधिकृत वसाहतीबाबतची चर्चा चालु आहे. त्या अनुषंगाने बोलावे.

श्री. स. अली मिरा सलामी : अनधिकृत वसाहतीमधील नागरिकांना २५% लोकवर्गणी घेऊन सोयी देणेबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये मंजुर झालेला आहे. तो सिडकोतील जागेबाबतचा उदा. पुंडलिकनगर हुसैन कॉलनी व इतर वसाहतीबाबतचा होता. जे जुन्या शहरातील अनधिकृत वसाहती आहेत त्यांना आपण यापुर्वीपासुन सर्व सुविधा दिलेल्या आहेत कोणत्याही प्रकारची बेटरमेंट चार्जेस न घेताही त्या ठिकाणी नागरी सुविधा उदा. नळ/लाईट/ड्रेनेज व रोड सारखे सुविधा त्या ठिकाणच्या नागरिकांना दिलेल्या आहेत. त्यांना यापुढेही देणेत येईल अशा प्रकारचा प्रस्ताव त्यासोबत मंजुर करण्यात आलेला होता. ज्या भागामध्ये ७५% महानगरपालिकाच्या निधीतुनच सर्व सुविधा पुरविल्या जात आहेत त्यांना २५% लोक वर्गणीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. यासाठी आता पुन्हा निर्णय यावयाचा झाल्यास या बाबींचा विचार करुन वेगवेगळा निर्णय द्यावा.

श्रीमती पार्वतीबाई मानकापे : महानगरपालिकेमध्ये जी युनायटेड वेस्टर्न बॅंक आहे. तेथील मॅनेजर स. नगरसेवक व कर्मचारी अधिकारी याचेशी आपुलकीने बोलत

नाहीत. या संस्थेचे आम्ही ट्रस्टी आहोत. व कर्मचारी/अधिकारी यांचेशी बॅकेनी व्यवहार योग्य रित्या करावा.

श्री. नंदुकमार घोडेले : ज्या भागामध्ये नागरिकांच्या सुखसोयीसाठी आवश्यक लागणारे सुविधा पुरविणेसाठी मागणी असेल त्यासाठी स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतुन त्या-त्या अनधिकृत वस्तीत करता येतील असा निर्णय व्हावा. आणि यासाठी शासनाची मंजुरी घेऊन निधीचा वापर त्या भागासाठी करता येईल. आणि ज्या प्लॉट धारकांनी १००% बेटरमेंट चार्जेस भरलेले असतील त्यांचे बाबतीत सर्व सुविधा पुरविणेची कार्यवाही प्रशासनाने करावी.

श्री. सुदाम सोनवणे : ज्या अनधिकृत वसाहती आहेत. त्या भागामध्ये स.नगरसेवकांचा स्वेच्छा निधीचा वापर नागरिकांच्या सुविधा पुरविणेसाठी करणे आवश्यक आहे. या संदर्भात अशी माहिती आहे. की, प्रशासनातर्फे संचिकेमध्ये वेगवेगळे शेरे दिल्या जाते. व अनधिकृत वसाहतीमध्ये स्वेच्छा निधी चा वापर करता येत नाही. मागील वर्षी सर्वसाधारण सभेने विशेष बाब म्हणुन सिडको भागातील स्वेच्छा निधीतुन काही कामे करण्याचा प्रस्ताव मंजुर केल्याने कामे केलेली आहेत. अर्थसंकल्पात दर्शविलेल्या लेखा शिर्षानुसार दिलेले उध्दीष्ट वसुलीसाठी आहे. ते पुर्ण केल्या जात नाही त्यामुळे अंदाजपत्रकात तरतुद करुनही उध्दिष्ट पुर्ण न झाल्याने आवश्यक ती कामे करण्यास अडचणी होतात. सध्या ५ महिन्यात एकंदर १२.०० कोर्टाची तुट आजच्या परिस्थितीत मालमत्ता व पाणीपट्टी कर वसुली तसेच जकात मिळुन दिसुन येत आहे याचे कारण प्रशासनाचे संबंधित अधिकाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचे अंकुश दिसत नाही. शहरातील मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली पाहिजे त्या प्रमाणात नसुन जकात सुध्दा मागिल वर्षीच्या तुलनेत नमण्य आहे. या ठिकाणी जे आकडे सांगितल्या जातात. त्यामध्ये प्रशासन पुर्णपणे दिशाभुल करीत आहे. जकात वसुली दिलेल्या उव्दिष्टान्वये होत नसुन तुट दिसत आहे. त्यावर प्रशासनाने नियंत्रण अजिबात दिसत नाही. अर्थसंकल्प फुगवुन सभागृह व नगरसेवकांची दिशाभुल केली आहे. ५ वा वेतनाचे ३ कोटी बाकी आहे. अधिकाऱ्यांना त्रास होतो. बजेट नाही कोटयावधी रुपयांचे स्पील ओव्हरची कामे आहेत. दिशाभुल थांबली पाहिजे.

श्री. तकी हसनखान : शहरामध्ये स्लम घोषित झोपडपट्टया ५३ आहेत आणि ४० झोपडपट्टया अघोषित आहेत शिवाय सिडको डिनोटीफॉईडच्या वेगळयाच १९९५ च्या पुर्वी ज्या झोपडपट्टया शासनाने निर्णय (जी.आर) प्रमाणे अनधिकृत म्हणुन बसलेल्या आहेत. त्यांना महानगरपालिकेतर्फे सर्व सुविधा पुरवाण्यात असे शासनाचे परिपत्रक आहे. व सन १९९५ नंतर २००० पर्यन्त बऱ्याचशा अनधिकृत वसाहती झालेल्या आहेत त्या सर्व वसाहतीमध्ये मंजुर व सर्वसाधारण लोक राहतात ज्या झोपडपट्टयांना सर्व्हे करणे आवश्यक आहे. सर्व्हे करुन दलित वस्त्या असलेल्या ठिकाणी स्लम घोषित करणे आवश्यक आहे. ९५ ते २००० पर्यन्त किती दलित वस्ती झाल्या आहेत. गलिच्छ वस्ती, झोपडपट्टी ज्यात ५०% पेक्षा जास्त दलित वस्ती आहे. त्यांना पुर्ण सुविधा द्यावी. त्याचा पुर्ण सर्व्हे झालेला नाही. यात ६०% पेक्षा जास्त दलित वस्ती येईल. या संदर्भात म्हाडा मंत्री महोदयासह बोलले स्लम घोषित करता येईल सुविधा देता येतील दलित वस्तीच्या नांवाने सर्व्हे करण्यात यावा.

श्री. कावडे रावसाहेब : चिकलठाणा अमानुल्ला मोतीवाला कॉलनी १९९२ ची वसाहत आहे. तेथे पाण्याची ड्रेनेजची व्यवस्था नाही पाणी व ड्रेनेजची सुविधा देण्यात यावी.

सौ. छायातिलक लिलावती : माझ्या वार्डातील घराला कर लावणे आवश्यक आहे. कारण अनधिकृत वसाहती व स्लम भाग असुन एका-एका घराचे मालक अनेकदा विक्रीमुळे बदलेले आहेत. यासाठी प्रत्येक घराच्या बॉड पेपरच्या आधारे जेथे घर तेथे कर याप्रमाणे कर वसुली केल्यास महानगरपालिकाच्या उत्पन्नात भर पडले. जुने घर मालक कर भरत नाहीत नविन ही भरत नाही कर पावत्या त्यांचे नांवाने करुन दिल्यास कर भरणा होऊन महानगरपालिकाच्या उत्पन्नात वाढ होईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : जवळपास ४८ ते ५० अनधिकृत वसाहती शहरात आहेत. व ५३ घोषित झोपडपट्टया आहेत. स. नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीचा वापर ऐनवेळी करावयाचा झाल्यास प्रशासनामार्फत टेंडर काढुन करावा. लागतो व या पध्दतीने प्रशासनातर्फे पुर्णपणे कार्यवाही होण्यास विलंब लागतो. प्रशासनाने अनेक अनधिकृत वसाहतीमध्ये रोड/लाईट पाणी व ड्रेनेज ची कामे केलेली आहेत. व संध्याही तीच व्यवस्था प्रशासना तर्फे चालु राहणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु स्वेच्छा निधीतुन पत्र घेवुन कामे करतात. शहरातील वाढती लोक संख्या लक्षात घेता प्लॉट मालक अनधिकृतरित्या छोटे-छोटे प्लॉट पाडुन विक्री केल्याने महानगरपालिकास बेटरमेंट चार्जेस व किास निधीचे उत्पन्न प्राप्त व्हावयास पाहिजे होते ते अनधिकृत वसाहतीमुळे झालेले नाही. त्यामुळे शहरात फार मोठया प्रमाणात २० बाय ३० चे प्लॉटवर लोकांनी अनधिकृत घरे बांधुन राहु लागले.यावर पुर्वीपासुन प्रशासनाने नियंत्रण केलेले नाही. त्यामुळे वसाहती आजुबाजुस झालेल्या दिसतील. यासाठी अशा सर्व अनधिकृत वसाहती मधील नागरी सुविधा पुरविणेच्या दृष्टीने व त्याच्या समस्या जाणीवपुर्वक सोडविण्याचा दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे त्यानुसार प्रशसानाने कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे रु तीन हजार पर्यन्त खर्च करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंत्यास द्यावे या महानगरपालिकेमध्ये गेल्या ५/६ महिण्यात तिन आयुक्त येऊन गेलेत मात्र विकास कामामध्ये कोणत्याही प्रकारची गती नाही. स. नगरसेवक निवडुन आल्यानंतर नागरिकांच्या वेगवेगळया मागण्या वार्डाच्या संदर्भात असतात. त्याबाबतचा पाठपुरावा करावा लागतो. याठिकाणी आयुक्त उपस्थित नसल्याने आम्हाला काहीही करता येत नाही. यासाठी या महापलिकेसाठी एक सक्षम आयुक्त असणे अत्यंत आवश्यक असल्याने सर्व पदाधिकाऱ्यांचे एक शिष्टमंडळ मा. विभागीय आयुक्त यांना भेटुन निवेदन देणे योग्य राहील. जेणे करुन या प्रशासनातील निवडुन आलेल्या स. नगरसेवकांचे वार्डातील कामे व स्वेच्छानिधी तील कामे तातडीने करवुन घेणे सोईस्कर होईल. त्यानुसार कार्यवाही व्हावी. कामाचा निपटारा लवकर व्हावा म्हणुन इतर अधिकाऱ्यांना नियमाप्रमाणे अधिकार देण्यात यावे. ९५ मध्ये अशा संचिका मा. आयुक्तांकडे जात नव्हत्या त्याचप्रमाणे आताही कार्यवाही व्हावी. या ठिकाणी २० बाय ३० च्या प्लॉट धारकांबाबत शहरात अनधिकृत वस्त्या होणारच आहेत . त्यांना परवानगी देणेसाठी प्रशसनाने पस्ताव ठेवावा व सर्व सभागृहाने त्या मान्यता द्यावी.

श्री. अंबादास दानवे : सध्या अनधिकृत वसाहती व त्यांना द्यावयाच्या नागरी सुखसुविधा याबाबत सभागृहात चर्चा चालु आहे. सिडको डिनोटीफाईड भागात ज्या वसाहती सध्या अनधिकृतरित्या बसलेल्या आहेत. त्या बऱ्याच दिवसापासुन असुन त्यांना नागरी सुविधा पुरविणे महानगरपालिकेतर्फे गरजेचे आहे. या संदर्भात ज्या भागामध्ये काही सुविधा पुरविण्यात आल्या व काही पुरवायच्या बाकी आहेत त्यांना उर्वरित नागरी सुखसुविधा महानगरपालिके तर्फे देणे आवश्यक आहे. सिडको नोटीफाईड भागातील वस्ती ही पुर्वीपासुन असुन त्यांना महानगरपालिकेतर्फे नागरी सुविधा पुरवण्यात त्याचबरोबर शहरात जवळपास ४०/५० अघोषित झोपडपट्टया आहेत त्या सर्व भागातील नागरिकांना नागरी सुविधा उपलब्ध होतील तशी व्यवस्था प्रशासनातर्फे करण्यात यावी. सेल्फ डेव्हलपमेंट झालेल्या सिडकोत काही कॉलनी/ वसाहती आहेत त्यांना महानगरपालिका तर्फे काम झाले. याबाबत प्रशासनाचा खुलासा आता तर स्पष्ट होईल. २५% रक्कम त्या-त्या भागातील नागरिकांकडुन लोकवर्गणी भरली तर प्रशासन काम करणार का, खरी बाजु काय आहे. प्रशासनाने खुलासा करावा. रेखांकनातील कामांना स्वेच्छा निधीतुन करण्याची परवानगी द्यावी म्हणजे सिडको नोटीफाईड एरियामध्ये काम करता येईल.

श्री. रतनकुमार पंडागळे : सन १९९५ च्या पुर्वीच्या घोषित झोपडपट्टया किती आहेत. याबाबतची अधिकृत घोषणा केलेली नाही. ते घोषित करावे लागले. ज्या ५३ स्लम घोषित झोपडपट्टया आहेत त्यांना त्यांचे मालकी हक्क प्राप्त व्हावे. पी.आर.कार्ड मिळावे. १९९५ च्या पुर्वीच्या अघोषित झोपडपट्टया झालेल्या आहेत. त्यांचा सर्व्हे करुन २००१ जणजननेच्या अधारे झोपडपट्टया म्हणुन घोषित करावे. आणि आरक्षण आहेत त्याबाबतही पाहणी करुन निर्णय घेलता पाहिजे. जेणे करुन त्या जागी गेले कित्येक दिवसापासुन वसाहती झालेल्या आहेत. त्यांना नागरी सुविधा सर्व सोयीयुक्त प्राप्त झालेल्या आहेत.

मा. महापौर : अनधिकृत वस्तीमध्ये नागरी सुविधा पुरविणेसाठी सभागृहात जवळपास दिड तासापासुन चर्चा चालु आहे. या संदर्भात प्रशासनाची काय भुमिका राहिल यासाठी मा. आयुक्त माहिती सांगतील.

मा. आयुक्त : शासनाने १.१.१९९५ ही तारीख निश्चित करुन सन १९९५ च्या पुर्वीच्या अनधिकृत वस्त्यांना अधिकृत म्हणुन जाहिर केलेले आहे. १.१.९५ पासुनच्या वस्त्या ज्या अनधिकृत आहेत. ज्यांचे रेकॉर्ड सध्दा स्थितीत आहे. त्या वस्त्यांना सुखसोयी व मुलभुत सेवा देणेच्या संदर्भात आज सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा चालु आहे. यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी मला अशी माहिती दिली आहे की, २५% लोकवर्गणी करुन नागरिकांना मुलभुत सुविधा पुरविणेचा ठराव झालेला होता. जर २५% कॉन्ट्रीब्युशन लोकवर्गणी व्दारे लोकांनी दिली तर महानगरपालिकाने ७५% खर्च करण्यास तेथील नागरिकांना मुलभुत सुविधा पुरवावी. सर्वप्रथम त्या भागातील नागरिक गोरगरिब आहेत व दारिद्रय रेषेखालील असतील तशा प्रकारचे अनधिकृत वस्त्यास राहत असतील त्यांची आर्थिक परिस्थिती अशी आहे का ? की ते २५% लोकवर्गणी देवु शकतील कारण शहरातील ड्रेनेज/रस्ते या कामांचे अंदाजपत्रक जवळपास लाखो रुपयाचे होते. हे काम रु दहा हजार किंवा विसहजाराचे नाही मोहल्ला पुंडलिकनगर येथील नागरिकांना २५% च्या

बाबतीत पाहिले असते तर १७ कोटी रक्कम जमा होण्याची वाट पाहावी लागली असती आज त्या ठिकाणी ६८ कोटीची योजना चालु आहे. परंतु २५% चा विचार केल्यास रु. १७ कोटी कोण देणार फक्त २५% लोकवर्गणीची ठराव करावयाचा व आपण सर्वांनी समाधानी व्हायाचे हे माझ्या मते बरोबर वाटत नाही. त्यानंतर दुसरी अडचण आमच्याकडे अशी आहे की, जरी आपण ठराव पास केला २५% व ७५% चा यामधुन सुदैवाने एखादया वस्तीतुन लोकवर्गणी रु. २५% प्राप्त झाली. तेंव्हा महानगरपालिका ताबाडतोब ७५% ची रक्कम खर्च करणचे असे काही फंडस् आहेत का ? की ज्यामुळे महानगरपालिका ताबडतोब ७५% रक्कम खर्च करु शकेल. म्हणुन यामध्ये दोन प्रकारच्या अडचणी येतात. १) २५% लोकवर्गणी त्या वस्तीतुन प्राप्त करुन घेणे. २) लोकवर्गणी प्राप्त झाल्यानंतर ७५% खर्च करण्याची प्रशासनाने तरतुद करणे. आज पुंडलिकनगरमध्ये योजना का राबविली जात आहे कारण शासनाने व तत्कालीन पालकमंत्री महोदयांनी तरतुद करुन ६८ कोटी रुपयाची योजना सुरु करुन घेतली परंतु आज आपण रु. १७ कोटीची वाट पाहिली असली तर सदर योजना अद्यापही सुरु झाली नसती आणि २५% लोकावर्गणी एखादया भागातुन आली समजा त्यावेळी महानगरपालिकेची ७५% रक्कम तातडीने खर्च करण्याची कुवत आहे का ? म्हणुन याच्यावर एक इलाज असा आहे. जसे स.नगरसोवकांनी एक मुद्दा मांडला होता की, जरी अनधिकृत वस्ती असेल सन. १९९५ च्या नंतरची परंतु त्यामुध्ये दलित वस्ती सुधार योजना आहे. यात शासनाकडे कोटयावधी रुपये उपलब्ध आहेत. माझ्या माहितीनुसार सन १९९७-९८ ला शासनाकडुन रु. ४.०० कोटीचा निधी आपल्याला प्राप्त झाली. यामध्ये दोन भाग असतात काही निधी ग्रामीण भागासाठी तर काही महानगरपालिकेच्या हद्दीसाठी मागील वर्षी सुध्दा सुमारे १.०० कोटी निधीची तरतुद होती. परंतु महानगरपालिकेचा सर्व अनधिकृत वस्त्यांचा सर्व्हे झालेला नसल्याने सदरील निधी आपल्याला या कामी खर्च करता येत नाही. उदा. मागील वर्षी जरी रु. १.०० कोटी खर्च करण्याची शास्वती होती परंतु रु. ७०.०० लाखाचे काम सुरु झाले. आणि या निधीतुन ३१ मार्च २००० पर्यंन्त रु. ३० लाख निधी व्यागत झाला. तेंव्हा कोणत्या कारणास्तव २५% लोकवर्गणीची नागरिकांकडुन मागणी करायची हा माझा मुद्दा आहे.

म्हणुन हे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी एकच मार्ग आहे की, सन १९९५ पुर्वीच्या अनधिकृत वसाहतीचा सर्व्हे युध्द पातळीवर पुर्ण करावयास पाहिजे त्याबाबतची योजना ताबडतोब कार्यान्वीत करावी. व शासनाकडे रु. १.०० कोटी ऐवजी रु. ५ कोटीची माणी केली तरी मला खात्री आहे की, शासन मागणीनुसार निधी उपलब्ध करुन देवु शकेल. या अनधिकृत वसाहतीसाठी स. नगरसेवकांचा जो निधी ठेवलेला आहे तो एकत्रित करुन व इतर ठिकाणी समसम स्वेच्छानिधी खर्च करता येऊ शकते. कारण एखादया नगरसेवकाने २० किंवा ५० हजार रु. स्वेच्छा निधीतुन दिले तर ती योजना पुर्ण होऊ शकत नाही. रु. ५० हजाराच्या निधीतुन एखादा रोड होऊ शकत नाही. पाण्याचे पाईपलाईनचे काम होऊ शकत नाही. किंवा ड्रेनेजचे काम होणार नाही परंतु विदयुत लाईटचे एखादा दिवा बसविण्याचे काम होऊ शकते. परंतु आपल्याला पुंडलिकनगर सारख्या ठिकाणी एखादी

मोठी योजना घ्यावयाची असले. दलित वस्ती सुधारणा योजना ही शासनाची योजना आहे.त्यांची आपण निश्चित पणे ताबडतोब कार्यवाही करणार व ती यशस्वी होण्याची खात्री सुध्दा आहे. त्यानंतर दुसरा मुद्दा असा आहे की, अनधिकृत वसल्या का होतात. यांच्यामध्ये ज्यांनी २० बास ३० चे प्लॉट टाकले आणि विकले. फक्त ते कसुरवार नाही. याच्यामध्ये शासन सुध्दा कसुरवार आहे. कारण असे नाही की, शासन सक्त नाही. किंवा वेळेवर दखल घेत नाही. हे सुध्दा एक कारण आहे परंतु ते एक ठराविक कारण आहे मुख्य कारण हे आहे. माझेकडे सुध्दा जिल्हाधिकारी म्हणुन लोक अनधिकृत वस्तीतील नो डेव्हलपमेंट झोन मध्ये जमीन अकृषि करण्याची मागणी करतात. त्याना एन.ए. मिळत नाही. तेंव्हा आपण म्हणतो की, हे ग्रीन पट्टा आहे. किंवा नो डेव्लपमेंट झोन आहे. दरवर्षी लोकसंख्येत ८ ते ९% वाढ होत आहे. आणि खेडयातुन शहराकडे स्थलांतर होण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे अनधिकृत वस्त्या होणारच. काही डेव्हलपर्स आहे त्याची मिटमिटा हर्सुल ठिकाणी ना विकास झोनमधील जागा असुन त्यांनी प्लॉट विक्री काढण्यासाठी महानगरपालिकेकडे डेव्हलपमेंट चार्जेस भरण्यास तयार आहे. जागा निवास मध्ये येत नाही. म्हणुन तुम्हाला ले आऊट ची परवानगी देता येत नाही तर अशा स्थितीमध्ये लोकवस्ती येणारच आपण त्याला थांबवु शकत नाही. कारण वाढत्या लोकसंख्ये प्रमाणे अनधिकृत वसाहती या कागदोपत्री जरी नसल्या तरी त्या होणारच कारण जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन एन.ए. मिळणार नाही. महानगरपालिकेकडुन विकास निधी भरण्यास व बांधकाम परवानगी मिळणार नाही. त्यामुळे या शहरात रोजगारामध्ये व पोट भरण्यासाठी लोक येतात त्यांना राहणेसाठी अनधिकृत वस्त्यामध्ये बांधकामे करुन राहणारच तर यामध्ये माझी सुचना अशी आहे की, जर महानगरपालिकेला उत्पन्न वाढवायचे असेल तर एका एका ले आऊट मध्ये लाखो रुपयाचा निधी मिळु शकतो. डेव्हलपर म्हणुन फक्त आपण विक्री धारकांना जबाबदार धरतो की सदर व्यक्ती आपल्याकडे आला नाही. व २० बाय ३० चे प्लॉट पाडले. डेव्हलपमेंट चार्जेस भरण्यासाठी जर आला असता तर व त्याला लेखी जबाब दिला असता की ले आऊट आम्ही मंजुर करित नाही व पैसेही भरुन घेत नाही. वेगाने वाढणारे शहर आहे आऊटर एरिआ जसे मुकुंदवाडी,चिकलठाणा, सातारा, पडेगांव भाग आहे सर्व भाग हा शहराला लागुनच असुन या भागात हजारो घरे झालेले आहेत. कुणीही विकास खर्च भरलेले नाहीत कारण एखादा व्यक्ती भरावयास आल्यास त्यास आपण परवानगी देत नाही, तर या भागासाठी आपणास एक बायलॅन्स ठेवला पाहिज की, येणारी लोकसंख्या किती असावी आणि त्यानुसार आपण झोनींगचा विचार केला पाहिजे. आणि खरोखरच आपल्या शहरात पुढील दोन वर्षाची अंदाजे २० हजार लोकसंख्या समाविष्ठ होत असल्याने अपेक्षित झाल्यास आपणास डी.पी. प्लॅन बाबत विचार करुन तो पट्टा रहिवासी क्षेत्रात फैर बद्दल करुन आणता येईल का याचा विचार केला पाहिजे.आपल्याला लाखो रुपये वसुल करता येऊ शकेल. परंतु याबाबत पध्दतीशिर कार्यवाही केली गेली पाहिजे. जर कार्यवाही केली नाही तर, येणाऱ्या दहा वर्षात अशा प्रकारच्या अनधिकृत वस्त्या होणार व त्यावर पुन्हा आजच्या सारखी चर्चा होत राहिल की, अनधिकृत रस्त्याचे

काय ? याबाबत माझी अशी सुचना आहे की, अनधिकृत वस्त्यांचे बाबतीत सर्व्हे करावयास पाहिजे. व निवासी क्षेत्र वाढविले पाहिजे. आज जर अनधिकृत क्षेत्रात्य लागुन निवास क्षेत्र करावयास पाहिजे जेस पुंडलिकनगर आहे याला लागुन जर कृषी क्षेत्र आहे ते निवास भागात असले पाहिजे. म्हणजे संबंधिताकडुन विकासानिधी भरुन घेता येतील. अन्यथा एकदा लोक येऊन बसले व एखादे लहान घर बांधले तर कधीही आपल्याला डेव्हलपमेंट चार्जेस देणार नाहीत. आणि अशा प्रकारे आपल्याला काहीना काही अडचणी येणार आहेत. याशिवाय महानगरपालिकाने सुद्धा पथक निर्माण केले पाहिजे.किंवा कक्ष निर्माण केले पाहिजे कोणताही बिल्डर कोणत्याही डेव्हलपर्स कोणती ही खाजगी व्यक्ती यांनी कुठे पांढरे दगड लाऊन अनधिकृत प्लॉटींग केल्यास त्यांचे विरुध्द पालिस केस नोंद केली पाहिजे की सदर व्यकतीने अनधिकृत प्लॉट विक्री करत आहे. व विक्री केल्यानंतर काहीच करता येत नाही. यासाठी महानगरपालिकाने जागरुक राहुन संबंधित प्लॉट धारक अमुक अमुक ठिकाणी प्लॉट पाडुन विक्री करताहेत, तर अशा वेळी संबंधितावर डायरेक्ट पोलिस केस नोंद केली पाहिजे. मतदान प्रक्रियोत जे अनधिकृत वस्तीत राहत असतील मतदार यादीत नाव आहे. अशा अनधिकृत वसाहती मध्ये सुविधा पुरवण्याची जाबाबदारी दलित वस्ती सुधारणासाठी आपल्याकडे कोटयावधीचे बजेट उपलब्ध आहे. त्यांचा वापर करुन सर्व्हे करुन यातुन मार्ग काढता येईल.

श्री. जयवंत ओक : मा. आयुक्त यांनी अनधिकृत वसाहतींना नागरी सुविधा पुरविणेच्या संदर्भात जी भुमीका विषद केली ती योग्य आहे. व अभिनंदन करावे.

मा. महापौर : १) शहरातील अनधिकृत वसाहती सन १.१.९५ च्या पुर्वीच्या असतील तर त्या सर्व वसाहती शासन निर्णयानुसार अधिकृत समजण्यात यावे. या संदर्भात प्रशासनामार्फत सर्व्हे करुन त्या भागातील नागरिकांना सर्व नागरी सुविधा पुरविणे गरजेचे आहे त्यासाठी आवश्यक लागणारा निधी सुध्दा मागविणे व पाठपुरावा करणे योग्य राहील तोपर्यंन्त संबंधित भागामध्ये आतापर्यंन्त नागरी सुविधा पैकी नळ/ड्रेनेज/लाईट व रोडचे कामे करण्यात आलेली आहेत सव यापुढे करणे आवश्यक आहेत त्यासाठी स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीमधुन ती कामे करता येतील अनधिकृत वसाहती ज्याप्रमाणे सिडको भागातील डिनोटीफाईड म्हणुन आहे त्या भागातील रहिवाशांना आतापर्यंन्त काही भागात नागरी सुविधा पुरविल्या व काही भागात पुरविणे आवश्यक आहे. त्या भागासाठी स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतील वापर करता येऊ शकते. सन १९९५ च्या वेळेस अनधिकृत वसाहती बाबत सर्व्हे करुन करण्यात आलेला आहे त्यानुसार पुन्हा प्रकल्प संचालक व अतिशहर अभियंता यांचे मार्फत सर्व्हे करुन कार्यवाही करावी. व अर्थसाहयाची मागणी करावी.

२) सिडको भागामध्ये महानगरपालिका प्रशासनातर्फे स्वेच्छा निधी प्रकरणातुन कोणत्याही प्रकारचे कामे करावयाची झाल्यास सिडको प्रशासनाने "ना हरकत प्रमाणपत्र" आणुन त्या-त्या वार्डातील कामे करता येतील.

३) शहरातील अनेक अनधिकृत ज्या २० बाय ३० प्लॉटींग वरुन वसाहती झालेली आहेत. त्याची प्रशासनामार्फत प्रत्यक्षात पाहणी करुन ले आऊट न करता छोटे-छोटे प्लॉट पाहुन विक्री करता व २० बाय ३० चे घरे

बांधतात त्या प्लॉट धारकांबाबत प्रशासनाने सुरवातीसच बंधन घालणे आवश्यक होते. परंतु आता अशा लहान लहान वसाहती अनेक ठिकाणी झालेल्या आहेत त्यामुळे महानगरपालिका प्रशासनावर नागरी सुविधा पुरविणेसाठी मागणी होत आहे. त्या पुरवाव्या लागतात. अनधिकृत प्लॉटींग थांबवावी. नियमाप्रमाणे २० बाय ३० चा ले आऊट मंजुर करता येतो.

श्री. काशिनाथ कोकाटे : २० बाय ३० च्या प्लॉट धारकांबाबत प्रशासनातर्फे प्रस्ताव मंजुरीस्तव ठेवावा जेणे करुन अशा वसाहती अनधिकृतरित्या जास्त प्रमाणात झालेल्या आहेत. त्या प्रस्तावास शासनाकडे शिफारस करुन पाठवावे. ज्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. मानवी हक्काच्या दृष्टीकोनातुन त्याचा पाठपुरावा व्हावा.

श्री. जयवंत ओक : सभागृहात या बाबत प्रस्ताव झालेला आहे.

मा. महापौर : मा. आयुक्त यांनी माहिती द्यावी.

मा. आयुक्त : आपल्या जिल्हयाचे तत्कालीण पालकमंत्री श्री. चंद्रकांत खैरे साहेब यांनी २० बाय ३० च्या अनधिकृत भुखंड विक्रीच्या संदर्भात एक वरिष्ठ पातळीवर बैठक घेतलेली होती व यात असे सुचविले होते की, २० बाय ३० चे अनधिकृत भुखंडाची सब रजिष्टारने खरेदीखत नोंदणी करु नये. यावेळी राज्याचे जे महानिरीक्षक श्री. आय.जी. स्टॅम यांना सुदधा बोलण्यात आले होते. या बैठकीमध्ये बरीच चर्चा झाली जर कोणताही व्यक्ती उपनिबंधकाकडे नोंदणीसाठी गेल्यास नोंदणी कायदा (स्टॅप ॲक्ट) १९०८ तरतुदीनुसार दस्त नोंदणीपासुन थांबविता येणार नाही. अन्यथा तक्रारी येतील. त्यासाठी देशस्तरावर या कायद्यात दुरुस्ती करावी लागेल. तसेच महानगरपालिकेकडुन महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडे प्रस्ताव पाठवुन खरेदी विक्रीच्या वेळी महानगरपालिकेकडुन नाहरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील अशी मान्यता घ्यावी व आवश्कता भासल्यास तसे शासनात निर्णय निर्गमित करण्याची मागणी करावी. लागेल.

श्री. गणेश तांबे : अनधिकृत वसाहती बाबत चर्चा चालु आहे. वाढती लोकसंख्या विचारात घेता शरहात २० बाय ३० चे प्लॉट धारकांना बांधकाम परवानगी देवु नये त्यांना ले आऊट करावयास सांगावे त्या प्रमाणे त्या भागासाठी रस्ते, खेळाचे मैदान, उद्यान विकासित करण्याचे उद्देशाने मंजुरी द्यावयास पाहिजे. नंदनवन कॉलनी येथे आर्मीने रस्ता दिला होता. मागच्या सर्वसाधारण सभेत मा. वैद्य साहेब आयुक्त असतांना खर्च देवु व कुंपन भिंत बांधुन देण्यात येईल असे बोलले होते. आर्मीचे लोक रस्ता बंद करण्याच्या तयारीत आहे. आपण पुल बंधले,खड्डीकरण केले याचा निर्णय घ्यावा.

श्री. काशीनाथ कोकाटे : या माहानगरपालिकेस स्वतंत्र आयुक्त मिळणेसाठी पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ मा. विभागीय आयुक्त यांना भेटुन निवेदन द्यावे.

मा. महापौर : १) सध्या २० बाय ३० च्या प्लॉट बाबत सभागृहात चर्चा चालु आहे. त्यानुसार शासनाकडे सचिव अर्बन डेव्हलपमेंट विभाग यांचेकडे एक प्रस्ताव मंजुर करुन पाठवावे जसे की, सिडको भागमध्ये अशा छोटया छोटया प्लॉटच्या बांधकामासाठी परवानगी देतात. त्यानुसारच अर्बन डेव्हलपमेंट विभागाच्या सचिवांनी या महानगरपालिकेच्या प्रस्तावास परवानगी द्यावी. जेणे करुन शहरात अनधिकृत २० बाय ३० चे प्लॉट न घेता शासनाकडील परवानगीस्तव ताबडतोब पाठविण्याची शिफारस करण्यात येते.

२) रस्ते बाबत स. सदस्य श्री. तांबे व सुनिल पंडागळे यांनी जी चर्चा केली त्याबाबत मा. आयुक्त यांचेशी नंतर चर्चा करण्यात येईल.

३) या महानगरपालिकेला स्वतंत्र आयुक्त असणे बाबत जी चर्चा सभागृहात झाली. त्यानुसार सिडको कडील चार्ज न ठेवता महानगरपालिकेवर स्वतंत्र आयुक्त असणे बाबत चे निवेदन शासनाकडे पाठविण्यास शिफारस करण्यात येत आहे. याबाबतचे निवेदन जिल्हाचे पालकमंत्री, संपर्कमंत्री शासनाचे सचित व मा. मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात येईल.

४) स. सदस्य श्री. रतनकुमार पंडागळे यांनी विचारलेल्या प्रश्ना-संदर्भात शहरातील स्लम घोषित झोपडपट्टयांना त्यांचे मालकी हक्कसाठी पी. आर. कार्ड द्यावे त्यानुसार मा. जिल्हाधिकारी यांनी नंतर विचार करुन माहिती देतो असे सांगितले आहे.

५) महानगरपालिकेचा मुख्य कणा उत्पन्नाचा जकात व टॅक्स वसुलीचा आहे. मागील वर्षी रु. १०८ कोटीचे कामे झाले होते. वसुली बरोबर नाही. त्याप्रमाणे यावर्षी आता ४-५ महिन्यात १२ कोटीचे वसुलीत दिलेल्या उद्दीष्टानुसार कमी आहे. यासाठी जकात मालमत्ता अधिकारी मालमत्ता कर व पाणी पट्टी वसुली अधिकारी व कर निरिक्षकांना सुचना करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कया अडचणी आहे ते सांगाण्यात मात्र वसुली ही दिलेल्या उद्दीष्टानुसार पुर्ण करावी. नसता त्यांचेवर "दंडात्मक" कार्यवाही करण्यात येईल.

६) मा. आयुक्त यांचेकडे जवळपास ४५० ते ६५० पर्यन्त संचिका वेगवेगळया व हळुहळु सर्व संचिका काढाव्यात.

श्री. स.अ. मिरा सलामी : वेगवेगळे एवन चे कामे १० ते २५ हजारापर्यन्तची कामाच्या संचिका मंजुरीस्तव पडलेल्या आहे. त्यास तातडीने मंजुरी द्यावी. जेणे करुन आमच्या सारख्या वार्डातील छोटे-छोटे कामे गुत्तेदाराकडुन करुन घेता येईल.

मा. महापौर : मा. आयुक्त यांनी आताच सुचना केली की, रु २५८ हजारापर्यन्तचे मंजुर करण्याचे अधिकार उपआयुक्त (म) यांना देण्यात येते. व उर्वरित त्यावरील सर्व खर्चाच्या संचिका मा. आयुक्त लवकरात लवकर निकांली काढतील.

सौ. पार्वतीबाई मानकापे : या महानगरपालिकेची जी युनायटेड वेस्टर्न बँक आहे.ञ अगोदर एका खोलीत कामकाज होत होते.आता दोन मोठया खोलीत त्यांचे कामकाज चालते त्यांना भाडे महानगरपालिकेतर्फे अतिशय कमी आहे. बॅकेनी आतापर्यन्त अनेक माजी महापौरांना गाडी खरेदीसाठी बॅकेतुन कर्ज दिलेले आहे. व आता काही नविन स.नगरसेवक त्यांचेकडे कर्ज मागणीसाठी जातात तर त्यांचेकडे ते बरोबर बोलत नाही. आपुलकीने वागत नाही. बऱ्याचशा कर्मचाऱ्याच्याही तक्रारी आहेत की, या बॅकेचे कर्मचारी अधिकारी यांचे वागण्याची पध्दत व्यवस्थित नाही. यासाठी त्यांना योग्य त्या सुचना देण्यात याव्या की. स. नगरसेवक किंवा कर्मचारी/अधिकारी बँकेचे कर्जे प्रकरणासाठली आल्यास त्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे परंतु ते करीत नाही. या बँकेचा व्यवहार आता फार मोठा झालेला आहे.महानगरपालिकाकडील बचत/ठेवीने बॅक मोठी झालेली आहे. याबॅकेकडुन आपला व्यवहार काढुन इतर दुसऱ्या कोणत्याही बॅकेस द्यावा

नसता काही कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन मी "उपोषणास" बसते याची नोंद घ्यावी.

अंबादास दानवे : स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता बॅकेचे व्यवस्थापकांनी त्यांचे ऐकुण सहकार्य करावे. अन्यथा दुसऱ्या बॅकेशी व्यवहार करावे आपल्याला काय ? आर्थिक बाबतीत ज्या बॅकेकडुन फायदा आहे. त्या बॅकेशी व्यवहार करता येऊ शकतो.

मा. महापौर : १) स. नगरसेवक/पदाधिकारी/अधिकारी वर्गास बॅकेचे व्यवस्थापक चांगली वागणुक देत नसतील तर त्यांचेवर कार्यवाही करुन दुसरी बॅक आणणे बाबत विचार करण्यात येईल. असे प्रशासनामार्फत संबंधित बॅकेस सुचना द्याव्यात.

२) सर्व स. सदस्यांना ओळखपत्रे देणेसाठी त्यांचा स्वतःचा फोटो काढणेसाठी तांत्रिक कक्षात फोटो काढणेची व्यवस्था केलेली आहे. ती काढुन घेण्यात यावे. यानंतर सभा १/२ तासासा ठी सभा तहकुब करण्यात येते. (वेळ अंदाजे १.५५ वाजता) (सभेला सुरुवात अंदाजे २.३० वाजता)

श्री. प्रकाश निकाळजे : शहरातील बरीचशी कामे प्रलंबीत आहेत. ती तातडीने होणेसाठी प्रशासनातर्फे कार्यवाही होणे आवश्यक आहे. बरीचशी कामे स्पील ओव्हरने ,खर्च झालेली आहेत असे सध्दा दिसुन येते. यावर्षी अंदाजपत्रकात विविध लेखाशिर्षा अंतर्गत दिलेले उद्दीष्ट आहे त्यानुसार कार्यवाही होणे गरजेचे आहे. मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली त्याचप्रमाणे जकातीचे दिलेले उद्दीष्टनुसार वसुली आहे एप्रिल ते आजपर्यंन्तच्या कालावधीत वसुली न झाल्याने जवळपास १२.०० कोटीचे नुकसान व तुट महानगरपालिकास सहन करावी. लागत आहे. जकात हा मुख्य कणा असुन जकात वसुली करणेसाठी प्रभावी यंत्रणा राबविण्यात यावी. दिलेले उद्दिष्ट काय पुर्ण होत नाही. यांचे कारण काय ? याची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी. तसेच मालमत्ता विभागाने शहरातील होर्ल्डीग बाबत माहे एप्रिल ते आजपर्यन्त टेंडर काढलेले नाही. त्यामुळे मनपास आर्थिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र झळ बसलेली दिसुन येते. शहरात एकुण होर्डीग आहेत. त्याचे होर्डीग टेंडर न काढल्याचे कारण काय ? ज्या होर्ल्डीग वाल्यानी जाहिरात लावले व त्याचा कालावधी संपला मग त्या होर्ल्डीगचे पैसे जमा करणार आहे काय ? याचा खुलासा करण्यात यावा.

श्री. स. अली मिरा सलामी : स. सदस्यांनी वसुली कमी झाल्याची चर्चा केली. त्यानुसार शहरातील होर्ल्डीग, मालमत्ता कर व पाणीपट्टी तसेच जकात असे मिळुन रु. १२.०० कोटीची घट झालेली आहे. तसेच नगररचना विभागातील बांधकाम परवानगी गेल्या ५/६ महिन्यापासुन देत असतांना त्यामध्ये सुध्दा महानगरपालिकेस कमी प्रमाणात मिळत आहे. मालमत्ता विभागातर्फे होर्ल्डीग टेंडर अद्यापही काढलेले नाही महानगरपालिकाचे उत्पन्न कमी झाले. शहरातील आठवडी बाजाराचा ठेका देतांना मनमाणी कारभार झाल्याचे या ठिकाणी दिसुन येते जे टेंडर दिलेले त्यामुळे जवळपास २ ते २.५० लाखाचे आर्थिक नुकसान महानगरपालिकेचे झालेले आहे. मी पत्राव्दारे विचारणा केली होती त्याची माहिती दिली त्यानुसार हे नुकसानीचा माहिती आपल्याला कळते. यावरुन असे स्पष्ट होते की, यामध्ये जाणीपुर्वक टेंडर अशा पध्दतीने काढले की, त्यात भ्रष्टाचार करण्यात आलेला आहे असा

माझा स्पष्ट आरोप आहे. कारण करण्यात आलेला आहे. असा माझा स्पष्ट आरोप आहे. कारण रविवार, पिरबाजार व चिकलठाणा येथील बाजार हा मागील वर्षी रु. १०.८५ लाखास देण्यात आलेला होता मागील वर्षी ५२ बाजार झाले व एका बाजारातुन कमीत कमी १९ हजाराचे उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त झाले होते. या ठिकाणी मालमत्ता अधिकाऱ्यांनी आठवडी बाजाराचा जो गुत्ता दिला आहे. त्या मध्ये यावर्षी ९ बजाराचे एकुण उत्पन्न ७ हजार व ५ हजार असे उत्पन्न दाखविलेले आहे. जे कि प्रायव्हेट व्यक्तीस गुत्ता देऊनही आपले कर्मचारी त्या बाजारात जाऊन वसुली करीत आहेत. जे की दिलेले उत्तर दिशाभुल करणारे असुन २.५० लाख रु. चे या कामी भ्रष्टाचार झालेले आहेत. दिसुन येते. याची चौकशी होणे अत्यंत आवश्यकता आहे. या तिन्ही बाजाराचे फक्त ९ बाजाराची वसुली अगदी नगण्य दाखविली आहे. आणि या बाबत मी जेव्हा आक्षेप नोंदविले तेंव्हा आठवडी बाजाराचे लिलाव काढला वर्तमानपत्रामध्ये ज्यामध्ये मागिल वर्षीच्या दरान्वये ज्यांचे दर कमी आहेत. तच दरांना लिलाव काढण्यात आला. लिलाव पध्दत कोणत्या ठिकाणी काढायची त्या स्थळाबाबतही रिंग गुत्तेदारांमध्ये होते. ९ बाजारामध्ये रु. २.५० लाखाचे कमी वसुली व मागील वर्षी सारखी कमी दरान्वये लिलाव करण्याचे कारण काय ? यांची चौकशी व्हावी. तसेच जकात खाजगीकरण होते म्हणुन या विभागातील कर्मचारी खुल्या प्रमाणात चोरी करीत आहेत. त्यांचेवर नियंत्रण नाही ओपन डिलेव्हरी होणे आवश्यक आहे. एखादया व्यापाऱ्याचा माल चांगल्या दर्जाचा येतो व कर्मचारी जकात फाडतांना कमी दर्जाचा दाखवुन जकात फाडतात. त्यामुळे वसुलीवर परिणाम होतो कर्मचाऱ्यांची मनमानी चालु आहे. त्यांचेवर लक्ष देणे आवश्यक आहे.

श्री. सुरजितसिंग खुंगर : मी होर्ल्डींग बाबत ४ ऑगस्टला पत्र दिलेले होते या महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणे साठी सर्वाचे सहाकार्य महत्वाचे आहे. शहराच विकास करणेसाठी अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. ४ ऑगस्ट पत्राव्दारे विचारणा केली की, शहरात होर्ल्डींगचे कमर्शियल दर किती आहेत इतर भागासाठी काय दर आहे. त्याची माहिती मला मिळाली नाही मी वैयक्तीक रित्या माहिती गोळा केली की, शहरातील मोठमोठे बंगलवाले आहेत त्याचेकडे जवळपास रु ८ ते १० हजाराचे उत्पन्न ते घेत आहेत परंतु महानगरपालिका तर्फे याचा काही उपयोग नाही काय ? सिडकोने होर्ल्डींगचे व्यवस्थीत टेंडर फार्मस केले आहे. १ लाख रुपये अनामत मिळते. छोटे-छोटे होर्ल्डींगस घरुन नियोजन बध्द कंत्राट दिलेले आहे. त्यामुहे त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढते. परंतु महानगरपालिका प्रशासनाने शहरातील होर्ल्डींगस बाबतीत कशा प्रकारचा निर्णय घेतला. महानगरपालिकाचे उत्पन्न वाढणे साठी संबंधित होर्ल्डींगस धारकांनी लायसन्स नुतनीकरण केले किंवा नाही, किती होर्ल्डींग लावण्यासाठी अर्ज प्राप्त झाले. किती होर्ल्डींग महानगरपालिकेने परवानगी दिली किती नामंजुर केले याची माहिती दयावी माझ्या मते शहरात जेवढे जाहिरात लागले ते सर्व मालमत्ता अधिकारी यांनी संगमत करुन होर्ल्डींग लावलेले आहेत त्यामुळे महानगर पालिकाचे आर्थिक नुकसान केलेले आहे. याबाबत एक कमिटी तयार करुन चौकशी व्हावी. व यासाठी महानगर पालिकाचे उत्पन्न कसे

वाढेल याबाबत नियमावली तयार करणे आवश्यक आहे. जकात वसुलीबाबत सुध्दा बरेचसे व्यापारी तेथील कर्मचाऱ्यांशी मिळुन राहतात त्यामुळे आलेल्या मालाचे किंमतीवर कमी किंमत दाखवुन जकात फाडली जाते. त्यामुळे महानगरपालिकाने नुकसान होते. यावर नियत्रंण ठेवावे त्याच प्रमाणे मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली करतांना बिले जे वाटप केले जातात त्यावर कमी दाखवतात व प्रत्यक्षात वेगळे आहे त्यामुळेही वसुलीवर परिणाम होत आहे.

श्री. अफसरखान : सन १९९६ पासुन दिल्ली गेट येथील अधिकाऱ्यांचे ४ क्वॉर्टर रिकामी आहेत मात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांचे अर्ज असुनही मालमत्ता अधिकारी त्यावर कार्यवाही काहीच करु शकले नाही. तेंव्हा सन १९९६ पासुन आजपर्यन्त भाडे यावयास पाहिजे होत ते येऊ शकले नाही तेंव्हा मालमत्ता अधिकारी यांचे पगारातुन झालेल्या नुकसानीची रक्कम वसुल करावी व क्वॉर्टरची मागणी असतांना संबंधितांना न देण्याचा खुलासा करावा.

श्री. जयवंत ओक : सभागृहातील माईक व एसीची व्यवस्था सुरु होणेसाठी संचिका मा. आयुक्त यांचेकडे प्रलंबित आहे त्यास मान्यता व्हावी. माईकमध्ये गेल्या बऱ्याच दिवसापासुन बिघाड आहे ती दुरुस्ती तातडीने होणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये महानगरपालिकेच्या शाळा चालविल्या जातात. त्या काढुन घेणार काय याची माहिति दयावी. मालमत्ता कर व पाणीपट्टी बाबत वसुली दिलेल्या उद्दीष्टांनुसार करणे आवश्यक आहे. प्रभावी व्यवस्था आखावी अनधिकृत नळ शोधवे त्यांचेवर दंडत्मक कार्यवाही करावी. महानगरपालिका हद्दीमध्ये जेथे घर तेथे कर त्याप्रमाणे टॅक्स आकारणी करावी वार्डनिहाय अनधिकृत वसाहतीतील मालमत्ता व पाणीपट्टी वसुली होणेसाठी दक्षता घ्यावी याबाबत कोणती योजना राबविणार याची माहिति दयावी.

श्री. सुनिल वडागळे : महानगरपालिकेच्या जलतरण तलावाच्या ठिकाणी व्यायाम शाळा सुरु करावी त्या ठिकाणी आवश्यक ते सामान येऊन पडलेले आहे. तेंव्हा व्यायाम शाळा लवकरात लवकर सुरु करावी.

श्री. माणिक साळवे : महानगरपालिकेच्या मालमत्ता करामध्ये बऱ्याच मोठया प्रमाणात घट झालेली आहे. गेल्या ३-४ वर्षापासुनची जवळपास थकबाकी ३० कोटी रुपयाची आहे. याबाबत शेकडो प्रकरणे न्यायलयात न्याय प्रविष्ठ आहेत परंतु न्यायपालिकेतुन प्रकरणे निकाली काढणेसाठी विधी विभागातर्फे काहिही प्रयत्न होत नाही. त्यांच्या चुकिच्या धोरणामुळे महानगरपालिकेला आर्थिक वसुली करण्यास मुकावे लागत आहे.त्यामुळे विधी सल्लागार जे पॅनेल आहे ते बदलण्यात यावे कारण न्यायप्रविष्ठ प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढणे गरजेचे आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : उत्पन्नाचा महानगरपालिकांचा जो भाग आहे. मालमत्ताकर व पाणीपट्टी जकात टपरी, जागा इमारती बांधकाम परवानगी उद्याने वगैरे मागिल वर्षीच्या अंदाजपत्रकापेक्षा जवळपास २०.०० कोटी रु तुट होती. या वर्षीचे अंदाजपत्रकान्वये आतापर्यंत वसुली बाबत पाहिजे तेवढा प्रतिसाद दिसुन येत नाही. स्पिल वर्क जे होते ते राहिलेल्या कामामधुन करावे लागते आहे. १९९९-२००० च्या तरतुदीनुसार तुट दिसुन आली मात्र सन २०००-२००१ च्या अर्थसंकल्पात रु. १२७-०० कोटीचे दाखवुनही त्या वेळेस काही

स. सदस्यांनी विचारणा केली होती की, या बजेट प्रमाणे किती वार्डातील कामाचे टेंडर काढले त्याची माहिती मिळाली नाही. व टेंडरही काटले नाही. त्यामुळे आता ५-६ महिन्याचा कालवधी राहिलेला असतील कधी टेंडर काढल्या जातील व कधी कामे होतील. याची माहिती दयावी. अधिकाऱ्यांची बैठक घेऊन शहरातील कोणकोणत्या भागात कामे चालु आहेत अशी विचारणा केली असता फक्त स्पिल ओव्हरची कामे चालु आहेत असे सांगितल्या जाते. सध्या गेल्या ५ महिन्याच्या कालावधीत १२.०० कोटीची तरतुद दिसुन येते आहे. प्रत्येक झोनमध्ये मालमत्ता कर हे वसुली होणेसाठी त्या विभागातील घरांना कर व्यवस्थित लावलेला आहे काय ? कराची वसुलीचे उद्दिष्ट दिलेले होते त्या नुसार मागिल वर्षी ५०% पेक्षाही कमी वसुली झाली याही वर्षी अर्थसंकल्पानुसार वसुली तेवढी होणे आवश्यक आहे करमुल्य निर्धारण आधिकारी या अधिकाऱ्यांचे वरिष्ठ आधिकारी व कर आकारणी करणेसाठी वर्ग-१ चे अधिकारी उपजिल्हाधिकारी संवर्गातील पद भरुन प्रभावी यंत्रणा राबवावी या ठिकाणी सक्षम अधिकारी आहेत. जेणे करुन वसुली करण्यास उपाययोजना आखता येईल. याबाबतची वर्षभराची आकडेवारी व झोननिहाय वसुली हि प्रत्येक महिण्याच्या सभेमध्ये दयावी जकातीचे उद्दिष्ठ रु. ५४ कोटीचे ठेवलेले आहे. मात्र ठेवलेल्या उद्दिष्ठानुसार आजपर्यन्त रु. ५.०० कोटीची तुट दिसुन येत आहे. याबाबतचा जकात वसुली साठी ठोस निर्णय घेणे आवश्यक राहिल संबंधित अधिकाऱ्यांना काय जाब विचारणार याची महिती दयावी. शेंद्राला लागुन नविन उद्योग होतात. अधिकृत कारखान्यांना माहिती पुरविली जात नाही जकातीत बरेच घोळ झालेले आहेत. प्रत्येक बैठकित ४ कोटीचे कामांचा मंजुरी मिळते अंमलबजावणी होत नाही. महानगरपालिकेने अनेक इमारती बांधल्या भाडयाने दिल्या ३ वर्षात किती उत्पन्न झाले मालमत्ता अधिकारी यांनी लक्ष न दिल्याने झळ सोसावी लागते.

दुसरे असे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्र हे उद्घाटन होऊन आठ नऊ महिण्याचा कालवधी संपलेला असुन त्या ठिकाणी आवश्यक लागणारे पदे अदयापही भरणा न करण्याचे कारण शासनाकडे पद मंजुरीचा प्रस्ताव पाठवुनही पदे भरण्यात आली नाही. तेथील पदे प्रशासनाने तातडीने भरावी व संशोधन केंद्र कार्यान्वीत होऊन या ठिकाणी पर्यटकांच्या दृष्टीने त्या वास्तुचा उपयोग होईल. शहरात महानगरपालिकेने अनेक ठिकाणी व्यापार संकुल व इमारती बांधलेल्या आहेत त्या वास्तु तशाच पडलेल्या आहेत. त्यापासुन महानगरपालिकेस उत्पन्नाचे साधन प्राप्त झालेले दिसत नाही.

रतनकुमार पंडागळे : २४ डिसेंबर १९९९ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे उद्घाटन झाले. तेंव्हापासुन आजपर्यन्त हे केंद्र तसेच पडलेले आहे. फक्त उद्घाटन करण्याची घाई करण्यात आली काय ? त्या ठिकाणी प्रशासनातर्फे आवश्यक लागणारे साहित्य पुरवठा कर्मचारी वर्ग, पुस्तके, फनिर्चर इ. अद्यापही पुरविण्यात आलेले नाहीत. आणि त्यामुळे सदरिल केंद्रात मागणी करण्यात आल्याप्रमाणे पुरवठा न केल्याने काहीही करता येत नाही ते केंद्र सुरळीत चालण्यासाठी तेथे मंजुर पदाप्रमाणे प्रशासनाने ते तातडीने भरावीत व जे बांधकाम अद्यापही प्रलंबित आहे त्याचे ही प्रशासनाने तातडीने

कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे अण्णभाऊ साठे वसतीगृह या वर्षी सुरु होणार होते तेथील काही सुविधा न केल्याने ते चालु करण्यात आलेले नाही. अजुन किती कालवधी लागेल याचीही माहिती दयावी, अण्णाभाऊ साठे वस्तीगृहामध्ये लाईटची व्यवस्था का नाही ?

श्री. दलबीरसिंग जबिंदा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथील टेंडर काढणेसाठी अद्यापही कार्यवाही केलेली नाही. त्याचे प्रमाणे या पुर्वी कार्यरत असलेले श्री. पदे यांना टेंडर दिलेले होते. तथापी त्यांना ५ वेळेस नोटीस देवुनही त्यांनी अद्यापही कामास सुरुवात केलेली नाही. नियमामध्ये असे आहे की, एखादया वेळेस गुत्तेदारास नोटीस मिळाली की, त्यास काळया यादीत नांव सामविष्ठ करावे कागते परंतु संबंधित विभाग प्रमुख तसे करित नाही काय कारण आहे समजत नाही दुसरे असे की, उस्मानपुरा येथील गोपाल टि सेंटर जवळ एक गुरुनानकांचे स्मारक तयार करण्यासाठी गेल्या दोन वर्षा पासुन सतत प्रयत्न होत आहेत. आर्किटेक्टने सुध्दा प्लॉन तयार करुन दिलेला आहे. परंतु अद्यापही प्रशासनाचे वतीने टेंडर काढुन कार्यवाही केलेली नाही. याबाबत अति शहर अभियंता यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

मा. महापौर : प्रकल्प संचालक यांनी माहिती दयावी.

प्रकल्प संचालक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे २४ डिसेंबर ९९ ला उद्घाटन झालेले आहे. मध्यंतरी या विषयावर चर्चा झालेली आहे. सर्वसाधरण सभेमध्ये या ठिकाणी पदे भरण्याची मंजुरी मिळाली होती एक सहा ग्रंथपाल, एक लिपीक व एक स्मन्वय ही पदे आहेत ही पदे भरण्याबाबत शसनाकडे पाठपुरावा करण्यासाठी अस्था-१ विभागामार्फत बऱ्याचदा पाठपुरावा करण्यात आलेला आहे आणि मा. आयुक्त यांच्या सहिने मंत्रालयात पत्रे पाठविण्यात आलेली आहेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र कार्यान्वित करणे बाबत आणि त्या ठिकाणी कोणकोणते ॲक्टीव्हीटीज आल्यास याबाबत स. नगरसेवक श्री. रतनकुमार पंडागळे यांनी माजी आयुक्त श्री. बलदेवसिंग साहेब यांच्याकडे एक प्रस्ताव सादर केला होता आणि त्या प्रस्तावाची प्रत माझ्याकडे दिली आहे. त्याची बॉयलॉज पुर्णपणे तयार करुन वरिष्ठांकडे सादर करण्यात आली आहे. गेल्या आठ दिवसापुर्वी त्यावर निर्णय झाल्यानंतर कार्यवाही करणेत होईल.

मा. महापौर : मागे बैठक झाली होती त्यावेळी असे ठरले होते की, एखादा तात्पुरता कर्मचारी कॉम्पुटर करणारा, त्याची नेमणुक करुन कार्यवाही व्हावी ते का केली नाही.

प्रकल्प संचालक : आस्था-१ या विभागाला त्याचे वेळेस इतिवृत्तासहित प्रकरणे पाठविली आहेत व सहा. आयुक्त यांचेशी चर्चा झाली आहे त्यांनी सांगितले की, शासनाकडे मंजुरी साठी पाठविण्यात आले असे सांगितले.

श्री. रतनकुमार पंडागळे : याबाबत मी गेल्या ३-४ वेळेस सभागृहात प्रश्न उपस्थित करुन विचारणा करित आहे. परंतु प्रशासनाकडुन काहीच कार्यवाही होत नाही.

मा. महापौर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या बाबतीत माझे अध्यक्षेतेखाली बैठक झाली होती त्याचे वेळेस मी सुचना केलेल्या होत्या आता शासन निर्णयाची वाट न पाहता जी सभेने मंजुर केलेली तिन पदे आहेत ते

डेपुटेशनने तिन दिवसात प्रशासनाने भरणा करुन त्याबाबतचा अहवाल सर्व पदाधिकारी यांना दयावी.

श्री. सुदाम सोनवणे : शहरामध्ये तिन वेगवेगळे सभागृह बांधलेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रामध्ये कर्मचारी नसल्याचा खुलासा मागविला त्याच प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयात सुध्दा वॉचमन व्यतिरिक्त कुणीही नाही याचाही खुलासा व्हावा.

अति.शहर.अभियंता : उस्मानपुरा येथील गुरुनानक स्मारक तयार करणेसाठी त्या चौकातील ९५% काम झालेले आहे. त्याच्या मध्ये ज्या फेसला ॲक्रेलिक शिट लावायची आहे ते काम थोडे राहिलेले आहे. आणि जे फाऊंटन बसविलेले आहे त्याचे नोउल बरोबर पाणी देत नाही ते बदलावे लागेल तेव्हा येत्या आठवडयात दोन्हीही कामे करण्यात येतील.

मा. महापौर : ठिक आहे. येत्या आठ दिवसात उस्मानपुरा येथील गुरु नानक स्मारक येथील कामाबाबत कार्यवाही व्हावी. आता छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहाल्याबाबत माहिती दयावी.

अति.शहर.अभियंता : छत्रपती शिवाजी पुराणवस्तु संग्रहालय येथे ८ कर्मचारी देनिक वेतनावर काम करित आहेत. त्यांचा पगारही दिलेला आहे. तेथील रितसर कर्मचारी प्रपोजल आम्ही दिलेले आहे. याबाबतचा प्रस्ताव सभागृहा समोर मान्यतेसाठी ठेवण्यात येईल. तसेच अण्णाभाऊ साठे वसतीगृहातील लाईट फिटींगचे टेंडर मंजुरीनंतर कार्यवाही होईल.

मा. महापौर : छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयासाठी जी काही पुस्तके लागतील ती घेण्यात यावी. त्याच प्रमाणे श्री. पुरेकर यांचे मानधन नियमितपणे देण्यात यावे व अण्णाभाऊ साठे वस्तीगृहातील लाईटचे काम न केल्याने वसतीगृह सुरु करण्यास अडचणी येत आहेत तेव्हा अति.शहर.अभियंता यांनी तातडीने कार्यवाही करावी. याबाबतची संचिका मा. आयुक्त यांचेकडे तातडीने पाठवुन मंजुरी घ्यावी.

श्री. काशीनाथ कोकाटे : छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयासाठी ज्या मोहरा दिलेल्या आहेत किती लोकांनी दिल्या याची माहिती सभागृहात दयावी.

श्री. रतनकुमार पंडागळे : २४ डिसेंबर ९९ ला अण्णाभाऊ साठे वस्तीगृहाने उद्‌घाटन झाले ल्यास ८/९ महिन्याचा कालावधी होऊनही लाईट फिटिंगची व्यवस्था होत नाही म्हणजे किती भयानक आहे.

श्री. शेख इसाक जैनोद्दीन : शहरातील जवळपास १००० टपऱ्या बसलेल्या आहेत त्याचे भाडे वसुली होत नाहीत २०० टपरीधारकांकडे अलाटमेंट पत्र असुनही महानगरपालिकेला भाडे दिल्या जात नाही. महानगरपालिकेचे ४ बाय ६ च्या टपरिस परवानगी दिलेली असतांना त्या ठिकाणी टपरी ८ बाय ८ किंवा ८ बाय १० ची आहे. त्या साईजप्रमाणे महानगरपालिकाचे टपरीभाडे ३० ते ४० लाखाचे महानगरपालिकाचे उत्पन्न वाढेल. परंतु गेल्या दोन वर्षापासुन टपरीचे भाडे मालमत्ता विभागातर्फे वसुल केल्या जात नाही त्यामुळे महानगरपालिकाचे नुकसान जवळपास ३ ते ४ कोटीचे होत आहे. जे टपऱ्या अनधिकृत बसलेल्या आहेत त्याचेकडुन रितसर परवानगी देऊन भाडे वसुली करावी ज्यामुळे ५० ते ६० लाखाचे उत्पन्न पुन्हा महानगरपालिकेस मिळेल.

श्री. सुदाम सोनवणे : महानगरपालिकेमध्ये वसुली चांगल्या प्रकारे झाल्यास विकास सुध्दा चांगल्या प्रकारे करता येऊ शकतो. आपल्या महानगरपालिकेमध्ये २ लाख

स्थायी मालमत्ता आहेत. तर किती स्थायी मालमत्तेला कर लागला १ लाख ४१ हजार यांना कर लागला आहे अशी माहिती मिळते या शहरात जवळपास ७० ते ७५ हजार अशा स्थायी मालमत्ता आहेत त्यांना कर लावलेला नाही. सन १९८४ पासुन न्यायालयात महानगरपालिका विरुध्द १४०० प्रकरणे प्रलंबित आहेत तेंव्हा नागरिकांनी दाखल केलेल्या प्रकरणाच्या निकाल ११ वर्षापर्यंन्त प्रलंबित राहिल्यास मनपाचे आर्थिक नुकसान किती होते आहे. याचा विचार करावा. त्याच प्रमाणे पाणीपट्टी वसुली सुध्दा कमी प्रमाणात होत आहे. महानगरपालिकेचे मुख्य जकात उद्दिष्ठ आहे हे सर्व वसुलीचा भाग मिळुन जकातीचे ५३ कोटीचे उद्दिष्ठापैकी १२ कोटीची तुट दिसुन येत आहे. त्यामुळे वसुली प्रभावी रित्या होणे आवश्यक असल्याने मागे जो विचार माजी आयुक्त यांनी आखलेला होता जकातीचे खाजगीकरण याबाबत फेरविचार व्हावा.

श्री. तकी हसनखान : माझ्या वार्डातील सर सैय्यद हॉलचे उद्‌घाटन २६ डिसेंबरला झाले परंतु त्यापासुन महानगरपालिकेस उत्पन्न काहीच मिळत नाही. त्या इमारती बाबत येथील कर्मचारी/अधिकारी यामुळे जवळपास ३० लाख वाया जाते रोज एक दगड जात आहे. लवकर पुर्ण केले तर रु.३०,०००/- मासिक उत्पन्न होईल. परंतु प्रशासन फक्त इमारती बांधुन ठेवते. त्याचे प्रयोजन पुढील काळात काय असावे असे काहीही करित नाही व महानगरपालिकेचे त्यामुळे फार मोठया प्रमाणात नुकसान होते याचा विचार करणे जरुरीचे आहे.

श्री.डॉ. आशा बिनवडे : जवाहर कॉलनी भागात भाजी मंडईसाठी गाळे बांधुन ठेवलेले आहेत. परंतु ते अद्यापही कार्यान्वीत केलेले नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे ार्धिक नुकसान होत आहे. काही नागरिक मालमत्ता करा संदर्भात न्यायालयात गेलेले आहेत. असे किती केसेस प्रलंबित आहेत. त्याची माहिती झोन निहाय दयावी. किती केसेस एका वर्षाभरात प्रलंबित आहेत. आपल्या विरोधात किती केसेसचा निकाल लागला याची माहिती दयावी त्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर दुरुस्तीचे नावा खाली गेले दोन-तिन महिने बंद होते त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. याचे नेमके कारण काय आहे ? या संदर्भात मी पत्र देऊन विचारणा केलेले आहे परंतु त्याचे उत्तर मिळत नाही यास कोण जबाबदार आहे. याचा खुलासा व्हावा.

सौ. साधना सुरडकर : मो. शहानुरवाडी येथे गेले एक वर्षापासुन आरोग्य केंद्र बांधुन पडलेला आहे. ते कधी कार्यान्वीत होईल. त्याचप्रमाणे एक हॉल बांधुन पडलेला आहे. परंतु कार्यान्वीत नाही यास कोण जबाबदार आहे ज्यामुळे महानगरपालिकाचे उत्पन्न मिळत नाही. याचा खुलासा व्हावा.

श्री. अंबादास दानवे : १) सध्या गेल्या ५/६ तासापासुन महानगरपालिकेच्या आर्थिक बाबतीत चर्चा चालु आहे कालच मा. महापौर यांच्या दालनात विकास कामाबाबत बैठक झाली त्या बैठकीत मुख्य लेखाधिकारी यांनी सांगितले की, या वर्षीच्या दिलेल्या उद्दिष्ठानुसार जवळपास १२ कोटीच्या वसुली उत्पन्न कमी झालेले आहे. जर हाच दर कायम राहिल्यास रु. ३६ कोटी पर्यंन्तच वसुली जाऊ शकते. त्यामुळे विकास कामावर फक्त २७ कोटी रु खर्च राहील. याबाबत विरोधी पक्ष नेता यांनाही सखोल चर्चा केली आहे. मागिल वर्षी १५ कोटीचे मालमत्ता चे उद्दिष्ठ ठरविलेले असतांना फक्त ७ $^{१/२}$ कोटीची वसुली झाली

आणि या वर्षी सुध्दा १५ कोटीचे उद्दिष्ठ ठरविण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रत्येक झोनमध्ये वसुली आढावा घेणे आवश्यक आहे कारण झोन अधिकारी मालमत्ता कर वसुलीवर पाहिजे तेवढे लक्ष देत नाहीत. स. सदस्य श्री तकी हसनखान यांनी मागे सांगितले होते की, झोन मधील कित्येक मालमत्तांना कर लागलेला नाही व कित्येक मालमत्ता वसुली केली जात नाही. माझ्या मते ते बरोबर आहे याबाबत झोन निहाय चौकशी करावी २) त्याचप्रमाणे स. सदस्य श्री. मिरा सलामी यांनी केलेल्या सुचनाप्रमाणे आठवडी बाजारा संदर्भात मालमत्ता विभागाने जी बाजार लिलावाची घाई केली त्यामुळे महानगरपालिकाचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसुन येते. तसेच शहरातील होर्ल्डींगच्या संदर्भात सुध्दा मनमानी कारभार झाल्याचे दिसुन येते. ज्या होर्ल्डींग पुर्वीपासुन आहेत मात्र त्यांनी परवानगी घेतली नाही अशा होर्ल्डींगस धारकांकडुन त्यावेळेस पासुन पैसे घेणार आहात काय व शहरातील डिव्हायडर्स मधील ज्या लहान लहान होर्ल्डींगस आहेत त्या बाबतही टेंडर काढुन कार्यवाही करणे योग्य राहिल. ज्यामुळे महानगरपालिकांची वसुलीत तुट दिसुन येत आहे. त्या दराचा निर्णय योग्य रित्या व्हावा.

३) नगररचना विभागाकडे शहरातील बऱ्याच ठिकाणी बांधकाम परवानगीसाठी संचिका दाखल होतात ज्यामुळे बेटरमेंट चार्जेस शहर विकास निधी फार मोठया प्रमाणात वसुली होईल यासाठी परवानगी संचिका तातडीने निकाली काढावे. जेणे करुन महानगरपालिकाच्या उत्पन्नात भर पडेल.

४) संत एकनाथ रंगमंदिर हे काही दिवस बंद अवस्थेत होते. त्यामुळे वसुलीवर परिणाम झाला व त्याठिकाणी एका जाणकार कर्मचाऱ्याची गरज असुन तशा कर्मचाऱ्याची बदली त्या ठिकाणी करावी.

५) शहरातील संशोधन केंद्र हे महानगरपालिकेच्या वास्तु पर्यटकाच्या दृष्टीने चांगले आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात आवश्यक लागणारे कर्मचारी वर्ग तसेच वर्ग तसेच राहिलेले काम तातडीने व्हावे. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज पुरावणवस्तु संग्रहालयाची वास्तु पर्यटकांच्या दृष्टीने पाहण्यासाठी पर्यटक विभागास काळवावे जेणे करुन या शहराचा सौदर्यात भर पडेल.

श्री. वसंत नरवडे पाटील : शहराचा व्याप वाढला मालमत्ता विभागाचे २ भाग करावे. नोंदी साठी पुरेसा स्टाफ पाहिजे छत्रपती शिवाजी पुराण वास्तु संग्रहालयात वाहन तळाची व्यवस्था उद्यानात करावी त्यामुळे पर्यटकात वाढ हाईल. पैटणगेट येथील दुकाने रु. ५००० भरुन अडकवले ते टेंडर रद्द करावे सध्या महानगरपालिकेच्या आर्थिक विकासांच्या दृष्टीने विचार करावयाचा झाल्यास वसुली होणे अत्यंत महत्वाचे आहे. त्याशिवाय शहराचा विकास करणे शक्य नाही. महानगरपालिकेतर्फे ज्या विविध ठिकाणी व्यापारी संकुले गाळे टपरी इ. पासुन मालमत्ता विभागातर्फे वसुली पाहिजे तेवढया प्रमाणात होत नाही. काही स. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे टपऱ्यांचे भाडे गेले २-२ वर्षापासुन वसुल केल्या जात नाही. त्यामुळे महानगरपालिकेला फार मोठी तुट दिसुन येते शहरातील विविध झोन निहाय दिलेले मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली दिलेल्या उद्दिष्ठा निहाय फारच कमी प्रमाणात आहे. १५ कोटीचे उद्दिष्टे ७

कोटी वसुली होते. त्याचप्रमाणे जकातीचे जे उद्दिष्ट रु. ५४ कोटीचे दिलेले आहे. त्यानुसार एप्रिल ते सप्टेंबर पर्यंन्त रु. ५ कोटीची तुट दिसुन येत आहे. शहरातील भाजी मंडई आठवडी बाजार व होर्ल्डींगस बाबतीतही प्रशासनाने चुक केल्याने वसुलीवर परिणाम होत आहे. दर वाढवले तर अडचण येणार नाही निविदा काढले तर बाहेर लोक येतील व जास्त उत्पन्न मिळेल. जे शहरातील महानगरपालिकाने बांधलेले गाळे आहेत त्यांची वसुली दरवर्षी नियमीतपणे होणे आवश्यक आहे. वसुली अभावे प्रशासनाला कोणत्याही प्रकारे विकास कामे करणे शक्य नाही. सभेत ३९ विषय आहेत ठराव मंजुर करावे किंवा कसे हे सभागृहाने ठरवावे. कम्पलेशन केसेस कुणी घेतलेली नसल्यास त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

मा. महापौर : स. सदस्यांच्या वसुलीबाबतच्या भावना फार दिसुन येतात जर वसुली झाली नाही तर महानगरपालिकात पैसाच जमा होणार नाही आणि पैशाच जमा झाला नाही तर आजच्या सभेतील ३९ प्रस्ताव स. सदस्यांनी मांडलेले आहेत त्याचा उपयोग नाही व काम करु शकणार नाही. तेंव्हा प्रशासनाने लक्षात घ्यावे की. वसुली होणे अत्यंत आवश्यक असुन यापुढील सर्वसाधारण सभा वसुलीवर घेण्यात येईल आणि त्यामध्ये प्रामुख्याने मालमत्ता कर पाणीपट्टी जकात व इतर होर्ल्डींग टपरी वसुली वर बैठक घेण्यात येईल. त्यावर चर्चा केली जाईल आणि जर जो अधिकारी वसुली बरोबर करीत नाही. त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करणेस येईल यानंतर टपरी संदर्भात व बाजार टेंडर शॉपिंग कॉम्पलेक्स व गाळे इमारती व क्वॉर्टर बाबत मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

मालमत्ता अधिकारी : टपरी भाडे बाबत त्या जागेवरील टपरी कोणत्या साईजची आहे. ती त्याच्याच नांवाची आहे काय ? याबाबतची तपासणी करुन व भाडे स्विकारणे सुरु केलेले आहे. टपरी धारकांना या संदर्भात नोटीसेस देण्यात आलेल्या आहेत आणि जे टपरीधारक अशा प्रकारचे भाडे भरण्यास तयार नसतील त्यांचेवर कार्यवाही होईल. आठवडी बाजाराचा गुत्ता देणे बाबत महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका असल्याने आचारसंहिते मुळे लिंलाव करता आलेला नाही. या कालावधीत महानगरपालिकाच्या कर्मचाऱ्यांमार्फत आठवडी बाजाराची वसुली करण्यात आली जाफरगेट आठवडी बाजाराचे एकुण १० बाजाराचे एकंदर ८०/- हजार रुपये पिर बाजारची रु ३६/- हजार.

श्री. अफसरखॉन : संबंधित अधिकारी सभागृहाची दिशाभुल करित आहेत. या संदर्भात ते सविस्तर माहिती देत नाही कारण आचारसंहितेच्या काळात सादिया टॉकिज जवळील शॉपिंग सेंटर बनविले. त्यामुळे अशा प्रकरचा खुलासा करणे बरोंबर नाही. बाजार बाबत सविस्तर खुलासा होणे आवश्यक आहे. ज्यांचेकडे २ लाख थकबाकी त्यांनाही दिले आहे.

मा. महापौर : आठवडी बाजारा संदर्भात निविदा का काढण्यात आली नाही.

मालमत्ता अधिकारी : दि. १८.३.२००० रोजी संचिका निविदा काढणेच्या संदर्भात पाठविण्यात आली होती. त्यानंतर ११.४.२००० रोजी मालमत्ता विभागात परत आली. १७.४.२००० उपआयुक्त (म.) यांचेकडे तर २९.४.२००० रोजी मा. आयुक्त यांचेकडे सादर करण्यात आली. आणि ३.६.२००० रोजी मा. आयुक्त यांचे कडुन संचिका मालमत्ता विभागास प्राप्त झाली. त्यानंतर

जाहिर प्रगटन काढुन दि. ८.६.२००० रोजी जाहिर लिलाव करण्यात आला होता अपेक्षित दर प्राप्त न झाल्याने मुख्यलेखा उपआयुक्त (म.) व मालमत्ता अधिकारी यांचे समक्ष लिलाव करण्यात आला होता. मात्र अपेक्षित दर प्राप्त न आल्याने पुन्हा १३.६.२००० रोजी जाहिर प्रगटन देऊन फेर लिलाव करण्यात आला व १८.६.२००० रोजी जाफरगेट आठवडी बाजार ५.५० लाखास तर पीरबाजार ५.१० लाखास आणि चिकलठाणा बाजार २.७६ लाखास लिलाव पध्दतीने देण्यात आला.

श्री. दलबीरसिंग जबिंदा, श्री. केसरखान, श्री. स.अ.मिरा सलामी : आचार संहितेमध्येही अनेक कामे करण्यात आली. आठवडी बाजाराच्या संदर्भात फार मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असुन महानगरपालिकाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. याची चौकशी व्हावी.

मा. महापौर : टेंडर संपण्याच्या तारखेपुर्वी प्रशासनाने पुढील कार्यवाही करणे आवश्यक असते. एवढा विलंब लागण्याचा कारण काय ? तेंव्हा या संदर्भात वेळेवर टेंडर काढलेले नाही. टेंडर नसतांना कुणी वसुली बाजारातील केली याची कल्पना नाही या शिवाय किती वसुली झाली याची माहिती नाही. तेंव्हा यासाठी चौकशी समिती गठीत करण्यात येते.

उप आयुक्त (म.) : बाजार ३१ मार्च पर्यंन्त दिलेला होता. त्यानंतर ३१ मार्चनंतर निवडणुक आचारसंहिता होती ही बाब खरी आहे, आणि त्यामुळे टेंडर काढता आले नाही. त्यामुळे एकुण १० बाजार आपल्या कर्मचाऱ्यामार्फत वसुल करण्यात आली. ही वसुली बरोबर आली नाही. त्याबाबत मालमत्ता अधिकारी व त्यांचे वसुली कर्मचारी यांना ज्ञापन देण्यात आले, दर बाजाराला रेव्हयु घेण्यात आले असता आपली वसुली कमी आहे. व एव्हरेज पेक्षाही वसुली कमी आहे. याबाबतही "कारणे दाखवा नोटीस" कर्मचाऱ्यांना दिलेली आहे. परंतु यामध्ये काही मर्यादा येतात की, जर दोन कर्मचारी आपली वसुली करित असतील तर त्याच्यावर काही लिमीटेशन्स येतात. जेंव्हा टेंडर काढायचे ठरविले होते तेंव्हा पहिले टेंडर काढले. आपण जे म्हणता रु १०/- लाख ६/- लाख एवढी रक्कम न आल्याने पुन्हा दुसरे टेंडर काढुन ओपन टेंडर वर्तमान पत्राव्दारे काढले यामध्ये प्रामुख्याने मुख्य लेखा परिक्षक उपआयुक्त (म.) व मालमत्ता अधिकारी आणि ज्यांनी टेंडर भरले त्यांचे समक्ष टेंडर उघडण्यात आहे. व त्यानंतरही पुन्हा निगोशिएशन्स करुन जे रेट टेंडरला आले होते. त्या रेट वरती पुन्हा निगोधिएशन्स करुन रक्कम वाढवुन ते टेंडर फायनल केले. ही या आठवडी बाजारा बाबतची वस्तुस्थिती आहे.

श्री. स.अ.मिरा सलामी : आठवडी बाजरातील वसुली आपले दोन कर्मचारी करित होते. असे नसुन दोन कर्मचाऱ्या व्यतिरिक्त इतर प्रायव्हेट व्यक्ती वसुली करतांना आढळले.याबाबतची सर्व माहिती प्राप्त असुन आम्हाला खोटे बोलण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही तर सत्य परिस्थिती महानगरपालिकाच्या वसुली बाबत असुन यामध्ये जाणीपुर्वक कर्मचाऱ्यांनी वसुली केलेली दिसते व दुसऱ्यांकडुन वसुली करुन तीत यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे या वेळेस दिसते.

उप आयुक्त (म.) : आठवडी बाजारातील वसुली आपले दोन कर्मचारी करित होते. तथापी काही पुरावा असल्यास द्यावा आम्ही त्याची चौकशी करतो. दुसरा मुद्या म्हणजे होर्ल्डींग बाबत उपस्थित झालेला आहे. शहरामध्ये जे जाहिरात फलक (होर्ल्डींगस) आहेत त्याचे दर अतिशय कमी आहेत. दिड रुपया प्रती

चौ. मीटर असे आहेत आणि गेले अनेक वर्षा याच दराने आपण जाहिरात दाराकडुन वसुल करतो. या अर्थसंकल्पात असे सांगण्यात आले की जाहिरात दर अतिशय कमी असल्याने त्याचे टेंडर काढावे स. सदस्य श्री. खुंगर यांनी जशी सुचना केली सिडको कार्यालयात जशी सुचना केली सिडको कार्यालयात जशी पध्द्त अवलंबिल्या जाते त्या पध्द्तीनेच. आचारसंहितेमध्ये टेंडर काढले जात नाही. आणि जाहिर प्रगटन सुध्दा वर्तमान पत्राव्दारे काढता येत नाही.

श्री. स.अ. मिरा सलामी : सादिया काम्लेक्स येथील निविदा आचार संहितेत काढण्यात ५२ दुकानाचा लिलाव केला.

मा. महापौर : या हाल्डींग संदर्भात व आठवडी बाजाराचे संदर्भात एका समितीची गठण करण्यात येते. सदरील समिती पुढील सर्वसाधारण सभेपुढे चौकशी करुन आपला अहवाल सादर करावा. समितीमध्ये स. सदस्य श्री. प्रशांत देसरडा दलबिरसिंलग जबिंदा व शेख ईसाक जैनोद्यीन नंदकुमार घोडेले तसेच अधिकारी वर्गातुन प्रकल्प संचालक श्री. विजय जावरे व उद्यान अधिक्षक श्री. जेएम. भडके यांची चौकशी समितीत समावेश करण्यात येते.

श्री. गणेश तांबे : महानगरपालिका गेट समोर काही कर्मचारी उपोषनास बसलेले आहेत. त्यांचे बाबतीत निर्णय घ्यावा.

मा. महापौर : संबंधित कर्मचाऱ्यांबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल.

श्री. बाबासाहेब थोरात : माझ्या वार्डामध्ये टपऱ्या दिलेल्या आहेत. परंतु त्याटपरीचे वसुली महानगरपालिके तर्फे केली जात नाही याबाबत मालमत्ता आधिकारी यांनी आतापर्यन्त किती वसुली केली याबाबतची माहिती द्यावी.

मा. महापौर : जकातमध्ये जवळपास रु ५.०० कोटीची वसुली दिलेल्या उद्दिष्टानुसार कमी झालेली आहे. असे आजच्या स. सदस्यांच्या वसुली चर्चेनुसार समजते. तेव्हा वसुली संदर्भात सभागृहात चर्चा होणार आहे.

श्री. तकी हसनखान : आय.आर.सी. प्रमाणे शहरातील होर्ल्डींगज लावावे. परंतु या ठिकाणी तसे करित नाही.

श्री. शकिल पटेल : माझ्या वार्डामध्ये गारखेडा परिसरात एका कॉम्पलेक्सला महानगरपालिकाने बांधकाम परवानगी दिलेली आहे. व त्यांचे महानगरपालिकाने बांधकाम परवानगी दिलेली आहे. व त्याचे बांधकाम होत आहे. त्या जागेचे क्षेत्र बांधकाम परवानगी ७००० चौ. फुट चे आहे मात्र प्रत्यक्षात बांधकाम १४००० चौ. फुट केले आहे. याकॉम्पलेक्सला परवानगी २६.१२.९५ ला मिळाली आहे. या बांधकाम परवानगीची संचिका मागवुन सभागृहात सिल करावे. कारण सदरील बांधकाम परवानगी चुकीचे दिलेले असुन बांधकामही अनधिकृत रित्या करित आहे. याबाबतचा खुलासा व्हावा. गारखेडा परिसरात अनधिकृत वसाहती २० बाय ३० चे प्लॉट पाडुन घरे बांधलेली आहेत. याठिकाणी घरे गेल्या १५.०० वर्षापासुनची असुन हुसैन कॉलनी मधील लोकांना मालमत्ता कर आकारणी करुन त्यांना ड्रेनेज/लाईट/पा.पु. व रस्ते सुविधा पुरविण्यात याव्यास व हा भाग स्लम घोषित करावा.

श्री. भगवान रगडे : मी विचारणा केल्यानुसार महानगरपालिका गेटसमोर काही नागरिक उपोषणास बसलेले आहेत व मोर्चे निदर्शने करित आहेत. त्यांचे बाबतीत सभागृहात निर्णय व्हावा दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना सर्व्हे करुन त्यांना

शासन योजनेनुसार कर्जे व अनुदान बॅकेव्दारे मिळते. परंतु प्रकल्प विभागातर्फे जेष्ठतेनुसार बॅकाना फाईली पाठवित नाही वार्डात डुकरांचा सुळसुळट आहे. त्याचा बंदोबस्त नाही. (याच वेळेस स. सदस्याच्या जोरात बोलण्यावरुन इतर स.सदस्य त्यांना खाली बसविण्याचे सांगतात त्यामुळे सभागृहात जोरजोरात आवाज होतो काहीही ऐकु येत नाही.)

मा. महापौर : स. सदस्य श्री. भगवान रगडे आपणास विनंती करण्यात येते की अगोदर आपण वसुन बोलावे. आपले सुचनेनुसार चर्चा करता येईल. परंतु सभागृहात बोलतांना योग्य व विचारपुर्वक आपले मत मांडावे. सध्या उपआयुक्त येऊन चर्चा करतील व सभा संपल्यानंतर मी येईल सध्या स. सदस्य श्री. भगवान रगडे यांनी बाहेर जावे. त्यांचे एक दिवसाचे सदस्यत्व रद्द करण्यांत येते आपली बोलण्याची पध्दत बरोबर नाही. सुरक्षा रक्षकांना सुचना देण्यात येते की सदस्यांना बाहेर काढावे. (याचवेळी काही स. सदस्य मा. महापौर यांनी स. सदस्य श्री. भगवान रगडे यांचे एक दिवसाचे सदस्यत्व रद्द केल्याचे जाहिर केल्याने ते परत घेण्याचे सांगतात. यावेळी आपसात बोलणे चालु असते. काहीही ऐकु येत नाही.)

श्री. अंबादास दानवे : मा. महापौरांना विनंती की स. सदस्य श्री. भगवान रगडे हे जनतेच्या प्रश्नासाठी या ठिकाणी आलेले आहेत. त्याचे एक दिवसांचे निलंबन रद्द करुन त्यांना बोलण्याची संधी द्यावी.

मा. महापौर : ठिक आहे स. सदस्यांच्या सभागृहातील भावना लक्षात घेता स. सदस्य श्री. भगवान रगडे यांचे निलंबन रद्द करण्यात येते आता स. सदस्यांनी आपल्या काय भावना आहेत ते व्यक्त करावे.

सौ. निखल परवीन ईजाज अली : महानगरपालिका हद्दीमध्ये जेवढे मनपाचे दवाखाने आहेत जसे डी.सी.आे. व डी.सी.एम. स्त्री डॉक्टर पाहिजे आहे कारण सदरील दवाखान्यात जास्त करुन स्त्री व लहान मुलेच दवाखान्यात इलाजासाठी जातात. त्या ठिकाणी इलाजासाठी गेले असतार तेथील डॉक्टर म्हणतात नाही आम्ही एम.डी. पॅथालिस्ट आहोत आम्ही आपणास काहीही देवु शकत नाही. असे बोलुन औषध देवुन टाळाटाळी केल्या जाते. त्यांना आम्ही म्हटले की, आमचे बावी चेक करा पंरतु टाळाटाळ करतात व म्हणतात आपण बाहेरिल खाजगी ठिकाणी जाऊन चेकअप करावे. म्हणजे वार्ड क्र. ६६ मधील दवाखाना जो आहे. तेथील डॉक्टराची ही तक्रार आहे. या ठिकाणी जानक्नॉलॉजी डॉक्टर असावा.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी : जुनाबाजार येथील मनपाचा दवाखान्यात वैद्यकिय अधिकारी हे पॅथालॉजिस्ट आहेत. आपल्या कडील ज्या तीन जागा पॅथालॉजिस्टच्या आहेत त्यापैकी नेहरुनगर व सिल्कमिल कॉलनीला दुपारच्या वेळेस पॅथालॉजिस्ट म्हणुन काम करतात. व सकाळच्या वेळेतही काम करतात. त्यांना मेडिसिनचे माहिती नाही त्या ठिकाणी स्त्री डॉक्टर आहेत त्या ठिकाणी जामनाकालॉजी डॉक्टरची व्यवस्था करता येईल.

श्री. स. अली मिरा सलामी : स. सदस्य श्री. भगवान रगडे यांनी गेल्या ३-४ महिन्यापासुन त्यांच्या वार्डातील डुकरांच्या सुळसुळटा बाबत सभागृहात प्रश्न उपस्थित केला. परंतु मी तर गेल्या २ १/२ वर्षापासुन त्यांचा बंदोवस्त व्हावा अशी सारखी तक्रार संबंधित अधिकाऱ्यांकडे करीत आहे. परंतु काहीही कार्यवाही होत नाही. पशुधना विकास अधिकारी यांना पत्र देवुनही काहीच कार्यवाही

करीत नाही. त्यांना वैयक्तीकरित्या मी भेटुन सांगितले की, माझ्या वार्डात वालमीकी समाज फार मोठया प्रमाणत राहतात तेंव्हा आपल्या विभागामार्फत कार्यवाही करावी. परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही बाब मनावर घेतली नाही. उलट माझ्या सोबत वाद घातला वर्तन योग्य नाही. पशुधन विकास अधिकारी हे जनावरांचे डॉक्टर असुन ते पशुखाद्यामध्ये भ्रष्टाचार करतात याबाबत प्रत्यक्षात पाहणी करावयाचे झाल्यास सकाळच्या वेळेत पाहणी करावे. जनावरांना लागणारे खाद्याचा कोटा काय आहे व पशुधन अधिकारी कशा प्रकारे खाद्य देतात तेंव्हा पशुधन अधिकारी यांच्या वागणुकीबाबत सभागृहात खुलासा व्हावा त्यांचेवर कार्यवाही व्हावी. (याच वेळेस काही स. सदस्य पशुधन विकास अधिकारी यांचे वर कार्यवाही करावी. असे जोर जोरात बोलतात.)

श्री. भगवान रगडे : माझ्या वार्डामध्ये डुकरांचा अतिशय सुळसुळाट आहे. त्यांना बंदोबस्त करणेसाठी मी वारंवार पत्र देऊनही संबंधित अधिकाऱ्यांनी काहीही कार्यवाही केली नाही. येथील नागरिकांना डुकरांच्या सुळसुळाटाने आरोग्य घोक्यात येण्याचा संभव आहे. याची दक्षता घ्यावी. त्याच प्रमाणे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत जे बँकांना प्रकरणे दरिद्रय रेषे खालील कुटुंबातील लोकांचे कर्जे घेण्यासाठी पाठवितात. ते ज्यांचे फॉर्म जेष्ठतेप्रमाणे आलेत अगोदर बॅकांना फॉर्म पाठविण्याचाी शिफारीस करावी तसेच माझ्या वार्डातील शाळेमध्ये शिक्षकांची संख्या कमी आहे ते प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्रीमती शाहिन जाफर : माझ्या वार्डात महानगरपालिकेची दोन शाळा आहे. परंतु विदयार्थ्यांच्या संख्येच्या मानाने शिक्षक वृद कमी आहेत. याबाबत कार्यवाही व्हावी. विदयार्थी संख्या ४८० व ३०० असुन तेथे प्रत्येकी ३ शिक्षक देण्यात आलेले आहेत एक शिक्षक ३ वर्ग असा प्रकार चालु आहे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. भगवान रगडे यांचे पत्र डुकरांचा सुळसुळाट वार्डात असल्याचे पत्र आले. याबाबत मी स्वत: संबंधित पशुधन विकास अधिकारी यांना सांगितले. लवकर टेंडर काढण्यास सांगितले टेंडर काढले आहे. स. सदस्य श्री रगडे व मिरा सलामी इतर सदस्यांच्या तक्रारी डॉ. रझवी बाबत आहेत. त्यामुळे प्रशासनाने श्री. डॉ. रझवी यांना कारणे दाखवा नोटीस देवुल खुलासा मागवावा.

सौ. कुसुमबाई खरात : माझ्या वार्डात उर्दु शाळेत २ शिक्षक आहेत व एकुण ७ वर्ग आहेत परंतु त्या ठिकाणी आवश्यक लागणारे सोयी नाही रोजाबाग येथील साफसफाई व्यवस्थित होत नाही. तेंव्हा मंजुर वाढवुन दयावे. माझ्या वार्डात ३० लाईट आहे पैकी २८ लाईट बंद आहेत या बाबत पत्र देवुनही कार्यवाही होत नाही मी दि. २०.७.२००० ला पत्र दिले होते. त्याचे उत्तर ५.८.२००० ला मिळाले परंतु मंजुर वाढवुन दिले नाही.

श्री. रतनकुमार पंडागळे : शाळेचा मुद्या उपस्थित झाला जिल्हा परिषद व महानगरपालिकेच्या जागेचा वाद चालु आहे महानगरपालिकेने शाळेची जागा रिकामी करावी म्हणुन पत्र पाठविले का ?

श्री. सुनिल पंडागळे : औरंगाबाद शहरात ५३ घोषित झोपडपट्टया आहेत. या भागासाठी अनेक नागरिकांच्या विविध सदस्यांच्या तक्रारी येत असतात. विद्युत बाबतही अनेक तक्रारी आहेत. या विद्युत विभागात फार मोठया प्रमाणात भ्रष्टाचार आहे असे दिसते आतापर्यंन्त स. सदस्यांनी दिलेल्या पत्रानुसार किती

वार्डनिहाय किती फोकस लावले याची माहिती दयावी. विदयुत फोकस वा टयुबलाईट न लावतातच बिले मंजुर करुन उखळल्या जाते. याबाबत चौकशी व्हावी.

मा. महापौर : उपआयुक्त (म.) यांनी चौकशी करुन लवकरात लवकर अहवाल सभागृहाला सादर करावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : याठिकाणी सकाळपासुन वसुली संदर्भात चर्चा करुन प्रशासनातील विविध विभागातील वसुली आढावा घ्यावयाची माहिती विचारणा न करता इतर बाबींवर चर्चा होत आहे. याबाबत मा. महापौर यांचा निषेध म्हणुन आम्ही सर्व स. सदस्य सभात्याग करित आहोत. कारण जकातीमुळे आजपर्यन्त दिलेल्या उद्दिष्टनुसार रु. ५/- कोटीची वसुली कमी पडल्याने शहरातील विकास कामे कोणत्या कारणाने कामे करणार प्रशासनास विचारणा करणे आवश्यक आहे. तसेच झोननिहाय मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीची माहिती सादर करावी. याबाबत उपआयुक्त (म.) यांनी माहिती दयावी.

उपआयुक्त (म.) : मालमत्ता कराबद्दल दर महिन्याला मालमत्ता व पाणीपट्टी कराची वसुली जी होते. त्याची आकडेवारी याप्रमाणे.

| | मालमत्ता | पाणीपट्टी |
|---|---|---|
| एप्रिल | ३१,९१,०००/- | ३१,३१,०००/- |
| मे. | ३२,८६,०००/- | २३,९५,०००/- |
| जुन | ३०,२०,०००/- | १८,२३,०००/- |
| जुलै | ५२,५०,०००/- | ३१,८४,०००/- |
| आगस्ट | ३४,६९,०००/- | ३३,९७,०००/- |
| सप्टेंबर-१५ तारखे पर्यन्त | ३७,३८,०००/- | ११,२१,०००/- |

एवढी वसुली झालेली आहे. आपली माहितीसाठी सप्टेंबर अखेरपर्यन्त मालमत्ता कराची मागिल वर्षी २.७१ लाख वसुली झाली तर पाणीपट्टी १.५५-१.५० तेंव्हा २.६४ या वर्षी १५ सप्टेंबर मालमत्ता वसुली विचारात घेता गतवर्षाच्या तुलनेत किंचितशी वाढ झाली आहे. या वर्षा एप्रिल महिना हा निवडणुकी मध्ये गेलेला असल्याने वसुलीवर परिणाम झाला आणि मा. महापौर व मा. पदाधिकारी यांची निवड व इतर निवडणुका असल्याने संपुर्ण मे महिना आपण करत होतो. त्यामुळेही थोडीशी वसुली कमी झालेली दिसते. परंतु आता या पध्दतीने आपण जर गेले तर मालमत्ता कर सध्या २.६४ कोटी व पाणी पुट्टी १.५० कोटी आहे. म्हणजे असुन सहा महिण्याच्या कालावधीत रु. १२.०० कोटी वसुल करावयाची आहे. रु. २.०० कोटी प्रत्येक महिण्याला आम्ही उद्दिष्ट ठरविलेले आहे त्यानुसार वसुलीच्या कामास सुरुवात केलेली आहे. वसुली करण्यासाठी प्रत्येक झोनचे झोन अधिकारी व त्या ठिकाणी नेमण्यात आलेले झोनल आयुक्त यांना जबाबदार धरण्याचे त्यावेळचे आयुक्त यांनी आदेश दिलेले होते. त्याप्रमाणे आता दर १५ दिवसाला सर्व विभाग आयुक्तांची बैठक घेवुन वसुलीचा आढावा घेण्यात येतो. मागिल मार्च महिन्यात २.१९ कोटी वसुली झाली होती. एकटया मार्च महिन्यात फक्त या वसुलीचा निष्कर्ष असा निघतो की, साधारण जानेवारी,फेब्रुवारी व मार्च महिण्यात वसुली आपण जास्त करतो.

आणि कर्मचाऱ्यांची संख्या सुध्दा आपण वसुलीसाठी डिसेंबर नंतर वाढवितो मी आपल्याशी सहमत आहे की, वसुलीचे प्रमाण अत्यंत कधी व असमाधानकारक आहे. फक्त ३.०० कोटीने आजच्या तारखेपर्यंन्त आणि १२.०० कोटीचे उद्दिष्ट येत्या सहा महिण्यात काढावयाचे आहे त्यासाठी नियोजनबध्द प्रयत्न आम्ही करित आहोत. मा. सभागृहाने ठरविल्याप्रमाणे वसुलीमध्ये काही कर्मचाऱ्यांनी कुचराई केलयास दंडानिय कार्यवाही आम्ही करणार आहोत. माहे एप्रिल मे, व जुन महिण्यात नागरिकांना डिमांड नोटीस बजावण्याचे काम करित आहोत.

श्री. कोकाटे काशिनाथ : मालमत्ता कराचे उद्दिष्ट आपण रु. १५ कोटीचे ठेवलेले आहे व वसुली मात्र आजच्या तारखेत धिम्या गतीने होत आहे तेंव्हा मार्च अखेर पर्यंन्त दिलेले उद्दिष्ट पुर्ण होईल. काय ?

सौ. छायतिलक लिलावती : मो. संजयनगर येथे घाणीचे साम्राज्य आहे त्या ठिकाणी साफसफाई व्हावी. ड्रेनेजचे पाणी वाहुन जाणेसाठी नाल्या खोदुन ठेवलेले आहेत. त्या नाल्याचे काम थांबलेले आहेत ते पुर्ण व्हावे.

सौ. कुसुम खरात श्री. रगडे भगावन : काही नागरिकांनी भेटुन निवेदन देण्यासाठी या ठिकाणी सभा तहकुब करुनविऐदन स्विकारावे.

मा. महापौर : जकात वसुलीबाबत जकाता आधिक्षक यांनी माहिती दयावी.

जकात अधिक्षक : सध्या पावसाळा सुरु असल्याने जकातीवर परिणाम झालेला आहे व आता पुढील महिण्यात दसरा, दिवाळी सण येणार आहे. त्या वेळी जकातीची वसुलीस वाढ होणार आहे. सध्या दिलेल्या उध्दीष्टनुसार थोडे कमी आहे. गतवर्षीच्या तुलनेत १०% वाढ आहे. उध्दिष्ट प्रमाणे १५% कमी आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : संबंधित जकात अधिक्षक पावसाळयामुळे जकात वसुली कमी झ ााल्याचे कारण सांगतात हे मा पटण्यासारखे नाही व प्रशासनातर्फे दिलेला खुलासा योग्य वाटत नाही व सभागृहाची दिशाभुल करु नये.

श्री. हिदायत अली : शहर किती वाढते व वसुली एवढया कमी प्रमाणात वाढते. पावसामुळे घट होते हे बोलणे बरोबर नाही.

श्री. अंबादास दानवे : या वर्षी अर्थसंकल्पात जकातीचे उध्दिष्ट ५४ कोटीचे वसफलीसाठी उध्दिष्ट ठेवलेले आहे.

सौ. कुसूम खरात श्री. भगवान रगडे : सभा तहकुब करुन शिष्टमंडळाचे निवेदन स्विकारावे.

मा. महापौर : सभा तहकुब करण्यात येते व पुढील तारीख नंतर ठरविण्यात येईल. याबरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने आजचे कामकाज संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | महापौर, |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद

**दिनांक ३०.९.२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवत्त. शनिवार दिनांक ३०.९.२००० रोजी महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मा. महापौर डॉ. भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील "प्रबोधनाकार केशव सिताराम ठाकरे" सभागृह येथे सकाळी ११.३० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सीमेला अधिकारी वर्ग यांच्यासह खाली प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स. श्री. वसंत पांडुरंग नरवडे
२) स.स. श्री. अशरफ मोतीवाला
३) स.स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४) स.स. श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स. श्री. तांबे गणेश रामच्रंद
६) स.स. श्री. साजेदा बेगम विख्तार अहेमद
७) स.स. श्री. औताडे रावसाहेब ममतु
८) स.स. श्री. रगडे भगवान दगडुजी
९) स.स. श्री. शिंदे राजु रामराव
१०) स.स. श्री. कावडे साहेबराव राणुबा
११) स.स. श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२) स.स. सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१३) स.स. सौ. धायतिलक लिलावती बाळासाहेब
१४) स.स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१५) स.स. श्री. नुसरत बानो फिरोजखान
१६) स.स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१७) स.स. सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१८) स.स. श्री. शे. शकील पटेल शे. बुढन पटेल
१९) स.स. श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे
२०) स.स. श्री. तायडे पांडुरंग यशवतराव
२१) स.स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२२) स.स. सौ. साधना गणेश सुरडकर
२३) स.स. सौ. मोरे जयश्री कुमारराव
२४) स.स. श्री. सावंत मधुकर दामोधर
२५) स.स. सौ. ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२६) स.स. श्री. जबिंदा दालबिरसिंग रणजिसिंग
२७) स.स. श्री. साळवे मणिक लक्ष्मण
२८) स.स. श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२९) स.स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
३०) स.स. श्री. अय्युब खॉ सरदार खॉ
३१) स.स. श्री. रशिद अ. सत्तार
३२) स.स. श्री. जैन विकास रतलाल
३३) स.स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल

३४) स.स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
३५) स.स. श्री. आनंद विनायकराव तांदुवाडीकर
३६) स.स. सौ. रशिदा बेगम गफ्फ़र यार खान
३७) स.स. श्री. पंडागळे सुनिल बुयवेल
३८) स.स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३९) स.स. श्री. ताटे भाऊसाहेब पुंडलिक
४०) स.स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
४१) स.स. श्री. नासेरखॉन सरदार खॉन
४२) स.स. श्री. सोनवणे सुदाम रामदास
४३) स.स. सौ. खरात कुसुमबाई दौलत
४४) स.स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४५) स.स. सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४६) स.स. श्री. सुरगोनिवार नारायण चंद्रय्या
४७) स.स. सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
४८) स.स. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
४९) स.स. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
५०) स.स. सौ. संगिता बाळु मैद
५१) स.स. श्री. नासीरखान अ. रहमानखान कुरेशी
५२) स.स. सौ. शाहीन जफर महमुद जफर
५३) स.स. सौ. दाणे चंद्रभागाबाई भगीरथ
५४) स.स. श्री. ओक जयवंत केशवराव
५५) स.स. श्री. स. सलीम स. युसुफ
५६) स.स. श्री. तकीहसन खान कासीम हसन खान
५७) स.स. श्री. गाजी सादोद्यीन गाजी जहीर अहेमद
५८) स.स. श्री. मिर हिदायत अली मिर बसालत अली
५९) स.स. श्री. शे. ईसाक जैनाद्यीन शे.
६०) स.स. श्री. अफसर खान यासीन खान
६१) स.स. सौ. सुलताना बेगम चॉंदखॉ
६२) स.स. श्री. लकडे भरत श्रीपती
६३) स.स. श्री. शे. मुनाफ शे. यासीन
६४) स.स. श्री. सलीम पटेल संमशेर पटेल
६५) स.स. श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान
६६) स.स. श्री. तुळसी बागवाले किशोर
६७) स.स. श्री. जगदिश कन्हैय्यालाल सिध्द
६८) स.स. सौ. बबीता सुभाष कागडा
६९) स.स. श्री. स. अली सलामी स. मिरा सलामी
७०) स.स. श्री. तनवानी किसनचंद लेखराज
७१) स.स. सौ. निखत परवीन ईजाज अली

स्विकृत सदस्य
१) श्री. घडामोडे भगवान देविदास

२) श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
३) श्री. खुंगर सुरजीतसिंग तिलकराज
४) श्री. धिल्लन तरवेद्रसिंग महेंद्रसिंग
५) श्री. सौ. सलमा बानो मिर मो. अली

संवाद :

मा. महापौर : विषय पत्रिकेवर अगोदर चर्चा करावी नंतर जनरल चर्चा करता येईल (याचवेळी स. सदस्या सौ. कचराबाई लोखंडे यांनी गढुळ पाण्याने भरलेल्या पिण्याची बाटली सभागृहात आणतात व सर्वांना दाखतात या संदर्भात योग्य खुलासा बाबत मा. महापौर यांचेकडे मागणी करतात यात इतर ही काही स. सदस्य सहभागी झाले होते.)

सौ. कचराबाई लोखंडे : वाल मधील पुर्ण पाणी यात जाते व पाणी दुषीत होऊन त्यात आळया झाल्या आहेत.

श्री. कुमावत अविनाश : पाण्याच्या संदर्भात अगोदर चर्चा करावी नंतर विषय पत्रिका मंजुर करावी पुंडलिक नगर येथील हे घाण पाणी असुन यात अळया पडलेल्या आहेत.

मा. महापौर : कार्यकारी अभियंता श्री. एम.डी. सोनवणे यांनी ही पाण्याची बाटली पाहुन घ्यावी व असे दुषीत गढुळ पाणी कसे येते. या संदर्भात सभा संपल्यानंतर तात्काळ त्या ठिकाणीह जाऊन पाहणी करुन कार्यवाही करावी असे पाणी पिल्यावर रोगराई पसरेल.

श्री. अंबदास दानवे : सदर पाणी हे पुंडलिकनगर भागातील गजाननगर भागातील असुन प्रत्यक्ष नळाच्या तोटीतुन घेतलेले पाणी आहे. अशा प्रकारचे पाणी कशामुळे येते चौकशी झाली पाहिजे व संबंधितावर कार्यवाही केली पाहिजे.

श्री. अफसरखान यासीनखान : अगोदर जनरल चर्चा करावी नंतरच विषय पत्रिकेवरिल विषयास मंजुरी घ्यावी. शहरातील अर्वच विकास कामे होण्याची कार्यवाही प्रलंबित आहे. बऱ्याच संचिका मा. आयुक्तांच्या मंजुरी विना पडुन आहेत.

श्री. जयवंत ओक : अर्थसंकल्प मंजुर केल्या पासुन एका ही वार्डात विकास कामे झालेले दिसुन येत नाही सर्वच विकास कामे ठप्प आहेत. या संदर्भात अधिकाऱ्याकडुन खुलासा घ्यावा नंतर विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

श्री. अफसरखान यासिनखान : बरेच प्रस्ताव या अगोदर मंजुर झाले त्यानुसार कोणतेही विकास कामे झालेले दिसत नाही विकास कामे होणार की नाही. सर्व संचिका सही विना पडुन आहेत.

मा. महापौर : विषय पत्रिकेवर चर्चा करुन मंजुर केल्यानंतर जनरल चर्चेसाठी वेळ देण्यात येईल. आजच्या बैठकीस मा. आयुक्त हे पुर्णवेळ येथे बसणार आहे. व आपले प्रश्न ऐकुण घेणार आहे.

श्री. जयवंत ओक : नुसती विषय मंजुर करुन चालणार नाही तर विकास कामासाठी पैसा पाहिजे मागील बैठकीत ज्या ज्या विषयावर मंजुरीचे निर्णय झाले त्या संदर्भात काय कार्यवाही केली स्वेच्छा निधीतुन कामे करण्याचा निर्णय झाला अद्याप कार्यवाही सुरु झाली नाही.

मा. महापौर : हि तहकुब सभा आहे मागील वेळी दिवस भर बैठकीत चर्चाच झाली आता विषय पत्रिका वरील विषय मंजुर करणे जरुरीचे आहे. त्यानंतर जनरल चर्चा करता येईल. वसुली संदर्भात एक विशेष बैठक आपण घेणार आहोत

त्यात चर्चा करता येईल आता अगोदर विषय पत्रिकेवर चर्चा करावी नंतर जनरल चर्चा करता येईल विषय क्र. १ वर बोलावे.

**विषय क्र. ७१/१** : दि. २७,२८ जुलै १९,३१ ऑगस्ट २००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद :

श्री. सुदाम सोनवणे : इतिवृत्तातील पान क्र. १६ वर पस्ताव स्थगित ठेवला आहे संबंधित मालकास चर्चेसाठी बोलवण्यात यावे अशी दुरुस्ती करण्यात यावी.

मा. महापौर : दुरुस्ती करण्यात येते.

श्री. स. अली मिरा सलामी : दि. १९.८.२००० च्या इतिवृत्तातील पान क्र. १० ठराव क्र. ४६/५ नुसार कायदेशिर बाबी तपासुन कार्यवाही करावी असा ठरावात उल्लेख आला या संदर्भात स. स. श्री कोकाटे यांनी सुचना केली होती की खासदार निधीतुन अनधिकृत वस्त्यामध्ये विकास कामे केली गेली त्यावेळेस कायदेशीर बाब नव्हती काय ? सुचना करुन सुध्दा ठरावात कायदेशिर शब्द वापरण्यात आला ती वगळण्यात यावा व या आगोदर ७५% विकास कामे झालेली आहे. आताच एखादा कामासाठी कायदेशीर बाबी हा शब्द टाकुन कार्यवाही करणे योग्य होणार नाही. जेथे ७५% सुविधा दिली तेथील कामे मंजुर करावी अशी दुरुस्ती करण्यात यावी. ७५% सुविधा दिली तर इतर सुविधा देण्यास हरकत नसावी.

मा. महापौर : या ठरावातील "कायदेशीर बाबी तपासुन हे शब्द वगळण्यास दुरुस्ती करण्यात येते.

श्री. नंदकुमार घोडेले : इतिवृत्तावरील पृष्ठ क्र. ६ वरील ठरावानुसार प्रशासना मार्फत सविस्तर माहितीसह प्रस्ताव सादर करण्यात येईल असे ठरले प्रस्ताव सादर केला नाही.

मा. महापौर : या प्रस्तावा संबंधी माहिति आलेली आहे पुढील बेठकीत प्रशासनातर्फे हा प्रस्ताव ठेवण्यात यावा व वरील प्रमाणे ज्या सुचना केलया त्या नुसार दुरुस्ती सह इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन विषय क्र. १ मंजर करण्यात येतो.

**ठराव क्र. ७१/१** : दिनांक १९.८.२००० च्या सर्वसाधारण सभेतील १) ठराव क्र. ४६/५ मधील "तथापी या संबंधात कायदेशीर बाजु तपासुनच पुढील कार्यवाही करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले "हे वाक्य वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. २) ठराव क्र. ५३/१२ मध्ये "सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा" या ऐवजी संबंधित मालकास चर्चेसाठी बोलवुन पुढील कार्यवाही करण्यात यावी अशी वाढ करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वरील दुरुस्तीहस दिनांक २७.७.२०००,२८.७.२०००,१९.८.२००० आणि ३१.८.२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

विषय क्र. ७२/२ : मुख्यलेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शासन परिपत्रक क्र. जीईएन १०९९/२२५८/प्र.क्र. ७०/९९ नवि-२४ दिनांक ११ नोव्हेंबर,१९९९ अन्वये राज्यातील महानगरपालिकांनी त्यांना ज्या प्रमाणात शक्य असेल त्या प्रमाणात साधन संपत्तीत वाढ करण्यासाठी सेवासुविधांचे दर, इतर शुल्क अशा प्रकारे अद्ययावत करावेत की

जेणेकरुन सुविधा पुरविण्यासाठी येणारा खर्च त्यामधुन भागविता येईल यासाठी प्रत्येक महानगरपालिकेने दर तीन वर्षांनी स्वतंत्र अशी समिती स्थापन करावी व त्या समितीला "दर सुधार समिती" असे संबोधण्यात यावे.

१) महानगरपालिकोच्या उत्पन्नाच्या बाबी : सध्याचे प्रचिलत धोरणानुसार मनपाचे नियमित उत्पन्नाचे स्थापित स्त्रोत खाली प्रमाणे आहे.

अ) कार १) मालमत्ता कर : (यामध्ये करासह मनपा शिक्षण कर साफसफाई कर, पथकर, जल लाभकर, जलनि:सारण कर, अग्निशमन कर इ. चा समावेश आहे.)

२) जकात

ब) भाडे ३) महानगरपालिकेच्या मालकीचे मिळकती करिता मिळणारे भाडे

क) सेवा आकार शुल्क : ४) विकास कामकरिता घेण्यात येणारी विकास खर्च रक्कम

५)विकास निधी शुल्क

६) मनपाकडुन पुरविण्यात येणाऱ्या सुविधा

उदा. उद्यान, पोहण्याचा तलाव, वाचनालय इ. कडुन घ्यावयाचा आकार शुल्क

७) इतर.

२) खर्चाच्या बाबी :

अ) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४३ चे कलम ६३ अन्वये मनपास पार पाडावयाच्या सर्व कर्तव्यासाठी लागणारा खर्च

ब) प्रत्यक्ष जमिन विकासाची कामे.

क) सुविधा पुरवितांना/ सुविधा विकसीत करण्यास येणारा खर्च तसेच त्यांचे नियमित दुरुस्ती /देखभालिचा खर्च.

३) दर सुधार समितीचे अपेक्षित कार्य :

२) मध्ये नमुद सुविधा करिता व मुलभुत सुविधा विकासाचे करण्याकरिता भाविष्यातील दिर्घमुदतीच्या योजना/ शहर सुधार योजना इ . चा अभ्यास करुन योजनांची आवश्यकता असल्यास खर्चाची रक्कम व त्याप्रमाणात टप्पयाने निधी उपलब्ध करण्याबाबतचे नियोजन करुन त्याची महानगरपालिकेच उत्पन्न स्त्रोतांशी सांगड घालुन दर निश्चित करणे, सुधारित करणे हे समितीकडुन अपेक्षित असुन त्या सोबत समितीने जनतेचा मताचा मागोवा घेऊन त्या सुधारित दर, शुल्क आकारनुसार रक्कम जमा करण्याबाबतची त्या शहरातील जनतेची क्षमता (पेईंग कॅपॅसिटी) व मानसिकता या दोहांचाही विचार करणे अपेक्षित आहे. अन्यथा कर/ शुल्क/ आकारात वाढ केल्याने जनतेचा विरोध होऊन त्याचा भरणाही केला जाणार नाही. त्यामुळे सर्व समावेशक व सर्व सामान्यासह सर्वांना योग्य वाटतील व परवडतील असे दर जनतेच्यासेवा सुविधा करीताच्या माफक योजना व अपेक्षा समोर ठेवुन सुधारित करावेत.

४) दर सुधार समितीची रचना :

महानगरपालिकेच्या १) मधील नमुद उत्पन्न स्त्रोताचा दर सुधारित करणे निश्चित करणे यासाठी सेवा सुविधावरील खर्च व असे दर, शुल्क आकार आकारणी करणाऱ्या/ वसुल करणाऱ्या यंत्रणेतील अधिकारी, तत्सम तांत्रिक अधिकारी सासह मनपा प्रतिनिधीचा समितीत सहभाग राहील. समितीत मनपा अधिकारी व लोक प्रतिनिधी यांचे शिवाय त्या त्या क्षेत्रातील तज्ञ (दोन्ही बाजु आकारणी व खर्चाचे क्षेत्रातील) चा समावेश केल्या ही समिती अधिक प्रभाविपणे व सर्व समावेशक समर्पक असा अभ्यास करुन दर सुधारित करणे व त्यामुळे शासनाचा दर सुधार समिती स्थापित करण्यामागील उद्देश साध्य होईल.

५) वैधानिकता :

दर सुधार समिती बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये काही तरतुद नाही व असे दर लागु व निश्चित करण्याबाबतचे अधिकार सर्वसाधारण सभेस आहे.

शासन निर्देशानुसार समितीने सुधारित केलेलेदर, केलेल्या शिफारशीची अंमलबजावणी करणे मनपास बंधनकारक असल्याने समितीचे कार्यास वैधानिकता प्राप्त होईल.

तसेच समिती कार्यकाल, समितीच्या शासकीय सदस्या व्यतिरिक्त इतर सदस्यांना दयावयाचे भत्ते इ. सह समितीचे अधिकार उदा. माहिती मागविणे गरज भासल्यास प्रवास करुन विविध ठिकाणी भेटी देऊन माहिती घेणे इ. "दर सुधार समिती" मध्ये खालील प्रमाणे सदस्य राहतील.

१) उप आयुक्त (महसुल)
२) मुख्यलेखाधिकारी
३) उप संचालक,नगर रचना
४) शहर अभियंता
५) अतिरिक्त शहर अभियंता
६) कार्यकारी अभियंता
७) मुल्यनिर्धारण अधिकारी

या शिवाय किमान ३ महानगरपालिका सदस्य सर्वसाधारण सभेचे नियुक्त करावेत व नागरिकांना सहभाग द्यावयाचा झाल्यास ३ सदस्य मा. आयुक्त/ महापौर यांनी नियुक्त करावेत, असे एकुण १३ सदस्य समितीत राहतील.

करिता वरिल प्रमाणेचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

संवाद :

मा. महापौर : मनपाचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने "दर सुधार समिती" स्थापन करावयाची आहे, यात ३ स. सदस्य व ३ नागरिकांचा समावेश करावयाचा आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : सभागृहातील स. सदस्यांना नागरिकांनीच निवडुण दिलेले आहे त्यामुळे ३ नागरिकांचा यात समावेश न करता ६ सदस्य स. सदस्यामधुनच निवडावे.

श्री. तकी हसनखान : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे "दर सुधार समिती" होऊ शकेल समिती जो निर्णय होईल व त्याची शिफारस सर्वसाधारण सभेकडे होईल व अंतिम निर्णय सर्वसाधारण सभेनुसार पुढील कार्यवाही व्हावी. जुने ने कर योग्य मुल्य आहेत त्यात बदल होणार नाही नवीन जे निवास स्थान (दुकान) होतील त्यासाठी निवास व वाणिज्य दर आकारावेत निवासासाठी अ,ब,क,ड,वर्गवारी साप्रमाणे "अ" सिमेंटचे "ब" धाबा "क" टिनरोड "ड" झोपडी वजा घरे अशी वर्गवारी करुन कर योग्य मुल्य ठरवण्यात यावे यासाठी दर सुधार समिती स्थापित केल्यास फायदा होईल परंतु सध्याच्या परिस्थितीत जे कर आकारणी होते त्यात बदल करुन शिघ्र सिध्द गणक (रेडीरेकनर) किंवा बाजार भाव यात जे जास्त असेल ते दर कर योग्य मुल्य निश्चिती सांग त्यासाठी वेगवेगळया विभागात शासनाने वेगवेळा दर निश्चित केले आहे. काही ठिकाणी २५ हजार चौरस मिटर काही ठिकाणी ६०० चौ. मीटर जमीनीचे दर आहेत यांना सारखेच करमुल्य आकाराले जाते. दर सुधार समिती सर्वसाधारण सभेत येईल. निर्णय येता येईल ज्याचकडे ६-७ वर्षाचे टॅक्स बाकी आहेत. त्या संबंधी कलेक्टर हे पद शासनाने मंजुर केलेले आहे.

सदर पदास दिड वर्षापुर्वी मंजुरी मिळालेली आहे अद्याप या पदावर नियुक्ती झाली नाही.टॅक्स असेसर ॲड कलेक्टर हे पद ताबाडतोब भरण्यात यावे आतापर्यन्त का भरले नाही. शिघ्र सिध्द गणकाचे दर (रेडीरेकनर) फक्त वाणिज्य वापरासाठी लावावे निवास वापरासाठी नाही. निवासासाठी वर्गवारी प्रमाणे कर आकारणी करावी.

श्री. प्रकाश निकाळजे : ही समिती गटीत करावी प्रस्तावात नमुद केले समितीने घेतलेले निर्णय बंधनकारक राहील परंतु असे न करता समिती सर्वसाधारण सभेस शिफारस करेल व सर्वसाधारण सभेचा निर्देशानुसार कार्यवाही होईल अशी दुरुस्ती व्हावी व त्यचा अहवाल पुन्हा सर्वसाधारण सभेसमोर या मुल्य निर्धारित करुनच रजिष्ट्री करण्यात येते. याचे दोन विभाग पाडले त्या नुसार रेट वेगवेगळे आहेत त्या धरतीवर मालमत्ता कर लावण्या बाबत चर्चा झ ालेली आहे.

श्री. रतनकुमार पंडागळे : स. स. श्री. तकीहसन खान यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याचा विचार व्हावा. व ६ सदस्य हे सदस्यामधुनच घ्यावे. अधिकारी संवर्गातुन सदस्यामध्ये मुख्यलेखा परिक्षक नाही ते असणे आवश्यक आहे.

मा. महापौर : मुख्यलेखा परिक्षक का नाही याचा खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुख्यलेखा परिक्षक ऐवजी मुख्यलेखधिकारी हा शब्द टंकलिखीत झाला. तसी दुरुस्ती करावी.

श्री. तकी हसनखान : या समितीत मुख्यलेखापारिक्षक नाही. मुख्यलेखाधिकारी यांचे नंतर मुख्यलेखा परिक्षक कोण यांनी काही चुक करुन ठेवली तर ती चुक कोण काढणार व कोणास जबाबदार धरणार.

मा. महापौर : दोन महिन्यापुर्वी निर्णय घेऊन मुख्य लेखा परिक्षक पदावर प्रतिनियुक्तीवर अधिकारी द्यावा असे शासनास कळविले आहे.

श्री. सुदाम सोनवणे : बरीच पदे रिक्त आहेत शिक्षणाधिकारी तसेच विधी सल्लागार ही पदे देखिल भरावित.

मा. महापौर : सध्या मुख्यलेखा परिक्षक नाहीत समिती होईपर्यन्त शासनाचे अधिकारी या पदावर येतील तशी तात्काळ पुन्हा मागणी करण्यात येईल मा. आयुक्त प्रस्ताव संदर्भात झालेलया चर्चेनुसार सांगु इच्छितात.

मा. आयुक्त : स. सदस्य श्री. तकी हसनखान यांनी चांगल्या मुद्दा उपस्थित केला, सध्या प्रचलित प्रथेप्रमाणे मालमत्ता कराचा मुळ आधार कर योग्य मुल्य आहे. ती स्थावर मिळकतीची किंमत किती आहे त्यावर आधारित आहे. स्थावर मालमत्ता १ कोटीची परंतु नोंदणी ३५ लाखाची होते. भुखंड ४० लाखाचा असतो परंतु नोंदणी (रजिष्ट्री) १२ लाखाची करतात व त्या आधारे गणका प्रमाणे फायदा होणार नाही. दर कमी आहेत दिल्ली महानगरपालिकेमध्ये अशी पध्दत आहे की, मुळ मालमत्तेची किंमत शिघ्र सिध्द गणका दर काय हे न पाहता साधारणतः ७०% मिळकती भाडयाने आहेत त्यांचे भाडयाचे ३०% विचारात घेता भाडे बाजार भावाप्रमाणे घेण्यात येते शासकिय बॅका, कमरशियल इमारती यांचे भाडे किंमतीच्या तुलनेत जास्त मिळते.

श्री. तकी हसनखान : गुलमंडी येथे पावती रु. ५०००/- ची प्रती महा जुने भाडेकरु आहेत मात्र ते इतरांना दैनंदिन १०००/-,२०००/- रु असे महिण्याला ६०,०००/- रु भाडे मिळते.

मा. आयुक्त : नविन बांधकाम आहे. त्याबद्दल कट आऊट डेट ठरवावी लागेल. कंपनीला भाडयाने दिले जुने व नविन दोन कूटेगरी मध्ये वसुली करता येईल.

श्री. स.अली मिरा सलामी : शासनाने परिपत्रक नोव्हेंबर मध्ये आले त्याचवेळी म्हणजे बजेटच्या अगोदर हा प्रस्ताव यावयास पाहिजे होता उशीर झाला आहे. अथसंकल्प बैठकीत दर समितीचा फायदा झाला असता यात ३ नागरिक व तीन स. सदस्य असे ६ सदस्य समिती सदस्य निवडले असे दिले परंतु जनतेनेच लोकप्रतिनिधी म्हणुन आम्हाला निवडुन दिले. व याच सभागृहातील ६ सदस्य निवड करावे ३ नागरिक घेतल्यास लोकप्रतिनिधीवर विश्वास नाही असे होईल. गुलमंडी पैठणगेट सारख्या भागात ५०० ते १००० पर्यन्त भाडे मुळ मालकास मिळत नाही जुने किरायादार किरायावसुल करतात व टॅक्स कमी आकारण्यात येतो आमचे दुकान किरायानेच माहे ६० व आत १०० रू किराया केला टॅक्स आकारत्या वेळेस न विचारता ३००/- आकारण्यात आले आहे. काही ठिकाणी पोट भाडेकरु ठेवुन जास्त भाडे वसुल करतात त्यांचेकडुन टॅक्स कमी का ? जी कमीही होईल त्या कमीटीकडे तक्रार व त्या कमीटीचे मार्गदर्शक तत्वे ठरवावी व सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी. नंतर कार्यवाही व्हावी.

श्री. अंबादास दानवे : नोव्हेंबर मध्ये पत्र आले नंतर बजेट बैठक झाली बजेट नुसार विकास कामे करण्याचे ठरवले त्या संबंधिची काही वैशिष्टये ठेवली होती. वैशिष्टये मध्ये मालमत्ता कराचे फोर मुल्यांकन करणे हा मुद्दा होता. त्यात असे म्हटले होते की, फेर मुल्यांकन करतांना कोणत्या ही व्यवसायिक संस्थाकडुन निविदाव्दारे दर मागवुन संस्था दर निश्चित बाबत सक्षम आहे याची खात्री करुन कार्यवाही करता येईल हा विषय बजेट मध्ये घेण्याची आवश्यकता नव्हती जे सदस्य निवड करावयाचे ते नागरिक न घेता याच सभागृहातील सदस्यामधुन ६ ही सदस्य निवडावे कारण येथील सदस्य हे नागरिकांचेच प्रतिनिधी आहे व आपण नागरिकांचा आदर करतो दर सुधार समितीचा निर्णय अंतिम राहणार का ? सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागेल. दर सुधार समिती आणखी काय काम करणार या समितीची निवड करुन लवकर काम सरु करावे आत या समितीतील बरेच अधिकारी कायम स्वरुपी मनपात नाही आयुक्त, मुख्यलेखा परिक्षक, शहर अभियंता, उप संचालक नगर रचना नाही काम कधी सुरु होणार या सर्व बाबींचा खुलासा करावा.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : दर सुधार समिती असे नाव न ठेवता दर सुधार सेवा समिती असे नाव दयावे कारण समिती दर निश्चित करणार जनतेवर बोजा पाडणार त्या दृष्टीने सेवा करण्याचे कार्य ही झाले पाहिजे म्हणुन दर सुधार सेवा समिती असे नाव व अधिकारी सदरच जास्त न ठेवता १३ सदस्य न ठेवता २५ सदस्य ठेवावे त्यात १० स. सदस्य व आठ झोनचे विभागीय अधिकारी स. सदस्य येतील असे सदस्य तसेच तज्ञ व्यक्तीचे समावेश केला तर आणखी योग्य २५ लोंकाची समिती करावयाची नसेल तर ५ अधिकारी ५ नागरिक व ५ स. सदस्य असे एकुण १५ सदस्याची ही दर सुधार समिती करावी याचा योग्य प्रकारे विचार व्हावा.

सौ. शाहीन जफर महमुद जफर : टॅक्स, जकात, दुकान, भाडे यानुसार मनपाचे उत्पन्न वाढेल या दृष्टीने दर सुधार समिती निश्चित करण्याबाबत प्रस्ताव आणावा लागला.

१) या समितीमध्ये मुख्यलेखा परिक्षक का नाही ? या समितीमध्ये या अधिकारी यांची सदस्य म्हणुन गरज आहे. आता मुख्यत्वेकरुन मुख्यलेखाधिकारी यांचेवरच मुख्य लेखा परिक्षकांची जबाबदारीच महत्व देण्यात येते कारण काय ?

२) या समितीत शहर अभियंता यांची गरज नाही सध्दा या पदावर अधिकारी कार्यरत आहे काय ? गरज असले तर खुलासा करावा. कॉलम १ नुसार शुल्कदर निश्चित संदर्भात सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक आहे. दर सुधार समिती दर निश्चित करुन वाटेल ते दर करतील व यास सर्वसाधारण सभेची मंजुरी न घेतलयास सर्वसाधारण सभेला काही महत्व राहणार नाही असे होईल असे का नियमानुसार सर्व अधिकार सर्वसाधारण सभेला आहेत या समितीत कार्यकारी अभियंता यांना समावेश न केल्यास काय नुकसान होणार खुलासा करावा.

श्री. मणिक साळवे : ३ नागरिक व ३ स. सदस्य घ्यावे असे प्रस्तावात नमुद केले बऱ्याच स. सदस्यांनी ६ ही सदस्य नगरसेवकापैकीच घ्यावे असे सुचविले परंतु पत्रकार मनपाच्या हिताचे लिखाण व रिपोर्ट करतात करिता मनपा पत्रकार संघातुन एक पत्रकार यांची या समितीवर नियुक्ती करावी अशी सुचना करतो.

मा. महापौर : शासनाकडील पत्रा बाबत खुलासा आयुक्त करतील शासनाने १२ नोव्हेंबर ९९ व १२ जानेवारी २००० चे / आदेशानुसार एकुण १५ सदस्य राहु शकतात त्यापैकी दोन सदस्य म्हणुन आयुक्त व मुख्य लेखापाल राहतील उर्वरित १३ सदस्य तयामध्ये प्रस्तावानुसार उपआयुक्त (महसुल) मुख्यलेखाधिकारी,उपसंचालक नगररचना, शहर अभियंता, अ. शहर अभियंता, कार्यकारी अभियंता व मुल्य निर्धारण अधिकारी व ३ मनपा सदस्य व ३ नागरिक असे १३ सदस्य पाहिजे ३ नागरिक यात दोन मार्ग आहे.

१) स. सदस्य घेतले तर नागरिक घेता येणार नाही.

२) नागरिक म्हणजे या कार्यक्षेत्रातील तश्र लोक ज्यांना या बद्दल अभ्यास असेल. तज्ञांनी तांत्रिक सल्ल्य देवुन निष्कर्ष काढावेत. याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावा.

श्री. प्रकाश निकाळजे : आपल्याकडे सर्वच अधिकारी तज्ञ आहेत आवश्यकता भासल्यास मार्गदर्शन घेता येईल. सदस्य म्हणुन बोजा टाकु नये. फारतर सल्लागार म्हणुन बोलावावे.

मा. महापौर : २ सदस्य आपण वाढवु शकतो, सुधारणा अशी करता येईल ६ सदस्य व २ तज्ञ घेता येईल.

श्री. स. अली मिरा सलामी : यामध्ये १ सदस्य पी.एच.डी. पदावरील तज्ञ घ्यावे. व १ सदस्य भुसंपादन विभागा संबंधिचे सेवा निवृत्त अधिकारी म्हणुन निवडावे.

मा. महापौर : बऱ्याच स. सदस्यांनी भावना व्यक्त केल्या स. सदस्य श्री तकीहसनखान यांनी सुचीत केली की, करमुल्य आकारणीसाठी अधिकारी नेमणुक करण्यात यावे. पद मंजुर होऊन १ $^{१/२}$ वर्ष झाले. या संदर्भात प्रशासनाने ताबाडतोब कार्यवाही करावी १ महिन्याच्या आत कार्यवाही व्हावी. दर सुधार समिती आपण गठीत करत आहोत दर सुधार समिती जे नियम ठरवतील जे निर्णय घेतील त्याची मंजुरी सर्वसाधारण सभेने देण्याची आवश्यकता आहे. या समितीत १५ सदस्यांपैकी २ सदस्य मा. आयुक्त व लेखापाल हे पद सिध्द

सदस्य असणार व ६ सदस्यासाठी सभागृह नेता व विरोधी पक्षनेता यांनी ३-३ स. सदस्यांची नांवे द्यावीत त्यानुसार दर सुधार समितीमध्ये त्या स. सदस्य सदस्य म्हणुन राहतील.

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्तावातील दर सुधार समिती बाबत सभागृहात झालेल्या चर्चे नुसार शासकिय सदस्यामध्ये "मुख्यलेखाधिकारी" या पदा ऐवजी "मुख्यलेखा परिक्षक या पदाचा समावेश करण्यास आणि तीन नागरिकांचा सहभाग करण्या एवेजी एकुण सहा सदस्यांचा समावेश करण्यात यावा अशी दुरुस्ती करुन या दुरुस्ती नुसार मा. सभागृहनेता व मा. विरोधी पक्षनेता यांनी प्रत्येकी तीन सदस्यांची नांवे सुचवावी असे सर्वानुमते ठरले व त्यानुसार प्रस्तावित दर सुधर समिती गठीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच गठित करण्यात आलेल्या दर सुधार समितीचे पदसिध्द अध्यक्ष "मा आयुक्त महानगरपालिका" आणि पदसिध्द निमंत्रक" महापालिकेचे मुख्य लेखापाल" राहतील असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७३/३** :

नगरसचिव यांनी प्रस्ताव केला की, ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोक गव्हर्नमेंट मुंबई यांचेतर्फे महाबळेश्वर येथे महिला नगरसेविकासाठी दिनांक १३ ते १५ नोव्हेंबर २००० या कालावधीत संघटनात्मक विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेच्या पत्रकानुसार प्रत्येक महानगरपालिके मधुन दोन महिला नगर सेविकांना या कार्यशाळेत भाग घेता येईल असे सुचित करण्यात आले आहे.

संस्थेच्या पत्रकानुसार दोन महिला सदस्यांना वरिल कार्यशाळेस पाठवावयाचे झाल्यास येण्या जाण्याचा व तेथे राहण्याचा खर्च व आवश्यकता भासल्यास त्यांचेसह एक कर्मचारी/ अधिकारी यांना पाठवावयाचे झाल्यास सुमारे रु. १५,०००/- खर्च अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने दोन महिला नगर सेवकांची नांवे निश्चित करण्यास व संभाष्य खर्च रु. १५,०००/- मंजुरी करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद :

मा. महापौर : हा ठराव मंजुर करण्यात येतो व ज्या महिला स. नगर सेविका जाण्यास इच्छाअसेल त्यांनी तसे लेखी मा. नगरसचिव यांचेकडे कळवावे

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ऑल इंडिया इनस्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट मुंबई यांचे तर्फे दि. १३ ते १५ आयोजित संघटनात्म विशेष कार्यशाळे करिता ज्या महिला सदस्यांना जाण्याची इच्छा असेल अशा महिला सदस्यांनी आपली लेखी संमती नगरसचिव यांचेकडे कळवावी. यासह रक्कम रु. १५,०००/- च्या संभाण्य खर्चात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ७४/४** :

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील वृक्ष लागवड करिता (वृक्ष प्राधिकरण समितीचे) महाराष्ट्र (नागरी) वृक्ष संवर्धन व जतन अधिनियम १९७५ (सुधारित १९९६ कलम ३ (१) नुसार नागरी स्थानिक प्राधिकरण ठरविल त्या कालावधि करिता मा. आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली वृक्ष प्राधिकरण समिती गठित करणे आवश्यक आहे.

समितीमध्ये स. सदस्यामधुन कमीत कमी ५ व जास्तीत जास्त १५ सदस्यांनी नियुक्ती मा. सभागृहाने करावयाची आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद** :

मा. महापौर : या प्रस्तावानुसार पर्यावरणाचे महत्व लक्षात घेता या शहरामध्ये झाडे लावली पाहिजे ती तोडली न पाहिजे यामध्ये १५ सदस्यांचा समावेश करावयाचा आहे यात सभागृह नेता व विरोधी पक्षनेता यांनी ८-७ प्रमाण कानुसार स. सदस्यांची नांवे दयावी त्यानुसार ते सदस्य म्हणुन राहतील.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील वृक्ष लागवड व संवर्धनाच्या नियोजनाकरिता मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली १५ सदस्यांचा समावेश असलेले वृक्ष प्राधिकरण समिती गठित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वृक्ष प्राधिकरण समिती साठी सभागृह नेता यांनी ८ सदस्यांची व मा. विरोधी पक्षनेता यांनी ७ सदस्यांची नांवे सुचवावीत असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

सर्वसाधारण सभा - दि. २०.९.२००० ची तहकुब दि. ३०.९.२००० रोजी संपन्न.

## *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्र. ७५/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझा वार्ड क्र. ४६ मो. नेहरुनगर सी.टी. एस. नं. ११६०१ सिट न. ३३६ व ३३७ महानगरपालिकातर्फे ले-आऊट मंजुरी झाल्या नंतरही जागा ओपन स्पेस म्हणुन सोडण्यात आलेली आहे. या ओपन स्पेस मध्ये महानगरपालिका तर्फे शादी खान्याची इमारत सर्वसाधारण उभारुन तात्काळ शादीखाना सुरु करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. श्री. नुसरत बानो फेरोज खान
अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे
श्री. शकील पटेल
दिनांक : १७.८.२०००.

**संवाद** :

श्री. अंबादास दानवे : पुरवणी विषयपत्रिकेवर सन्माननीय सदस्यांचे कधी न येणारे इतके विषय मांडण्यात आलेले आहेत. कोणत्याही विषयास मी कमी लेखत नाही. परंतु हे सर्वच प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर १० ते २० कोटी रुपये खर्च येऊ शकतो असे प्रस्ताव प्रशासनामार्फत यावयास पाहिजेत. आर्थिक तरतुद नसेल असे अनेक प्रस्ताव मंजुर होतात व त्यानंतर सन्माननीय सदस्य

अधिकाऱ्याकडे पुढील कार्यवाही करण्याची मागणी करतात. कनिष्ठ अभियंता, उप अभियंता यांचे स्तरावर प्रश्न सुटण्यासारखे प्रस्ताव बाजु लक्षात घेणे जरुरी आहे व जे प्रस्ताव आहेत त्यावर आता चर्चा व्हावी व यापुढे असे प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर व्हावेत.

मा. महापौर : सन्माननीय सदस्यांच्या भावना वेगवेगळया आहेत पुर्वी सर्वसाधारण सभेसाठी सन्माननीय सदस्यांचे प्राप्त झालेले प्रस्ताव प्रशासनाच्या अभिप्रायासाठी पाठविले होते. काहीचे अभिप्राय आले काहीचे नाही त्या संदर्भात माझ्यावर आरोप करण्यात आले की, मुद्दामहुन काही प्रस्ताव महापौरांनी मंजुरीस घेतले नाही. त्यामुळे सर्वच प्रस्ताव घ्यावे लागतात. सर्वसाधारण सभेत धोरणत्मक निर्णय घेण्याबाबतचे प्रस्ताव पाहिजे. यापुढे सर्व सन्माननीय सदस्यांनी याची काळजी घ्यावी. अडचण येत असेल तर सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता व जेष्ठ सदस्यांचे मार्गदर्शन घ्यावे.

श्री. स. अली मिरा सलामी : एखादया भागात विकास काम करण्या संदर्भात अधिकारी यांचेकडे सन्माननीय सदस्य जातात. अधिकारीच सांगतात तशा प्रकारचा ठराव सर्वसाधारण सभेत मंजुर करुन घ्यावा त्यामुळे असे स. सदस्यांचे प्रस्ताव सादर होतात. असे प्रस्ताव प्रशासनानेच ठेवावयास पाहिजे व सभागृहात निर्णय झाल्यास तात्काळ कार्यवाही केली पाहिजे. जे की असे जास्तीचे प्रस्ताव सभागृहात मंजुरीस येणार नाहीत स. सदस्यांनी पत्र दिल्यानंतर सर्वेक्षण करुन प्रशासकिय प्रस्ताव ठेवण्याबाबत निर्बंध घालवेत.

मा. महापौर : बरेचसे नविन सन्माननीय सदस्य आहेत प्रस्ताव ठेवताना विचार पुर्वक प्रस्ताव असावे यासाठी स. सदस्य यांनी पदाधिकारी तसेच जेष्ठ स. सदस्य यांचा सल्ला घेऊन प्रस्ताव ठेवावे. अधिकाऱ्यांनी सर्वसाधारण सभेकडुन मंजुरीसाठी प्रस्ताव ठेवावा असे सांगु नये. व यापुढे जे काही स. सदस्यांच्या वार्डातील समस्या संदर्भात त्यांनी संबंधित विभागाला पत्र दिलयावर त्यानुसार तात्काळ कार्यवाही केली पाहिजे व विकास कामासंदर्भात असेल तर तसे अंदाजपत्रक तयार करुन पुढील कार्यवाही केली पाहिजे. विषय पत्रिकेवरिल विषयावर ठरवावे.

श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. मधुकर सावंत : जे प्रस्ताव सादर केलेले आहेत त्यावर चर्चा करुन मंजुर करावे.

श्री. भगवान घडामोडे : असे बरेचशे प्रस्ताव आलेले आहेत दवाखाना शादीखान, काही जागे संदर्भात असे विकास कामाबाबत प्रस्ताव येतात व मंजुरी मिळण्यावर वार्डातील जनता स. सदस्यांना वेठीस धरते की, यासंबंधिचा ठराव झालेला असतांना कार्यवाही का करत नाही. असा जनतेचा बोल स. सदस्यांवर येऊन पडतो विषय पत्रिकेवरिल जे प्रस्ताव स्वेच्छेनिधीतुन कामे करण्यासंबंधिचे आहेत त्यासच मंजुरी देण्यात यावी बाकीचे सर्व प्रस्ताव प्रशासनामार्फत घेण्यात यावे.

श्री. तकी हसनखान : धोरणात्मक निर्णयाबाबतचे प्रस्ताव प्रशासना मार्फत आले पाहिजेत अशाच प्रकारचा एक प्रस्ताव मंजुर होऊन संचिका करण्यात येऊन सहा महिने संचिका चालते व अंतिम टप्प्यात संचिका मा. आयुक्तांकडे जाते व जागा उपलब्ध आहे का ? असे शेरे येतात त्यामुळे कामे होत नाही व वेळ पण लागतो. स. सदस्य स्वतः चीच दिशाभुल करत आहेत. थोडी मेहनत घेतली तर प्रशासकिय ठराव येतील.

श्री. अ. रशिद अ. सत्तार : महापौर बंगल्या समोरिल शॉपिंग सेंटरचे इस्टिमेंट दीड वर्षा पासुन थांबवुन आहेत. सदरचे काम होण्याची कार्यवाही कधी सुरु करणार. जागा उपलब्ध आहे.

मा. महापौर : ज्या ठिकाणी आर्थिक तरतुद व जागा उपलब्ध आहेत व विकास करण्यास प्रशासनास अडचण येणार नाही. अशा प्रस्तावावर निर्णय घेतला जाईल त्या प्रस्तावास मंजुरी देण्यास हरकत राहणार नाही. ठराव मंजुर करुन माहिती घेतली जाईल. मनपाचा फायदा होत असेल तर ते प्रस्ताव मंजुर केले जातील.

श्री. शे. इसाक शे. जैनाद्दीन : कॉर्पोरेशन नुकसानीचे प्रस्ताव मंजुरीसाठी येतात इतिवृत्तातील पान क्र. १४ वर ठराव क्र. ५३/१२ नुसार शहागंज भाजी बाजार पुर्वी आठवले बाग असे संबोधण्यात येत होते. मयत महाराजा किशनप्रसाद हैद्रबाद१३५३ फसलीमध्ये ९९ वर्षाचा करार झालेला असतांना उल्लंघन करुन नगर परिषदेने त्याजागेवर प्लॉट पाहुन लिलावाव्दारे विक्री केले असे प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस येतात. दुसऱ्याच प्रस्तावास का विरोध होतो कटकटगेट येथील भागात पावसाचे पाणी घुसते त्याला विरोध का ?

श्री. मधुकर सावंत : काही सन्माननीय सदस्यांची मागणी आहे वार्डवाईज बजेट असावे, त्यानुसार विकास कामे करता येतील.

श्री. जयवंत ओक : अर्थसंकल्पाच्या बैठकीत मी वार्डवाईज बजेट ठेवण्या संदर्भात सुचना केली होती परंतु निर्णय घेतला नाही. प्रशासनाने १३५ कोटींचा अर्थसंकल्प फुगवुन ठेवला, घोषणा केली परंतु परिस्थिती काय मनपाकडे आर्थिक बळ किती आहे. प्रशासनाला खुलासा विचारावा वार्डात साफसफाईसाठी कुणीही नाही. गल्ल्यामध्ये घाण पडलेली दिसुन येते. आठरा खेडयाचा समावेश आणखी परिस्थिती गंभीर होत जाईल प्रत्येक बैठकीत स. सदस्य विकास कामा संदर्भात आपलया भावना प्रकट करतात. आयुक्तांचे दालनात ५००-६०० संचिका पडुन आहेत. सर्व विकास कामे ठप्प आहेत. बजेट नाही तर प्रस्ताव का मंजुर करता काय रिमार्क येतात. याची माहिती जनतेला झाली पाहिजे काही लोक गेटसमोर त्यांचे मागण्यासाठी बसलेले आहेत प्रशासनाने माहिती द्यावी. जनतेला या सभागृहानी स. सदस्यांनी आश्वासन दिले की, मुलभुत गरजा दिल्या जातील. सर्वसामान्य नागरिकांना पाणी, ड्रेनेज, रस्ते, इत्यादी सुविधा प्रशासन देणार की नाही. वार्डातील जनता नगर सेवकांकडे विचारणा करणार काही प्रस्ताव शादीखाना व इतर बाबतीत आले ते पुढील बैठकीत घेता येतील आताच पाण्याचा प्रश्न उपस्थित झाला. सदर पाणी मोठया खड्डयातील आहेत त्यास फवारणी नाही. किडे अळया झाले आहेत. या सर्व बाबी प्रशासनाच्या निदर्शनास आणुन द्याव्या लागतात. प्रशासन काय करते. नुसते १३५ कोटीचे बजेट ठेवले अद्याप कोणसही वार्डात ५ लाखाचे काम झाले नाही. ठेकेदाराची बिले दिली नाही. जनतेला मुलभुत सुविधा दव्यात एका वार्डात एक महिला व एक पुरुष मंजुर संपुर्ण वार्ड साफसफाई कसा करु शकेल. याची सर्व दखल घेण्यात यावी. जनतेला काम पाहिजे दुसरे काही नको.

श्री. सुरजीसिंग खुंबर : सन्माननीय सदस्यांनी योग्य सुचना केले बजेट किती आहे, किती खर्च करु शकतो, नंतर प्रस्ताव मंजुर करावे.

श्री. जयवंत ओक : प्रस्तावा संबंधी अधिकाऱ्यांनी ताबडतोब अहवाल दिले पाहिजे.

श्री. काशिनाथ कोकाटे : पुरवणी विषय पत्रिके संदर्भात बरीच चर्चा झाली. सन्माननीय सदस्यांनी आपआपली भुमिका मांडली. स. सदस्यांचे एकत्रित जास्तीचे प्रस्ताव येण्याचे कारण म्हणजे गेल्या चार महिन्यात प्रशासना तर्फे कोणते विकास कामे उदा. ड्रेनेज,पाणी, लाईट व इतर मुलभुत सुविधा देण्या संदर्भात प्रस्ताव स्थायी समिती सभेत आलेला नाही. याचा अर्थ वार्डातील सर्व सुविधा देण्यात आल्या असा भास होऊ शकतो. ८३ वार्डात सर्व सुविधा पुरविल्या आहे असे वाटत. विकास कामा संदर्भात प्रशासन प्रस्ताव ठेवत नाही. म्हणुन नाईलाजस्तव स. सदस्यांनी प्रस्ताव सादर केलेले आहेत. नागरिकांना सुविधा दिल्या नाही तर मनपाच्या तिजोरीत पैसा उपलब्ध होणार नाही व प्रशासनासही कामे करण्यात अडचण येऊ शकेल. ४ महिन्यांपासुन प्रशासन प्रस्ताव ठेवत नाही याची बाजु कोण मांडवयाची प्रस्ताव मंजुर करावे शासन अनुदान देईल. शासनाच्या निधीतुन कामे करण्यात यावी व प्रशासकिय प्रस्ताव का येत नाही याचा खुलासा प्रशासनास विचारावा बजेटमध्ये प्रोव्हीजन करुन शासकिय अनुदानातुन काम करण्यास मंजुरी व्हावी.

श्री. रतनकुमार पंडागळे : सन्माननीय सदस्य श्री. जयवंत ओक यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या योग्य असुन स. सदस्य तकी हसनखान यांनी त्यांचे मत व्यक्त केले. शहाबाजार येथील एक प्रस्ताव मंजुर केला त्या संदर्भात टेंडर काढले व त्या प्रकरणात न्यायालयाचे स्थगिती आदेश आहे. असे प्रस्ताव मंजुर होत असतील तर प्रशासनाकडुन प्रस्तावा संबंधी अभिप्राय घेणे जरुरी आहे. नंतर प्रस्ताव मंजुर व्हावेत.

मा. महापौर : सन्माननीय सदस्यांनी बऱ्याच वेळ भावना प्रकट केल्या विषय क्रमांक १ मंजुर करण्यात येतो.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४६ मधील सिटी. एस. नं. ११६०१ शीट नं. ३३६ व ३३७ मधील खुल्या जागेत (ओपन स्पेस) मनपातर्फे शादीखान्याची इमारत उभारुन शादीखाना सुरु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६/१** :

रोशनगेट ते मौलाना आझाद चौक पर्यन्तचे तीन प्रभाग हे स्लमध्ये येतात. परंतु शरीफ कॉलनी रहेमानिया कॉलनी आणि किराडपुरा या तिन्ही प्रभागात बालसंस्कार केंद्र अद्याप अस्तित्वात आले नाही. येथील लोकसंख्या सुमारे तीस हजारापेक्षाही जास्त आहे. तसेच या भागात राहणारे बहुसंख्य नागरिक मंजुरी करुन आपला उदरनिर्वाह करित आहे. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. अशा आर्थिक परिस्थितीत त्यांच्या मुलांवर चांगले संस्कार होणे अशक्य आहे करिता शरिफ कॉलनी प्रभागात गरिब आणि मंजुरी करणाऱ्या नागरिकांच्या मुलांसाठी "बालसंस्कार केंद्र" स्थापण्यात यावे प्रस्ताव मंजुरीस्तव सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक : श्री. शे. इसाक शे. जैनोद्दीन
अनुमोदक : श्री अफसर खाँ
दिनांक : २३.८.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शरीफ कॉलनी प्रभागात गरिब आणि मजुरी करणाऱ्या नागरिकांच्या मुलांसाठी "बाल संस्कार केंद्र" स्थापन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७/३** :

प्रभाग क्रमांक ६३ कैसर कॉलनी मध्ये एक उंच व सुंदर असे मिनार ट्रस्टीतर्फे बांधण्यात आलेले आहे. परंतु त्या मिनाराच्या सौदर्यात आणखी भर घालण्यासाठी माझ्या स्वेच्छानिधीतुन रु. ५०,०००/- च्या आत जेवढे मेटल हायलाईट बसविता येतील तेवढे बसविण्यात यावे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. सलीम पटेल
अनुमोदक : श्री. अब्दुल रशिद
दिनांक : २३.८.२०००.

**ठराव** :

प्रभाग क्रमांक ७६ कैसर कॉलनी मध्ये बांधण्यात आलेल्या मिनारच्या सौदर्यात भर घालण्याचे दृष्टीने सन्माननीय सदस्य श्री. सलीम पटेल यांच्या स्वेच्छा निधीतुन र रु. ५०,०००/- पर्यन्त मेटल हायलाईट बसविण्याचे काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८/४** :

औरंगाबाद शहराचा दिवसेंदिवस विकास होत आहे. महानगरपालिकेच्या सिमेबाहेर देखील औरंगाबाद शहर पसरत आहे. कित्येक गृहनिर्माण संस्थांनी महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर भुखंड खरेदी केले आहेत. कित्येक गृहनिर्माण योजना अस्तित्वात येत आहेत महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर व्यापाऱ्यांनी गोदामे बांधली आहेत. औरंगाबाद शहरामध्येच परंतु महानगरपालिका हद्दीबाहेर असल्यामुळे व्यापारी गृहनिर्माण संस्था आणि उद्योगपतीकडुन महानगरपालिकेस वसुली करता येत नाही महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे याकरिता सुंदरवाडी, झाल्टा, सातारा, देवळाई, पंढरपुर, तिसगांव, वाळुज, राजणगांव, घातेगांव, शहणापुर, करोडी, मांडकी, गंधेली ही गावे तसेच महानगरपालिका हद्दीच्या लगतची गावे महानगरपालिका औरंगाबाद मध्ये समाविष्ठ करण्यात यावी. ज्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. करिता सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर.

सुचक : श्री. शे. इसाक शे. जैनोद्दीन, श्री. स. अली मिरा सलामी
अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. मुमताज अली, श्री. शेख मुनाफ
दिनांक : ३०.८.२०००.

**संवाद** :

श्री. प्रशांत देसरडा : एम.आय.डी.सी. बरोबर करार झाला असेल तर या गाबांचा समावेश होऊ शकेल का ?

श्री. शे. इसाक शे. जैनोद्दीन : या गावांचा समावेश केल्यास मनपाच्या उत्पन्नात वाढ होऊ शकेल, नागरिकांना सुविधा देण्यासाठी मनपाच्या तिजोरीत पैसाही आणे

गरजेचे आहे. शहराच्या बाहेरील मोळे उद्योगात वाढ होत आहे. कच्चा माल परस्पर कारखान्यांत जात आहे. त्याचे उत्पन्न मनपास जकात करापोटी मिळु शकते. खरेदी तालुक्याच्या ठिकाणी करणार, डिलेव्हरी गोदामातुन घेणार त्यामुळे जकात बुडते हद्द वाढवणे जरुरीचे आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : मनपाची हद्द वाढवण्याबाबतचा प्रस्ताव आहे. मनपामध्ये समाविष्ट करणे जरुरीचे आहे. किंवा कसे ठरावावर चर्चा करतांना जो आवश्यक भाग समाविष्ट करुन तेथील नागरिकांना मनपा सुविधा देऊ शकेल. काय हे पाहावे मनपाच्या १९९५ ला शिवाजीनगर वार्ड घोषित करुन २००० मध्ये वगळण्यात येतो. मनपाच्या अंतर्गत येत आहे म्हणुन त्यांच्या हद्दीत असल्याने छावणी टोल नाका म्हणुन त्यांच्या रक्कम द्यावी लागते. काही टक्केवारीनुसार त्यांना रक्कम द्यावी लागते शिवाजीनगर येथील टोलनाका मनपाच्या हद्दीतुन वगळते त्या संदर्भात आंदोलने झाली. या संदर्भात मनपातर्फे पाऊल उचलावयास पाहिजे होते ग्रामपंचायत किंवा मनपातही नोंद नाही. अशा प्रकारच्या समस्या मनपा सोडवु शकेल काय ? याचा विचार करुन किती भाग आपल्याला घेता येईल हे पाहावे. यासंबंधीचे योग्य मार्गदर्शन प्रशासनाकडुन घेऊन कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : यासंबधी सखोल अभ्यास करावा लागेल वाळुज एम.आय.डी.सी. किंवा इतर एम.आय.डी.सी. शहणापुर पंचतारीका औद्योगिक वसाहत होत आहे. काहीचे निवास जाहीर झाला तर काहीचे कलम ६ ची नोटीस निघाले आहे. त्याचा करार केलेला आहे. २५ वर्षे मनपा हद्दीत जाणार नाही. परंतु याचा अभ्यास करु. आपण ग्रामविकास खात्याशी संपर्क करु शकतो. कोटयावधी अनुदान मिळते. जसे इंदिरा आवास स्कीम इ. ग्रामविकास खात्यातर्फे आवश्यक सोयी सुविधा देण्याचे बंद होणार ही कार्यवाही करावयाची झाल्यास तेवढी क्षमता मनपामध्ये आहे काय ? शासकिीय यंत्रणा आहे पाणी, वीज, तांत्रिक व आर्थिक क्षमता आहे का ? हे पहावे लागेल. उत्पन्नाचा विचार न करता कार्यवाही करणे योग्य होणार नाही. शिवाजीनगर संदर्भात नगर विकास खात्याने हरकत मागवली होती, राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर मा. उच्च न्यायालयाने सदरचा भाग नगर पंचायत किंवा मनपा हद्दीत समावेश करावा. अभ्यासाची गरज आहे.

मा. महापौर : प्रस्ताव स्थगित करण्यात येतो. विशेष बाब म्हणुन शिवाजीनगर हा भाग महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव** :

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो. परंतु औरंगाबाद महानगरपालिका हद्दीलगत असलेल्या शिवाजीनगर (गारखेडा) हा भाग म.न.पा. हद्दीमध्ये समाविष्ट करण्यास विशेष बाब म्हणुन सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९/५** :

कटकट दरवाजा बाहेरील पुलाची उंचीकमी असल्याने पावसाचे पाणी यामधुन जाऊ शकत नाही. येथील नाल्याचे पाणी आसपासच्या घरांमध्ये घुसुन दरवर्षी लाखो रुपयांचे नुकसान होते. या पुलाची उंची वाढविण्यात कटकट दरवाजामधुन वाहतुक होऊ शकत नाही. याकरिता कटकट दरवाजाच्या दक्षिणेकडील आणि उत्तरे कडील जमीन संपादन करुन दुहेरी रस्ता करावा. तसेच पुलाची उंची वाढवुन सध्या चालु (कटकटगेट बाहेर( असलेल्या रस्त्यावर वाहतुक बेट निर्माण करावे.

कटकट दरवाजाच्या दक्षिणेकडील रस्ता संपादन करण्या संबंधिचा प्रस्ताव सुमोर सात वर्षापुर्वी महानगरपालिकेने मंजुर केलेला आहे. सध्या उत्तरेकडील जागा संपादीत करण्यास मंजुरी द्यावी. तसेच नवीन आर.सी.सी. पुल बांधुन शरिफ कॉलनी नेहरुनगर, रहेमानिया कॉलनी या भागातील नागरिकांना दर वर्षी होणारा त्रास दुर करण्यात यावा. प्रस्ताव मंजुरीस्तव सर्वससाधारण सभेत सादर.

सुचक : श्री. शे. इसाक शे. जैनोद्यीन
अनुमोदक : श्री. स. मुमताज अली, श्री.अ. रशिद,
श्री. रतनकुमार पंडागळे, श्री. शेख. मुनाफ
दिनांक : ३०.८.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कटकट गेटच्या दक्षिणेकडील आणि उत्तरेकडील जमीन संपादन करुन दुहेरी रस्ता करणे तसेच पुलाची उंची वाढवुन सध्या चालु असलेल्या रस्त्यावर (कटकटगेट बाहेर) वाहतुक बेट निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८०/६** :

मिसरवाडी ही झोपडपट्टी अनेक वर्षापासुन अस्तित्वात आली असुन या वस्तीत कोणत्याही प्रकारची नागरी सुविधा नाही. नगर रचना विभागात चौकशी केली असता असे आढळुन आले की, सदरील वस्ती विकास आराखडयात आरक्षण दर्शविले आहे. त्यामुळे या वस्तीचा विकास खुंटला आहे तरी आराखडयातुन सदर वस्तीवरिल आरक्षण उठविण्यात यावे. व या वस्तीस स्लम म्हणुन घोषित करावे.

सुचक : श्री. रतनकुमार पंडागळे
अनुमोदक : श्री. दलबीरसिंग जबिंदा
दिनांक : २३.८.२०००.

**ठराव क्र. ८०/६** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिसरवाडी ही अनेक वर्षापासुन अस्तित्वात असलेली झोपडपट्टी असल्यामुळे या वस्तीत नागरी सुविधा पुरविण्याचे दृष्टीने या ठिकाणी असलेले आरक्षण उठविण्याचे व ही वस्ती "स्लम" म्हणुन घोषित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१/७** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पैठणरोड ते विटखेडा गाव रस्त्यास जोडणाऱ्या पुलाची उंची ही अतिशय कमी असल्यामुळे पावसाळयात सदरील गावतील नागरिकांचा येण्याजाण्याचा संपर्क तुटतो तसेच या पुलाच्या रस्त्यावरुन जाणाऱ्या येणाऱ्या शाळकरी मुले सुध्दा घरी जाऊ शकत नाही.

करिता या भागातील नागरिकांनी विनंती केलेली आहे की, सदरील पैठण रोड ते विटखेडा या रस्त्याला जोडणाऱ्या पुलाची उंची वाढविण्यात यावी. तसेच रस्त्याची रुंदीही वाढविण्यात यावी. जणे करुण पावसाळयात जो नागरिकांना येण्याजाण्याचा संपर्क तटतो. तो सुरळीत होईल. करिता सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.
सुचक : श्री. नंदकुमार घोडेले
अनुमोदक : श्री. अंबादास दानवे, श्री. सुदाम पाटिल सोनवणे, श्री. भ्रत लकडे
दिनांक : ३.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणरोड ते विटखेडा गांव जोडणाऱ्या रस्त्याची रुंदी वाढविणे व या रस्त्यावरिल पुलाची उंची वाढविणे करिता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२/** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र. २९ हमालवाडा मधील हमालवाडा सिलवड लाईट जवळील रेल्वे क्रॉसिंगवर ब्रीज नसल्यामुळे या ठिकाणी --- होण्याची शक्यता आहे. नागरिकांना जाण्यायेण्यासाठी पर्यायी रसता नसल्यामुळे येथु जाणे येणे करावे लागते. नागरिकांच्या जिवीताचा विचार करता या ठिकाणी रेल्वे ओव्हर ब्रीज असणे आवश्यक आहे. तरी या ठिकाणी मनपातर्फे रेल्वे ओव्हर ब्रीज बाधणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधरण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.
सुचक : श्री. अय्युब खान सरदार खान
अनुमोदक : श्री. नंदकुमार घोडेले
दिनांक : ४.९.२०००.

संवाद :
मा. महापौर : सभागृहात सुचक उपस्थित नाहीत म्हणुन प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव** :

प्रस्तावचे सुच सभागृहात उपस्थित नाहीत. करिता हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्र. ८३/९** :

गजानन महाराज मंदिर रस्त्यावर सध्या वाहतुकीची वर्दळ वाढलेली आहे मंदिराजवळच अद्यायावत डॉ. हेगडेवार रुग्णालय नुकतेच सुरु झालेले आहे. तसेच दर गुरुवारी भाविकांची गर्दीही दिवसें-दिवस वाढत आहे. बीड रोडकडे जाणारी वाहतुक जालना रस्त्यावरुन शिवाजीनगर मार्गे याच चौकातुन जात आहे. तथापी या चौकात अंधारच आहे.

तरी गजानन महाराज मंदिरा समोरिल चौकात हायमास्ट दिवे लावणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.
सुचक : श्रीमती अशा बिनवडे, श्री. अंबादास दानवे
अनुमोदक : श्रीमती जयश्री किंवळेकर, सौ. जयश्री कुलकर्णी,
श्री. प्रशांत देसरडा, श्री सुदाम पाटील सोनवणे,
श्री. नंदकुमार घोडले, सौ. कचराबाई लोखंडे

दिनांक : ४.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गजानन महाराज मंदिर रस्त्यावरुन दिवसें-दिवस बीड रोडकडे जाणारी वाहतुक तसेच भाविकांची होणारी गर्दी आणि मंदिराजवळील डॉ. हेडगेवार रुग्णालयाचा विचार करता या चौकात "हायमास्ट" दिवे बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४/१ :**

पैठण रोड, बीड बायपास टी पॉइंट (रेल्वेस्टेशन महानुभाव आश्रम जवळील) चौकास "चक्रधर स्वामी चौक" असे नांव देण्यात यावे करिता प्रस्ताव सादर.

सुचक : श्री. नंदकुमार घोडेले

अनुमोदक : श्री. अंबादास दानवे, श्री. सुदाम पाटिल सोनवणे,
सौ. कचराबाई लोखंडे

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठण रोड, बीड बायपास टी पॉइंट (रेल्वेस्टेशन जवळील चौकास "चक्रधर स्वामी चौक" असे नांव देण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५/१** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कांचनवाडी गट न. १९ ची गायरान जमीन आहे. ती आपल्या महानगरपालिकेकडे हस्तांतरण करुन त्या भागातील नागरिकांना आरोग्य केंद्र खेळाचे मैदान, वाचनालय, इ. उपक्रम राबविण्याकरिता इतरत्र जागा नसल्यामुळे सदरील जागा ही मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे गट नं. १९ ची गायरानची असलेली मोकळी जागा हस्तांतरण करणे बाबतचा हा प्रस्ताव मंजुर करुन मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावा. जेणे करुन या प्रभागातील नागरिकांना उपरोक्त आवश्यक त्या सुविधा पुरविणे बाबत महानगरपालिकेतर्फे उपक्रम राबविता येईल. करिता सदरील प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. नंदकुमार घोडेले

अनुमोदक : श्री. अंबादास दानवे,श्री.सुदाम पाटिल सोनवणे
श्री. भरत लकडे, श्री. आनंद तांदुळवाडीकर.

दिनांक : ४.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कांचनवाडी भागातील नागरिकांना आरोग्य केंद्र,खेळाचे मैदान, वाचनालय इत्यादी उपक्रम महानगरपालिके तर्फे राबवुन सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता कांचनवाडी गट नं. १९ ची गायरान जमीन हस्तांतरण करणेकरिता मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रकरण पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच हा पुस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८६/१** :

प्रस्तावात सादर करण्यात येतो की, श्री. तनवीर अहेमद खान रा. कैसर कॉलनी औरंगाबाद यांना किडनीचा आजार असुन त्यांचा उपचार यशोदा हॉस्पीटल हैद्राबाद येथे सुरु असुन या आजारास्तव रु. ९०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे श्री. तनवीर अहेमद खान यांची आर्थिक परिस्थिती जमतेम असुन ते इतका खर्च पेलु शकत नाही. त्यांना विशेष वैद्यकिय मदत म्हणुन रुपये ४०,०००/- देण्यास मान्यता व्हावी. करिता सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये मंजुर करण्यात यावा.

सुचक : श्री. सली पटेल
अनुमोदक : श्री. नंदकुमार घोडेले.
दिनांक : ४.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. तनवीर अहेमद खान, रा. कैसर कॉलनी औरंगाबाद यांना किडनीच्या आजारावरिल उपचाराकरिता विशेष वैद्यकिय मदत म्हणुन र रु. ४०,०००/- (स्वेच्छानिधी) ची आर्थिक मदत देण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८७/१** :

महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर मनपा हद्दीत सभावेतालचे १८ खेडयांचा समावेश करण्यात आला. या खेडयांना महानगरपालिके मार्फत अल्प प्रमाणात नागरी सुविधा पुरविण्यात येत आहेत. १८ खेडयांपैकी काही खेडे महानगरपालिकेने झोपडपट्टया म्हणुन घोषित केल्या. येथील रहिवाश्यांनी अद्याप पी. आर.कार्ड देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे रहिवाशांची अत्यंत गैरसोय होत असुन पी.आर.कार्ड मिळणे बाबत रहिवाशी सारखी मागणी करत आहेत.

महानगरपालिका हद्दीतील सर्वही १८ खेडे (वसाहती) मधील मिळकत धारकांना पी.आर.कार्ड देणे बाबत नगर भुमापन अधिकारी व मा. जिल्हाधिकारी यांना शिफारस करणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अंबादास दानवे, श्री. काशिनाथ कोकाटे,
श्री. भाऊसाहेब वाघ, सौ. मंदा पवार.
अनुमोदक : श्री. भगवान घडामोडे, श्री. भगवान रगडे,
श्री. राजु शिंदे, श्री. मोतीलाल जगताप,
सौ. रुख्मीणी शिंदे, श्री. नंदकुमार घोडेले, श्री. अ. रशिद.
दिनांक : ६.९.२०००.

संवाद :

श्री. सुनिल पंडागळे : १८ खेडयांचा समावेश केला त्या कोणकोणता भाग आला याची महिती देण्यात यावी. नवीन सन्माननीय सदस्यांना याची माहिती नाही.

मा. महापौर : ठराव मंजुर करुन मा. जिल्हाधिकारी यांचे कडे पाठवण्यात येईल.

श्री. अंबादास दानवे : १८ खेडे मनपामध्ये जोडले आहे या भागातील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. १८ खेडयांचा ७/१२ वर व्यवहार चालले ७/१२ वर १००-२०० लोकांची नांवे आली . बऱ्याच भागामध्ये सोसायटी इ

ाालेल्या आहेत. परंतु सुविधा मिळत नाहीत. बांधकाम परवानगी घेतात ते दिले जाते. परंतु संबंधित रहिवाशांकडे पी.आर.कार्ड उपलब्ध नाही. त्यांना पी.आर.कार्ड देणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त : शासन निर्णय आहे. ७/१२ चालु असेल ७/१२ ऐवजी पी.आर.कार्ड देण्यात यावे. यास पैसे भरावे लागतात मुळ मालक पैसे भरणार नाही. त्यामुळे मोजणी होणार नाही. शेजारच्या हरकती घ्याव्या लागतात. त्या नसल्यास मनपा पी.आर.कार्ड देण्यात येणाऱ्या खर्चाची अर्थसंकल्पात तरतुद केली आहे. काय हे पहावे लागले सर्वसाधारणपणे १५००/- रुपये प्रत्येक नागरिकांस भरावे लागेल रक्कम जमा झाली तर जिल्हा निरिक्षक भुमी अभिलेख यांना आदेश करु शकतो काय पैसे भरल्याशिवाय मोजणी होत नाही. महानगरपालिकेकडुन आर्थिक तरतुद करण्यात आल्या नंतर कार्यवाही करता येईल.

श्री. गणेश तांबे : भावसिंगपुरा स्लम भाग असुन तेथील नागरिकांना पी.आर.कार्ड दिले नाही. त्याचा खर्च कोण करणार आहे.

मा. आयुक्त : भावसिंगपुरा येथे विशेष बाब म्हणुन सर्वेक्षण झाले आहे. १९८५ चे अतिक्रमणाचे एकुण ६८४ प्लॉट आहेत. कट आऊट डेट प्रमाणे मास्टर यादी केली.१९९३ च्या शासन निर्णयानुसार येथील नागरिकांनी भागेवटा किंमत (आकोपन्सी प्राईज) भरली तर पी.आर.कार्ड देऊ शकतो. यापैकी २०० ते २५० लोकांनी पैसे भरले नाही. यादी व कब्जेदार यात फरक आहे. त्यामुळे सर्वानाच पी.आर.कार्ड देता येत नाही. मास्टर यादीनुसार काही जागाचे मुळ मालक अज नाहीत म्हणुन पी.आर.कार्ड देता येत नाही.

श्री. गणेश तांबे : ज्याचे नोंद घ्यावयाचे राहिले त्याचे बाबत काय करणार ?

मा. आयुक्त : या व्यतिरिक्त विहित मुदतीत जिल्हा निरिक्षक भुमि अभिलेख यांचेकडे मोजणी फीस भरावयाची मोजणी करुन घ्यावयाचे व त्यावेळी कोणी हरकत घेतली तर पी.आर.कार्ड देण्यास अडचण येईल.

श्री. सुनिल वडागळे : मनपाने अशा योजना राबवाव्यात की त्यापासुन उत्पन्न मिळु शकेल.

मा. आयुक्त : भावसिंगपुरा भागातील ४०० लोकांना पी.आर.कार्ड दिले आहे. त्यांची यादी मनपाकडे दिली जाईल व त्यानुसार टॅक्स वसुल करता येईल.

मा. महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यात येऊन पुढील कार्यवाहीसाठी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात येईल.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या १८ खेडयांमधील मिळकत धारकांना पी.आर.कार्ड देणे करिता नगर भुमापन अधिकारी यांचेकडे तसेच मा. जिल्हाधिकारी यांना शिफारस करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधाधिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८/१** :

भिमनगर भावसिंगपुरा वार्ड क्र. २ मध्ये २० हजार लोकसंख्या आपल्या कारणाने तसेच संबंधित ठिकाणी विद्यार्थ्याची संख्या जवळपास ४ ते ५ हजार मध्यमवर्गीय कुटुंब राहात असल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती सक्षम नाही. त्यामुळे त्यांच्या विद्यार्थी मुलाना अभ्यासाची योग्य ती सुविधा उपलब्ध करुन शकत नाही तेव्हा संबंधित परिसरामधील विद्यार्थ्यांची संख्या व गैरसोय लक्षात घेता सर्व सोयीना उपलब्ध असे अभ्यासगृह निर्माण करण्यात यावे.

सुचक : श्री. गणेश तांबे
अनुमोदक : श्री. साहेबराव कावडे
श्री. भाऊसाहेब ताठे
दिनांक : ७.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे वार्ड क्रमांक २ भिमनगर भावसिंगपुरा वार्डातील विद्यार्थ्यांची संख्या तसेच मध्यम वर्गीय कुटुंबाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता या परिसरामध्ये सर्व सोयीनी युक्त असे अभ्यासगृह निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९/१५** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगर पालिकेच्या सिध्दार्थ उद्यानातील विद्युत रोषणाई, संगित कारंजे, यांचे लाईटबील लाखो रुपये महानगरपालिकेला भरावे लागते. सदरील विद्युत बील अर्थिक दृष्टया देणे मनपास सिध्दार्थ उद्यानातील वसुलीच्या दृष्टीने परवडत नाही. तरी सदरील विद्युत देयकाचे पैसे वाचविण्याचे दृष्टीकोनातुन या ठिकाणी महानपालिके तर्फे "सौर ऊर्जा प्रकल्प" राबविल्यास महापालिकेचे विद्युत बिलाचे पैसे बचत होतील व या बचतांच्या पैशातुन सिध्दार्थ उद्यानात विकास कामे करण्यास मदत होईल. करिता सिध्दार्थ उद्यानात "सौर ऊर्जा प्रकल्प" निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. मधुकर सावंत, श्री. भगवान घडामोडे
अनुमोदक : श्री. अय्युबखॉ सरदार खान, श्री. गणेश तांबे, सौ. जयाश्री कुलकर्णी
दिनांक : ७.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यानातील विद्युत रोषणाई संगित कारंजे इत्यादी वरिल लाईट बीलाची बचत करण्याचे दृष्टीने सिध्दार्थ उद्यानामध्ये महापालिकेतर्फे "सौर ऊर्जा प्रकल्प" राबाविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०/१६** :

भिमनगर भावसिंगपुरा या वार्डाची लोक संख्या जवळपास २० हजार असल्या कारणाने आणि संबंधित वार्डामध्ये अनेक वसाहती असल्यामुळे या ठिकाणी सतत रहदारीचा प्रश्न बिकट झालेला आहे. भिमनगरच्या पहिल्या पुलावरुनच सर्व लोकांना ये-जा करावी लागते. सर्व वसाहतीमध्ये येण्या-जाण्यासाठी एकाच पुलावरुन प्रवेश करावा लागतो. संबंधित

पुल अरुंद असुन रहदारीच्या दृष्टीने अरुंद असुन तिथे नेहमी अपघात होतात. त्यामुळे त्याच पुलाशेजारी दुसरा पुल उभा करावा. रस्त्याचे रुंदीकरण त्वरीत करण्यात यावे.

सुचक : श्री. गणेश तांबे
अनुमोदक : श्री. साहेबराव कावडे, श्री. भाऊसाहेब ताठे
दिनांक : ७.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भिमनगर भावसिंगपुरा वार्डामध्ये अनेक वसाहती असल्या ने रहदारी वाढलेली असुन या भागात जाण्या करिता असलेला एकमेव पुल अपुरा पडत आहे. त्यामुळे या पुलाशेजारीच दुसरा पुल उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१/१०** :

भिमनगर भावसिंगपुरा वार्ड क्र. २ मध्ये एकुण लोकसंख्या जवळपास २० हजार आहे. तसेच सदरील वार्डामध्ये भिमनगर भावसिंगपुरा,श्रीवस्तीनगर, पेठेनगर, नवयुग कॉलनी, कानीफनाथ कॉलनी, तेलगोटे कॉलनी, इत्यादी वसाहती असुन भविष्यात लोकसंख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. कारण नियोजित बऱ्याचशा कॉलनीचे ले-आऊट मंजुर झालेली आहे. या पार्श्वभुमीवर विचार करता संबंधित वार्ड हा फार मोठा वार्ड असुन या ठिकाणी मध्यमवर्गीय कुटुंब राहतात. त्यांच्या सार्वजनिक आरोग्य सेवेसाठी सर्व सोयींनी युक्त असे हॉस्पीटल (दवाखाना) असणे अत्यावश्यक आहे. करिता किमान २५ खाटांचा हॉस्पीटल सुरु करण्यात यावे.

सुचक : श्री. गणेश तांबे
अनुमोदक : श्री. साहेबराव कावडे
श्री. भाऊसाहेब ताठे.
दिनांक : ७.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्रमांक २ भिमनगर भावसिंगपुरा या वार्डात एकुण लाकसंख्या तसेच वाढलेल्या वसाहतीची संख्या लक्षात घेता या भागात सर्व सोयींनी युक्त असे २५ खाटांचे हॉस्पीटल (दवाखाना) सुरु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२/१८** :

श्री. टिकाराम धनीराम बरथुने रा. पदमपुरा औरंगाबाद यांना हृदय शस्त्रक्रियेसाठी अंदाजित खर्च १ लाख रुपये अपेक्षित आहे. संबंधितांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. त्यामुळे तेवढा खर्च ते करु शकत नाही. करिता श्री. टिकाराम धनिराम बरथुने, रा. पदमपुरा यांना हृदय शस्त्रक्रियेसाठी नगरसेवक स्वेच्छानिधीमधुन र. रु. ६०,०००/- (अक्षरी साठ हजार फक्त) आर्थिक मदत करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद :

मा. महापौर : रुग्णांना आर्थिक मदत किती द्यावयाची हे सन्माननीय सदस्यांच्या पत्रानुसार राहिल आतापर्यन्त स्वेच्छानिधीतुन मदत देत होतो. यापुढे २५ हजार

रुपयापेक्षा जास्त रक्कम देता येणार नाही व सदर रक्कम ही संबंधित हॉस्पीटलच्या नांवाने लेखा विभाग चेक व्दारे व्यक्त करतील. त्यासाठी तेथील संबंधित डॉक्टरचे प्रमाणपत्र मनपाचे डॉक्टरचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. टिकाराम धनिराम बरथुने, रा. पदमपुरा औरंगाबाद यांना हृदय शस्त्रक्रियेसाठी नगरसेवक स्वेच्छानिधीतुन र. रु. २५,०००/- (पंचवीस हजार) आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३/१९** :

माझ्या वार्डात श्री. अब्दुल अलीम पि. अब्दुल करीम यांना हृदय रोगाचा आजार असल्यामुळे शस्त्रक्रियेसाठी संबंधित डॉक्टरांनी ५० हजार रुपये खर्च दाखविलेला आहे. करिता स. नगरसेवक यांच्या निधीतुन संबंधितास पन्नास हजार खर्च देण्यासाठी सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. रशिदा बेगम
अनुमोदक : सौ. निखल एजाज झैदी
दिनांक : १३.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. अब्दुल अलीम पिता अब्दुल करिम यांना हृदय रोगावरील शस्त्रक्रियेसाठी नगरसेवक स्वेच्छानिधीतुन रु. २५,०००/- (पंचविस हजार) आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४/२०** :

श्री. मुस्तफा अब्दुल रहेमान, समी कॉलनी रोशनगेट, औरंगाबाद यांना कॅन्सर या रोगावर इलाज करायाकरिता मोठया प्रमाणात खर्च अपेक्षित असल्यामुळे त्यांनी नगरसेवक स्वेच्छा निधीतुन मदत मिळण्याची विनंती केलेली आहे. तरी त्यांना रक्कम रु. २५,०००/- (पंचवीस हजारा) पर्यन्त आर्थिक मदत देण्याकरिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अशरफ मोतीवाला
अनुमोदक : श्री. शे. ईसाक शे. जैनोद्यीन
दिनांक : १३.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. सय्यद मुस्तफा अब्दुल रहेमान, रा. समी कॉलनी रोशनगेट औरंगाबाद यांना कॅन्सर या रोगावरील इलाज करण्यासाठी नगर सेवक स्वेच्छानिधीतुन र. रु. २५,०००/- (पंचवीस हजार) आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५/२** :

सौ. सुनिता विजयकुमार राठी रा. कैलासनगर औरंगाबाद यांना हृदयावरील शस्त्रक्रियेसाठी अंदाजित खर्च र. रु. १,००,०००/- (एक लाख) इतका येणार आहे. संबंधिताची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे संबंधितांना शस्त्रक्रियंसाठी नगरसेवक स्वेच्छानिधीतुन रु. २५,०००/- (पंचवीस हजार) आर्थिक मदत देणेसाठी प्रस्वात मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. प्रशांत देसरडा, श्री. अंबादास दानवे
अनुमोदक : श्री. भगवान घडामोडे, श्री. काशीनाथ कोकाटे
श्री. अशरफ मोतीवाला, श्री. साहेबराव कावडे, श्री. रतनकुमार पंडागळे
दिनांक : १४.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सौ. सुनिता विजयकुमार राठी रा. कैलासनगर औरंगाबाद यांना हृदयवरील शस्त्रक्रियेसाठी नगरसेवक स्वेच्छानिधीतुन रक्कम रु. २५,०००/- (पंचवीस हजार ) आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९६/२२** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७-अ प्रमाणे दरवषी्र ३१ जुलै पर्यावरण अहवाल महापालिकेसमोर ठेवावा लागतो. यासाठी महानगरपालिकेचा दरवर्षी सुमारे २ ते ३ लक्ष खर्च होतो. व फक्त त्यांचा अहवाल तयार होतो. त्यावर नियंत्रण ठेवणे अंलबजावणी करणे व पर्यावरणाशी पुरक बाबी व निगडीत कामांसाठी स्वतंत्र यंत्रणा या महानगरपालिकेत नाही मात्र इतर महानगरपालिकांमध्ये जसे ठाणे महानगरपालिका येथे प्रदुषण नियंत्रण कक्ष स्वतंत्ररित्या काम करित आहे. त्याच धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेमध्येही प्रदुषण नियंत्रण कक्ष निर्माण करणे आवश्यक वाटते. प्रामुख्याने त्यांची पुढील प्रमाणे राहतील.

१) पिण्याच्या पाण्याचे पृथ : करण करणे नमुने तपासणे.
२) परिसरातील पाणी तपासणी जसे नाला कारखान्याचे दुषित पाणी इ.
३) जमिनी अंतर्गत पाण्याचे नमुने तपासणे जसे तळे, झरा इ.
४) ट्रिटमेंट प्लान्टच्या पाण्याची तपासणी.
५) हवेतील वायुंचे पृथःकरण.
६) पाण्यातील, हवेतील व ध्वनी प्रदुषण तपासणी व पृथःकरण.

विशेष कामे : महानगरपालिकेच्या पोहण्याच्या तलावातील पाणी शुध्दीकरणासाठी रसायने वापरणे संबंधी नमुने तपासणे, विहिरींचे व हापश्यांचे पाणी तपासणी, नाला, ओहळ, तलाव इ. चे पाणी तपासणी मनपाचे घन कचऱ्यांचे पृथःकरण करणे इ. तसेच प्रत्येक वर्षी पर्यावरण अहवाल तयार करण्यासाठी देखील प्रदुषण नियंत्रण कक्षाचा उपयोग होईल व त्यासाठी करावा लागणारा खर्च हा कमी होईल. शहरातील जे नुतनीकरणाचे कामे होती त्यासाठी पर्यावरण मार्गदर्शन करण्यात येईल. तरी औरंगाबाद महानगरपालिकेत प्रदुषण नियंत्रण कक्ष निर्माण करण्यासाठी निर्माण मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) प्रमाणे खालील पदे महानगरपालिका अस्थापनेवर निर्माण करणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | वेतन श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | प्रदुषण नियंत्रण अधिकारी (पोलुशन कंट्रोल ऑफिसर) | ०१ | एम.एस.सी. (पर्यावरणशास्त्र श्रेणी) आणि पर्यावरण सुपरवायझर किंवा डिसेलीनेशन,अन्न-रसायन पाणी, फॉरमॅस्युटीकल संबंधीत क्वॉलीटी कंट्रोल सुपरवायझर पेक्षा कमी नाही अशा पदावर किमान ७ वर्षाचा काम करण्याचा अनुभव<br>किंवा<br>एम.एस.सी. (पर्यावरणशास्त्र प्रथम श्रेणी) आणि पर्यावरणातील पी.एच.डी. सह २ वर्षाचावरील प्रमाणे कामाचा अनुभव आवश्यक व वय ४० वर्षापेक्षा जास्त नसावे. | |
| २. | प्रदुषण निरिक्षक (पोलुशन कंट्रोल इन्स्पेक्टर) | ०१ | बी.एस.सी. (पर्यावरणशास्त्र) व संबंधित कामचा ५ वर्षाचा अनुभव व वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. | |
| ३. | लिपिक कॉम्प्युटर-(ऑपरेटर) | ०१ | मनपातील इतर मंजुर पदाप्रमाणे. | |
| ४. | शिपाई | ०१ | मनपातील इतर मंजुर पदाप्रमाणे. | |

वरील पदांसाठी इतर महानगरपालिकामध्ये लागु असलेली वेतनश्रेणी या पदासाठी लागु राहील. प्रदुषण नियंत्रण कक्षाच्या कामासाठी शासनाच्या विविध योजना मधुन अर्थसाहय प्राप्त होते. जसे युनायटेड नॅशनल इन्वायरर्नमेटल प्रोग्राम (यु.एन.ई.पी.) सेंट्रल पोलुशन कंट्रोल बोर्ड (सी.पी.सी.बी.) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (एम.पी.सी.बी.) जागतिक बँक (वर्ल्ड बॅक) इ. कडुन अर्थसाहय मिळत असते. या योजनेतुन या शहरातील विविध पर्यावरणाशी संबंधित जागांचा विकासही घडवुन आणता येईल व शहराचा सौदर्यात भर पडेल. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अंबादास दानवे, श्री. सुरजीतसिंह खुंगर,
श्री. कैसर खान, श्री. अशरफ मोतीवाला
अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. सलीम पटेल शमशेर पटेल,
सौ. निखल एजाज जेदी.
दिनांक : १५.९.२०००.

संवाद :

श्री. सुरजीतसिंह खुंगर : मा. महापौरांनी शहर साफसफाई संबंधी मिटींग घेतली. पर्यावरण संदर्भात प्रस्ताव आला. शहरातील पुर्णपणे स्वच्छता नियंत्रण होणे गरजेचे असुन स्वच्छता नसेल तर प्रदुषण होऊ शकते. स्वच्छतेवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असुन यासाठी साधान सामुग्रीची गरज आहे. ठाणे

महानगरपालिकेमध्ये प्रदुषण नियंत्रण कक्ष स्वतंत्ररित्या चालु आहे. इतर कार्यालयही यासाठी आर्थिक मदत करतात त्यात पाण्याचे नमुने तपासणे परिसरातील पाणी तपासणे जसे नाला करखान्याचे दुषित पाणी -जमीनी अंतर्गत पाण्याचे नमुने ट्रिटमेंट प्लान्टच्या पाण्याची तपासणी हवेतील वायुचे पृथ:करण तसेच पाण्यातील हवेतील ध्वनी प्रदुषण तपासणी व पृथ:करण इ. पध्दतीने तपासणी होते. या प्रस्तावास मंजुरी द्यावी.

श्री. जयवंत ओक : प्रशासन काय करणारा झाडे लावण्याची एक योजना राबवली होती त्याचे काय झाले प्रशासनाने खुलासा करावा.

श्री. अंबादास दानवे : या अगोदर मनपाच्या माध्यमातुन ९७-९८ ला "मशाल" या संस्थेकडे सर्वेक्षण काम दिले होते. ठाणे मनपा मार्फत शहरातील प्रदुषण पर्यावरण संबंधात प्रदुषण नियंत्रण कक्षाची स्थापना केली मशाल संस्थेमार्फत सर्वेक्षण केले. त्यात वायु, ध्वनी, जल,यांचे प्रदुषण व सार्वजनिक आरेग्या संबंधि विशेष सुचनाही दिल्या होत्या. परंतु पुढे काय अंमलबजावणी केली माहीत नाही. २००० पर्यन्त सुध्दा अंमलबजाणी नाही. पुन्हा नव्याने प्रस्ताव आणावा लागतो. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या धर्तीवर ही योजना राबवणे गरजेचे आहे. शहरात वेगवेगळे प्रकारचे दुषित पाणी, कारखान्याचे दुषित पाणी ध्वनी प्रदुषण तसेच क्रांती चौकापासुन ते संपुर्ण जालना रोडला वाहनाचे प्रदुषण मोठया प्रमाणात होते ते कमी करण्यासाठी काय उपाय योजना करता येईल ते पहावे. त्यासाठी प्रदुषण नियंतत्रण कक्ष स्थापन करावे. या विभागासाठी अनुभवी अधिकारी/कर्मचारी हे शासनाचे मागवल्यास निश्चितच शहराचे प्रदुषण कमी होऊ शकेल. हा प्रस्ताव एकमताने मंजुर करावा.

श्री. स. अली मिरा सलामी : दिल्ली,ठाणे, मुंबई, औरंगाबाद पर्यावरण प्रदुषण विरुध्द लाढण्यासाठी वारंवार चर्चा होते. सकाळचे दुर्गधीयुक्त पाणी, पॉलीथीन बॅगचा प्रश्न आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक आहे. पर्यावरणाचा प्रस्ताव आला. त्या अनुषंगाने ठाणे येथे प्रदुषण नियंत्रण कक्ष स्थापन केले. ४ वर्षाची चांगली कामगिरी केली, चांगला रिपोर्ट आला. तेथील तलाव इतके साफसफाई करण्यात येतात. की, त्यात आतमध्ये चेहरा दिसतो. यासाठी सर्व पैसा सेट्रल पोलुशन कंट्रोल बोर्ड, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जागतिक बँक कडुन येतो. ठाणे मनपाला ३.२५ कोटी मिळाले. आपण संस्थेला देवुन अहवाल मागवला आतापर्यंन्त अंमलबजावणी नाही. या कामसाठी तज्ञ लोकांना ठरविक वेतनावर घ्यावे यासंबंधी आजच निर्णय घ्यावा. पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्याची कार्यवाही करता येईल.

श्री. वसंत नरवडे : पर्यावरण व ध्वनी प्रदुषण हे वेगवेगळे विभाग असावेत.

मा. महापौर : सर्वांच्या भावना लक्षात घेऊन यासाठी प्रदुषण नियंत्रण अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे. हा प्रस्ताव जशाच्या तसा मंजुर करण्यात येतो. शैक्षणिक अर्हतेनुसार महाराष्ट्र पोलुशन कंट्रोल बोर्डाची नियमावली मागवुन तशी कार्यवाही करता येईल. तरतुदीची मागणी शासनाकडे मागवुन तशी कार्यवाही करता येईल. तरतुदीची मागणी शासनाकडे केली जाईल. तोपर्यंन्त ठराविक वेतनावर कर्मचारी भरण्यास मंजुरी देण्यात येते. व पर्यटन,पर्यावरण उद्यान वेगळे असावेत.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिके मधुन "प्रदुषण नियंत्रण कक्ष" स्थापन करण्यास व त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेल्या खालील पदांची निर्मिती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते

| अ. क्र. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| ०१. | प्रदुषण नियंत्रण अधिकारी (पोलुशन कंट्रोल ऑफिसर) | ०१ (एक) |
| ०२. | प्रदुषण निरिक्षक (पोलुशन कंट्रोल इन्स्पेक्टर) | ०१ (एक) |
| ०३. | लिपिक (कॉम्प्युटर ऑपरेटर) | ०१ (एक) |
| ०४. | शिपाई. | ०१ (एक) |

तसेच या पदाकरिता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे लागु असलेली शैक्षणिक आर्हत व अनुभव इत्यादी विचारात घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी तोपर्यंन्त प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रदुषण नियंत्रण कक्ष सुरु करण्याकरिता ठराविक वेतनावर वरिल अ.क्र. १ ते ४ ची अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे भरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रदुषण नियंत्रण कक्षाच्या कामासाठी शासनाच्या विविध योजनांमधुन नियमाप्रमाणे अर्थसाहय प्राप्त करुन घेण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९७/२** :

प्रभागामधील गणेश कॉलनी भागात मा. विभागीय आयुक्त कार्यालयाचे पाठीमागे महानगरपालिका मालकीची बरीच जागा उपलब्ध आहे. सदर जागेवर यापुर्वी विभागीय कार्यालय उभारणेचा प्रस्ताव विचाराधीन होता .परंतु आता विभागीय कार्यालयाची इमारत अन्य ठिकणी तयार होत आहे. महानगरपालिका हद्दीत महानगरपालिका मालकीचे विभागागृह नाही. विश्राममगृह नसल्याने राज्याचे विविध ठिकाणाहुन येणारे राजकीय नेते. पदाधिकारी, प्रतिष्ठीत व्यक्ती, कलावंत व विविध क्षेत्रातील महत्वाच्या व्यक्ती यांची अत्यंत गैरसोय होते.

मा. विभागीय आयुक्त कार्यालयाचे पाठीमागे उपलब्ध असलेल्या जागेवर अद्ययावत व सुसज्ज असे विश्रामगृहासाठी भव्य इमारत उभारण्यात यावी. जेणे करुन वर नमुद केलेल्या सर्वही व्यक्तीची गैरसोय दुर होईल. विश्रामगृहाचे इमारतीमुळे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल व डॉ. सलीम अली तलावाचे काठावर निसर्गरम्य ठिकाणी उंच जागेवर विश्रामगृहाची भव्य इमारत उभारण्याचे श्रेय महानगरपालिकेस मिळेल. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. बाळासाहेब थोरात, श्री. अंबादास दानवे
अनुमोदक : श्री. नंदकुमार घोडेले, श्री. सुदाम पाटिल सोनवणे
दिनांक : १५.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गणेश कॉलनी भागात विभागीय आयुक्त कार्यालयाचे पाठीमागे असलेल्या उपलब्ध जागेत महानगरपालिकेचे भव्य इमारत बांधुन अद्ययावत व सुसज्ज असे विश्रामगृह उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९८/२४** :

प्रस्ताव सादर करतो की, मोतीवाला कॉलनी चिकलठाणा येथे पिण्याची व ड्रेनेजची लाईन टाकणे बाबत सदरील प्रस्ताव मोतीवाला कॉलनी,चिकालठाणा व रामनाथनगर १९९२ व १९९३ पासुन महानगरपालिकेमध्ये असुन या दोन्ही कॉलनी मध्ये पिण्याचे पाणी व ड्रेनेज लाईनची सोय नसुन या दोन्ही कॉलनी या सुविधापासुन वंचित आहेत. करिता मा महापौर व सर्व नगरसेवक व नगरसेविका, मा. आयुक्त साहेब व सर्व सभागृह सदस्य यांनी हा प्रस्ताव मंजुर करावा. हि नम्र विनंती.

सुचक : श्री. साहेबराव कावडे

अनुमोदक : श्री. प्रशांत देसरडा, श्री. किशोर तुळशी बागवाले.

दिनांक : १५.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोतीवाला कॉलनी, चिकलठाणा व रामनाथनगर या वसाहतीमध्ये पिण्याचे पाण्याची व ड्रेनेज लाईन टाकणेकरिता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९/२५** :

कटकटगेट जवळ मनपाच्या खुल्या जागेवर भाजी मंडई बांधण्यात यावी. कारण की, कटकट गेट, नेहरुनगर न्यु एस.टी. कॉलनी,सदफ कॉलनी, बाबर कॉलनी, माहीद नगर, यशोधरा कॉलनी, शताब्दी नगर, त्रिवेणी नगर, शरिफ कॉलनी येथे लोकांची मोठी वस्ती आहे. लोकांच्या सोयीसाठी भाजी मंडी आवश्यक आहे आणि तेथे मनपाची खुली जागा उपलब्ध आहे. भाजीमंडी झाल्यानंतर तिथे अतिक्रमण होऊ शकत नाही. तरी हे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. सलमा बानो मिर मो. अली.

अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. केसरखान बद्रोद्यीनखान

दिनांक : १५.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरुनगर, न्यु एस.टी. कॉलनी कटकटगेट, शरीफ कॉलनी बाबर कॉलनी, माहिद नगर, यशोधरा कॉलनी इ. भागातील नागरिकांच्या सोयीसाठी कटकटगेट येथील मनपाच्या खुल्या जागेवर भाजी मंडी बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १००/२६** :

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १ पडेगांव मनपाच्या हद्दीत असुन सुध्दा आतापर्यंन्त नागरिक सुविधा पैकी माझ्या वार्डात रस्ते तयार करण्यात आलेले नाही. सदरील वस्ती सुमारे २० ते २५ वर्षापासुन बसलेली आहे. तरी वार्ड क्र. १ पडेगांव येथे नागरिकांच्या सोयी सुविधासाठी रोड तयार करण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. ठकुजी रामसिंग वाणी

अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. वसंत नरवडे पाटील,
श्री. अंबादास दानवे
दिनांक : १५.९.२०००

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्रमांक अंतर्गत पडेगांव येथील नागरिकांच्या सोयी सुविधा साठी ठिकाणी रस्ते (रोड) तयार करण्यास सर्वानुमते मंजरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्र. १०१/२७** :

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १ पडेगांव सदर वार्ड मनपात असुन सुध्दा नागरिकांच्या सुविधासाठी अत्यंत आवश्यक असलेले ड्रेनेज लाईन आतापर्यंन्त टाकण्यात आलेली नाही तरी माझ्या वार्डात ड्रेनेज लाईन नसल्यामुळे नागरिकांची फार गैरसोय होत आहे ड्रेनेज लाईन टाकण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. ठकुजी रामसिंग वाणी
अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. वसंत नरवडे पाटील,
श्री. अंबादास दानवे
दिनांक : १५.९.२०००

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्रमांक १ अंतर्गत पडेगांव भागातील नागरिकांच्या सुविधासाठी या भागात ड्रेनेज लाईन टाकण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०२/२६** :

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १ पडेगांव माझ्या वार्डात पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी आतापर्यंन्त टाकण्यात आलेली नाही. वार्डातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याकरिता सुमारे २ ते ३ किलोमिटर पासुन पिण्याचे पाणी विहिरीवरुन आणावे लागते. सध्या पावसाळयात कमी पाऊस झाल्याने विहिरीही कोरडे असुन पुढे पाण्याची फार टंचाई होणार असुन त्या करिता पिण्याचे पाण्याची लाईन टाकणे अत्यंत आवश्यक आहे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. ठकुजी रामसिंग वाणी
अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. वसंत नरवडे पाटील,
श्री. अंबादास दानवे
दिनांक : १५.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे वार्ड क्रमांक १ पडेगांव या भागात पिण्याचे पाण्याकरिता जलवाहिनी टाकण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३/२९** :

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ३० सदरील रेल्वेस्टेशन बनेवाडी, सादात नगर, राहुलनगर, येथील नागरिकांना दफन विधी व अंत्यसंस्कार या करिता त्यांना ५ ते ६ किलोमीटर चालावे लागते. म्हणुन आपल्या महानगरपालिकेच्या गट नं. २३ हा माझ

या माहितीप्रमाणे राखीव असुन त्या ठिकाणी दफन विधी करण्याकरिता मुस्लीम कब्रस्तानासाठी महानगरपालिकेने सदरील जागा भुसंपादन करुन त्या ठिकाणी संरक्षित भिंत ही बांधण्याकरिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.
सुचक : श्री. अ. रशिद अ. सत्तार, श्री. वसंत नरवडे पाटील
अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्रमांक ३० अंतर्गत असलेल्या विविध वसाहती करिता मुस्लीम कब्रस्तांनासाठी (दफन भुमी) गट नं. २३ मधील जागा भुसंपादन करुन त्या ठिकाणी संरक्षित भिंत बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४/३०** :

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ३० माझ्या वार्डातील नागरिकांच्या सोयी सुविधा साठी मंगलकार्यालय आवश्यक असल्यामुळे व मा. महापौर यांच्या बंगल्यासमोर असलेली दीड एकरच्या जागेमध्ये शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधण्यात यावे. सदरील भागात रेल्वेस्टेशन, पैठण रोड, आर.टी.ओ. ऑफिस असुन सदर ठिकाणी नेहमी वर्दळ असते. म्हणुन त्या ठिकाणी कमर्शियल शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधण्यास मनपाचे करोडो रुपयांचा आर्थिक फायदा होऊन वार्डातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होईल. सदर कॉम्प्लेक्स वर मंगल कार्यालय बांधण्यात यावे जेणे करुन वार्डातील रहिवाशांना सोय सुविधा होईल. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री. अ. रशिद अ. सत्तार : सदरचे शॉपिंग कॉम्प्लेक्स मनपाने बांधावे त्यापासुन मनपास उत्पन्न मिळेल.

मा. महापौर : महापौर बंगल्याशेजारी मनपाची जागा आहे मागील वर्षी हा प्लॉन तयार झ ाला ठराव मंजुर करण्यात येतो. निधी उपलब्ध असेल तर कार्यवाही करता येईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : शॉपिंग सेंटरच्या संदर्भात जळगांव शहराची पाहणी व अहवाल मागवला तर निश्चितच याही म.न.पा ला शॉपिंग सेंटर उत्पन्न वाढेल शासकिय अनुदान १०० टक्के वापरुन काम करण्यात मंजुरी यावी.

मा. महापौर : शासनाने १० कोटी दिले. त्यातील ३ कोटी जालना रोडसाठी दिले महाराष्ट्र शासन २ कोटी देणार आहे. ५ कोटी मध्ये दुकान केंद्र करायचे तर एका कामास ५ कोटी लागेल. बोल्ट पध्दतीने ज्या ज्या ठिकाणी रिकाम्या जागा असतील त्या संबंधी नियमावली करुन विकास कामे करुन उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने कार्यवाही होईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : शासनाचा निधी प्राप्त आहे. २ कोटी खर्च करावेत. या अगोदर खर्चाचा अहवाल शासनाकडे पाठवला का ? जोपर्यंन्त खर्च दाखवणार नाही तापर्यंन्त शासन पैसा देणार नाही. मनपातर्फे खर्च करावा.

श्री. जयवंत ओक : शहराचा विकास होईल व उत्पन्न वाढेल अशा प्रकारचे निर्णय व्हावेत. शासनाकडुन कमी निधी मिळत असेल तर त्यात विकास कामेच करता येतील बोल्ट पध्दतीने घ्यावे. जाहिरात द्यावी.

श्री. प्रकाश निकाळजे : शॉपींग सेंटर व्हावेत त्याच बरोबर दुकाने वाटप करताना गरिब सुशिक्षित बेरोजगार तरुणांना याचा फायदा झाला. पाहिजे. ज्यांच्याजवळ पैसा आहे. असे लोकांना देण्यात येते. गरिब व्यक्ती जास्तीची रक्कम मनपाला भरु शकणार नाही व त्यांना बोल्ट पध्दतीने घेता येणार नाही. टप्प्या टप्प्याने दुकानाचे वाटप करावे. जेणे करुन गरिबांनाही दुकाने मिळतील. जे गरिब ते गरिबच राहतात. ज्यांचेकडे पैसे आहे ते श्रीमंत होतात. मनपाने मानवतेचा दृष्टीकोन ठेवुन महानगरपालिकेच्या फंडातुन २.३ टप्प्यात करावा.

श्री. भगवान घडामोडे : शॉपिंग सेंटर होण्यास कुणाचा विरोध नाही महानगरपालिकेचा फायदा झाला पाहिजे. या दृष्टीनेच अशा योजना राबवाव्यात मनपाचे हित लक्षात घ्यावे जे काम करावयाचे बजेटमध्ये ठरवल्या प्रमाणे खर्च व्हावा बोल्ट पध्दतीने करावे जनतेच्या मुलभुत सुविधा पाणी, रस्ते, ड्रेनेज, व स्वच्छता पुरविण्यात आल्या पाहिजे. त्या संपुर्ण शहरात पुरविल्या जातात का ? हे अगोदर पहावे व नंतरच असे प्रस्ताव सभागृहाच्या मंजुरीस यावेत.

श्री. स.अली मिरा सलामी : अर्थसंकल्पामध्ये जी चर्चा झाली त्यानुसार निर्णय घेतले गेले बजेटची सविस्तर माहिती मिळाली नाही. आयुक्त नसल्याने कामास अडचण झाली खाजगी करणाचा प्रश्न उपस्थित झाला. त्यास विरोध आहे. त्या बैठकीत सर्वेक्षण करण्याची बाब समोर आली त्या विरोध आहे. इतिवृत्तात येते. ज्या बैठकीचे इतिवृत्त वेळेवर द्यावयास पाहिजे. १३३ कोटींचे बजेट ठेवले हे चुकीचे ठेवण्यात येते. असे दिसते प्रस्तावानुसार शॉपिंग सेंटर झ ाल्यावर यात गरिब नागरिक युवक यांना न्याय मिळाला पाहिजे. त्यांना दुकाने देण्यात आली पाहिजे. परंतु लाखो रुपये जमा करुन दुकाने विक्री केली जाते. सादिया मार्केट चे ५०००/- रुपये बोली बोलावुन दुकाने गुंतवले. एका व्यक्तीकडे ४-५ दुकाने देण्यात आली. आचार संहितेत लिलाव झाला. जनतेचे महानगरपालिकेने हित, माणुसकीचा विचार करुन मनपाच्या बजेटमधुन अशी कामे व्हावीत जेणे करुन जवतेचा काही सुविधा प्रश्न सोडवुन शकते असे दिसुन येईल १३५ कोटींचे बजेट ठेवले. विकास कामे काहीच नाही. असे करणे योग्य होणार नाही. रोजची वसुली होते खर्चात जाणारच त्यामुळे तिजोरीत पैसा दिसणारच नाही.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : प्रशासनाचे मत घ्यावे.

मा. महापौर : मा. आयुक्त या संदर्भात खुलासा करत आहेत.

मा. आयुक्त : दुकान केंद्र बांधवयाचे झाले तर त्यास तीन मार्ग निघु शकतात. १) पहिल्यादा पुर्ण गुंतवणुक महानगरपालिकेने करावी. २) दुसरी पध्दत अशी की, बोल्ट सिस्टम आहे. अगोदर संबंधित मालकाने बांधकाम करावयाचे काही दिवस त्यांनी चालवावयाचे व भाडयाने द्यायचे व हस्तांतर करावयाचे त्यास २५ वर्षे लागु शकतील. पाहिलयामध्ये नफा-तोटा आहे. जर मनपाने दिड दोन कोटी रुपये खर्च करुन बांधले व कमी उत्पन्न गट मध्यम उत्पन्न गट व आर्थिक दृष्टया कमकुवत गट या सर्वांचा यात समावेश होऊ शकतो. व तिसरा मार्ग निघु शकतो. यातीलच दुसरा एक मार्ग केल्यास जे की, बोल्ट पध्दतीत दुकाने यावर नियंत्रण आपले राहात नाही. जर एखाद्या व्यक्तीने ते बांधुन दिल्यास समजा १०० दुकाने बांधण्यास सदर व्यक्ती कोटी रुपये खर्च करेल व मनपा त्या व्यक्तीस आग्रहाने म्हणु शकत नाही. की, एखाद्यास दुकान

वाटप करावी. कारण ते व्यावसायिक व्यापारी म्हणुन काम करतात. ते त्यांचे पध्दतीने दुकाने देणार ट्रान्सफर करणार त्याचे फीस लावणार जर अशा प्रकारचे ते त्योच मर्जी प्रमाणे लिलाव व निविदा काढणार त्यानंतर वर्षानुवर्ष त्याची खरेदी विक्री होणार आहे. गाळयाचे ट्रान्सफर होणार चार्जेस किती ठेवावयाचे हे त्या मालकाचे मनावर राहणार आहे. या प्रकरणात आणखी तिसरा मार्ग निघु शकतो की, जर आपण २ कोटी खर्च केला २ कोटीचा किती व्याज बॅन्केचे मिळते. मुख्यउद्दिष्ट उत्पन्न आहे २ कोटी १४-१५ लाख होत व निव्वळ ३० लाखचा फायदा होत असेल तर शॉपिंग सेंटर बांधु शकतो. कारण शेवटी आपला उद्देश मनपाचे उत्पन्न वाढले पाहिजे. असा आहे. कारण आपण स्वत: केले तर आरोप होतात.

बोल्ट पध्दतीमध्ये श्रीमंत लोकांचा फायदा होतो खाजगी प्लॉट असेल तर जमीन मालक व बिल्डर यात करार होतो. बिल्डर तीन मजले बांधतो. तळमजला पहिला मजला व दुसरा मजला मालकाने दोन पैकी एक निवडायचे कोणी ठेवावे. ५०% डेव्हलपर ५०% आपले मालकी याबाबत आपण धोरण ठरवावयाचे आहे. २०० गाळे बांधले तर १०० गाळे बांधले तर १०० गाळे डेव्हलपरला कारण त्यांनी बांधकामावर खर्च केला आहे. यामुळे उत्पन्न वाढेल शहराच्या सौदर्या करणात वाढ होईल या संदर्भात सभागृहाने निर्णय घ्यावा.

श्री. स. अली मिरा सलामी : मा. आयुक्तांनी केलेला खुलासा योग्य आहे. अमुक अमुक प्रकारची दुकाने होणार अशा धर्तीवर जाहिरात देऊन टेंडर मागवावे व संबंधीतांकडुन अगोदर पैसा जमा करुन नंतर बांधकामाची कार्यवाही करावी. यात मनपाने खर्च करुन नुकसान होणार नाही हे पहावे त्यासाठी आवश्यक तो करार करण्यात यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : सिडकोमध्ये आविष्कार कॉलनीमध्ये मनपाने शॉपिंग सेंटर केले. तेथील नकाशा तयार झाला जाहिरात देऊन टेंछर केले. जमा झालेल्या रक्कमेमधुन गाळे बांधण्यात आली. तीच पध्दत या जागेवर बांधकाम करताना अवलंबावी. वरच्या एक भव्य असे मंगल कार्यालय करता येईल ही जागा अत्यंत मोक्याची असुन आसपास बरीच शासनकी कार्यालये आहेत. शॉपिंग सेंटर केल्यास निश्चित मनपाच्या उत्पन्नात यापासुन वाढ होऊ शकेन. तसेच याच जागेच्या काही भागात कर्मचारी निवासस्थान करु शकतो. वरील प्रमाणे वचार करुन हा प्रस्ताव मंजुर करावा.

श्री. अंबादा दानवे : महानगरपालिकेच्या माध्यमातुन विकास करावा जी भुमीका श्री. कोकाटे यांनी घेतली. त्यात माझा पाटींबा आहे.

मा. महापौर : या प्रस्तावासंबंधी बरीच चर्चा झाली. मनपाचे हित लक्षात घेता व उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने येथील जागेवर दुकाने करण्याची कार्यवाही करावी प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. मनपाचे नुकसान होणार नाही हे बघावे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महापौर बंगल्यासमोर असलेल्या दीड एकर जागेमध्ये किंवा महापौर बंगल्याशेजारील जागेत शॉपिंग कॉम्प्लेक्स व त्यावर मंगल कार्यालय बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०५/३९** :

माहे सप्टेंबर २००० मध्ये होणाऱ्या महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत राजाबाजार येथील जाधवमंडी, शहागंज यास जोडणाऱ्या संस्थान गणपती मंदिर जवळील चौकास तेथील जवळपासच्या सर्व नागरिकांच्या मागणीनुसार "संस्थान गणपती चौक" असे नांव देण्याचा प्रस्ताव आम्ही ठेवत असुन कृपया प्रस्वात सर्वसाधारण सभेसमोर ठेवुन मंजुर करावा हि विनंती.

सुचक : श्री. जगदिश कन्हैयालाला सिध्द

अनुमोदक : श्री. नंदकुमार घोडेले, श्री. किशारे तुळशीबागवाले

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राजाबाजार येथील शहागंज, जाधवमंडी यास जोडणाऱ्या संस्थान गणपती मंदिराजवळील चौकस "संस्थान गणपती चौक" असे नाव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०६/३** :

किराणा चावडी चौकास "भगवान शांतीनाथ चौक" नांव देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माहे सप्टे २००० मध्ये होणाऱ्या महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत किराणा चावडी चौकास "भगवान शांतीनाथ चौक" असे नांव देण्याचा प्रस्ताव ठेवत असुन कृपया सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेऊन मंजुर करावा. हि नम्र विनंती.

सुचक : श्री. जगदिश कन्हैयालाल सिध्द

अनुमोदक : किशोर तुळशीबागवाले, श्री. विकास जैन, श्री. प्रशांत देसरडा

दिनांक : १५.९.२०००.

**ठराव**:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराणा चावडी चौकास "भगवान शांतीनाथ चौक" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०७/३३** :

प्रभागामधील न्य समर्थनगर भागात महानगरपालिकेची बरीच खुली जागा उपल्ब्ध आहे. या प्रभागात कुठेही सांस्कृतिक सभागृह अस्तित्वात नाही. सांस्कृतिक सभागृह नसल्यामुळे येथील रहिवाशांना कुठेही सांस्कृतीक व धार्मिक कार्यक्रम साजरे करणेस अत्यंत गैरसोय होते. रहिवाशांनी या वसाहतीत सांस्कृतिक सभागृह उभारणे बाबत मागणी केली आहे. या भागातील रहिवाशांनी १००% विकास निधी व सर्व कर भरलेला असुन रहिवाशांची मागणी व सांस्कृतिक सभागृहा अभावी होत असलेली गैरसोय होवुन या भागात

उपलब्ध असलेल्या महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर अद्यवयात व सुसज्ज असे भव्य सांस्कृतिक सभागृह उभारणी बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर
अनुमोदक : श्री. अंबादास दानवे, श्री. नंदकुमार घोडेले,
सौ. विजयाताई राहटकर
दिनांक : १५.९.२०००.

संवाद :

श्री. स.अली मिरा सलामी : या प्रस्तावात सांस्कृतिक व धार्मिक असा उल्लेख करण्यात आलेला असुन सांस्कृतिक व सार्वजनिक अशी दुरुस्ती करावी.

मा. महापौर : वरील दुरुस्तीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु समर्थनगर भागात महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर सांस्कृतिक व सार्वजनिक कार्यक्रम साजरे करण्याकरिता सांस्कृतिक सभागृह उभारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०८/** :

औरंगाबाद शहरामधील विख्यात नाटककार श्री. लक्ष्मणराव देशपांडे (वऱ्हाडकार) यांचे वऱ्हाड निघालय लंडनला या एकपात्री नाटकाचे संपुर्ण राज्यात असंख्य प्रयोग सादर झाले असुन त्यांचे एकपात्री नाटक विदेशात देखील जाऊन पोहचले आहे. पा्र. डॉ. लक्ष्मण देशापांडे यांचे नांवाची गिनिंज बुकात नोंद झाली असुन त्यांचा बऱ्याच महानगरपालिकातर्फे भव्य सत्कार करण्यात आलेला आहे.

वऱ्हाडकरांची मात्र औरंगाबाद महानगरपालिकेने कुठलीही दखल घेतलेली नाही. शहरातील या विश्वविख्यात नाटय कलावंताची योग्य ती दखल घेऊन त्यांचे कार्यांचा उचित गौरव होणे अत्यंत आवश्यक आहे. आगामी महानगरपालिका वर्धापन दिनी या नाटय कलावंताचा महानगरपालिकेमार्फत भव्य नागरी सत्कार करण्यात यावा. त्यांना मानपत्र स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात यावे. तसेच प्रतिष्ठीत मान्यवरांना पाचारण करुन विशेष कार्यक्रमात त्यांना महानगरपालिकेमार्फत ५१,०००/- रुपयाची थेली अर्पण करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर श्री. अंबादास दानवे
अनुमोदक : श्री. सुदाम सोनवणे
सौ. विजया रहाटकर

संवाद :

मा. महापौर : फक्त सत्कार करण्यात यावा. ५१ हजार रुपये देण्यात येणार नाही.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरामधील विख्यात नाटककार श्री. लक्ष्मणराव देशापांडे (वऱ्हाडकर) यांचे नांवाची गिनिंज बुकात नोंद झालेली असुन या विश्वविख्यात कलावंताचा औरंगाबाद महानगरपालिकेच्या वर्धापन दिनी मानपत्र स्मृतिचिन्ह

देऊन प्रतिष्ठीत मान्यवरांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रम घेऊन गौरव करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०९/३५** :

प्रभागामधील समर्थनगर मंजुर रेखांकनामध्ये रहिवाशांनी नियमानुसार १०% जागा सोडलेली होती. सदर जागेवर महानगरपालिकेमार्फत व्यायाम शाळा बांधलेली आहे. सदर व्यायाम शाळेत नियमित व्यायाम पटु येतात. मंजुर रेखांकनामधील व्यायाम शाळेच्या परिसरात अजुन बरीच खुली जागा पडलेली आहे. सदर ले-आऊट मधील खुली जागा अंदाजे १५०० ते २००० चौ. मी. आकाराची असुन या जागेच्या उत्तरेस प्रा. दिवकर करान्ने यांचे घर, यांचे घर व श्री. धांडे यांचे घर, पुर्वेस मी. गिते यांचे घर व पश्चिमेस श्री. पाटील यांचे घर असुन या चुतः सिमेतील खुल्या जागेवर भव्य क्रिडा संकुल उभारणे बाबत प्रभागातील रहिवाशी सारखी मागणी करत आहे. प्रभागात कुठेही खेळाचे मैदान नसल्यामुळे नागरिकांची मुलांची अत्यंत गैरसोय होत आहे. येथील रहिवाशांची १००% विकास निधी भरलेला असुन नियमित मालमत्ता कर भरत आहेत. रहिवाशांची मागणी विचारात घेता वर नमुद केलेल्या चतुः सिमेमधील खुल्या जागेवर अद्ययावत व प्रशस्त असे क्रिडा संकुल उभारणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर
अनुमोदक : श्री. अंबादास दानवे, श्री. नंदकुमार फुलारी,
सौ. विजयाताई रहाटकर
दिनांक : १५.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थनगर मंजुर रेखांकनामध्ये व्यायामशाळेच्या परिसरात असलेल्या अंदाजे १५०० ते २००० चौ. मी. आकाराच्या प्रस्तावित चतुः सिमेमधील जागेवर अद्ययावत प्रशस्त असे क्रिडा संकुल उभारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११०/३६** :

शहरात अनधिकृत वसाहरतीमध्ये महानगरपालिकेकडुन कुठल्याही उद्योगास ना हरकत प्रमाणपत्र न देण्याचे ठरविल्याने धोरणात शितल करण्यात यावे व पीठ गिरणीसाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे. कारण पीठ गिरणी ही दैनंदिन आणि विशेष जिवनावश्यक बाब म्हणुन त्यात शितल करुन पीठ गिरणीसाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती सलमा बानो मिर मो. अली
अनुमोदक : श्री. सुरजीतसिंह खुंगर
दिनांक : १५.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील अनधिकृत वसाहतीमध्ये पिठाची गिरणी सुरु करण्यासाठी दैनंदिन आणि विशेष जिवनावश्यक बाब म्हणुन महानगरपालिके तर्फे "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १११/३७ :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने कोटयावधी रुपये खर्च करुन श्रीमंत छत्रपती पुराणवस्तु संग्रहालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर , मौलाना अब्दुल कलाम आझाद रिसर्च सेंटर या प्रेक्षणिय वास्तु उभारण्यात आलेल्या आहेत. परंतु सदरील वास्तुंची देशी व विदेशी पर्यटकांना अद्यापही ओहख झालेली नाही. महानगरपालिकेतर्फे सिध्दार्थ उद्यानही पर्यटनाच्या दृष्टीकोनातुन विकसित करण्यात आलेले आहे. तथापी सदरील औरंगाबाद शहराची माहिती वेबसाईटवर टाकली तर शहराची माहिती देशी विदेशी पर्यटकांपर्यन्त पोहचु शकेल.

करिता औरंगाबाद शहराची माहिती वेबसाईटवर टाकण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. वसंत नरवडे पाटील, श्री. काशिनाथ कोकाटे
श्री. भाऊसाहेब ताठे
अनुमोदक : श्री. स.अली स. युसुफ, श्री. स. अली मिरा सलामी,
श्री. कैसरखान, श्री. पांडुरंग तायडे, श्री. इलियास किरमानी

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील विविध प्रक्षणिय स्थळांची तसेच मनपातर्फे चालविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देशी, विदेशी पर्यटकांपर्यन्त पोहोच विण्याचे दृष्टीने हि माहिती वेबसाईटवर टाकण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११२/३८ :**

दि. २६ जुलै रोजी कारगील येथील युध्दात भारतीय जवान शहिद झालेले आहेत. या शहिद जवानांना श्रध्दांजली म्हणुन औरंगाबाद शहरात एक स्मारक उभारण्यात यावे. करिता कारगील येथील शहिद जवानांचे स्मृतीप्रित्यर्थ औरंगाबाद शहरात स्मारक उभारण्याचे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. वसंत नरवडे, श्री. काशिनाथ कोकाटे
अनुमोदक : श्री. भाऊसाहेब ताठे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कारगील युध्दामध्ये शहिद झालेल्या भारतीय जवानांच्या स्मृतीप्रितर्थ औरंगाबाद शहरात स्मारक उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३/३९** :

महानगर पालिकेत विविध प्रकारचा तक्रारी सतत येत असतात. परंतु सदरील तक्रारींची योग्य प्रकारे निवारण होत नाही. करिता तक्रारींचे लवकरात लवकर व योग्य प्रकारे निवारण होण्यासाठी संगणकीकरण होणे आवश्यक आहे. करिता महापालिकेत येणाऱ्या दैनंदिन तक्रारीचे निवारण संगणकाच्या सहाय्याने करण्यासाठी संगणकीकरण करणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. वसंत नरवडे,
अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. भाऊसाहेब ताठे

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगर पालिकेत येणाऱ्या विविध प्रकारच्या तक्रारीचे लवकरात लवकर व योग्य निवारण होण्यासाठी संगणकीकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

संवाद :

सौ. लिलावती छायतिलक : १९ जानेवारी पासुन वार्ड क्र. १२ मध्ये ड्रेनेज काम सुरु झाले अद्याप काम पुर्ण झाले नाही. अनेक नागरिकांनी तोंड द्यावे लागते लोक रात्री बेरात्री घरी येऊन सुचना करतात. ड्रेनेज काम का झाले नाही त्याचा सविस्तर खुलासा सुबंधीत अधिकाऱ्यांकडुन घेण्याम यावा. दुसरी बाब अशी की नाला दुरुस्तीसाठी १ महिण्यापासुन सर्व रस्त्यात उकरुन ठेवले आहे काही कार्यवाही केली नाही. ज्या वार्डात समस्या निर्माण होतील त्या अगोदर सोडवल्या पाहिजे नाही तर जनतेचे आरोग्य धोक्यात येईल.

मा.महापौर : स. सदस्या यांनी केलेल्या सुचनेनुसार संबंधित अधिकारी यांनी व झोन अधिकरी यांनी त्यांचे वार्डात जाऊन पाहणी करुन सर्व समस्या ताबडतोब सोडवाव्या तसेच ऐनवेळाचे ४ विषय आलेले आहेत. व ते मंजुर करण्यात येतात.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ११४/१** :

प्रभागामधील क्रांतिनगर घोषित स्लम या वसाहती मध्ये सार्वजनिक वाचनालय व मंगल कार्यालय नसल्यामुळे येथील रहिवाशांची अत्यंत गैरसोय होत आहे. वरिल सुविधा नसल्यामुळे त्यांनी या वसाहतीत सार्वजनिक वाचनालय व मंगल कार्यालय बांधणे बाबत माणी केली आहे. या वसाहतीत बरीच सार्वजनिक खुली जागा उपलब्ध असुन सदर जागेवर वाचनालय तसेच मंगल कार्यालयासाठी अद्ययावत व सुसज्ज अशी ईमारत बांधल्यास येथील रहिवाशांना त्याचा लाभ मिळेल. व रहिवाशांची गैरसोय दुर होईल. प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.
सुचक : श्री. संजय शिरसाठ
अनुमोदक : श्री. अंबादास दानवे
दिनांक : १८.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावत दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ३३ मधील क्रांतीनगर भागात सार्वजनिक खुल्या जागेवर अद्ययावंत व सुसज्ज असे मंगल कार्यालय व वाचनालय बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११५/२** :

सादर करण्यात येतो की, श्री. जिवन बाबुराव गायकवाड रा. प्रियदर्शनी इंदिरानगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद यांना कॅन्सरचा आजार झालेला असुन त्यांचा शासकिय वैद्यकिय रुग्णालय, औरंगाबाद येथे उपचार चालु आहे.

सदरील आजारात रुपये ३०,०००/- (तीस हजार रुपये) खर्च अपेक्षीत आहे. संबंधीताची अर्थिक परिस्थिती बिकड असुन इतका खर्च ते पेलु शकत नाहीत. त्यांना विशेष वैद्यकिय मदत म्हणुन रुपये ३०,०००/- (तीस हजार रुपये) आर्थिक मदत देण्यास मान्यता व्हावी. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. शेख शकील पटेल

अनुमोदक : श्री. नासिरखान सरदारखान

दिनांक : २९.९.२०००.**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. बाबुराव गायकवाड यांना कॅन्सरचे उपचारासाठी र. रु. २५,०००/- (पंचवीस हजार) अर्थसाहय सन्माननीय सदस्यांच्या स्वेच्छानिधीमधुन करण्यास विशेष बाब म्हणुन सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११६/** :

महानगरपालिकेमार्फत शहरात काही ठिकाणी फटाके विक्रीसाठी व्यापाऱ्यांना तात्पुरती परवानगी देण्यात येते. महानगरपालिकेमार्फत ना हरकत प्रमाणपत्र देतांना व्यापाऱ्याकडुन ठराविक शुल्क वसुल केले जाते. सालाबादा प्रमाणे याही वर्षी फटाके विक्रेत्यांना महापालिकेमार्फत ना हरकत प्रमाणपत्र द्यावे लागणार आहे. त्यावेळी गतवर्षी महापालिकेने जेवढी फीस वसुल करुन ना हरकत प्रमाणपत्र दिले, याही वर्षी तवढेच शुल्क कुठलीही नविन वाढ न करता आकारुन वसुल करण्यात यावे व फटाके विक्रेत्यांना ना हरकत प्रमाणपत्र देणे बाबत प्रस्ताव मंजुरलीस्तव विचारार्थ सादर.

सुचक : श्री. किशनचंद तनवाणी

अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. अंबादास दानवे
श्री. नंदकुमार घोडेले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात फटाके विक्रीसाठी व्यापाऱ्यांना तात्पुरतया परवानगीसाठी ना हरकत प्रमाणापत्र देतांना महापालिकेमार्फत गत वर्षी फटाके विक्रेत्यांना महापालिकेने जेवढी फीस वसुल करुन ना हरकत प्रमाणपत्र दिले, याही वर्षी तेवढेच शुल्क आकारुण कुठलाही नविन वाढ न करता आकारुण फटाके विक्री ना हरकत प्रमाणपत्र देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११७/४** :

श्री. गणेश लक्ष्मणसिंग ठाकुर हे इंदिरानगर बायजीपुरा औरंगाबाद येथील रहिवांशी असुन ते क्षयरोगाने आजारी आहेत. त्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट आहे. त्यांचेवर शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, घाटी औरंगाबाद येथे वैद्यकिय उपचार चालु असुन उपचारासाठी रक्कम रुपये ५०,०००/- (पन्नास हजार) खर्च येणार आहे.

त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्यामुळे ते एवढा खर्च करणेस असमर्थ आहे. संबंधितास काही सन्माननीय नगरसेवक क्षयरोगावरील वेद्यकिय उपचार तथा

औषधोपचारासाठी नगरसेवक स्वेच्छा निधीतुन आर्थिक मदत देणेत तयार आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती व आजार विचारात घेता संबंधितास क्षय रोगावरिल वैद्यकिय उपचार तथा औषधोपचारासाठी स. नगरसेवकांचे स्वेच्छा निधीमधुन र. रु. २५,०००/- रुपये विशेष बाब म्हणुन मंजुर करणेसाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

सुचक : श्री. भरत लकडे, श्री. बाळासाहेब थोरात

अनुमोदक : नंदकुमार घोडेले, श्री. भाऊसाहेब वाघ

दिनांक : १४.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. गणेश लक्ष्मणसिंग ठाकुर यांना क्षय रोगचे उपचारासाठी नगरसेवक स्वेच्छा निधीतुन रु. २५,०००/- (पंचवीस हजार रुपये मात्र) अर्थसाहय विशेष बाब म्हणुन देण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११८/५** :

समर्थनगर भागातील श्री. भास्करराव देशापांडे यांच्या पुणे येथे होणाऱ्या हृदयाच्या शस्त्रक्रियेसाठी रु. २५,०००/- ची मदत सन्माननीय नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीमधुन देण्याबाबतचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा ही विनंती.

सुचक : श्री. आनंद तांदुळवाडीकर

अनुमोदक : श्री. अ. रशिद अ. सत्तार, श्री. नंदकुमार घोडेले,
श्री. प्रकाश निकाळजे

दिनांक : ३०.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे श्री. भास्करराव देशपांडे यांना हृदयाच्या शस्त्रक्रियेसाठी नगरसेवक स्वेच्छा निधीतुन र. रु. २५,०००/- (पंचवीस हजार रुपये मात्र) अर्थसाहय विशेष बाब म्हणुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

संवाद :

मा. महापौर : सभा १५ मिनिटांसाठी तहकुब करण्यात येते. (वेळ २.५० वाजता सभेला सुरुवात ३.४० वाजता.

श्री. अंबादास दानवे : आताच थोडया वेळापुर्वी आपल्या खुर्चीवर कुणी तरी बाहेरील व्यक्ती येऊन बसलेले होते. त्यासंबंधी काय कार्यवाही होणार आपल्या सुरक्षा रक्षक आहेत. हा विभाग काय काम करतो. संबंधितावर कार्यवाही व्हावी.

श्री. सुनिल पंडागळे : सभागृहाचा व मा. महापौर यांचा अशा गोष्टीमुळे अवमान झाला आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : आपल्याच काही स. सदस्यांनी चेष्ठेने आणेले ताकीद देण्यात यावी.

मा. महापौर : बाहेरील अनावश्यक व्यक्ती सभागृहात येऊन महापौर यांचे खुर्चीवर येऊन बसले तर आपण सुरक्षा रक्षक विभाग काय काम करते. संबंधीत जो कुणी दोषी असेल तयाची योग्य चौकशी करुन निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी.

श्री. नंदकुमार घोडेले : निलंबनाचे आदेश देऊ नये चौकशी करुन कार्यवाही व्हावी. हा प्रकार तहकुब सभेत झालेला आहे

श्री. प्रकाश निकाळजे : संबंधीत व्यक्ती मनोरुग्ण आहेत त्यामुळे तो आसनावर येऊन बसलेला असावा. सदर प्रकार तहकुब सभेच्या वेळात झाला संबंधित

कर्मचारी यांचेवर निलंबन आदेश न करता चौकशी करुन पुढील कार्यवाही करावी.

श्री. स. अली मिरा सलामी : सदर व्यक्ती मानेरुग्ण असुन आपण आपण घेतलेला निर्णय मागे घ्यावा सभा तहकुब केली होती त्या वेळेत हा प्रकार झाला आहे.

मा. महापौर : सदर व्यक्ती मनोरुग्ण आहेत तर खुर्चीवर करता येऊन बसु शकतो उद्या कुणीही येऊन बसेल ज्यांनी कुणी त्यास बसण्याचे सांगितले मोठी चुक केली. ही खुर्ची माझी नसुन महापौरांची आहेत आता महापौरा बरोबर तितकाच सभागृहाचा ही अवमान होतो आहेत. मी घेतलेला निर्णय माग्र घेत नाही जो कोणी कर्मचारी समोरच्या गट मध्ये असतो त्यांचेवर प्रशासन कार्यवाही करेल. दोषी नसेल तर पुन्हा त्या कर्मचाऱ्यास कामावर घेतले जाईल. चर्चेसाठी ४.३० वाजेपर्यन्त वेळ आहे. काही स. सदस्यांना ५.०० वाजता जावयाचे आहे पोलिस आयुक्तालयातर्फे गणेश उत्सवाचा बक्षीस समारंभाचा कार्यक्रम आहेत. काय प्रश्न असतील ते मांडावे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : मा. आयुक्त सभागृह सोडुन जाणार नव्हते ते आता बैठकीत उपस्थित नाही त्यांनी आपली परवानगी घेऊन गेले आहेत काय ? नुसती सभागृहात चर्चा होते कार्यवाही होत नाही. याचा खुलासा करावा.

मा. महापौर : मा. विभागीय आयुक्त यांचे कडे महत्वाची बैठक होती त्यामुळे मा. आयुक्त बैठकीत परवानगी गेलेले आहेत. जे मा. आयुक्त रजेवर गेले आहे ते ३ तारखेला रुजु होणार आहे.

अंबादास दानवे : मागील बैठकीत खुल्या जागा बाबत चर्चा होऊन सभागृहात माहिती मागवली होती. खुल्या जागा मनपाच्या नावाने काराव्या असे ठरले होते. किती जागा आहेत किती नावावर केल्या याची माहिती संबंधीत विभागाने दयावी.

श्री. स.अली मिरा सलामी : पशुधन विकास विभागावर दोन बैठकी पासुन चर्चा होत आहे. संबंधित अधिकारी श्री. रझवी सभागृहात उपस्थित नाही. मुद्दामहुन बैठकीस येत नाही असे दिसुन येते. आज बैठकीस नाही याचा अगोदर खुलासा व्हावा.

मा. महापौर : आपल्या प्रश्नाचे उत्तर दिले जाईल अगोदर मालमत्ता विभागा संदर्भात खुलासा दिला जाईल.

श्री. स. अली मिरा सलामी : का सभेस उपस्थित नाही सकाळ पासुन नाही जे दोषी नसतात त्यांना निलंबित आदेश दिले जाते संबंधीत अधिकारी हे सभेस गैरहजर आहे. त्यांना निलंबीत करावे.

मा. महापौर : काही अधिकारी मला विचारुन गेले आहे उदा. प्रकल्प अधिकारी हे लातुर मुख्यमंत्र्याची बैठक बोलावली तसे पत्र आले होते म्हणुन ते गेलेले आहे. श्री. डॉ. रझवी तरी माझ्याकडे काही लेखी कळविले नाही. प्रशासनाकडे रजा दिली आहे का ? याचा खुलासा करावा.

मा. आयुक्त (म.) : डॉ. रझवी यांनी माझी परवानगी घेतली नाही.

श्री. स. अली मिरा सलामी : संबंधित अधिकारी यांना निलंबीत करावे विना परवानगीने ते सभेस गैरहजर आहेत.

श्री. सुदाम सोनवणे,श्री. -जबिंदा, श्री.- फुलारी, श्री. साहेबराव ताठे : संबधीत अधिकारी विना परवानगी सभागृहात गैरहजर आहे त्यांना निलंबित करावे. सभागृहात

उत्तर देण्याच्या उद्देशाने अधिकारी गैरहजर राहात असतील तर अशी कार्यवाही होणे जरजेचे आहे.

श्री. तकी हसनखान : डॉ. रझवी हे एच ओ. डी. नाही त्यांचे वरचे अधिकारी एच.ओ.डी म्हणुन उप आयुक्त(महसुल) उपस्थित आहे. माझ्या माहिती प्रमाणे नियमाने एच.ओ.डी. यांनी सभागृहात उपस्थित राहिले तरी काम होऊ शकते.

मा. महापौर : सर्वसामान्यपणे आपल्यासभेत एच.ओ.डी व त्यांचे खलचे अधिकार यांनी सर्वांनीच उत्तरे देण्यासाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

श्री. स.अली मिरा सलामी : मालमत्ता अधिकारी यांचे ए.ओ.डी. उपआयुक्त हे आहेत ते का सभागृहात उपस्थित आहे. इतर खालचे उपस्थित सर्व अधिकाऱ्याचे दोनच उपआयुक्त ए.ओ.डी आहेत तर त्यांनाच बोलावे इतरांना कशसाठी बोलावतात त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : डॉ. रझवी हे सभागृहात उपस्थित राहत नाही. काही वेळा अडचणी येऊ शकतात परंतु नेहमीच सभेच्या वेळी हजर न राहणे व त्या संबंधीची काही लेखी स्वरुपात माहिती प्रशासनाकडे न देणे हे योग्य नाही केवळ सभागृहात उपस्थित होणारे प्रश्न व त्यांचे उत्तर देण्याच्या भावनेतुन डॉ. रझवी हे गैरहजर राहतात. अशी सभागृहाची भावना आहे. म्हणुन प्रशासनाने त्यांना या संबंधी कारणे दाखवा नोटीस देऊन २४ तासाच्या आत खुलासा मागावा. व सदा खुलासा प्रशासनास योग्य वाटत नसेल तर प्रशासनाने त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करावी. यानंतर सर्वसाधारण सभेस सर्व अधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याची गरज आहे.

श्री. सलीम पटेल : शिक्षणाधिकारी नाही व इतर अधिकारी सभागृहात उपस्थित नाही.

मा. महापौर : शिक्षणाधिकारी हे संत एकनाथ रंग मंदिर येथे आहेत. तेथे ट्रेनिंग चालु आहे. त्यामुळे त्या येऊ शकत नाही तसे लेखी कळविले आहे. सी.एस. सोनी आजारी असल्याने ते उपस्थित राहु शकत नाही. तसे लेखी दिले आहे.

श्री. अंबादास दानवे : स. सदस्य श्री. स. अली सलामी व श्री. भगवान रगडे यांनी त्यांचे वार्डातील डुकरांचा प्रश्न २० तारखेस बैठकीत उपस्थित झाला होता. उपआयुक्त यांनी ८ दिवसांत टेंडर काढुन कार्यवाही करण्यात येईल असे कळविले होते. डॉ. रझवी यांचे संबंधी मला बोलायचे की, सिध्दार्थ उद्यानातील एक हत्तीचा मृत्यु सुध्दा दोन महिन्यापुर्वी झाला. त्या संबंधात मी वेळोवेळी माहिती विचारली होती. त्या हत्तीचा पोष्ट मार्टम रिपोर्ट आतापर्यंन्त आलेला व संबंधीत अधिकारी सांगतात . त्या हत्तीचे विमा काढलेला आहे. असे कळवितात हे उत्तर देणे योग्य नाही एका हत्तीचे निधन होणे फार मोठया रक्कमेची बाब आहे. सिध्दार्थ उद्यानात पाहिणीसाठी एक पथक सुध्दा उदया येणार आहे. हत्ती आजारी पडला त्याचे तत्कालीन आजार बघीतला तर संबंधीत विभाग प्रमुखच त्यास जबाबदार आहे कारण किडणीचा आजार झाला. असे सांगितले परंतु दोन दिवसात किडणीचा आजार हे हत्तीचे निधन होऊ शकत नाही. व मृत्यु झालेचा पोष्ट मार्टमचा रिपोर्ट सुध्दा आजपर्यंन्त आला नाही तो सभागृहासमोर आला पाहिजे.

मा. उप आयुक्त (म) : शासकिय यंत्रणे मार्फत हत्तीचा पोस्ट मार्टमचा रिपोर्ट मागविला होता तो आजच प्राप्त झाला आहे व आज सर्वसाधारण सभा असल्याने मी तो वाचला नाही व आपली इच्छा असेल तर सर्वासमक्ष ठेवण्यात येईल.

श्री. स.अली मिरा सलामी : एक वाघाचे निधन झाले व सध्या एक आजारी आहे. त्याची माहिती द्यावी.

उप आयुक्त (म.) : एक वाघ आजारी पडलेला होता.त्यांचेसाठी तातडीने (व्हेटरनरी कॉलेजचे) वैद्यकिय डॉक्टरांचे पथक येऊन गेले आहे. आता त्यांची प्रकृती सुधारत आहे. अशी माहिती मला मिळाली आहे.

श्री. स. अली मिरा सलामी : डॉ. रझवी एक्सपर्ट नाही तर त्यांनी बदली करावी त्यांचे जागेवर दुसऱ्यांना घ्यावे प्राणी आजारी पडतात बाहेरील डॉक्टर बोलवण्याची आवश्यकता पडते. तर आपल्याकडील डॉक्टरांचे काम काय असते त्यांना माहिती नसेल तर दुसऱ्या अधिकारी नेमावे. संबधीत अधिकारी यांचेवकडे एक जबाबदारीने काम दयावे. चांगले काम केले तर रझवी यांनी केले वाईट झाले तर अनुभवी डॉक्टराने केले असे होता कामा नये. ज्या जबाबदाऱ्याची कामे दिली त्याचे विभाजन करावे. असे माझे मत आहे.

श्री. सुदाम सोनवणे : आपल्याकडे सगळा कर्मचारी वर्ग असतांना प्राणी आजारी पडल्यावर बाहेरील डॉक्टरांना बोलवावे लागते ही खेदाची बाब आहे. वसुली होत नाही त्यामुळे बाहेरील महसुल अधिकारी जे एच.ओ.डी. आहेत त्यांना आपण बोलावतो. येथील एच.ओ.डी. कामे करत नसतील तर बाहेरील तज्ञ अधिकाऱ्यांना घेण्यास यावे. येथे सर्व एच.ओ.डी. बिगर तज्ञ आहेत असे समजुन येते. त्यांचे सक्तीची रजा मुजुर करुन सेवानिवृत्त करावे. बाहेरील अधिकारी सर्व विभागासाठी बोलावावे त्यामुळे मनपाचे उत्पन्न ही वाढेल वअसे २१ लाख रुपया पर्यन्तचे हत्ती ही मरणार नाही. याची काळजी घेतली जाईल मनपाचे नुकसान होणार नाही.

श्री. सुनिल पंडागळे : शहरामध्ये कुत्र्याचे प्रमाण जास्त झाले आहे. त्यांना पकडण्याची जबाबदारी डॉ. रझवी यांची आहे. तसेच रस्त्यावर इतरही जनावर फिरतात त्या सर्व जनावरांना रहदारीस अडथळा होऊ नये म्हणुन व मनपाने उत्पन्न वाढेल या दृष्टीने आपल्या ताब्यात ठेवावी तरी कुत्रे पकडण्यासाठी एक स्वतंत्र विभाग करावा व उपकार्यकारी अधिकारी पदाचे कर्मचारी नेमावे जेणे करुन जनतेच्या छोटया मोठया सुटु शकेल व जनतेला कुत्र्या पासुन व इतर जनावराच्या रस्त्यावरील त्रास ही कमी होऊ शकेल.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांना ताकीद देण्यात येते की, त्याचे विभागाचे काम व्यवस्थित करावे.

श्री. नंदकुमार फुलारी : सिडको हडको भागातील जनावरे पकडल्या जो व ते मील जवळ आणुन सोडतात. हे बरोबर नाही कर्मचाऱ्यास विचारणा केल्यास संबंधित मालक घेऊन गेले. असे सांगण्यात येते.

श्री. जयवंत ओक : अतिशय गंभीर विषयावर चर्चा चालु आहे. जे प्राणी आहेत त्याची संपुर्ण काळजी घेतली गेली पाहिजे. ज्या हत्तीचे निधन झाले ते झाले नसते म्हैसुर येथुन हत्ती आणला होता माहितगार कर्मचारी आले होते एकवर्षासाठी त्या कर्मचाऱ्यास आपण ठेवले होते नंतर पाठवण्यात आले त्यांना खेलवर अभ्यास झाले त्याचा खोलवर अभ्यास केल्यातर दोन दिवसात किडणीचा आजार होऊन हत्तीचे निधन होऊ शकत नाही. किडणीचा आजार होता असे सांगणे चुकीचे गोलमोल उत्तर दिले गेले असे दिसुन येते आता सध्या परिस्थिती अशी आहे की, एक पांढरा वाघ व एक अस्वल आजारी आहे निधन होण्याच्या मार्गावर आहे सभा संपल्या नंतर पाहुन येऊ शकता अद्याप

चांगल्या प्रकारे डॉक्टराचे उपचार त्यांचेवर होत नाही सर्व प्राण्यांना पिंजऱ्यात ठेवण्यात आले. म्हैसुरहुन जे दोन लोक दै. वेतनावर नौकरी मागत होते. त्यांनी तस अर्ज ही केला होता परंतु डॉ. रझवी यांनी त्यांना घेतले नाही आपल्याकडे अनुभवी लोक नाही. म्हैसुर येथील ते दोन लोक श्री. शेख व पठाण यांना कामावर घेतले असते. हत्तीचा मृत्यु झाला नसता कारण ते लो अनुभवी होते. आणि खरोखरच डॉ. रझवी दोषी असेल तर त्यांचवर कार्यवाही करावी. आणि म्हैसुर हुन जे लोक आले होते त्यांना का घेतले नाही याची चौकशी व्हावी त्यामुळे आज २० लाखांचा हत्तीचे निधन झाले.

मा. महापौर : प्रशासनाला आदेश देता की बैठक संपल्यानंतर उपआयुक्त (म.) यांनी वाघ व अस्वल हे आजारी आहे. त्यांचेवर वैद्यकिय डॉक्टर बोलवुन तपासणी बाबत ताबडतोब कार्यवाही करावी व या प्राण्याचे निधन होणार नाही याची दक्षता घ्यावी. पोष्ट मार्टमचा रिपोर्ट पुढील बैठकीत सर्वसाधारण सभेत ठेवला जाईल.

सौ. लिलावती छायतिलक : माझ्या वार्डमध्ये घाण झाली नागरिकांचे निधन झाले तर कोण जबाबदार मजुर पाहिज. कचरा साचलेला दिसतो. एक मजुर नाही संबंधी अधिकाऱ्यांना माहिती दिली कार्यवाही नाही. डॉ. बाबासाहेबांच्या पुतळया जवळ सुभेभिकरण असावे या दृष्टीने संरक्षित भिंत करावी अशी सुचना केली होती जनावरे येऊन बसतात. अधिकारी सांगतात संचिका नाही. तर अशा चकरा मारण्याची पाळी येऊ नये.श्री. गायकवाड म्हणतात ८ दिवस झाले पाठविले आहे. संबंधित अधिकाऱ्यांना सुचना द्यावी.

मा. महापौर : वार्ड क्र. १२ येथे स्वच्छतेच्या दृष्टीने स. सदस्या यांनी मांडलेल्या सुचनेनुसार संबंधित झोन अधिकारी व झोनल आयुक्त यांनी पाहणी करुन पुढील आठवडयापर्यन्त तात्काळ कार्यवाही करावी. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयाच्या बाजुला संरक्षित भिंत होण्याबाबत कार्यवाही व्हावी.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दर्शन सवलत आता का बंद करण्यात आली यापुर्वी देण्यात आली ती कोणत्या धरतीवर याचा खुलासा करावा.

सहाय्यक आयुक्त-२ : मा. आयुक्त यांचे कडे या संबंधीची संचिका सादर केली आहे मा. आयुक्तांची स्वाक्षरी झाली नाही.

सौ. कचराबाई लोखंडे : पुंडलिकनगर भागात गल्ली नं. ५,६ पाणी आले नाही पाण्यात घाण वास येतो. वेळेवर पाणी येत नाही दोन दिवसा आड पाणी येते. सनावाराचे दिवस आहे लोक चिडतात बरेच नागरिक माझ्या कडे तक्रार करुन गेले. दाने तीन दिवसापासुन गल्ली नं ५ व ६ मध्ये, तर पाणीच आले नाही. बरचे लोक मोटारी बसवुन जास्तीचे पाणी घेतात त्यामुळे काहींना पाणी मिळत नाही. तसेच वार्डातील साफसफाई करणारे मजुर वेळेवर येत नाही. म्हणावी तशी स्वच्छता दिसुन येत नाही.

मा. महापौर : स. सदस्या यांनी केलेली सुचना त्यांच्या वार्डात गल्ली नं. ५ व ६ मध्येच का पाणी येत नाही संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा तसेच जे लोक पाणी येणाच्या वेळात मोटारी बसवुन जास्तीचे पाणी घेतात या बाबतीत पाहणी करुन तसे आढळुन आल्यास मोटारी जप्त करण्यात याव्यात.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : पुंडलिकनगर भागात एक दिवसा आड पाणी पुरवठा केला जातो परवाच्या दिवशी पाणी पुरवठा होऊ शकला नाही कारण रात्री ९ ते सकाळी ३.०० वाजेपर्यन्त पंपींग बंद होती गारखेडा टाकीत पाणी पुरवठा झ ाला नाही विद्युत प्रवाहाच्या तारा तुटलेल्या होत्या म्हणुन पाणी पुरवठा होऊ शकला नाही.

मा. महापौर : तारा तुटल्या म्हणुन पाणी आले नाही हे कारण होऊ शकत नाही. कारण गल्ली नं. ५ व ६ मध्येच पाणी का आले नाही असा प्रश्न स.सदस्य यांनी मुद्दा उपस्थित केला. संबंधित अधिकारी यांनी वार्डात स्वतः जाऊन पाहणी करावी व पाणी देण्यात यावे.

सौ संगिता मैंद : मोंढा नाका ते जाफरगेट १०० फुट रस्त्याचे भुसंपादन झाले नाही. यासंबंधी नगररचना विभागाला विचारणा केली असता निधी उपलब्ध नाही. भुसंपादन अधिकारी यांचेकडे प्रलंबित आहे. निधी उपलब्ध होताच विचार केला जाईल त्याला काही कालमर्यादा आहे की नाही. दि. १५.७.२०००. ला पत्र दिले होते कार्यवाही झाली नाही. समाधान कारक उत्तर दिले जात नाही.

उप अभियंता (नगर रचना) : लक्ष्मण चावडी ते कैलास नगर येथील भुसंपादनाच्या संदर्भात संपुर्ण कागदपत्र भुमी अभिलेख विभागाकडे पुढील कार्यवाही साठी पाठवले आहे जाफरगेट ते मोंढा नाका भुसंपादन सुरु नाही.

श्री. शे. शकील पटेल शे. बुढन पटेल : १) एक जागेवर ले-आऊट मंजुर झालेला असतांना एका व्यक्तीने घर बांधले अतिक्रमण कले तसे पत्र ही मनपाकडे दिले व उपआयुक्त यांना प्रत्यक्ष भेटले कार्यवाही केली नाही. २) जवाहरनगर पोलिस स्टेशन जवळील रस्त्याचे चालु असलेले काम अचानक का बंद करण्यात आले ३) स्वेच्छा निधी मधुन एखादया रुग्णाला आर्थिक मदत करण्या बाबतचा ठराव पास केल्या पैसे देण्यात येत नाही बऱ्याच संचिका थांबवुन आहे. पेशंटचे निधन होते नंतर पैसे देण्यात येते यासाठी औषधोपचार चालु असतांनाच तात्काळ मदत दिली गेली पाहिजे अन्यथा निधी कया कामाचा रुग्णांना मदत तात्काळ मिळावी.

मा. महापौर : स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतुन २५ हजारात मंजुरी येते. रुग्ण आजारी असतांना त्याचे ऑपरेशन साठी खर्च येते. स्वेच्छा निधीतुन आर्थिक मदत देण्या बाबतच्या ज्या संचिका थांबुन आहेत त्या त्वरित निकाली काढव्या मुख्यलेखाधिकारी डॉ. देशपांडे आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी संबंधीत जातीने लक्ष देऊन कार्यवाही करावे.

श्री. गाजी सादोद्दीन : स्वेच्छानिधीतुन २ ठिकाणी कॉम्प्युटर सेंटर बांधणार होते. टाऊन हॉल २ सिडको काय झाले.

मुख्यलेखाधिकारी : कॉम्प्युटर ट्रेनिंग वाहनचालक, ट्रेनिंगचे टेंडर मंगळवारी झाले. ८-१५ दिवसात कार्यवाही पुर्ण होईल.

श्री. किशोर शिंदे : औरंगाबाद लेण्यावर यात्रा भरते पुल वाहुन गेला. जागेवर झऱ्या पडल्या दसरा निमित्त लोक येतिल तेंव्हा सदस्यांच्या नावाने ओरडतील सदर रस्त्याचे काम तातडीने करुन द्यावे.

मा. महापौर : जागा पाहणी करण्यात येईल रस्ता मनपाच्या हद्दीत असेल तर दुरुस्ती करता येईल.

श्री. नंदकुमार घोडेले : अनाधिकृत वसाहतीमध्ये स्वेच्छा निधीतुन विकास कामे व्हावीत असा निर्णय झालेला असतांना कामे करण्यात येत नाही. होणार की नाही खुलासा करावा. २५,०००/- रु. पर्यन्तचे अधिकार उपआयुक्तांना देण्या बाबत सभागृहात बोलण्यात आले होते. काहीच कार्यवाही झाली नाही.

मा. आयुक्त (म.) : रु. २५,०००/- चे अधिकार प्रदान करणे बाबत तत्कालीन आयुक्त श्री. चहल साहेब यांनी सांगितले होते. सभेचे इतिवृत्त मिळाल्यावर कार्यवाही करण्यात येईल.

श्री. नंदकुमार घोडेले. : शहानुरवाडी येथील अतिक्रमणाच्या संदर्भात मागविलेला अहवाल सभागृहात अद्याप सादर झाला नाही. सभागृहात सदर अहवाल ठेवण्याची आवश्यकता नाही काय ?

मा. महापौर : तत्कालीन मा. आयुक्त श्री. बलदेवसिंग यांनी त्या संदर्भातील अहवाल सादर केला आहे तो सभागृहाला नंतर दाखवण्यात येईल दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

श्री. नंदकुमार घोडेले : संत एकनाथ रंग मंदिर येथे विविध कार्यक्रम घेतले जातात कार्यक्रमास अनामत रक्कम १,०००/- हजार वरुन ५,०००/- हजार करण्यात आली आहे. जी वाढ केली ती एकदम जास्तीची करण्यात आली कमी करण्यात यावी.

मा. आयुक्त : अनामत रक्कम मनपाकडे जमा असते. नुकसान झाले तर कोण जबाबदार म्हणुन १,०००/- हजार वरुन प्रशासनाने ५,०००/- रु वाढ केली आहे.

श्री. सुदाम सोनवणे : जी वाढ करण्यात आली ती कुणाच्या अधिकारात केली सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतली का ? जुलै मध्ये २१ कार्यक्रम ६०,०००/- रुपये ऑगस्ट ३८,०००/- सप्टेंबर ५०,०००/- हजार रक्कम प्राप्त झाली या रंग मंदिरात नियोजित कार्यक्रम होण्यासाठी सदरची फिस वाढवणे योग्य होणार नाही. उत्पन्न कसे वाढेल हे प्रशासनाने पहावे अनामत फिस वाढ करुन कार्यक्रम कमी होतील व जे उत्पन्न मिळणार तेही येणार नाही आतापर्यन्त उत्पन्नचा तपशिल विचारात घेता एप्रिल पासुन ठेवलेल्या बजेटच्या हिशोबाने १४ कोटीची तुट आलेली आहे जकात वसुली संदर्भात चर्चा करणार होतो. बैठक बोलवणार संत एकनाथ रंग मंदिराचे अनामत रक्कम मध्ये जी वाढ केली ती कुणाच्या सांगण्यावरुन केली त्याचा करावा. उत्पन्नाच्या संदर्भात बैठक बोलवावी उत्पन्न नसेल तर नुसत्या बैठका घेऊन उपयोग नाही.

मा. महापौर : अनामत रक्कमेची फिस कुणाच्या अधिकाराने वाढवली खुलासा करावा.

उपआयुक्त (म.) : अनामत रक्कम वाढवण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहे.

श्री. सुदाम सोनवणे : अनामत रक्कम वाढवण्याचे अधिकार मा. आयुक्तांना नाही. यासाठी सर्वसाधारण सभेची मंजुरी घ्यावी लागते. विकास कामा संदर्भात मा. आयुक्तांना भेटावयाचे झाल्यास ६-७ महिन्यापासुन आयुक्त भेटत नाही सभागृहातही समाधान कारक उत्तर मिळत नाही. आजची बैठक संपली व वसुलीवर विशेष सभा बोलवव्यात.

श्री. वसंत नरवडे : वसुली संदर्भात नवीन आयुक्त रजेवरुन आल्यावर रुजु होतील त्या नंतर विशेष बैठक बोलवण्यात यावे.

श्री. सुनिल पंडागळे : टपरी समितीत कोण-कोण आहे. माहिती नाही व काय कार्यवाही करतात. त्याची माहिती मागील वेळी टपरी समिती बनवली होती ती सध्या अस्तीत्वात नाही नवीन टपरी समिती तयार करण्याची कार्यवाही करावी

लागणार आहे. मनपाच्या तिजोरीत उत्पन्न कमी येत आहे व उत्पन्न कमी असेल तर विकास कामे करता येणार नाही या संदर्भात बऱ्याच स. सदस्यांनी सुचना केल्या व उत्पन्न वाढवता येईल या मुद्यावर नविन आलेले आयुक्त रजेवरुन आल्यावर रुजु होतील व वसुली संदर्भात एक विशेष बैठक लावण्यात येईल.

श्री. कोकाटे काशिनाथ : विशेष बैठकीत त्वरीत बोलवावी उशीर झाल्यास मनपाने उत्पन्न उद्दीष्ट पुर्ण होणार नाही.

मा. महापौर : विशेष बैठकीत पाणी पट्टी,जकात, मालमत्ता तसेच इतर कर वसुली संदर्भात चर्चा करता येईल तसेच सभागृहाच्या भावना लक्षात घेता संत एकनाथ रंग मंदिर येथील कार्यक्रमा संबंधीची अनाम रक्कमेत वाढ केल्याने कार्यक्रम कमी होतात असे स. सदस्यांनी सुचना केल्या त्यानुसार सभागृह असा निर्णय घेते की, ५००/- रु वरुन अनामत रक्कम म्हणुन रु. २५००/- चे घेण्यात यावी.

श्री. भगवान घडामोडे : नवरात्र महोत्सव चालु असुन सिडको हडकोतील बऱ्याच भागात पाणी नाही. तक्रार केली असता अधिकारी फारोळा येथे विद्युत लाईनची लोड शेडिंग असल्याचे लेखी कळवितात पाणी पुरवठया संदर्भात मनपा काय कायमची उपाय योजना करु शकते त्या संदर्भात चर्चा करावी फारोळा येथे जाऊन पाहणी केली आहे का ? काही अडचण आल्यावर सिडको हडकोच्या भागातच कमी प्रमाणात का पाणी येते. किती टाक्यात किती एम.एल.डी. पाणी येते. लिकेजेस किती फटका मात्र सिडको हडकोला सुधारणा होत नसेल तर तिव्र आंदोलन करण्यात येईल.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : ५० किला मिटर वरुन शहराला पाणी आणण्यासाठी ५ ठिकाणी उचल करुन पाणी आणावे लागते विज पुरवठा असणे अत्यंत आवश्यक आहे. या शहरासाठी हा प्रकार महिण्यापासुन असुन आजही चालु आहे पंप बंद राहतात लोडशेडींग काय ११ ते ४ दरम्यान होतो सिडकोचा पाणी पुरवठा चालु असतो याचवेळी लोडशेडींग होते. त्यामुळे मागील १ महिन्यापासुन पाण्याचा तुटवडा पडला.

श्री. भगवान घडामोडे : या शहराचे आमदार ऊर्जामंत्री आहे. मनपाचे पदाधिकारी मा. महापौर विरोधी पक्षनेते, उप महापौर, यांनी त्यांचेशी या संदर्भात संपर्क साधला का ? समस्या उद्‌भवल्यास सुचना करुन अधिकारी सहकार्य करत नाही एका दैनिकात बातमी आली की सिडकोंच्या ६७ कोटीच्या पाणी पुरवठा योजनेचा भंडारा झाला हा मनपाच्या सभागृहाचा अवमान व प्रशासनाचाही अवमान आहे अशा बातम्या जर वर्तमान पत्रात येतात त्याचा मी निषेध करतो (याच वेळी सदर वृत्तपत्रात आलेली बातमीचा पेपर फाडतात)

सौ. जयश्री. मोरे : सिडको भागात असलेल्या म्हाडा कॉलनीमध्ये विकास काम होत नाही. तसेच साफसफाई व्यवस्थित होत नाही तसे आदेश देण्यात यावे.

मा. महापौर : साफसफाई संदर्भात संबंधीत झोन क्र. ५ चे अधिकारी तसेच झोनल आयुक्त यांनी पाहणी करुन तात्काळ स्वच्छता राहील याची काळजी घ्यावी व म्हाडा महानगरपालिकेच्या अंतर्गत येते तेथील इतर सुविधा ही पुरविण्यात याव्यात.

श्री. कोकाटे काशिनाथ : स. सदस्य हे जिव्हाळयाने प्रश्न उपस्थित करतात जो सत्य परिस्थिती आहे तो दाखवतात. स. सदस्य बोलण्याच्या अगोदरच त्यांना

उत्तर देण्याचे प्रशासन टाळते याचा मी तिव्र निषेध करतो. लोडशेडींग मुळे पाणी पुरवठा झाला नाही हे उत्तर समाधानकारक नाही खात्रीपुर्वक सांगतो लोडशेडींगचा कार्यक्रम नाही लोड शेडींगचा तक्ता काढला २ ते ३% पेक्षा जास्त नाही. शहराला १३० एम.एल.डी पाणी येते. सभागृहात चर्चा झ ााल्यानंतर नेहमीच सांगितले जाते पाण्याचे नियोजन करावे परंतु अधिकारी सहकार्य करत नाही पाणी कुठे मुरते सविस्तर चर्चा व्हावी या बैठकीत पाण्या संदर्भात चर्चा व्हावयास नको होतो पाण्याच्या संदर्भात एक स्वतंत्र विशेष बैठक लावण्यात यावी असे पत्र दिले होते स. सदस्यांच्या भावना लक्षात घेतल्या जात नाही. गेल्या १५ दिवसात पाण्याच्या संदर्भात किती तरी नागरिकांनी निवेदन देऊन तक्रारी केल्या आहेत कधी काळजी घेतली का ? या संदर्भात प्रशासनास ताकीद देणार की नाही संपुर्ण शहराला पाणी वेळेवर मिळण्या बाबतची चर्चा घडवुन आणावीच बेजबाबदारीचे उत्तर ऐकुण घेणार नाही. रोषनगेट,जवाहर कॉलनी, पुंडलिकनगर ई. ठिकाणी २-३ दिवस पाणी येत नाही चर्चा झाली अधिकारी सांगतात तारा तुटल्या महानगरपालिकेकडे योग्य तो स्टॉफ आहे. त्यांचेकडुन वेळेवर कामे करुन घ्यावी. जनतेसाठी अधिकारी पदाचा वापर करावा कार्यवाही होत नसेल तर तसे सांगण्यात यावे. सभागृहाने निर्णय घ्यावा. जर जनतेला पाणी देता येत नसेल तर तसाही खुलासा व्हावा.

श्री. जयवंत ओक : विद्युत प्रवाहाची समस्या होती काय ? त्याचा अधिकारी यांनी योग्य खुलासा करावा. उदया बैठकीच्या संदर्भात बातम्या झळकतील महानगरपालिकेची बदनामी व्हायला नको ?

मा. महापौर : लोड शेडींगची समस्या असेल तर ठिक आह या संदर्भात संबंधीत अधिकारी यांनी एम.एस.ई.बी. ला विचारणा केली काय ? या व्यतिरिक्त समस्या असेल व चुकीची माहिती सभागृहाला अधिकारी देत तर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

श्री. नंदकुमार फुलारी : सिडको हडकोत पाणी पुरवठा व्यवस्थित नाही गॅप देण्यात येतो १००% पाणी पट्टी भरण्यात झाल्यास पंप बंद होतात.

श्री. काशिनाथ कोकाटे : अधिकारी खोटी माहिती देत आहे. त्यांनी पत्रव्यवहार केला असेल तर त्याचे नंबर सहित आवक दिनांका सहित संपुर्ण तपशील बैठकीत सादर करावा.

मा. महापौर : शहरात वेळेवर पाणी पुरवठा होत नाही. सभागृहात आताच झालेल्या चर्चेनुसार लोड शेडींग समस्या होती असे अधिकारी यांनी खुलासा केला या संदर्भात मा ऊर्जामंत्री यांना सर्व पदाधिकाऱ्याना एक निवेदन देण्यात येईल व हा प्रश्न सोडवण्या संदर्भात सांगण्यात येईल.

या बरोबरच जण गन मन या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे दुपारी ५.०० वाजता मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

**दिनांक १३.१०.२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त. शुक्रवार दिनांक १३.१०.२००० रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात मा. श्री. डॉ. भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली सर्व साधारण सभेची "वंदे मातरम् " या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगपालिकातील अधिकाऱ्यावर खालील सन्माननी स. नगरसेवक उपस्थित होते.**

१) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
२) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
३) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
५) स.स.सौ. साजेदा बेगम विख्तार अहमद
६) स.स.श्री. शिंदे राजु रामराव
७) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
८) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
९) स.स.सौ. धायतिलक लिलावती बाळासाहेब
१०) स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
११) स.स.सौ. शिंदे रुखमीणी राधाकिशन
१२) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१३) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१४) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
१५) स.स.श्रीमती. मानकापे पार्वती लहानु
१६) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
१७) स.स.सौ. विजया किशोर रहाटकर
१८) स.स.श्री. सांवत मधुकर दामोधर
१९) स.स.सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२०) स.स.श्री. जाबिंदा दालबिरसिंग रणजितसिंग
२१) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२२) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२३) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२४) स.स.श्री. अय्युब खॉ सरदार खॉ
२५) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२६) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
२७) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
२८) स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फर यार खान
२९) स.स.श्री. वडागळे सुनिल बुधवेल
३०) स.स.श्री. स. मुमताज अली मोज्जम अली
३१) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३२) स.स.श्री. नासेरखान सरदार खान
३३) स.स.श्री. थोरात दत्तात्रय उर्फ बाळासाहेब रामराव

३४) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३५) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३६) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३७) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
३८) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
३९) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
४०) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४१) स.स.श्री. सुरमोणीवार नारायण चंद्रय्या
४२) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
४३) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४४) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४५) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४६) स.स.श्री. नासीर खान अ. रहेमान खॉन कुरेशी
४७) स.स.सौ. शाहिन जफर महमुद जफर
४८) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
४९) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५०) स.स.श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
५१) स.स.श्री. गाजी सादोद्दीन गाजी जहिर अहमद
५२) स.स.श्री. मिर हिदाय अली मिर बसालत अली
५३) स.स.सौ. नफिसउन्नीसा बेगम हबीब खॉ
५४) स.स.श्री. शेख ईसाक जैनोद्दीन शेख
५५) स.स.श्री. अफसर खॉ यासिन खॉ
५६) स.स.सौ. सुलतान बेगम चॉंद खॉ
५७) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५८) स.स.श्री. सलीम पटेल शमशेर पटेल
५९) स.स.श्री. कैसरखान बद्रोकद्दीन खान
६०) स.स.श्री. सय्यद अली सलामी स. मिरा सलामी
६१) स.स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज
६२) स.स.सौ. निखत परवीन ईजाज अली

## *स्विकृती सदस्य*

१) स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास
२) स.स.श्री. खुंगर सुरजित तिलकराज
३) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४) स.स.सौ. सलमा बानो मिर मो. अली

संवाद :

श्री. अंबादास दानवे : स. सदस्य श्री. ईलीयास किरमाणी यांचे आईचे नुकतेच निधन झाले त्याना ०२ मिनीटे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

मा. महापौर : ठिक आहे. ०२ मिनीटे सर्वांनी उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात येते. याचवेळी स. सदस्य श्री. ईलियास किरमाणी यांच्या आई यांना सभागृहातर्फे ०२ मिनीटे स्तब्धता पाळुन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री. अफसरखॉन : मागील बैठकीतील निर्णयानुसार एका सुरक्षा रक्षक यांचेवर कार्यवाही करुन निलंबन करण्यात आले आहे सदर व्यक्ती, गरिब असुन त्यांना पुन्हा कामावर घेण्यात यावे.

श्री. प्रकाश निकाळजे : सभा तहकुब असतांनाच्या काळात जो व्यक्ती खुर्चीवर येऊन बसला तो मनोरुग्ण आहेत ज्या कर्मचाऱ्यावर कार्यवाही केली त्यांना पुन्हा कामावर घ्यावेत.

श्री. भगवान घडामोडे : सभागृहाचे या संदर्भात एकमत झाले आहे. कुणावर अन्याय होणार नाही, व यापुढे असे होऊन नये. याची दक्षता संबंधिताने घ्यावी. कर्मचाऱ्यास त्वरित कामावर घ्यावे

श्री. जयवंत ओक : सुरक्षा रक्षक गरिब आहे वगैरे असे काही स. सदस्यांनी मत व्यक्त केले हा मुद्दा समोर ठेवुन संबंधितावर निलंबनाची झालेली कार्यवाही मागे घेऊन त्यांना कामावर घेणे योग्य होईल काय बाहेरील लोक येऊन अधिकाऱ्यांना शिव्या देतात तेव्हा शिफारस का होत नाही. कारण येथे महापौर यांचाच नाहीतर सभागृहाचा सुध्दा सदर व्यक्ती खुर्चीवर बसल्याने अपमान झालेला आहे. ठिक आहे. सभागृहाने आता दया दाखवली त्या सुरक्षा रक्षकासा कामावर घ्यावे व यापुढे अशी चुक होऊ नये. व अशा वेडसर व्यक्तीला महानगरपालिकाच मुख्य प्रवेश व्दारातुन येऊ देऊ नये तसे संबंधित विभागास आदेश व्हावेत.

श्री. स. अली मिरा सलामी : मा. महापौर यांचे खुर्चीवर बसण्या संदर्भात मागील बैठकीत जो प्रकार झाला त्यानुसार सभागहाचा व मा. महापौर यांचा अवमान झालेला आहे. सभा तहकुब असो किंवा नसो असा प्रकार घडणे बरोबर नाही सुरक्षा विभागाचे कर्मचाऱ्यांनी लक्ष ठेवणे जरुरी होते परंतु सदर मनोरुग्ण व्यक्ती तहकुब सभेच्या वेळी जेवण, नाश्ता करण्याच्या निमित्ताने आलेला होता व त्याच वेळात हा प्रकार झाला यापुढे असे होऊ नये व संबंधित विभागास तसे आदेश दयावे व सुरक्षारक्षक यांना कामावर घ्यावे. अशी सुचना करतो.

मा. महापौर : मागील बैठकीत महापौर यांचे खुर्चीवर एक बाहेरील व्यक्ती येऊन बसण्याचा प्रकार घडला व त्यानुसार एका सुरक्षा रक्षकास कामावरुन कमी करण्या बाबतची कार्यवाही करण्यात आली होती सभागृहाच्या भावना लक्षात घेता सदर निलंबन झालेल्या सुरक्षा रक्षकास पुन्हा कामावर घेण्याबाबत कार्यवाही व्हावी व प्रशासनातर्फे संबंधित विभागास योग्य त्या सुचना करण्यात याव्यात व सभा असो किंवा नसो सभागृहात कुणी बाहेरी व्यक्ती यापुढे येणार नाही याची दक्षता संबंधीत विभागाने घ्यावी.

श्री. रतनकुमार पंडागळे : सदर मनोरुग्ण व्यक्तीस कुणी सभागृहात आणले त्याची चौकशी व्हावी.

मा. महापौर : तो विषय आता संपलेला असुन विषय क्र. १ वर चर्चा करावी.

श्री. सुदाम सोनवणे : महानगरपालिकाचे आर्थिक उत्पन्न फार घटत चालेले आहे. वसुली संदर्भात चर्चा करण्यात यावी वसुलीवर या बैठकीत चर्चा करण्यात येईल

असे मागील बैठकीतच सांगण्यात आले होते. नंतर विषय पत्रिकेवर निर्णय घेण्यात यावे.

श्री. प्रकाश निकाळजे : वसुलीवर चर्चा करतांना एका वेळेस एका स. सदस्यांना बोलु दयावे.

मा. महापौर : विषय क्र. १ पासुन सुरुवात करु नंतर चर्चा करण्यात येईल.

**विषय क्र. ११९/१** :

दि. २०.९.२००० व ३०.९.२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद :

श्री. स. अली मिरा सलामी : दि. २०.९.२००० च्या बैठकीत पान क्र. ७ वरिल चर्चेस "वादग्रस्त प्रस्ताव मांडु नये" अशी नोंद घेण्यात आली असुन यातुन "वादग्रस्त" वगळण्यात यावा. तसेच मागील सभेत मालमत्ता अधिकारी यांचे संदर्भात चौकशी करण्यासाठी उपसमिती नेमण्यात आलेली होती. परंतु उपसमितीचे संदर्भात साधे पत्र आम्हाला मिळाले नाही अधिकाऱ्यावर चौकशी कार्यवाही करावयाची असेल तर अशा अधिकाऱ्यांना त्यांचे पदावरुन अगोदर हटवावे त्यानंतर कार्यवाही होत असते असे माझे मत आहे. तसेच डॉ. रझवी यांचेवर काय कार्यवाही केली त्याचा ही खुलासा व्हावा आपण आदेश दिलेले होते.

मा. महापौर : स. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे "वादग्रस्त" शब्द वगळण्यात येते. डॉ. रझवी यांचेवर प्रशासनाने कार्यवाही करावी त्यांना नोटीस देऊन खुलासा मागवावा असे सांगितले होते. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री. तकी हसनखान : सर्वसाधारण सभेत विभाग प्रमुख नाहीत राहणे जरुरी आहे डॉ.रझवी विभाग प्रमुख नाही मागील सभेत उपस्थित नव्हते म्हणुन डॉ. रझवी यांचेवर कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. असे आदेश करणे म्हणजे अधिकाऱ्यांवर अत्याचार होतो असे दिसुन येते.

मा. महापौर : मागील सर्वसाधारण सभेत डॉ. रझवी यांना नोटीस देऊन कार्यवाही करण्याबाबत प्रशासनास सुचना देण्यात आली आहे. त्यानुसार प्रशासन कार्यवाही करेल यापुढे सर्वसाधारण सभेत सर्वच संबंधित अधिकाऱ्यांना उपस्थित राहणे गरजेचे आहे.

श्री. तकी हसनखान : सर्वसाधारण सभेमध्ये विभाग प्रमुखांनी उपस्थित राहावे असा नियम आहे विभाग प्रमुख अंतर्गत असलेल्या अधिकाऱ्यांना सभेस राहणे बंधन नाही. तथापी शाखा प्रमुखांनी सभेस उपस्थित राहणे आवश्यक असेल तर यापुढे विभाग प्रमुख व शाखा प्रमुख यांनी उपस्थित राहावे असे आदेश दयावेत व जे अधिकारी विना परवानगी सभेस गैरहजर राहतील. त्यांचेवर प्रशासनाने कार्यवाही करावी असे ही आदेश देण्यात यावेत या संदर्भात मा. आयुक्तांनी स्वतः लक्ष घालुन अशा अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी.

श्री. स. अली मिरा सलामी : हे नविन आदेश आपण देत नाही. सर्वच महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर १९८८ पासुन सर्वच विभागाचे संबंधीत अधिकारी सर्वसाधारण सभेच्या वेळी स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर

देण्यासाठी उपस्थित राहतात. मागील सभेतील रुलींगची अंमल बजावणी व्हावी.

मा. महापौर : मागील सर्वसाधारण सभेत रुलींग दिलेले आहे इतिवृत्तास स्विकृती मिळाल्यानंतर डॉ. रझवी यांना नोटीस दिली जाईल.

श्री. तकी हसनखान : टॅक्स कमीटी करणार होतो. त्याचे उद्याप काहीही झाले नाही.

मा. महापौर : विभाग प्रमुखांसह क्र. २ चे अधिकारी हजर राहण्याची गरज आहे.

श्री. अफसर खॉन : कमीटीमध्ये कोणते स. सदस्योचा समावेश करावयाचे हे आपले अधिकार असुन आपण आपले अधिकार सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता यांना देऊन नावे सुचवण्या बाबत सांगितले परंतु यात मतभेद होऊ शकतात. आपणच नावे सुचवावी आजच निर्णय व्हावा. जबाबदारीला जबाबदारीने करावे सर्वांना विश्वासात घेवुन करावे.

श्री. तकीहसन खान : कमिटी नेमण्यबाबत स. सदस्यांना अधिकार देणे बरोबर नाही. सर्वसाधारण सभेस अधिकार असुन निर्णय घ्यावयाचा आहे. आपले अधिकार दुसऱ्यावर देणे बरोबर नाही.

श्री. स. अली मिरा सलामी : या विषयावर चर्चा करणे योग्य होणार नाही मा. महापौर यांनी सभागृहनेता तसेच विरोधी पक्षनेता यांना कमीटीतील सदस्य सुचवण्यात सांगितले आहे. त्यानुसार कार्यवाही होईल.

श्री. अंबादास दानवे : मागच्या सभेत मी जाहिरात फलकाच्या बोललो होतो. ते इतिवृत्तांत आले नाही. जाहिरात फलकाचे दर ३ पटीने वाढवुन द्यावे त्याच लोक व स्थनिक लोकांना देण्यात यावे. अशी दुरुस्ती करावी.

मा. महापौर : मागील बैठकीत कमीटीतील स. सदस्यांची नांवे सुचवण्या बाबत सभागृहनेता तसेच विरोधी पक्षनेता ३-३ नांवे देणे बाबत निर्णय घेतलेला आहे त्यानुसार कार्यवाही होईल. जाहिरात फलकांच्या वसुलीचे दर ३ व ४ वाढवावे जुने लोकांना बोलवुन ३ वर्षासाठी वाढवुन देण्यात यावे. व प्रशासनाने त्याप्रमाणे कार्यवाही करावी अशी दुरुस्ती करण्यात येते विषय क्र. १ मंजुर करण्यात येतात.

**ठराव क्र. ११९/१** : दिनांक २०.९.२०००. ३०.९.२०००. रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. १२०/२ :**

स्थायी समिती ठराव क्र. १९०/१ दिनांक ६ जुलै १९९९ अन्वये लेखा परिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांचे पदमान खालील प्रमाणे निश्चित करण्यात सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे.

| अ. क्र. | सद्य:स्थितीत अस्तित्वात आलेली पदनाम | वेतन श्रेणी | मंजुर पदमान |
|---|---|---|---|
| १. | वरिष्ठ लेखा परिक्षक | (रु. १६४०-२९००) | लेखा परिक्षा अधिक्षक |
| २. | कनिष्ठ लेखा परिक्षक | (रु. १४००-२३००) | वरीष्ठ लेखा परिक्षक |
| ३. | कनिष्ठ/लेखा लिपीक | (रु. ९५०-१५००) | कनिष्ठ लेखा परिक्षक |

प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद :

श्री. तकी हसनखान : पदनाम कशासाठी बदलेले त्याचा खुलासा करावा.

मा. महापौर : हा प्रस्ताव मुख्यलेखा परिक्षक विभागा अंतर्गत येतो व पदनाम बदलण्याचा असुन या बाबतीत बऱ्याच स. सदस्यांनी मत व्यक्त केले की, पदनाम बदलता येणार नाही. याचा फायदा काय ? केवळ बदल्या होणार नाही म्हणुन तसा प्रस्ताव आला काय प्रशासनाने खुलासा करावा.

श्री. प्रकाश निकाळजे : महानगरपालिका अस्थापनेवर विविध पदावर बऱ्याच दिवसापासुन काही चपराशी सेवा करतात व वरिष्ठ पात्रता धारण करतात. उदा. एम.कॉम. बी.कॉम, वेगवेगळया पदव्या मिळवलेल्या आहेत त्यांचेही पदनाम बदलुन अशा पध्दतीने कार्यवाही करणार काय ?

मा. महापौर : लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री. तकी हसनखान, श्री. प्रकाश निकाळजे : लेखाधिकारी यांचा या प्रस्तावाशी संबंध नाही. प्रशासनातील अधिकारी उपआयुक्त (म.) यांनी या संबंधी करावा. असे प्रस्ताव उपआयुक्त यांनी सादर करावयाचे असतात.

मा. महापौर : लेखाधिकारी सध्या या विभागाचे प्रभारी अधिकारी आहेत तेच खुलासा करु शकतील.

मुख्यलेखाधिकारी : उपआयुक्त यांचेकडुन हा प्रस्ताव आलेला नाही व त्याचा अधिकार नाही. मुख्य लेखा परिक्षक या विभागामार्फत हा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीने सर्वसाधारण सभेस शिफारस केलेली आहे. ही पदे आयसोलेटेड पदे आहे. असे प्रस्ताव ठेवण्याचे अधिकार मुख्य लेखा परिक्षकास आहे. प्रस्तावित केलयाप्रमाणे पदनाम बदलल्या नंतर ही सदर कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी किंवा इतर आर्थिक फायदे मिळणार नाही. फक्त इतरत्र विभागात त्यांचे बदल्या होणार नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : प्रशासन प्रस्ताव ठेवतात त्याचा व्यवस्थित खुलासा व्हावयास पाहिजे संबंध नसतांना लेखाधिकारी यांनी माहिती दिली. यास कनिष्ठचे वरिष्ठ पदनामाची अंमलबजावणी करावयाची आहे. परंतु गेल्या ३ वर्षाचा कालावधीच धरता महानगरपालिकेमध्ये बरेच प्रस्ताव कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मंजुर केले. परंतु कुण्याही कर्मचाऱ्यास वेतनश्रेणी लागु केली नाही. मागील एक स्थायी समिती सभेत ५ अधिकारी वर्गाचे कर्मचाऱ्याचा वेतनश्रेणी वाढ करण्याचा प्रस्ताव होता. त्यानंतर ३ सभापती होऊन गेले. अंमलबजावणी झ ाली नाही. सर्वसाधारण सभेस किंवा स्थायी समिती सभेत एखादया विषयावर निर्णय घेतल्यास कार्यवाही करावयास पाहिजे परंतु तसे होत नाही. एकाच पद दर्जा असलेले कर्मचारी वेगवेगळया वेतनश्रेणी मध्ये काम करत असतील तर योग्य नाही याची जागीव प्रशासन ठेवावी. अनधिकृतपणे असे प्रस्ताव ठेवणे बरोबर नसु प्रशासनाच्या वतीने हे प्रस्ताव यावयास पाहिजे.

श्री. प्रकाश निकाळजे : पदनिर्मिती करण्यास आमचा विरोध नाही पदनाम करण्यास विरोध आहे बरेच कर्मचारी गुणवत्तेनुसार लागलेले आहेत व त्यांनी लागल्या पासुन वेगवेगळया पात्रता धारण केली त्यांना ही वेतनश्रेणी देणार काय असे

केल्यास प्रत्येक सर्वसाधारण सभेत प्रस्ताव येतील व त्यास सभागृह मंजुरी देईल.

श्री. अंबादास दानवे : आताच लेखाधिकारी यांनी खुलासा केला मुख्यलेखा परिक्षक या विभागाचा प्रस्ताव आहे व त्यापदावर संध्या कायम अधिकारी सुध्दा नाहीत चुकीचा खुलासा वाटतो दुसरे असे की, हा प्रस्ताव स्थायी समिती सभेत मंजुर झाला. १ १/२ (दिड) वर्षाचा कालावधी गेला जर पदनाम बदलुन महानगरपालिकाचा, फायदयाचा अत्यावश्यक हा प्रस्ताव होता. तर हा प्रस्ताव येण्यास उशीर का झाला यावरुन असे दिसुन येते की, हा प्रस्ताव सादर झाला तो बरोबर वाटत नाही. सध्या जे मुख्यलेखाधिकारी हेच या विभागाचे प्रभारी अधिकारी असल्याने त्यांना असे प्रस्ताव ठेवण्याचा अधिकार आहे काय पदनाम झाल्यानंतर खालच्या अधिकाऱ्यांची परवानगी घेण्याची आवश्यकता पडणार नाही. म्हणुन असा प्रस्ताव सादर केला काय ? महानगरपालिकामध्ये भांडार अधिक्षक यांना भांडार लेखापल असे नाव देण्यात आहे ते चुकीची पध्दत आहे. इतर महानगरपालिकेमध्ये असे होत नाही असे प्रस्ताव प्रशासनामार्फत यावयास पाहिजे संबंधित विभागामार्फत नाही. या प्रस्तावास माझा विरोध आहे.

श्री. तकी हसनखान : पुर्वीच आवश्यकता होती तर मंजुर का झाला नाही.

मा. महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेता हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येते. हा प्रस्ताव लेखाधिकारी यांनी सादर केला नसुन स्थायी समितीत मंजुर झाल्याने सचिव यांनी सादर केला आहे. हा प्रस्ताव नामंजुर करण्यात येतो व प्रशासनास सुचना करु इच्छितो. की असे प्रस्ताव प्रशासनामार्फत एकत्रीत सादर करावेत.

**ठराव** :

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार पदनाम बदलणे बाबत सर्व विभागातील माहिती एकत्रित करुन प्रस्ताव प्रशासनातर्फे सादर करण्यात यावा व हा प्रस्ताव तुर्त नामंजुर करण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १२१/३** :

दि. १५.३.९९ रोजी (दि. १०.२.९९ रोजी तहकुब करण्यात आलेली) संपन्न झालेल्या विशेष स्थायी समितीने लेखा परिक्षण अहवाल (१) सन १९८३ -८४,९०-९१ (२) १९९१-९२ ते ९३-९४ (३) सन ९६-९७ या तिन्ही अहवालावर संगोपाग चर्चा करुन मुख्य लेखा परिक्षक यांनी तिन्ही अहवालातील महत्वाच्या मुद्यावर कार्यवाही न झालेली प्रकरणे या बाबत जी स्वतंत्र टिपणी सादर केली त्यातील सर्व मुद्यावर मा. आयुक्त व प्रशासन यांनी उचित कार्यवाही करुन त्याबाबतचे संपुर्ण अनुपालन झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल स्थायी समितीला सादर करावा या व्यतिरिक्त मुळ लेखा परिक्षण अहवालातील शिल्लक मुद्यांचा आढावा घेवुन त्याबाबतच संपुर्ण अनुपालन करण्यात यावे वरिल प्रमाणे कार्यवाही करण्यात सर्वानमुते मंजुरी देवुन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद :

श्री. अंबादास दानवे : लेखा परिक्षण अहवाल जवळ पास १०-१२ वर्षाचा एकत्रित ठेवण्यात आलेला असुन या संबधी स. सदस्यांचा अभ्यास झालेला नाही. याचा

विचारपुर्वक अभ्यास करणे जरुरी आहे. या अहवालावर चांगल्याप्रकारे चर्चा होऊन निर्णय व्हावेत व त्यासाठी स्वतंत्र विशेष बैठक बोलवण्यात यावी. त्यानुसार महानगरपालिकाचा यातुन फायदाच होईल.

श्री. स. अली मिरा सलामी : दरवर्षी ऑडीट रिपोर्ट सभागृहापुढे सादर करणे आवश्यक आहे एकत्रित १०-१२ वर्षाचा लेखा अहवाल सादर केला घाईने चर्चा करुन मंजुरी देणे योग्य होणार नाही. सविस्तर चर्चा व्हावीत व झालेल्या निर्णयानुसार संबधीतावर तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक आहे. चर्चा करण्यासाठी स्वतंत्र बैठक बोलवावी.

श्री. तकी हसनखान : सन १९८३-८४ ते ९०-९१ व त्यानंतर केला ९४-९५,९५-९६ या दोन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल सादर न करता त्यापुढील ९६-९७ चा लेखा अहवाल सादर केला. सदर अहवाल ८ दिवसापुर्वीच मिळाले यावर अभ्यास करण्यासाठी ८ दिवस कमी पडतात सभागृहाच्या मंजुरीस सादर करावेत.

मा. महापौर : हा प्रस्ताव पुर्ण न ठेवता यात ९४-९५ व ९५-९६ चा लेखा अहवाल दिलेला नाही या दोन वर्षाचे ऑडीट झाले नाही काय ? त्याचा खुलासा संबंधीत अधिकारी यांनी करावा.

मुख्यलेखाधिकारी : तत्कालीन मुख्य लेखा परिक्षक यांनी माहे फेब्रुवारीच्या बैठकीस प्रस्ताव ठेवलेले होते. स्थायी समितीने मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केलेली आहे. मुख्यलेखा परिक्षक यांनी ९४-९५ व ९५-९६ या दोन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट ठेवलेले नव्हते. त्यासंदर्भात स्थायी समितीच्या बैठकीतही चर्चा झालेली आहे. व ९४-९५ व ९५-९६ हे प्रशासकिय कालवधी येत असल्याने प्रशासकानेच ऑडीट रिपोर्ट अंतीम केलेले होते. तसेच ८३-८४ ते ९०-९१ तथापी ८३-८४ ते ८७-८८ पर्यतही प्रशासकच होते परंतु प्रशासकाने अंतिम न केल्याने सर्वसाधारण सभेपुढे आलेले आहे.

श्री. तकी हसनखान : ऑडीट करण्यासाठी मुख्यलेखा विभागाकडे जाणे आवश्यक आहे. प्रशासकाचा कालावधी जरी असेल तर लेखा परिक्षणास सुट नाही. संपुर्ण लेखा परिक्षण झालेले आहे का ?

मुख्यलेखाधिकारी : त्यावेळी ऑडीट रिपोर्ट सादर करण्यासाठी सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसते व प्रशासकाला सुपुर्ण अधिकार प्राप्त असते.

मा. महापौर : प्रशासनाचा खुलासा असा कि ९४-९५- व ९५-९६ चा ऑडीट रिपोर्ट प्रशासकाचा कालवधी येत असल्याने प्रशासकाने अंतिम केलेले आहे व शासनाकडे पाठवले आहे व म्हणुन सर्वसाधारण सभेस मंजुरीस ठेवण्याची आवश्यकता नाही तथापी ८३-८४ ते ८७-८८ पर्यतही प्रशासक होते त्यांनी ऑडीट रिपोर्ट अंतिम केलेला नसल्याने सर्वसाधारण सभेस मंजुरीसाठी आलेले आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : सन ८३-८४ पासुन ते ९६-९७ लेखा परिक्षण अहवाल विषयपत्रिके सोबत मंजुरीसाठी सादर केलेला आह. यात फक्त दोन वर्ष ९४-९५ व ९५-९६ या वर्षाचा अहवाल सादर झालेला नाही खुलासा मागवला असता लेखधिकारी यांनी असे सांगितले की सदर कालवधी प्रशासनाचा येत असल्याने व प्रशासकाला संपुर्ण अधिकार असल्याने प्रशासकाने ऑडीट रिपोर्ट अंतिम करुन घेतलेला आहे. परंतु याच अहवालामध्ये ८२-८३ ते ८८ पर्यन्त ही प्रशासकाचा कालवधी होता त्यावेळचा का ऑडीट रिपोर्ट अंतिम करण्यात आला नाही. जो दोन वर्षाचा अहवाल प्रशासकाने अंतिम करुन

घेतला व शासनाची मंजुरी जरी घेतलेली असेल तरी त्याची माहिती सर्वसाधारण सभेस यावयास पाहिजे. या संदर्भात मी मागच्या वेळी सुध्दा माहिती मागवली होती व तसा दोन वर्षाचा अहवाला सहीत पुन्हा ८२-८३ ते ९६-९७ पर्यन्त संपुर्ण अहवाल सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी आणावा व यासाठी स्वतंत्र बैठक बोलवुन निर्णय घेण्यात यावा.

श्री. तकी हसनखान : ९५-९६ चे लेखा परिक्षण अहवाल नाही असे माझे स्वतःचे मत आहे असेल तर सभागृहात आणुन दाखववावे.

मा. महापौर : या संबंधी प्रशासनास माहिती विचाराण्यात येईल. व चर्चेसाठी स्वतंत्र बैठक घेण्यात येईल.

**ठराव** :

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संपुर्ण लेखा परिक्षक अहवालावर संगोपांग चर्चा करण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभेचे आयेजन करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

चर्चा :

श्री. सोनवणे सुदाम : या विषयावर चर्चा न करता विशेष बैठक ठेवण्यात यावी. वसुली संदर्भात चर्चा करण्यात यावी विठ्ठलनगर येथील आमदार बसैय्ये बंधु निधीतुन बांधण्यात आलेल्या सांस्कृतिक सभागृहास नेताजी सुभाषचंद्र बोस सभागृह नांव देण्यात यावे.

मा. महापौर : प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. मा. आयुक्त यांना एका महत्वाच्या बैठकीसाठी जायचे असल्याने ते उपस्थित राहणार नाही.

श्री. सुदाम सोनवणे :मा. आयुक्त जर उपस्थित राहत नसतील. तर बैठक तहकुब करुन नंतर आयोजीत करण्यात यावी. कारण मा. आयुक्त यांना सुध्दा कळवयास पाहिजे की, १५ कोटीची वसुलीची तुट का येते. मा. आयुक्त बैठकीस उपस्थित राहणे जरुरी आहे.

मा. महापौर : दोन ठराव महत्वाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर सुरु करण्या संदर्भात असुन सिडको मध्ये पाण्याची टाकी बांधण्याचे इस्टिमेटचा प्रस्ताव असुन तो मंजुर करण्यात येते. तसेच यानंतरचे सर्व ठराव मंजुर करण्यात येत आहे. ऐनवेळचे सर्व विषय मंजुर करण्यात येत आहे.

**विषय क्र. १२२/४** :

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, माननीय आमदार श्री. शालीग्रामजी बसैय्ये (बंधु) यांनी खाली ठिकाणी लोकोपयोगी विविध प्रकारच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सदरील इमारतीस खालील प्रकारे नामकरण करणे बाबत पत्राव्दारे कळविले आहे.

| अ. क्र. | इमारत | अ. क्र. | करावयाचे नामकरण |
|---|---|---|---|
| १. | प्रियदर्शनी इंदिरानगर सांस्कृतिक सभागृह | १. | अण्णाभाऊ सभागृह |
| २. | ब्रिजवाडी सांस्कृतिक सभागृह | २. | संत रोहिदास सभागृह |
| ३. | नारेगांव सांस्कृतिक सभागृह | ३. | डॉ. शामाप्रसाद सभागृह |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | सिडको एन-११ सांस्कृतिक सभागृह | ४. | स्व. दत्ताजी भाले सभागृह |

वरिल प्रमाणे इमारतीचे नामकरण करण्याबाबतचा रितसर प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. शालीग्रामणी बसैय्ये (बंधु) यांचे आमदार निधीतुर बांधण्यात आलेल्या इमारतीचे खालील प्रमाणे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | इमारत | अ. क्र. | करावयाचे नामकरण |
|---|---|---|---|
| १. | प्रियदर्शनी इंदिरानगर सांस्कृतिक सभागृह | १. | अण्णाभाऊ सभागृह |
| २. | ब्रिजवाडी सांस्कृतिक सभागृह | २. | संत रोहिदास सभागृह |
| ३. | नारेगांव सांस्कृतिक सभागृह | ३. | डॉ. शामाप्रसाद सभागृह |
| ४. | सिडको एन-११ सांस्कृतिक सभागृह | ४. | स्व. दत्ताजी भाले सभागृह |

**विषय क्र. १२३/१** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हॉटेल अमरप्रित ते बिड बाय पास पर्यन्तच्या रस्त्याचे अदयापी नामकरण झालेले नाही तरी कृपया या रस्त्यास स्वातंत्र सेनानी कै. श्री. प्रल्हादजी अभ्यंकर यांचे नांव देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. साधना सुरडकर
अनुमोदक : सौ. जयश्री किवळेकर
सौ. जयश्री कुलकर्णी
दिनांक : १९.९.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल अमरप्रित ते बिड बाय पास पर्यन्तच्या रस्त्यास स्वातंत्र सेनानी कै. श्री. प्रल्हादजी अभ्यंकर यांचे नांवे देण्यास सर्वानुमते मंजुर देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२४/२** :

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ५२ येथील म्हाडा कॉलनी ही महानगरपालिकेच्याकडे हस्तांतरीत झालेली असुन त्यामधील अंतर्गत रस्ते फार लहान आहे सदर रस्ते हे दोन ते तीन मिटरचे असुन तेथे महानगरपालिका तर्फे सिमेंट पाथवे तयार करण्यात यावे.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. नारायण आण्णा सुरगोणीवार
अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ५२ येथील म्हाडा कॉलनी महानगरपालिके कडे हस्तांतरीत झालेली असुन त्यामधील अंतर्गत रस्ते सिमेंट पाथवे तयार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात यते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२५/३** :

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ५२ येथील एन-६ सिडको भागातील मोहल्ला साईनगर व अविष्कार कॉलनी येथील जागा उद्यानाकरिता राखीत करण्यात आलेली आहे सदरील जागेवर लोकांच्या सोयसुविधा करिता महानगरपालिका तर्फे उद्यान विकसित करण्यात यावा.

करिता सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. नारायण आण्णा सुरगोणीवार

अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ५२ येथील एन-६ सिडको मोहल्ला साईनगर व अविष्कार कॉलनी येथील उद्यानासाठी असलेल्या जागेवर महानगरपालिका तर्फे उद्यान विकसित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवळचे विषय*

**विषय क्र. १२६/१** :

मुख्य अग्निशमन अधिकारी अग्निशमन विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, आग्निशमन विभागाकडुन देण्यात येणारे "अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र" (एक वर्षासाठी) करिता फिस आकारणी व फिस दखावसाठी दिनांक २७.७.२००० रोजी महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या ठरावाप्रमाणे "अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्रासाठी फिस रु. ५००/- ऐवजी सुधारित फिस रु. १५००/- आकारणी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

औरंगाबाद शहर व परिसरात दिपावली निमित्त फटाका विक्रेते फटाका स्टॉल वरुन (एक महिण्यासाठी) फटाका विक्री करतात. यासाठी फटाका विक्रेत्यांना बी.पी.एम.सी - ॲक्ट-१९४९ कलम ३७६-(१) अन्वये "अग्निशमन ना हरकम प्रमाणपत्र" घेणे बंधनकारक आहे.

सन १९९४-९५ पासुन फटाका विक्रेत्यांना "अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र" फिस रु. २५०/- आकारणी करण्यात येत होती. या प्रमाणे खालील वसुली झालेली आहे.

| अ. क्र. | वर्ष (२) | फिस आकारणी (प्रती स्टॉल) (३) | एकुण स्टॉल (४) | एकुण वसुली रुपये (५) |
|---|---|---|---|---|
| १. | ९४-९५ | रु.२५०/- | २०० | रु. ५०,०००/- |
| २. | ९५-९६ | रु.२५०/- | १९५ | रु. ४८,७५०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | ९६-९७ | रु.२५०/- | २६५ | रु. ६६,२५०/- |
| ४. | ९७-९८ | रु.२५०/- | ३०१ | रु. ७५,२५०/- |
| ५. | ९८-९९ | रु.२५०/- | १६२ | रु. ४०,५००/- |
| ६. | (९८-९९) | रु.२५०/-<br>रु.१००/- | १५४<br>१५४ | रु. ३८,५००/-<br>रु. १५,४००/- |
| ७. | ९९-२००० | रु. २५०/- | ३३६ | रु. ८४,२५०/- |
| एकुण वसुली | | | | रु. रु. ४,१८,९००/- |

मागीलवर्षी १५४ फटाका स्टॉल धारकांनी अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र घेतले नव्हते. त्या बाबत दंड व फिस वसुली झाली तो खाली प्रमाणे.

दिनांक २७.७.२०००. रोजी सर्वसाधारण सभेच्या ठरावाप्रमाणे "अग्निशमन ना हारकत प्रमाणपत्र" (एक वर्षासाठी) फिस ५००/- ऐवजी रु. १५००/- करण्यात फिस रु. २५०/- ऐवजी रु. ७५०/- आकारणी करण्याचा प्रस्ताव महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव व वैधानिक कार्यवाहीस्तव सादर.

संवाद:
मा. महापौर : रु. ३००/- आकारणी करावी

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ (१) अन्वये फटाका विक्रेत्यांना एक महिण्यासाठी देण्यात येणाऱ्या अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्रा करिता रु. ७५०/- ऐवजी रुपये ३००/- या प्रमाणे फिस आकाराण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२७/२** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासनाने मागील वर्षी मनपाच्या अस्थापनेवर कर निर्धारक व संकलक हे पद रु. २२००-४००० या वेतन श्रेणीत निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे.

शासन वित्त विभागाचे परिपत्रक क्रबीजीटी- १००/प्र.क्र.-१३/२००/ अर्थसंकल्प-९९ दि. १ मार्च,२००० अन्वये रिक्त होणारी पदे भरण्यावर बंदी घालण्यात आलेली आहे. त्यामुळे ती उभारण्यात आलेली नाहीत.

महानगरपालिकेमार्फत करण्यात येणारी जनतेची कामे निर्धारित वेळेत पुर्ण करण्यासाठी कर निर्धारक व संकलक या पदाकरिता उप जिल्हाधिकारी या संवर्गातील एक अधिकारी यांची सेवा तातडीने प्रतिनियुक्तीवर महानगरपालिकेकडे उपलब्ध करुन देण्याची विनंती मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना दि. १०.१०.२००० रोजी करण्यात आलेली आहे. याच संदर्भाने श्री. वि.मा. गांवडे, वि. भु.सं. निप्पॉन डेनो वर्धा हयांनी दि. १०.१०२००० रोजी फॅक्सव्दारे अर्ज पाठवुन त्यांनी औरंगाबाद विभागात स्थलांतर झाल्यामुळे ते औरंगाबाद येथे महानगरपालिकेत उप जिल्हाधिकारी संवर्गात असलेल्या पदावर प्रतिनियुक्तीने येण्यासाठी संमती देत आहे व प्रतिनियुक्तीने करिता असलेले सर्वसाधारण

नियम त्यांना मान्य आहेत असे कळविलेले आहे. त्यानुंषागाने प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिके तर्फे करण्यात येणारी जनतेची कामे निर्धारित वेळेत पुर्ण करण्यासाठी कर निर्धारक व संकलक या पदाकरिता उपजिल्हाधिकारी या संवर्गातील संवर्गातील श्री. वि.मा. गांवडे विशेष भुसंपादन निप्पॉन डेग्रो वर्धा यांची प्रतिनियुक्ती करिता असलेले सर्वसाधारण नियमाअंर्तगत प्रतिनियुक्तीवर नेमणुक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२८/३** :

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि. यांनी प्रस्ताव सादर केले आहे की, नक्षत्रवाडी येथील मुख्य जलकुंभ (एम.बी.आर.) ते विटखेडा गांवापर्यन्त ३०० मी.मी. व्यासाची डी.आय.के. जलवाहिनी टाकवयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभागाची सन १९९९-२००० च्या दरसुची नुसार रक्कम रु. ९२,५६,४००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा सन २०००-२००१ मध्ये प्राप्त होणाऱ्या शासकिय अनुदानातुन करण्यात येणार आहे.

करिता अंदाजपत्रक रु. ९२,५६,४००/- चे विचारार्थ व मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नक्षत्रवाडी येथील मुख्य जलकुंभ (एम.बी.आर. ) ते विटखेडा गांवापर्यन्त ३०० मी.मी. डी.आय.के. जलवाहिनी टाकण्याचा कामासाठी रक्कम रु. ९२,५६,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२९/४** :

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मरीमाता येथे २० लाख लिटर्स क्षमतेचा जलकुभ बांधणे व वितरण व्यवस्थेसाठी विविध व्यासांच्या जलवहिण्या टाकावयाच्या आहेत. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभागाची सन १९९९-२००० च्या दरसुची नुसार रु. २,०७,२१,४००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास प्रशाकिय मान्यता घेण्यात आली सदर कामाचा खर्च हा २०००-२००१ मध्ये प्राप्त होणाऱ्या शासकिय अनुदानातुन करण्यात येणार आहे.

तरी रक्कम रु. २,०७,२१,४००/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मरिमाता येथे २० लाख लिटर्स क्षमतेची जलकुभ बांधणे व वितरण व्यवस्थेसाठी विविध व्यासाच्या जलवाहीन्या टाकण्याच्या कामासाठी रक्कम रु. २,०७,२१,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३०/५ :**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वर्ष १९९१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधुन औरंगाबाद महानगरपालिकेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे बांधकाम हाती घेतले व उद्घाटन दिनांक २४-डिसेंबर १९९९ रोजी संपन्न झाले सदर केंद्र कार्यान्वित करणेसाठी उध्दीष्ट व कार्य खालील प्रमाणे करण्यात येत आहेत.

१) सामाजिक समता या उदात विचाराने प्रेरित होऊन या विषयी समाज शास्त्रज्ञांना विचार व्यासपिठ निर्माण करण्याच्या उद्देशाने सदर केंद्र कार्य करिल.
२) सामाजिक समस्यांचा सर्वांगीण अभ्यास करणे व समाज परिवर्तनाचा विचार समाजात रुजविणे
३) जगातील सर्व समतावादी विचारवंताचे,ग्रंथ, दलित साहित्य, (मराठी,हिंदी, व इंग्रजी) विश्वकोष जाती-जमातीवरील पुस्तके ग्रंथालयासाठी देणगी स्वरुपात स्विकारणे, व खरेदी करणे, त्यासाठी समम्वय आणि प्रकल्प संचालक यापैकी कोणीही सुचविलेले ग्रंथ खरेदी करण्यात यावेत.
४) वरील विषयावर विचारवंतासाठी व्याख्याने चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळाचे आयेजन करणे प्रबंध, लेख संकलन, प्रकाशन करणे महाविद्यालयीन, शालेय विद्यार्थ्यांसाठी व्याखानमाला, वक्तुत्व, निबंध, चित्रकला व तत्सम स्पर्धांचे आयोजन करणे व पुरस्कार,प्रशस्तीपत्र प्रदान करणे, शिष्यवृत्ती देणे.
५) संशोधन केंद्राच्या उध्दीष्टांशी जुळणाऱ्या स्थानिक जिल्हा, राज्य आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या इतर संस्थाशी समन्वय सुसंवाद साधणे.
६) देश/ विदेशातील महाविद्यालये. विश्वविद्यालयामधील विव्दानांना आमंत्रित करणे व स्थानिक राज्यातील विचारवंताना केंद्राच्या वतीने संशोधन/ व्याख्यान/परिसंवाद/ कॉन्फरन्स साठी पाठविणे.
७) अस्पृष्याचा निवारण, अंधमध्दा निर्मुलन, अनिष्ट रुंढींचे उच्चटन, सामाजिक सलोखा निर्माण करणे राष्ट्रीय एकात्मता वृध्दींगत होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणाऱ्या अराजकिय व्यक्ती, संस्था व संघटनांना पुरस्कृत करणे, मानपत्र प्रदान करणे, अर्थसाहय्य उपलब्ध करुन देणे बाबीसाठी भारतातील व्यक्ती, संघटनांचा विचार करण्यात येईल.
८) या संशोधन केंद्रासाठी मासिक व वार्षिक सदस्य मिळविणे.
९) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैयक्तीक वापरातील वस्तु हस्तालिकखीते जमा करुन जतन करणे, प्रदर्शनाचे आयोजन करणे.
१०) विपश्यना शिबिरांचे आयोजन करणे.
११) संशोधन केंद्राच्या उद्दीष्टाशी जुळणाऱ्या कार्यक्रमांसाठी/ बैठकीसाठी अराजकिय संस्था संघटनांना केंद्राचे सभागृह व परिसर प्रतिदिन रुपये ५००/- शुल्क आकारुण उपलब्ध करुन देण्यांत यावा. मनपा व्यतिरिक्त इतर संस्थांना विपश्यना शिबिरासाठी हॉल नाममात्र प्रतिदिन रु. ५/- दराने उपलब्ध राहिल. संशोधन केंद्रात माईक स्पिकर व कॅमेरा उपलब्ध करुन दयावा.
१२) महात्मा फुले-राजर्षी शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्य चळवळी संबंधी संशोधन पर ग्रंथ प्रकाशित करणे सामाजिक न्यायाच्या प्रश्नांसंबंधी- दलित,अदिवासी, स्त्रिया, भटके विमुक्त व शोषित समाजाच्या उन्नतीसाठी परिवर्तन चळवळी संबंधी संशोधन प्रकल्प हाती घेणे व असे लेखन करणाऱ्या

(पतिवर्ष एक याप्रमाणे) लेखकांना गंथ प्रकाशनार्थ रुपये. १५,०००/- च्या मर्यादेत अर्थ सहाय्य उपलब्ध करुन देणे.

१३) डॉ. आंबेडकर जीवन कार्य, ग्रंथ, छायचित्रे, भाषणे, प्रबंध, प्रसारित करावी. स.न. रतनकुमार पंडागळे यांनी सर्वसाधारण सभेत पत्र दि. २८ जुलै २००० नुसार आहे.

१४) "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन पुरस्कार" वितरण करणे.
(अ) आंतरराष्ट्रीय पुरस्कार रु. १ लाख व स्मृतीचिन्ह.
(ब) राष्ट्रीय पुरस्कार रु. ५१,०००/- व स्मृतीचिन्ह.
(क) राज्यस्तरीय पुरस्कार रु. २५,०००/- व स्मृतीचिन्ह.
दरवर्षी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांसाठी विद्वानांची निवड करण्यासाठी वृत्तपत्र व इतर प्रसार माध्यमाव्दारे बातमी/जाहिरात देण्यांत यावी पुरस्कार निवड समितीत खालील सदस्य असावेत.

१) श्री. वसंत मून २) डॉ. गंगाधर पानलावणे ३) प्रा. रावसाहेब कसबे ४) पो. बा. ह. कल्याणकर ५) प्रा. अरुणा लोखंडे.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केद्रासाठी मानद समन्वयक पदासाठी सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. गंगाधर पानतावणे डॉ. ल.बा.रायमाने, प्रा.प्र.ई. सोनकांबळे, डॉ. सुभाष गडद यांच्या पैकी एका मानवरांचे नांव प्रशासनातर्फे निश्चित व्हावे. नियुक्त होणाऱ्या समन्वयेकाच्या जबाबदाऱ्या कर्तव्ये व सवलती खालील प्रमाणे असाव्यात.

१) केंद्राच्या दैनंदिन व्यवस्थापन प्रमुख व सल्लागार म्हणुन काम पाहाणे.
२) केंद्रास भेट देणाऱ्यांना माहिती/मार्गदर्शन करणे केंद्राच्या उद्दीष्टपुर्तीसाठी उपक्रमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी समन्वयकाची राहिल. त्यांनी केलेल्या सुचनांना मनपाने प्राधान्य दयावे परंतु त्यांचा सल्ला/सुचना मान्य करणे मनपा प्रशासनावर बंधनकारक असणार नाही. त्यांनी मनपा प्रकल्प संचालक ग्रंथापाल व लिपीकाची मदत घ्यावी.
३) समन्वयकास स्थानिक प्रवास भत्ता व मानधन असे एकुण रुपये. ५०००/- दरमहा देण्यांत यावे. त्यांना मनपा कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी/ सवलती देय राहणार नाहीत.
४) समन्वयकास संशोधन केंद्रात बसण्यासाठी स्वतंत्र कक्ष, दुरध्वनी, फर्निचर व स्टेशनरी उपलब्ध करुन द्यावी.
५) संशोधन केंद्राच्या कामासाठी मनपाने खर्चाने भारतात कोठेही जाण्याचे मुभा असेल परंतु अशा प्रस्तावास त्यांनी मा. आयुक्तांचा लेखी मान्यता घेणे बंधनकारक असेल त्यांना वर्ग एक अधिकाऱ्यांस देण्यांत येणाऱ्या/सुविधा देण्यांत याव्यात तसेच रुपये ३००/- दरमहा पेटी कॅश केंद्राच्या किरकोळ खर्चासाठी व अतिथी भत्ता म्हणुन खर्चाची देयके सादर केल्यावर देण्यात यावा.
६) मानद समन्वयकाची नियुक्ती प्रथम एक वर्ष कालावधीची असेल मुदत वाढ देण्यांचा आधिकार मा. आयुक्तांना असेल. तथापि कोणतीही लेखी/तोंडी सुचना न देता सदर नियुक्ती मुदती पुर्वी रद्द करणे बाबतचा अधिकार मनपा आयुक्तांना राहील. समन्वयकास मनपाची बदनामी होईल अशी जाहिर टिका करता येणार नाही अथवा प्रसार माध्यमांना मुलाखत देता येणार नाही.

७) समन्वयकाने प्रकाशित केलेल्या लेखात, दिलेल्या मुलाखातीतील वक्तव्यासाठी वादग्रस्त भाषणासाठी आणि त्यातुन निर्माण होणाऱ्या कायदेशीर बाबीसाठी ते स्वत:जबाबदार असतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या सभासदासाठी खालील प्रमाणे नियम राहतील.

१) सभासदांनी सभासद होतांना अनामत रक्कम रु. २००/- प्रवेश फी रु. ५०/- भरल्यास एकावेळी एक पुस्तक मिळु शकेल, मासिक सदस्यता शुल्क रु. पंचवीस वार्षिक सदस्यता शुल्क रु. २५०/- राहिल.

२) एका सभासदास फक्त पाच (पाच) पुस्तके मिळु शकतील त्यासाठी अनामत व वर्गणी त्यापटीत भरावी लागेल.

३) काही विशिष्ट पुस्तकांसाठी अतिरिक्त अनामत रक्कम घेण्याचा अधिकार ग्रंथपाल यांना असुन सभासदांनी रु. १००/- पेक्षा अधिक किंमतीचे पुस्तक किंमतीच्या दुप्पट रक्कम भरण्याशिवाय मिळणार नाही.

४) सभासदास मासिक वर्गणी ही, कार्डावर पुस्तक न घेतले तरी देखील भरावीच लागेल.

५) वर्गणी दरमहा १० तारखेपर्यंन्त जमा करावी अन्यथा पुर्व सुचित न करता सभासदत्व रद्द करुन अनामत रक्कम जप्त केली जाईल.

६) महिन्याच्या कोणत्याही तारखेस सभासदतत्व सुरु केल्यास त्या महिन्याची पुर्ण वर्गणी द्यावी लागेल.

७) सभासदत्व एक वर्षापुरतेच मर्यादित राहिल दरवर्षी (एप्रिलमध्ये) सभासदत्वाचे नुतनीकरण करणे आवश्यक राहिल.

८) सभासदत्व (कारण न सांगता देखील) नाकारण्याचा अधिकार उप आयुक्त मनपा औरंगाबाद यांनी राखुन ठेवलेला आहे.

९) राजपत्रित अधिकारी वर्गाशिवाय शासकिय निमशासकिय मंडळे औरंगाबाद मनपाचे कायमस्वरुपी व्दियीय/ तृतीय श्रेणीतील कर्मचारी वर्ग यांना घेतलेली हमी ग्रंथपाल यांनी प्रमाणित केल्यास अधिकृत राहील. याबाबत अधिकार ग्रंथपाल यांना राहिल.

१०) सभासदांनी लेखी अर्ज दिल्यास सभासदत्व स्थगित काळाची वर्गणी आकारली जाणार नाही. सदस्यत्व फक्त चालु आर्थिक वर्ष (एप्रिल ते मार्च) अखेर पर्यंन्तच स्थगित ठेवता येईल.

११) सभासदत्व रद्य करावयाचे असल्यास अनामत रक्कमेच्या मुळ पावतीसह १५ दिवस अगोदर लेखी अर्ज कराव, पावती शिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१२) सभासदत्व रद्द करण्यापुर्वी सभसदाने वर्गणी, विलंब शुल्क, पुस्तक व तिकीट/कार्ड प्रथम जमा करणे बंधनकारक राहील.

१३) पुस्तके किंवा मासिक संदर्भ ग्रंथ ग्रंथलयाबाहेर दिले जाणार नाही. ती ग्रंथालयात वाचवयास मिळतील.

१४) सभासदाचे तिकीट हरवल्यास त्याची दुप्पट किंमत करावी लागेल. न दिल्यास अनामत रक्कम जप्त करुन उर्वरित रक्कम वसुलीसाठी महानगरपालिका अधिनियम अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

१५) सभासदाचे तिकीट हरवल्यास त्याचा दुरुपयोग करुन त्यावर इतरांनी ग्रंथ नेता तरी त्याची जबाबदारी माझ्यावर राहिल या अटीवर दुसरे तिकीट एक महिन्या नंतर वीस रुपये भरुन मिळु शकेल.

१६) सभासदांनी पुस्तके, मासिके जपुन वापरावीत चित्रे, नकाशे प्रतिलिपीने काढु नयेत, पुस्तक फाटक्या किंवा खराब अवस्थेत तसेच रेषा मारलेल्या घडया पडलेल्या असवस्थेत परत केल्यास त्याची जबाबदारी सभासदावर राहिल व पुस्तकाची दुप्पट किंमत वसुल करण्यात येईल. सदर वसुलीचे अधिकार ग्रंथपालांना असतील.

१७) ग्रंथलयात पुस्तकाखेरीज अनावश्यक वस्तु बॅगज, पाळीव प्राणी आणु नयेत, खाद्य पदार्थ खाणे, धुम्रपान करणे, कोणत्याही प्रकारची नशा करणे अथवा करुन येणे चघळणे,आवाज करणे, ओरडणे या सर्वास सक्त मनाई राहिल.

१८) पुस्तक घेतांना मुळातच ते फाटके अथवा खराब असल्यास ते घेतेवेळी ग्रंथपालांच्या निदर्शनास आणुन द्यावे व पुस्तकावर स्वाक्षरी घ्यावी पुस्तकातील डिझाईन मोजुन/घ्यावीत, नसता फाटल्याची जबाबदारी सभासदावर राहिल., त्याबद्दल दुप्पट किंमत वसुल केली जाईल.

१९) वरिल सर्व नियमासह इतर वादातील प्रश्नाबद्दल आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचा निर्णय अखेरचा व सर्वांना बंधनकारक राहिल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासाठी वरिल प्रमाणे उद्दीष्टे उपक्रम व सभासदासाठी नियम व अटी संबंधी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव** :

प्रकल्प संचालक यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेउकर संशोधन केंद्र कार्यान्वित करणेसाठी उद्दीष्ट व कार्य खालील प्रमाणे मंजुर करण्यांत येत आहे.

१) समाजिक समता या उदात्त विचाराने प्ररित होऊन या विषयी समाज शास्त्रज्ञांना विचार व्यासपिठ निर्माण करण्याच्या उद्देशाने सदर केंद्र कार्य करिल.

२) सामाजिक समस्यांचा सर्वागीण अभ्यास करणेव समाज परिवर्तनाचा विचार समाजात रुजविणे.

३) जगातील सर्व समतावादी विचारवंतांचे ग्रंथ दलित साहित्य(मराठी, हिंदी व इंग्रजी) विश्वकोष जाती-जमातीवरिल पुस्तके ग्रंथालयासाठी देणगी स्वरुपात स्विकारणे व खरेदी करणे त्यासाठी समन्वयक आणि प्रकल्प संचालक यापैकी कोणीही सुचविलेले ग्रंथ खरेदी करण्यात यावेत.

४) वरिल विषयांवर विचारवंतांसाठी व्याख्याने चर्चासत्रे, लेख परिसंवाद कार्यशाळांचे आयोजन करणे प्रबंध, लेख संकलन, प्रकाशन करणे महाविद्यालयान शाळेय विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमाला, वक्तृत्व निबंध, चित्रकला, व तत्सम स्पर्धाचे आयोजन करणे व पुरस्कार प्रशस्तीपत्र प्रदान करणे शिष्यवृत्ती देणे.

५) संशोधन केंद्राच्या उद्दिष्टांशी जुळणाऱ्या स्थानिक,जिल्हा, राज्य आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या इतर संस्थांशी समन्वय सुसंवाद साधणे.

६) देश/विदेशातील महाविद्यालये, विश्वविद्यालयामधील विव्दानांना आमंत्रित करणे व स्थानिक, राज्यातील विचारवंताना केंद्राच्या वतीने संशोधन/व्याख्यान/परिसंवाद/कॉन्फरन्ससाठी पाठविणे.

७) अस्पृष्यता निवारण अंधमध्दा निर्मुलन, अनिष्ट रुढीचे उच्चाटन, सामाजिक सलोखा निर्माण करणे राष्ट्रीय एकात्मता वृध्दींगत होण्याच्या दृष्टीकने प्रयत्न करणाऱ्या अराजकिय व्यक्ती,संस्था व संघटनांना पुरस्कृत करणे, मानपत्र प्रदान

करणे अर्थसाहाय्य उपलब्ध करुन देणे बाबीसाठी भारतातील व्यक्ती संघटनाच्या विचार करण्यात येईल.

८) सा संशोधन केंद्रासाठी मासिक व वार्षीक सदस्य मिळविणे.

९) डॉ. बाबासाहेब आंबेउकरांच्या वैयक्तीक वापरातील वस्तु, हस्तलिखीते जमा करुन जतन करणे, प्रदर्शनाचे आयोजन करणे.

१०) विपश्यना शिबिरांचे आयोजन करणे

११) संशोधन केंद्राच्या उद्दिष्टांशी जुळणाऱ्या कार्यक्रमासाठी/ बैठकींसाठी अराजकिय संस्था संघटनांना केंद्राचे सभागृह व परिसर प्रतिदिन रुपये ५००/- शुल्क आकारुन उपलब्ध करुन देण्यांत यावा. मनपा व्यतिरिक्त इतर संस्था विपश्यना शिबीरासाठी हॉल नाममात्र प्रतिदिन रु. ५/- दराने उपलब्ध राहिल. संशोधन केंद्रात माईक,स्पिकर व कॅमेरा उपलब्ध करुन देण्यांत यावा.

१२) महात्मा फुले राजर्षी शाहु महाराज,डॉबाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळी संबंधी संशोधन पर ग्रंथ प्रकाशित करणे सामाजिक न्यायाच्या प्रश्ना संबंधी दलित, आदिवासी, स्त्रीया, भटके विमुक्त व शोषित समाजाच्या उन्नतीसाठी परिवर्तन चळवळी संबंधी संशोधन प्रकल्प हाती घेणे व असे लेखन करणाऱ्या (प्रतिवर्ष एक या प्रमाणे) लेखकांना ग्रंथ प्रकाशानार्थ रुपये १५,०००/- च्या मर्यादेत अर्थ सहाय्य उपलब्ध करुन देणे.

१३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन कार्य, ग्रंथ छायाचित्रे, भाषणे, प्रबंध पुस्तके या सदर्भात वेबसाईट निर्माण करुन प्रसारित करावी. स.न.श्री. रतनकुमार पंडागळे यांनी सर्वसाधारण सभेत पत्र दि. २८ जुलै २००० नुसार खालील काही सुचनाचा समावेश करुन मंजुरी दिली जाते.

१४) "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन पुरस्कार" विरतण करणे.

अ) आंतरराष्ट्रीय पुरस्कार रु. १ लाख व स्मृतीचिन्ह.

ब) राष्ट्रीय पुरस्कार रु. ५१,०००/- व स्मृतीचिन्ह.

क) राज्यस्तरीय पुरस्कार रु. २५,०००/- व स्मृतीचिन्ह.

दरवर्षी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी विद्वानांची निवड करण्यासाठी वृत्तपत्र व इतर प्रसार माध्यमाव्दारे बातमी/जाहिरात देण्यात यावी. पुरस्कार निवड समितीत खालील सदस्य असावेत.

१) श्री. वसंत मून २) डॉ. गंगाधर पानतावणे ३) प्रा. रावसाहेब कसबे ४) प्रा.बा.ह. कल्याणकर ५) प्रा. अरुणा लोखंडे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासाठी मानद समन्वक पदासाठी सेवानिवृत्त प्राध्यपक डॉ. गंगाधर पानतावणे डॉ.ल.बा. रायमाने, प्रो.प्र.ई. सोनकांबळे डॉ. गडद यांच्या पैकी एका मान्यवराचे नांव प्रशासनातर्फे कर्तव्य व सवलती खालील प्रमाणे असाव्यात.

१) केंद्राच्या दैनंदिन व्यवस्थापन प्रमुख व सल्लागार म्हणुन काम पाहाणे.

२) केंद्रास भेट देणाऱ्यांना माहिती/मार्गदर्शन करणे केंद्राच्या उद्दीष्टपुर्तीसाठी उपक्रमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी समन्वयकाची राहिल. त्यांनी केलेल्या सुचनांना मनपाने प्राधान्य दयावे परंतु त्यांचा सल्ला/सुचना मान्य करणे मनपा प्रशासनावर बंधनकारक असणार नाही. त्यांनी मनपा प्रकल्प संचालक ग्रंथापाल व लिपीकाची मदत घ्यावी.

३) समन्वयकास स्थानिक प्रवास भत्ता व मानधन असे एकुण रुपये. ५०००/- दरमहा देण्यांत यावे. त्यांना मनपा कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी/ सवलती देय राहणार नाहीत.

४) समन्वयकास संशोधन केंद्रात बसण्यासाठी स्वतंत्र कक्ष, दुरध्वनी, फर्निचर व स्टेशनरी उपलब्ध करुन द्यावी.

५) संशोधन केंद्राच्या कामासाठी मनपाने खर्चाने भारतात कोठेही जाण्याचे मुभा असेल परंतु अशा प्रस्तावास त्यांनी मा. आयुक्तांचा लेखी मान्यता घेणे बंधनकारक असेल त्यांना वर्ग एक अधिकाऱ्यांस देण्यांत येणाऱ्या/सुविधा देण्यांत याव्यात तसेच रुपये ३००/- दरमहा पेटी कॅश केंद्राच्या किरकोळ खर्चासाठी व अतिथी भत्ता म्हणुन खर्चाची देयके सादर केल्यावर देण्यात यावा.

६) मानद समन्वयकाची नियुक्ती प्रथम एक वर्ष कालावधीची असेल मुदत वाढ देण्यांचा आधिकार मा. आयुक्तांना असेल. तथापि कोणतीही लेखी/तोंडी सुचना न देता सदर नियुक्ती मुदती पुर्वी रद्द करणे बाबतचा अधिकार मनपा आयुक्तांना राहील. समन्वयकास मनपाची बदनामी होईल अशी जाहिर टिका करता येणार नाही अथवा प्रसार माध्यमांना मुलाखत देता येणार नाही.

७) समन्वयकाने प्रकाशित केलेल्या लेखात, दिलेल्या मुलाखातीतील वक्तव्यासाठी वादग्रस्त भाषणासाठी आणि त्यातुन निर्माण होणाऱ्या कायदेशीर बाबीसाठी ते स्वत:जबाबदार असतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या सभासदासाठी खालील प्रमाणे नियम राहतील.

१) सभासदांनी सभासद होतांना अनामत रक्कम रु. २००/- प्रवेश फी रु. ५०/- भरल्यास एकावेळी एक पुस्तक मिळु शकेल, मासिक सदस्यता शुल्क रु. पंचवीस वार्षिक सदस्यता शुल्क रु. २५०/- राहिल.

२) एका सभासदास फक्त पाच (पाच) पुस्तके मिळु शकतील त्यासाठी अनामत व वर्गणी त्यापटीत भरावी लागेल.

३) काही विशिष्ट पुस्तकांसाठी अतिरिक्त अनामत रक्कम घेण्याचा अधिकार ग्रंथपाल यांना असुन सभासदांनी रु. १००/- पेक्षा अधिक किंमतीचे पुस्तक किंमतीच्या दुप्पट रक्कम भरण्याशिवाय मिळणार नाही.
सभासदास मासिक वर्गणी ही, कार्डावर पुस्तक न घेतले तरी देखील भरावीच लागेल.

४) सभासदास मासिक वर्गणी ही, कार्डावर पुस्तक न घेतले तरी देखील भरावीच लागेल.

५) वर्गणी दरमहा १० तारखेपर्यंन्त जमा करावी अन्यथा पुर्व सुचित न करता सभासदत्व रद्द करुन अनामत रक्कम जप्त केली जाईल.

६) महिन्याच्या कोणत्याही तारखेस सभासदतत्व सुरु केल्यास त्या महिन्याची पुर्ण वर्गणी द्यावी लागेल.

७)सभासदत्व एक वर्षापुरतेच मर्यादित राहिल दरवर्षी (एप्रिलमध्ये) सभासदत्वाचे नुतनीकरण करणे आवश्यक राहिल.

८) सभासदत्व (कारण न सांगता देखील) नाकारण्याचा अधिकार उप आयुक्त मनपा औरंगाबाद यांनी राखुन ठेवलेला आहे.

९) राजपत्रित अधिकारी वर्गाशिवाय शासकिय निमशासकिय मंडळे औरंगाबाद मनपाचे कायमस्वरुपी व्दियीय/ तृतीय श्रेणीतील कर्मचारी वर्ग यांना घेतलेली हमी ग्रंथपाल यांनी प्रमाणित केल्यास अधिकृत राहील. याबाबत अधिकार ग्रंथपाल यांना राहिल.

१०) सभासदांनी लेखी अर्ज दिल्यास सभासदत्व स्थगित काळाची वर्गणी आकारली जाणार नाही. सदस्यत्व फक्त चालु आर्थिक वर्ष (एप्रिल ते मार्च) अखेर पर्यन्तच स्थगित ठेवता येईल.

११) सभासदत्व रद्य करावयाचे असल्यास अनामत रक्कमेच्या मुळ पावतीसह १५ दिवस अगोदर लेखी अर्ज कराव, पावती शिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१२) सभासदत्व रद्द करण्यापुर्वी सभसदाने वर्गणी, विलंब शुल्क, पुस्तक व तिकीट/कार्ड प्रथम जमा करणे बंधनकारक राहील.

१३) पुस्तके किंवा मासिक संदर्भ ग्रंथ ग्रंथलयाबाहेर दिले जाणार नाही. ती ग्रंथालयात वाचवयास मिळतील.

१४) सभासदाचे तिकीट हरवल्यास त्याची दुप्पट किंमत करावी लागेल. न दिल्यास अनामत रक्कम जप्त करुन उर्वरित रक्कम वसुलीसाठी महानगरपालिका अधिनियम अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

१५) सभासदाचे तिकीट हरवल्यास त्याचा दुरुपयोग करुन त्यावर इतरांनी ग्रंथ नेता तरी त्याची जबाबदारी माझ्यावर राहिल या अटीवर दुसरे तिकीट एक महिन्या नंतर वीस रुपये भरुन मिळु शकेल.

१६) सभासदांनी पुस्तके, मासिके जपुन वापरावीत चित्रे, नकाशे प्रतिलिपीने काढु नयेत, पुस्तक फाटक्या किंवा खराब अवस्थेत तसेच रेषा मारलेल्या घडया पडलेल्या असवस्थेत परत केल्यास त्याची जबाबदारी सभासदावर राहिल व पुस्तकाची दुप्पट किंमत वसुल करण्यात येईल. सदर वसुलीचे अधिकार ग्रंथपालांना असतील.

१७) ग्रंथलयात पुस्तकाखेरीज अनावश्यक वस्तु बॅगज, पाळीव प्राणी आणु नयेत, खाद्य पदार्थ खाणे, धुम्रपान करणे, कोणत्याही प्रकारची नशा करणे अथवा करुन येणे चघळणे,आवाज करणे, ओरडणे या सर्वास सक्त मनाई राहिल.

१८) पुस्तक घेतांना मुळातच ते फाटके अथवा खराब असल्यास ते घेतेवेळी ग्रंथपालांच्या निदर्शनास आणुन द्यावे व पुस्तकावर स्वाक्षरी घ्यावी पुस्तकातील डिझाईन मोजुन/घ्यावीत, नसता फाटल्याची जबाबदारी सभासदावर राहिल., त्याबद्दल दुप्पट किंमत वसुल केली जाईल.

१९) वरिल सर्व नियमासह इतर वादातील प्रश्नाबद्दल आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचा निर्णय अखेरचा व सर्वांना बंधनकारक राहिल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रासाठी वरिल प्रमाणे उद्दीष्टे उपक्रम व सभासदासाठी नियम व अटी संबंधी ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो. वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. १३१/१** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो. की, सर्वे. क्र. ४४, नगर भुमापन क्र. १६३१६ व १६३१६/१ शिट नं. २७४/२७४/ए/१८३ साईट क्र. २८९,२९९ व ३०० या मिळकती बाबत मिळकत धारकांनी दिनांक २१.४.१९९९ रोजी व दिनांक ४.९.१९९९ रोजी व वेळोवेळी नोटीस

यु/एस १२७,ऑफ महाराष्ट्र रिजनल ॲन्ड टाऊन प्लॅनिंग ॲक्ट १९६६ नुसार जमीन खरेदी सुचना दिलेली आहेत तथापी महानगरपालिका प्रशासनाकडुन कुठलीही कायदेशीर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

सुचक : श्री. सुदाम सोनवणे
अनुमोदक : श्री. नंदकुमार फुलारी
दिनांक : १४.८.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स. न. ४४ नगर भुमापन क्रमांक १६३१६ व १६३१६/१ शिट नं. २७४/२७४/ए/१८३ साईट क्र. २८९,२९९ व ३०० या मिळकतीबाबत दि. २१.४.१९९९ व ४.९.१९९९ रोजी महाराष्ट्र रिजनल ॲन्ड टाऊन प्लॅनिंग ॲक्ट १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी बाबत सुचना दिलेल्या असल्यामुळे वरिल मिळकती बाबत पुढील कायदेशिर कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३२/२** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कु भुषण शरद राजगुरु वय ११ वर्ष रा. शांतीपुरा या मुलास सिकलसलेस ॲानिमीया आजार झाला असुन सदर मुलास आई वडीस नसुन त्या मुलाचा सांभाळव्याची आजी करत आहे. सदर मुलाची आजी ही निराधार असल्याने नातुवरिल आजाराचा उपचार ते करु शकत नाही. सदरील मुलाचा डॉ. तपासणी व शस्त्रक्रिया करण्यासाठी मुंबई सायन हॉस्पीटल या ठिकाणी पन्नास हजार रु. ५०,०००/- रुपये खर्च अपेक्षित आहे.

करिता सदरील मुलाचा उपचारार्थ नगरसेवक स्वेच्छा निधीतुन विशेष बाब म्हणुन वरिल धनादेश देण्यात यावे ही विनंती.

**ठराव** :

प्रस्तावत दर्शविल्याप्रमाणे कु. भुषण शरद राजगुरु रा. शांतीपुरा यांनी सिकलसलेस ॲानिमीया आजार असुन औषधोपचारासाठी नगरसेवक स्वेच्छा निधीतुन रु. २५,०००/- आर्थिक सहाय्य करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जण गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २३.१०.२००० रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त. सोमवार दिनांक २३ ऑक्टोंबर २००० रोजी सकाळी ११.३० वाजता गणपुर्ती अभावी तहकुब करण्यात आलेली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा मा. महापौर डॉ. भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे दुपारी ३.०० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग यांचेसह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स. स.श्री. अशरफ मोतीवाला
२) स. स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
३) स. स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४) स. स.श्री. ठकुजी रामसिंग वाणी
५) स. स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स. स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स. स.श्री. शे. इलियास किरमानी शे. उमर
८) स. स.श्री. औताउे रावसाहेब ममतु
९) स. स.सौ. शकुंतला सांडुजी इंगळे
१०) स. स.श्री. रगडे भगवान दगडुजी
११) स. स.श्री. शिंदे राजु रामराव
१२) स. स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१३) स. स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४) स. स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१५) स. स.सौ. धायतिलक लिलावती बाळासाहेब
१६) स. स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१७) स. स.श्रीमती. किवळेकर जयश्री सारंग
१८) स. स.श्री. शे. शकील पटेल शे. बुढण पटेल
१९) स. स.श्रीमती. मानकापे पार्वती लहानु
२०) स. स.सौ. साधना गणेश सुरडकर
२१) स. स.सौ. विजया किशोर राहटकर
२२) स. स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२३) स. स.सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२४) स. स.श्री. जबिंदा दलबिरसिंग
२५) स. स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२६) स. स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
२७) स. स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
२८) स. स.सौ. रशिदा बेगम गफ्फ़र यारखान
२९) स. स.श्री. वडागळे सुनिल बुथवेल
३०) स. स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३१) स. स.श्री. नासेरखान सरदार खान
३२) स. स.श्री. थोरात दत्तात्रय उर्फ बाळासाहेब

३३) स. स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३४) स. स.सौ. नुसरत बानो फिरोज खान
३५) स. स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
३६) स. स.सौ. मोरे जयश्री. कुमारराव
३७) स. स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
३८) स. स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
३९) स. स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
४०) स. स.श्री. अ. कदिर मौलाना सय्यद
४१) स. स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर,
४२) स. स.सौ. संगिता बाळु मैंद
४३) स. स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
४४) स. स.श्री. ओक जयवंत केशवराव
४५) स. स.श्री. स. सलिम स. युसुफ
४६) स. स.श्री. तकीहसन खान कासिमहसन खान
४७) स. स.श्री. गाजी सादोद्दीन गाजी जहिर अहेमद
४८) स. स.श्री. मिर हिदाय अली मिर बसालत अली
४९) स. स.सौ. नफीसुन्नीसा बेगम हबीब खान
५०) स. स.श्री. शे. ईसाक जैनोद्दीन शे.
५१) स. स.श्री. अफसर खान यासीन खान
५२) स. स.श्री. लकडे भरत श्रीपती
५३) स. स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
५४) स. स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
५५) स. स.श्री. तुळशीबागवाले किशोर
५६) स. स.श्री. जगदिश कन्हैय्यालाल सिध्द
५७) स. स.सौ. बबीता सुभाष कागडा
५८) स. स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज
५९) स. स.सौ. निखत परवीन ऐजाज झैदी

## *स्विकृती सदस्य*

१) स. स.श्री. घडामोडे भगवान देविदास
२) स. स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
३) स. स.सौ. सलमा बानो मिर मो. अली

**विषय क्र. १३३/१** :

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना बोनस देणे बाबत विचार विनिमय करणे.

संवाद :

मा. महापौर : कर्मचाऱ्यांना बोनस देण्यासाठी विशेष सभेचे आयोजन केलेले आहे सकाळी सभा सुरु करण्यात आली होती. परंतु कोरम अभावि सभा आता ३.००

वाजता बोलवली आहे. ज्या ज्या स. सदस्यांना या संदर्भात सुचना करावयाच्या आहेत त्या कराव्यात.

श्री. रतनकुमार पंडागळे : शहराचे त्याच बरोबर महानगरपालिकेचे अस्तित्व टिकवावे या दृष्टीकोणातुन शहरातील स्वच्छता झाली पाहिजे. ती होण्याच्या दृष्टीने काही कर्मचाऱ्यांच्या मागण्या असतात त्या मान्य करणे संदर्भात १२ तारखेला मोर्चा काढण्यात आला व शासनाचे काही आदेश येतात काय म्हणुन वाट पाहावी लागली. आपली महानगरपालिका सक्षम असुन कर्मचाऱ्यांना आपण बोनस देऊ शकतो. व तसा निर्णय सभागृहाचे आदेश घ्यावा. आपल्याला माहित असेल शासनाचे आदेश असतांना कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग तात्काळ लागु करण्यात आला औरंगाबाद जिल्हयामध्ये असलेल्या वैजापुर नगरपरिषदेने स्वत:चे अस्तित्व कायम राहावे यासाठी कर्मचाऱ्यांना ३५ दिवसाचा बोनस देण्याचा विचार केलेला आहे. त्याच प्रमाणे आपल्याही कर्मचाऱ्यांना बोनस देण्यात यावा. नगरपरिषदा सुध्दा शासन अधिपत्याखाली चालते. तरी सुध्दा त्यांनी निर्णय घेतलेला आहे. जे कामगार काम करतात. त्यांच्या कामाचा मोबदला, बक्षीस रुपाने दिपावली निमित्त बोनस आपण देतो. कर्मचाऱ्यांना बोनस देण्या बाबत सभागृहाने सखोल विचार करुन निर्णय घ्यावा. अशी मी सुचना करतो.

श्री. किशनचंद तनवाणी : कर्मचाऱ्यांना बोनस देण्या संदर्भात बैठक बोलवली परंतु या संदर्भात प्रशासनाची काय भुमिका आहे ते जाणुन घ्यावे तसा खुलासा करण्यात यावा.

मा. महापौर : मा. आयुक्त या संदर्भात खुलासा करत आहेत.

मा. आयुक्त : कर्मचाऱ्यांना बोनस देण्या संदर्भात विशेष सर्वसाधारण सभा आयेजित करण्यात आलेली आहे. जवळपास १९८६ पासुन कम्रचाऱ्यांना बोनस देण्याची प्रथा आहे. आतापर्यन्त ३५ किंवा ३६ दिवसांचा बोनस कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला आहे. ही वस्तु स्थिती आहे. परंतु मा. महापौर व मा. सभागृह यांना कायदेशीर बाबी अवगत करुन देण्याची नैतिक जबाबदारी माझी असल्याने मी खुलासा करु इच्छितो आहे. आणि विनम्रपणे सभागृहासमोर मला विशद करावशे वाटते की, कायदयानुसार बरोबर ही काही कर्मचाऱ्यांचे हक्काची बाब नाही. कायदयाप्रमाणे बोनस देण्यात यावा. असा कुठेही उल्लेख नाही. परंतु आता पर्यन्त बोनस देण्यात आला व या महानगरपालिकामध्ये बोनस देण्यात आलेला आहे. १९९८ साली शासनाने एक परिपत्रक काढले व महानगरपालिकांनी कर्मचाऱ्यांना बोनस कशा पध्दतीने दयावा. या संबंधीचे निवेदन केलेले आहे. त्यात असे निर्देश दिले आहे की, महानगरपालिकेला किती रक्कमेचे देणे आहे. आर्थिक परिस्थिती कशी आहे. याचा सारासार अभ्यास करुन बोनस देण्या बाबत निर्णय घ्यावा आपल्या महानगरपालिकेची आर्थिक पारिस्थिती काय आहे. हे माझ्या पेक्षा आपणांस सर्वांना माहित आहे. या महानगरपालिकेला एकुण १५० कोटी रुपये देणे आहे. त्यापैकी १०४ कोटी र. एम.एस.ई.बी . ला दयावयाचे आहे. जे दर महिन्याला बिल महानगरपालिकेला येते ते जवळपास २ कोटी ३० लाख रुपयाचे असते. दर महिन्याला ७५ लाख रुपये एम.एस.ई.बी. ला भरावे असा निर्णय घेतलेला आहे. त्याप्रमाणे भरणा दर महिन्याला होत आहे. सर्वांना मी माहिती देऊ इच्छितो की, पुन्हा एम.एस.ई.बी. ने पैसे

भरण्या संदर्भात नोटिस दिलेली आहे. व ५ नोव्हेंबर पर्यंन्त जर थकबाकी भरणा केली नाही तर विज पुरवठा खंडीत करण्याची नोटीस दिलेली आहे एका बाजुने आपण कर्मचाऱ्याचे हित पाहण्यासाठी विचार करणार आहात त्यांचे हित जोपासले पाहिजे हे कुणालाही तत्वतः मान्य आहे परंतु आपल्या आर्थिक परिस्थिती नुसार त्यांना बोनस देणे परवडणारे आहे काय याचा गांभीयाने विचार करणे गरजेचे आहे. मागील वर्षी कर्मचाऱ्यांना ३० दिवसाचा बोनस दिला व जे अस्थायी कर्मचारी आहे त्यांना १०००/- रुपये प्रमाणे बोनस दिलेला आहे. यावर्षी संघटनेच्या मागण्या संदर्भात स. सदस्य श्री. पंडागळे मा. महानपौर यांनी सुचना केलेल्याच आहेत मला या संदर्भात थोडक्यात एवढेच सांगावयाचे आहे की, जो निर्णय आपणांस घ्यावयाचा आहे. तो शासनाच्या निर्णयास अधिन राहुनच घ्याव लागेल माझ्या मते कर्मचाऱ्यांना बोनस देणे आपल्या महानगरपालिकेस परवडणारे नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : कर्मचाऱ्यांना बोनस देण्या संदर्भात सभेत आयोजित केली आहे या अगोदर कधी सभा बोलावली नाही. प्रशासनाच्या वतीने मा. आयुक्तांनी खुलासा केलेला आहे. महानगरपालिकेची परिस्थिती खराब आहे. विद्युत मंडळाचे पैसे दयावयाचे आहे व त्यामुळे कर्मचाऱ्यांना बोनस देणे परवडणारे नाही असा खुलासा प्रशासनाने केलेलाआहे. परंतु ६ महिण्यापासुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवण्याचे संदर्भात अत्यंत पोटतिडकिने सर्वच स. सदस्यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केलेले होते. परंतु जाणीवपुर्वक किंवा कळत न कळत प्रशासनाचा वसुली संदर्भात कानाडोळा झालेला आहे असे वाटते. मालमत्ताकर पाणी पट्टीकर, बाबत कित्येक केसेस न्यालयात पडलेल्या आहे त्यामुळे उत्पन्न कमी येते. ही सर्व जबाबदारी कर्मचारी व सभागृहाची समजुन प्रशासनाची आहे असे मी मानतो ही नैतिक जबाबदारी समजुन प्रशासन का कार्यवाही करत नाही जी नैतिक जबाबदारी आहे. ती टाळली गेली. शेवटी कर्मचारी हे आलेच आहे आता प्रशासन सांगते की, आर्थिक परिस्थितीनुसार कर्मचाऱ्यांना बोनस देणे परवडणारे नाही. हे धोरण योग्य होणार नाही. कर्मचाऱ्यांना बोनस दयावाच लागेल.१९८५-८६ पासुन शासन बोनस देत आलेले आहे. आता शासनाचा जी.आर. आला नसेल परंतु गेल्या वेळेस कर्मचाऱ्यांना बोनस देण्यात आलेला आहे. ५ वा वेतन आयोग लागु केला तो या महानगरपालिकेला ज्या पध्दतीने देता येईल. त्या नुसार दिला आहे सर्व पदाधिकारी व संघटनेच्या लोकांना विचारात घेऊन ५ वा वेतन लागु केलेला आहे मा. आयुक्तांनी जो खुलासा केला त्यास मी मानणारा नसुन आर्थिक उत्पन्न कसे वाढवता येईल याकडे प्रशासनाने प्रयत्न करावे व उत्पन्न असेल तर अशा वेळी सभागृहाला चांगल्या प्रकारे निर्णय घेता येतात. बोनस देण्याबाबतचा एकमत झालेले असुन कर्मचाऱ्यांना बोनस देण्या बाबतचा निर्णय व्हावा शासनाचा निर्णय होईल म्हणुन २ दिवस आपण वाट पाहिली असुन शासन निर्णयनुसार निर्णय घेणे बरोबर होणार नाही. दिवाळी जवळ आलेली आहे. कर्मचाऱ्यांना बोनस देण्याबाबत आजच निर्णय घेण्यात यावा.

श्री. भगवान घडामोडे : कर्मचाऱ्यांच्याच बाबतीत आर्थिक परिस्थिती सुचना प्रशासन मांडते. परंतु प्रशासनाने वेळीच कार्यवाही केली पाहिजे. महापालिकेचे उत्पन्न काय आहे. कशामुळे उत्पन्न वाढु शकेल याचा विचार अगोदर केला पाहिजे. हे

सभागृह सर्वाचे न्यायासाठी आहे. कामागारांचे प्रश्न सोडवले गेले पाहिजे. कामगार हे सर्व वार्डात सकाळ पासुन सध्याकाळ पर्यन्त साफसफाई करतात शहर स्वच्छ ठेवतात. सर्व माता भगिनी महानगरपालिका आवारात बोनस मिळण्यासाठी वाट पहात आहे. मागील वर्षी बोनस दिला त्यावेळेस महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती काय होती याचा प्रशासनाने खुलासा करावा. मागच्या वेळेसचे बजेट किती वसुली किती, खर्च किती, या वर्षाचे बजेट, खर्च,उत्पन्न वाढवुन आहे. माहिती दयावी माझ्यामते कर्मचाऱ्यांच बाबतीत अन्याय होतो. मागील वेळेस सुध्दा कर्मचाऱ्यांना बोनस देण्याचे वेळी एम.एस.ई.बी. कारण दाखविले होते. आजही प्रशासन तेच कारण दावित आहे. कर्मचाऱ्यांच्याच सभागृहाने कर्मचाऱ्यांना बोनस देण्याबाबत निर्णय व्हावा व कर्मचाऱ्यांना बोनस मिळणे जरुरी आहे. तरच त्यांची अपेक्षा दुर होईल व वसुली मध्ये जे कर्मचारी असतील ते जर चांगजे काम करत नसतील तर प्रशासनाने तशी कार्यवाही करावी संक्तीने वसुली करावयास लावावे व उत्पन्न कसे वाढेल हे प्रशासनाने पहावे परंतु कर्मचाऱ्यांची बोनस बाबतची जी मागणी आहे ती मान्य करावी.

श्री. अंबादास दानवे : महानगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यादांच बोनस देण्या संदर्भात बैठक आयोजित करावी लागली. ही महानगरपालिका जवळपास १८ वर्षापासुन अस्तित्वात आहे. प्रशासनाने खुलासा केला की, आर्थिक परिस्थिती चांगली नाही. याच वर्षी परिस्थिती चांगली नाही काय ? या अगोदर ही महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. असे असतांना सुध्दा सर्वसाधारण सभा बोलवण्याची गरज पडली नाही. व कर्मचाऱ्यांना बोनस वाटप करण्यात आला प्रशासनाने खुलासा केला की, शासनाने निर्देश दिलेले नाही व आर्थिक परिस्थितीत सुध्दा चांगली नाही म्हणुन बोनस देणे परवडणारे नाही. माझ्यामते शासनाचे निर्देश असतांना (८५ ते ९५ पर्यन्त शासनाने ठरवुन दिलेले बोनस व महानगरपालिकेतर्फे वाटप करण्यात आलेले बोनसाची माहिती वाचुन दाखवतात) सुध्दा महानगरपालिका तर्फे वाढीव (जास्तीचा) बोनस वाटप करण्यात आलेला आहे. जो जास्तीचा बोनस देण्यात आला तो सभागृहाच्या मंजुरीने दिलेला आहे. कारण कर्मचाऱ्यांचे हिताचे काही प्रश्न असतील तर सभागृह निर्णय घेवु शकते. प्रशासनाने जी भुमिका मांडली ती खरोखरच अन्यायकारक असेल तर आम्ही त्याचा निषेध करतो. आताच काही स. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला की, वसुली होत नाही म्हणुन ही परिस्थिती निर्माण होते हे बरोबर आहे. दिपावली जवळ आलेली आहे. खरे तर आतापर्यन्त कर्मचाऱ्यांना बोनस वाटप व्हावयास पाहिजे होता. उदा. घ्यावयाचे झाल्यास वैजापुर नगरपरिषदेने कर्मचाऱ्यांना ३५ दिवसांचा बोनस जाहिर केला व ज्यांचे दैनिक वेतन रुपये ४० होता अशा कर्मचाऱ्यांना ५५ रु दैनिक वेतनात वाढ करण्याच निर्णय घेतलेला आहे. याचा विचार करता महानगरपालिकेने बोनस देण्यास काहीच हरकत नाही दरवर्षी बजेट वाढवुन असते त्याप्रमाणे आर्थिक वसुलीत वाढ होते व त्यानुसार वसुली होते मागील वर्षाचा विचार करता या वर्षी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगलीच म्हणावी लागेल. कर्मचाऱ्यांप्रमाणे बालवाडी सेविका यांना सुध्दा इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे बोनस देण्यात यावा. मागील वर्षी प्रमाणे जो बोनस देण्यात आला

त्याचप्रमाणे याही वर्षी देण्यात यावा असे मी सभागृहाच्या वतीने सुचना करतो. कर्मचारी शहराची स्वच्छता ठेवतात याची जाणीव ठेवावी.

श्री. जयवंत ओक : कर्मचाऱ्यांना बोनस देण्याबाबत विशेष बैठक बोलवली. बोनस देण्याबाबत माझा विरोध नाही परंतु वृत्तपत्रात घोषणाबाजी होतात. एकच स. सदस्य बोनस देण्याबाबतचा निर्णय घेणार नाही. सर्व स. सदस्यांनी मान्यता दिल्यावरच मंजुर होणार आहे शासनाचे आदेश काय आहे बोनस देता येतो का ? याचा विचार व्हावा.

श्री. कोकाटे काशिनाथ : स. सदस्यांनी विचारपुर्वक सुचना मांडलेल्या असुन महानगरपालिका आस्तित्वात असतांना सुध्दा बोनस देण्या बाबत सर्वसाधारण सभा आयोजित करावी लागली. प्रशासनाने मत व्यक्त केले की, आर्थिक परिस्थिती चांगली नाही म्हणुन बोनस देणे परवडणारे नाही. परंतु वसुली संदर्भात एक विशेष बैठक बोलवावी व वसुली का होत नाही याबाबत विचार मांडण्यात येतील त्यानुसार कार्यवाही करावी.

(यावेळी सभागृहास स. सदस्य आपआपले मत मांडत असतांना माईक खराब झालेला असतो स. सदस्य काय बोलत आहे हे स्पष्ट ऐकावयास येत नव्हते. त्यामुळे सभागृहाने या संबंधी नाराची व्यक्त केली. व माईक दुरुस्ती करण्याबाबत मा. महापौर यांचेकडे सुचना केली)

मा. महापौर : माईक दुरुस्ती करण्याबाबत या अगोदरच सुचना दिलेल्या होत्या जवळपास ३ महिण्यापासुन माईकचा प्रॉब्लेम आहे. जे कर्मचारी येथे काम करतात त्यांचेवर निलंबणाची कार्यवाही करण्यात यावी.

(याच वेळी बरेच स. सदस्यांची मा. महापौर यांचे डायस जवळ जाऊन कर्मचाऱ्यांना निलंबीत करु नये माईक बाबत का कार्यवाही होत नाही याची चौकशीचे आदेश दयावे अशी मागणी करतात तर काही सदस्य अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी अशी मागणी करतात मोठमोठयाने बोलणे चालु असते काहीही ऐकावयास येत नाही.)

मा. महापौर : ठिक आहे सर्व स. सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे. स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता निलंबाची कार्यवाही करण्याचे आदेश मागे घेण्यात येतात व याबाबत तीन महिन्यापासुन सभागृहात सुचना दिल्या असुन सुध्दा माईक दुरुस्तीची कार्यवाही केली नाही. आयुक्तांना सुचना करतो की, याबाबतची संपुर्ण चौकशी करुन कार्यवाही करावी. यापुढे सभा चालु असतांना माईक व्यवस्थित असावयास पाहिजे. याची प्रशासनाने नोंद घ्यावी. आताच बोनस संदर्भात स. सभासदांना चर्चा केली आपआपल्या सुचना मांडल्या कर्मचाऱ्याना बोनस मिळण्यासाठी संघटने तर्फे मोर्चा काढण्यात आलेला होता. तसे निवेदन ही सर्व पदाधिकारी मा. आयुक्त यांना दिलेले आहे. प्रत्येक वर्षी बोनस देण्या संदर्भात शासन परिपत्रक येत असते ते येईल म्हणुन आतापर्यन्त वाट पाहिली मध्यंतरीत काळात म्हणजे १२ तारखेपासुन आज पर्यन्त मा. आयुक्त यांनी मंत्रालय व इतर महानगरपालिकामध्ये बोनस देण्याबाबतची काय स्थिती आहे याबाबत माहिती जमा केली व प्रशासनाने याबाबत काय मत आहे हे पण आपण ऐकुण घेतलेले आहे परंतु दिवाळीचा सण असल्याने व सर्व आपलेच कर्मचारी असुन सकाळी ५ वाजेपासुन काम करतात शहर स्वच्छ करतात. त्यांनी दिवाळीचा सण चांगल्या प्रकारे साजरा करावा म्हणुन सभागृहाच्या भावना लक्षात घेता मागील वर्षी ज्या ज्या

कर्मचाऱ्यांना बोनस देण्यात आला होता त्या प्रमाणे वर्षी ३० दिवसाचा बोनस जाहिर करण्यात येत असुन जे कर्मचारी तात्पुरत्या स्वरुपात (अस्थायी) आहेत अशा सर्वच कर्मचाऱ्यांना १०००/- रुपये बोनस जाहिर करण्यात येत आहे. शासनाचे परिपत्रक येईन न येईल ती अपेक्षा न बाळगता आपली महानगरपालिका सक्षम आहे बोनस देण्याबाबत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी.

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार बोनस वाटपाबाबत शासनाचे परिपत्रक प्राप्त झाले नसले तरी महानगरपालिका ही एक स्वायत्त संस्था असल्यामुळे गतवर्षी ज्या प्रमाणत बोनसचे वाटप करण्यात आले होते. त्याच प्रमाणात याही वर्षी स्थायी कर्मचारी/कामगार यांना ३० दिवसांचा बोनस वाटप करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या शिवाय या महानगरपालिकेमध्ये जे कर्मचारी/कामागार अस्थायी पदावर काम करत आहेत अशा कर्मचारी/कामागारांना रु. १०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) याप्रमाणे बोनस स्वरुपात रक्कम आदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर ठरावास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

सवांद :

श्री. अंबादास दानवे : बोनसच्या बाबतीत विषय संपलेला असुन ही विशेष सभा असतांना सुध्दा शासनाकडुन एक अध्यादेश प्राप्त झाला त्या संदर्भात मी बोलु इच्छितो की, शासनाकडुन एक अध्यादेश काढण्यात आलेला आहे. कर्मचाऱ्यांच्या बदल्या पदोन्नती व नोकर भरती. शासनाचे आदेश नसतांना सुध्दा आपण बोनस देण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. तो कामगारांच्या हितासाठी. पदोन्नती व नोकर भरती संदर्भात जो आदेश आहे. तो या महानगरपालिका स्थानिक संस्थावर अन्यायकारक आहे. वर्ग-१,२,३ च्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करावयाच्या असेल तर त्यास शासनाची मान्यता घ्यावी लागेल असे त्या आदेशात आहे आता पर्यन्त अशा प्रकारची पध्दत जिल्हापरिषद जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त म्हणजेच महसुल विभागामध्ये होती. महानगरपालिकेला या संदर्भात वर्ग- ३ साठी परवानगी घेण्याची काहीच आवश्यकता नाही असे मला वाटते. या सर्वांसाठी जर शासनाची मंजुरी घ्यावयाची असेल तर खुप वेळ लागेल. काल एक बातमी आली की, $१^{१/२}$ (दीड) लाख संचिका मंत्रालयामध्ये मंजुरी विना पडुन आहे महाराष्ट्रातील सर्वमहानगरपालिका नगरपालिका, नगरपरिषदातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात संचिका नगरविकास विभागाकडे गेल्यास नक्कीच दीड लाख संचिका ऐवजी ३ लाख संचिका होतील, शासनाचा जो आदेश आला त्यास सर्वांनीच विरोध दर्शवावा कारण महानगरपालिकेच्या कामकाजावर घाला घालणारा हा अध्यादेश आहे तो निर्णय बदलावा व यातुन स्थानिक संस्था वगळाव्या तसे शासनास एक पत्र पाठवुन विनंती करावी अशी मी सभागृहाच्या वतीने सुचना करतो.

मा. महापौर : घटना दुरुस्ती नुसार स्थानिक स्वराज्य संस्था सक्षम व्हाव्यास व स्थानिक स्वराज्य संस्थेने आपआपल्या क्षेत्रात सक्षमपणे काम करावे तसे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थेस दिलेले आहे मागील आठवडयामध्ये शासनाचे एक

परिपत्रक आलेले आहे की, या विभागातुन दुसऱ्या विभागात बदली करावयाची असेल तर संबंधीत मंत्री महोदयाची परवानगी लागेल. दुसरे परिपत्रक आले पदोन्नती संदर्भात जर एखादया पदाची जागा रिक्त असेल व पदोन्नतीने भरती करावयाचे असेल तर शासनाची परवानगीनेच ते पद भरण्यात यावे मंत्र्यांची परवानगी घेण्यास वेळ लागेल म्हणुन हे सभागृह या या निर्णयास येते आहे की, महानगरपालिका ही स्थानिक संस्था आहे, सक्षम आहे व कर्मचाऱ्यांच्या बदल्या, पदोन्नती व नवीन भरती या संदर्भात काढलेल्या आदेशातुन स्थानिक स्वराज्य संस्थेस वगळण्यात यावे अशा प्रकारचे शासनास पाठयण्यात येईल. या संबंधीचे सर्व अधिकार महानगरपालिकेस आसावेत असे पत्रात नमुद करण्यात येईल.

याच बरोबर "जण,गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २०.११.२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त. सोमवार दिनांक २०.११.२००० रोजी सकाळी ११.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात मा. महापौर डॉ. श्री. भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली सर्व साधारण सभेची "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली या सभेस महानगरपालिकातील अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय नगर सेवक उपस्थित होते.**

१) स.स. श्री. अशरफ मोतीवाला
२) स.स. श्री. अंबादास एकनाथराव दानवे
३) स.स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४) स.स. श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स. श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स. श्रीमती. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स. श्री. इलियास किरमानी शे. उमर
८) स.स. श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स. श्री. रगडे भगवान दगडुजी
१०) स.स. श्री. शिंदे राजु रामराव
११) स.स. श्री. कावडे साहेबराव राणुबा
१२) स.स. श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१३) स.स. सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१४) स.स. सौ. धायतिलक लिलावती बाळासाहेब
१५) स.स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१६) स.स. सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१७) स.स. श्रीमती. किवळेकर जयश्री सारंग
१८) स.स. सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१९) स.स. श्री. शेख शकिल शेख बुढन पटेल
२०) स.स. श्रीमती. डॉ. आशा उत्तम बिनवडे
२१) स.स. श्रीमत. मानकापे पार्वती लहानु
२२) स.स. सौ. साधना गणेश सुरडकर
२३) स.स. सौ. विजया किशोर राहाटकर
२४) स.स. श्री. सावंत मधुकर दामोधर
२५) स.स. श्री. जाबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२६) स.स. श्री. साळवे मानिक लक्ष्मण
२७) स.स. श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२८) स.स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिशन
२९) स.स. श्री. अय्युबखान सरदार खान
३०) स.स. श्री. अ. रशिद अ. सत्तार
३१) स.स. श्री. जैन विकास रतनलाल
३२) स.स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
३३) स.स. श्री. सिरसाठ संजय पांडुरंग

३४) स.स. श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३५) स.स. सौ. रशिदा बेगम गफ्फर यारखान
३६) स.स. श्री. वडागळे सुनिल बुथवेल
३७) स. स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३८) स.स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३९) स.स. श्री. नासेरखान सरदार खान
४०) स.स. श्री. थोरात दत्तात्रय ऊर्फ बाळासाहेब रामराव
४१) स.स. श्री. सोनवणे सुदाम रामरास
४२) स.स. सौ. खरात कुसुमबाई दौलत
४३) स.स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४४) स.स. सौ. नुसरत बानो फिरोजखान
४५) स.स. श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
४६) स.स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४७) स.स. सौ. मोरे जयश्री कुमारराव
४८) स.स. सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४९) स.स. श्री. सुरगोनिवार नारायण चंद्रय्या
५०) स.स. सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
५१) स.स. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
५२) स.स. श्री. अ. कदीर मौलाना सय्यद
५३) स.स. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
५४) स.स. श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५५) स.स. सौ. संगिता बाळु मैंद
५६) स.स. श्री. नासीरखान अ. रहेमान खान कुरैशी
५७) स.स. सौ. शाहीन जफर महमुद जफर
५८) स.स. सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५९) स.स. श्री. ओक जयवंत केशवराव
६०) स.स. श्री. स. सलीम स. युसुफ
६१) स.स. श्री. तकी हसनखान कासिम हसनखान
६२) स.स. श्री. गाजी सादोद्दीन गाजी जहीर
६३) स.स. श्री. मिर हिदायत अली मिर बसालत अली
६४) स.स. सौ. नफिसुन्नीसा बेगम हबीबखान
६५) स.स. श्री. शे. ईसाक जैनोद्दीन शेख
६६) स.स. श्री. अफसरखान यासीन खान
६७) स.स. सौ. सुलताना बेगम चाँदखॉ
६८) स.स. श्री. लकडे भरत श्रीपती
६९) स.स. श्री. शे. मुनाफ शे. यासीन
७०) स.स. श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान
७१) स.स. श्री. तुळशीबागवाले किशोर
७२) स.स. श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
७३) स.स. सौ. बबिता सुभाष कागडा
७४) स.स. श्री. स. अली सलामी स. मिरा सलामी
७५) स.स. श्री. तनवाणी किशनचंद लेखराज

७६) स.स. सौ. निखत परवीन ऐजाज झैदी

स्विकृती सदस्य

१) स.स. श्री. घडामोडे भगवान देविदास
२) स.स. श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
३) स.स. श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज
४) स.स. श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५) स.स. सौ. सलमा बानो मिर मो. अली

संवाद :

श्री. नंदकुमार घोडेल : अगोदर चर्चा घेण्यात यावी नंतर मंजुर करावेत

मा. महापौर : अगोदर विषय पत्रिकेवर चर्चा करुन निर्णय घेऊ नंतर चर्चा करण्यात येईल चर्चाच करत राहिले तर वेळ होईल विषय मंजुर होणार नाही.

श्री. अंबादास दानवे : मागील बैठकीत सुध्दा जनरल चर्चा न घेता सभा समाप्त झाली. आता चर्चा अगोदर व्हावी नंतर विषय पत्रिकार चर्चेनुसार निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेता अगोदर चर्चा करण्यात येते. करण्यासाठी ३ वाजेपर्यंन्त वेळ देण्यात येतो त्यानंतर विषय पत्रिकेवर चर्चा करण्यात येईल.

श्री. जयवंत ओक : नगरसेवकांचा स्वेच्छानिधी कसा व कोठे वापरणार यासंबंधीची सुचना मांडतो स्वेच्छानिधीतुन ड्रायव्हींग प्रशिक्षण तसेच संगणक प्रशिक्षण सुशिक्षित बेरोजगारांना देण्याचा आपण निर्णय घेतलेला असतांना कार्यवाही झालेली नाही तसेच विकास कामे जसे रस्ते, ड्रेनेज, पाणी लाईट इ. सुविधा स्वेच्छानिधीतुन होणेसाठी स. सदस्यांनी पत्र दिलेले आहे स्वेच्छानिधीतुन कामे व्हावीत व तसा सभागृहाने सुध्दा निर्णय घेतलेला आहे की स्वेच्छानिधीतुन विकास कामे करण्यात यावी परंतु अशा प्रकारच्या बऱ्याच फाईली प्रलंबीत आहेत व बऱ्याच संचिकेवर रिमार्कस येत आहेत डिसेंबर नंतर लॅप्स होतील. शहरात अनाधिकृत वसाहती आहेत डीनोटी फाईट एरिया आहे. अशा सर्व भागात नगरसेवकांनी विकास कामे करण्या बाबत जर पत्र दिलेले असेल तर त्यांचे स्वेच्छानिधीतुन ती कामे व्हावयास पाहिजे परंतु तशी कार्यवाही होत नाही. कधी विकास कामे करणार ? याचा खुलासा प्रशासनाने दयावा व ज्या संचिका मा. आयुक्त यांचेकडे पठुन आहेत त्याबाबत तात्काळ निर्णय घेण्याचे आदेश दयावेत. नागरिकांच्या गरजा पुरवल्या गेल्या पाहिजे. स्वेच्छानिधी मतदार संघात वापरता यावा.

श्रीमती. पार्वतीबाई मानकापे : सर्व स. नगरसेवकांचे एकमत झाले की, स्वेच्छानिधीतुन विकास कामे होण्याबाबत कार्यवाही झाली पाहिजे परंतु निर्णय झालेला असतांना सुध्दा स्वेच्छानिधीतुन विकास कामे करण्याचे प्रलंबित आहे. स्वेच्छानिधीतुन वार्डातील कामे होत नसतील तर स्वेच्छा कशासाठी ठेवला याचा खुलासा व्हावा, स्वेच्छानिधीतुन कामे करणे शक्य होत नसेल तर नगरसेवकांनी काय भुमिका घ्यावी. आमची मागणी मान्य करावी नसता आम्ही सर्व नगरसेवक उपोषणास बसु व मागणी पुर्ण न झाल्याचे कारणाचे

कारणाने मंत्रालयात जनतेसह मोर्चा घेऊन जाऊ याची प्रशासनाने दखल घ्यावी.

श्री. विकास जैन : नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतुन आजारी व्यक्तींना आर्थिक मदत म्हणुन रु. २५,०००/- देण्यासंबंधीची नियमावली तयार करण्यात आलेली आहे त्यानुसार आर्थिक मदत देण्यात येते परंतु काही रुग्णांना औषधोपचारासाठी जास्त खर्च येत असल्याने जास्तीच्या रक्कमेची मागणी होते व त्या मागणीनुसार विशेष बाब म्हणुन ठरावास मंजुरी देण्यात येते. संबंधीत व्यक्ती त्यानंतर नगरसेवकांचे ठराव मंजुर झाल्यानुसार पत्र जमा करतात व संचिका तयार होऊन मंजुरीसाठी जाते तेंव्हा अधिकारी यांचे रिमार्कस् येतात की, एवढा रक्कमेचा स्वेच्छानिधी औषधोपचारासाठी देता येत नाही. जेव्हा सभागृह निर्णय घेते त्यानुसार प्रशासन का कार्यवाही करत नाही या संबंधीचा खुलासा घेण्यात यावा व ज्या ज्या रुग्णांना विशेष बाब म्हणुन आर्थिक मदत देण्या संबंधीचे मंजुर झालेली आहेत त्यास मान्यता दिलीच पाहिजे. त्यास मंजुरी देण्याचे आदेश दयावेत.

श्री. रतनकुमार पंडागळे : माईक चालु नाही, दुरुस्त केलेले आहेत का ?

मा. महापौर : सभागृहातील माईक चालु असल्याचा रिपोर्ट संबधीत विभागाने दिलेला आहे सर्व माईक चालु आहेत, आपण आपआपल्या सुचना मांडाव्यात.

श्री. भागवत घडामोडे : स. सदस्यांनी अनाधिकृत वस्त्यात स्वेच्छानिधीतुन कामे व्हावीत म्हणुन भावना व्यक्त केल्या अनाधिकृत वस्त्यात कामे करण्यात येतील या संबंधीची आपण रुलींग दिली होती त्यांची अंमल बजावणी होत नसेल तर सभा घेऊन काहीही उपयोग नाही. जवळपास ८३ वार्डातुन २० ते २५ वार्डामध्ये अनाधिकृत वसाहती आहेत अधिकारी रिर्माक करतात स्वेच्छानिधी वापरता येत नाही अडचणी येते विकास कामे होत नसेल तर तेथील जनता काय करायवाचे माझ्या माहितीप्रमाणे महानगरपालिका हद्यीत मुलभुत सुविधा पुरविण्याचे काम महानगरपालिकेचे ते आपण विकास करण्यासाठी आहोत की कामे ठप्प करण्यासाठी महानगरपालिका झाल्यापासुन आश्वासने दिल्या गेले आता मात्र हात वर करण्यात येतात. काहीही उपयोग नाही ५०% लोकसंख्या अनाधिकृत वसाहतीत राहतात तेथील जनता किराणा सामान इ. वापरतात त्यातुन कर वसुल होतो. स्वेच्छानिधीतुन पाण्यासारख्या सुविधा पासुन वंचित ठेवण्यात येते. हे योग्य नाही सभागृहात निर्णय घेतल्यानंतर तेथील नागरिकांना आश्वासने देण्यात येतात. मतदानाचा हक्क ते बजावतात. तेथुन लोकप्रतिनिधी म्हणुन निवडुन येतात व तेथील वार्डात सुविधा न देणे बरोबर वाटते का ? पाण्यासारख्या सुविधा सुध्दा उपलब्ध करुन दिल्या जात नाही तेथील लोक मालमत्ता,पाणी पट्टी भरतात उत्पन्न असेल तर महानगरपालिकाला सुविधा देण्यास काय तोटा येतो. स्वेच्छानिधीतुन कामे करण्यासंदर्भात नियमावली केलेली असतांन व सभागृहात निर्णय घेतलेला असतांना सुध्दा कामे होत नाही नगर सेवक स्वेच्छानिधी हा महानगरपालिकेचा आहे हे सन्माननीय सदस्यांना समजते. तो जनतेच्या कामासाठी आहे बऱ्याच नगर सेवकांनी स्वेच्छानिधीतुन विकास कामे होण्याबाबत पत्र दिले परंतु अंमलबजावणी होत नाही. प्रशासनाने विचार केला पाहिजे की स्वच्छानिधी हा कशासाठी असतो. नगर सेवक स्वतःच्या स्वार्थापोटी तो खर्च करत नाही. वार्डात जनतेची कामे व त्यांना

सुविधा देण्याचा स. सदस्यांना खरा उद्देश असतो. निधी जनतेचा असुन जनतेच्याच विकास कामासाठी वापरावयाची मागणी करतात. जनतेला मुलभुत सुविधा देण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. जनतेनेच नगर सेवकांना निवडुन दिलेले आहे. आम्हाला तेथील नागरिकांना सुविधा देणे भाग आहे. आत्ताच काही स. सदस्यांनी स्वेच्छानिधीतुन संगणक व ड्राव्हींग प्रशिक्षणाबाबत सुचना मांडली निर्णय झालेला असतांना अंमलबजावणी नाही कशासाठी सभागृहाने निर्णय घेतला ? स्वेच्छानिधीतुन उरल्याप्रमाणे कामे होत असेल तरच आजची सभा घ्यावी नसता सभा घेण्याचा काही अधिकार आता उरलेला नाही ६ महिन्यामध्ये प्रशासनाने विकास कामासाठी काय कार्यवाही केली हे जनतेला कळु दयावे हे प्रशासन सर्व विकास कामे ठप्प करत आहे. याचा जाणीव प्रशासनाने सुध्दा ठेवावी.

श्री. शे. इसाक शे. जैनोद्दीन : नगर सेवकाच्या स्वेच्छानिधीचा वापर कसा करावयाच्या संदर्भात चर्चा चालु आहे. माझ्या वार्डातील अरफात कॉलनी येथील रस्ता दुरुस्तीसाठी पत्र दिले होते. पत्रानुसार संचिका मा. आयुक्तांकडे गेल्यावर सदर रस्त्याचे काम या अगोदर कधी केले असे रिमार्कस् येतात. संबंधीत अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती देऊनच संचिका वरिष्ठांकडे मंजुरीसाठी पाठवली पाहिजे. रेट लिस्टच्या कामासाठी १५-१५ दिवस लागल्यावर इतर कामे वेळेवर होतील काय ? विनाकारण रिमार्कस् करणे बरोबर होणार नाही. स्वेच्छा निधीचा पैसा जनतेचा असतो जनतेला मुलभुत सुविधा देण्याचे दृष्टीने व त्यानुसार विकास कामे होण्याचे हेतुने आम्ही सुचना करत असतो. स्वेच्छानिधी आम्ही स्वतःच्या कामासाठी वापरत नाही याचा प्रशासनाने विचार करावा. कामे होत नसतील तर जनतेनी आम्हाला कशासाठी निवडुन दिले. नेहमी संचिकेवर तेच ते रिमार्कस् येतात खालच्या लोकांचे काम आहे की, किती वर्षासाठी झाले होते ते बघावे.

रतनकुमार पंडागळे : विकास कामे करणे संदर्भात बऱ्याच स. सदस्यांनी चांगल्या प्रकारे भावना व्यक्त केल्या आहेत सभागृहाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होत नसेल तर योग्य नाही. विशेष म्हणजे चालु आर्थिक वर्षाच्या अर्थ संकल्पात १३ ठळक वैशिष्ट्यांवर निर्णय झालेला असुन सदर बैशिष्टांनुसार यावर्षी ती कामे केली जातील असा निर्णय घेतलेला आहे. १३ वैशिष्ट्यांपैकी एक जकाती संदर्भात प्रशासनाने कार्यवाही केली आहे. ज्या विषयावर सभागृहात अर्थसंकल्पाच्या बैठकीत चर्चा झालेली नाही अशा बाबतीत प्रशासनाने निर्णय घेणे बरोबर नाही. ज्या विषयावर चर्चा होऊन निर्णय घेतले ते एक काम पुर्ण केलेले दिसुन येत नाही. प्रशासकिय प्रस्ताव सादर न होता अशासकिय प्रस्ताव सभागृहात येऊन मंजुरी झाल्यानुसार जर जकातीचे खाजगीकरण करण्याचा प्रशासनाने धोरणात्मक निर्णय घेणे बरोबर राहत नाही. जर प्रशासकिय प्रस्ताव सादर झाला असता तर योग्य प्रकारे चर्चा करुन निर्णय घेतला असता ठेकेदारी पध्दतीचे अनेक उदाहरणे घेतली नाही यावरुन असे दिसुन येते या मनपामध्ये एकाधिकार ठेकेदार पध्दती सुरु झालेली आहे. खाजगीकरणा संबंधी अनेक महानगरपालिकामध्ये निर्णय घेतलेला होता परंतु त्यांचा हेतु सफल झालेला नाही. उदाहरण घ्यावयाचे झाल्यास सोलापुर मनपाचे सुध्दा खाजगीकरण झाले होते. जकातीचे

खाजगीकरण करण्याचा निर्णय घेणे योग्य होणार नाही. उर्वरित १२ उद्दीष्टांचे काय झाले.

मा. महापौर : नगर सेवकांचा स्वेच्छानिधीतुन अनाधिकृत वस्त्यांमध्ये वापरण्या बाबत चर्चा करावी जकातीचे खाजगीकरण संदर्भात आपण नंतर चर्चा करणार आहोत.

श्री. तकी हसनखान : सभागृहात स. सभासद सुचना करतात याचा अर्थ असा नव्हे की, चुकीच्या सुचना मांडतात कुणीही काही बोलेल. असे नव्हे. आत्ताच स. सदस्यांनी श्री. घडामोडे यांनी उल्लेख केला शहरातील जनता मग ती अधिकृत वस्तीतील असो किंवा अनाधिकृत वस्तीतील असो ते टॅक्स देतात. कपडा, घडी चप्पल इ. वस्तुंवर कर भरलेला आहे. सदर अनाधिकृत वसाहतीतील लोक त्या वस्तु खरेदी करत नाही काय ? यावरुन मनपाचा फायदाच आहे असे समजते. बऱ्याच अनधिकृत वस्त्यांमध्ये या अगोदर ड्रेनेज,पाणी, लाईटची,रस्ते इ. केलेली असुन आत्ताच का दुरुस्ती काम होत नाही. प्रशासन कामे करण्यास तयार नसेल तर अगोदरच्या ड्रेनेज लाईन तात्काह का टाकण्यात आले यास आपणास सामोरे जावे लागेल कर लावण्याचा अधिकार कोणी दिला. कर वसुली साठी नळ बंद केला जातो. जनतेकडुन कर वसुल केला जातो व जनतेला सुविधा न दिल्यास महानगरपालिकेवर मोर्चे, आंदोलन येतील जनतेबरोबर सर्व नगर सेवक असतील याची जाणीव ठेवावी व याचा परिणाम प्रशानास भोगावा लागेल. ज्या भागात सुविधा दयावयाच्या नाही. त्या भागातील जनतेची नावे मतदार यादीतुन वगळण्यात यावे, उद्या ही जनता न्यालयात गेली तर त्यास सदस्यांनी न्यालयात काय उत्तर दयावे. वार्डातील जनता आम्हाला विचारणा करते की, स्वतःच्या घरातील गल्लीतील वार्डातील विकास कामे होत नसतील तर कशासाठी नगरसेवक झाले आयुक्त साहेब मी संगणकाबाबतचा ठराव दिला अफेलेशन झाले. स्वेच्छानिधीतुन अनधिकृत वस्त्यात कामे करण्याच्या संचिकेवर रिमार्कस् येतात रिमार्कस् कशासाठी ? जर सभागृहात महापौरांनी निर्णय घेतलेलो असेल तर सुविधा देणे बंधनकारक आहे. अनाधिकृत वस्त्यांचे सोडा पण अधिकृत वस्तीतील कामांचे काय झाले तातडीने विकास कामे होण्यासाठी शासनाने १० लाख पर्यंन्त विकास कामा बाबतचे मा. आयुक्तांना अधिकार दिले ते कामास गती मिळण्यासाठी परंतु संचिका मंजुर होण्यास प्रशासन इतका विलंब करत आहे की, आम्हाला अंदाज काढणे शक्य नाही. नगर सेवक मजबुर झाले आहेत टेंडर निघतात परंतु एजन्सी फिक्स होत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. २५ वर्षापासुन मनपाचा लोकप्रतिनिधी म्हणुन कामे करतो परंतु एवढे बोलण्याची पहिलीच वेळ पडलेली आहे मी नियमाने बोलणारा असुन सन २००० ते २००१ या अर्थ संकल्पात १३ ठळक वैशिष्ट्ये दिली प्रभावी मालमत्ता वसुली संदर्भात काहीच कार्यवाही नाही संभाजी महाराज पुतळा झाला नाही, मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्राचे काय झाले माहित नाही, तसेच अण्णाभाऊ साठे वस्ती गृहाचे काहीच कर्यावाही नाही. सभागृहाच्या वतीने मी बोलु इच्छितो की आज पर्यंन्त शहरात लाईट देण्याबाबतचे टेंडर सुध्दा निघालेले नाही. बेल्ट सिस्टीम सुरु झालेली नाही यापासुन मनपाच्या उत्पन्नात फारक पडु शकतो परंतु तीही कार्यवाही सुरु झालेली नाही. जकातीचे खाजगीकरण करण्याचा प्रशासनाने निर्णय घेतला आहे. कसा

घेतला का घेतला या बद्दल काही मला माहित नाही. चुकीचा निर्णय घेतला आहे खाजगी संस्थे मार्फत शहरातील नळ जोडणी सर्वेक्षण अद्याप केलेले नसुन तसेच मालमत्ता कराचे फेर मुल्यांकन ही झालेले नाही. नगर सेवक स्वेच्छा निधीतुन संगणक केंद्र उभारणे प्रत्येक नगर सेवक स्वेच्छा निधीतुन रु. २५,०००/- पर्यन्त सुशिक्षित बेरोजगारांना संगणक प्रशिक्षण देऊ इच्छित होते. बराच काळ चालु असणारी ही योजना होती परंतु प्रशासनाने मुद्दामहुन कार्यवाही केली नाही. नविन आरोग्य केंद्र उभारण्याची कार्यवाही झाली नाही विशेष आरोग्य सेवा कशाचे नाव आहे माहित नाही काय कार्यवाही केली माहित नाही. बायोमेडीकल वेस्टची कार्यवाही झाली नाही. अर्थसंकल्पातील एकुण १३ वैशिष्ट्यांमधुन कोणतीच कार्यवाही प्रशासनाने पुर्ण केलेली नसुन सभा कामकाज करुन उपयोग काय ? (याच वेळी स.स. श्री. तकीहसनखान चालु आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पाचे पुस्तक सभागृहात फाडतात.) सभागृहात निर्णय घेऊनही कार्यवाही न करणे तर प्रशासन काय काम करते व सभागृहात कशासाठी असते. अर्थसंकल्पकशासाठी तयार करण्यात येतो प्रशासनाने खुलासा करावा. अर्थसंकल्पात झाल्यानंतर प्रशासनाने कार्यवाही करणे जरुरी असतेच अधिकृत भागातही पाणी देण्याची कार्यवाही मनपा करते. रु. १,२००/- पाणी परंतु संबंधीतास एकुण रु. ६,२००/- भरावे लागतात ते असे की बऱ्याच लोकांचे नळ कनेक्शन घराच्या बाहेरच असते. पाणी घेण्यासाठी त्यांना मोटार लावुन पाणी घ्यावे लागते. व इतर घरातील विद्युत बिल जवळ पास ५,०००/- येते. टॅक्स घेण्याचा काय अधिकार आहे जेव्हा सुविधा दिल्या जात नाही. जास्त प्रमाणात टॅक्स वसुल करावा परंतु सुविधाही तशाच देण्यात याव्यात असे माझे मत आहे. पाण्याचा प्रश्न सुटत नाही, स्वेच्छानिधीतुन कामे नाहीत, संगणक प्रशिक्षण झाले नाही, अर्थसंकल्पातील उद्दिष्ट्ये पुर्ण होऊ शकली नाही. साधे रेटलिस्ट कामे प्रशासन करीत नाही. नगर सेवक स्वेच्छा निधीतुन कामे करुन घेण्यासाठी प्रशासनावर पुर्णतः अवलंबुन राहावे लागत आहे. काम सुरु करण्यासाठी कनिष्ठ अभियंता पासुन कार्यकारी अभियंता पर्यन्त मनधरणी करावी लागते. जनता व नगरसेवक यांना त्रास होत आहे कामे सुरु करावी मंजुरी मिळत राहिल असे प्रशासनाचे ध्येय असावे व यास सभागृहाचीही संम्मती आहे बऱ्याच अनाधिकृत वसाहती होत आहे ते थांबण्यासाठी विकास आराखडा तयार करावा जमीन भुसंपादन करावी. त्यासाठी पैसा नसेल प्रशासन तशी कार्यवाही करित नसेल व त्यानंतर अनाधिकृतपणे झालेल्या घरांना टॅक्स लावण्याचा मनपाला काहीही अधिकार नाही. असे माझे मत आहे. विकास योजनेतील आरक्षणांचा मोबदला देण्यात येत नाही ते भुसंपादन करत नाही त्यामुळे हजारो संचिका कन्स्ट्रक्शनसाठी कार्यालयात पडुन आहे. शहर खंडर होत आहे पैसा द्या, संपादन करा नाहीतर बांधकाम परवानगी द्या. तुटलेल्या घरांचे मालमत्ता कर घेतात ते कमी करा वापरात नाही. पुन्हा पुन्हा कलम १२७ ची सुचना दिली जाते बांधकाम परवानगीसाठी वर्ष दोन वर्ष चकरा मारतात ही कोणती प्रशासनाची काम करण्याची पध्द्त आहे यास बदलावी लागेल. प्रशासनाच्या निदर्शनास आणुन देतो की या अगोदर प्रभारी मा. आयुक्त म्हणुन श्री. चहल साहेब होते. सभागृहात त्यांनी अनाधिकृत वस्त्या संदर्भात असा खुलासा केला की, अनाधिकृत वस्त्या व

त्या वस्त्यात अनाधिकृत घरे होण्याचे कोणीही रोखु शकत नाही. जनता जातील कुठे, वस्त्या होत राहणार व होतीलच यात शंका नाही. असे सांगण्यात आले होते गरिब व्यक्ती २० बाय ३० च्या प्लॉट घेण्या शिवाय काय करु शकेल ? महानगरपालिकेला काय फायद्याचे आहे त्या संबंधी सुध्दा प्रशसान कार्यवाही करत नाही उदाहरण द्यावयाचे झाल्यास मा. आयुक्तांना मी एक पत्र देऊ इच्छितो की (एक पत्राची प्रत देतात) होर्ल्डीग टेंडर अद्याप पर्यन्त का काढण्यात आले नाही. काय अडचण निर्माण झाली. सिडको हस्तांतरण होण्याच्या अपेक्षेवर मनपाचे नुकसान होत आहे. म्हणुन काही कामे थांबुन आहेत काय ? सिडको मध्ये होर्ल्डीगसाठी रु. १३ दराने आकारणी करते. मनपा फक्त ३.६५ पैसे आकरते कमी कर आकारणी कशी केली तोही कर वेळेवर वसुल न होणे ही जबाबदारी प्रशासनाची आहे त्यास सभागृह दोषी नाही. विकास कामे होत नाही म्हणुन सर्व नगरसेवक त्रस्त झालेले आहेत जनतेला मुलभुत सुविधा देण्याबाबत कार्यवाही होत नसेल तर सभा घेऊन उपयोग नाही. आठ महिन्यात काहीही काम नाही. एकही कार्यादेश नाही. मागील घेतलेल्या निर्णयाची अंमलबजाणी होत नसेल तर बैठक घेऊन उपयोग नाही, सभागृहाने एकमत करावे की ही बैठक होऊ देऊ नये. मागील सभागृहाने मंजुर केलेली सर्व विकास कामे व्हावीत असा आमचा उद्देश आहे.

श्री. कदीर मौलाना : जोपर्यंन्त आयुक्तांचा खुलासा होत नाही तोपर्यंन्त सभा पुढे चालवु नये.

श्री. प्रकाश निकाळजे : अनाधिकृत वस्त्यामध्ये स्वेच्छानिधीतुन विकास कामे होण्या संबंधीची सुचना बऱ्याच ज्येष्ठ स. सदस्यांनी मांडल्या आलेत अर्थसंकल्पातील १३ ठळक वैशिष्ट्ये मधील अदयाप प्रशासनाने एकही काम हाती घेतलेले दिसुन येत नाही. जनतेनी आम्हाला निवडुन दिले यात बरेचशे स. सभासद नवीन असुन त्यांना समजण्यात वेळ गेला आयुक्तांच्या बदल्या यात वेळ गेलेला आहे. नविन आयुक्तांना कामाची माहिती घेण्यास वेळ गेला ४ थे ५वे आयुक्त आले संचिकेवर सुरुवातीला निर्णय घेताना आपण यात योग्य निर्णय घेत आहोत काय हे प्रत्येक आयुक्तांच्या मनी झालेले होते. त्यामुळे संचिका थांबुन विकास कामे झाली नाहीत. मागील बैठकीत असा निर्णय झाला की ज्या अनाधिकृत वसाहती असतील तेथे नगर सेवकांच्या स्वेच्छानिधीतुन विकास कामे व्हावीत व ज्या वस्त्या १९९५ च्या अगोदरच्या आहेत त्या अधिकृत कराव्यात व तेथील जनतेला सुविधाही दयाव्यात असे ही शासनाचे आदेश आहे व तेथील जनतेला मानवी दृष्टीकोन समोर ठेवुन अनाधिकृत वस्त्यामध्ये सन्माननीय सदस्यांच्या स्वेच्छानिधीतुन लाईट,पाणी, ड्रेनेज, इ. मुलभुत सुविधा देण्यात याव्यात असा ठराव मान्य केलेला आहे. आत्ताच काही स. सदस्यांनी संचिकेवर रिमार्कस् येतात म्हणुन सुचना मांडली एखादया प्रशासनाचे असे मत असु शकते की होणारी कामे चांगली व्हावीत कारण बऱ्याच वेळेस अधिकारी खुलासा करतात झालेली रस्त्याची कामे कमीत कमी एकदा काया झाल्यानंतर ते काम अडीच ते तीन वर्षापर्यंन्त टिकले पाहिजेत व होणारी बरीच कामे योग्य न झाल्यास कुणास दोषी ठरवावे असे मत प्रशासनाचे असुन शकते म्हणुन योग्य माहिती प्रशासनास पाहिजे असेल ती सर्व माहिती टेक्नीकल विभागामध्ये मिळु शकेल व येणाऱ्या

संचिकेवर निर्णय घेण्यास वेळ लागणार नाही व कामे ही तात्काळ होतील व ज्या ज्या स. सदस्यांनी स्वेच्छा निधीतुन विकास कामे करण्यासंदर्भी पत्र दिले अशा सर्व संचिका मागुन त्यावर निर्णय घ्यावेत स्वेच्छानिधीतुन संगणक केंद्र उघडावे असा निर्णय झाला तरी कर्यावाही नाही स्वेच्छा निधी विकास कामासाठी खर्च झाला पाहिजे व या सभागृहाने अर्थ संकल्पातील जी १३ ठळक वैशिष्ट्ये दाखवली व ती कामे का करण्यात आली नाही याचा खुलासा सभागृहाला दयावा स्वेच्छानिधी बुडणार नाही याची काळजी मा. आयुक्तांनी घ्यावी.

श्री. स. अली मिरा सलामी : गेल्या ६-७ महिने झाले नविन बॉडी आली प्रत्येक स. सदस्य विकास कामे होण्यासाठी प्रयत्न करत आहे तेव्हा पासुन तीन आयुक्तांच्या बदल्या झाल्या. कुणी नविन आयुक्त आल्यावर काही कामे समाजावुन घेण्यास उशीर लागेल. बदल्यामुळे कामे होऊ शकली नाही. परंतु या सभागृहाचा एकच उद्देश आहेत की आयुक्त पदावर कुणी ही असोत आयुक्त म्हणुन आलेत विकास कामे झाली पाहिजे, आयुक्त पदावर श्री. जहागीदार यांची नियुक्ती झाली सुरुवातीस त्यांनी आश्वासन दिले की, कोणत्या कामाची संचिका प्रलंबीत राहणार नाही त्या नुसार प्रत्येक स. सदस्य मा. आयुक्तांना भेटले. बऱ्याच संचिका सही होऊन संबधीत विभागात आल्या व त्यात बऱ्याच संचिकेवर जसे आत्ताच स. सदस्य शे. इसाक यांनी सांगितले की, बऱ्याच संचिकेवर रिमार्कस् आले प्रशासनातील कोणते ही कामे वरिष्ठांनी कनिष्ठाच्या विश्वासावर करावयाची असते. मग ते कोणतेही प्रशासन असु शकते. परंतु महानगरपालिकेच्या आयुक्त पदी कुणी आले व विकास कामाबाबत व इतर कामाच्या संदर्भात तगादा केल्यास माझी बदली करण्यात यावी असेच आयुक्त बोलण्याचे काम करत आहे. हे काही बरोबर नाही. सभागृहाच्या वतीने मी अशी विनंती करेन की महानगरपालिका आयुक्त पदी अशा व्यक्तीची नेमणुक व्हावी की, ज्यांना या शहराची जाण आहेत जनता व लोकप्रतिनिधी याच्या भावना समजावुन घेतील तातडीने विकास कामे होतील भेदभाव निर्माण होणार नाही. या अगोदरचे तत्कालीन आयुक्त श्री. भोगे साहेबा सारखे आयुक्त या महानगरपालिकेमध्ये असणे गरजेचे आहे सध्याच्या परिस्थितीत ६-६ महिने उत्तर नाही विकास कामा संदर्भात संचिका पडुन राहिल्यास स. सदस्य जनतेस काय उत्तर देतील. सध्याचे प्रशासन असुन कामे ठप्प करत आहे. कारण लहान-लहान रक्कमेची विकास कामे सुध्दा थांबुन आहेत. जनतेची अपेक्षा काय असेल व त्यांना काय असेल व त्यांनी आम्हाला कशासाठी निवडुन दिले विकास कामे का होत नाही. त्यांचेकडुन आम्हाला विचारणा होते. काय उत्तर देणार. मा. आयुक्तांशी कोणत्याही काम निमित्त भेट घेतल्यात संबंधीत व्यक्तीला कामाची माहिती माझ्याकउे आणावी असे बोलेले जाते असे बोलणे योग्य आहेत काय ? प्रत्येक वेळेस प्रत्यक्ष कामा बाबतची माहिती देणेस स. सदस्यांचा वेळ किती जाणार हे प्रशासनाचे धोरण योग्य वाटत नाही. नगरसेवकांनी भावना प्रकट करुन नंतर कामे करण्यची कार्यवाही करणारे आयुक्त या महानगरपालिकेमध्ये नको आहे.जनतेच्या समस्या समजावुन व न बोलता विकास कामे करणारे आयुक्त या महानगरपालिकेला पाहिजे. माझ या वार्डातील औरंगपुरा पान सेंटर जवळ एका ड्रेनेज लाईन संदर्भात काम

होते. ८ महिने फाईल चालली दोन वेळेत संचिका मंजुर झाली एकदा चर्चा झाली संचिका कनिष्ठाकडुन मंजुर होते. व त्यावर आयुक्तांनी रिमार्कस् केलेले आहे. कनिष्ठावर विश्वास ठेवुनच वरिष्ठांनी परवानगी द्यावयाची असते. जर असे न केल्या संचिका मंजुर होण्यास खुपच वेळ जाईल व कामेही ठप्प होतील याची प्रशासन करावी. आताच स. सदस्य श्री. तकी हसनखान यांनी सांगितले विकास कामे होत नाही प्रशासन लक्ष देत नाही. त्यामुळे नगरसेवक मजबुर झाले परंतु नगरसेवक मजबुर नाही. नगरसेवकांच्या पाठीमागे जनता आहे. जनतेने आम्हाला निवडुन दिलेले आहे. जनतेचाच निधी जमा होतो जनतेच्या कामासाठी वापरला गेला पाहिजे. आताच स. सदस्य यांनी मत व्यक्त केले की, प्रशासन चांगली कामे व्हावीत म्हणुन योग्य माहिती घेऊन संचिका मजुर होत असतील परंतु एखादे काम चांगले झाले नाही. का झाले नाही जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही व्हावी त्या सभागृह दोषी होऊ शकत नाही. काम करुन घेण्याची जबाबदारी प्रशासनाची असेल प्रशासन जबाबदार राहील. शहानुरवाडी येथे महानगरपालिकाने करोडो रुपये खर्च केले परंतु तेथे आज पाजिल्यास लोकांनी मातीची घरे केली यास प्रशासनच जबाबदार आहे. प्रशासन म्हणजे आयुक्तांना आम्ही ३,५,१०,२० हजारापर्यन्तचे आहेत त्यावर सुध्दा रिमार्कस् येत आहे यामुळे सर्व विकास कामे ठप्प होतील चालु वर्ष निघुन जाईल कुठेही काम झाल्याचे दिसुन येणार नाही. जनतेनी निवडुन दिले आहे त्याची कामे व्हावीत एवढाच उद्देश आमचा आहे. अनाधिकृत वस्त्यामध्ये स्वेच्छानिधीतुन विकास कामे होण्या बाबत चर्चा चालु आहे परंतु अधिकृत वस्त्यामध्ये सुध्दा कामे केलेली दिसुन येत नाही झालेली असल्यास प्रशासनाने माहिती घ्यावी. अर्थसंकल्प मंजूर केला त्यात १३ ठळक अशी कामे करण्याचा निर्णय घेण्यास काय झाले माहीत नाही. कधी अंदाजपत्रक केले, संचिका कोठे आहे. काहीही माहिती सभागृहात नाही. कार्यरत असणारे प्रशासन काम करणारे नसुन------ झाले आहे. स्वेच्छा निधीचा प्रश्न उपस्थित झाला जर वार्डात जनतेची कामे करावयाची असेल तर सर्व स. सदस्यांनी एकत्र यावे. हा निधी महानगरपालिकाचा नाही. किंवा शासनाचा सुध्दा नाही जनतेचा निधी आहे जनतेसाठी वापरावयाचा आहे. यासाठी का विरोध शासन परवानगी कशासाठी आम्ही सर्व जबाब प्रशासनास विचारु शकतो. लाईटचा प्रश्न उपस्थित झाला शहरात बऱ्याच ठिकाणी लाईट नाही. तक्रार करुनही कार्यवाही नाही. अर्थसंकल्प कुठे गेला खुलासा दयावा. जनतेला असे सांगण्याचे वेळ आली की, सदरचे प्रशासन----- आहे. कामे करणारे नाही. शहरात ५०% जनता अनाधिकृत वस्त्यामध्ये राहतात. महानगरपालिका होऊन १८ वर्ष झाले. तेव्हापासुन अनाधिकृत वस्त्या होत आहे. सुविधा दयावयाच्याच नव्हत्या तर अनाधिकृत वस्त्या कशासाठी होऊ दिल्या, आता झाल्यातर सुविधा देण्यात याव्या बरेच स. सदस्य अनाधिकृत वस्त्यातुन निवडुण आलेले आहेत या वस्त्यातील जनता कर भरतात वरिल सर्व गोष्टीचा खुलासा देण्यात यावा.

श्री. सुदाम सोनवणे : स. नगरसेवकांचा स्वेच्छा निधी कोठे व कसा खर्च करावयाचा नगरसेवकांना व्यथा मांडावी लागते. गेल्या ६ वर्षापासुन श्री. भोगे साहेब आयुक्त असतांना सिडको अनधिकृत वस्तीत खर्च केला महापौरांची रुलींग

होती कामपुर्ण केले उद्दीष्ट पुर्ण केले. स्वेच्छा निधी वापराण्या बाबत निर्णय झालेला आहे. मग ती वसाहत अधिकृत असो अनाधिकृत असोमा. मा. महापौर यांचे रुलींग झालेले आहे. निर्णय झालेला आहे. ६-७ महिन्याचा कालावधी गेला स. सदस्यांनी कामे व्हावीत म्हणुन पत्र दिलेले आहे. काहीच कार्यवाही झालेली नाही. स्वेच्छा निधीतुन आर्थिक मदत देण्या बाबतचा निर्णय झाला त्याची तातडीने कार्यवाही होत नाही नुसती सभागृहात चर्चा करुन ठराव पास करणे बरोबर नाही तर प्रशासनाने सभागृहात झालेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी करणे जरुरी आहे. महापौरांचे आदेशाला प्रशासन जुमानत नसेल तर दुदैवाची बाब आहे. ज्या अनाधिकृत वसाहती झाल्यात त्या स. सदस्यांनी बसलेल्या नाहीत. यास प्रामुख्याने प्रशासन व शासनाच्या प्रशासकिय विभागाच्या माध्यमातुनच झालेल्या आहेत प्रशासनाच्या संबंधीत विभागाने कार्यवाही करावयास पाहिजे होती. ती अगोदर नियोजन केले नाही म्हणुन आज ती परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यास हे सभागृह जबाबदार नाही बरेच स. सदस्य अनधिकृत वस्त्यामधुन निवडुन आलेले वार्डाचा विकास होईल या अपेक्षेने जनतेनी निवडुन दिले आहे. काम झाली नाही तर जनता वेगळी भुमिका घेतील व हे सभागृह सुध्दा चालवण्याचा आपल्याला अधिकार नाही. याची जाणीव ठेवावी. स. सदस्य श्री. फुलारी याच्या वार्डातील एका पाण्याच्या लाईनच्या संदर्भात संचिकेवर रिमार्कस् आणु देऊ इच्छितो की १९९७ मध्ये मी माझ्या स्वेच्छा निधीतुन यशवंता गृह निर्माण संस्था सिडकोमध्ये विकास कामे केली. चिश्तिया कॉलनी येथे ३ लाख रुपयाचे ड्रेनेज काम केले आता एक लाखाच्या संचिकेवर रिमार्क येतात का सिडकोमधील वसाहतीत विकास कामे करण्यास मनाई होते आहे. ठराव मंजुर झाल्यावर कामे होतील अशी सभगृहात अपेक्षा व्यक्त होतात. व त्या अपेक्षा पुर्ण न करण्याचा हे प्रशासन प्रयत्न करत आहे. अर्थसंकल्प मंजुर झाल्यापासुन जवळ पास ६*७ महिन्याच्या कालावधीत कुण्या वार्डामध्ये -५० हजारांच्या वर स्वेच्छा निधीतुन कामे झालेली नाही. आजारी व्यक्तीला स्वेच्छा निधीतुन आर्थिक मदतीची तरतुद असतांना तसा सभागृहाने निर्णय घेतला तरी सुध्दा संबंधीत व्यक्तीला मदत देण्याचे नाकारले जाते पेशंट मेल्यावर पत्र जाते. व ठराविक व्यक्तींना आर्थिक मदत देण्याचे कार्यवाही होते याच अर्थ अधिकारी मनपमानी प्रमाणे प्रशासन चालवित आहे. शहानुरवाडी येथे ८० लाखाचे जवळपास कामे झाली त्याची माहिती नाही. २५० ते ३०० वटॅचा लाईट लावण्यास २ दिवस टिकत नाही सर्व बोगस काम करण्याचे ध्येय प्रशासनाचे आहे असे वाढते जकातीचे खाजगी करणाचा निर्णय घेतला कसा घेतला काय घेतला त्यांची ही सविस्तर माहिती सभागृहाला नाही. शिक्षणाधिकारी यांना शिक्षक भरती संदर्भात सविस्तर माहिती मागवली होती की ज्यांनी शपथ पत्र लिहुन दिले की, जिल्हा परिषदेत नोकरीस नाही परंतु ते नोकरीत होते असे सिध्द झाले. त्यांनी असे उत्तर दिले की हा प्रश्न अस्थापना विभागाशी संबंधित आहे. समाधानकारक उत्तरे मिळत नाही. अशी उत्तरे अधिकारी देत असतील व ते त्याचे जबाबदारी सांभाळत नसतील तर त्यांना त्वरीत त्या पदावरुन हटवावे व त्यांचेवर कार्यवाही सुरु करावी. आम्ही नगरसेवक लोक प्रतिनिधी आहेत नोकर नाहीत. तसेच विविध विभागातील पदे भरण्यात येत नाही विधी

सल्लागार पद भरण्या संबंधीची ३ वर्षापासुन कार्यवाही चालु आहे. महानगरपालिकेमध्ये मुख्य लेखापरिक्षक नाही. शहर अभियंता पद रिक्त आहे. अशी पदे रिक्त ठेवल्यास जनतेची कामे वेळेवर होतील काय ? या संबंधी प्रशासन कार्यवाही करणार की नाही ? आपले अधिकारी कामे करत नसतील बाहेरील अधिकारी मागवावे कार्यकारी अभियंता (पा.पु) सुध्दा जिवन प्राधिकरणाकडुन मागविण्यात यावा पाणी सुरळीत होईल.

सौ. कुसुम खरात : स्लम भागात विकास कामा संदर्भात संचिका सुध्दा मा. आयुक्तांनी मंजुर केल्या नाही रिमार्कस् येतात. त्यामुळे लहान-लहान रक्कमेच्या संचिका प्रलंबित आहेत. विकास कामे थांबुन आहेत. स्लम भागातील कामे वेळेवर होणार नसेल तर कोणती कामे होणार याचा खुलासा मा. आयुक्तांनी करावा. स्लमचा पैसा परत जाईल.

श्रीमती. शहिन जफर महमुद जफर : वार्डात लहान मोठया समस्या निर्माण झालेल्या आहेत. लहान-लहान कामे थांबवुन आहेत. ३ हजाराचे ड्रेनेजचे काम बंद केले. पाणी वेळेवर येत नाही. अधिकारी यांचेकडे सुचना केल्या असता तात्काळ कार्यवाही होत नाही. नगरसेवकांनी जनतेला काय उत्तर दयावे ठराविक वार्डातील कामे होत आहे असे दिसुन येते. माझ्या वार्डातील शाळेमध्ये शिक्षक कर्मचारी कमी आहेत. सुचना करुन शिक्षक दिले नाही. वारंवार त्याच सुचना करणे बरोबर होत नाही या संबंधी शिंदे साहेबांची भेट घेतली कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले ड्रेनेजचे चालु काम बंद केले वार्डातील रस्ते खराब झालेत. समस्या जाणुन घेण्यासाठी वार्डात भेट देण्यासाठी बोलवले आश्वासन दिले झाले नाहीत. लहान-लहान कामाच्या आयुक्तांकडे जातात त्यावर रिमार्क येतात विकास कामे करणार की नाही असे कधी पर्यन्त चालेल नगरसेवकांची काय भुमिका घ्यावयाची याची सविस्तर खुलासा प्रशासनाने करावा.

श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद : स. सदस्य श्री. तकी हसनखान, श्री. सुदाम सोनवणे श्री. स. इसाक यांनी विकास कामे करण्यासंदर्भात चांगल्याप्रकारे सुचना केल्या. नगरसेवक व महानगरपालिका प्रशासनाचा समन्वये साधुन विकास कामे करावयाची आहे. वार्डाचा विकास होण्यासाठी जनतेने लोकप्रतिनिधी निवडुन दिलेले असतात सभागृह ज्या पध्दतीने चालवावयाचे तसे चालत नाही व सभागृहातील निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. ८ महिन्याचा कालावधी निघुन गेला परंतु कोणतीही विकास कामे झालेली नाही जनता आपली आहे असे समजुन विकास कामास सुरुवात करावी ज्या कामासाठी आम्हाला पाठविले आहे तो लोकांचा पाहण्याचा दृष्टीकोन असतो. जसे महापौरांना ज्या पदावर बसवले तो सभागृहाचा पाहण्या दृष्टीकोन असतो.

श्री. शे. इलियास किरमानी : माझ्या वार्डात पन्नास ते साठ लक्ष रु खर्च करुन २० लाख लिटर्स क्षमतेच्या टाकीचे काम होत आहे. जी जुनी पाण्याची टाकी आहेत त्यात जवळपास ५ लक्ष लिटर्स पाणी भरत नाही त्या टाकीमध्ये कित्येक दिवसापासुन पाणी सोडण्यात येत नाही. या टाकीव्दारे एकनाथनगर चेतनानगर, हर्सुलचा काही भागास पाणी मिळु शकते. नवीन होणारी टाकी जुन्या टाकी जवळच होत आहे. नवीन टाकीज, करण्याचे कारण काय ? या साठी खर्च न करता जुन्या टाकीतच पाणी साठा करुन कार्यवाही करणे योग्य वाटते. अनावश्यक खर्च होत आहे अधिकारी यांनी कोणत्याही

टेक्नीकचा उपयोग न करता हा निर्णय घेतलेला आहे. विभागाचे दोन ठिकाणी विभाजन करावे त्यामुळे कामे वेळेवर व योग्य होतील. अशी सर्वाचींच मागणी आहे.

सौ. साधना सुरडकर : वार्डात जे तिला सुखसुविधा देणे महानगरपालिकाचे कर्तव्य असुन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत बिकट झालेला आहे. अधिकृत अनधिकृत हे नतर पाहावे. नाल्या काठी हात पंप मध्ये निचरा होते व त्यामुळे पाणी पिण्यास योग्य नाही. आणि पाणी पिण्यास यावेत नाही असे रिमार्कस् संबंधित आरोग्य विभागाकडुन येतात. तरी सुध्दा त्या भागात जातीने लक्ष देऊन पिण्यांचे पाण्याची व्यवस्था होत नाही नाईलाजाने जनतेला, हातपंपाचे पाणी प्यावे लागते. व आरोग्याच्या दृष्टीकोनातुन विचार केल्यास जनतेचा बळी गेला तर त्यास जबाबदार कोण अशावेळी नागरिकांनी काय भुमिका घ्यावी बांधकाम परवानगीसाठी नागरिकांनी पत्र दिलेले आहे. बेटरमेन्ट चार्जेस भरलेले असतांना सुध्दा ४-४ महिने कार्यवाही होत नाही. प्रशासकीय कार्यवाही होण्यास निष्काळजीपणा होत आहे. नगरसेवक काम करण्यास निष्काळजीपणा करतात. अशी जनतेची भावना झाली आहे विकास कामे व्हावीत अशी आमची मागणी आहे. फाईलमध्ये १००% बेटरमेंट चार्जेस भरलेले आहे काय ? अशा शेरा येतो. हे कोणी बघायचे प्रशासनाने की नगरसेवकांने ४ महिने फाईली पडुन राहणे योग्य नाही प्रशासनाचा निष्काळजीपणा होत आहे.

श्री. सुनिल पंडागळे : मागील बैठकीत लाईट संदर्भात चर्चा झाली, काही कार्यवाही झाली नसुन जनतेला ज्या मुलभुत सुविधा देणे जरुरी आहे त्या देण्यात येत नाही. बऱ्याच वार्डात पाणी पुरवठा होत नाही. विचारणा केल्यास उडवा उडवीची उत्तरे अधिकारी देतात. लाईटच्या सुविधा देण्या संदर्भात १५-१५ दिवस संचिका पुढे जात नाही. तसेच महानगरपालिका हद्दीत ५३ स्लम घोषित केला तेथे सुविधा देणे योग्य आहे. लाईटच्या संबंधी नगरसेवक संबंधीत विभागात जाऊन भेटतात आज देण्यात येईल, उदया देण्यात येईल असे सांगितले जाते. किती साहित्य खरेदी केले. कोणत्या भागात लावण्यात आले याची माहिती द्यावी.

श्री. अफसरखॉन : स्वेच्छानिधीतुन अनाधिकृत वस्त्यामध्ये विकास कामे होत नाही. म्हणुन चर्चा होत आहे परंतु अधिकृत वस्त्यामध्ये सुध्दा या वर्षात किती व कुठे कामे झालीत याची माहिती दयावी. एक स्वेच्छानिधीतुन काम करण्यासाठी कार्यकारी अभियंता (पा.पु) यांची भेट घेतली कार्यवाही नाही. एका ड्रेनेजच्या लाईनचे कामा बाबत आम्ही ४-५ सदस्यांनी भेट घेतली. बरोबर उत्तरे मिळत नाही. मंजुरी शिवाय काम करु नये असे आयुक्तांनी सांगितले जाते. अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे. ४-४,५,६,७ हजाराच्या विकास कामाच्या संचिकेवर रिमार्कस् येत आहे. जेथे काम करणे आवश्यक नाही. त्या संचिका मंजुर होतात. सगळयाच संचिकेवर रिमार्कस् येत असतील तर शहरात दुर्गंधी होईल. विकास कामाच्या संचिका थांबुन आहेत परंतु महानगरपालिकाची जागा हडप करणाऱ्या बिल्डरच्या संचिका मंजुर होतात तत्कालीन आयुक्त यांनी बिल्डराचे काळे कामे बंद करण्याचा प्रयत्न केला. बिल्डराचा फायदा होत नव्हता म्हणुन व्यापारी, बिर्ल्डस यांनी त्यांची बदली करण्याचा प्रयत्न केला. कोणत्या विभागात कोणती कामे होत आहे हे

आयुक्तांनी स्वतः पहावे मागील संचिकेचा अभ्यास करावा. प्रत्येक विभागावर लक्ष ठेवावे. विनाकारण संचिकेवर रिमार्क करणे बरोबर नाही. नगरसेवकांना विकास कामे होण्यासाठी लाचार व्हावे लागत आहे वारंवार मागणी करावी लागत आहे परंतु नगरसेवक लाचार नाही. ५-७ हजार जनतेनी त्यांना निवडुन दिलेले असते. अधिकाऱ्यांनी अधिकृत वस्त्यामध्ये भ्रष्टाचार करुन बोगस कामे करत असेल तर अशा अधिकाऱ्यावर आयुक्तांनी कार्यवाही केली पाहिजे. परंतु सगळयाच विकास कामा संदर्भात संचिकेवर रिमार्कस् येत असतील तर योग्य नाही असे होत असेल तर सभा घेऊन उपयोग नाही शिक्षणाधिकारी यांचेकडे उर्दु शाळेसाठी किती शिक्षकांची गरज माहितीची मागणी केली असता ४ शिक्षक लागतात असे सांगितले. चुकीची माहिती स. सदस्यांना पुरवितात माहिती घेतली ३०,४० शिक्षकांची आवश्यकता आहे अशा अधिकाऱ्यांना हटवावे सहा महिन्याच्या वर प्रभारी अधिकारी म्हणुन ठेवु शकत नाही. त्वरित बदली करावी महानगरपालिकांचे नाव बदनाम होण्याचा हा प्रकार आहे. शिक्षण विभागाचा दर्जा नष्ट झालेला असुन याकडे जातीने प्रशासनाने लक्ष दयावे. मुख्यध्यापकांना चार्ज द्यावा. व त्वरीत अशा अधिकाऱ्यांना त्यांच्या पदावरुन हटवावे नगरसेवकांनी सुचना केल्यानुसार जनतेची कामे होत नसतील तर बरोबर नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : जनतेच्या भावना लक्षात घेऊन स. सदस्यांनी विकास कामे होण्यासाठी पोटतिडकीने चर्चा केली आणि चर्चा करणे ही जरुरीचे आहे. वर्षीचा अर्थसंकल्प २००० ते २००१ चा कालावधी संपण्यास ४ महिन्याचा अवधी आहे. ४० ते ४५ कोटी रुपये विकास कामावर खर्च होणार असे दाखवले. परंतु सभागृहात गेल्या ६ महिन्यापासुन नुसती चर्चाच होत असुन ६ महिन्यामध्ये ८३ वार्डात विकास कामे झाली नाही. झाली असल्यास कोणते काम केले. कोणत्या वार्डात केले. कोणते काम प्रस्तावित होते. सालाबादा प्रमाणे पुढील वर्षाच्या अर्थसंकल्प सादर करण्याची वेळ आलेली असतांना चालु वर्षाच्या अर्थसंकल्पातील ठरल्या प्रमाणे विकास कामे झाली नाही. हे प्रशासनाचे धोरण बरोबर नाही. १९९५ च्या अगोदरच्या असलेल्या अनधिकृत वसाहती सर्व्हे करुन अधिकृत कराव्यात असा शासनाचा जी.आर. असतांना कुठल्या भागात सर्व्हे करण्याी कार्यवाही प्रशासनाने केली नाही. कुठे ही बोर्ड लावला नाही व काय कार्यवाही केली त्याची थोडक्यात माहिती. निवेदन महानगरपालिकाच्या वतीने दिलेले आहे काय ? गेल्या ५ वर्षात प्रशासनाने काहीच कार्यवाही का केली नाही. जबाबदारी होती ती टाटली गेली आहे. कोण आयुक्त चांगले नाही, त्यांना दोषी ठरवित नसुन त्यांचे खुर्चीला आम्ही प्रश्न विचारतो. कोणती कामे तातडीचे आहे. याची जाणीव ठेवावी दरवर्षी शासनाकडुन महानगरपालिकेला निधी उपलब्ध होतो. त्यातुन ज्याला हे प्रशासन अनधिकृत म्हणते त्या वसहातीत ड्रेनेज लाईन, लाईट रस्तेची कामे झालेली आहे. पाण्याच्या टाकीचे काम चालु आहे. आजच का मनाई होत आहे. प्रशासनाच्या निदर्शनास आणुन देतो की, १९८८ पासुन लोक प्रतिनिधी म्हणुन नगरसेवकाची निवड केली जाते. तेव्हा पासुन सभागृहात लोकप्रतिनिधीनी आवश्यकतेनुसार बदल केले नियमात बदल केले. ठराव पास केले त्यांची अंमल बजावणी प्रशासन करणार नाही काय, मा. महापौर यांनी सभागृहाच्या वतीने घेतलेला निर्णय प्रशासनाने

मान्य केलाच पाहिजे व त्याची ताबडतोब अंमलबजावणी करण्याचे काम प्रशासनाचे असते. आणि जर प्रशासन झालेल्या निर्णयाची अंमलबजाणी करत नसेल तर त्या संबंधी कायदेशीर चौकशी करुन कार्यवाही केली पाहिजे. चौकशी करण्या संबंधीचे आदेश देण्याचे अधिकार या सभागृहाला असुन त्याचा पुर्णपणे वापर करा. आम्ही सर्व स. सभासद आपल्या पाठीशी आहेत. नियमावली नुसार नगरसेवकांचा निधी वापरण्या संदर्भात जवळ-जवळ सर्व ८३ वार्डातील स. सभासदांनी पत्र देऊन कामे व्हावी म्हणुन पत्र दिलेले .यात ड्रेनेज मुरुम टाकणे, पाणी लाईन, रस्ते दुरुस्ती अशी वेगवेळी कामे नमुद केली. कुठेही म्हणावे तसे काम झालेच दिसुन येत नाही. कोणत्या वार्डात किती रक्कमेची स्वेच्छानिधीतुन कामे झाली यांचा संपुर्ण तपशिल माझ्याकडे आहे तो मी सभा संपल्यानंतर आपणांस दाखविणार आहे ४०-५० हजाराच्या वर आता पर्यन्त निधीचा वापर केलेला नाही. चालु आर्थिक वर्ष संपण्याची वेळ आली यावरुन असे दिसुन येते की, प्रशासन हे सभागृहाची दिशाभुल करत असुन कोणतीच विकास कामे होऊ देईनात शासनाच्या निधीतुन अनेक इमारती तसेच मोठ मोठया वास्तु झालेल्या आहेत त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर,छत्रपती शिवाजी महारज वस्तु संग्रहालय डॉ. अब्दुल कलाम संशोधन केंद्र, तसेच सामाज मंदिरे बॅडमिटंन हॉल हॉस्पीटल अशा इमारती झाल्या. उद्घाटने केली कोणशिला लावला नारळ फोडले म्हणजेझाले का ? तेथील कारभार चालु आहे का ? तेथील नागरिकांना सुविधा उपलब्ध करुन दिल्या का ? प्रशासनाच्या निदर्शनास आणुन देते की ज्योतीनगर येथे हॉस्पीटल सुरु करण्यासाठी एक इमारत बांधलेली असुन आज काय अवस्था त्या इमारतीची आहे महानगरपालिकेच्या मालकीच्या किती इमारती शहरात अस्तीत्वात आहे हे सुध्दा प्रशासनाला सांगता येणार नाही. लाखो रुपये खर्च करुन इमारती केल्या त्याचा पुर्ण आज पर्यंन्तचे व्याजसह रक्कम काढल्यास महानगरपालिकाचे खुप मोठया प्रमाणात नुकसान झाल्याची दिसुन येईल यास महापौर किंवा सभागृह जबाबदार नसुन प्रशासन जबाबदार आहे. कार्यवाही करत नसुन झोपलेले आहे. म्हणुन प्रशासनाला जबाब विचारण्याची या सभागृहाला वेळ आलेली आहे बरेच स. सदस्य ड्रेनेज, पाणी, इतर विकास काम बाबत समस्या मांडतात अधिकारी सांगतात संचिका वरिष्ठाकडे मंजुरीला गेली. एखादी ड्रनेज लाईन चोकअप होते व त्यासाठी मंजुरी लागते हे बरोबर नाही. माझ्या माहितीप्रमाणे या सभागृहाने कार्यकारी अभियंता अधिकारी दर्जाच्या ३ अधिकारी यांना २५ हजार रुपया पर्यन्तचे काम करण्याचे अधिकार दिले होते त्यानुसार अधिकार दिले असेल व फाईल वरिष्ठाकडे गेली असे सांगितले जाते अशा अधिकाऱ्यावर कार्यवाही झाली पाहिजे व खरी काम बाजु आहे याचाही खुलासा झाला पाहिजे. प्रत्येक फाईलसवर चर्चा करावी असे रिमार्कस् कशासाठी अधिकाऱ्यांना अधिकार दिले तर ४,५ हजार रुपयापर्यन्तची कामे कशासाठी थांबुन आहेत, सभागृहाचे असे मत नाही की, ठराविकच एजन्सीकडुन काम करुन घ्यावे नियमाने करावे अशी आमची मागणी आहे कोणत्या विकास कामासाठी ठराविक वेळे दिला पाहिजे जेणे करुन ते काच त्या मुदतीत झालेच पाहिजे. ठराव पास होऊन त्यांचे टेंडर निघाले किती दिवसात निघावे. कार्यकारी

अभियंता यांचेकडे किती दिवस संचिका, मा. आयुक्त यांचेकडे किती दिवस संचिका होती एजन्सीज कडुन किती दिवसात काम करावयाचे यांचा गेल्या सहा महिन्यापुर्वीचा माहिती प्रशासन देऊ शकेल का ? माझ्यामते प्रशासनाकडे कुठलीच अचुक माहिती नाही. त्याचे उदाहरण घ्यावयाचे झ ााल्यास परवाच एका पाण्याचे टाकीचे उद्घाटन केले. सदर टाकीचे टेंडर प्रस्ताव १९९९ च्या डिसेंबर मध्ये झाला आज कामास सुरुवात होते. इतका उशीर कशासाठी मोठी मोठी कामे हाती न घेता जास्त पैसा खर्च न करता वार्डातील जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने लहान-लहान रक्कमेची कामे व्हावीत. मागे एकदा झाल्टा प्लॅन संदर्भात अधिकारी यांनी खुलासा केला होता की, झाल्टा ट्रीटमेंट प्लॅन्ट होणे अत्यंत गरजेचे असुन तेथील लोकांचा मोर्चा पण आलेला होता व जनतेच्या आरोग्याचा विचार करता ही योजना होणे योग्य वाटते परंतु ११ महिन्याचा कालावधी निघुन गेला टेंडर झाले कधी काम झाले, काय कार्यवाही केली माहित नाही स्पष्ट दुर्लक्ष्ज्ञ केले आहे हाती घेतलेली कामे अपुर्ण राहत असतील तर यात पैसा खर्च होऊन ही जनतेची निराशा होते. अशा कामावर प्रशासनाकडुन दुर्लक्ष होते. प्रत्येक विभागाची तीच परिस्थिती आहे, आताच काही स. सदस्यांनी शिक्षण विभागा संदर्भात चर्चा केली एक वर्षापुर्वी या सभागृहाने तसेच शासनाने ४५ ते ५० शिक्षक भरण्या बाबत मंजुरी दिलेली आहे. शैक्षणिक वर्ष संपत आले कार्यवाही झाली नाही या संबंधी आयुक्तांना प्रत्यक्ष चर्चा केली तर मंजुर शिक्षक पदास पुन्हा शासनाची मंजुरी घ्यावी लागेल कारण शासन मंजुरी पासुन ६ महिन्याच्या आत कोणतीही पदे मंजुर होऊन आल्यास भरावी लागतात. असा नियम आहे. प्रशासनाला नियम माहित नाही काय ? सहा महिन्याच्या आत का पदे भरली नाही. पुन्हा का मंजुरी घेण्याची गरज पडली यास प्रशासन दोषी आहे. चांगले काम करण्याचा प्रशानाचा विचार नाही. सार्वजनिक बांधकाम खात्याचा विचार केला तर एका कार्यकारी अभियंत्यावर ८ कोटीचे कामे लागतात. जवळपास ४० कोटीचे कामे करण्याचे बजेट असते. त्यांचे कार्यक्षेत्र ७० ते ८० कि.मी. पर्यन्त असते. आणि महानगरपालिकामध्ये किती कार्यकारी अभियंताची गरज आहे. हे तपासयाला पाहिजे. पाणी पुरवठा जीवन प्राधीकरणाकडुन महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाला आहे व तेथील कर्मचारी एक वर्षासाठी आपल्याकडे घेतले गेले व आपल्या विभागातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्या ठिकाणी नेमण्यात येईल असा ठराव झाला किती कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले याकडे प्रशासनाचे लक्ष आहे काय योग्य असा खुलासा करावा चांगल्या गोष्टीकडे जनतेच्या महत्वाच्या बाबीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे असे दिसुन येते. अनधिकृत वसाहत म्हणुन विकास कामे थांबुन चालणार नाही. महानगरपालिका निधी, स्वेच्छा निधी, आमदार निधी, खासदार निधी, तसेच शासकिय अनुदान इ. मधुन कामे झालीच पाहिजे. शहराचे आमदार श्री. दर्डा साहेब यांनी एक पत्र देऊन चिश्त्तिया कॉलनी मध्ये रस्ते देखभाल दुरुस्ती स्वेच्छा निधीतुन करावा असे पत्र दिले परंतु त्या संचिकेवर रिमार्कस् आला की सदर वसाहत अनधिकृत आहे जर ती अनाधिकृत वसाहत आहे तर या अगोदर त्या वसाहतीत ड्रेनेज पाणी, इ. सुविधा देण्यात आल्या व त्यासाठी जवळ पास ४ लाखाचे लाईट दिवे, पोल लावले इ. कामासाठी

रुपये खर्च केले. त्यावेळेस अनधिकृत वसाहत नव्हती काय ? याचा खुलासा व्हाववयास पाहिजे. आताच माजी महापौर यांनी सांगितले नेहरु नगर येथे विकास कामासाठी ९,२०,०००/- खर्च केले. रस्ते आहेत, स्ट्रीट लाईट आहेत परंतु ५,२०,०००/- ची एक संचिका डिसेंबर-९९ मध्ये स्थायी समिने मंजुर केले होती. त्यावेळी असे सांगण्यात आले सदरचे काम येणाऱ्या शासकिय अनुदानातुन करण्यात येईल परंतु आतापर्यंन्त कार्यवाही नाही जर त्याभगामध्ये ड्रेनजे, पाणी लाईन, दिवे इ. सुविधा दिलेल्या असेल तर आताच का अशा संचिका मंजुर होत नाही. प्रशासनाकडुन स्पष्ट खुलासा झ ाला पाहिजे की, गेल्या १,२ महिन्यामध्ये शासनाचा असा जी.आर. आलेला की, कोणतीही विकास कामे सदर वसाहती अधिकृत आहे कामे करुन नये. जर परिपत्रक आले असेज तर दाखववे नसता पुर्वी ज्या धरतीवर कामे केली त्याप्रमाणे करावी कामे न झाल्यास लोकप्रतिनीधी व जनतेचा अवमान झाल्या सारखे होईल. प्रशासनातील अधिकारी काय कामे करतात. हे सभागृह ओळखुन आहे. वाद निर्माण करुन सभा तहकुब करण्याचा बेत आहे. यावर्षीची सगळीच कामे झाली. पाहिजे ती होणे जरुरी आहे लहान-लहान कामे कित्येक दिवस थांबुन राहतात. नगरसेवकांना नेहमी सुचना करण्याची गरज पडते नगरसेवक मजबुर होतो कामे होण्यासाठी स. सभास दांची पोटातिडकीने प्रश्न उपस्थित करतात व आपले मत व्यक्त करतात. याची जाण प्रशासनास असावयास पाहिजे. अनाधिकृत वस्त्याचा या अगोदर कामे केली आहे म्हणुन आता सुध्दा मागणी नुसार विकास कामे करणे जरुरी आहे. जे प्रस्ताव मान्य होतात त्यांची अंबलबजावणी झाली पाहिजे. प्रस्ताव मंजुर होऊन ७ महिन्याचा कालावधी उलाटला तर काही कार्यवाही झाली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर मध्ये ज्या ज्या समस्या होत्या तेथील साहित्य उपलब्ध करुन दयावे असा निर्णय झालेला असतांना काहीही केलेले नाही. मोठमोठया वास्तु, इमारती झाल्या, उद्घाटने झाली. प्रत्यक्ष कामास सुरुवात नाही. मोठया प्रमाणात खर्च झाला त्याचे व्याजासहित हिशोब केल्यास नुकसान झाल्याचे दिसुन येते त्यास दोषी कोणास धरावे प्रशासनाने कामाची दिशा ठरवावी व कामे करावी.

श्री. अंबादास दानवे : प्रामुख्याने अनाधिकृत वस्त्यामध्ये स्वेच्छानिधीतुन कामे करण्या संदर्भात बऱ्याच स. सभासदांना आपआपल्या भावना व्यक्त केल्या तत्कालीन आयुक्त बलदेवसिंग यांचा प्रभारी आयुक्त म्हणुन श्री. चहल यांचेकडे दिवस पदभार होता त्यावेळी सर्वसाधारण सभेत अनाधिकृत वस्त्या संदर्भात चर्चा झ ाली होती व त्या अनपुषंगाने श्री. चहज यांनी अनधिकृत वस्त्यामध्ये स्वेच्छा निधीतुन कामे करता येतील असा खुलासा केलेला असतांना सुध्दा आज स्वेच्छानिधीतुन अनाधिकृत वस्त्यामध्ये विकास कामे होण्याच्या संचिकेवर रिमार्कस् येतात विकास कामे थांबण्याचा हा प्रकार आहे प्रशासनाने लोकप्रतिनिधी तसेच जनता यांचेशी खेळु नये विकास कामे झाली पाहिजे. शहरात २ ते २.५० लाख लोक आनधिकृत वस्त्यामध्ये राहतात व या भागातील जनता मालमत्ता कर, पाणी पट्टी इ. कर भरतात इतर निधीतुन नाही तर किमान स्वेच्छा निधीतुन विविध कामे करण्यास प्राधान्य दयावे. असे सभागृहाचे मत झाले आहे. स. सदस्यांच्या स्वेच्छानिधीतुन ड्रायव्हींग, संगणक प्रशिक्षण देणार होते. तसा निर्णय घेतलेला असतांना सुध्दा ७

महिन्याचा कालवधी गेला व चालु वर्ष समाज होण्याच्या वेळ आली तरी सुध्दा काही कार्यवाही केली नाही. महानगरपालिकेच्या प्रत्येक शाळेमध्ये मुलांना संगणक प्रशिक्षण असावे असे शासनाचे धोरण आहे काहीच कार्यवाही नाही. सभागृहात बऱ्याचदा चर्चा होते. आता आज सुध्दा स. सदस्यांनी वेगवेगळे प्रध्दतीने प्रश्न मांडले. सभागृहात चर्चे अंती ठराव मंजुर होतात. अंमलबजावणी होत नाही का होत नाही चर्चा केल्यास अदयाप प्रशासनाने उत्तर दिले नाही. सर्वे नं. ८ वरुन १५ मध्ये अनाधिकृत बांधकाम केली सभागृहात चर्चा झाली. अहवाल देऊ सांगितले असतांना अदयाप सभागृहात अहवाल दिला नाही. जुन महिन्याच्या सर्वसाधारण सभेने वार्कीग व अनधिकृत प्लॅट्स याची माहिती विचारली होती ती मिळाली नाही. जेटींग व बुलडोझरचे काय झाले. अधिगृहीत केलेल्या जागा महानगरपालिकेच्या नावावर नाही. याचा खुलासा पुढील सभेत पण होणार नाही. १९९५ च्या नंतरच्या अनाधिकृत किंवा अगोदरच्या वस्त्यात विकास कामा संदर्भात चर्चा चालु आहे. परंतु अधिकृत वस्त्यात किती प्रमाणात कामे केली त्याचीच माहिती अगोदर दयावी. १९९५ च्या अगोदरच्या वसाहतीचा शासन आदेश नुसार सर्व्हे केला असता तर आज, ही वेळ आली नसती चर्चा करावी लागली नसती. शासनानी काढलेल्या जी.आर. नुसार १८ खेडयांमध्ये जी.आर. कार्ड देणेचा चांगला निर्णय घेतलेला होता. कार्यवाही नाही. विकास कामा संदर्भातील सर्व संचिकेची तयारी कार्यवाही अभियंता करतात सदर कामाची संचिका टेक्नीकल सेलकडे जाते. संचिकेवर रिमार्क येतात व कामे थांबुन राहतात वेळ लागते. सभागृहाच्या वतीने मी असे सांगेन की उच्च पदाचे कार्यकारी अभियंता असतांना त्यांना सर्व माहिती आहे. त्यांना सर्व संचिका वर अंतिम मंजुरीचे अधिकार दयावे जेणे करुन त्यांनाच जबाबदार धरता येईल. टेक्नीकल विभाग बंद करुन टाकावा कारण, उदया काही झाल्यास कुणास जबाबदार धरणार, कार्यकारी अभियंतानाच जबाबदार धरावे. तांत्रिक कक्षात नाही. माझ्या वार्डामध्ये एका १५ ते १७ हजाराच्या कामाच्या संदर्भात संचिका मंजुरीस गेली. १००% एरिया लिगल असतांना हा भाग लिगल आहे का ? असा रिमार्क येतो. त्यामुळे होणारे काम १ महिना उशिरा झाले. अधिकाऱ्यांनी सविस्तर लिहावयाचे असते. संचिका मंजुरीला गेल्यास पुर्ण माहिती देऊन दिली गेली पाहिजे ही जबाबदारी खालच्या अधिकाऱ्याची, विनाकारण रिमार्क करणे बरोबर नाही. विकास कामे होणे गरजेचे आहे. सध्याचे प्रशासन पुर्णपणे थंउावलेले असुन लहानशा कामाच्या संचिकेसाठी स. सदस्यांना सुपदा चकरा माराव्या लागतात.१०-२० वेळेस फोनवरुन बोलावे लागते अशी परिस्थिती निर्माण झ ाली. आताच स. सदस्य श्री. कोकाटे यांनी सांगितले ७ महिन्याच्या काळात इतर महानगरपालिकामध्ये झालेली विकास कामाचा आढावा घेतलेला बजेट नुसार किती टक्के विकास कामे झाली याची माहिती घेतली आहे. या महानगरपालिकाचे रु. १२४ कोटीचे बजेट केले. प्रत्येकाचे बजेट ठरवलेले आहे. व त्यातील वसुली नुसार किती टक्के विकास कामे झाली. ५,१०,२०% याचा आढावा घेण्यासाठी त्या त्या कार्यकारी अभियंता कडुन माहिती घ्यावयास पाहिजे. परंतु कोणतीच कार्यवाही होत नाही. "डोळे असुन आंधळे कान असुन बहिरे, तोंड असुन मुके" अंधळे,मके, बहिरे

प्रशासनाला निट करण्याचे काम हे सभागृह बरोबर करेल. परंतु सभागृहाने संय्यम बाळगला आहे याची जाणीव ठेऊन विकास कामे करण्यात यावी ज्या सुचना केल्या त्या वर निर्णय घेण्यात यावेत.

श्री. रतनकुमार पंडागळे : छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालयामध्ये पुरवार नावाच्या व्यक्तीला महानगरपालिकातर्फे ७ हजार रु. मानधन देण्यात येते तसेच त्याच्या मुलाला सुध्दा ५,०००/- रुपये महानगरपालिका देते. २४ डिसेंबर ९९ डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर उद्घाटन झाले. एक कर्मचारी देऊ शकले नाही एका ठिकाणी देता एका ठिकाणी नाही असा भेदभाव का ?

मा. महापौर : सभागृहात अनाधिकृत अधिकृत वस्त्यामध्ये विकास कामे व्हावे व स्वेच्छा निधीतुन अनाधिकृत वस्त्यात कामे करता यावी. या विषयावर २ तासापासुन चर्चा चालु आहे. विशेषत: स्वेच्छानिधीतुन कामे व्हावीत म्हणुन चर्चा केली त्यात बरेच वेगवेगळया स्वरुपात प्रश्न विचारलेल्या त्याची नोंदी मी घेतली आहे. त्याचा सुध्दा खुलासा प्रशासनाकडुन घेणार आहोत. वार्डात कामे होत नाही म्हणुन सर्वच स. सदस्य संतप्त झाले असे दिसुन आले प्रत्येकांने आपआपल्या भावना व्यक्त केल्या या चालु वर्षात महानगरपालिका सर्वत्रिक निवडणुका झाल्यानंतर पदाधिकारी निवडणुका झाल्या त्यानंतर आयुक्तांच्या झालेल्या बदल्या हया वेगवेगळया कारणाने झाल्या असतील विकास कामास उशीर झाला याची आपणा सर्वांना कल्पना आहे परंतु आता यापुढे उशीर करता विकास कामास सुरुवात करावी. अशी सर्वांची भावना आहे नगरसेवक वेगवेगळे प्रश्न घेऊन अधिकाऱ्याकडे जातात कामे होत नाही, असे समजल्यामुळे भावना व्यक्त केल्या मी आपल्या मताशी सहमत आहे. कामे होत नाही ती करावी आणि ती झालीच पाहिजे स्वेच्छा निधीतुन अधिकृत असो अनाधिकृत असो मागील वर्षी कामे केली आहे विशेषत: सिडको येथे पाण्याची कामे केली आहेत. आताच सभागृह नेता यानी सांगितले की, १९९५ च्या अगोदरच्या ज्या वसाहती झाल्या त्या अधिकृत आहे असे आम्ही समजतो शासनाच्या निर्णयानुसार आपण ठराव घेऊन निर्णय घेतलेला आहे. त्याचे पुढे काय झाले याचा खुलासा द्यावा.

२) अनधिकृत वस्त्यामध्ये किमान स्वेच्छानिधीतुन तरी कामे व्हावीत.

३) नागरिकांनी विकास कामासाठी २५% लोकवर्गणी व महानगरपालिकाचे ७५% असा खर्च करुन कामे करण्यास यावी असा ठराव मागच्या बॉडीने घेतलेला होता व त्यानुसार कामे झालेली आहे व झालीच पाहिजे असे सर्वांचीच भावना आहे म्हाडा कॉलनी हस्तातरण होऊन ५ वर्ष झाली तरी तेथे साफ सफाई होत नाही. त्याची कागद पत्रे नव्हती असे सांगितले जाते. सभागृहाने जे मत व्यक्त केले. त्यानुसार सर्वच विकास कामाच्या संचिका मंजुर कराव्या असे माझे मत आहे प्रशासनाचे काय मत आहे मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : प्रथम विनम्र निवेदन करायचे आहे मी जर बोललो "हम बोले तो बोलेगा के बोलता है" कृपा करुन माझी व्यथा समजुन घ्यावी. जेथे माणसे राहतात तेथे सुविधा देण्यास माझा वैयक्तीक विरोध नाही मात्र कोणतेही काम करतांना अधिकाऱ्यांना शक्ती प्रदान व्हावी लागते कामाच्या संदर्भात मा. महापौर यांचे दालनात माझ्यांशी व इतर पदाधिकारी यांची बैठक झाली. त्या बैठकीमध्ये अनाधिकृत वस्त्यामध्ये सुविधा पुरवण्या बाबत विषय निघाला होता. मला तर

येऊन २ १/२ महिने झाले आहे. आपण जो आढावा केला तो मागील ८ महिन्याचा आहे. मी सुध्दा किती अंदाजपत्रके स्वेच्छा निधीची कामे केली त्याचे विवेचन करायला तयार आहे पुर्ण यादी द्यायला तयार आहे. मागील वर्षीच्या तुलनेत जेव्हढया विकास कामाच्या संचिका माझ्या हातुन मंजुर झाल्या याची सर्व माहिती आपणास देऊ शकतो. परंतु मला थोडा वेळ द्यावा. किती कामे केली व वसुली किती केली याची सुध्दा माहिती देण्यात येईल. जकातीचे वसुली संदर्भात मागील वर्षीची तुलना केली असता गेल्या २ ते २ १/२ महिन्यात जास्त वसुली झ केलेली आहे. यात याच कालावधीत वाढ झाली असुन वाढीत मागील वर्षी १३.०७ कोटीची होती यावर्षी १५.०० कोटीची आहे. यात याच कालावधीचाच यात मोठा सिंहाचा वाटा आहे. त्याचप्रमाणे मालमत्ता व पाणीपट्टीत सुध्दा वाढ झ ाालेली दिसुन येईल वसुली वाढ होण्यासाठी निरिक्षक दर्जाच्या कर्मचाऱ्यासह दर १५ दिवसाला सभा घेतल्या इतर आयुक्तांना या लेव्हलवर सभा घेतल्या असतील नसतील ते मला माहित नाही परंतु माझा हा प्रयत्न राहिल. शेवटी उत्पन्न वाढले तरच विकासकामे होतील अशी माझी भावना आहे तो त्या माझ्या कामाची कसोटी हे ठरविण्याचा अधिकार माझे पेक्षा वरिष्ठ अधिकारी यांनाच आहे परंतु कोणत्याही अभिप्रायमुळे मी नाऊमेद होणाऱ्या अधिकाऱ्यापैकी नाही. जोपर्यन्त मी या पदावर आहे. तो पर्यन्त विकास कामे जलद गतीने झाली पाहिजे. ही माझी तळमळ आहे. दुसरी गोष्ट संचिका कशी पाठवावयाची,प्रपोजल कसे द्यायचेक याची शिस्त विभाग प्रमुखांना लागली पाहिजे. प्रपोजल कसे पाठवावे हे सांगण्याची त्यांना गरज भासते. आताच काहीनी सुचना केल्या रिमार्कस् येतात मान्य आहे. रिमार्कस् येतात परंतु २०% संचिकेवर रिमार्कस् असतील ८०% संचिका मंजुरी झालेली आहे. जाणकार व्यक्तीत रिमार्कस् दाखवले तर त्याचे गांभीर्य त्यांचे सहज लक्षात येईल. आताच एका सदस्यांनी सुचनेव्दारे सांगितले मागील काम कधी झाले असे रिमार्क आले जर समजा मागील झालेले काम ६ महिन्यापुर्वीच झालेले असेल व मी त्या बाबतीत दखल घेतली नाही मी सुध्दा त्यात दोषी आहे. असे सिध्द होऊ शकते. म्हणुन मागील कामे कशी झाली माझे कर्तव्य आहे. आता नसतील दोषी असतील तर संबंधीत अधिकाऱ्यांवर कार्यवाही करणे हे सुध्दा माझे कर्तव्य आहे. आता विभाग प्रमुखांना परिपत्रक काढण्यात आले आहे की ३ दिवसाच्या वर कोणाकडे संचिका पडुन राहता काम नये मागे काय झाले त्याचे मला माहित नाही. परंतु मी जो पर्यन्त आयुक्त म्हणुन आहे तो पर्यन्त -------- होणारी कामे करण्याचा माझ्या प्रयत्न राहिल व अशी कामे ही तात्काळ करील मागे अधिकृत वसाहतीत विकास कामे झाल्याचा दाखला सदस्यांनी दिला परंतु या संदर्भात मी काही महानगरपालिकेच्या आयुक्तांशी चर्चा केली. आपणास पुन्हा सांगु इच्छितो की ज्या ठिकाणी माणसे राहतात त्यांना सुविधा देणे गरजेचे आहे त्यास माझा वैयक्तीक विरोध नाही. फक्त शासनाच्या अनुमतीची मला गरज आहे. अनाधिकृत वसाहती आहेत तेथे मा. आमदार, मा. खासदारांचा सुध्दा निधी खर्च करता येत नाही या संबंधी मी नियोजन विभागाकडे खुलासा केला आहे शासनाकडुन मला अधिकार शक्ती प्राप्त झाली तर प्रश्न सोडविण्यात येतील. आपण जो मुद्दा उपस्थित केला त्यानुसारच तोच मुद्दा मी शासनाकडे पाठवलेला पासुन त्यासाठी स. विरोधी पक्ष नेता यांनी मदत केली तर शासनाची अशा वस्त्यामध्ये कामे करण्याची परवानगी तर तात्काळ कार्यवाही होईल. मी

आश्वासन देतो की, कोणत्याही नगरसेवकांचा स्वेच्छा निधीतील १ पैसाही वाया जाऊ देणार नाही नगर सचिव यांनी कृपया याची इतिवृत्तात नोंद घ्यावी. स्वेच्छानिधीचे अनुज्ञेय तेथे तातडीने कामे होतील ४८ तासात मंजुर झाले पाहिजे. निम्नस्तरावर जे अधिकारी अधिकाऱ्यांनी काळजीपुर्वक कोणतेही काम करावयाचे असते. जनता चांगली लोकप्रतिनिधीही चांगले येणारे प्रपोजल माझ्याकडे येतांना बारकाईने लक्ष ठेवुन येणारे प्रस्ताव व्यवस्थित येतात की नाही. यासाठी मी एक परिपत्रक काढलेले त्याची प्रत मी आपणास दाखववायसा तयार आहे. कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव द्यावयाचा असतो त्यातील १,२,३,४,५ क्रमांकानुसार कोणत्या बाबी कशा नमुद करावयाच्या हे मी परिपत्रकाव्दारे कळविलेले आहे. मुदत वाढ संचिका असेल तर मुदतवाढ कुणाच्या दिरंगाईने झाली प्रशासनाच्या की ठेकेदाराच्या हे शोधुन काढावे लागते जर ठेकेदाराची चुक असेल तर दंडात्मक कार्यवाही करावी लागेल. सर्व अधिकाऱ्यांना सुध्दा सभागृहाच्या साक्षीने सांगु इच्छितो की व्यवस्थितरित्या संचिका माझ्याकडे सादर झाल्या तर ताबडतोब मंजुर होतील यासंबंधी स्थायी समितीच्या बैठकीत सुध्दा बोललो. ज्या संचिकेस उणिवा असतील. अशा संचिका ४८ तासाच्या माझ्याकडे पडुन राहिलेल्या नाहीत. आज सुध्दा माझ्याकडे फक्त ६५ संचिका प्रलंबित असुन त्या ठेकेदाराच्या ९८ लाखाच्या निविदा संदर्भात आहे ठेकेदाराच्या ३ कोटी ४० लाख रुपयांच्या बिलाच्या संचिका १ महिन्यात मंजुर केल्या कारण त्यांनी कामे केली पाहिजे. व कोणतीही विकास कामे थांबवु नये म्हणुन मागील महिन्यात बोनस दिले फेस्टिवव्हल, ॲडव्हास दिले जवळपास ७-८ कोटी रुपये वाटप झाले आता पुन्हा १.१० कोटी रु. विज बिलापोटी भरावयाचे आहेत नसता २२ नोव्हेबर २००० ला विज बंद करण्याची नोटीस दिलेली आहे १ तारखेला कर्मचाऱ्यांना पगार द्यावयाचा आहे. एका बाजुला आर्थिक स्थितीला बघ्यावे लागते स. सभासद प्रशासनाच्या पाठीशी राहिजे तर आमची हिम्मत वाढेल वसुलीचा विचार केल्यास १५ कोटीची मालमत्तेची वसुली करावयाची आहे . कोटी थकबाकी ७-८ कोटीचे पाणीपट्टी बाकी आहे आतापर्यंन्त ३.५० ते ४ कोटी मालमतेचे करापोटी मिळालेले आहे मागील २ १/२ महिन्याचा कालवधीचा विचार केल्यास भरीव अशी वसुलीत वाढ झालेली आहे असे मी छातीठोकपणे सांगतो. काही आक्षेप माझ्यावर येतात मी नाऊमीद झालेलो नाही. माझ्याकडुन स. सदस्यांना आदरपुर्वक वागणुक देण्यात येते. कुणी स. सदस्य माझ्याकडे भेटीसाठी कोणत्या कामासाठी ४ वेळेस जरी दिवसातुन भेट घेण्यास आले तरी त्यांचेशी चर्चा करण्याची तयारी या आयुक्तांनी ठेवली आहे. मी त्याचवेळी काही संचिका संदर्भात त्या मागवुन प्रत्यक्ष आपल्या समोर काही संचिकेवर मंजुरी दिलेली आहे. याची जाणीव काही स. सभासदांना आली असेल अस्याई निर्णय प्रक्रियेची व्यवस्था गतीमान झाली असे म्हटले तर वावगे होणार नाही. प्रकरणात त्रुटी काढल्या जातात. त्यामुळे अधिकाऱ्यांना कळावले की आयुक्त मागील कामाची माहिती मागवतात त्यामुळे मुळातच येणारी संचिका सविस्तर माहितीसह आता सादर होतील या अगोदर काही कामे मागवतात त्यामुळे मुळातच येणारी संचिका सविस्तर माहितीसह आता सादर होतील. या अगोदर काही कामे झाली त्याचे कम्पीशन सर्टीफीकेशन दिलेले नाही मग ती कामे झाली किंवा काय याची माहिती घेणेही जसे ऑडीटर काढतात तशीच आयुक्तांची सुध्दा जबाबदारी असते. आताच शहानुरवाडी

येथील पुर्नडांबरीकरणा संदर्भात मुद्दा उपस्थित केला या संबंधीची चौकशीसाठी विभागीय आयुक्तालयाकडुन स्पेशल ऑफिसर ऑन डयुटी यांची नियुक्ती केली त्यांचे अनुज्ञेय खर्च देण्याची तयारी दर्शविली आहे. एका बाजुला आर्थिक स्थिती बघावी लागते. ती बळकट करणे व दुसरी बालु कुण्याही स. सदस्य पदाधिकारी याचा उप्रत्यक्षपणे सुध्दा आपमान न होता त्यांना आदरपुर्वक वागणुक देणे माझ्या ३३ वर्षाचा अनुभव पाहिला तर मी निक्षुण आश्वासन देतो की, अधिकाऱ्यांनी ज्या पेडींग संचिका असतील त्याबाबत तात्काळ निर्णय घ्यावेत. प्रशासन लोकप्रतिनिधी वेगळे नाही अनाधिकृत वस्त्यात या अगोदर स्वेच्छा निधीतुन कामे केली आहे. हया संदर्भात एक महिन्यापुर्वी शासन नगर विकास विभागाकडे पत्र पाठवुन मी मार्गदर्शन मागवले आहे. सर्व पदाधिकापऱ्यांना विशेषतः स. विरोधी पक्षनेता यांनी या बाबतीत लक्ष घालुन शासनाची मंजुरी मिळुन घ्यावी कोणत्याही महानगरपालिकेत अनाधिकृत वस्त्यात सुविधा देण्यास पायबंद आहे त्याचे कारण असे की अशा सुविधा दिल्या तर अनधिकृत वस्त्या वाढतील दुसरी एक गोष्ट अशी की १.१.९५ या तारखेला विधान सभेच्या मतदार याची आपण मागवलेली आहे ती घेऊन १ डिसेंबर पासुन आपण अनधिकृत झोपडपटयाचे सर्व्हेक्षण करण्याचे प्रस्तावित आहे. सर्व्हेक्षण १.१.९५ च्या अगोदरच्या अनाधिकृत मुलभुत गलिच्छ वस्त्या आहेत त्या अधिकृत करावयाच्या दृष्टीने कार्यवाही करावी लागेल व घोषित झाल्या तर तेथे मुलभुत सुविधा देण्यास शासनाने मान्यता दिली आहे.अनाधिकृत वस्तीतील विकास कामे घेण्याबाबत जर मान्यता आली याच्या दुसऱ्या दिवशी पासुनच विकास कामे स्वेच्छानिधी मधुन करण्याची अनुमती दिली. परंतु त्यासाठी शासनाने आदेश आपल्या सहकार्यांची मला गरज आहे. अधिकृत वस्त्यामधील कामासाठी कोणताही प्रश्न येण्याची गरज नाही. एकुण १७-१८ कोटीचे प्रस्ताव दाखल झालेले आहेत.८ कोटी ३२ लाखांचे ३५५ कामे असुन त्यापुर्वीचे ४५९ कामे होते. १.४.२०००. ते ३१.८.२००० पर्यंन्त ४५९ कामे सबमीट झाली होती व १.९.२०००. ते १७.११.२००० पर्यंन्त ३५५ कामे सादर झाली होती . हा विषय सभागृहात निघेल याची मला कल्पना असती तर वार्डनिहाय काम निहाय, नगरसेवक निहाय कोणती कामे झाली याची माहिती तयार करुन सभागृहात आपल्या समोर ठेवली असती. निवडणुकीची आचारसंहिता संपली बलदेवसिंग यांची बदली झाली व अगोदरच्या प्रलबित संचिका व नंतरच्या संचिका सुध्दा माझ्या काळात समोर आल्या सर्व कामाचा भार माझ्याकडे आला. सुरुवातीला १०० ते १२० संचिका दररोज निकाली काढल्या प्रत्येक फाईलचा अभ्यास करुन निर्णय घ्यावे लागतात. चिकाटीने काम करणे गरजेचे आहे प्रशासन पारदर्शक असले पाहिजे व कोणतीही कामे करतांना संचोटी लागते. आपल्या सर्वांची सहकार्याची प्रशानास गरज आहे.

श्री. जयवंत ओक : जवळपास ४०-५० वर्षापासुन ६० अनाधिकृत वस्त्या आहेत. महानगरपालिका आस्तित्वात आल्यात १३-१४ आयुक्त बदलुन गेले. त्यांनी आतापर्यंन्त सुविधा दिलेल्या आहे. कोणत्या नियमाने दिल्याचे विद्यमान आयुक्तांनाच शासनाची परवानगी कशासाठी प्रभारी आयुक्त म्हणुन चहल साहेबाकडे पदभार केला होता ते बैठकीत उपस्थित असतांना आनाधिकृत वस्त्या बाबत मुद्दा उपस्थित झाला त्यांनी सुध्दा कामे करण्यास सम्मती दिली होती. नविन कामे स्वेच्छा निधीतुन व्हावी. म्हणुन मागणी करत नसुन कामावर देखभाल दुरुस्तीची कार्यवाही स्वेच्छा निधीतुन करावे अशी सभागृहाची मागणी

आहे प्रशासनाने वेगळा अर्थ काढु नये. श्री. बलदेवसिंग आयुक्त म्हणुन आले ------- त्यांचे समोर सुध्दा हा प्रश्न होता यांनी टेक्नीकल विभाग स्थापन केला त्यानुसार स्वेच्छानिधीतुन अनाधिकृत वस्त्यात कामे झालेली अगोदर केली आताच का नाही सुविधा दिल्या नाही तर २ ते ३ लाख जनता आपल्याकडे मोर्चा घेऊन येतील सुव्यवस्थेची बाब निर्माण होईल यास प्रशासन जबाबदार राहिल. ५३ स्लम असुन ६० अनाधिकृत वस्त्या आहेत. या वस्त्यात कामे का करत नाही. शासनाचा जी.आर. आलेला आहे का असल्यास खुलासा करावा सभागृहाने १.१.९५ च्या अगोदरच्या वसाहतीत विकास कामे करण्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला १९९५ च्या अगोदरचा वस्त्या सर्व्हे करुन तेथील जनतेला मुलभुत सुविधा दयाव्यात असे शासनाने आदेश असतांना पुन्हा प्रशासनाला कोणते आदेश पाहिजेत. नगरसेवकांचा स्वेच्छानिधी कशासाठी असतो त्या सुचवल्यानुसार आवश्यतेनुसार वार्डास कामे करण्यासाठी असतो जर यातुन होणारी कामे व्यवस्थीत झाली नाही तर अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी. कामे करु नये असा शासनाचा जी.आर. आला असेल तर वाचुन दाखववावा. अनधिकृत वस्त्यापेक्षा काही अधिकृत वस्त्यांमध्ये सुध्दा विकास कामे झालेली नाही. का झाली ड्रेनेज,लाईट, पाणी सुविधा देत होतो. त्या वेळवर नाही. जनता मोर्चा घेऊन आली तर त्यात नगरसेवक सहभागी राहतील. जवळपास ५०% स. सदस्य अनाधिकृत वस्त्यातुन निवडुन आलेले आहे जनता व सभागृहाची भावना आहे की ड्रनेज,पाणी, लाईट, व रस्ते इ. सुविधा देण्यात याव्या. दसरा दिवाळी गेली लाईट विना सर्व शहर अंधारातच हे प्रशासनाचे धोरण बरोबर वाटत नाही. शासनाने १९९५ च्या अगोदरच्या वस्त्यांना अधिकृत करुन सुविधा देण्याबाबत कळविलेले असुन त्यानुसार सर्व्हे करावा व या अगोदर ज्या धरतीवर कामे केली त्यावर स्वेच्छा निधीतुन विकास कामे व्हावीत. पेपरबाजी होते आज या वार्डात उदया दुसऱ्या वार्डात येणार, कामे होत नाही तर भेट कशासाठी.

श्री. तकी हसनखान : विकास कामे करु नये असा शासनाचा जी.आर. असेल तर सभा घेऊन काय उपयोग शासनाचा निषेध का करु नये.

श्री. अंबादास दानवे : आम्ही पाठिबां देतो सेना व भाजपा सदस्य सभा त्याग करित आहे. त्याचवेळी भाजप सेना सदस्य सरकारचा निषेध असो अशा घोषणा देत सभा गृहाबाहेर निघुन जातात. वेळ दुपारी २.२० वाजता.

श्री. कोकाटे काशिनाथ : प्रशासनाच्या वतीने खुलासा केला. इतर महानगरपालिकेच्या संदर्भात बोलण्यात आले. शासनाकडुन परिपत्रक आले असेत तर शासन जबाबदार शासनाकडुन आले नसेल तर प्रशासन दोषी आहे. जर जी.आर. आले असेल तर दाखववावा. प्रशासनाच्या वतीने महाराष्ट्र शासनास बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे.

श्री. प्रकाश निकाळजे,श्री. अफसरखान यासीनखान : कोणत्या सरकारच्या काळात विकास कामे बंद करण्या संदर्भात जी.आर आली. त्याचा पण खुलासा करावा ६० वस्त्यामध्ये विकास कामे केलेली आहे. आताचा का बंद करण्यात येतात. शासन आदेशाची प्रत वाचुन दाखववावी.

श्री. तकी हसनखान : शासनाचा जी.आर. आहे म्हणुन वारंवार बोलुन निषेध होत आहे. जी.आर. नसेल तर कोणास जबाबदार धरावे कामे १ ते १½ महिना झाला पडुन आहेत.

मा. आयुक्त : मी माझ्या निवेदनात सुरुवातीलाच सांगितले आहे. १.१.९५ च्या तारखेच्या आधारित विधानसभा मतदार याद्या हातात घेवुन जेवढया अनाधिकृत गलिच्छ वस्त्या घोषित करावयाच्या त्याचे सर्वेक्षण करावे लागेल त्या अधिकृत वस्त्याची त्याी अधिसुचना काढावी लागेल त्यानंतर अनधिकृत वसाहतीत मुलभुत सुविधा पुरविण्याबाबत कार्यवाही होईल. संचिकेवर जे शेरे देण्यात आले. या संदर्भात मी माझे अभिप्राय दिले आहेत. कामे व्हायला पाहिजे यात वाद नाही व वैयक्तिक माझा विरोध ही नाही. कामे नियमबाहय होऊ नये यासाठी खबरदारी घेणे आवश्यक आहे शासनाच्या नगरविकास विभागास अनाधिकृत वस्तीत स्वेच्छानिधीतुन कामे करता येतील काय या संबंधीत पत्र लिहिले आहे. शासनाने दि. १.१०.९९ च्या जी.आर. मध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्व्हेक्षणाअंती १.१.९५ रोजी किंवा तत्पुर्वी आस्तित्वात अनलेल्या अनाधिकृत गलिच्छ वस्त्या रितसर अधिकृत करण्याची कारवाई करता येईल.

श्री. कोकाटे काशिनाथ : अनाधिकृत वस्त्यात कामे करावयाचे किंवा नाही याचा स्पष्ट खुलासा मा. आयुक्तांनी केलेला नाही. सभागृहातील आमचे सहकारी कुठल्या प्रकारची निश्चित माहिती न घेता सभात्याग करुन बाहेर गेले गैर समजुतीतुन निघुन गेले. सरकार कुणाचेही असो त्याचे घेणे देणे नाही परंतु जनतेची कामे होण्याच्या दृष्टीने अंमलबजावणी व्हावी हा हेतु समोर ठेवुन आपण चर्चा करत आहे निषेध करण्याची गरज नव्हती. १९९५ च्या अनधिकृत वस्त्यात अधिकृत करुन सुविधा दयाव्यात असा शासन जी.आर. आहे. त्यावर लोकशाही आघाडीच्या व घटक पक्ष एक होऊ सरकारने सदर अनधिकृत वस्त्यात काम करु नये असा जी. आर. आलेला आहे का त्याचा खुलासा करावा.

मा. महापौर. १ ऑक्टोंबर १९९९ चा जी. आर. आहे. १९८५ ते ९५ च्या मधील ज्या अनाधिकृत वसाहती आहे त्यांचा सर्व्हे करुन अधिकृत करण्यात याव्या व नंतर सुविधा दयाव्या असा शासनाचा जी.आर. आहे. त्यानुसार कार्यवाही करता येईल. जी.आर. निघुन एक वर्ष झाले.

श्री. कोकाटे काशिनाथ : सरकार कोणते होते हे न बघता जो जी.आर. आहे त्यात १.१.९५ च्या अगोदरच्या अनाधिकृत वस्त्यात कोणतीच कामे करु नये. असे नमुद केलेले आहे का ? कोणत्या दिवशी प्राप्त झाला, कोणत्या विधान सभेत पास झाला त्याची पण सविस्तर माहिती दयावी.

मा. महापौर : जी.आर. ची प्रत सर्वांना देण्यात येईल जी.आर. मोठा असुन वाचण्यात वेळ जाईल

श्री. कोकाटे काशिनाथ : प्रत न देता सभागृहात वाचुन दाखववावा व चर्चा करुन विकास कामे करणार की नाही याचा आजच निर्णय व्हावा शासनाना स्पष्ट उल्लेख आहे १.१.९५ च्या अनाधिकृत वसाहती आहे त्या भागात सर्व्हे करुन सुविधा द्याव्य असा स्पष्ट केलेले आहे. मागील काळात ९६-९७,९७-९८,९८-९९ च्या वर्षात अनाधिकृत वस्त्यात कामे केले. एक काम तर जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातुन अनाधिकृत वस्ती व पाण्याचे टाकीचे उद्घाटन केले. अधिकृत नव्हती. तर कामे कशी केली. आताही विकास कामे व्हावी.

मा. महापौर : शासनाचा जो १ ऑक्टो. ९९ चा जी.आर. प्राप्त झालेला आहे त्याची माहिती संबंधीत अधिकारी श्री. जावरे वाचुन दाखवतील. अनधिकृत वस्त्यात कामे व्हावतीत सर्वांची भावना आहे. परंतु प्रशासनाचे काम करण्याची इच्छा नाही. (याच वेळी सभागृहात मोठमोटयाने बोलणे चालु असे काही ही ऐकु येत नाही.)

श्री. स. अली मिरा सलामी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम १९४९ चे कलम ६६ नुसार स्वेच्छानिधीची कामे कशी करावी त्यात दिले आहे यावरुन शासनाच्या परवानगीची आपणांस गरज नाही. नगर सचिव यांनी अॅक्ट नुसार माहिती वाचुन दाखववावी जेणे करुन मा. आयुक्तांना सुध्दा त्याची माहिती मिळेल.

मा. महापौर : सचिव. अॅक्ट ६६ ची माहिती वाचुन दाखवतील.

नगर सचिव : (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ नुसार स्वेच्छानिधीची वापरा संबंधी वाचुन दाखवतात वे वात असतांना-------)

श्री. स. अली मिरा सलामी : आत्ताच सचिव यांनी थोडक्यात माहिती वाचुन दाखवली यावरुन असे निष्कर्ष निघतो की स्वेच्छा निधीचा वापर करता येऊ शकतो. कलम ६६ नुसार जे नियम केलेत त्यानुसार कार्यवाही व्हावी.

श्री. कोकाटे काशिनाथ : गुग्या,बहिऱ्या,आंधळया प्रशासनास पाठीशी घालण्याचा प्रकार बंद करा.

श्री. जयवंत ओक : १ आक्टो. ९९ ला प्राप्त झालेला शासनाचा जी.आर. वाचुन दाखवावा.

मा. महापौर : जी.आर. वाचण्यास वेळ लागेल सर्वांना प्रति देण्यात येतील आता सभा १० मिनीटांसाठी तहकुब करण्यात येते. (वेळ २.५० वाजता सभेला सुरुवात दुपारी ४.०० वाजता )

श्री. जयवंत ओक : शासनाचा जी.आर. ची प्रत सर्वाना मिळावी, स्वेच्छानिधीतुन कामे ड्रेनेज, लाईट, रस्ते, इ. सुविधा होण्याबाबतचा जी.आर. प्रत सर्वांना द्यावी. सिडको, हडको नोटी फाईड एरिया मध्ये स्वेच्छानिधीतु कामे व्हावी.

श्री. घडामोडे भगवान : अनाधिकृत वस्त्यात सुविधा पुरविण्याबाबत चर्चा झाली त्यानुसार आयुक्तांनी खुलासा केला, जकात वसुली वाढली. अधिकाऱ्यांना शिस्त लागले, अधिकृत वस्त्याच्या फाईल तात्काळ निकाली निघतील. अधिकारी संचिका व्यवस्थित पाठवतील हे सर्व सभागृहाला मान्य आहे. परंतु अनाधिकृत वस्त्यात काम केले. नाही तर जनतेची मोर्चे निदर्शने निघतील त्याचा परिणाम म्हणुन कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने काय हाल होतील याची जाणीव ठेवावी. शहर व काळ होईल समजा एखादे काम अनाधिकृत वस्तीला लागुन आहे. घाण साचली ती वस्ती अधिकृत आहे तर अशी कामे करणार नाही काय ? शासनाची मंजुरी आहे सर्व्हे करण्याचे काम करावे तेथील कामे सुरु करावी.

श्री. अंबादास दानवे : मा. आयुक्तांना --------असे शब्द वापरण्यात आले ते कामकाजातुन वगळण्यात यावे. सभागृहात भावनेच्या बोलले असेल तर त्याबद्दल माफी मागण्यात येते.

श्री. कोकाटे काशिनाथ : १.१.९५ च्या अगोदर वसाहती अधिकृत समजुन या सभागृहात चर्चा केली भावनेच्या भरात काही स. सभासद ------- वगैरे शब्द बोलले ते इतिवृत्तातुन वगळयात यावे.

मा. महापौर : अनाधिकृत वस्त्यात स्वेच्छानिधीतुन कामे व्हावीत म्हणुन स. सदस्यांनी सखोल अशी चर्चा केली या चर्चेत जवळ जवळ २४ सदस्यांनी भाग घेतला मत मांडले. प्रत्येकाच्या वार्डात जनतेला मुलभुत सुविधा दिल्या गेल्या पाहिजे अशी सर्वाचीच अपेक्षा आहे यास मी ही सहमत आहे. भावनेच्या भरात ---- शब्द वापरला कामकाजातुन वगळण्यात यावे.

श्री. स. अली मिरा सलामी : प्रशासन कामे करत नाही म्हणुन ------- शब्दवापला मला का शिक्षा द्यायचीद ती द्या. जो काम करित नाही त्याला बोललो. ज्यांनी चांगले

कामे केले जसे जकातीत श्री. अय्युब व मा. आयुक्त साहेब यांच्या सत्कार करावा.

मा. महापौर : इतिवृत्तातुन शब्द वगळावा व अनाधिकृत वस्त्यामध्ये कामे व्हावी असे सर्वांचे मत आहे जी.आर. नसल्याने हे काम होत नाही. ही आजची सभा तहकुब करण्यात येते.

" याच बरोबर जण गण मन राष्ट्र गिताने सभा संपली".

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

दिनांक १९.१२.२००० रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त. (दिनांक २०.११.२००० ची तहकुब सभा)दिनांक २०.११.२००० रोजी तहकुब करण्यात आलेली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा दि. १९.१२.२००० रोजी सकाळी ११.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे मा. श्री. डॉ. भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसह खालील स. नगरसेवक उपस्थित होते.

१) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
२) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
३) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
८) स.स.सौ. शंकुतला सांडुजी इंगळे
९) स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी
१०) स.स.श्री. शिंदे राजु रामराव
११) स.स.श्री. कावडे साहेब राणुबा
१२) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१३) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१४) स.स.सौ. धायलिक लिलावती बाळासाहेब
१५) स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१६) स.स.सौ. शिंदे रुख्मणी राधाकिसन
१७) स.स.श्रीमती. डॉ. आशा उत्तम बिनवडे
१८) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
१९) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२०) स.स.श्री. जाबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग
२१) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२२) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२३) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२४) स.स.श्री. अय्युब खान सरदार खान
२५) स.स.श्री. अ. रशिद अ. सत्तार
२६) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२७) स.स.श्री. शिरसाट संजय पांडुरंग
२८) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
२९) स.स.सौ. रशिदा बेगम गफफार यारखान
३०) स.स.श्री. वडागळे सुनिल बुथवेल
३१) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३२) स.स.श्री. स. मुताज अली मोज्जम अली

३३) स.स.श्री. नासेरखान सरदार खान
३४) स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव
३५) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३६) स.स.सौ. खरात कुसुबाई दौलत
३७) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३८) स.स.सौ. नुसरत बानो फिरोजखान
३९) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
४०) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४१) स.स.श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या
४२) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकरसिंग
४३) स.स.श्री. देसदडा प्रशांत सुभाष
४४) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४५) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४६) स.स.श्री. नासीरखान अ. रहेमान खान कुरैशी
४७) स.स.सौ. शहित जफर महमुद जफर
४८) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
४९) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५०) स.स.श्री. स. सलीम स. युसुफ
५१) स.स.श्री. तकीहसन खान कासिम हसनखान
५२) स.स.श्री. मिर हिदायत अली मिर बसालत अली
५३) स.स.श्री. शे. ईसाक जैनोद्दीन शे.
५४) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
५५) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५६) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
५७) स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
५८) स.स.श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान
५९) स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर
६०) स.स.श्री. स. अली सलामी स. मिर सलामी

## ***स्विकृती सदस्य***

१) श्री. भगवान देविदास घडामोडे
२) श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
३) श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज

संवाद :

श्री. जयवंत ओक : मागील महिन्यात तहकुब केलेलीच सभा आज होत आहे. नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन अनाधिकृत वस्त्यामध्ये विकास कामे व्हावीत अशी चर्चा बैठकीत झाली व त्यानुसार प्रशासनाने खुलासा केला अशा वस्त्यामध्ये प्रशासन कामे करण्या तयार नाही. व मा. आयुक्तांनी अशा वस्त्यात स्वेच्छा निधीतुन विकास कामे होण्या बाबत निर्णय घ्यावे व जो पर्यन्त आयुक्त निर्णय घेत नाही. तो पर्यन्त सभा तहकुब करण्यात येत आहे.

असे आपले रुलींग दिलेले आहे. ज्या कारणसाठी सभा तहकुब केली तो प्रश्न सुटला का ? या संदर्भात मा. आयुक्तांशी आपण चर्चा केली का ? व स्वेच्छा निधी अनधिकृत वस्त्यामध्ये वापरण्याची तयारी प्रशासनाने ठेवली का तसा निर्णय घेतला काय ? वार्डात कामे झाली पाहिजे नगरसेवकांच्या स्वेच्छा निधी तसाच पडलेला आहे. सुविधा दिल्या गेल्या पाहिजे. अशाविकास कामाच्या बऱ्याच संचिका मंजुरी विना पडुन आहेत सविस्तर खुलासा द्यावा.

मा. महापौर : आपण केलेला प्रश्न माझ्या लक्षात आलेला आहे. प्रश्न उपस्थित करतांना थोडक्यात बोलवे.

श्री. जयवंत ओक : कामे करावयाची नसेल तर तसे स्पष्ट सांगावे मी आता माझ्याच वार्डात प्रश्न उपस्थित करत आहे. माझ्या वार्डात विकास कामाच्या बऱ्याच संचिका पडुन आहे. का मंजुर होत नाही. जोपर्यंन्त मंजुर होत नाही तोपर्यंन्त मी आपल्या डायस समोर बसुन राहणार आहे. (याच वेळी स. स. श्री. जयवंत ओक मा. महापौर यांचे डायस समोर खाली बसतात वेळ ११.४० वाजता खाली बसुनच सुचना मांडतात) या अगोदर १० वर्षापासुन कामे होत आलेले आताच का होत नाही. शहरातील लाईट, पाणी ड्रेनेज बाबत सर्वच समस्यांना तोंड द्यावे लागत आहे विकास कामे थांबुन आहेत ती झाली पाहिजे.

श्री. अफसरखान यासीनखान : जवळपास सर्वच वार्डातील विकास कामाच्या संचिका मा. आयुक्तांच्या सहीसाठी थांबुन आहेत शहरात लाईटची, साफसफाईची व्यवस्था कोणती कामे करणे आवश्यक आहे ती झाली पाहिजे हे प्रशासनाने समजुन घ्यावयास पाहिजे. स. सदस्य श्री. ओक यांनी जी भुमीका घेतली त्यास आमचा सर्वांचा पाठिबा आहे. मा. आयुक्त आत नाही. खुलासा कोण करणार जनतेची कामे व्हावयास पाहिजे.

श्री. स.अली मिरा सलामी : स.स. ओक खाली बसले महापौर व सभागृहाचा अवमान होत आहे. त्यांना बाहेर काढावे.

श्री. नंदकुमार घोडेले : मा. महापौर यांनी आश्वासन द्यावे की, सर्वच स. सदस्यांचा स्वेच्छा निधीतुन कामे केली जातील.

श्री. जयवंत ओक : जनतेच्या कामासाठी मला बाहेर काढले तरी चालेल परंतु कामे झाली पाहिजे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. ओक यांनी खाली न बसता आपली काय सुचना असेल ती त्यांनी त्याचे जागेवर बसुन मांडावी स. सदस्यांनी मागील बैठकीत अनाधिकृत वस्त्यामध्ये स्वेच्छा निधीतुन विकास कामे करणार की नाही. असा प्रश्न उपस्थित केला होता. त्यानुसार १.१.९५ च्या अगोदर ज्या वसाहती झालेल्या आहेत अशा वसाहती शासन निर्णयानुसार सर्व्हे करुन तेथे सुविधा दिल्या जाईल अशी सुचना मी प्रशासनास दिलेली आहे. या संबंधी मी मा. मुख्यमंत्री यांचेशी सुध्दा चर्चा केली सर्व्हे सुरु केला आहे येथुन प्रस्ताव गेल्यानंतर १ दिवसात शासनाची मंजुरी मिळेल.

श्री. जयवंत ओक : लोकशाही मार्गाने सुचना मांडलेली आहे व तशी भावना मी खाली बसुन व्यक्त करित आहे महापौरांचा राजदंड घेऊन पळवुन वगैरे त्यांना आपमानास्पद केले नाही. कामे होत नाही म्हणुन बातम्या येतात त्यांची जाणीव ठेवावी. आमच्या निधीचे काय ?

मा. महापौर : स.स.श्री ओक यांनी त्यांची सुचना त्यांचे जागेवरुन मांडावी. खाली बसु नये. सभागृहाचा मान ठेवावा. प्रत्येक नगरसेवकांचा २.५० लाखचा जो स्वेच्छानिधी आहे तो प्रत्येकांच्या सुचने नुसार वापरला जाईल. कुणाचाही स्वेच्छा निधी ३१ डिसेंबर नंतर लॅप्स होणार नाही. याची मी जबाबदारी घेतो.

श्री. जयवंत ओक : स्वेच्छानिधी संदर्भात जी नियमावली तयार केली त्यात सदर निधीचा वापर ३१ डिसेंबर पर्यन्तच करता येईल असे नमुद केले. नसता लॅप्स होईल असे समजते. तर विकास कामे कशी करणार.

मा. महापौर : स्वेच्छा निधीच्या वापरासंबंधीची जी नियमावली आहे. त्यातील तारखेची मुदत वाढवुन घेतली जाईल व त्यानुसार विकास कामे करणे बाबत कार्यवाही करण्यात येईल. स. सदस्य श्री. ओक यांनी आपल्या जागेवर जाऊन बसावे. ( याचवेळी स.स. ओक हे उठुन त्यांचे जागेवर बसतात )
मागील बैठकीत झालेल्या चर्चेनुसार अनाधिकृत वस्त्यामध्ये विकास कामे होण्या संदर्भात मी. मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचेशी चर्चा केली व तात्काळ सर्व्हे करुन रिपोर्ट शासनाकडे पाठवणार आहेत व शासन मंजुरी २४ तासात घेऊन अधिकृत करुन वस्त्यात आपण कामे करणारच यात शंका नाही तसेच सिडको हस्तांतरणा बाबत सिन्हा साहेबांनी ७ दिवसात बैठक लावली आहे. आता विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**विषय क्र. १३४/** :

दिनांक १३.१०.२००० व २३.१०.२००० च्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद :

श्री. अफसरखान यासीनखान : दिनांक १३.१०.२००० च्या इतिवृत्तातील पान क्र. १५ वर ठराव क्र. १२६/२ मध्ये श्री.वि.मा. गांवडे १०.१०.२००० रोजी फॅक्स व्दारे कळवुन महानगरपालिका आस्थापनेवरिल कर निर्धारक व संकलक या पदावर येण्यास संमती दिली. व ते येण्यास तयार असेल तरी त्यांच्या नावासहित ठराव सादर करणे योग्य नाही. नांव वगळण्यात यावे. अगोदर ठराव मंजुर करावा केवळ त्यांनी फॅक्स केला म्हणुन असा ठराव घेणे चुक आहे घेण्याबाबत ठराव करण्यात यावा. यास आमचा विरोध नाही. परंतु नांवासह ठराव होऊ शकत नाही.

मा. महापौर श्री. गांवडे यांचा फॅक्स आलेला होता त्यांनी संमती दर्शविल्यानुसार ही कार्यवाही झालेली आहे थकीत टॅक्स तात्काळ वसुल व्हावा म्हणुन अधिकारी लवकर यावा म्हणुन नावानिशी ठराव केलेला आहे.

श्री. अफसरखान यासीनखान : नियमानुसार कार्यवाही व्हावी केवळ फॅक्स आला म्हणुन त्यांना घेता येईल काय ? ठरावात त्यांचे नांव आलेले आहे ते काढुन टाकावे मागणी करावी त्यानुसार १० अधिकारी येण्यास इच्छुक होतील.

श्री. प्रकाश निकाळजे : शासनाकडे पत्र व्यवहार करुन ५ वर्ष उपजिल्हाधिकारी म्हणुन काम करणारे अनुभवी अधिकारी महानगरपालिकेमध्ये या पदावर द्यावे अशी विनंती करावी.

मा. महापौर : हा प्रस्ताव नावानिशी आहे म्हणुन या ठरावातील जे गांवडे नांव नमुद केले ते वगळण्याची दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

श्री. जयवंत ओक : पान क्र. १५ ज्या पदा संबंधी चर्चा चालु आहे. हे पद घेणे आपल्याला नियमाप्रमाणे आवश्यक आहे. परंतु प्रस्तावाच्या अनुषंगाने मी एक सुचना मांडु इच्छितो की औरंगाबाद महानगरपालिका १९८२ साली अस्तित्वात येऊन त्यावेळी या शहराची लोकसंख्या ३ लाख होती व १८ वर्षानंतर १० लाख झालेली आहे. लोकसंख्येत भरमसाठ वाढ झाल्याने नागरी समस्यात वाढ झाल्याने महानगरपालिका प्रशासनावर भयंकर ताण पडत आहे. सर्व खात्याचे अधिकार मा. आयुक्तावर असल्याने कामाचा व्याप लक्षात घेता प्रशासकिय कामाचा मा. आयुक्तांवर जास्त ताण पडत आहे. व कामास विलंब होत आहे. तसेच अनेक संचिका प्रलंबित राहात आहे यासाठी प्रशासनाचा कारभार अधिक गतिमान व्हावा व निर्णय प्रक्रिया गतीने व्हावी. यासाठी महानगरपालिकामध्ये आणखी एक अतीरिक्त जिल्हाधिकारी या संवर्गातुन प्रतिनियुक्तीने भरण्यात यावे. जे पर मंजुर झाले त्या पदावर शासनाचेच प्रतिनियुक्तीने अधिकारी येत आहे ते न घेता या पदाऐवजी अतिरिक्त आयुक्त हे पद निर्माण करुन शासनाकडे कार्यवाहीसाठी द्यावे व जे पद मंजुर होऊन आले त्याच खर्चात अतिरिक्त आयुक्त यांचेवर खर्च होईल व विकास कामे ही तात्काळ होतील त्यासाठी या पदाऐवजी अतिरिक्त आयुक्त पदावर अधिकारी आणावे तशी मंजुरी द्यावी.

मा. महापौर : हा अत्यंत मोठा ठराव आहे व अतिरिक्त आयुक्त पद निर्मीतीचा आहे. ही तहकुब सभा आहे. दुपारच्या सभेत याबद्दल चर्चा करण्यात येईल.

श्री. नंदकुमार घोडेले : प्रस्ताव अशासकिय की प्रशासकिय याचा खुलास व्हावा. अशा प्रकारचे प्रस्ताव नावांनिशी येतात कसे फॅक्सव्दारा संम्मती देण्यात येते. नांव वगळण्यात यावे.

मा. महापौर : प्रशासकीय ठराव आलेला आहे. नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल प्रस्तावातील श्री. गांवडे यांचे नांव वगळण्यात आलेले आहेत. महानगरपालिकेच्या नियमानुसार हे पद भरण्यात यावे. अशी मंजुरी देण्यात येते.

श्री. अंबादास दानवे : निर्धारक संकलेक ऐवजी अतिरिक्त आयुक्त अशी दुरुस्ती करावी उप जिल्हाधिकारी ऐवजी अतिरिक्त जिल्हाधिकारी अशी दुरुस्ती करावी त्यामुळे कामात विभागणी होईल कामे तात्काळ होतील.

मा. महापौर : कर निर्धाकर व संकलक हे पद मंजुर होऊन आलेले आहे. अतिरिक्त आयुक्त हे पद निर्माण करावे लागणार आहे. जे पद मंजुर झाले त्याची नियमाने कार्यवाही करावी लागणार आहे.

श्री. सुरजितसिंग खुंगर : १३.१०.२००० च्या बैठकीत पान क्र. ६ वर सभागृहनेता यांनी ठराव ठेऊन होर्ल्डीगचे रेट ३ पट करावे व ३ वर्ष वाढवुन द्यावे अशी सुचना केली व आपण मंजुरी सुध्दा दिली आहे. यावर सविस्तर चर्चा व्हावी. होर्ल्डीगच्या संदर्भात मी दि. ४.८.२००० ला पत्र देवुन माहिती मागवली होती अद्याप त्यांचे उत्तर मिळाले नाही. यावरुन सदस्यांना काही ही सन्मान राखला जात नाही पत्र डिसेबर महिन्यात दिले त्याचे उत्तर आज त्यात असे नमुद केले की व्हीजन पब्लीक सीटी श्री गिरिष रामटेके यांनी यापुर्वीच परवानगी देऊन करार केलेला आहे. कोणता करार केला कधी करार केला

रक्मेपर्यन्त करार केला. किती वर्षासाठी केला याची माहिती मिळवयास पाहिजे. याची माहिती घेतली असता पब्लीक सीटी व विलय व्हीजन हे वेगळे आहे. बाजार येथे होर्ल्डींग लावलेल्या आहे. एका मागे एक लावण्यात आलेल्या आहेत. नियमाचे कोणतेच पालन केले जात नाही. नियोजन नाही शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा विचार केला जातो परंतु कोणते ही नियोजन पुर्वक कामे होत नाही मी दिलेल्या पत्राचे उत्तर मला द्यावे. ४ महिने झाले पत्र दिले कार्यवाही नाही. ६०/- रु एक बोर्डाचे वर्षाची फिस आकारली गेली ती खुपच कमी आहे सिडको मध्ये २७००/- रु. एक वर्षासाठी आकारली जाते करार हा ११ महिन्यासाठी असतो ५ वर्षासाठी नाही. ज्यांनी ५ वर्षाचा करार कसा केला त्याची सी.आय.डी.मार्फत चौकशी करावी.

उप आयुक्त (म.) : स. सदस्यांनी जी सुचना केली व्हीजन पब्लीक सीटीच्या संदर्भात स. सदस्य यांची तक्रार प्राप्त झाल्यानंतर फाईल चौकशीसाठी आहे. त्याची चौकशी करत आहोत.

श्री. सुरजितसिंग खुंगर : करारा नुसार कुणीही महानगरपालिकेकडे पैसे भरले नाही महानगरपालिकेचे मोठे नुकसान होत आहे. सर्वच होर्ल्डींग काढुन जो ५ वर्षाचा करार केला तो फक्त ११ महिन्याचा करार होऊ शकेल व ११महिन्याचे पैसे घेतले जातात. झालेला करार रद्द करावा व नवीन कार्यवाही नुसार टेंडर करुन देण्यात यावे.

उपआयुक्त (म.) : जाहिरात फलका बाबतचे निर्देश सभागृहाने द्यावे त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल जो ५ वर्षाचा करार केलेला आहे तो सक्षम सभागृहाच्या मंजुरीने किंवा मा. आयुक्तांच्या मंजुरीने दिले आहेत किंवा काय याची चौकशी चालु आहे.

श्री. सुरजितसिंग खुंगर : ऑगस्ट माहिन्यापासुन मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. दिले की नाही, दिलेले असल्यास किती रक्कम आलेली आहे महानगरपालिकेचा किती फायदा होणार सिडकोमध्ये २७००/- रु. होर्ल्डींग कर लावण्यात येत आहे महानगरपालिकेमध्ये फक्त ६०/ रु. लावण्यात येत आहे अगोदरच महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती ढासळलेली आहे. व महानगरपालिकेचे उत्पन्न परिस्थिती ढासळलेली आहे. व महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढवता येईल या संबंधी चर्चा होणे गरजेचे आहे जे नुकसान होत आहे त्यास रोखणे प्रशासनाचे काम आहे.

श्री. भगवान घडामोडे : इतिवृत्ताला मंजुरी देत असतांना इतिवृत्तात चुका असेल तर त्या दुरुस्त करता येतात चर्चा करता येत नाही. त्या बैठकीतच चर्चा व्हावयास पाहिले.

री. अंबादास दानवे : सभागृहात मागील सर्वसाधारण सभेच्या अगोदरच्या सभेत हा विषय झालेला होता व मा. सचिव यांचे कडुन चुकुन मिनीटास मध्ये उल्लेख झालेला नव्हता आता या बैठकीत उल्लेख झालेला आहे. यात काय दुरुस्ती असेल व कुणाचा विरोध असेल त्यांची नोंद करुन घ्यावी व विषयाला मान्यता द्यावी.

मा. महापौर : व्हीजन पब्लीक सीटीच्या संदर्भात प्रशासनातर्फे कार्यवाही होत आहे. बाकी मंजुर करण्यात येतो. विषय क्र. १ सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव** :

दिनांक १३.१०.२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तातील ठराव क्र. १२७/२ मधील "उपजिल्हाधिकारी या संवर्गातील श्री. वि.मा. गावंडे विशेष भुसंपादन निप्पान डेन्रो वर्धा यांची हे वाक्य वगळण्यात येईल नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व अशी दुरुस्ती करण्यास सर्वनुमते मंजुरी देण्यात येते. वरील दुरुस्तीसह दि. १३-१०-२००० व २३-१०-२००० करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३२/२ :**

मा. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, दलित वस्ती सुधारणा योजना समाज कल्याण विभागाकडुन राबविण्यात येत असुन सदरील योजना आता शासनाने नागरी भागातील दलित वस्त्यामध्ये राबाविण्याचा निर्णय घेतला आहे. ही योजना ज्या वार्डामध्ये दलित लोक संख्या ५० टक्क्यापेक्षा अधिक आहे. अश्या वार्डामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामासाठी १००% शासकिय अनुदान अनुज्ञेय राहील.

या योजनोअंर्तगत रस्ते, पोच रस्ते, नाली बांधकाम, विहिरी दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची वितरण व्यवस्था, रस्त्यावरिल दिवे, बालवाडी, बगीचे, समाज मंदिर, वाचनालय, व्यायाम शाळा, दवाखाने सांस्कृतिक केंद्र, दुकाने, सार्वजनिक पाणी पुरवठा, पाण्याची टाकी, सार्वजनिक सेप्टीक ट्रॅक, नाल्याचे शिस्तीकरण करणे इत्यादी कामे हाती घेता येतील.

अंदाजपत्रके (प्रस्ताव) उपसंचालक, नगररचना विभाग यांचे संमती घेऊन शासनास पाठविणे आवश्यक आहे सदरील कामे शासनाच्या मालकीच्या अथवा ताब्यात असलेल्या जमीनीवर घेण्यात येतील. या योजनेतर्गत निधी हा उप संचालक नगर रचना यांचेक्डे सुपुर्द करण्यात येईल व सदरील निधी महानगरपालिकाचे संयुक्त खात्यात जमा करण्यात येऊन होणारे खर्चाप्रमाणे मा. आयुक्त यांचे स्वाक्षरीने खर्च करण्यात येईल.

वरील प्रस्ताव शासनास पाठविणेसाठी सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक असुन सर्वसाधारण सभेचा मंजुरीनंतर प्रस्ताव शासनास उपसंचालक नगर रचना विभाग यांचे संमतीसह पाठविण्यात येतील. करिता सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे कामे हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

तरी रु. १७१.९६ लाखाचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव व मान्यतेस्तव सादर.

दलित वस्तीसुधारणा योजना २०००-२००१ अंतर्गत प्रस्तावित कामाची यादी.

| अ. क्र. | कामाचे नाव | अ.प. रक्कम रु. | शेरा. |
|---|---|---|---|
| १. | बौध्दवाडा चिकलठाणा येथे खडी रस्ते तयार करणे. | २,५५,८३२.०० | |
| २. | बौध्दवाडा चिकालठाणा येथे जलनि:सरण वाहिनी टाकणे. | १,६७,४२२.०० | |
| ३. | मसनतपुर दक्षिण येथे खडी रस्ते तयार करणे. | ४,९७,९२०.०० | |
| ४. | मसनतपुर दक्षिण येथे गटार बांधणे. | १०,०९,०१८.०० | |
| ५. | मसनतपुर दक्षिण येथे जलनि:सारण वाहिनी टाकणे. | १२,३८,९०८.०० | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | गितानगर येथे खडी रस्ते तयार करणे. | ४,००,०००.०० | |
| ७. | गितानगर येथे गटार बांधकाम करणे. | ६,१९,७९०.०० | |
| ८. | गितानगर येथे जलनिःसारण वाहिनी टाकणे. | ७,६१,०१०.०० | |
| ९. | एकतानगर येथे खडी रस्ते तयार करणे. | ३,७८,७७०.०० | |
| १०. | एकतानगर येथे गटारी बांधकाम करणे. | ६,१९,७९०.०० | |
| ११. | एकतानगर येथे जलनिःसारण वाहिनी टाकणे. | ७,६१,०१०.०० | |
| १२. | मुकुंदवाडी गाव येथे पुल तयार करणे. | २,५४,०८१.०० | |
| १३. | शाहाबाजार येथे स्लॅब क्लव्हर्ट तयार करणे. | ५,००,०००.०० | |
| १४. | भिमनगर भावसिंगपुरा येथे पादवारी पुल बांधणे. | ५,००,०००.०० | |
| १५. | हर्षनगर येथे जलवाहिनी टाकणे व पाण्याच्या टाक्या बांधुन पाणी वितरण व्यवस्था करणे. | ९,००,०००.०० | |
| १६. | काश्मिरानगर येथे (कांचनवाडी) खडी रस्ते तयार करणे. | ४,८४,०००.०० | |
| १७. | कश्मिरानगर (कांचनवाडी) येथे गटार तयार करणे. | ६,५१,०००.०० | |
| १८. | कश्मिरानगर येथे (कांचनवाडी) येथे जलनिःसारण वाहिनी टाकणे. | ६,८०,०००.०० | |
| १९. | महुनगर हमालवाडा येथे खडी रस्ते तयार करणे. | २,१५,४६०.०० | |
| २० | महुनगर येथे गटारी तयार करणे. | ३,४१,७७०.०० | |
| २१. | शाताब्दी नगर येथे खुल्या गटारी बांधणे. | ५,४३,७००.०० | |
| २२. | भिमनगर,उस्मानपुरा येथे गटार तयार करणे. | १,६४,०००.०० | |
| २३ | महुनगर येथे जलनिःसारण वाहिनी टाकणे. | २,५२,८००.०० | |
| २४. | विविध दलित वस्त्यामध्ये विद्युतीकरण करणे. | ५०,००,०००.०० | |
| | एकुण रुपये | १,७१,९६,२८६.०० | |

संवाद :

श्री. भागवान रगडे : स्लम भागामध्ये अपुरा निधी असल्याने कामे झालेली नाही ती झाली पाहिजे प्रस्तावातील यादी नुसार बराच स्लम भाग सुटलेला आहे त्याचा समावेश करावा.

मा. महापौर : पत्रकार कक्षात पत्रकारा शिवाय कुणी बसले असेल त्यांनी बाहेर जावे. कुणीही माझी पत्रकार कक्षात बसण्याची परवानगी घेतलेली नाही.(याच वेळी पत्रकार कक्षातुन सभागृहात स. माजी नगर सेवक श्री. खरात,श्री. गौतम लांडगे, श्री. बंडु प्रधान यांनी खाजगीकरणास विरोध दर्शविण्याचे पत्रके फेकतात व ते महिला सदस्यांच्या अंगावर पडतात. विरोधी घोषित देतात. सभागृहात मोठमोठयाने आवाज येते. काहीही ऐकु येत नाही)

मा. महापौर : सुरक्षा रक्षक व पोलिस शिपाई यांचा स. माजी सदस्यांना बाहेर काढावे. (याचवेळी काही स. सदस्यांनी माजी नगरसेवक यांनी गैरवर्तन केल्या प्रकरणी व विना परवानगी पत्रकार कक्षात येऊन बसल्याने त्यांचेवर कार्यवाही करावी शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला गुन्हे दाखल करावे अशी मा. महापौर यांचे डायस जवळ जाऊन मागणी करतात.)

श्री. अंबादास दानवे : पत्रकार कक्षात विना परवानगी शिवाय कसे बसु दिले. सुरक्षा रक्षक काय करतात पी.आर. ओ. चे काय काम आहे. त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही झाली पाहिजे.श्री. गौतम खरात, श्री. बंडु प्रधान, श्री. लांडगे यांचेवर गुन्हा दाखल करावा.

श्रीमती डॉ. आशा बिनवडे : पत्रकार कक्षातुन फेकलेला (पॉम्प्लेट) निषेधाचे जाहिरात पत्रक आमच्या महिलांच्या अंगावर टाकले लोकप्रतिनिधीचा अपमान होतो आहे. त्याबद्दल आम्ही माहिला नगरसेविका या घटनेचा निषेध करतो.

मा. महापौर : पत्रकार कक्षात बसलेले माझी नगरसेवक श्री. खरात, श्री. लांडगे व श्री. बंडु प्रधान यांनी गैरवर्तन करुन सभा कामात अडथळा आणला त्यांचेवर प्रशासनाने सिटी चौक पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करावा. व जे सुरक्षा रक्षक पत्रकार कक्षाच्या दरवाजावर होते त्यांनी पत्रकाराशिवाय इतरांना कसे येऊ दिले म्हणुन त्यांनाही दोषी ठरवुन निलंबित करण्यात येते तसेच जनसंपर्क अधिकारी यांची सुध्दा तितकीच जबाबदारी असतांना सुध्दा त्यांनी इतरांना बसु दिले म्हणुन त्यांना निलंबित करण्यात यावे.

सौ. दाणे चंद्रभागाबाई : अगोदर पासुनच ते बसलेले होते. तेव्हाच त्यांना पत्रकार कक्षातुन बाहेर काढावयास पाहिजे होते. नंतर त्यांनी खाजगीकरणाचा निषेध केला म्हणुन आपण गुन्हे दाखल करणे योग्य नाही. व गुन्हा दाखल करु नये. त्यांना आपण बसण्याची परवानगी द्यावयास पाहिजे होती.

श्रीमती. डॉ. आशा बिनवडे : कोण बसलेले होते याला महत्व नसुन विना परवानगीने बसलेले होते. म्हणुन कार्यवाही करणे योग्य आहे. आम्ही महिला या घटनेचा निषेध करतो व सभात्याग करीत आहे. (याचवेळी काही महिला नगरसेविका सभागृहा बाहेर जातात. वेळ १२.२५ वाजता.)

श्री. स.अली मिरा सलामी : सभागृहात निषेध पत्रके टाकण्यात येऊन माहिला सदस्यांच्या अंगावर पडल्याने निषेध करण्यात आला. पत्रके कशा संदर्भात होते. का टाकण्यात आले. हे समजावयास पाहिजे. सभागृहात चुकीचे निर्णय घेऊन कार्यवाही होण्याचे प्रकार घडत असेल तर जनतेमध्ये वेगळया भावना निर्माण होऊ शकतील जो की या प्रशासनाने खाजगी करण करण्याचा जो निर्णय घेतलेला आहे. तो चुकीचा आहे. यास जबाबदार सभागृह राहिल. सभागृहाची परवानगी निर्णय झालेला नसतांना प्रशासनाने निर्णय घेतला व त्यामुळे जनतेत नाराजी व्यक्त होऊन जनता रस्त्यावर येईल व प्रशासनाशी तोंड देईल त्यामुळे कायदा व सुव्यवस्था ढासळेल याची जाणीव ठेवावी खाजगीकरणाच्या चुकीचा निर्णय घेतलेला असल्याने स. सदस्यांनी त्यांच्या भावना व्यक्त करणे निषेध केलेला आहे त्यांचेवर कोणती कार्यवाही करणे योग्य होणार नाही. पहिल्यांदाच त्यांना येऊ द्यावयाचे नव्हते हा जो प्रकार घडला त्यावेळी पोलिस, सुरक्षा विभागाचे कर्मचारी काय करत होते. त्यांची चौकशी व्हावसास पाहिले. जो दोषी असेल त्यांचेवर नियमाने कार्यवाही व्हावी. जनतेसाठी भावना व्यक्त केलेल्या आहे. पोलिस केस करणे योग्य नाही व पोलिस केस करुन नये.

मा. महापौर : जे सुरक्षा रक्षक तेथे कामास होते त्यांना व जनसंपर्क अधिकारी यांना दोघांना ही निलंबणची कार्यवाही केलेली आहेत आता विषय क्र. २ वर चर्चा करावी.

श्री. तकी हसनखान : नियमाने पत्रकार कक्षात कोण बसतात ही जबाबदारी जनसंपर्क अधिकारी यांची नाही असे माझे मत आहे.

श्री. निकाळजे प्रकाश : जनसंपर्क अधिकारी यांनी पत्रकार कक्षात येणारांना पास द्यावी लागते. पास दिलेली नाही म्हणुन त्यांचेवर झालेली कार्यवाही योग्य आहे.

मा. महापौर : तो विषय संपलेला असुन विषय क्र. २ वर चर्चा करावी.

श्री. भगवान रगडे : ज्या भागात विकास झालेला नाही. अशा भागात विकास होण्यासाठी कामाची व भागाची यादी सादर केलेली असुन या व्यतिरिक्त आणखी शहरातील बरेचशे स्लम भागात विकास कामे झालेली नाही विकास म्हणावा तसा झालेला नाही. शासनाकडुन येणारा निधीतुन या भागामध्ये विकास करता आलेला नाही. जेथे विकास झाला नाही व सोबतच्या यादीत समावेश न केलेल्या वस्त्याचा यात समावेश करावा १० वर्षापासुन स्लम भागचा निधी शासनाकडुन यावयाचा बाकी आहे. या अगोदर येथील अधिकारी श्री. सिकंदर अली यांनी पाठपुरावा करुन निधी आणलेला होता व हा विषय मंजुर करुन पुन्हा श्री. सिकंदर अली यांची मुंबईहुन निधी उपलब्ध करुन आणण्यासाठी नियुक्ती करावी. (स. नगरसेविका परत सभागृहात येतात.)

मा. महापौर : २४ वस्त्यांच्या कामाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. शासनासा कळवुन पाठपुरावा करण्यात यावा.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रस्तावित कामांच्या यादी प्रमाणे (दलित वस्ती सुधारणा योजना २०००-२००१ एकुण रुपये १७१.९६ लाखाच्या कामाच्या प्रस्ताव सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३६/३** :

औरंगाबाद पाणी पुरवठा योजना (जायकवाडी उद्‌भव) अंतर्गत जल शुध्दीकरण केंद्र फारोळा येथे पाण्याच्या निर्जंतुकीकरणासाठी क्लोरिन गॅस वापरण्यात येते. क्लोरिन गॅस पुरवठा सतत राहणे आवश्यक आहे. करिता क्लोरिन गॅस वार्षिक रु. २०,२७,०००/- च्या अंदाज पत्रकास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

वार्षिक क्लोरिन गॅस पुरवठया करिताचा रु. २०,२७,०००/- प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

संवाद :

मा. महापौर : मंजुरी देण्यात येते.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविलयाप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजना (जायकवाडी उद्‌भव) अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे पाण्याच्या निर्जतुकीकरणासाठी देखभालीच्या रु. २०,२७,०००/- च्या अंदाज पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३७/४** :

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एच.एस.जी./२०००/प्र. क. ६०/गृनिधी-१/ गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ११ ऑगस्ट २००० नुसार मुंबई व्यतिरिक्त इतर ६१ शहरामध्ये मोठया

प्रमाणावर सदविका बांधण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे त्यात औरंगाबाद शहराचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये वाढते औद्यागिकरण व शहरीकरणामुळे झोपडपटयांची बेसुमार वाढ होत आहे. पुरेशा नागरी सुविधांच्या अभावामुळे तेथील वातावरण आरोग्यास हानीकारक होत आहे. झोपडपट्टी वासीयांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनातर्फे कल्याणकारी धोरण अंतर्गत अनेक योजना राबाविल्या जातात. तेथील पर्यावरणाच्या समतोल राखण्यासाठी झोपडपट्टी श्रेणीवाढु करुन तेथे राहणाऱ्या आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील लोकांच्या जीवनामध्ये अमुलाग्र परिवर्तन घडवुन आणण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे. राष्ट्रीय गलिच्छवस्ती सुधार कार्यक्रमाअंतर्गत केंद्र शासनाकडुन उपलब्ध होणाऱ्या निधीतुन झोपडपट्टी वासीयांना पाच प्रकारच्या नागरी मुलभुत सुविधा पुरविल्या जातात. केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतुन किमान १०% रक्कम घर बांधणी करिता खर्च करणे अपेक्षित असते. शासनाच्या राष्ट्रीय गलिच्छवस्ती सुधार कार्यक्रम, घरकुल योजना, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योना एकत्रितपणे राबविण्याच्या दृष्टीकोनातुन प्रस्तुत योजनेव्दारे सदविका बांधण्याचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे.

योजना :

सदर योजना घोषित झोपडपट्टयामधुन राबविणे प्रस्तावित आहे. १९९५ च्या विधानसभा मतदार यादीत नांव आहे व सध्याही त्याच ठिकाणी रहिवासास आहेत अशा अत्यल्प उत्पन्न गटातील झोपडपट्टी वासीयांना या योजनेचा लाभ घेता येईल. घराचे बांधकाम लाभार्थिने स्वत: करावयाचे असुन योजनेवर संपुर्ण नियंत्रण महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्रधिकरण यांचे राहिल. महानगरपालिकेवर या योजनेचा आर्थिक बोजा पडणार नाही. म्हाडाने प्रस्तावित केल्यानुसार १६० चौ. फुटाचे एकुण बांधकाम त्यात एक बहुउद्देशीय खाली, स्नानगृह व स्वच्छतागृह बांधवयाचे आहे. तसेच भविष्यात एक खोली बांधण्यासाठी जागा असल्यास उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव आहे घोषित झोपडपट्टयांमध्ये प्रथम महानगरपालिका व म्हाडाच्या अधिकाऱ्यामार्फत संयुक्तपणे सर्वेक्षण करुन कच्छी घरे, तात्पुरत्या शेडस्ची संख्या निश्चित करुन जर सदरचे भुखंड हा लाभ धारकाचा नांवे असेल व त्यास वरिल योजना मान्य असेल, तसेच सदरचा भुखंड शासन/महानगरपालिकेच्या मालकीचा असेल व हा भुखंड लाभधारकांच्या नांवे करण्यास महानगरपालिका/शासन तयार असेल अशा लाभधारकांचाच या योजनेत समावेश होऊ शकेल तसेच महानगरपालिकेच्या मालकीची निवासी उपयोगास योग्य अशी रिक्त जमीन म्हाडास विनामुल्य उपलब्ध करुन दिल्यास त्या जमिनीवर ही योजना राबविता येऊ शकेल.

अर्थसाहय वितरण :

म्हाडाचे अधिकारी व लाभार्थिच्या संयुक्त बचत खात्यात (जॉईन्ट अकांऊट) अनुदान व कर्जाची रक्कम जमा करण्यात येईल. व बांधकामाची प्रगती पाहुन टप्प्याटप्प्याने अनुदान व कर्जाचे वितरण करण्यात येईल.

१) एका सदनिकेची किंमत रु. ३०,०००/- फक्त.
२) लाभार्थीचा सहभाग रु. ५,०००/- (दोन हप्त्यात पाहिला हप्ता लाभार्थी म्हणुन निवड झाल्यावर रु. ३,०००/- व घरकुल ताब्यात घेतांना रु. २,०००/- )
३) अमागासवर्गीय लाभार्थ्यास प्रस्तावित अनुदान रु. १०,०००/- व कर्ज रु. १५,०००/-
४) मागासवर्गीय लाभार्भ्यास प्रस्तावित अनुदान रु. २०,०००/- व कर्ज रु. ५,०००/- (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागासवर्ग )

महानगरपालिका क्षेत्रकरिता समितीचे स्वरुप :

१) अध्यक्ष -आयुक्त, महानगरपालिका

२) इतर सदस्य - महापौर, विधान सभा सदस्य/ विधान परिषद सदस्य (ज्यांच्या मतदार संघात त्या स्थानिक स्वराज्य संस्था येतात) जिल्हाधिकारी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी.

३) सदस्य सचिव -म्हाडाचा स्थानिक अधिकारी.

समितीची कार्यकक्षा व अधिकार :

१) योजनेसाठी लागणाऱ्या सुयोग्य जमीनी जिल्हाधिकारी यांचे मार्फत विनामुल्य अथवा नाममात्र दराने उपलब्ध करुन देणे.

२) प्रस्तावित योजनेतील घरांचे बांधकाम लाभार्थीकडुन करावयाचे असल्याने अत्यल्प उत्पन्नावर या प्रवर्गातील लाभार्थी प्रचलित पध्दतीने ठरविणे व त्यांची यादी जाहिर करणे लाभार्थी ठरवितांना, कुटुंब नियोजनाचे पालन करणाऱ्या लाभार्थीना या योजनेमध्ये प्राधान्य देणे तसेच सदरहु सदनिकेचा प्रथम हक्क तथा वारसा कुटुंबातील महिलेच्या नांवे जमिनीचा भाडेपट्टा देण्यात यावा.

३) वरिल प्रमाणे कार्यवाही करुन समितीने या योजनमध्ये बांधवयाच्या त्यांच्या जिल्हासाठी ठरवुन दिलेल्या एकुण सदानिकेवर सविस्तर प्रस्ताव तयार कराव. प्रस्तावित योजनेचे आराखडे व घरांचे आराखडे तयार करुन समितीचे प्रथमतः ते मंजुर करावेत व स्थानिक शासकिय शासकीय व सक्षम प्राधिकरणाकडुन त्यास मंजुरी घ्यावी यामध्ये प्रवर्ग निहाय एकुण सदानिकांची संख्या अंदाजपत्रकीय खर्च एकुण सदानिकेस उजुसरुन राज्य शासनाकडुन प्राप्त करुन घ्यावयाचे अनुदान, ज्या ठिकाणी विशेष घटक योजना असेल त्याबाबत केंद्र शासनाकडुन मागणी करावयाचे अनुदान तसेच एकुण सदनिकेच्या संख्येनुसार आवश्यक असणारे कर्ज असा सविस्तर प्रस्ताव तयार करावा. या प्रस्तावात प्रशासकिय मान्यता समिती देईल.

४) योजनेचे प्रस्ताव तयार करतांनाच दरम्यानच्या काळात, प्रस्तावित योजनेसाठी लागणाऱ्या सामायिक सुविधा जसे पाणी, वीज मलनिःसारण,रस्ते संबंधि योजनेखाली पुरविण्याची कार्यवाही तथा आदेश निर्गमित करणे.

५) या योजनेसाठी समितीने पुढाकार घेवुन लाभधारकांना उपलब्ध असल्यास निर्मिती केंद्रामार्फत आवश्यक ते सहकार्य उपलब्ध करुन घ्यावयाचे आहे जसे निर्मिती केंद्रामध्ये तयार होणारा माल किंमत आकारुन उपलब्ध करुन देणे आवश्यक तेथे लाभार्थीना तसेच स्थानिक तांत्रिक, शेक्षणिक संस्थाच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने सदहरु केंद्र व प्रशिक्षण देणे इत्यादी कामे करणे.

६) योजनेच्या लाभार्थ्यींना घर बांधणीच्या प्रगतीस अनुसरुन शासनाकडुन प्राप्त होणारे अनुदान व अर्ज उपलब्ध करुन देणे, लाभधारकांनी घरांचे बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे करावयाचे आहे या बांधकामांबाबत मार्गदर्शन लाभार्थ्यांच्या आवध्यकतेप्रमाणे स्थानिक अधिकाऱ्यांनी करावयाचे आहे. तसेच कामाच्या प्रगतीनुसार दाखल देऊन टप्प्याटप्प्याने अनुदान तथा कर्ज लाभार्थीस उपलब्ध करुन देण्याची व कर्ज वसुलीची कार्यवाही समितीने तथा जिल्हाधिकारी यांनी करावयाची आहे. यासाठी योग्य ती कार्यपध्दती अवलंबिली जाईल यात लाभार्थ्यानी स्वतःचे खाते सुरु करावयाचे आहे. यामध्ये शासनाने वेळोवेळी, निर्णमीत केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे बदल केला जाईल.

वरील प्रस्ताव मान्य झाल्यास प्राधान्याने शासकिय जमीनीवरील व तद्नंतर निमशासकिय, खाजगी जमीनीवरील घोषित झोपडपट्टयामधुन टप्प्याटप्प्याने वरील योजना सबविण्यात यावी. या वर्षी मार्च २००१ पर्यन्त २००० सदनिकांचे औरंगाबाद

महानगरपालिकेस उद्दिष्ट देण्यात आले आहे. सर्वसाधारण सभेने पात्र झोपडपट्टयांची निवड करुन झोपडपट्टीत किती सदनिका बांधण्यात त्याबाबत शिफारस करणे उचित राहिल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री. भगवान रगडे : म्हाडा योजना स्लम मध्ये राबाविणार या अगोदर प्रकल्प संचालक यांचे विभागामार्फत सुवर्ण जयंती योजना राबवण्यात आलेली हाती योजना योग्य प्रकारे या विभागाकडुन हाताळली गेली नाही. त्याचा विचार करता ही घरकुल योजना खरोखरच राबवली जाईल काय ? सुवर्ण जयंती रोजगार योजनेचा बट्याबोळ झाला आहे. व या योजनेचे काम पुन्हा त्याच विभागाकडे देण्यात येते आहे. प्रकल्प संचालक हे कार्यक्षम नाही असे दिसुन येते.

मा. महापौर : ही योजना चांगली असुन यात काय दुरुस्ती करावयाची असेल त्या सुचना कराव्यात हा प्रस्वात मंजुरीसाठी आलेला आहे.

श्री. भगवान रगडे : या अगोदरची सुवर्ण जयंती योजना व्यवस्थीत राबविली गेली नाही. आता ही योजना त्याच अधिकाऱ्यांकडे दिल्यावर तरीच प्रलंबीत राहिल. दुसरे अधिकाऱ्याकडे देण्यात यावी. पहिली योजनेस अंतीम करावे. प्रस्ताव मंजुर करुन कार्यवाही व्हावी. या विषयास माझा विरोध नाही. प्रकल्प संचालक बदलल्या गेले पाहिजे.

श्री. स.अली मिरा सलामी : या प्रस्तावात मागासवर्गीयांसाठी २०,०००/- हजार व अमागासवर्गीयासाठी १०,०००/- हजार अनुदान देणार उर्वरित ५,०००/- हजार व १५,०००/- हजार कर्ज रुपाने देणार यात परत फेडसाठी किती हप्ते पाडणार याचा खुलासा द्यावा. तसेच किती दिवसात ही योजना पुर्ण होईल. त्याचप्रमाणे महानगरपालिका क्षेत्राकरिता समितीचे स्वरुप यामध्ये संबंधीत वार्डातील स. सदस्यांचा सदस्य म्हणुन समावेश करण्यात यावी अशी विनंती आहे.

मा. महापौर : प्रकल्प संचालक यांनी या प्रस्तावातील अनुदान व कर्ज रुपाने देण्यात येणारी रक्कम व जागा कुणाची ? कोण राबवणार, समिती कशी करण्यात आली सर्व माहिती द्यावी.

प्रकल्प संचालक : जी योजना आपणासमोर सादर केलेली आहे ती म्हाडा कडुन आलेली आहे. या योजने अंतर्गत एक घरकुल ३० हजार रुपयामध्ये झोपडपट्टी वासीयांना बांधुन देणे आहे ही योजना राबविण्याची जबाबदारी म्हाडाची आहे. म्हाडाचे अधिकारी व झोपडपट्टी वासीय यांचे संयुक्त खात्यामध्ये ३० हजार रक्कम जमा होणार असुन व ज्या झोपडपट्टीवासी यांची निवड करावयाची आहे. ते सहकार्य महानगरपालिकेमार्फत होणार आहे. ज्या झोपडपट्टया शासकीय जागेवर व १९७५ च्या अगोदर पासुनच्या ज्या झोपडपट्टया झालेल्या आहेत. त्यास या योजनेत प्राधान्य दिले जाईल. व सर्वेक्षण करणे अपेक्षित आहे एका सदनिकेची किंमत ३०,०००/- हजार रुपये राहणार असुन एक सदनिका १६१ चौ. फुटाची असेल संडास बाभरुम ची व्यवस्थाराहणार आहे. व एक खोली होण्या इतपत जागा उपलब्ध असेलतर संबंधीताच्या ताब्यात देण्याची ही योजना आहे. मागासवर्गीयासाठी २०,०००/-

हजार अनुदान ८ व ५,०००/- हजार दोन हप्त्यात द्यावयाचे पहिला हप्ता लाभार्थीची निवड झाल्या झाल्यावर ३,०००/- रु. भरावयाचे व २०००/- हजार रु. घर ताब्यात देतांना भरावे लागतील जी कर्जरुपाने रक्कम देणार ती साधारणतः दिर्घ मुदतीचा कालावधी म्हणजे ७ वर्षापर्यन्त परतफेड करावयाची आहे. साधारणतः दर महिन्याला १०० ते १५०/- रु. हप्ता हा म्हाडा कार्यालयात जाऊन संबंधीतांनी भरावयाचा आहे. शहरात एकुण ५३ झोपडपट्टया हया घोषित असुन त्यापैकी २१ झोपडपट्टया हया शासनकीय जागेवर असुन त्या व्यतिरिक्त आताच महापौरांनी सांगितल्यानुसार ज्या झोपडपट्टया आहत त्या अस्तित्वात नव्हत्या परंतु १९७५ च्या अगोदरच्या आहेत. आता घोषित करावयाच्या आहेत त्याचा ही या योजनेसाठी सहभाग करण्यात येणार आहे. ज्या वसाहतीत कुठलीही सुविधा देण्यात आलेल्या नाही. अशा सर्वच अनाधिकृत वसाहतींना घोषित झोपडपट्टया म्हणुन करणार आहे. जवळपास ५३ च्या आसपास पुन्हा झोपडपट्टयाची संख्या वाढणार आहे. व घोषित झोपडपट्टी म्हणुन अशा वसाहतीना दर्जा दिला जाईल जी झोपडपट्टी या योजनसाठी घोषित झाल्यानंतर गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळाकडुन महानगरपालिकेला या घरकुल योजनच्या अंतर्गत भौतिक सुविधा देण्यासाठी १ हजार रुपये गटार,पाणी, वीज, रस्ते, सार्वजनीक शौच्छालये इ. सुविधा देण्यासाठी अनुदान स्वरुपात घरकुल योजनाचया रकमे व्यतिरिक्त देणार आहेत. सर्वेक्षण करुन घोषित होणाऱ्या झोपडपट्टया गॅझेटमध्ये घेणार व सर्वेक्षणाचे काम सुरु केलेली असुन काही वसाहतीचे सर्वेक्षण पण झालेले असुन एका संचिका मा. आयुक्तांकडे मंजुरीसाठी आहे. ती संचिका मंजुर झाल्यास कामाची गती वाढवुन कार्यवाही करता येईल व १९९५ च्या विधान सभेच्या यादीत ज्यांची नांवे आहेत व ती व्यक्ती त्याच ठिकणी राहात आहे. अशा व्यक्तीचा सुध्दा शासनाच्या आदेशानुसार या घरकुल योजनेत लाभ घेऊ शकेल.

श्री. अ. रशिद अ. सत्तार : खुल्या जागा असतील तेथे सुध्दा अशा योजना राबवता येतील.

प्रकल्प संचालक : म्हाडा गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळाकडुन ही योजना आपण घेऊ शकतो. २५,०००/- हजार पर्यन्तची साधारण ही योजना आहे. परंतु यासाठी लागणारी जमीन महानगरपालिका किंवा जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करुन म्हाडाकडे हस्तांतरण करावयास पाहिजे. खुल्या जागेवर सुध्दा ही योजना राबवली जाऊ शकते. तसेच एखादा डेवहल्पमेंट प्लॅन असेल व विस्थापितांचे पुनःर्वसन या आरक्षणाच्या विकासासाठी ही योजना राबवु शकतो.

श्री. काशिनाथ कोकाटे : सर्वसाधारण गरिब जनतेच्या फायद्याचा हा प्रस्ताव असुन ही योजना रावबवण्यास शासनाचा प्रयत्न आहे. यात सबसिडीत मिळणार आहे. स. सदस्यांनी सुचना माडल्या परंतु योग्य खुलासा देण्यात आलेला नाही ही योजना म्हाडा राबवणार की महानगरपालिका हा प्रश्न स. स. श्री. भगवान रगडे यांचा होता. यानंतर स. सदस्यांनी संपुर्ण भावना व्यक्त केल्यानंतर उत्तर द्यावे. असे माझे स्वतःचे मत आहे. ५३ घोषित झोपडपट्टयामध्ये बऱ्याच लोकांनी कच्च्या मातीची घरे बांधली ती पाडुन १०-५१ लोकांनी जागा उपलब्ध करुन दिल्यास ही योजना रावविली जाईल किंवा काय ? हा प्रश्न

निर्माण होतो. दुसरा प्रश्न असा की महानगरपालिका हद्दीत जी सरकारी गायरान आहे अशा जागेवर नविन वसाहत स्थापन करता येईल का ?

प्रकल्प संचालक : शासनाची जमीन आहे जर ती विनामुल्य मिळत असेल तर ही योजना राबवता येऊ शकते. परंतु ही योजना राबवायाची की नाही याचे अधिकार शासनाने जी समिती तयार केली आहे जे त्या समितीचे अध्यक्ष मा. आयुक्त आहे समीतीत महापौर, विधानसभा सदस्य, विधान परिषद सदस्य, तसेच जिल्हाधिकारी समाज कल्याण अधिकारी व सचिव म्हणुन म्हाडाचे स्थानिक अधिकारी असेल ही समिती निर्णय घेऊ शकते.

श्री. काशिनाथ कोकाटे : ज्या ठिकाणी योजना राबवणार आहोत त्या संबंधित वार्डाचे नगरसेवकंना विश्वासात घेऊन कार्यवाही करावी.

मा. महापौर : विषय क्र. ४ मंजुर करण्यात येतो. स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता कमकुवत घटकासाठी शासनाची जमीन उपलब्ध असेल तर त्या ठिकाणी सुध्दा घरकुल योजना करण्यास मान्यता देण्यात येते. ही योजना राबवत असतांना संबंधित वार्डाचे नगरसेवकांना बैठकीस बोलवुन विश्वासात घेऊनच ही योजना राबवण्यात यावी असा निर्णय घेण्यात येतो. आता पुरवणी विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एच.एस.जी/२०००/प्र.क. ६०/गृनिधे-१/ गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग मुंबई, दिनांक ११ ऑगस्ट २००० नुसार औरंगाबाद शहरातील झोपडपट्टी भागात सदनिका बांधण्याच्या योजनेअंतर्गत १९९५ च्या निधान सभा मतदार यादीत नांव असलेल्या व सध्या त्याच ठिकाणी रहिवासास असलेल्या सदरचा भुखंड लाभधारकाचे नांवे असेल अथवा सदरचा भुखंड शासन/महानगरपालिकाचे लाभधारकाचे नांवे करण्यास तयार असेल अशा अत्याल्प उत्पन्न गटातील झोपडपट्टी वासीयांना या योजनेचा लाभ घेता येईल औरंगाबाद महानगरपालिकासाठी देण्यात आलेले सन २००१ पर्यन्त २००० सदनिकांचे उद्दीष्ट म्हाडाने पुर्ण करण्यात यावे यासाठी प्रस्तावातील समितीने कोणत्या झोपडपट्टीत किती सदनिका बांधाव्यात याबाबत निर्णय घ्यावा आणि सदनिका बांधण्याच्या कामी प्रस्तुत प्रस्तावात दर्शविण्यात आलेल्या समितीने ज्या भागाचे संबंधीत नगरसेवक यांना विश्वासात घेऊन त्यांना बैठकीस बोलवण्यात यावे. सदर सदनिकेसाठी खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

१) एका सदनिकेची किंमत रु. ३०,०००/- फक्त
२) लाभार्थीचा सहभाग रु. ५,०००/- (दोनहप्त्यात पहिला हप्ता लाभार्थी म्हणुन निवड झाल्यावर रु. ३,०००/- व घरकुल ताब्यात घेतांना रु. २,०००/-)
३) अमागासवर्गीय लाभार्थ्यास प्रस्तावित अनुदान रु. १०,०००/- व कर्ज रु. १५,०००/-
४) मागासवर्गीय लाभार्थ्यास प्रस्तावित अनुदान रु. २०,०००/- व कर्ज रु. ५,०००/- (अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, व विशेष मागासवर्ग )

तरी प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे सदर योजनेस, अर्थसहाय्य वितरण व्यवस्था सदनिकेसाठीचा खर्चाचा तपशिल, यासाठी असलेल्या समितीचे स्वरुपात आणि समितीच्या कार्यकक्षा व अधिकारास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र. १३८/१** :

औरंगाबाद महानगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री. पी.बी.पैठणकर उर्फ माळीबाबा यांना हृदय विकाराचा झटका आल्यामुळे सध्या ते कमलनयन बजाज हॉस्पीटलमध्ये उपचार घेत आहे. डॉक्टरांनी त्यांच्यावर हृदय शस्त्रक्रिया (बायपास सर्जरी) करण्याचे ठरविले आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. त्यांच्या कुटुबात ते एकटेच कमावते व्यक्ती आहेत त्यामुळे त्यांना तातडीने आर्थिक मदतीची आवश्यकता आहे.

विशेष बाब म्हणुन औरंगाबाद महानगरपालिके तर्फे सन्माननीय नगरसेवक स्वेच्छा निधीतुन रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार) आर्थिक मदत देण्यात यावी. प्रस्तावास स्वीकृतीसह मंजुरी देण्यात यावी.

सुचक : श्री. राधाकृष्ण गायकवाड
अनुमोदक : श्री. नंदकुमार घोडेले
श्री. भरत लकडे
दिनांक : ९.१०.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री. पी.बी. पैठणकर यांना हृदय विकाराचा तीव्र झटका आल्यामुळे त्यांचेवर हृदय शस्त्रक्रिया (बायपास सर्जरी) करणे साठी स. नगरसेवक स्वेच्छा निधीतुन विशेष बाब म्हणुन रु. ५०,०००/- (पन्नास हजार मात्र) आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुर देण्यातम येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३९/२** :

महानगरपालिका हद्दीचा प्रारुप विकास आराखडा प्रत्येक १० वर्षानंतर महानगरपालिके मार्फत तयार करण्यात येतो. विकास आराखडयास राज्य शासनाची अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर विकास आराखडा प्रसिध्द करण्यात येतो विकास आराखडया मध्ये विविध प्रयोजनांसाठी दर्शविलेली आरक्षणे उठविण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत. महानगरपालिका सभागृहाच्या संमतीने आरक्षण उठवणे, प्रयोजनाचा उद्देश बदलणे इत्यादी जनहितासाठी करु शकते.

राज्य शासनाने नुकताच एक आध्यदेश काढला असुन त्यानुसार महापालिकेचे विकास आराखडयात कुठलाही बदल करण्याचे अधिकार कमी केले असुन यानंतर असे बदल राज्य शासन करणार आहे, त्यामुळे महापालिकेच्या अधिकारांवर गदा आली असुन राज्य शासनाची अशी कृती अन्यायकारक आहे. विकास आराखडयात बदल,दुरुत्या,आरक्षण उठविणे इत्यादी बाबतचे सर्व अधिकार पुर्ववत महानगरपालिकेस प्रदान करणेस राज्य शासनास कळविणेसाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अंबादास दानवे
श्री. नंदकुमार घोडेले
अनुमोदक : श्री. भरत लकडे
श्री. दत्तात्रय थोरात
दिनांक : १०.११.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राज्य शासनाचे अध्यादेशानुसार महानगरपालिकेस शहर विकास आराखडयांतील बदल करण्याचे अधिकार कमी केले आहे. त्यामुळे महानगरपालिकाच्या अधिकारावर गदा येत असल्याने महानगरपालिका हद्दीचा प्रारुप विकास आराखडा तयार करुन राज्य शासनाची अंतिम मंजुरी मिळल्यानंतर सदर विकास आराखडयातील बदले करणे, आरक्षण उटविणे, इ. बाबतचे सर्व अधिकार पुर्वीप्रमाणे महानगरपालिकेस देणे बाबत राज्य शासनास कळविण्यात यावे. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४०/३** :

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद हद्दीतील वार्ड क्र. ७० रोशनगेट येथील कोणत्याही ठिकाणी नागरिकांच्या सुविधासाठी अद्याप वाचनालय नसल्यामुळे नागरिकांना दुसऱ्या ठिकाणी जावे लागत असुन त्यामुळे त्यांची फार गैर सुविधा होत आहे. यानुसार माझ्या वार्डात मो. करिम कॉलनी येथे महानगरपालिका वाचनालय बांधण्यात यावे.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. सौ. ताफीस उन्नीसा बेगम
अनुमोदक : श्री. शे. इसाक झैनोद्दीन
श्री. सलिम पटेल
दिनांक : १६.१०.२०००.

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक सभागृहात उपस्थित नसलयामुळे प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १४१/४** :

श्री. मिर्झा फुलबेग मुलाबबेग हे औरंगाबाद येथील रहिवाशी असुन ते कर्करोगाने आजारी आहे. तरी त्यांना ५०,०००/- (पन्नास हजार) रुपये आर्थिक मदत देण्यात यावी तरी या प्रस्ताव येणाऱ्या सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी ठेवण्यात यावे.

सुचक : सौ. रशिदा बेगम
अनुमोदक : सौ. चंद्रभागाबाई दाणे

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. मिर्झा फुलबेग गुलाब बेग यांचे वरिल कर्क रोगाचे उपचारासाठी रु. ५०,०००/- (पन्नास हजार ) विशेष बाब म्हणुन आर्थिक मदत देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४२/** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मी मनोज चंद्रकांत जैन रा. विष्णुनगर यांच्या हृदयाचा वॉव्ह (झडप) खराब झालेला आहे. शस्त्रक्रियेसाठी रक्कम रुपये. ७५,०००/- खर्च

अपेक्षित आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे नगरसेवक स्वेच्छानिधीमधुन संबंधितास रक्कम रु. २५,०००/- (अक्षरी पंचवीस हजार फक्त) आर्थिक मदत देणेचा प्रस्ताव मंजुरस्तव सादर.

सुचक : श्री. भाऊसाहेब ताठे
श्रीमती. डॉ. आशा बिनवडे
अनुमोदक : श्री. मधुकर सावंत
सौ. जयश्री कुलकर्णी
सौ. विजया रहाटकर
दिनांक : २३.१०.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. मनोज चंद्रकांत जैन यांचे वरिल हृदयाचा वॉव्ह (झडप) शस्त्रक्रियेसाठी नगरसेवक स्वेच्छानिधी मधुन विशेष बाब म्हणुन रु. २५,०००/- (पंचवीस हजार) अर्थसाहय्य देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४३/६** :

श्री. सोपन मगरे किडनी स्टोनचा आजार असल्यामुळे त्यास त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसुन ते स्वतः कुटुंब प्रमुख आहे. तरी त्यांना उपचाराकरिता नगरसेवक स्वेच्छानिधीतुन १८,०००/- (अठरा हजार रु. फक्त) रुपये आर्थिक विशेष बाब म्हणुन देण्यात यावी ही विनंती.

सुचक : श्री. राजु आर. शिंदे
अनुमोदक : श्री. भगवान घडामोडे
श्री. गणेश तांबे
दिनांक : १३.११.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. सोपन मगरे यांना किडनी स्टोनचा आजार असलयामुळे त्यांचेवरिल उपचारासाठी नगरसेवक स्वेच्छानिधी मधुन विशेष बाब म्हणुन रु. १८,०००/- (रु. अठरा हजार) आर्थिक सहाय्य करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १४४/७** :

औरंगाबाद शहरातील शहागंज भागास आणि शहागंज चमन यांना ऐतिहासीक वारसा लाभलेला आहे. जुन्या शहरात नागरिकांना विरंगुळा म्हणुन शहागंज चमन हेच एक मनोरंजनाचे आणि करमणुकीचे ठिकाण होते. भारताचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा देखील याच शहागंज चमन मध्ये अस्तीत्वात आहे शहागंज चमन च्या पुर्वेकडे रुंद विकास रस्ता, चंद्रसागर धर्मशाळा, बालाजी मंदिर आणि गांधी भवन सारख्या सुपरिचीत वास्तु उभ्या आहेत. पश्चिमेकडे क्लॉक टॉवर, शहागंज मस्जीद आहे. तर दक्षिणेकडे संस्थान गणपती आणि जैन मंदिराची भव्य वास्तु उभी आहे. अशाप्रकारे या भागात मध्दाळु भाविक आणि पर्यटकांचा नेहमीच राबता असतो.

पंरतु या ऐतिहासीक स्थळांच्या सौदर्यांत भर पाडण्यासाठी महानगरपालिकाने अद्याप कोणतीही कार्यवाही केली नाही. करिता शहागंज "चमन" मध्ये हायमस्ट लाईट बसवुन हा भाग सुशोभित व प्रकाशित करण्यात यावा करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.
सुचक : श्री. शे. इसाक
अनुमोदक : श्री. स. मुमताज अली,श्री. भगवान घडामोडे
श्री. सुदाम सोनवणे
दिनांक : १६.११.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहागंज येथे सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा चंद्रसागर धर्मशाळा, बालाजी मंदिर, गांधी भवन, क्लॉक टॉवर, शहागंज मस्जीद असल्यामुळे व तेथील रस्ता वर्दळीचा असल्यामुळे शहागंज चमन मध्ये "हायमस्ट" लाईट बसविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४५/८** :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा माझ्या वार्डात बऱ्याच वर्षापुर्वीचा असुन त्याच्या आजु बाजुला संरक्षण म्हणुन ४ फुटभिंत व लोखंडी जाळी टाकुन वरती पत्रे टाकुन संरक्षण कुंपन माझ्या स्वेच्छा निधीतुन करण्याकरिता सर्वसाधारण सभेने मान्यता देण्यात यावी.
सुचक : श्री. राजु आर. शिंदे
अनुमोदक : श्री. भगवान घडामोडे
श्री. भाऊसाहेब ताठे
दिनांक : १३.११.२०००.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाच्या आजुबाजुस ४ फुट भिंत व लोखंडी जाळी तसेच वरती पत्रे टाकणे ही कामे स. सदस्य श्री. राजु आर. शिंदे यांच्या स्वेच्छानिधीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४६/९** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराच्या मंजुर विकास योजनेनुसार मोढा नाका ते जाफरगेट हा १०० फुट रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित केलेला आहे. सदर भाग हा अत्यंत रहदारीचा असुन या ठिकाणी रस्ता रुंद होणे अत्यंत गरजेचे आहे. या भागात नियमित वाहतुकीची कोंडी होत असते. विकास योजना मंजुर होवुन २५ वर्षे लोटल्यानंतर ही हा रस्ता पुर्णतः विकसित करण्यात आलेला नाही तरी १०० फुट रुंद रस्त्याने बांधित होणाऱ्या सर्व मिळकतीचे भुसंपादन करण्यात यावे व त्या येणाऱ्या संभाव्य खचा्रस मान्यता मिळावी. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.
सुचक : सौ. संगिता मैंद
अनुमोदक : श्री. भगवान घडामोडे
दिनांक : १६.११.२०००.

संवाद :

श्री. अंबादास दानवे : या प्रस्तावात नमुद केलेल्या रस्त्याला लागुनच कैलास स्मशनभुमीकडे जाणारा रस्ता आहे. हा रस्ता रहदारीस फारच कमी पडतो तोही रस्ता भुसंपादन करण्यास यात समावेश करावा.

श्री. प्रशांत देसरडा : ९३ पासुन काही लोकांच्या जागा रस्त्यासाठी भुसंपादन केलेल्या असुन त्यांना अद्याप दिला गेला नाही.

मा. महापौर : स. सदस्य श्री. दानवे यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे कैलासनगरकडे जाणाऱ्या रस्त्याचे भुसंपादनासा ही मंजुरी देण्यात येते. हा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. व याची कार्यवाही ताबडतोब करण्यात यावी.

श्री. कोकाटे काशिनाथ : या अगोदर अनेक रस्त्याचा विकास होण्यासाठी जागा भुसंपादन करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात कार्यवाही काहीच होत नाही. शहरातुन जाणारा जालना रोड रुंद करण्यासाठी अनेक मिळकती संपादित केल्या परंतु सदर रस्त्याचे रुंदीकरण्याची कर्यवाही म्हणावी तशा गतीने होत नाही. असे दिसते. या रस्त्याची रुंदीकरणाची कार्यवाही कधी पर्यंन्त होणार याचा खुलासा द्यावा. जे प्रस्ताव भुसंपादनाच्या बाबतीत या अगोदर झालेले आहे. अशा प्रस्तावात कार्यवाही होण्यासाठी विशेष असे अधिकारी नेमावे. महानगरपालिकेकडे बजेट नाही परंतु विकास महामंडळाचे जे ३० कोटीचे बजेट आले त्यामधुन ही कामे होण्याची कार्यवाही व्हावी. क्रांतीचौक ते पैठणगेट रस्त्याचे काम थांबुन आहेत जे प्रस्ताव या अगोदर भुसंपादन करण्या संदर्भात झाले. अशा सर्व मिळकती घेण्यासाठी कुणाचा आक्षेप असतो. तक्रार असेल, देण्यास तयार नसेल अशांना चर्चेसाठी बोलवुन सर्व प्रकरणे निकाली काढावी. जानेवारी २००१ पर्यंन्त कार्यवाही व्हावी. व तसेच रोशनगेट ते सिडको-हडकोकडे जाणारा रस्ता सुध्दा विकसित होणे गरजेचे आहे. व एक विशेष अधिकारी नेमुन कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : स. सदस्य यांनी केलेली सुचना व जे रस्ते विकासासाठी याअगोदर भुसंपादन केलेल्या जागा ताब्यात घेण्याबाबत तात्काळ प्रशासनाने कार्यवाही करावी. यासाठी नगररचना विभागातील श्री. डी.पी.कुलकर्णी उपअभियंता नगररचना यांनी नोंद घ्यावी व त्यानुसार कार्यवाही करावी.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराच्या मंजुर विकास योजनेनुसार मोढा नाका ते जाफरगेट या १०० फुट रुंद विकास योजनेतील बाधीत होणाऱ्या सर्व मिळकतीचे भुसंपादन करण्यास आणि या रस्त्यावरुन कैलास नगर कडे जाणाऱ्या रस्त्याने देखील बाधित होणाऱ्या मिळकती संपादन करण्यास व त्यास येणाऱ्या संभाव्य खर्चास मान्यता देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४७/१०** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, इस्लाम दरवाजा (कटकटगेट) जवळील चौकास इस्लाम चौक असे नांव देण्यात यावे.

सुचक : सौ. नफिसुन्नीसा बेगम
अनुमोदक : श्री. नासेरखॉन

दिनांक : १६.११.२०००.

संवाद :
मा. महापौर : सुचक उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक सभागृहात उपस्थित नसल्यामुळे प्रस्ताव स्थगित ठेवणेस यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १४८/११** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद मंजुर विकास योजनेनुसार महानगरपालिका कार्यालय ते रोशनगेट हा रस्ता ५० फुट नियोजित केलेला असुन काही ठिकाणी रस्त्याचा विकास ही झालेला आहे. अलमास हॉटेल ते कामाक्षी लॉज हा रस्ता फार अरुंद असुन रहदारीस अडथळा निर्माण होत आहे व रहदारी बऱ्याच वेळेस वाहतुक टप्प होत आहे.

तरी अलमास होटल ते कामाक्षी लॉज ५० फुट रुंद रस्त्यात बाधीत संपुर्ण मिळकती संपादन करण्यास व संपादनास येणारा खर्चास मंजुरी मिळावी. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. निखत परवीन इजाज झैदी
अनुमोदक : सौ. साधना सुरडकर

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका कार्यालय ते रोशनगेट या ५० फुट विकास योजना रस्त्यापैकी अलमास हॉटेल ते कामाक्षी लॉज पर्यन्त बाधीत होणाऱ्या संपुर्ण मिळकती संपादन करणेस व संपादनास येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१४९/१२** :

औरंगाबाद महापालिका व औरंगाबाद जिल्हा क्रिकेट असोशिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने " नगरसेवक चषक स्पर्धा" घेण्यात याव्यात या स्पर्धेसाठी प्रत्येक नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन एक हजार रुपये देण्यात यावे. या स्पर्धेतुन प्रत्येक वार्डातुन क्रिकेट खेळाडुना वाव मिळेल. तसेच नगरसेवक चषक मुळे महापालिकेचाही गौरव होईल तरी सदर ठराव सर्वसाधारण सभेच्या कार्यक्रम पत्रिकेवर घ्यावा.

सुचक : श्री. जयवंत (बंडु) ओक
अनुमोदक : श्री. अंबादास दानवे, श्री. भरत लकडे, श्री.
श्री. आनंद तांदुळवाडीकर
दिनांक : १७.११.२०००.

संवाद :
मा. महापौर : सुचक उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १५०/१३** :

औरंगाबाद शहरातील खडकेश्वर प्रभागात महात्मा ज्योतीबा फुले पुतळयापासुन ते छत्रपती शाहु महाराज यांच्या पुतळयापर्यंन्त रस्त्यांच्या दोन्ही बाजुला फुटपाथ बांधण्यात यावेत. तसेच छत्रपती शाहु महाराज ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयापर्यंन्त असलेल्या रस्त्यावरही दोन्ही बाजुस फुटपाथ बांधण्यात यावेत. त्यामुळे रस्ते स्वच्छ व चांगले राहतील.

सुचक : श्री. जयवंत ओक
अनुमोदक : श्री. भरत लकडे
श्री. आनंद तांदुळवाडीकर
दिनांक : १७.११.२०००.

संवाद :
मा. महापौर : सुचक उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १५१/१४** :

शहरात सुमारे ५०० ते ६०० डॉक्टरर्सची हॉस्पीटल्स व कन्सल्टींग रुमस् आहेत. त्याठिकाणी रुग्णांना औषधोपचार केल्यावर वापरलेल्या सिरीज व निडल्स् हया कचरा कुडीत फेकल्या जातात. कचरा कुंडीतील हया वस्तु प्लॉस्टिक पेपर व भंगार गोळा करणारे निवडुन परत उत्पादकास विकण्याची शक्यता असुन त्यामुळे जनतेच्या आरोग्यास धोका आहे. अशा वास्तु कचरा कुंडीत न टाकण्याचे बंधन सर्वावर करण्यांत यावे तसेच सदरील सिरीज व निडल्स् नष्ट करण्याचे काम सेवाभावी संस्थाना द्यावे शिव उद्योग या संस्थेस हे काम देण्याची कृपा करावी. पुणे मुंबई शहरात सध्या शिव उद्योग हा प्रयोग करित असुन तो यशस्वी होत आहे. त्यामुळे शिव उद्योगाच्या बेरोजगारांना त्यामुळे रोजगाराची संधी मिळेल.

तरी आपण येणाऱ्या सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव ठेवण्याची कृपा करावी.

सुचक : श्री. जयवंत ओक
अनुमोदक : श्री. अंबादास दानवे
श्री. आनंद तांदुळवाडीकर
दिनांक. : १७.११.२०००.

संवाद :
मा. महापौर : सुचक उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक सभागृहात स्थगित ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १५२/१५** :

औरंगाबाद महापालिकेच्या असलेल्या जागा व रस्ते यांची माहिती दर्शविणारा बोर्ड फलक महापालिकेच्या जागेवर वा रस्त्यावर लावण्यात यावा सदरील फलकावर जागेची थोडक्यात माहिती व नकाशा लावण्यात यावा सदरील जागेवर अतिक्रमण वा अनाधिकृत बांधकाम होणार नाही. यासाठी नोटीस लावण्यात यावी. सदरील जागा इशारा देण्यात यावा त्यामुळे महापालिकेचे जागेचे हस्तांतर होणार नाही. तसेच त्यावर अनधिकृत बांधकामही होणार नाही. सदरील जागेचे क्षेत्रेही नकाशावर दर्शविण्यांत यावे त्यावर मालमत्ता अधिकारी प्रशासकिय आधिकारी यांनी महिन्यांत एकदा जागेवर भेट देऊन आयुक्तांना मालमत्ता व्यवस्थित असल्याचे अहवाल द्यावे. तसेच महापालिकेचे रस्तेही त्याच प्रमाणे फलक लावुन त्यांनी लांबी, रुंदी दर्शविण्यांत यावी. रस्त्यावर अतिक्रमण होऊ नये म्हणुन रस्त्याची रुंदी लांबी देण्यात यावी.

सुचक : श्री. जयवंत ओक
अनुमोदक : श्री. भरत लकडे
श्री. आनंद तांदुळवाडीकर
दिनांक : १७.११.२०००.

संवाद :
मा. महापौर : सुचक उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १५३/१६** :

जसे स्मशान भुमीवर स्मशान जोगीची नेमणुक करण्यात आली आहे. त्याप्रमाणे २७ विकसित मुस्लीम कब्रस्थानावर त्वरित वाचमची नेमणुक करावी, जेणे करुन तेथील कब्रस्थानाची देखभाल व साफसफाई नियमीतपणे होत राहिल.

करिता आपणांस विनंती करण्यात येते की, २७ विकसित कब्रस्थानावर वॉचमनची नेमणुक बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. शेख इसाक शेख जैनोद्दीन
अनुमोदक : श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
दिनांक : १७.११.२०००.

चर्चा :

श्री. स.अली मिरा सलामी : या अगोदर ही दीड (१$^{१/२}$) वर्षापुवी अशाच प्रकारचा प्रस्ताव मंजुर केलेला होता. वॉचमन देण्या संदर्भात संचिका चालु आहे. त्याची काय कार्यवाही झाली त्याचा खुलासा करावा.

सहाय्यक आयुक्त : शासन निर्णयानुसार नवीन भरतीवर बंदी आल्याने नोकर भरती करता येत नाही.

श्री. स.अली मिरा सलामी : ठराव मंजुर होऊन वर्ष झाले त्यानंतर शासन निर्णय आला त्या अगोदर का कार्यवाही केली नाही.

श्री. कोकाटे काशिनाथ : ठराव पास होऊन १ वर्ष झाले अधिकारी बेजबाबदारपणे उत्तरे देतात.ज्या तारखेला वॉचमन देण्याचा ठराव मंजुर झाला त्यानंतर नोकर भरती करण्यात आलेली आहे. ठरावाची अंमलबजावणी का झाली नाही. दिरंगाई होत असेल तर बरोबर नाही. तात्काळ कब्रस्थानावर वॉचमनची नियुक्ती करावी.

श्री. स.अली मिरा सलामी : वक्फ बोर्डचे नाहरकत प्रमाणपत्र आणुन सुध्दा कार्यवाही झालेली नाही जुनी संचिका चालु आहे त्यानुसारच कार्यवाही करावी.

मा. महापौर : वॉचमन देण्यासंबंधी या अगोदर ठराव झालेला असुन त्याची संचिका कार्यवाहीस्तव आहे त्यानुसारच कार्यवाही करावी प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे २७ विकसित कब्रस्थावर वॉचमन नेमणुक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१५४/** :

मागील जनरल बॉडीच्या बैठकीत महानगरपालिका सभागृहामध्ये न्यु नंदनवन कॉलनी मधील अे-१ डीफेन्सच्या जागेमधुन असलेल्या सार्वजनिक व रस्त्याबाबत सविस्तर चर्चा होऊन चर्चेमध्ये सदरील जागा घेण्याबाबत व या भागातील रस्ता देण्या बाबत मान्यता देण्यात आली व त्याप्रमाणे दि. २८.९.२०००. डीफेन्स ऑफिसच्या पत्रानुसार आपण दि. ३०.१०.२०००. अेएमसी/पीसे/२०००/४९१ २ डिसेंबर २००० मुदत ठराव मंजुर करण्या करिता मागण्यात आली असल्यामुळे सदरील बैठकीत ठराव मंजुर करण्यात यावा.

सुचक : श्री. गणेश तांबे
अनुमोदक : श्री. राजु शिंदे
श्री. भगवान घडामोडे

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु नंदनवन कॉलनी मधील अे-१ डिफेन्सच्या जागेमधुन सदरील भागात रस्ता देण्यासाठी ठराव मंजुर करणेस मागण्यात आलेली मुदतवाढ देण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

न्य नंदनवन कॉलनी अप्रोच रस्ता प्रकरण निकाली काढणे बाबत सर्वसाधारण सभेत द्यावयाची संक्षिप्त टिपणी

छावणी हद्दीलगत असलेल्या सर्वे नं. २४,२५,२६ व २७ मधील अभिनंदन कॉलनी, भुजबळनगर, न्यु नंदनवन कॉलनी व अमन कॉलनी इत्यादी वस्तीतील भाग अनाधिकृत विकसीत झाला व पक्षपाणी कॉलनी ही अधिक वसाहत आहे. सदर वसाहतीतील नागरिकांनी पक्या स्वरुपाची घरे बांधलेली आहे. आणि वस्तीच्या पुर्व बाजुस भारतीय सैन्य दलाची हद्द आहे. सदर हद्दीतुन १९९३-९४ मध्ये तत्कालीन महापौर श्री. अशोक सायन्ना यादव यांनी सैन्य दलाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन अंदाजे २८२ मिटर, लांबीच्या रस्त्याचे

खडीकरण महानगरपालिकेच्या खर्चाने करुन दिले तेव्हा भारतीय सैन्य दलाच्या अधिकाऱ्याने आपल्या हद्दीची कायम खुन रस्ता सोडुन तारकुंपन स्थलांतरित केले.

वरील कॉलनी करिता छावणी हद्दीतुन जाणारा हा एकमेव पोच रस्ता आहे. व सदर रस्ता छावणी मंडळाने बंद केल्यास मुख्य रस्त्यावरील अनाधिकृत विकसीत वसाहतीतील भुखंड धारकांना रस्ता राहणार नाही. तसेच दुसरा पर्यायी रस्ता देखील नाही. लोकहिताच्या दृष्टीने विचार करता सदरचा मुख्य पोच रस्ता भुसंपादन करुन महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करणे गरजेचे आहे. त्यानुसार महानगरपालिकेने सदर जागेचा मोबदला छावणीस देवुन रस्ता संपादित करणे बाबत बैठकीत चर्चा झाली आहे. त्यानुसार छावणी मंडळास महानगरपालिकेने पत्र देवुन सदर जागेचे मुल्यांकन किती होते. याबाबत माहिती मागविली असता त्यांनी पत्र क्र. ५११५/ एन.एन.सी.आर/क्यु दिनांक २७.४.९९ अन्वये कळविले की सदरील जागेचे क्षेत्रफळ ४९३३.११ चौ. मी. असुन त्याचे मुल्यांकन रु. १४,७९,९३३/- इतके होत आहे.

दिनांक ४.६.९९ रोजी मा. आयुक्त महानगरपालिका यांच्या दालनात छावणी स्टेशन कंमाडर कार्यालयाचे ले. कर्नल श्री. डोग्रा मा. आयुक्त मा. उपआयुक्त या स.स. नरवि यांची बैठक संपन्न झाला त्यामध्ये श्री. डोग्रा यांनी सुचविले की, मुल्यांकनाची रक्कम छावणी मंडळास पैशाच्या अथवा चेकच्या स्वरुपात नको आहे. त्याऐवजी छावणी मंडळालगत एखाद्यी महानगरपालिकेची जागा द्यावी अथवा छावणी मंडळास उपयुक्त असे बांधकाम (जसे संरक्षीत भिंत, तारकुंपन, दवाखाना, शाळा इ.) बांधकाम करुन द्यावे म्हणुन मा. आयुक्त महानगरपालिका यांनी समंती दर्शविली व तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मांडण्याचे सुचविले.

तरी श्री.डी.सी.डोग्रा यांचे पत्र दि. ४.५.२००० नुसार सदर प्रकरणी डिफेन्स इस्टेट पुणे यांचे प्रतिनिधी, न्यु नंदनवन कॉलनीचे प्रतिनिधी व स्थानिक मिलीटर आधिकारी यांचे प्रतिनिधी सोबत बैठक आयोजित करुन सदर प्रकरणात निर्णय घेण्याबद्दल कळविले आहे. रक्कम रु. १४,७९,९३३/- रकमेच्या हद्दीपर्यंन्त महानगरपालिकेने स्थानिक भारतीय सैन्य दलाचे कोणते काम करावयाचे आहे. हा निर्णय येणे आहे.

करिता संक्षिप्त टिपणी सर्वसाधारण सभेमध्ये विचारार्थ सादर.

स्वाक्षरीत/-
अतिरिक्त अभियंता,
महानगरपालिका, औरंगाबाद.

या बरोबरच "जण गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १९.१२.२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त. मंगळवार दिनांक १९.१२.२००० रोजी महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मा. महापौर डॉ. भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील "प्रबोधकार केशव सिताराम ठाकरे" सभागृह येथे दुपारी ३.०० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्ग यांच्यासह खाली प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
२) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
३) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहमद
७) स.स.श्री. शे. इलियास किरमानी शे. उमर
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.सौ. शकुंतला सांडुजी इंगळे
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी
११) स.स.श्री. शिंदे राजु रामराव
१२) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१३) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१५) स.स.सौ. धायतिलक लिलावती बाळासाहेब
१६) स.स.श्री. जगताप मोतीवाला रघुनाथ
१७) स.स.सौ. शिंदे रुख्मिनी राधाकिसन
१८) स.स.श्रीमती. किवळेकर जयश्री सारंग
१९) स.स.श्री. शे. शकिल पटेल शे. बुढण पटेल
२०) स.स.श्रीमती. डॉ. आशा उत्तम बिनवडे
२१) स.स.श्रीमती. मानकापे पार्वती लहानु
२२) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२३) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२४) स.स.सौ. ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२५) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२६) स.स.श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग
२७) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२८) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२९) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
३०) स.स.श्री. अय्युब खान सरदार खान
३१) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
३२) स.स.श्री. सिरसाठ संजय पांडुरंग
३३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर

३४) स.स.सौ. रशिदा बेगम गफफार यारखान
३५) स.स.श्री. वडागळे सुनिल बुथवेल
३६) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३७) स.स.श्री. स. मुमताज अली मोज्जम अली
३८) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३९) स.स.श्री. नासेरखान सरदारखान
४०) स.स.श्री. थोरात दत्तात्रय उर्फ बाळासाहेब रामराव
४१) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४२) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
४३) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४४) स.स.सौ. नुसरतबानो फिरोजखान
४५) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
४६) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४७) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४८) स.स.श्री. सुरगोनीवार नारायण चंद्रय्या
४९) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
५०) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
५१) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
५२) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५३) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
५४) स.स.सौ. शाहिन जफर महमुद जफर
५५) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई
५६) स.स.श्री. सलीम स. युसुफ
५७) स.स.श्री. तकी हसनखान कासिम हसनखान
५८) स.स.श्री. गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
५९) स.स.श्री. मिर हिदायत अली मिर बसालत अली
६०) स.स.श्री. शे. ईसाक जैन्नोद्दीन शेख
६१) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
६२) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६३) स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
६४) स.स.श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान
६५) स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर
६६) स.स.श्री. स.अली सलामी स. मीरा सलामी
६७) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
६८) स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
६९) स.स.श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज
७०) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
७१) स.स.सौ. सलमाबानो मिर मो. अली

मा. महापौर : विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**विषय क्र. १५५/१** :

प्र. कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे. की, मो. ब्रिजवाडी स्लम येथे नाला संरक्षित भिंत बांधणे बाबत कामा करिता सार्व. बांधकाम विभाग यांचे वर्ष ९९-२००० च्या दरसुचिनुसार रु. २०,२८,९९६/- च्या अंदाज पत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खुली गटार/संरक्षित भिंत बांधणे (शासकिय अनुदान २०००-२००१)" या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १६.११.२०००. रोजी प्रशासकिय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रु. २०,२८,९९६/- चे अंदाज पत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. ब्रिजवाडी (स्लम) येथे नाला संरक्षित भिंत बांधणेच्या साठी रक्कम रुपये २०,२८,९९६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५६/** :

प्र. कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर मुकुंदवाडी (स्लम) येथील रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सार्वजनिक बांधकाम खाते यांचे वर्ष ९९-२००० च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १२,२४,४३०/- चे अंदाज पत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "पुर्नडांबरी करण" च्या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि. २०.११.२००० ला प्रशासकिय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रु. १२,२४,४३०/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर मुकुंदवाडी (स्लम) येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी रक्कम रु. १२,२४,४३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५७/** :

प्र. कार्यकारी अभियंता,स्लम यांनी प्रस्ताव सादर केला आहे. की, मो. नारेगांव (स्लम) येथे दगडी गटार बांधणेच्या कामाकरिता सार्व. बांधकाम खाते यांचे वर्ष ९९-२००० च्या दरसुची नुसार रु. ३६,८८,६०४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "शासकिय अनुदान २०००-२००१" मध्ये प्रस्तावित आहे. आणि "खुली गटार व संरक्षित भिंत" या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २१.११.२००० ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रु. ३६,८८,६०४/- यास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार मो. नारेगांव (स्लम) येथे दगडी गटार बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३६,८८,६०४/- च्या अंदाजपत्रकास सार्वनुमते मंजुर देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र१५८/४** :

उपसंचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना १९७५ नुसार क्रांतीचौक ते पैठणगेट ३०.० मीटर (१०० फुट) रुंद रस्ता आहे. यापैकी पहिला टप्पा म्हणुन रॉक्सी सिनेमा ते पैठणगेट पश्चिम बाजु १०० फुट रुंद रस्त्याप्रमाणे बांधित मिळकती महानगरपालिकेने संपादन करुन विकासीत केला आहे.

त्यांनतर दुसरा टप्पा सिल्लेखाना चौक ते क्रांतीचौक १०० फुट रुंद प्रमाणे दोन्ही बाजु महानगरपालिकेने संपादन करुन विकसित करण्यात येत आहे.

वरील तिन्ही मुद्दे लक्षात घेता सिल्लेखाना चौक ते पैठणगेट रस्त्याने बांधीत होणाऱ्या मिळकती पुर्व बाजुच्या बाधित मिळकती संपादन करणे आवश्यक आहे.

तसेच क्रांतीचौक ते पैठणगेट हा शहरातुन मध्यवस्तीत म्हणजेच औरंगपुरा गुलमंडी,चौक,सराफा या भागात जाण्यास मुख्य रस्ता आहे. त्यामुळे क्रांतीचौक ते पैठणगेट यातील वर नमुद केल्याप्रमाणे तिसरा टप्पा म्हणुन सिल्लेखाना चौक ते पैठणगेट पुर्वबाजुकडील मिळकती संपादन केल्यास क्रांतीचौक ते पैठणगेट हा मंजुर विकास योजनेनुसार १०० फुट रुंद रस्ता पुर्णपणे विकासीत होईल. व रहदारीस तसेच वाहतुकीस सुलभता व नियमितता उपलब्ध होईल.

करिता सिल्लेखाना चौक ते पैठणगेट पुर्व बाजुकडील बांधीत होणाऱ्या मिळकती संपादन करण्यासाठी भुसंपादन कायदयातहत रितसर कार्यवाही करण्याकरिता त्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या मंजुरीसह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

प्रस्ताव मान्यतेनंतर रितसर भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात येऊन त्यांचे मार्फत भुसंपादन करण्यात येईल.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्यानुसार क्रांतीचौक ते पैठणगेट ३० मिटर रस्ता रुंदीकरणाच्या तिसरा टप्पा म्हणुन सिल्लेखाना चौक ते पैठणगेट पुर्व बाजुकडील बाधित होणाऱ्या रितसर कार्यवाही करण्याकरिता आणि त्यासाठी लागणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५९/४** :

उपसंचालक नगररचना महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराच्या मंजुरी विकास योजना वाढीव हद्दी मधील मौजे इटखेडा येथील सेक्टर एस-२, एन-१ मध्ये खालील आरक्षणे व रस्ते आहेत.

| अ. क्र. | आरक्षणा/रस्ता | उद्देश | क्षेत्र अंदाजे | सर्व्हे क्रमांक |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | आरक्षण क्रमांक २ | क्रिडांगण | ४,२२७ चौ.मी. | ३६/पै व ३७/पै. |
| २. | आरक्षण क्रमांक ३ | प्राथमिक शाळा | ४,५७६ --//-- | ३६/पै व ३५/पै. |
| ५. | आरक्षण क्रमांक ४ | हायस्कुल | ११,५२० --//-- | ३५/पै ४०/पै,व २९/पै. |
| ४. | आरक्षण क्रमांक ५ | क्रिडांगण | ११,५२० --//-- | ४०/पै२८पै, व २६/पै. |
| ५. | आरक्षण क्रमांक ६ | प्राथमिक शाळा | ३,८४० --//-- | २६/पै व २४/पै. |
| ६. | आरक्षण क्रमांक ७ | पाण्याची टाकी | ७,०४० --//-- | २४/पै. |
| ७. | पुर्व/पश्चिम १५ मी. रस्ता इटखेडाचे दक्षिण बाजु. | १५ मिटर रस्ता | ३,९०० --//-- | २४/पै,२६/२५/पै, पै,४९/पै,५०/पै, ५१/पै,५२/पै,५३/ पै,४८/पै. |
| ८. | दक्षिण उत्तर १५ मिटर रस्ता | १५ मिटर रस्ता | ११,४०० --//-- | ४७/पै,४६/पै,२८/ पै व २६/पै. |

उक्त आरक्षणासाठी पोच रस्ते सुध्दा वरील प्रमाणे प्रस्तावित आहेत. मौजे इटखेडा व त्या भागातील वाढता विकास लक्षात घेता वरील आरक्षणे भुसंपादन करुन विकासित करणेच्या दृष्टीने योग्य असल्याबाबत या प्रकरणी कार्यकारी अभियंता (पा.पु.) व शिक्षणाधिकारी यांचे अभिप्राय घेण्यात आलेले आहेत. त्यानुसार वरील आरक्षणे व रस्ते संपादन करणे बाबतचा भुसंपादन प्रस्ताव त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मंजुरीसाठी सादर. प्रस्ताव मान्यतेनुसार भुसंपादनाचे रितसर कार्यवाहीस्तव प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात येईल मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री. अविनाश कुमावत : प्रस्तावात जे आरक्षण दाखवले ती जमीन सध्या खुली आहे का अतिक्रण झाले आहे त्याचा खुलासा व्हावा.

श्री. अंबादास दानवे : यासाठी सर्व खर्च किती येणार याची पण माहिती द्यावी.

श्री. प्रकाश निकाळजे : आरक्षण जागा नेमक्या कोणत्या संपादित करावयाच्या त्याची सविस्तर माहिती प्रस्तावात दिलेली नाही.

नगर रचनाकार-२ : आरक्षणे वगळण्याचा प्रस्ताव नसुन आरक्षण व रस्तेची जागा भुसंपादन करण्याचा प्रस्ताव आहे. प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर पुढील कार्यवाहीस्तव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवण्यात येणार आहे. भुसंपादन केलेल्या जागेची किंमत ठरवल्या जाईल नंतर निवाडा जाहिर होईल.

श्री. अविनाश कुमावत : या आरक्षणाच्या संबंधीत श्री. भंडारे यांची आरक्षणाखालील तेवढीच जमीन घेण्यात यावी. बाकीचे भुसंपादन करुन नये. क्रिडांगण व शाळेचे आरक्षण घ्यावे.

मा. महापौर : आरक्षणात जागा कुणाच्या व कुठे येतात त्याचा उल्लेख व्हावयास पाहिजे जे आवश्यक कामासाठी आरक्षण घेणे तेच भुसंपादन करावे शाळा व क्रिडांगणाचे आरक्षण आवश्यक आहे तेच भुसंपादन करावे असे माझे मत आहे. श्री. मंडोरे यांचा अर्ज आपल्याकडे आलेला आहे काय ?

नगर रचनाकार -२ : श्री. मंडोरे यांची जागा क्रिडांगणासाठी आरक्षत आहे. क्रिडांगण संपादन करावयाचे झाल्यास माध्यमिक शाळा घेणे आवश्यक आहे. मंडोरेचा भुसंपादन करण्याबाबत अर्ज आहे.

श्री. रतनकुमार पंडागळे : जे आरक्षण आवश्यक आहे ते भुसंपादन करावे.

श्री. स.अली मिरा सलामी : जागा भुसंपादन करुन कार्यवाही पुर्ण होण्याच्या बऱ्याच संचिका पडुन आहे. जुना बाजार ते चंप्पा मज्जीद रस्त्याचे भुसंपादन केले कार्यवाही पुर्ण झाली नाही त्याचा खुलासा दयावा तसेच सिटीचौक ते दिवानदेवडी रस्ता अपुर्ण अहे कधी कार्यवाही करणार.

श्री. रतनकुमार पंडागळे : आता पर्यन्त किती भुसंपादन झाले याची माहिती दयावी.

मा. महापौर : या अगोदर जे रस्ते अर्धवट भुसंपादन केले त्याची मोबदलयाची रक्कम भरावी त्याची यादी सभागृहाला पुढील बैठकीत सादर करावी, ज्या रस्त्याचे ॲक्वायर केले त्याची पण माहिती दयावी. या प्रस्तावास मंजुरी दिल्यानंतर मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी जाणार आहे. फक्त दोनच आरक्षण भुसंपादन करण्यास मंजुरी देण्यात येते.

श्री. स.अली मिरा सलामी : हा प्रस्ताव मंजुर करणे जरुरी आहे. एकतर परवानगी द्यावी किंवा संपादन करावे. लोक न्यायालयात जातील प्रशासनास नोटीसा येतील या गोष्टी घडु नये म्हणुन ज्याची जागा आहे त्याची मान्यता घ्यावी. व त्यांच्या जागेचा मोबदला भुसंपादन केल्यास त्यांना लवकरात लवकर दिला गेला पाहिजे अशा विषया संदर्भात एक नगररचना विभागाची विशेष बैठक घ्यावी व त्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन निर्णय व्हावेत आरक्षणावर चर्चा होऊ द्या. जनरल बैठकीत असे विषय सादर झाल्यास वेळ कमी मिळतो व अभ्यास करणे शक्त नसते. नुसते प्रस्ताव मंजुर होतात पुढे काहीही कार्यवाही होत नाही. अशा प्रस्ताव संबंधी स. सदस्यांना सविस्तर माहिती दिली गेली पाहिजे. नकाशे दाखवावे,सविस्तर तपशिल सभागृहासमोर ठेवावा व या अगोदर झालेल्या प्रस्तावांवर कार्यवाही करावी. विशेष सभा बोलवुन प्रस्ताव सादर करावे.

मा. महापौर : रस्ते विकासासाठी बऱ्याच जागा भुसंपादन केलेल्या आहे. फक्त शाळा व क्रिडांगणासाठी जे आरक्षण आहे ते भुसंपादन करावे या आरक्षणातील ज्यांचा मोबदला देणे बाकी असेल त्यांची कार्यवाही करावी.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात प्रत्यक्ष झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीसाठी मंजुर झालेल्या विकास योजनेतील मौजे इटखेडा येथील सेक्टर एन-२,एन-१ मधील क्रिडांगण क्रमांक ४, हायस्कुल व आरक्षण क्रमांक ५, क्रिडांगण संपादन करण्यास भुसंपादनासाठी लागणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६०/६** :

कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, गुरुनगर ही वसाहत एन-८ सिडको भागात बसलेली वसाहत आहे. सिडको भागात महानगरपालिका १९८५ पासुन पाणी पुरवठा करीत आहे.

सिडकोच्या भुखंडावर खाजगी गृहनिर्माण संस्था स्थापित झालेल्या आहेत व सिडकोच्या नियमानुसार व मापदंडानुसार विकसित होऊन काही गृहनिर्माण संस्थांना अंतर्गत विकासाची कामे जसे रस्ते, पाणी पुरवठा, ड्रेनेज इत्यादी कामे स्वत: करुन घेतलेली आहे, काही गृहनिर्माण संस्थानी संस्था विकासाची कामे स्वत: करणार आहे असे सिडकोला करारात लिहुन दिलेले आहे व त्याप्रमाणे विकासाची कामे केलेली आहेत.

प्रस्तावातील जलवाहिनी टाकण्याचे काम नगरसेवक स्वेच्छानिधीतुन प्रस्तावीत करण्यात आलेले आहे.

गुरुनगर ही वसाहत सिडकोच्या जागेवर अधिकृतपणे बसलेली वसाहत असुन सदर वसाहतीमध्ये जलवहिनी संस्थेने स्वत:च्या खर्चाने टाकलेली आहे. आता या वसाहतीमध्ये रहिवाशांनी घरे बांधल्यामुळे येथील लोकसंख्येत वाढ झाल्याने या वसाहतीत कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणी पुरवठा होत आहे. त्यामुळे या वसाहतीतील कमी व्यासाच्या जलवाहिनी बदलुन मोठया व्यासाची जलवाहिनी टाकणे जरुरीचे आहे.

गुरुनगर व यासारख्या इतर गृहनिर्माण संस्थेत ज्यांनी विकास खर्च सिडकोत केलेला आहे व ज्या वसाहतीचा पाणी पुरवठा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेला आहे. गृहनिर्माण संस्थेत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्याकरिता नगरसेवक स्वेच्छनिधीमधुन खर्च करण्याकरिता धोरणात्मक निर्णय घेणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर अशा वसाहतीचा बाबतीत या वसाहतीच्या रहिवाशांना/ मालमत्ता धारकांना मालमत्ता कर महानगरपालिकेस अदा करावा लागेल अशीही अट राहिल.

तरी प्रस्ताव धोरणात्म निर्णयास्तव सादर.

संवाद:

श्री. प्रकाश निकाळजे : स्वेच्छानिधीतुन विकास कामे करण्याबाबतचे प्रस्ताव येतात मंजुरही होतात परंतु मा. आयुक्त अशा संचिकेस मान्यता देण्यास नकार देतात. नुसते प्रस्ताव मंजुर करुन जनतेला प्रदर्शन होते व जनता विकास कामे होण्या संदर्भात आमचेकडे मागणी करतात. स्वेच्छानिधीतुन विकास कामे करणार की नाही यासाठी निश्चित धोरण ठरवावे.

मा. महापौर : सिडकोचा पाणी पुरवठा महानगरपालिकाच्याकउे आहे. धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी हा प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर झालेला आहे.

श्री. सुरजितसिंग खुंगर : सिडकोने महानगरपालिकेकडे पाणी पुरवठा हस्तांतरण केला व त्यानंतर बऱ्याच ठिकाणच्या पाईप लाईन महानगरपालिकाकडुन बदलल्या गेल्या परंतु कधी बदलल्या, किती खर्च झाला. जुन्या पाईप लाईनचे मटेरीयल कुठे आहे त्याची काय विल्हेवाट लावली याची सविस्तर माहिती सभागृहाला संबंधीत अधिकाऱ्यांनी द्यावी.

कार्यकारी अभियंता : सन ८७-८८ पर्यन्त सिडकोच्या भागाचा पाणी पुरवठा सिडको प्रशासनाकडे होता. ८८ पासुन महानगरपालिकाने सिडकोच्या पाणी पुरवठा हस्तांतर केल. स. सदस्य श्री. खुंगर यांनी जो प्रश्न उपस्थित झाला त्यासंदर्भात महानगरपालिकाने पाणी पुरवठा हस्तांतरन केल्या पासुन सिडकोमध्ये कमी व्यासाच्या पाईप लाईन टाकलेल्या असुन ज्या सेक्टर मध्ये सिडकोच्या अगोदर ज्या पाईपलाईन होत्या त्याच्या दुसऱ्या विरुध्द बाजुला महानगरपालिकाने पाईपलाईन टाकलेल्या आहेत. त्यामुळे जुन्या पाईलाईन काढलेल्या नाही.

श्री. सुरजितसिंग खुंगर : सिडकोने पाणी पुरवठयासाठी किती खर्च केलेला आहे त्याची सर्व माहिती अधिकारी यांनी घेतलेली आहे काय ? कोणत्या पाईपलाईन किती व कोठे-कोठे खर्च झाला याची माहिती देण्यात यावी.

मा. महापौर : पाणी पुरवठयाचा हा प्रस्ताव असुन महात्वाचा आहे स. सदस्य श्री. सुरजितसिंग खुंगर यांनी त्यांना काय माहिती पाहिजे. याचा लेखी स्वरुपात पत्र सचिव यांचेकडे दयावे त्यानुसार त्याची माहिती संबंधीत अधिकारी देतील.

श्री. काशिनाथ कोकाटे : सिडको भागात पाणी पुरवठा होणाऱ्या दृष्टीने हा प्रशासकीय प्रस्ताव सादर केलेला आहे. सन-८५ पासुन महानगरपालिका सिडकोला पाणी पुरवठा करित आहे त्यानंतर पाणी पुरवठा हस्तांतरीत केलेला आहे. यांतर अनेक वेळा पाण्याच्या संदर्भात महानगरपालिकेने विकास कामे केली व गेल्या २ महिन्यापासुनच आयुक्त आल्यापासुन स्वेच्छानिधीतुन पाण्याच्या संदर्भातील कामे व्हावी म्हणुन परवानगी मागवली होती. सिडकोमध्ये नगरसेवकांचा निधी वापरता येत नाही म्हणुन बरीच प्रकरणे स्थगित ठेवली व आता प्रशासनाकडुन स्वेच्छानिधी वापरण्याबाबतचा प्रस्ताव येतो यात विसंगती दिसुन येते. एक बाजुने मनाई होते दुसऱ्या बाजुने परवानगी मागवली जाते. सिडको भागामध्ये सिडकोची ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर कामे व्हावी असे ठरले असतांना हा प्रस्ताव ठेवण्याचा उद्देश काय ? याचा सविस्तर खुलासा व्हावा.

मा. महापौर: प्रशासनातर्फे प्रस्ताव सादर केलेला आहे खुलासा द्यावा.

कार्य. अभियंता : सिडकोमध्ये बरचे खाजगी गृहनिर्माण संस्था असुन १०८ भुखंड दिले आहे. सिडको बरोबर विकासासाठी करारनामा करुन गृहनिर्माण संस्थेने त्या त्या भागात आपआपल्या सुविधा करुन घ्याव्यात असा करारनामा झालेला आहे व पाणी पुरवठा हा महानगरपालिकाकडे असल्याने हा प्रस्ताव सादर केला. बऱ्याच सोसायट्टयांमध्ये जुन्या पाईप लाईन व्यासाच्या असुन कालांतराने लोकसंख्येत ही वाढ झालेली असुन अपुरा पाणी पुरवठा मिळतो आहे व बऱ्याच ठिकाणी नविन मोठया व्यासाची पाईपलाईन टाकण्याची मागणी होत आहे. म्हणुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी म्हणुन प्रस्ताव ठेवलेला आहे.

श्री. सुदाम सोनवणे : हस्तांरण होत नाही तो पर्यंन्त मालमत्ता कर करण्यात येऊ नये असा निर्णय झालेला आहे. आता कामे करणार परंतु मालमत्ता कर भरावा असा प्रस्ताव आलेला आहे. सभागृहाने घेतलेल्या निर्णयाला या प्रस्तावामुळे काहीच महत्त्व नाही असे दिसते कामे करावयाची असेल तर मालमत्ता कर वसुल करु नये जेव्हा हस्तांतर होईल तेव्हा कार्यवाही करावी व विना मालमत्ता कर वसुल न करता विकास कामे करण्यात यावी या अगोदर सिडकोमध्ये कामे केलेली आहे.

मा. महापौर : सिडकोचे महानगरपालिकाकडे जो पर्यन्त हस्तांतरण होत नाही तो पर्यन्त मालमत्ता कर वसुल करु नये असा निर्णय या सभागृहाने घेतलेला आहे. मालमत्ता कर वसुल करुन अशा पाणी पुरवठयाच्या सुविधा देण्यास सभागृहाचा विरोध असल्याने मालमत्ता कर न घेता पाण्या सारख्या महत्वाच्या सुविधा जनतेला देण्यात याव्यात असा धोरणात्मक निर्णय हे सभागृह घेत आहे. ज्या वेळेस सिडकोचे महानगरपालिकाकडे हस्तांतरण होईल त्यावेळी मालमत्ता कर वसुली होण्याबाबत कार्यवाही करावी.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-८ सिडको गुरुनगर व या सारख्या इतर गृहनिर्माण संस्थेत ज्यांनी विकास खर्च सिडकोत जमा केला आहे व ज्या वसाहतींना पाणी पुरवठा महानगरपालिकाकडे हस्तांतरीत झालेला आहे. अशा गृह निर्माण संस्थेत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्याकरिता स. नगरसेवक स्वेच्छा निधीतुन खर्च करणेस सर्वानुमते मंजरी देण्यात येते. व अशा वसाहतींना रहिवाशांना/मालमत्ता धारंकांना तसेच सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे ज्यावेळी सिडकोचे महानगरपालिकाकडे हस्तांतरण होईल तेव्हा पासुन मालमत्ता कर अदा करावा लागेल असे सर्वानमुते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६१/१** :

प्रभाग क्र. २८ नक्षत्रवाडी, सदरील प्रभागातुन दोन हायवे रोड जात असुन, हया दोन्ही रोडवर जास्त प्रमाणावर जड वाहतुक असते व त्यात जास्तीची भर ओव्हर ब्रिज झाल्याने पडली आहे. ओव्हर ब्रिज संपला असता समोरिल चौकात वाहनाची रात्र-दिवस वाहतुक असते सदरील चौकातील प्रकाश व्यवस्था पुर्णपणे कोलमडली आहे. सदरील चौकात अपुऱ्या प्रकाश व्यवस्थेने वारंवार अपघात होतात.

करिता नक्षत्रवाडी प्रभागातील चक्रधर स्वामी चौकात एक हायमस्ट दिवा लावण्याबाबत प्रस्ताव मांडुन बहुमताने मंजुरी मिळणे.

सुचक : श्री. नंदकुमार घोडेले
अनुमोदक : श्री. अंबादास दानवे,श्री. जयवंत ओक
श्री. सुदाम सोनवणे.

संवाद :

श्री. काशिनाथ कोकाटे : या प्रस्तावाच्या अनुषंगाने शहरात संपुर्ण सर्व्हे करण्यात येऊन कोणता चौक महत्त्वाचा आहे. कोणत्या चौकात जास्त नागरिकांचा येण्या जाण्याची वर्दळ आहे. त्या चौकास चार रस्ते जोडलेले आहे काय ? अशा सर्व चौकात हायमस्ट दिवे बसवण्याबाबत प्रशासनाने पाहणी करुन तसा प्रस्ताव सादर करावा.

श्री. पांडुरंग तायडे : टी.व्ही.सेंटर येथे हायमस्ट दिवा बसवायचे साहित्य आलेले आहे परंतु अंतिम कार्यवाही करण्यास वेळ होत आहे का कार्यवाही केली नाही खुलासा दयावा.

मा. महापौर : हा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे परंतु यापुढे कोठे कोठे हायमस्ट दिवा बसवण्याची आवश्यकता आहे किती चौक आहेत त्या चौकास किती रस्ते जोडलेले आहे किती चौक आहेत प्रमाणात नागरिकांची वर्दळ आहे इतर दृष्टीने आवश्यकता आहे काय ? याचा सारासार अभ्यास करुन यापुढे कार्यवाही करण्यात यावी व तसा प्रशासकिय प्रस्ताव एकत्रित सभागृहापुढे सादर करावा.

**ठराव** :

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. २८ नक्षत्रवाडी प्रभागातील चक्रधर स्वामी चौकात हायमस्ट दिवा लावण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. यापुढे हायमस्ट दिवे कोणत्या

चौकात उभारावे याबद्दल प्रशासनाने सविस्तर योजना आखाली, त्यानुसार प्रस्ताव ठेवण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६२/२ :**

नक्षत्रवाडी प्रभागात, कांचनवाडी गट नं. ७ विभागात १० एकर जमीन ही रिकामी असुन,महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. सदरील रिकाम्या जागेवर वनस्पती उद्यान नविन स्थापन करुन विकसित करण्यात यावे. हया उद्यानामुळे कित्येक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होईल व तसेच औषधी उत्पन्नही वाढेल.

करिता कांचनवाडी गट नं. ७ विभागातील १० एकर जमीनीवर वनस्पती उद्यान विकसित करण्यात यावे.

सुचक : श्री. नंदकुमार घोडेले
अनुमोदक : श्री. अंबादास दानवे,श्री. जयवंत ओक,
श्री. सुदाम सोनवणे.

संवाद :

श्री. काशिनाथ कोकाटे : प्रस्ताव महत्त्वाचा आहे परंतु सदर गट नं. ७ ही जमीन कुणाच्या मालकीची आहे. हे सर्व करण्यासाठी कोणत्या कॉलीफिकेशनचा विचार होणार आहे. कर्मचारी किती लागणार अस्थापनेचा खर्च विचारात घेता व इतर संपुर्ण अभ्यास करुनच प्रस्ताव ठेवलेला आहे काय ? या संबंधी सर्व्हे करुनच या जमीनीची निवड केली काय या संपुर्ण बाबीचा खुलासा दयावयास पाहिजे.

मा. महापौर : आपल्याकउे आयुर्वेदीक वनस्पती उद्यान आता पर्यन्त झालेले नाही परंतु उद्यान असणे आवश्यक आहे. ऐन वेळी औषधी मिळत नाही. होणारे उद्यान ,ही जागा महानगरपालिकाची आहे काय ? या ठिकाणी वनस्पती उद्यान केल्यास योग्य होईल काय ? खर्च किती येणार याची संपुर्ण माहिती प्रशासनाने घ्यावी. प्रस्ताव तुर्त मंजुर करण्यात येतो. परंतु सविस्तर माहिती घेऊन त्या सह प्रस्ताव प्रशासनामार्फत नंतर पुन्हा सादर करावा.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. २८ नक्षत्रवाडी प्रभागात, कांचनवाडी गट नं. ७ विभागात १० एकर महानगरपालिकेच्या ताब्यातील जमीनीवर वनस्पती उद्यान विकसीत करण्यास सर्वांनुमते मंजुरी देण्यात येते तथापी सदर प्रकरणी प्रशासनामार्फत सविस्तर प्रस्ताव ठेवण्यात यावा. असे सर्वानुमते ठरलेक.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६३/३** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. १५,एन-३ एन-४ न्याय नगर मध्ये एन-४ ते पुंडलिक नगरकडे जाणारा रस्त्याला "भगवान बाबा रोड" असे नांव देण्यात यावे करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती जयश्री किवळेकर
अनुमोदक : सौ. जयश्री कुलकर्णी.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १५ एन-३ एन-४ न्यायनगर मध्ये एन-४ ते पुंडलिकनगरकडे जाणाऱ्या रस्त्यास "भगवान बाबा रोड" नांव देण्यास सर्वानमुते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६४/४** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ. आंबेडकर नगर ही वस्ती व्ही.अया.पी रोड जवळ बसलेली आहे. ती सुभोभित दिसण्यासाठी त्या ठिकाणी विद्यापीठ गेट सारखी भव्य प्रतिकृत (कमान) माझ्या स्वेच्छा निधीतुन बांधण्याचा माझा प्रस्ताव आहे. यासाठी माझ्या स्वेच्छानिधीतुन व उर्वरित रक्कम भगवान रगडे (नगरसेवक) ब्रीजवाडी व आयु. कुसुमताई खरात(नगरसेविका) रोजाबाग, यांच्या स्वेच्छानिधीतुन घेण्यात यावी.

करिता आपण विशेष बाब म्हणुन धोरणात्मक निर्णय घेऊन सदरील विद्यापीठ गेटच्या प्रस्तावास मंजुरी दयावी.

सुचक : सौ. शंकुतला इंगळे
अनुमोदक : श्री. भगवान रगडे,सौ. कुसुमताई खरात

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. आंबेडकर नगर वस्ती जवळील व्ही.आय.पी. रोडवर विद्यापीठ गेट सारखी भव्य प्रतिक्रती (कमान) प्रस्तावात नमुद केलेल्या स. सदस्यांच्या स्वेच्छानिधीतुन सर्वानमुते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६५/५** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कै. दिनदयाल उपध्याय सभागृह हे मा. आमदार श्री. शातीग्रामजी बसैय्ये (बंधु) यांच्या आमदार निधीतुन होणार आहे व ते वार्ड क्र. ४८,पवननगर, सिडको) वार्डासाठी सर्व साधारण जनतेसाठी उपयोगासाठी येणारे असल्यामुळे व कै. दिनदयाल उपाध्याय ही जेष्ठ व्यक्तीचे आदर्श जनतेच्या डोळयासमोर नेहमी राहावे यासाठी मी त्या व्यक्तीचे नाव देण्याचा प्रस्ताव सर्व साधारण सभेस ठेवत आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. जयश्री कुमारराव मोरे.
अनुमोदक : श्री. बाळासाहेब थोरात.

**ठराव** :

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४८ पवन नगर सिडको येथील आ. शालीग्रामजी बसैय्ये (बंधु) यांच्या आमादार निधीतुन होणाऱ्या सभागृहास "कै. दिनदयाल उपाध्याय सभागृह हे नाव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६६/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ८३ चौक औरंगाबाद.वार्डात शहरातील सर्व धर्माच्या धार्मिक सन साजरे करण्याकरिता शहरातुन मिरवणुक निघतात त्या सर्व प्रथम माझ्या वार्डातुन जातात करिता चौक येथील मुख्य रस्त्यावर एक हायमस्ट लाईट लावण्यात यावे.

तरी वार्ड क्र. ८३ चौक मध्ये एक हायमस्ट लाईट लावण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. निखत जैदी
अनुमोदक : श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ, श्री.सय्यद अली मीरा सलामी.

मा. महापौर : सुचक अनुपस्थित असल्याने प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सदर प्रस्तावाचे सुचक सभागृहात हजर नसल्यामुळे सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १६७/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या स्वेच्छानिधीतुन व काही स. सदस्यांच्या स्वेच्छानिधीतुन लोटाकारंजा येथे संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याकरिता मी प्रशासनाकडे दि. १७.११.२००० रोजी प्रस्ताव सादर केलेला असुन स्वेच्छा निधी नियमावलीप्रमाणे विहीत मुदतीत प्रस्ताव सादर केलेला आहे. या नियमावली तील भाग"ब" मध्ये लोक उपयोगी सार्वजनिक कामा अंतर्गत अ.क्र. २७ वर साक्षरता सामाजिक प्रबोधन, समाज शिक्षण अशा कामासाठी खर्च करणे अ.क्र. २८ वर प्रभागातील एखादे जनहिताचे आवश्यक वाटते. परंतु सदर कामाकरिता अर्थसंकल्पात तरतुद नसेल तर अशा जनहिताचे सार्वजनिक कामासाठी स्वेच्छानिधीचा वापर केला जाऊ शकतो, परंतु त्यासाठी अगाऊ सम्मती घ्यावी लागेल. नियम क्रमांक ३० मध्ये औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत सुशिक्षीत बेरोजगारांला रोजगार प्राप्त होण्यासाठी प्रशिक्षण स्वेच्छानिधीतुन देण्यात येईल. प्रशिक्षणाचा खर्च रुपये २५ हजारापर्यंन्त सिमीत राहील. इ. तरतुद आहे. संगणक प्रशिक्षण केंद्र हे साक्षरता समाज शिक्षण, प्रशिक्षण जनहिताचे काम यामध्ये मोडते सदर प्रशिक्षण केंद्र हे महानगरपालिकेचे राहिल व यातुन महानगरपालिकेस उत्पन्न देखील मिळु शकेल. सदर प्रकल्पासाठी सुमारे ३.५५ लाख खर्च अपेक्षीत आहे.

तरी विशेष बाब म्हणुन लोटाकारंजा येथे महानगरपालिकेचे प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी स. सदस्यांच्या स्वेच्छानिधीतुन काम करुन घेण्यासाठी मान्यता मिळावी करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर. या संदर्भात आवश्यक ती पुर्तता विहीत मुदतीत प्रशासनाकडे दाखल केलेली आहे.

सुचक : श्री. तकी हसनखान
अनुमोदक : श्री. दलबीरसिंग जबिंदा, श्री. रतनकुमार पंडागळे.

संवाद :

श्री. अविनाश कुमावत : दोन संगणक प्रशिक्षण केंद्र करण्याचे निश्चित केलेले आहे सर्वच स. सदस्य त्यांच्या वार्डात संगणक प्रशिक्षण केंद्र करण्याची मागणी करतील

असा प्रस्ताव घेणे योग्य नाही. प्रत्येक वार्डात निधी उपलब्ध करुन दिल्यास केंद्र उभारणार काय ?

श्री. प्रकाश निकाळजे : संगणक प्रशिक्षण केंद्र उभारण्यास जागा उपलब्ध आहे का ? तसेच कर्मचारी खर्चाची जबाबदारी कोण घेणार सविस्तर खुलासा दयावा.

मा. महापौर : लोटाकारंजा येथे महानगरपालिकेची जागा उपलब्ध आहे. ती वापरणार आहोत. स. सदस्य निधी देणार आहे. अगोदर केंद्र स्थापन करणार नंतर कर्मचारी वर्ग देणार आहेत. प्रत्येक केंद्र स्थापन करण्याची गरज नाही.

श्री. सुदाम सोनवणे : प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे नियमावलीतील अ.क्र.२७ व अ.क्र. २८ वर दिले आहे या संबंधी आम्हा सदस्यांना अभ्यास करु दयावा. तुर्त प्रस्ताव स्थगित ठेवावा असे प्रस्ताव घेण्याची आवश्यकता नाही. जे दोन केंद्र निश्चित केले त्याची प्रशासनाचे वतीने काय कार्यवाही झाली खुलासा दयावा.

श्री. तकी हसनखान : संगणक प्रशिक्षण केंद्र दोन ठिकाणी चालु करण्याबाबतचा निर्णय घेतलेला होता परंतु अदयाप कार्यवाही नाही हे प्रशिक्षण केंद्र चालु झाल्यास यास एकुण ३.५५ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. यापैकी २.५० लक्ष निधी माझा स्वत:चा उपलब्ध आहे एक ही रुपया खर्च केलेला नाही. एकुण ३.५५ लक्ष मधुन माझा २.५० लक्ष व उर्वरित १.५५ लक्ष निधी इतर १३ स. सदस्य देण्यास तयार आहे व तसे पत्रही त्यांनी दिलेले आहे. हे संगणक प्रशिक्षण मोफत नाही याचा प्रोजेक्ट रिपोर्ट तयार केलेला आहे. संगणक प्रशिक्षण सुरु केल्यानंतर उत्पन्नाचा विचार केल्यास डी.टी.पी. पध्दतीने प्रशिक्षण घेणारे विदयार्थ्याचे ३ बॅचेस एका बॅचेसमध्ये १२ विदयार्थी असे ३६ विदयार्थी होतात. प्रत्येक विदयार्थ्याकडुन १५,००/- रु. फिस आकारली जाईल. तर एकुण ५४०००/- रु. येतात तसेच फंडामेटल कॉम्प्युटर पध्दतीने एका बॅचेससाठी १२ विदयार्थी, ३ बॅचेस होणार,३६ विदयार्थ्यांची १२००/- रु. प्रमाणे ४३०००/- रुपये होतात. असे एकुण ९७०००/- हजार रु. उत्पन्न होते. खर्चाचा विचार केल्यास यासाठी १) दोन प्रशिक्षक ३०००/- रु. मानधनावर ६ महिन्यासाठी ठेवल्यास १८०००/- रु. महिने ६०००/- रुपये होतात तसेच लाईट बील इ. ६०००/- रुपये एकुण खर्चाची बेरिज केल्या ३००००/- रुपये येतात. उत्पन्न ९७०००/- रुपये हजारा रुपये महानगरपालिकास नफा होऊ शकतो महानगरपालिकाचा फायदाच आहे. हा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा. नसता मतदान पध्दतीने या प्रस्ताव निर्णय व्हावा.

मा. महापौर : महानगरपालिका तर्फेच प्रशिक्षण केंद्र कार्यानिहाय होणार महानगरपालिकाचेच नियम लागु राहतील.

श्री. अविनाश कुमावत : या प्रशिक्षण केंद्रांचे व्यवस्थापन कोण करणार ?

श्री. तकी हसनखान : महानगरपालिकेचया नियमाप्रमाणे हे प्रशिक्षण केंद्र चालणार असुन "सर सय्यद हॉल लोटाकारंजा संगणक प्रशिक्षण केंद्र" असे नाव देण्यात येईल. स. सदस्यांचा निधी वापरण्यात येईल व यावर संपुर्ण नियंत्रन महानगरपालिका प्रशासनाचे राहिल-अभ्यासक्रम तयार करण्यासाठी समिती राहिल प्रेजेक्ट रिपोर्ट मध्ये सविस्तर उल्लेख केलेला आहे.

श्री. अविनाश कुमावत : दोन ठिकाणी प्रशिक्षण केंद्र व्हावे असा निर्णय घेतलेला आहे तोच निर्णय योग्य आहे प्रस्तावास आमचा विरोध नाही.

श्री. तकी हसनखान : या प्रशिक्षण केंद्रांत १० उर्तीर्ण विदयार्थी प्रवेश घेऊ शकतील केंद्राचे जे नियंत्रण राहतील त्यांचे नावे रक्कम जमा होईल महानगरपाकेचे संपुर्ण नियम लागु राहतील.

श्री. सुदाम सोनवणे : प्रस्तावास आमचा विरोध नाही प्रस्ताव योग्य प्रकारे मांडलेला आहे. एक वर्षात स. सदस्य सांगतात ६७,०००/- हजार रुपये प्रमाणे १.३४ लाख मिळतील. यातुन कर्मचारी खर्च फार मोठा आहे.

श्री. अविनाश कुमावत : हा प्रशासकिय ठराव आलेला नाही या प्रशिक्षणासाठी कर्मचारी वर्ग लागणार याची नियमीत जबाबदारी कोणी घेणार नाही. यानंतर दुसरे स. सदस्य मागणी करतील प्रशासकिय ठराव येऊ दयावा.

श्री. तकी हसनखान : स्वेच्छानिधी नियमावली मध्ये अ.क्र. २८ वर "प्रभागातील जन हिताचे एखादे काम संकल्पात वाटले परंतु सदर कामाकरिता अर्थ संकल्पात तरतुद नसेल तर अशा जनहिताच्या सार्वजनिक कामासाठी स्वेच्छाचा वापर केल्या जाऊ शकतो परंतु त्यासाठी आगाऊ सम्मती घ्यावी लागेल असे नमुद केलेले आहे त्याच प्रमाणे क्र. २७ वर साक्षरता सामाजिक प्रबोधन समाज शिक्षण अशा कामासाठी मदत करणे असे काय ? निधी कमी पडत असेल तर आमदार निधीतुन मला ५/१० लाख रुपये उपलब्ध होऊ शकतात तर निधी उपलब्ध होत असेल तर प्रस्ताव मंजुर करण्यास काय हरकत आहे. नियमानुसार प्रस्ताव सादर केलेला आहे. विरोध करणे योग्य नाही विरोध होत असेल तर मतदान पध्दतीने प्रस्तावावर निर्णय घ्यावा.

श्री. कोकाटे काशिनाथ : स. सदस्य श्री. तकी हसनखान यांनी त्याचे वार्डात संगणक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव ठेवलेला असुन त्या संदर्भात वेगवेगळया प्रकारची चर्चा झाली. फायदे काय आहे त्याची चर्चा केली . हे प्रशिक्षण केंद्र उभरतांना ते त्यांचा स्वत:चा निधीचा वापर करणार आहे तसेच बाकीच्या खर्चासाठी उपलब्धता दाखवली त्यांनी आमदार निधी तुन त्यांना यासाठी ५ लाख रुपये मिळणार या सर्व बाबीचा विचार व त्या ठिकाणी ऑलरेडी महानगरपालिकेच्या मालकीची जागा असल्याने त्या जागेची उपयोग ही होईल. असा निधी उपलब्ध करुन दिल्यास व महानगरपालिकेचा त्यात फायदा होत असेल तर हा प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नसावी इतर प्रस्ताव आले तर त्यांनाही मंजुरी दयावी दोन ठिकाणी प्रशिक्षण केंद्र उभारण्या बाबत निर्णय झालेला असतांना अदयाप, का कार्यवाही केली नाही याची माहिती स. सदस्यांना नाही.

श्री. स.अली मिरा सलामी : स्वेच्छा निधी मंजुर केलेला आहे. आता नगरसेवकांचा निधी वापरण्या संदर्भात मंजुरी घ्यावयाची आहे. नगरसेवकांचा निधी हा कुणाचा नसतो जनतेचा असतो फक्त स. सदस्यांना आवश्यकतेनुसार वापरण्याचा अधिकार आहे. स. सदस्य तकी हसनखान यांनी प्रस्ताव ठेवला तो चांगल्या पध्दतीने मांडलेला आहे त्यांचा संपुर्ण निधी शिल्लक आहे ते एकाच कामासाठी वापरत आहे खरा तर इतरांनी त्यांचे कडुन आदर्श घ्यावा की कोणत्या गोष्टीसाठी लढवावयाचे कोणती कामे करुन घ्यावयाची कशा पध्दतीने करावयाची त्याचा संपुर्ण निधी बाकी असुन इतर १३ स. सदस्य हे प्रशिक्षण केंद्र उभारणी साठी निधी देणार आहे. लाईट, कर्मचारी खर्च व इतर खर्च लावुन त्यांना प्रोजेक्ट रिपोर्ट मध्ये माहिती दिलेली आहे.

महानगरपालिकेचा यात फायदा असेल तर मान्यता देण्यास हरकत नसावी. सदर प्रस्ताव स्वागत करण्यासारखा आहे.

श्री. गणेश तांबे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रातही संगणक प्रशिक्षण केंद्र उभारणासाठी जागा देऊन गोर गरिब विदयार्थ्यांसाठी संगणक प्रशिक्षण केंद्र करणार होते त्यास या प्रस्तावानुसार वेगळया स्वरुपाचे वळण देण्याचा प्रयत्न होत असेल तर बरोबर नाही व ते आम्ही सहज ही करुन घेणार नाही.

श्री. तकी हसनखान : स. सदस्य श्री. तांबे यांनी उल्लेख केलेल्या संगणक प्रशिक्षण केंद्र व या प्रशिक्षण केंद्रांचा काही संबंध येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिचर्स सेंटर मध्ये होणारे संगणक प्रशिक्षण केंद्र हे विनामुल्य विदयार्थ्यांना उपलब्ध राहणार आहे.

श्री. अविनाश कुमावत,श्री. अंबादास दानवे : प्रशासनाच्या वतीने प्रस्ताव आणावा असे आमचे मत आहे.

श्री. भगवान घडामोडे : प्रस्ताव चांगल्या पध्दतीने मांडलेला आहे. परंतु स्वेच्छा निधीतुन हे काम करणार असुन यापुढे स. सदस्यांच्या मागणीनुसार निधी उपलब्ध करुन दिल्यास प्रत्येक वार्डात संगणक प्रशिक्षण करणार कया प्रत्ये वर्षी अस्थापनेवर खर्च किती येणार यानंतरचा खर्च कोण करणार व्यवस्थापन कोण असणार प्रशिक्षणाची फिस कोण ठरविणार या सर्व बाबीचा सखोल विचार होऊनच या प्रस्तावा संबधी मंजुरीचा निर्णय व्हावा. प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नाही परंतु यानंतर असे प्रस्ताव मंजुर करणार काय ? प्रस्ताव अशासकिय असला तरी प्रशासनाचा खुलासा घेण्यात यावा व तसा खुलासा प्रशासनाच्या वतीने करावा.

श्री. तकी हसनखान : प्रस्ताव मी ठेवलेला असुन यावर जास्त चर्चा न होता मंजुर करावा नसता मतदान पध्दतीने हा ठराव मंजुर करण्याचा निर्णय घेण्यात यावा अशी विनंती आहे.

श्री. प्रशांत देसरडा : दोन केंद्र करण्या बाबत सभागृहाने निर्णय घेतलेला असुन दोन केंद्रामध्ये विदयार्थी संख्या व इतर सर्व गोष्टी विचारात घेता चांगले चालल्या सच ३ रे प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा विचार करावा.

श्री. दलबीरसिंग जबिंदा : प्रस्ताव चांगल्या पध्दतीने मांडलेला आहे. प्रत्येक स . सदस्य अशा प्रकारचा निधी जमा करुन संगणक प्रशिक्षण केंद्र उभारु शकतात. यात महानगरपालिकेचा पुर्णतः फायदा आहे. विरोध करण्यास काहीही अर्थ नाही.

श्री. सुदाम सोनवणे : प्रस्तावास विरोध नाही परंतु प्रशासकीय मान्यता घ्यावी अशी विनंती आहे अस्थापनेचा खर्च किती होणार कर्मचारी किती लागणार शिपाई लागतील पुढील खर्चाचा व व्यवस्थापनाचा विचार करुन मान्यता दयावी सुशिक्षीत बेरोजगार विदयार्थ्यी या संगणक केंद्रातुन प्रशिक्षण घेतील, जनतेच्या कामासाठी हा निधी वापरला जाणार आहे. म्हणुन प्रस्तावास आमचा विरोध नाही परंतु प्रशासकीय मान्यता असावी दुसरे असे की, प्रस्ताव मंजुर करणार असाल व आताच स. सदस्य यांनी सांगितले ५ लाख निधी आमदार निधीतुन मिळणार आहे. उदया आम्हाला खासदार निधीतुन १ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिल्यास सर्वच वार्डामध्ये संगणक प्रशिक्षण

केंद्र उभारण्यास मान्यता देणार काय ? असे असेल तर आमचा या प्रस्तावास विरोध नाही.

मा. महापौर : प्रकल्प संचालक यांनी खुलासा करावा.

प्रकल्प संचालक : स. सदस्य श्री. तकीहसनखान यांनी त्याचे वार्डात लोटाकारंजा येथे संगणक प्रशिक्षण केंद्र उभारावे म्हणुन एक पत्र देऊन कळविले की त्यांचा नावे असलेला संपुर्ण स्वेच्छा निधी बाकी असुन इतर स. सदस्य काही निधी देण्यास तयार आहे त्यानुसार प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी संचिका तयार केलेली असुन हा प्रस्ताव तपासुन संचिका आयुक्ताकडे संचिका पाठवलेली आहे. सध्या ती संचिका मा. आयुक्ताकडे आहे.

श्री. कुमावत अविनाश : मा. आयुक्तांची मंजुरी होत असेल तर हरकत नाही. संचिका कार्यवाहीसाठी असल्याने मुळात हा प्रस्ताव चुकीच्या मार्गाने दाखल झालेला आहे असे वाटते प्रशासकीय मार्गाने प्रस्ताव यावा प्रशिक्षण केंद्रात फिस कोण ठरवणार आहे. दोन प्रशिक्षण केंद्र करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याच निर्णयानुसार अंमलबजावणी व्हावी.

श्री. गणेश तांबे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिचर्स सेंटर मध्ये संगणक प्रशिक्षणासाठी संपुर्ण शहराचे गोरगरिब विदयार्थी प्रशिक्षण घेणार आहे या प्रशिक्षण केंद्र लगतच जर या प्रस्तावातील नमुद केल्याप्रमाणे संगणक प्रशिक्षण उभारनण्याचे काम होत असेल तर योग्य नाही. (याच वेळी सभागृहात स. सदस्य मोठ-मोठयाने बोलतात काही ऐकावयास येत नाही.)

मा. महापौर : आजची सभा ५ मिनीटासाठी तहकुब करण्यात येते. (वेळ ४.५० वा. सभेला सुरुवात ५.२० वाजता)

मा. महापौर : या विषयावर भरपुर चर्चा झालेली आहे स. सदस्य स्वेच्छानिधी उपलब्ध करुन देणार आहे व संगणक केंद्र उभारण्यात यावे असा हा प्रस्ताव संगणक प्रशिक्षणासाठी जे नियम आहेत ते काही प्रशासकीय नियमाने चालणार आहे म्हणुन हा ठराव सर्वानुमते मंजुरी करण्यात येते. याचा प्रस्तावाप्रमाणे ३ प्रस्ताव आणखी आलेले असुन जर स. सदस्यांनी निधी उपलब्ध करुन दिली व जागा उपलब्ध करुन दिली अशा वार्डातही संगणक प्रशिक्षण केंद्र उघडण्यात येईल तेही ३ प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव** :

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला लोटाकारंजा येथे सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार प्राप्त होण्यासाठी संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर प्रशिक्षण केंद्र उभारण्यास प्रशासनाकडे दाखल करण्यास आलेल्या प्रकल्प अहवाल नुसार स. नगरसेवक श्री. तकी हसनखान व इतर यांचे स्वेच्छा निधीतुन अंदाजे रु. ३.५५ चा अपेक्षित खर्च करण्यात यावा या प्रशिक्षण केंद्रावर महानगरपालिकाचे संपुर्ण नियंत्रण राहिल त्यासाठी महानगरपालिकेचे आवश्यक ते नियंत्रण व विनिमय तयार करावेत. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. संगणक प्रशिक्षण केंद्रास जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. तसेच याच धर्तीवर स. सभासद एकत्र येऊन त्यांचे प्रभागाकरिता संगणक प्रशिक्षण केंद्र उभारु इच्छित असतील तर त्यासाठी विशेष बाब म्हणुन मंजुरी देण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले.

# *ऐन वेळाचे विषय*

**विषय क्र. १६८/१** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको-हडको भागातील इच्छुक लाभार्थी ना नगरसेवकांच्या स्वेच्छानिधी तुन लाभ घेण्याकरिता संगणक प्रशिक्षण आपल्या नियोजित संगणक केंद्रावर येणे फार अवघड आहे.

सिडको-हडको भागातील जनतेच्या/लाभार्थीच्या दृष्टीने सन्माननीय नगर सेवकांच्या निधीतुन सध्या स्थित असलेल्या सिडकोच्या इमारतीत संगणक प्रशिक्षण केंद्र उभारण्यात यावे व लवकरात लवकर कार्यान्वीत करुन लाभार्थींना संगणक प्रशिक्षण देण्यात यावे असा प्रस्ताव बहुमताने मंजुर करावा. ही विनंती.

सुचक : श्री. सुदाम सोनवणे
अनुमोदक : श्री. पांडुरंग तायडे, श्री. भाऊसाहेब ताठे,
सौ. जयश्री कुमारराव मोरे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सिडको-हडको भागातील जनतेच्या/ लाभार्थ्यांच्या सोयीच्या दृष्टीने स. नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतुन निधी उपलब्ध झाल्यास तसे संगणक प्रशिक्षण केंद्रासाठी जागा उपलब्ध झाल्यास या संदर्भात आवश्यक ते नियम,विनियम महानगरपालिका प्रशासनाने तयार करण्याच्या अटी व वरील अटीसह संगणक प्रशिक्षण केंद्र उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६९/२** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्व जवाहर नगर गारखेडा परिसरातील (झोन क्र.४) च्या अंतर्गत येणाऱ्या १० ते १२ स. नगर सेवक व नगर सेविकांमार्फत ज्या इच्छुक लाभार्थींना प्रशिक्षण दयावयाचे आहे त्याचे केंद्र आमच्या प्रभागापासुन बरेच लांब असुन लाभार्थींची गैरसोय होण्याचा संभव आहे.

तरी मा. महापौर साहेबांना विनंती की, आमच्या जवाहर-गारखेडा परिसरात संगणक प्रशिक्षण केंद्र उभारणे बाबतचा व कार्यान्वित करणे बाबतचा ऐनवेळचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा ही विनंती.

सुचक : सौ. सुवर्णा चंद्रात्रे, सौ. जयश्री मोरे,
श्रीमती पार्वती मानकापे, श्री, मधुकर सावंत.
अनुमोदक : श्री. अविनाश कुमावत. श्रीमती डॉ. आशा बिनवडे

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्व जवाहर नगर, गारखेडा परिसरातील (झोन क्र.४) च्या अंतर्गत येणाऱ्या १० ते १२ स. नगर सेवक व नगर सेविका मार्फत या भागातील जनतेच्या/लाभार्थीच्या सोयीच्या दृष्टीने स. नगर सेवकाच्या स्वेच्छानिधीतुन निधी उपलब्ध झाल्यास तसेच संगणक प्रशिक्षण केंद्रासाठी जागा उपलब्ध झाल्यास या संदर्भात आवश्यक ते नियम विनियम महानगरपालिका प्रशासनाने तयार करण्याच्या अटी व वरील अटीसह संगणक प्रशिक्षण केंद्र उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७०/३** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कामागार कॉलनी भागात महानगरपालिकेची इमारत आहे. माझ्या स्वेच्छानिधीतुन व शेजारी वार्डातील नगर सेवकांच्या स्वेच्छानिधीतुन मुकुंदवाडी,कामगार कॉलनी येथे संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात यावे.

करिता चिकलठाणा येथे महानगरपालिका प्रशिक्षण केंद्र उभारणीसाठी स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतुन काम करुन घेण्यासाठी मान्यता यावी.

सुचक :श्री. भाऊसाहेब वाघ

अनुमोदक : श्री. मोतीलाल जगताप, श्री. राधाकृष्ण गायकवाड, श्री. भगवान घडामोडे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कामागार कॉलनी मुकुंदवाडी भागातील जनतेच्या/लाभार्थीच्या सोयीच्या दृष्टीने स. नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतुन निधी उपलब्ध झाल्यास तसेच संगणक प्रशिक्षण केंद्रासाठी जागा उपलब्ध झाल्यास या संदर्भात आवश्यक ते नियम विनियम महानगरपालिका प्रशासनाने तयार करण्याच्या अटी व वरिल अटींसह संगणक प्रशिक्षण केंद्र उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७१/४** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की येत्या सर्वसाधारण सभेत (दि. १९.१२.२०००) रोजी पुरवणी विषय प्रत्रिकेवरिल विषय क्र. ७ आलेला आहे. या विषया बरोबर त्याच धर्तीवर माझ्या वार्डात सादिया शॉपिंग कॉम्पलेक्सच्या अंडर ग्राऊंड मध्ये रिकामा असलेल्या गाळयात संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात यावे. सदरील केंद्रास येणारा खर्च माझ्या स्वेच्छा निधीतुन सन २०००-२००१ या अर्थ संकल्पीय निधीतुन र.रु. २२ लाख रुपये व उर्वरित खर्च २००१-२००२ या वर्षाच्या अर्थ संकल्पीय माझ्या स्वेच्छानिधीतुन करण्यात यावा.

करिता विषय क्र. ७ बरोबर वरिल विषयाची वैधानिक कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

सुचक : श्री. सय्यद अली सलामी

अनुमोदक : श्री. शेख इसाक.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सादिया शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या अंडर ग्राऊंड मध्ये रिकाम्या असलेल्या गाळयात स. नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतुन निधी उपलब्ध झाल्यास आवश्यक ते नियम,विनीयम, महानगरपालिका प्रशासनाने तयार करण्याच्या अटी व वरील अटीसह संगणक प्रशिक्षण केंद्र उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७२/५** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जविनावर डॉ. जब्बार पटेल (दिग्दर्शक) यांनी उत्कृष्ठ चित्रपट निर्माण केला आहे. या चित्रपटात श्री. मामुटी व्यक्ती व डॉ.य.दि.फडके यांचा सत्कार करण्यात आला.

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचा भाग म्हणुन वरील मान्यवरांना स्मृतीचिन्ह व शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात यावा. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. रतनकुमार पंडागळे
अनुमोदक : श्री. दलबिरसिंग जबिंदा, श्री. तकी हसनखान.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर डॉ. जब्बार पटेल यांनी दिग्दर्शत करुन उत्कृष्ठ चित्रपट निर्माण केला. या दिग्दर्शकाचे आणि यातील डॉ. बाबासाहेबांचे भुमिका करणारे प्रतिभावान कलावंत श्री. मामुटी आणि डॉ. य.दी. फडके यांचे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ देवुन सत्कार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७३/६** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात प्रथमच दुसऱ्या आशियाई मुलींच्या सॉफटबॉल अजिंक्यपद स्पर्धाचे आयोजन पी.ई.एस.च्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियमवर दिनांक १० ते १५ डिसेंबर दरम्यान संपन्न झाल्या. या स्पर्धा जागतिक पातळीवर असल्यामुळे जगातील ११ देशांचे मुलींचे संघ सहभागी झालेले होते. त्यामुळे स्पर्धासाठी खर्चही मोठया प्रमाणावर झालेला असल्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने रक्कम रुपये २,००,०००/- (अक्षरी दोन लाख रु) आर्थिक मदत करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्व सादर.

सुचक : श्री. अंबादास दानवे, श्री. काशिनाथ कोकाटे,
श्री. अशरफ मोतीवाला.
अनुमोदक : री. मधुकर सावंत, श्री. गणेश तांबे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात प्रथमच दुसऱ्या अशियाई मुलीच्या सॉफटबॉल अजिंक्यपद स्पर्धाचे पी.ई.एस. च्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियमावर जागतिक पातळीवर आयोजन करण्यात आले. त्यास औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने रक्कम रु. २,००,०००/- (अक्षरी दोन लाख रु.) आर्थिक मदत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७४/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येता की, मुकुंदवाडी वार्ड क्र. १३ मध्ये आमदार मा. श्री. शालिग्राम बसैय्ये यांच्या स्वेच्छानिधीतुन सांस्कृतिक सभागृह बांधण्यात आलेले आहे. या सभागृहास "राजश्री शाहु महाराज सभागृह" असे नांव देण्यात यावे करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अशरफ मोतीवाला, श्री. मोतीलाल जगताप
अनुमोदक : श्री. भगवान घडामोडे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकुंदवाडी प्रभाग क्र. १३ मध्ये मा. आमदार श्री. शालीग्राम बसैय्ये यांच्या स्वेच्छानिधीतुन बांधण्यात आलेल्या सांस्कृतिक सभागृहास "राजश्री शाहु महाराज सभागृह" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७५/८** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. १२ व वार्ड क्र. १३ च्या सीमेवर असलेल्या वस्तीस "संत रोहीदासनगर" नांव देण्यात यावे. सदरील भागास रोहीदासनगर या नावाने सध्या येथील रहिवाशी संबोधतात, तरी या वसाहतीस "संत रोहिदासनगर" असे नांव देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अशरफ मोतीवाला, श्री. मोतीलाल जगताप
अनुमोदक : सौ. लिलावती छायतिलक.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. १२ व १३ च्या सीमेवर असलेल्या वस्तीस "संत रोहिदास नगर" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७६/९** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. रविंद्र प्रल्हादराव प्रधान हे हृदय विकाराने आजारी असुन दौलत मेमोरीयल हॉस्पीटल, औरंगाबाद या रुग्णालयात वैद्यकिय उपचार घेत आहेत. अर्जदार गौतम नगर औरंगाबाद येथील रहिवांशी असुन त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंतबिकट आहे. त्यांना हृदय विकारावरील वैद्यकिय उपचारासाठी रक्कम रु. ३०,०००/- एवढा खर्च येणार आहे. अर्जदार एवढा खर्च करणेस असमर्थ आहे. संबंधीतास काही स. नगरसेवकांनी नगर सेवक स्वेच्छानिधीतुन आर्थिक मदत देणे बाबत पत्रक देऊन संमती दर्शविलेली आहे. त्यांना झालेला हृदय विकार तसेच त्यांची बिकट आर्थिक परिस्थिती बाबत सहानुभुतीपुर्वक योग्य विचार करुन संबंधीतास हृदय विकारावरील वैद्यकिय उपचार तथा औषधोपचारासाठी नगर सेवक स्वेच्छानिधी मधुन विशेष बाब म्हणुन रक्कम रु. २५,०००/- आर्थिक मदत देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अंबादास दानवे, श्री. नंदकुमार घोडेले.
अनुमोदक : श्री. आनंद तांदुळवाडीकर, श्री. भरत लकडे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. रविद्र प्रल्हादराव प्रधान यांना हृदयरोगाच्या वैद्यकिय उपचारासाठी स. नगर सेवकांच्या स्वेच्छानिधीमधुन विशेष बाब म्हणुन रु. २५,०००/- अर्थ साहाय्य करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७७/१०** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. मुरलीधर गरुजी घोडेले हे पद्मपुरा औरंगाबाद येथील रहिवाशी असुन युरेटेरिक कोलीक व सिव्हीवर ॲनेमिया (किडणीचे विकार) या

आजाराने ग्रस्त असुन महेंद्रकर हॉस्पीटल, बन्सीलाल नगर, औरंगाबाद या रुग्णालयात वैद्यकिय उपचार घेत आहेत. संबंधीताचे किडणीचे उपचारासाठी बराच खर्च येणार असुन एवढा मोठा खर्च करणेस ते असमर्थ आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असुन संबंधीतास सदर आजारावरील वैद्यकिय उपचारासाठी काही नगरसेवकांनी स्वेच्छानिधी मधुन आर्थिक मदत देणेस लेखी संमती दर्शविलेली आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेता संबंधीतास किडणीचे विकारवरील वैद्यकिय उपचारासाठी विशेष बाब म्हणुन २५,०००/- रु. नगर सेवकांचे स्वेच्छानिधीतुन देणेस प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. नंदकुमार घोडेले, श्री. भरत लकडे.
अनुमोदक : श्री. अंबादास दानवे, श्री. आनंद तांदुळवाडीकर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री. मुरलीधर घसुजी घोडेले रा.पद्मपुरा औरंगाबाद यांना युरेटेरिक कोलीक व सिव्हीयर ॲनेमिया (किडणीचे विकार) या किडनीच्या विकारावरील वैद्यकिय उपचारासाठी स. नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतुन विशेष बाब म्हणुन रु. २५,०००/- अर्थ सहाय्य करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यास येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७८/११** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंबाद महानगरपालिका येथील गेल्या ऑगस्ट १९९९ पासुन कोणतीही व्यवसायीक पात्रता (बि.एड अथवा एम.एड) नाही व शिक्षकाच्या संवर्गता किंवा त्याच्या सेवा ज्येष्ठता यादीत समावेश नसतांना महानगरपालिका प्रशासनाने सांस्कृतीक अधिकारी वर्ग-३ हयांनी शिक्षणाधिकारी वर्ग-२ च्या पदावर अवैधरित्या बसविलेले आहे हे नियम बाह्य असुन महानगरपालिका सेवा भरती नियमाचे पृष्ठ क्र. ३४ चे अधिनियम ९० ते ९२ च्या ही तरतुदीत बसत नाही. सध्या महानगरपालिकाचे असलेले शिक्षणाधिकारी यांना त्या पदावरुन हटवावे व भविष्यात अशी चुक होणार नाही. याची दखल प्रशासनाने घ्यावी. शासनाच्या प्रतिनियुक्ती पुर्वी सेवा जेष्ठ मु.अ. (पात्र) व्यक्तीस संधी द्यावी व उर्दू/मराठी असे दोन पदे सहा-शिक्षणाधिकारी निर्माण करावे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अफसर खान
अनुमोदक : री. कैसर खान, श्री. अशफाक सलामी.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सांस्कृतीक अधिकारी (वर्ग-३) हयांचेकडे प्रशासनातर्फे सोपविण्यात आलेला शिक्षणाधिकारी वर्ग-२ या पदाचा कार्यभार तातडीने काढुन घेण्यात येऊन शासनाकडुन प्रतिनियुक्तीवरील शिक्षणाधिकारी रुजु होई पर्यन्त महानगरपालिका सेवा भरती नियमाच्या तरतुदीनुसार सेवा जेष्ठ अशा पात्र मुख्याध्यापकास संधी देण्यात यावी यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच मराठी व ऊर्द माध्यमाकरिता प्रत्येकी एक याप्रमाणे सहाय्यक शिक्षणाधिकारी दोन पदे निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७९/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. अनंत गोविंद कोमटकर रा. एन ६, सिडको, औरंगाबाद यांना ह्रदयावरील शस्त्रक्रियेसाठी अंदाजे खर्च रु. १,००,०००/- (अक्षरी एक लाख रु.) इतका येणार आहे. संबंधीताची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्यामुळे त्यांना शस्त्रक्रियेसाठी नगर सेवक स्वेच्छानिधीमधुन रु. २५,०००/- (अक्षरी पंचवीस हजार रु.) आर्थिक मदत देणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. नारायण (अण्णा) सुरगोणीवार
अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. अनंत गोविंद कोमटकर रा. एन ६, सिडको, औरंगाबाद यांना ह्रदयावरील शस्त्रक्रियेसाठी नगर सेवक स्वेच्छानिधी मधुन विशेष बाब म्हणुन रक्कम रु. २५,०००/- अर्थ साहाय्य करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८०/१३** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. कैलास राजन्ना नाटेकर हे मेंदुचे विकाराचे आजारी असुन त्यांचेवर सेठ नंदलाल धुत रुग्णालय येथे वैद्यकिय उपचार चालु आहेत त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट आहे. संबंधीतास मेंद्रचे आजारावरील वैद्याकिय उपचार तथा औषधोपचारासाठी रक्कम रु. ४०,०००/- खर्च येणार आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्यामुळे ते एवढा खर्च करु शकत नाही. संबंधीताचे डोक्यावर मेंदुची शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्यामुळे त्यांना मेंदुचे विकारावरील वैद्यकिय उपचारासाठी काही स. नगरसेवकांनी नगर सेवक स्वेच्छानिधी मधुन आर्थिक मदत देणे बाबत लेखी पत्राव्दारे संमती दर्शविली आहे. संबंधीताची आर्थिक परिस्थिती विचारात घेता त्यांना नगर सेवक स्वेच्छा निधी मधुन ४०,०००/- रु. विशेष बाब म्हणुन देणेस प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

सुचक : श्री. अंबादास दानवे
अनुमोदक : श्री. नंदकुमार घोडेले, श्री. आनंद तांदुळवाडीकर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. कैलास राजन्ना नाटेकर यांना मेंदुच्या आजारावरील वैद्यकिय औषधोपचारासाठी स. नगर सेवक यांच्या स्वेच्छानिधीमधुन विशेष बाब रक्कम रु. ४०,०००/- अर्थ साहाय्य करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८१/१४** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. सतिश रामकृष्ण मोहरकर यांना ह्रदयविकाराचा त्रास असुन त्यांना ह्रदयावर शस्त्रक्रिया करणेसाठी मोठया प्रमाणावर खर्च लागणार आहे. तरी त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे त्यांना ह्रदयावरील शस्त्रक्रियेसाठी नगर सेवक स्वेच्छानिधीतुन रक्कम रु. ५०,०००/- (पन्नास हजार रु.फक्त) आर्थिक मदत देण्याकरिता विशेष बाब म्हणुन प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. प्रकाश निकाळजे

अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. माणिक साळवे,
श्री. रतनकुमार पंडागळे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. सतिश रामकृष्ण मोहोरकर हे हृदय रुग्ण असुन त्यांना हृदयावरील शस्त्रक्रियेसाठी स. नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीमधुन विशेष बाब म्हणुन रक्कम रु. ५०,०००/- अर्थ साहाय्य करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८२/१** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १९.०८.१९९७ रोजीच्या सर्वसाधारण सभेत विषय क्र. ६६/२ अन्वये उत्सव मंगल कार्यालय ते अमरप्रीत ८० फुट रस्ता रमानगर मधुन जाणारा रस्ता रुंदीकरण करणेबाबत ठराव परित करण्यात आलेला आहे. तथापी रमानगर मध्ये दलित वस्ती अधिक असल्यामुळे रस्ता रुंदीकरण झाल्यास दलित वस्ती अधिक असल्यामुळे रस्ता रुंदीकरण झाल्यास दलित बांधवाना अडचणीच होणार आहे. सदरील नागरिक बेघर होतील.

तरी कृपया उत्सव मंगल कार्यालय ते हॉटेल अमरप्रीत रमानगरमधुन जाणारा ८० फुट रस्ता रद्द करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. मधुकर सावंत, श्री. प्रकाश निकाळजे.
अनुमोदक : श्री. राजु शिंदे, श्री. गणेश तांबे,
श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. रतनकुमार पंडागळे,
श्री. दलबीरसिंग जबिंदा, श्री. अय्युब खॉ सरदार खॉ,
श्री. माणिक साळवे, श्री. सुदाम सोनवणे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उत्सव मंगळ कार्यालय ते अमरप्रित हॉटेल रमानगर मधुन जाणारा ८० फुट रुंद रस्ता रद्द करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८३/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वेदांत हॉटेलकडुन पुर्वेकडे जाणारा विकास रस्ता महात्मा ज्योतीबा फुलेनगर मधुन जाणारा आहे. फुलेनगर ही दलितांची वस्ती असुन या ठिकाणी सर्व मोलमजुरी करुन राहणारे लोक आहेत. हा रस्ता या वसाहतीमधुन पुढे गेल्यास येथील नागरिक बेघर होणार आहेत. या गरिब जनतेची घरे तोडुन त्यांना बेघर होण्यापासुन वाचविण्यासाठी हा रस्ता रद्द करण्यात यावा करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येत आहे.

सुचक : श्री. प्रकाश निकाळजे, श्री. मधुकर सावंत.
अनुमोदक : श्री. माणिक साळवे, श्री. अय्युब खॉ. सरदार खॉ,
श्री. अंबादास दानवे, श्री. काशिनाथ कोकाटे,
श्री. सुदाम सोनवणे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल वेदांत कडुन पुर्वेकडे जाणारा रस्ता ज्योतीबा फुले नगर मधुन जातो. महात्मा ज्योतीबा फुले नगर मधुन जाणारा रस्ता रद्द करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८४/१७** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कु. अनिता मोकळे, प्रसिध्द अंध गायिका हीस आपण महानगरपालिकेच्या वर्धापनाच्या दिवशी रु. २०,०००/- ची आर्थिक मदत जाहिर केली होती ती देणे बाबतचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा ही विनंती.

सुचक : श्री. अंबादास दानवे
अनुमोदक : श्री. नंदकुमार घोडेले.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कु. अनिता मोकळे, प्रसिध्द अंध गायिका हिस स नगरसेवकाच्या स्वेच्छानिधीमधुन विशेष बाब म्हणुन रु. २०,०००/- अर्थ सहाय्य करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८५/१८** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका नगर रचना विभागामधील दैनंदिन कामाचा व्याप दिवसें-दिवस वाढत आहे. नागरिकांची विविध कामे होणेस विलंब लागतो. उपसंचालक, नगररचना या पदावर प्रतिनियुक्तीने शासकिय अधिकारी या विभागात कार्यरत आहे. गेल्या दोन वर्षात काही अधिकारी प्रतिनियुक्तीवर आले व बदलुन गेले. नगर रचना विभागात दोन नगर रचनाकार यांची पदे असुन या पदावर महापालिकेचे अधिकारी कार्यरत आहेत. नगर विभागामधील भोगवठा प्रमाणपत्र देणे घर दुरुस्तीची परवानगी देणे, अनामत रक्कम परत करणे. परवानगीचे नुतनीकरण करणे, विकास खर्च भरणेस परवानगी देणे, अकृषीसाठी संचिका प्रमाणपत्र देणे, इत्यादी प्रकरणाबाबतच्या संचिका उप संचालक,नगररचना यांचे स्वाक्षरीसाठी पाठवाच्या लागतात. त्यात बराच वेळ वाया जातो. वर नमुद केलेले विषया बाबतचे अधिकार नगररचनाकार यांना प्रदान करण्यात यावे. वरील सर्व विषयांबाबतचे अधिकार देणे. शक्य नसल्यास दुय्यम स्वरुपाच्या वर नमुद केलेल्या प्रकरणाचे अधिकार प्रदान करण्यात यावे जेणे. करुन नागरिकांची वरील कामे विहीत मुदतीत पुर्ण होतील, वेळ वाचेल व उपसंचालक, नगररचना यांचे कडील कामाचा व्याप कमी होईल. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. नंदकुमार घोडेले
अनुमोदक : श्री. भरत लकडे, श्री. आनंद तांदुळवाडीकर.

**ठराव क्र. १८५/१८** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील नगररचना विभागातील दोन्ही नगर रचनाकार यांना भोगवठा प्रमाणपत्र देवुन घर दुरुस्ती परवानगी देणे. अनामत रक्कम परत करणे. परवानगीचे नुतनीकरण करणे, विकास खर्च भरण्यास परवानगी देणे, अकृषीसाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे, हे अधिकार त्यांना प्रदान करण्यात किंवा हे सर्व

अधिकार प्रदान करणे प्रशासकिय दृष्टया प्रदान करणे शक्य नसल्यास किमान दुय्यम स्वरुपाच्या कामांचे अधिकार प्रदान करण्यास प्रशासनाकडुन योग्य ती कार्यवाही करण्याकरिता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८६/१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की. महाराष्ट्र शासनाचा सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७ दिनांक १६ सप्टेंबर २००० अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपाकलिका आयुक्तांना दहा लाखा पर्यंन्तच्या निवीदा अंतिम करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. दहा लाखपेक्षा अधिक रक्कमेचे अंदाजपत्रक सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव जाते. सर्वसाधारण सभा महिन्यातुन एकदाच होत असल्याने मंजुरीसाठी बराचसा कालावधी लागतो. त्यानंतर कामासाठी निवीदा मागविणे व त्यावर पुढील प्रशाकिय कार्यवाही करण्यास विलंब होतो. पर्यायाने कामे सुरु होण्यास विलंब लागतो. हा विलंब टाळता यावा याकरिता दहा लाखांपेक्षा अधिक व २५ लाखां पर्यन्तच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळण्याकरिता सर्वसाधारण सभेस असलेले अधिकार स्थायी समितीस प्रदान करण्यात यावेत. स्थायी समितीच्या बैठका दर आठवडयात येण्याची तरतुद असल्याने विलंब टाळता येईल व विकास कामे लवकर होण्यास मदत होईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. काशिनाथ कोकाटे
अनुमोदक : श्री. अंबादास दानवे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन अध्यादेशा नुसार रु. १०,००,०००/- पर्यंन्तचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यात आलेले असल्याने यावरील रकमेच्या कामाचा निपटारा लवकर व्हावा या दृष्टीकोनातुन २५ लाख ऐवजी २० लाखा पर्यंन्त कामाच्या अंदाज पत्रकांना मंजुरी देण्याचे अधिकार स्थायी समितीस प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८७/२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत हर्सुल परिसरात जळगांव रोड, अजिंठा अ गेट समोरील स्व. अमानउल्ला मोतीवाला चौक येथील टी पॉईट मध्यो आयलॅड बांधुन तयावर येणाऱ्या खर्चास सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. रावसाहेब औताडे
अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. अशरफ मोतीवाला.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जळगाव रोड वरिल अजिंठा अ गेट समोरिल स्वर्गिय अमानउल्ला मोतीवाला चौक येथील ही पॉईट मध्ये वाहतुक बेट (आयलॅन्ड) बांधण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८८/२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो आंबेडकर नगर ते पिसा देवी रोड गेल्या पंधरा वर्षापासुन खराब झालेला आहे सदरील रोड औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतुन ग्रामीण भागास जोडल्या जातो सदरील रस्ता महानगरपालिका झाल्यानंतर १८ खेडी महानगरपालिकेत समाविष्ट झाल्यापासुन आतापर्यन्त सदरील रोडचे काम झालेले नाही. त्यामुळे तेथील नागरिकांना येण्याजाण्यासाठी फार त्रास होत आहे. म्हणुन सदरील रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाला तात्काळ मंजुरीस्तव प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. रावसाहेब औताडे
अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. अशरफ मोतीवाला.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो आंबेडकर नगर ते पीसादेवी रोड या रस्त्याचे डांबरीकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८९/२२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आपणास विनंती करण्यात येते की, लायन्स क्लबच्या वतीने डॉ. दिक्षित हे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी प्लास्टीक सर्जरी करण्यात येते कित्येक रुग्णांना, गोर-गरिब जनतेला फायदा होता म्हणुन दरवर्षी प्रमाणे एक लाख रुपये मदत देण्यात यावी करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. भगवान घडामोडे
अनुमोदक : श्री. प्रशांत देसरडा, श्री. राजु शिंदे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लायन्स क्लबच्या वतिने डॉ. दिक्षीत याचेकडुन प्लास्टिक सर्जरी साठी आयोजित केलेल्या शिबिरास दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महानगरपालिकेकडुन रुपये एक लाख अर्थ सहाय्य करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९०/२३ :**

महानगरपालिका आयुक्त एस.डी जहागिरदार यांनी अडीच महिन्याच्या अलपावधीन मालमत्ता,जकात व अन्य करांची चांगलया पध्दतीने वसुली केली आहे. त्यामुळे उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे. तंबुन राहिलेल्या शेकडो संचिका अल्पावंधीत निकाली काढल्या आहेत या काळात प्रशासनास चांगलीच शिस्त लागली होती. त्यामुळे त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजुर करण्यात यावा

सुचक : श्री. नंदकुमार घोडेले
श्री. प्रकाश निकाळजे.
अनुमोदक : श्री. माणिक साळवे
श्री. भगवान घडामोडे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकाचे आयुक्त श्री. एस.डी. जहागिरदार यांनी अडीच माहिन्याच्या अल्पकालावधीत प्रशासनास चांगली शिस्त लावुन तुंबून राहिलेल्या शेकडा संचिका निकाली काढणे महानगरपालिकेच्या विविध करांची वसुली वाढवुन उत्पन्नात वाढ करणे अशी चांगली कामे केल्याने सभागृहातर्फे आयुक्त श्री. एस.डी. जहागिरदार यांचे अभिनंदन करण्यात येते या ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

या बरोबर "जण गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत /- |
| नगर सचिव, | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १९ जानेवारी २००१ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेचे इतिवृत्त. शुक्रवार दिनांक १९.०१.२००१ रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यलयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात मा. महापौर डॉ. श्री. भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली सर्व साधारण सभेची "वंदेमातरम्" या गीताने सुरुवात झाली या सभेत महानगरपालिकातील अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय नगर सेवक उपस्थित होते.**

१) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
२) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
३) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
६) स.स.श्री. शे. इलियास किरमानी शे. उमर
७) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
८) स.स.सौ. शकुंतला सांडुजी इंगळे
९) स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी
१०) स.स.श्री. शिंदे राजु रामराव
११) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१२) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१३) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१४) स.स.सौ. धायातिलक लिलावती बाळासाहेब
१५) स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१६) स.स.सौ. शिंदे रुख्मिणी राधाकिसन
१७) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१८) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१९) स.स.श्री. शे. शकिल पटेल शे. बुढण पटेल
२०) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
२१) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२२) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२३) स.स.सौ. विजया किशोर राहटकर
२४) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२५) स.स.सौ. ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२६) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजीतसिंग
२७) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२८) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२९) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
३०) स.स.श्री. अ. रशिद अ. सत्तार
३१) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
३२) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
३३) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर

३४) स.स.श्री. वडागळे सुनिल बुथवेल
३५) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३६) स.स.श्री. स. मुमताज अली मोज्जम अली
३७) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३८) स.स.श्री. नासेरखान सरदार खान
३९) स.स.श्री. थोरात दत्तात्रय उर्फ बाळासाहेब रामराव
४०) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४१) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
४२) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४३) स.स.सौ. नुसरतबानो फिरोजखान
४४) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४५) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४६) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४७) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
४८) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
४९) स.स.श्री. अ.कदीर मौलाना सय्यद
५०) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
५१) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५२) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
५३) स.स.श्री. नासीरखान अ. रहेमानखान कुरैशी
५४) स.स.सौ. शाहिन जफर महमुद जफर
५५) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५६) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५७) स.स.श्री. स.सलिम स. युसुफ
५८) स.स.श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
५९) स.स.श्री. गाजी सादोद्यीन गाजी जहीर अहेमद
६०) स.स.श्री. मिर हिदायत अली मिर बसालत अली
६१) स.स.सौ. नफिसुन्नीसा बेगम हबीबखान
६२) स.स.श्री. शे ईसाक जैनोद्यीन शेख
६३) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
६४) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६५) स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
६६) स.स.श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान
६७) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६८) स.स.श्री. स.अली सलामी स. मिरा सलामी
६९) स.स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज
७०) स.स.सौ. निखत परवीन ऐजाज झैदी

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे

२) स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
३) स.स.श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज
४) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५) स.स.सौ. सलमाबानो मिर मो. अली.

स. नगरसेवक श्री. नारायण चंद्रय्या सुरगोणीवार यांच्या मातोश्री यल्लमा सुरगोणीवार आणि जिल्हा परिषद सदस्या श्रीमती सुरेखा नाईक यांच्या निधना निमित्त सभागृहाने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली.

**विषय क्र. १९१/१** :

दि. २०.११.२००० दि. १९.१२.२००० सकाळी ११.३० वाजता दि. २०.११.२००० रोजी तहकुब झालेली तसेच दि. १९.१२.२००० रोजीच दुपारी ३.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद :

श्री. नंदकुमार घोडेले : दिनांक १९.१२.२००० च्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. १५९/५ नुसार आरक्षण क्र. ६ प्राथमिक शाळा व आरक्षण क्र. ७ पाण्याची टाकी यासाठी आरक्षित असलेली जागा संपादन करण्यात यावी अशी सुचना मागील सभेत केली होती नोंद इतिवृत्तात आली नाही. तेव्हा वरील आरक्षणाची जागा संपादन करण्याबाबत इतिवृत्तास आवश्यक ती नोंद घेण्यात यावी.

मा. महापौर : स. सभासदांचे सुचनेप्रमाणे इतिवृत्तात दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

श्री. काशिनाथ कोकाटे : दिनांक १९.१२.२००० (दिनांक २०.११.२००० ची तहकुब) च्या सभेतील विषय क्र. १४०/३,१४७/१०,आणि दिनांक १९.१२.२००० च्या सभेतील विषय क्र. १६६/६ हे प्रस्ताव सुचक उपस्थित नसल्याने स्थगित ठेवण्यात आले होते. आजच्या सभेत वरील प्रस्तावाचे सुचक सभागृहात हजर आहेत. तेव्हा वरील तिन्ही प्रस्तावांना मंजुरी देण्यात यावी.

मा. महापौर : मा. विरोधी पक्ष नेता यांचे सुचनेप्रमाणे तिन्ही प्रस्ताव मंजुर करण्यात येतात. इतिवृत्तात दुरुस्ती करण्यात यावी.

**ठराव** :

दिनांक १९.१२.२००० (दिनांक २०.११.२००० ची तहकुब सभा) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील---

१) ठराव क्र. १४०/३ चे सुचक सभागृहात हजर नसल्याने मुळे प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला होता त्याऐवजी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ७० येथील नागरिकांच्या सुविधासाठी मोहल्ला करिम कॉलनी येथे महानगरपालिका वाचनालय बांधण्यात सर्वानुमते मंजरी देण्यात येते.

२) ठराव क्र. १४७/१० चे सुचक सभागृहात हजर नसल्याने मुळ प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला होता त्या ऐवजी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इस्लाम दरवाजा(कटकट गेट) जवळील इस्लाम चौक असे नांव देण्यास आणि वाहतुक बेट तयार करुन सुशोभित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. दिनांक १९.१२.२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधार सभेतील------

३) ठराव क्र. १५९/१ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीसाठी मंजुर झालेल्या विकास योजनेतील मौजे इटखेडा येथील सेक्टर एन-२, एन-१ मधील आरक्षण क्र. ६ "प्राथमिक शाळा" व आरक्षण क्र. ७ "पाण्याची टाकी" यासाठी आरक्षीत असलेली जागा संपादन करण्यास व भुसंपादनासाठी लागणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी येते अशी वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

४) ठराव क्र. १६६/६ चे सुचक सभागृहात हजर नसल्याने मुळ प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला होता त्या ऐवजी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ८३ चौक येथील मुख्य रस्त्यावर एक हायमस्ट लाईट लावण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

अ.क्र. १ ते ४ मध्ये दर्शविलेली दुरुस्ती व वाढ यासह दिनांक २०.११.२००० दिनांक १९.१२.२०००,(दिनांक २०.११.२००० ची तहकुब सभा) आणि दिनांक १९.१२.२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. १९२/** :

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जालना रोड रस्ता रुंदीकरणाच्या कामात २०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.- ९ ही जलवाहिनी रस्त्याच्या कडेस टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्रधिकरण विभागाची सन १९९९-२००० च्या दरसुची नुसार रक्कम रु. २४,८१,४७३/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा शासनातर्फे प्राप्त होणाऱ्या अनुदानातुन सार्वजनिक बांधकाम विभागास महानगरपालिकेतर्फे जे रु. ३.०० कोटी द्यावयाचे आहेत त्यातुन करावयाचा आहे.

करिता अंदाजपत्रक रक्कम रु. २४,८१,४७३/- चे विचारार्थ व मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

संवाद :

श्री. भगवान घडामोडे : सदर प्रस्तावास मंजुरी देण्यात हरकत नाही. तथापि जालना रोड सध्या किती रुंद आहे विकास योजना आराखडयानुसार जालना रोड किती फुट रुंद आहे. विकास आरखड्यातील रुंदीनुसार प्रस्ताव दर्शविलेली पाणी पुरवठा लाईन टाकण्यात येत आहे. या बाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

मा. महापौर : कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी माहिती द्यावी.

श्री. अंबादास दावने : जालना रोडवरिल पाणी पुरवठा लाईन बदलण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडील दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. स्थानिक वर्तमानपत्रात चर्चा प्रसिध्द झाली आहे. प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाचे दरसुची प्रमाणे तयार केल्यास काही फरक येतो का ? दरसुचीचा आढावा घेतला का ?

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन जालना रोड १०० फुट जात आहे. या रुंदीकरणांनुसार १०० फुट रस्त्याच्या कडेला चार साडेचार फुट खोलीसह ही जल वाहिनी टाकण्यात येत आहे. यामुळे भविष्यात १३२ फुट रुंद करायचे ठरले तर या लाईनमुळे काही अडचण येणार नाही.

सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुची मध्ये पाईप लाईन टाकण्याच्या कामासाठी लागणारे दर नसतात म्हणुन या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडील दरसुची वापरली जाते.

श्री. अंबादास दानवे : विकास आराखड्यानुसार जालना रोड १३२ फुट रुंद आहे. त्या नुसार या रोडवर बांधकाम परवानगी देतांना १३२ फुट गृहित धरुनच बांधकाम परवानगी दिली जाते. म्हणजेच पाणी पुरवठा लाईन ही १३२ फुटावर टाकण्यात हरकत नसावी.

कार्य.अभि.(पा.पु) : जागा उपलब्ध होत नाही.

श्री. स.अली मिरा सलामी : सभागृहात चालु असलेल्या चर्चेनुसार जालना रोड हा १३२ फुटाचा आहे का, १०० फुटाचा आहे याचा खुलासा व्हावा.

उप अभियंता (नगररचना) : नियोजीत जालना रोड हा १३२ फुटाचा (४० मीटर) आहे.

श्री. स.अली मिरा सलामी : पाणी पुरवठा पाईप लाईन टाकण्याबाबत चर्चा करतांना १०० फुटावर लाईन ठाकल्याने भविष्यात फरक पडणार नाही असा खुलासा कार्यकारी अभियंता यांनी केला आहे मग जुनी पाईप लाईन बदलण्याचे कारण काय ? जुनी पाईप लाईन बदलली नाही तर चालणार नाही का ? हा रस्ता रुंदीकरणाच्या कामाचे वेळी आकाशावाणी केंद्राची जागा संपादनसाठी केंद्र शासनाच्या परवानगीची गरज लागली आहे. त्याला दहा वर्षाचा कालावधी लागला तेव्हा विकास आरखड्यानुसार १३२ फुट असलेला जालना रोडचे १३२ फुटापर्यन्तचे काम करण्यात यावे. तोपर्यन्त कोणताही पैसा खर्च केला जाणार नाही. जेथे विकास कामाची आवश्यकता आहे. तेथे विकास कामे होत नाहीत. तेव्हा जालना रोडचा विकास करावयाचा असेल तो पुर्ण म्हणजेच १३२ फुटाचा करण्यात यावा. अर्धवट काम करण्यात काही अर्थ नाही. तेव्हा यावर सर्व बाबींचा विचार करुन निर्णय घेण्यात यावा अशी विनंती आहे.

श्री. सुदाम सोनवणे : सध्या जो जालना रोड रुंदीकरण करण्यात येत आहे त्या रोड मध्ये आपली लाईन येते का, ही लाईन येत नसेल तर ती बदलण्यासाठी पैसा खर्च करण्याची आवश्यकता नाही. आता लाईन बदलण्यासाठी २४ लाख रुपये खर्च करावयाचे आणि पुन्हा १३२ फुटाचे रुंदीकरणाचे वेळी २४ लाख रुपये खर्च करावे लागतील. १३२ फुटाचे काम करतांना पुन्हा लाईन बदलावी लागेल का याचाही या ठिकाणी विचार होणे आवश्यक आहे.

श्री. अफसर खान : ज्या ठिकाणी जलवाहिनी आहे त्याच ठिकाणी ठेवण्यात यावा. ती बदलण्यात येऊ नये. विनाकारण खर्च करण्याची आवश्यकता नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : जालना रोडवरिल पाईप लाईन, बदलण्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी सभागृहापुढे प्रस्ताव ठेवला आहे. त्यावर स. सदस्यांनी आपआपले मत मांडले आहे विकास आरखड्या नुसार विकास रस्ता १३२ फुटाचा आहे. रुंदीकरण करण्यात येते आहे. १०० फुटाचे रुंदीकरण हाती घेताना टेलिफोन पोल, विदयुत पोल, अतिक्रमणे हटविताना बऱ्याच अडचणी आल्या. याच अडचणी १३२ फुटाप्रमाणे रुंदीकरण करतांना येणार आहेत पुन्हा सर्व्हीस लाईन शिफ्ट करतांना १ वर्ष लागेल तेव्हा आज हा रोड १३२ फुट रुंद करणे ही सर्वाजनिक बांधकाम खात्याची जबाबदारी आहे. आणि हा रस्ता हस्तांतरणापुर्वी पुर्ण १३२ फुटांचे रुंदीकरण सार्वजनिक बांधकाम खात्याकडुनच झाले पाहिजे. त्यावेळी १३२ फुटाचे रुंदीकरणानुसार पाईप

लाईन टाकण्यात यावी. आहे ती लाईन आज बदलण्याची गरज नाही. जी काही प्रक्रिया करायची ती करावी आहे त्या ठिकाणी कसे करता येईल ते पहावे शासकिय पैशाचा दुरुपयोग होऊ नये. १३२ फुटाचे विकास रस्त्याचे आत बांधकाम परवानगी देऊन नये. वाहतुकीची कोंडी होऊ शकते वाहतुक व्यवस्थीत सामोरे जावे. लागेल या सर्व बाबीचा विचार करता विकास आराखड्यानुसार १३२ फुटाचे रुंदीकरण करण्यात यावे. भविष्यात महापालिककला विद्युत पोल, टेलिफोन पोल हलविण्यासाठी खर्च लागता कामा नये. त्यासाठी आवश्यक तो ठराव सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात यावा.

मा. महापौर : जालना रोड रुंदीकरणाचे काम चालु आहे. हे काम शासकिय अनुदानातुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन करण्यात येत आहे. १०० फुटी ऐवजी १३२ फुटाचे रुंदीकरण केले तर वाहतुकीची कोंडी कमी होईल. विकास आराखड्यानुसार नियोजीत जालना रोडची रुंदी १३२ फुट आहे त्याप्रमाणे रस्ता रुंदीकरणाचे काम ही १३२ फुटापर्यंन्त करण्यात यावे असा सभागृहात ठराव करावा. जालना रोडवार १३२ फुटापर्यंन्त कोणासही बांधकाम परवानगी देण्यास येऊ नये. पाणी पुरवठा पाईप लाईन विद्युत पोल, आदी हलवितांना नियोजित १३२ फुटाची रुंदी विचारात घेऊनच पाईप लाईन विद्युत पोल हटविण्यात यावे. आज जर १०० फुटाप्रमाणे विद्युत पोल अथवा पाईप लाईन हलविण्याचे काम केले तर पुन्हा ४/५ वर्षांनी पाईप लाईन विद्युत पोल हालविण्याचा खर्च कराव लागेल. तेंव्हा जे शिफ्टींगचे काम करण्यात येत आहे. ते १३२ रुंदीकरण गृहीत धरुन करण्यात यावे.

श्री. रतनकुमार पंडागळे, श्री. तकीहसनखान श्री. स.अली मिरा सलामी : विकास आराखड्याप्रमाणे जालना रोड करिता १३२ फुट जागा संपादन केली का ? जागा ताब्यात आहे काय ? जमीन संपादनासाठी किती नागरिकांना रक्कम दिली आहे.

मा. महापौर : नगर रचना विभागाने खुलासा करावा.

उप अभियंता (नगर रचना) विकास आराखड्याप्रमाणे १३२ फुट जागा ताब्यात नाही. सध्या १०० फुट रस्ता आहे. १३२ फुट प्रमाणे बांधकाम परवानगी दिलेल्या आहेत. १३२ फुट (४० मीटर) प्रमाणे रस्ता रुंदीकरणासाठी भुसंपादनाची कार्यवाही केली नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : गेल्या एक वर्षापासुन रुंदीकरणाचे काम चालु आहे. प्रशासनाला वेळीच जाणीव का झाली नाही.

श्री. प्रकाश निकाळजे : जालना रोड पाईप लाईन कोणत्या बाजुने टाकणार आहेत. शासकिय अनुदान परत जाईल.

कार्य.अभि.(पा.पु.) : जालना रोडवरील नविन पाईप लाईन रस्त्याच्या कडेला टाकत आहेत. व भविष्यात रस्ता रुंदीकरण करावे लागले तरी त्याचा धोका नाही. कारण या पाईप लाईनवर कॉक्रीट केसिंग करण्यात येत आहे. ४-५ फुट खोल टाकतो टेलिफोनचे केबलला धोका नाही.

श्री. स. अली मिरा सलामी : विकास आराखड्याप्रमाणे १३२ फुटाचे रुंदीकरण का केले जात नाही.

श्री. जयवंत ओक : सभागृहात जालना रोड किती फुटाचा असावा यावर चर्चा चालु आहे. शहर सौंदर्यकरण्याच्या गप्पा मारल्या जातात. कोणाच्या दबावाला बळी न

पडता जालना रोडचे १३२ फुट रुंदीकरण करण्यात यावे या रोडवर अपघात होतात. फुटपाथही झाले पाहिजे. रुंदीकरणाबाबत संपुर्ण माहिती घ्यावी व मा. आयुक्त यांनी आपली भुमिका काय याचा खुलासा करावा.

श्री. मिर हिदायत अली : क्रांतीचौक ते पैठणगेट या रस्त्याचे काम तातडीने झाले. पण जालना रोडचे काम तातडीने होत नाही. १३२ फुट ऐवजी १०० फुट केले काय कारण आहे.

श्री. तकी हसनखान : १३२ फुट मंजुर आहे आम्हाला १०० फुट करण्याचा अधिकार आहे काय ? असे असते तर सिल्लेखाना रस्त्याच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयात प्रकरण गेले नसते.

श्री. अंबादास दानवे : सभागृहात जालना रोड १०० फुटाचा का १३२ फुटाचा यावर चर्चा चालु आहे. विकास योजनेनुसार हा रस्ता १३२ फुटाचा आहे. या रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी १३२ फुटाची रुंदी मिळाली आहे. फार थोडया ठिकाणी १३२ फुटाची रुंदी मिळाली नाही. नियोजित १३२ फुट रुंद रस्त्याप्रमाणे नगर रचना विभागातर्फे परवानगीही दिली आहे. या रस्त्यात कोणती मालमत्ता बाधीत होणार आहे, कोणती होणार नाही या बाबतचा सविस्तर खुलासा करण्यात यावा. तो पर्यन्त सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

मा. आयुक्त : जालना रोड १३२ फुट रुंद रस्ता आहे हे बरोबर आहे. सध्या १०० फुट रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाचा आहे. १३२ फुटापर्यन्त रस्ता रुंदीकरण करावयाचे झाल्यास दोन्ही बाजुने १६/१६ फुट जागा संपादन करावी लागेल. जागा संपादनासाठी वेळ लागतो हे आपणास माहिती आहे. या रस्ता रुंदीकरणाच्या कामात आपल्या पाईप लाईनमुळे जो अडचण निर्माण होत आहेतो दुर करण्यासाठी या कामाचे अंदाजपत्रक अशा प्रकारे तयार करण्यात आले आहे की, १०० फुट रुंदीच्या केडेला खोलवर ही पाईप लाईन टाकल्यानंतर कॉक्रीट केसिंग करण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात जरी रस्ता रुंदीकरण करावयाचे झाल्यास या पाईप लाईनवर होणाऱ्या वाहतुकीचा दाब ही जलवाहिनी सांभाळु शकेल अशीच व्यवस्था केली आहे. रुंदीकरण्यास कोणाचेही दुमत नाही. यानंतर पुन्हा दोन्ही बाजुने रुंदीकरण झाले तरी नवीन पाईप लाईन टाकण्याची गरज भासणार नाही. यासर्व बाबींचा विचार करुन आज जे १०० फुटाचे काम हाती घेतले आहे ते योग्य आहे. जालना रोड हा १३२ फुटाचाच आहे. आणि आता दोन्ही बाजुने १६/१६ फुट जागा संपादन करावयाची झाल्यास त्याला जास्त वेळ लागेल चीफ इंजिनियर आणि विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली एक संयुक्त समिती नेमण्यात आली आहे. या समितीच्या सुचने प्रमाणे म.रा.वि.मं. टेलिफोन विभाग यांनी पोल शिफ्ट करण्याचे काम केले आहे. या शिवाय या रोडवरील काही डी.पी. हलविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. उदा. शासकिय दुध डेअरी येथील डेअरीच्या आवारात हलविण्यात येत आहे. सभागृहास नम्र विनंती आहे की, आहे त्या परिस्थितीत प्रस्तावीत केल्याप्रमाणे काम करण्यास मंजुरी द्यावी. भविष्यात लाईन स्थालांतर करावी लागणार नाही.

श्री. अफसरखान यासिन खान : जालना रोडवरिल पाहिला लाईन केव्हा कोठे आणि कशी टाकली आहे. याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

कार्यकारी अभि.(पा.पु) : जलवाहिनी जालना रोड विद्यमान रस्त्याच्या कडेने डांबरीकरण्याच्या २ फुट सोडुन आहे. या डांबरी रोडपासुन १२ मीटर अंतरापर्यंत रुंदीकरणसाठी खोद काम होत आहे. त्यामुळे विस्कळीत होते. एका ठिकाणी असे झालेले आहे.

श्री. अफसर खान यासीन खान : प्रस्तावित कामाच्या साईटची पाहाणी करण्यात यावी. खोद कामाची गरज नाही.आम्हाला शंका आहे. लाईन बदलण्याची गरज नाही.

मा. महापौर : जालना रोड रुंदीकरणाचे काम अत्यंत हळु हळु गतीने चालु आहे. प्रस्तावीत कामाला मंजुरी दिली नाही तर कामाला आणखी वेळ लागेल.

श्री. स.अली मिरा सलामी : प्रस्तुत कामाबाबत सभागृहात खुलासा करतांना या लाईनवर कॉक्रीट केसिंग करण्यात येईल जर ही लाईन नियोजित १३२ फुटावर टाकली तर लाईनवर कॉक्रीट केसिंग करण्याची गरज भासणार नाही आणि पर्यायाने महापालिकेचे १२ लाख रुपये वाचतील.

श्री. प्रशांत देसरडा : जालना रोडवरिल पाईप लाईन बदलली पाहिजे. या लाईन वरुन अनेक भागात पाणी पुरवठा होतो. गेल्या तीन दिवसापासुन माझ्या वार्डात पाणी नाही. लवकरात लवकर काम करावे.

श्री. प्रकाश निकाळजे : जालना रोड रुंदीकरणाचे काम सुरु होऊन ७/८ महिने झाले आहेत. त्यामुळे या रस्त्यावर रहदारीची कोंडी होत आहे. याशिवाय सिडको भागाला पाणी पुरवठा करण्यात व्यत्यय येत आहे. तेंव्हा यास कार्योतर मंजुरी देण्यात यावी. तीन सदस्यांची कमेटी नेमण्यात यावी. ही समिती पाहणी करिल.

मा. महापौर : विषय क्र. २ सर्वानुमते मंजुर करण्यात येतो. सभागृहातील चर्चेनुसार रस्त्याची पाहाणी करण्यासाठी स. सभासद सर्वश्री. नंदकुमार घोडेले, श्री. प्रकाश निकाळजे, श्री. स.अली मिरा सलामी आणि श्री. प्रशांत देसरडा यांचा समावेश असलेली चार सदस्यांची समिती नेमण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोड रुंदीकरणाच्या कामात बांधित होणारी २०० मी. मी. व्यासाची जलवाहिनी काढुन २०० मी मी व्यासाची डी. आय. के इ९ ही जलवाहिनी रस्त्याच्या कडेस टाकण्यासाठी रक्कम रु. २४,८१,४७३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर कामाचा खर्च सार्वजनिक बांधकाम विभागास शासनातर्फे प्राप्त होणाऱ्या अनुदानातुन मिळणाऱ्या ३.०० कोटी रुपयातुन महापालिकेतर्फे करण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९३/३ :**

उपसंचालक नगररचना,महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे. की, मोहल्ला गुरुरामदासनगर मधील नगर भुमापन क्रमांक १२४८६/७४,१२४८६/७५, व १२४८६/७६ मिळकतीच्या सामासिक अंतरातुन १.५ मीटर x २६ मीटर जमीन संपादन करणे बाबत कार्यकारी अभियंता (पा.पु) यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे त्या भागातील जमीनीचा नैसर्गिक उतार लक्षात घेऊन उपरोक्त नगर भुमापन क्रमांकामधील जमीन संपादन करणे बाबत प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

गुरु रामदासनगर व त्या लगतच्या सर्व रेखांकन भुखंड धारकांची ड्रेनेज समस्यांचे निराकारण होण्यासाठी सदरिल जलनिःसारण वाहिनीची मुख्य जलनिःसारण वाहिनीस जोडणी करण्याकरिता त्या रेखांकन डेड अण्ड असलेल्या रस्त्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणुन भुसंपादन करणे गरजेचे आहे. सदरील भुसंपादन प्रस्ताव हा नॉन डी.पी. असुन ड्रेनेज कामाची निवड लक्षात घेता अर्जन्सी क्लाज लावुन सदरील भुसंपादन करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर भुसंपादन पुढील कार्यवाहीस्तव जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात येईल.

संवाद :

श्री. जबिंदा दलबिरसिंग : बॅकेची बांधकाम परवानगी संचिका सापडत नाही. ही जागा पार्किगची आहे. २१ लाखात विकली नगर रचना विभागात फाईल सापडत नाही.

श्री. प्रशांत देसरडा : बांधकाम परवानगी फाईल मिळावी म्हणुन दोन माहिन्या पासुन मागणी करत आहे. फाईल सापडत नाही.

मा. महापौर : स. सभासद श्री. जबिंदा आणि श्री. देसरडा यांनी मागणी केलेली फाईल नगर रचना विभागाने ताबडतोब उपलब्ध करुन द्यावी.

श्री. रतकुमार पंडागळे : नगर रचना विभागातील अनेक संचिका गहाळा आहेत. अनेक फाईल मिळत नाही. तेंव्हा नगर रचना विभागाची सखोल चौकशी करण्यात यावी.

मा. महापौर : स. सभासदांनी यादी द्यावी. विषय क्र. ३ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुरु रामदासनगर व त्या लागतच्या सर्व रेखांकन भुखंडधारकांची ड्रेनेज समस्यांचे निराकरण होण्यासाठी ड्रेनेज कामाची निकड लक्षात घेता भुसंपादन अधिनियमानुसार तातडीने (अर्जन्सी क्लॉज अंतर्गत) गुरुरामदासनगर मधील नगर भुमापन क्र. १२४८६/७४, १२४८६/७५,व १२४८६/७६ या मिळकतीच्या सामाजिक अंतरातुन १.५X२६ मीटर जागा संपादन करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९४/४ :**

आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहर हे गेल्या १५-२० वर्षापासुन झपाट्याने विकसीत हात असुन झालेल्या औद्योगिक विकासामुळे तसेच पर्यटन दृष्टीकोनातुन या शहरास जागतिक नकाशावर महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. शहरात दररोज हजारो पर्यटक बाहेरुन येणारे नागरिक मोठया संख्येने येतात. अशा नागरिकांच्या व पर्यटकांच्या माहितीकरिता तसेच शहरातील वाढती वाहतुक सुरळीत होण्याचे दृष्टीने नागरिकांना सोई सुविधा उपलब्ध होण्यासाठी शहरातील प्रमुख मार्गावर दिशादर्शक कमाल व प्रमुख चौकात दिशादर्शक फलक, चौकाचे इ. ची उभारणी करण्याचे महानगरपालिकेने प्रस्तावित केलेले आहे. सदर कामामुळे पर्यटकांना नागरिकांना सोईसुविधा उपलब्ध होण्यासह शहर सौदर्यातही भर पडणार आहे.

सदरील कामाकरिता मोठया प्रमाणावर निधी आवश्यक असुन महानगरपालिकेस तशी भांडवली तरतुद करणे शक्य नसल्याने सदर प्रकल्प खाजगी कारणांने बी.ओ.टी.

(बांधा वापरा हस्तांतरित करा) या तत्वावर राबविण्याचा प्रशासनाने निर्णय घेतला आहे. सदरील कामाकरिता ढोबळमानाने शहरातील प्रमुख मार्गावर विविध जागा निश्चित केल्या आहेत. ज्या जागा औरंगाबाद महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या महानगरपालिकेने विकसीत केलेल्या रस्त्यावर असल्याने त्यासाठी कोठल्याही प्रकारचे भुसंपादन अथवा अतिरिक्त खर्च महानगरपालिकेस करावा लागणार नाही. या उलट खाजगीकरणातुन उभारण्यात येणाऱ्या दिशदर्शक कमान, दिशादर्शक फलक व चौकाचे नामफलक या माध्यमातुन जाहिरातीच्या वापर केल्याने महानगरपालिकेस महसुली उत्पन्न मिळु शकेल.

या प्रस्ताचे स्वरुप या कामाकरिता निविदा मागविण्यात येऊन त्या निविदांतर्गत तांत्रिक व आर्थिक अशा दोन वेगवेगळया भागात माहिती घेऊन निविदा विचारात घेण्यात येतील व किमान कालावधी नंतर सदर कमानी/ फलक महानगरपालिकेस हस्तांतरित करुन घेण्यात येईल असे आहे.

करिता ढाबळमानाने खालील प्रमाणे निश्चित केलेल्या कामाकरिता

१) दिशादर्शक कमान --//-- १००
२) दिशादर्शक फलक --//-- १००
३) प्रमुख चौकास नामफलक --//-- २०

खाजगीकरणाचे बी.ओ.टी. तत्वावर कामे करुन देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

तसेच महानगरपालिकेच्या मालकीचे गरवारे स्टेडियम येथे सद्यः स्थितीत क्रिकेट,बॅटमिंटन,टेबल टेनिस, ऐनिस इत्यादी क्रिडा प्रकार चालतात या क्रिडासंकुलामध्ये फार मोठी रिकामी जागा उपलब्ध आहे. त्या जागेमध्ये जलतरण तलाव बोट (बी.ओ.टी) पध्दतीने बांधल्यास महानगरपालिकेवर सद्यःस्थितीत कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही व महानगरपालिकेची एक मोठी मालमत्ता उभी राहिल. त्याकरिता गरवारे स्टेडियम येथे बोट(बी.ओ.टी.) पध्दतीने जलतरण तलाव बांधणेचा मान्यतेस्तव सादर.

उपरोक्त दोन्ही प्रस्ताव मान्यतेनंतर या प्रस्तावचे अंमलबजावणी करिता एक समिती (विंग) स्थापन करण्यात येऊन त्या मार्फत तांत्रिक व आर्थिक बाबी तपासुन या संदर्भात नियम, अटी ठरवुन व प्रत्यक्ष कामाच्या जागा निश्चित करुन प्रस्तावित कामची अंमलबजावणी करण्यात येईल.

सदरील कामे शहर अभियंता यांच्या मार्फत करण्यात येतील व जाहिरात महसुल व हस्तांतरण हया संदर्भात मालमत्ता अधिकारी यांचेकडुन कार्यवाही करण्यात येईल.

स्थापीत करण्यात येणारी समिती (विंग) खालील प्रमाणे असणार आहे.

१) शहर अभियंता --//-- निमंत्रक/संयोजक
२) अति. शहर अभियंता --//-- सदस्य
३) मुख्यलेखा अधिकारी --//-- सदस्य
४) उप आयुक्त (महसुल) --//-- सदस्य
५) उपसंचालक नगररचना --//-- सदस्य

प्रस्ताव मान्यतेनंतर सदर समिती निविदा मसुदा/ अटी, शर्ती कायम करुन निनिदा मागवुन निविदा कायम करण्याची कार्यवाही करेल व ढोबळयानाने प्रस्तवित केलेल्या जागा निश्चित करुन कामाची अंमलबजावणी करुन घेईल दरम्यानचे काळात स. सदस्यांनी काही जागा, चौक प्रस्तावित करुन तशा सुचना दिल्यास त्याचा ही या कामाचे अंमलबजावणी वेळी विचार करण्यात येईल.

संवाद :

श्री. सलीम : ज्या प्रभागास येईल त्या प्रभागाचे नगर सेवक यांना त्यात घेण्यात यावे अशी दुरुस्ती करुन ठराव मंजुर करावा.

मा. महापौर : अशी दुरुस्ती करुन प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

श्री. अंबादास दानवे : दोन वेगवेगळे प्रस्ताव एकत्र करण्यात आले आहेत. जलतरणाच्या प्रस्तावाबाबतच्या अटी वेगळया असतील, या समितीवर मालमत्ता अधिकारी यांचा समावेश असला पाहिजे.

मा. महापौर : संबंधीत प्रभागाचे नगरसेवक आणि मालमत्ता अधिकारी यांचा समितीत समावेश करण्यात यावा शहर वाहतुक विभागातर्फे परवानगी घेतली जाईल विषय क्र. ४ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात बाहेरुन येणारे नागरिक पर्यटक यांचे माहितीकरिता आणि शहरातील वाहतुक सुरळीत होणाच्या दृष्टीने शहरातील प्रमुख मार्गावर दिशादर्शक कमान आणि प्रमुख चौकात दिशादर्शक फलक उभारण्याचा प्रकल्प खाजगी कारणाने बांधा, वापरा व हस्तांतरित करा (बी.ओ.टी.) या तत्वावर खालीप्रमाणे कामे करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) दिशादर्शक कमान --//-- १००
२) दिशादर्शक फलक --//-- १००
३) प्रमुख चौकाचे नामफलक --//-- २०

या शिवाय महानगरपालिका मालकीच्या गरवारे स्टेडियम येथे मोठया प्रमाणावर मोकळी जागा उपलब्ध असल्याने गरवारे स्टेडियम येथे बांधा, वापर व हस्तांतरित करा (बी.ओ.टी.) या पध्दतीने जलतरण तलाव बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

या दोन्ही प्रस्तावाबाबतच्या तांत्रिक व आर्थिक बाबी तपासणे या संदर्भात नियम अटी ठरवुन प्रत्यक्ष कामाची जागा निश्चित करणे व कामाची अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे एक समिती (विंग) स्थापन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) शहर अभियंता --//-- निमंत्रण/संयोजक
२) अति शहर अभियंता --//-- सदस्य
३) मुख्यलेखाधिकारी --//-- सदस्य
४) उप आयुक्त (महसुल) --//-- सदस्य
५) उपसंचालक नगर रचना --//-- सदस्य
६) मालमत्ता अधिकारी --//-- सदस्य

या संबंधीत प्रभागाचे स. नगरसेवक यांचा या समितीत समावेश असेल.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९५/ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करित आहेत की, दि. २५ जानेवारी २००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये निर्देशित केल्यानुसार व सन २०००-२००१ च्या अर्थसंकल्पात अर्थसंकल्पीय ठराव क्र. ९६/१. दि. ३१ जुलै २००० च्या मान्यता मिळाल्यानुसार जकात वसुली खाजगी अभिकर्त्या मार्फत वसुल करावयाची आहे या करिता निविदा मागविल्या असता वेळेच्या आत कोणतीही निविदा प्राप्त न झाल्याने फेर निविदा मागविण्यात येत आहे. दरम्यानच्या कालावधीत काही सन्माननीय नगर सेवक व संघटना यांनी जकात खाजगीकरण कशा प्रकारे करणार आहात, वसुली कशा प्रकारे करण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या जकात विभागातील कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी

करणार आहात काय, जकात उद्दीष्ट कशा प्रकारे निश्चित करणार आहेत या बाबत शंका निर्माण केल्याने प्रकरणात संभ्रम निर्माण झाल्याने सदरील प्रशासकिय टिप्पणी मा. सर्वसाधारण सभेच्या समोर माहितीस्तव व मान्यतेस्तव ठेवण्यात येत आहे.

१) शासन आदेश क्रमांक ए.एम.ए. १०९४/प्र.क्र ३/९४/नवि-३२ दि. २८-२-९४ नुसार शासनाने जकात वसुलीसाठी अभिकर्ता नेमण्याची कार्यपध्दती निश्चित केली आहे त्यानुसार पहिल्या वर्षासाठी किमान बेकार रक्कमेची गणना करण्यासाठी महानगरपालिकेचे गत तीन वित्तीय वर्षापैकी ज्या वर्षाचे जकातीपासुन जास्त उत्पन्न मिळाले असेल ती रक्कम २०% ने वाढवावी व त्यामध्ये महानगरपालिकेने जकात वसुलीसाठी नेमलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पगारावर झालेल्या खर्चाच्या ५०% रक्कम मिळावावी. अशा बेरजेत जी रक्कम म्हणुन निश्चित ती रक्कम किमान देकार रक्कम महानगरपालिकेचे मागील ३ वर्षाचे उत्पन्न खालील प्रमाणे आहे.

    १) सन १९९८-९९ रु. ४०,५१,२१,०००/-
    २) सन १९९९-२००० रु. ४३,७१,०४,३६०/-
    ३) सन २०००-२००१ रु. ५० कोटी (३१ मार्च २००१ पर्यंत अपेक्षित)

   माहे डिसेंबर २००० पर्यंत महानगरपालिकेस रु. ३५.३५ कोटी उत्पन्न प्राप्त झाले आहेत. जकात वसुलीचे सरासरी विचारात घेता ५० कोटी उत्पन्न अपेक्षीत आहे. शासन निर्णयानुसार ५० कोटी रक्कमेवर २०% वाढ रक्कम रु. १० कोटी व अधिकारी व कर्मचारी यांची पगारावरील ५०% खर्च रु. १ कोटी असे एकुण रक्कम रु. ६१ कोटीचे वसुलीसाठी उद्दिष्ट निश्चित करण्यात येत आहे.

२) शासन निर्णयानुसार किमान देकार रक्कमेच्या ५% रु. ३ कोटीचे जकात वसुलीसाठी अनामत रक्कम म्हणुन राहिल.

३) शासन निर्णयानुसार ज्या निविदा धारकांची निविदा मंजुर होईल त्यास १६% सुरक्षा रक्कम रु. ९ कोटी ७६ लक्ष बॅक हमी स्वरुपात द्यावी लागेल.

४) निविदा धारकास प्रत्येक आठवडयास २% रक्कम महानगरपालिका ठरवुन देईल त्या बॅकेत किंवा कार्यालयात भरावी लागेल. अशा प्रकारे एकुण ५० आठवडयात संपुर्ण रक्कम निविदा धारकामार्फत कार्यालयात जमा होईल.

५) जकात वसुलीसाठी अभिकर्ता नेमल्यानंतर महानगरपालिकेच्या कोणत्याही कर्मचाऱ्याच्या नोकरीवर गदा येणार नाही. सदरील कर्मचारी शासन निर्णय १९९४ नुसार इतर कामासाठी वापरण्यात येतील. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या हक्कावर कुठल्याही प्रकारची गदा येणार नाही.

६) जकात वसुलीसाठी अभिकर्त्याने महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची मागणी केल्यास महानगरपालितर्फे सदरील कर्मचाऱ्यांच्या सेवा पुरविण्यात येतील. तथापी त्यांचे वेतन व भत्ते खाजगी अभिकर्त्यास महानगरपालिकेकडे जमा करावे लागतील.

७) जकात वसुली महानगरपालिकेच्या नियमानुसार होते किंवा नाही याबाबत दक्षता घेण्यासाठी एक जकात अधिक्षक व चार जकात निरिक्षक पाहणीस्तव नेमण्यात येतील.

८) जकात वसुली करतांना खाजगी अभिकर्ता व व्यापारी यांचे मध्ये काही वाद निर्माण झाल्यास सदरील वाद खालील समितीसमोर अंतिम करण्यात येईल व तो निर्णय अंतिम राहिल.

    १) आयुक्त --//-- अध्यक्ष

२) उपआयुक्त --//-- सदस्य
३) मुख्यलेखाधिकारी --//-- सदस्य
४) मा. महापौर यांनी --//-- सदस्य
नेमलेलो दोन प्रतिनिधी --//-- सदस्य

९) निविदा धारकांने प्रत्येक आठवडयास भरणा करावयाची रक्कम मुदतीच्या आत महानगरपालिकेत भरणा न केल्यास २४% दराने व्याज आकारण्यात येईल. मुदतीच्या आत सुरक्षा रक्कम हमी पत्र सादर न केल्यास अथवा काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१०) खाजगी अभिकर्त्यामार्फत जकात वसुलीचा कालावधी दि. १-४-२००१ ते ३१-३-२००२ असा राहिल.

११) जकात वसुलीकरिता प्रशासकीय बाबीसंबंधी अटी व शर्ती स्वंतत्रपणे निविदेत समाविष्ट केल्या जातील.

करिता "जकात खाजगीकरण" फेर निविदा मागविणेस्तव व अटी व शर्ती बाबतचा प्रस्ताव माहितीस्तव तथा मान्यतेस्तव सादर.

संवाद :

श्री. जबिंदा दलबिरसिंग : जकात बाबत छावणी बोर्डाचे एकपत्र आले आहे. छावणीचे हद्दीत आपल्या एक नाका आहे.

मा. महापौर : त्या प्रश्नाचा यात समावेश करता येत नाही.

श्री. प्रकाश निकाळजे : जकात खाजगीकरण या ऐवजी जकात टेंडर असा शब्द प्रयोग करण्यात यावा.

श्री. स.अली मिरा सलमी : जकात खाजगीकरण या ऐवजी जकात टेंडर असा शब्द प्रयोग करण्यात यावा.

श्री. स.अली मिरा सलामी : जकात हा महानगरपालिकेचा उत्पन्नाचा कणा आहे. शहराचा ५०% कारभार जकात उत्पन्नातुन केला जाते. याबबत सर्वांनी चर्चा करुन त्यावर योग्य निर्णय झाला पाहिजे. जकात खाजगी करणाबाबत यापुर्वी टेंडर मागविण्यात आले होते. मग हा विषय आज का मांडण्यात आला. याचा अर्थ यापुर्वी जे टेंडर मागविले होते. त्यावेळी जकात खाजगीकरणाबाबत ठराव झ ालेला नव्हता हे खरे आहे. म्हणजे मागील अनधिकृत कारभरात जो चार साडेचार लाख खर्च झाला तो खर्च कोणाकडुन वसुल करणार याचा खुलासा करण्यात यावा जकात खाजगीकरणाबाबत ठराव झाला का याबाबत मी लेखी माहिती विचारली होती तसा कोणताही ठराव सभागृहात आला नाही. फक्त अर्थसंकल्पात याचा उल्लेख करण्यात आलास होता याचा अर्थ खाजगीकरण करावे असा होत नाही. एखादया कामाचा अर्थ संकल्पात उल्लेख केल्यानंतर त्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले जाते त्याबाबतची पुर्ण प्रक्रिया केली जाते. त्यानंतर ते सभागृहापुढे मंजुरीस्तव ठेवले जाते. जकात खाजगी करणाबाबत मात्र स्थायी समितीने अर्थ संकल्पात उल्लेख करुन सर्वसाधारण सभेकडे पाठविले आहे. व्यापारी जकात कराची चोरी करत नाही असे कोणाचेही मत नाही. पण चोरी होते म्हणुन खाजगीकरण करणे हा त्यावर उपाय नाही. तर आपल्यात काय कमतरता आहे. याचा शोध घ्यावयास पाहिजे. अधिकाऱ्यांनी ६० कोटी ऐवजी ७० कोटी वसुली कशी होईल हे पाहिले पाहिजे. आज जकातचे खाजगीकरण होत आहे

यापुढे सर्वच कामाचे खाजगीकरण होईल. उदा. टॅक्स वसुली, खाजगीकरणाचे काम घेणारे या कामासाठी कर्मचारी नाही तर गुंड वसुलीसाठी ठेवतील. यासाठी खाजगीकरणानंतर काम करणाऱ्या वसुलीसाठी काही नियम घालुन दिले पाहिजे. या खाजगीकरणामुळे महानगरपालिकेचा २०%,१०% फायदा होतो ही एकच बाब समोर ठेऊन चालणार नाही. तेंव्हा खाजगीकरणाने काय फायदे होणार आहेत याचा सविस्तर विचार झाला पाहिजे. चुका दुरुस्त करणे आपले काम आहे. खाजगी करणामुळे पुढे गुंडागर्दी होईल त्यास जबाबदार कोण? या सर्व बाबींचा विचार करता माझे असे मत आहे की, हा ठराव मंजुर करुन नये. पंचायत राज पध्दतीने मागील पांच वर्षापासुन प्रभाग समित्या नेमल्या गेल्या नाहीत. आज या विषयसमित्या असत्या तर जकात बाबत त्यात विचार केला गेला असता.

श्री. शेख ईसाक : जकात खाजगीकरणाचा जो प्रस्ताव आज आला आहे तो फक्त लोकांच्या हितासाठी महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी आणि विकास कामे होण्यासाठी आहे. जकात वसुलीसाठी दरवर्षी उद्दीष्ट ठरवुन देण्यात येते. यावर्षासाठी ५३ कोटीचे उद्दीष्ट देण्यात आले होते. आता पर्यंत ३५ कोटी रुपये वसुल झाले आहेत. याचा अर्थ तीन महिन्यात ५३ कोटीचे उद्दीष्ट पुर्ण होत नाही. स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे जकात अभिकर्त्यावर अटी लावण्यात याव्यात.

- वाहनांची तपासणी फक्त नाल्यावरच करण्यात यावी.
- शहरात इतरत्र जकात कर वसुलीसाठी महापालिकेच्या अधिकाऱ्यास किंवा प्रतिनिधीस हजर ठेवुन तपासणी करावी.
- ऑटोरिक्षा किंवा वाहनामध्ये स्त्रिया असतील तर तपासणी करतांना संयम पाळावा अरेरावी करु नये.
- गुंडप्रवृत्तीचे किंवा गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेले कर्मचारी जकात अभिकर्त्याने ठेऊ नये.
- नाक्यावर प्रत्येक मालावर आकारले जाणाऱ्या करासंबंधीत फलक लावण्यात यावा. ज्यामुळे नागरिकांची लुट होणार नाही.
- जकात वसुलीसाठी अभिकर्त्याने धाड टाकतांना किंवा तपासणी करते वेळी पोलिस आणि महापालिका कर्मचाऱ्यास सोबत ठेवावे अन्यथा तपासणी करुन नये.

जकात खाजगीकरणामुळे महापालिकेस ६१ कोटी रुपये मिळतील महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल, विकास कामे होतील म्हणुन विनंती की हा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

श्री. रतनकुमार पंडागळे : जकात खाजगीकरणाचा प्रस्ताव सभागृहापुढे मांडला आहे. स. सभासद श्री. स.अली मिरा सलामी यांनी या प्रस्तावावर आपले विचार मांडले आहेत. मागील वेळी जी टेंडर नोटीस निघाली होती त्यावेळी संवादाच्या माध्यमातुन सभागृहापुढे आला होता पण हा प्रस्ताव मंजुर झालेला नव्हता आणि संवादाच्या माध्यमातुन आलेल्या प्रस्तावावर जर नोटीस काढली असेल तर या निविदेसाठी झालेल्या खर्चास कोण जबाबदार आहे. एका वर्तमानपत्राच्या जाहिरातीचे बील रु. ८९,०००/- पर्यंत आले

आहे. याबाबत चौकशी झाली पाहिजे. सर्व देशातुन/ राज्यातुन खाजगीकरणास विरोध होत आहे. या खाजगीकरणापासुन काय धोके आहेत हे आज समजुन घेतले पाहिजे. औरंगाबाद शहर हे चळवळीची कर्मभुमि आहे. खाजगीकरण झाले तर या शहरातील तरुण काम करण्यासाठी कोठे जाणार आहे याचा विचार झाला पाहिजे.

ज्या ज्या महानगरपालिकेने जकातीचे खाजगीकरण केले आहे. त्या ठिकाणचा अभ्यास करणे आवश्यक होते. नांदेड महापालिकेने खाजगीकरण केले. खाजगीकरणांच्या ठेका देवगिरी प्रतिष्ठान ने घेतला होता. त्याबाबतचे ८० लाखाचे प्रकरण औरंगाबाद हायकोर्टात चालु आहे. कोल्हापुर महापालिकेत हीच परिस्थिती आहे. उत्पन्न वाढविण्यासाठी दुसरा पर्याय शोधला पाहिजे. उत्पन्न वाढविण्यासाठी सक्षम अधिकारी नेमले पाहिजे. त्यासाठी खाजगीकरण हा पर्याय होऊ शकत नाही यासाठी हा ठराव माग्र घेण्यात यावा. आमचा त्यास विरोध आहे.

श्री. तकी हसनखॉन : खाजगीकरणाचा ठराव सभागृहापुढे आला आहे. या खाजगीकरणामुळे फायदे किती तोटे किती या दोन्ही बाजु पाहिल्या पाहिजेत. सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे डिसेंबर पर्यंत ३५ कोटी रुपये वसुल झाले आहे. प्रत्यक्षात मात्र ३८ कोटी रुपये वसुल झाले आहेत. ज्यांनी परिश्रम करुन वसुली केली त्याचे ३ कोटी रुपये यात कमी केले आहेत. वसुलीसाठी तीन महिन्याचा कालावधी उरलेला आहे. यात किती रक्कम वसुल होणार आहे. आम्ही सर्वांचे सोबत आहेत. पण चोरांचे सोबत नाही. व्यापारी चोर असेल तर तो पकडला गेला पाहिजे. यापुर्वी जकात खाजगी करणाचे टेंडर काढले होते यासाठी ५६ कोटी ठेवले होते. आता जे टेंडर काढले होते त्यासाठी ६१ कोटी रुपये ठेवले आहेत याचा अर्थ ज्याच्या विरोधामुळे हे ५ कोटी रुपये वाढले आहेत ते प्रशंसेचे पात्र नाहीत का? उरलेले काळात आपण सर्व मिळुन ५० कोटी जकात वसुल करु शकु असा माझा विश्वास आहे. याप्रमाणे जकातीचे उत्पन्न ५० कोटी धरले तर २०% वाढ धरुन जकात करासाठी ६१ कोटी दाखवले ते कमी आहेत. यात २/३ कोटीची वाढ केली पाहिजे. जकात विभागात लिकेज किती आहे. हे कोणीही सांगु शकणार नाही. लिकेजचे प्रमाणे १०-१५% गृहीत धरले तर अंदाजे ७/८ कोटी रक्कम वाढु शकेल. महागाई वाढत आहे. त्यात १२.५% वाढ धरली तरी ७ कोटी रुपये होतात. या ७ कोटीचे ४०-६०% केले तरी जकात टेंडरचे उद्दीष्ट हे ६४ कोटी करावयाला हवे. नाही तर जन बरोबर धोका केल्यासारखे होईल. सभागृहाचे बरोबर धोका केल्यासारखे होईल. महापालिकेचे उत्पन्न कसे वाढेल याचा विचार केला पाहिजे महापालिका जकात उत्पन्नात छावणी बोर्डाचा हिस्सा आहे. महापालिकेने जकातीचे खाजगी करण केले तर छावणी बोर्ड त्याचा भाग ओपन झोन म्हणुन घोषित करणार आहे. त्यामुळे महापालिकेचे नुकसान होईल. नाकाही हलववावा लागेल. छावणी भागात टोलटॅक्स वसुल करण्याची त्यांची तयारी आहे. छावणी बोर्डाचे १६-११-२००० चे पत्र काय आहे हे माहित नाही यासाठी छावणी बोर्डाशी चर्चा होणे आवश्यक आहे. मी महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने बोलत आहे. जकातचे टेंडर हे ६४ कोटीचे उद्दीष्टाप्रमाणे द्यावयाला पाहिजे. टेंडर घेणारे लोक कोण असतील हे जरी माहिती नसले तरी टेंडर देण्याने जर शहराची

परिस्थिती बिघडली तर त्यास जबाबदार कोण याचा ही विचार होणे आवश्यक आहे. या सर्व बाबीचा विचार करता टेंडर देण्यापुर्वी त्याबाबतचे नियम/अटी काय असतील त्या सभागृहापुढे आल्या पाहिजेत त्यात ज्या टेंडर धारकाने अन्य महापालिकेचे पैसे बुडवले आहेत. अशा टेंडर धारकास या पालिकेचे टेंडर भरता येणार नाही. अशी अट टाकली पाहिजे. तेंव्हा जनतेच्या हिताच्या दृष्टीने जकात टेंडर ६१ कोटी असावे का ६४ कोटी असावे हे सभागृहाने ठरवावे.

श्री. शेख ईसाक : जकात वसुलीबाबतचा आतापर्यंतचा तक्ता (माहिती) माझ्याकडे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १९९६/९७ | ३५ कोटीचे उद्दिष्ट | रु. ३०,९९,३२,२८९ | वसुली |
| १९९७/९८ | ४० --//-- | रु. ३८,५३,९५,९८१ | --//-- |
| १९९८/९९ | ४६ --//-- | रु. ४०,५०,५६,२८७ | --//-- |
| १९९९/२००० | ४८--//-- | रु. ४३,७१,४०,०६७ | --//-- |
| २०००/२००१ | ५३ --//-- | रु. ५३,६०,४२,२०० | --//-- |

पुढील तीन महिन्यात किती वसुली होईल हे पाहाता आरोग्य वैद्यकिय अधिकारी व लेखाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे. त्यामुळे वसुलीत १.५ कोटीची वाढ झाली आहे. यापुर्वी अशी वाढ का झाली नाही. याचाच अर्थ जकात मध्ये चोरी थांबविण्यासाठी, जनहितासाठी हा ठराव मंजुर करण्यात यावा.

श्री. तकी हसनखान : मी सभागृहात जो खुलासा केला त्या बाबत जकात अधिक्षक यांनी खुलासा करावा की, मी दिलेले आकडे बरोबर आहेत का चुक आहेत.

मा. महापौर : जकात खाजगीकरणासाठी प्रशासनातर्फे ६१ कोटी रुपयाचे उद्दिष्ट दिले आहे आणि स. सभासदांचे मते ते ६४ कोटी असावयाला हवे या याबाबत प्रशासनाने खुलासा करावा. की उद्दिष्ट ६१ कोटी केसे.

मुख्यलेखाधिकारी : शासनाने जकात वसुलीसाठी पाहिल्या वर्षी उद्दिष्ट निश्चित करत असतांना कार्यपध्दती निश्चित केली आहे. शासन आदेश क्र. ए एम ए /१०९४ प्र क्र/ ९४/ नवि दिनांक २८-२-९४ अन्वये शासनाने ही कार्यपध्दती निश्चित केलेली आहे. यामध्ये पहिल्या वर्षाचे उद्दिष्ट निश्चित करत असतांना मागील तीन आर्थिक वर्षात किती वसुली झाली आणि ज्या वित्तिय वर्षात जास्त वसुली झाली ते बेस कॉस्ट धरुन त्यावर २०% अतिरिक्त वाढ धरण्यात यावी. आणि महापालिकेने जकात वसुलीसाठी जो कर्मचारी वर्ग नेमला आहे. त्याच्या वेतनावर होणाऱ्या खर्चाच्या ५०% शेअर करण्यात यावा या सुत्रानुसार मागील तीन वर्षांची. आकडेवारी जी प्रशासनातर्फे सादर करण्यात आली आहे. १९८/९९,१९९९/२००० आणि २०००/२००१ तर आता ५० कोटी रुपये ३१ मार्चपर्यंत अपेक्षित आहे. यावर २०% अधिकार लावुन प्रशासकीय खर्चाच्या ५०% (१ कोटी ९७ लाखाच्या ५०%) म्हणजेच १ कोटी रुपये असे मिळुन ६१ कोटीचा उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यामुळे ६४ कोटी उद्दिष्ट ठरविण्यासाठी कोणत्याही प्रकारचे लॉजिक नाही. शासनाने जे नियम घालुन दिले आहेत त्यानुसार पाहिल्या वर्षासाठी उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यानंतर दुसऱ्या वर्षासाठी उद्दिष्ट ठरवितांना १०% वाढ धरुन तरतुद करण्यात येईल.

श्री. तकी हसनखान : जकात वसुलीचे उद्दिष्ट ५३ कोटीचे होते पण प्रत्यक्षात ५० कोटी वसुली गृहीत धरण्यात आली आहे. याचा अर्थ ३ कोटीची चोरी झाली हे

मान्य करावे लागेल. तेव्हा उद्दिष्टानुसार ५३ कोटीवर २०% वाढ करुन उद्दिष्ट ठरवाव्याला पाहिजे होते.

मुख्यलेखाधिकारी : ५३ कोटी उद्दिष्टावर २०% वाढ लावता येणार नाही. प्रत्यक्ष वसुली ही शासनाची पहिली अट आहे. प्रत्येक वर्षासाठी वसुलीचे उद्दिष्ट ठरविले जाते व प्रत्यक्ष वसुली तेव्हावी होत नाही. शासनाने आपल्या परिपत्रकात जकात वसुलीचे काम अभिकर्ता मार्फत हाती घेतले त्यात ज्या वर्षात प्रत्यक्षात जास्त वसुली होईल त्यावर २०% अतिरिक्त वाढ व कर्मचारी वेतनाच्या ५०% रक्कम धरुन उद्दिष्ट ठरवावे अशी अट आहे.

मा. महापौर : कोणत्याही वर्षात जकात वसुलीचे उद्दिष्ट पुर्ण झाले नाही. शासनाचे पत्रकानुसार मागील तीन वर्षाचे प्रत्यक्ष उत्पन्नावर उद्दिष्ट ठरविण्यात यावे अशा सुचना आहेत.

श्री. स. अली मिरा सलामी : आतापर्यंत जे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते त्यापेक्षा कमी पैसा आपल्याकडे आला म्हणुन जकातीचे खाजगीकरण करण्याचे ठरविण्यात आले आहे. या ऐवजी वसुली कमी का झाली याचा विचार करण्यात यावा. वसुलीसाठी महसुन अधिकारी नेमावा व उद्दीष्ट पुर्ण करण्यास यावे. जर हा ठराव मंजुर झाला तर तो बेकायदेशिर होईल. कारण आज कारभार चालु आहे तो पंचायत राज प्रमाणे चालु नाही.

मा.महापौर : हा प्रस्ताव प्रशासनातर्फे सभागृहापुढे मांडला आहे तो नियमाप्रमाणे आहे. स. सभासदांच्या सुचना नोंदवुन घेतल्या आहेत.

मुख्यलेखाधिकारी : नऊ महिन्याचा आढावा घेऊन सुधारित अंदाजपत्रक दरवर्षी सादर करण्यात येते. सुधारित अंदाजपत्रक तयार करण्याची प्रक्रिया सुरु असुन सर्व विभागाच्या उत्पन्नाचा आढावा घेतला असता जकात विभागाकडुन लेखी स्वरुपात प्राप्त झालेल्या आकडेवारी वरुन उत्पन्नाचा कल पाहता जकातचे उत्पन्न ५० कोटीपर्यंत अपेक्षित आहे. ९५-९६ ला ३२ कोटीचे उद्दिष्ट असतांना सुधारित अंदाजपत्रकाचे वेळी ३२ काटी झाले. ९७-९८ ला ४० कोटीचे उद्दिष्ट असतांना सुधारित अंदाजजपत्रकाचे वेळी ३९ कोटी झाले. ९८-९९ ला ४६ कोटीचे उद्दिष्ट असतांना सुधारित अंदाजपत्रकाचे वेळी ४२ कोटी झाले. ९९-२००० ला ४८ कोटी उद्दिष्ट असतांना ४४ कोटी झाले आणि आत २०००-२००१ ला ५३ कोटी उद्दिष्ट असतांना सुधारित अंदाजपत्रकाचे वेळी ५० कोटी ग्राह्य धरते आहे.

मा. महापौर : प्रत्येक वर्षी सुधारित बजेट करतांना ठरवुन दिलेले उद्दिष्ट पुर्ण होत नाही म्हणुन कमी करावे लागते २०००-२००१ करिता ५३ कोटीचे उद्दिष्ट ठेवले असले तरी सुधारित करतांना ते ५० कोटी धरले आहे. ते पुर्ण होईलच असे नाही. प्रत्येक वर्षाच्या प्रत्यक्ष वसुलीप्रमाणे दर वर्षी सुधारित अंदाजपत्रकापेक्षा २-४ कोटी वसुली कमी झालेली आहे.

श्री. जयवंत ओक : महापालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे. विकास कामे झाली पाहिजे. यातुन जकात खाजगीकरणाचा प्रस्ताव सभागृहापुढे आला आहे. खाजगीकरणास विरोध नाही पण त्यापासुन जनतेला त्रास होता कामा नये त्यासाठी नियमावली तयार करण्यात यावी. जकात बरोबरच मालमत्त कर, पाणी पट्टी इत्यादीच्या वसुली खाजगीकरणातुन करण्यात यावी. त्यामुळे महापालिकेला उत्पन्नात वाढ होईल जकातीसाठी सध्या ६१ कोटीचे उद्दिष्ट ठेवले आहेत. त्यात ६-७-८% लिकेज ग्राह्य धरुन जकातीच्या उद्दिष्टात काही वाढ होऊ

शकते का ? ६४-६५ कोटी पर्यंत जाऊ शकते का याचाही विचार झाला पाहिजे. महापालिकेचा फायदा होत असेल तर तसा विचार करावयाला हरकत नाही.

श्री. सुदाम सोनवणे : ज्या विषयावर चर्चा चालु आहे तो विषय हा महापालिकेच्या उत्पन्नाची फार मोठी बाब आहे. शहराचा विकास व्हावा म्हणुन वेळोवेळी मागणी केली जाते. बऱ्याच वेळा अर्थसंकल्पात तरतुद नाही म्हणुन काम करता येत नाही. मागच्या सभेत जकात बाबतचा ठराव झाला त्यानुसार त्याची प्रक्रिया सुध्दा सुरु झाली टेंडर नोटीस वृत्तपत्रात प्रसिध्द झाली परंतु त्यावर आपण कार्यवाही करु शकले नाही म्हणुन पुन्हा विषय सभागृहापुढे ठेवावा लागला. जकात खालगीकरण करणे म्हणजे या शहरातील नागरिकांचा/व्यापाऱ्यांना रोष घेणे असे नाही. याचा शहरातील नागरिकांना व्यापाऱ्यांना त्रास होऊ नये म्हणुन आम्ही या सभागृहात काम करतो. दरवर्षीच्या अर्थसंकल्पात जकातीचे उद्दिष्ट ठरविले जाते` पण गेल्या ५-६ वर्षाच्या अनुभवावरुन उद्दिष्टापेक्षा ३-४ कोटीची तुट दरवर्षी भरुन काढावी लागते चांगले अधिकारी पाठविले समित्या नेमल्या पण जकातीची उद्दिष्ट साध्य करता आले नाही आणि चुकही लक्षात आली नाही. आणि त्यातुन एक उपाय पुढे आला तो म्हणजे खाजगीकरण करणे. यावर शहराची शांतता भंग होईल असा मुद्दा पुढे आला या मुद्दाचा बाऊ करणे योग्य नाही. जकातीचे ६१ कोटीचे जे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यात जर स्पर्धा झाली तर ते ७० कोटीच्या आसपास जायला हवे असे माझे मत आहे. त्यामुळे शहराचा विकास चांगला होईल कल्याण डोंबवली महापालिकेने जकातीसाठी ४८ कोटीचे उद्दिष्ट ठेवले होते त्यांना ५५ कोटी रुपये मिळाले. दुसऱ्या वर्षी ६२ कोटी रुपये मिळाले यावषी त्याचा ठेका ७१ कोटी रुपयावर गेला आहे. तेंव्हा जकात खाजगीकरणाचा ठराव मंजुर करण्यात यावा. त्यासाठी ६१ कोटीचे उद्दिष्ट बरोबर आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : जकात खालगीकरणाच्या प्रश्पावर स. सभासदांनी आपले मत व्यक्त केले आहे. गेल्या अनेक वर्षाच्या वार्षिक उत्पन्नाची आकडेवारी पाहता फायदे/तोटे याची बाजु मांडली. जकातीच्या बाबतीत आपण सन १९९५ पासुन ठरवुन दिलेले उद्दिष्ट पुर्ण करु शकलो नाही. या वर्षीही उद्दिष्ट पुर्ण होणार नाही. असे दिसते जकात विभागात काम करणारे २००/२२५ कर्मचारी, वापरण्यात येणारी वाहणे याचा अंदाजे खर्च २ ते २.५ कोटी आहे. मालमत्ता कराचे उद्दिष्ट सुध्दा आपण पुर्ण करु शकत नाही. चांगली वसुली झाली तर मालमत्ता करापासुन ३०-३५ कोटी उत्पन्न होईल. जकातीचे खाजगीकरण झाले तरी जकातचा कोणताही कर्मचारी कमी करणार नाही. किंवा त्याचे आर्थिक नुकसान होऊ देणार नाही कल्याण-डोंबवली, उल्हासनगर,अमरावती या सारख्या महापालिकातुन खाजगीकरणातुनच जकात वसुली केली जात आहे. शासनाने उपकर लागु केला आहे. आज पुन्हा शासन नगरपालिकांना जकात कर लागु करु पाहात आहे. कोल्हापुर शहराची गोष्ट वेगळी आहे. या शहरातील तलावातुन चोरीने माल आयात/निर्यात करण्याची तस्करी चालते. कोल्हापुर वगळता इतर महापालिकेतुन खाजगीकरणाच्या माध्यमाने जकात वसुलीचे काम चांगल्या प्रकारे चालु आहे. हा प्रस्ताव महापालिकेच्या हिताचा आहे. जी नियमावली आहे त्यात चार सदस्यांचा समावेश करण्यात यावा. व समिती नेमावी व ज्या

तक्रारी आहेत त्या दुर करण्यात याव्यात या विभागाचा कर्मचारी इतर कामासाठी उपयोगात घेता येईल. प्रस्ताव मंजुर करावा.

श्री. अंबादास दानवे : मी खऱ्या अर्थाने सांगेल की हा विषय जकातीचे खाजगीकरणाचा नाही तर उद्दिष्ट निश्चितीसाठी ठेवण्यात आला आहे. यावर बरीच चर्चा झ ाली अनेक महापालिकाचे दाखले या ठिकाणी देण्यात आले आहेत जकातीचे उद्दिष्ट ६३-६४ कोटी असावे अशी सुचना आली आहे मी म्हणतो ते ७० कोटी असावे. परंतु त्याला आधार काय ? जे उद्दिष्ट सभागृहापुढे ठेवण्यात आले आहे. ते शासनाच्या जी. आर. प्रमाणे ठेवले आहे. ९८-९९ च्या तुलनेत जकातीचे ३.८९ कोटी जास्त उत्पन्न झाले आहे. २०००-२००१ या वर्षात ६.२९ कोटी उत्पन्न उद्दिष्टापेक्षा जास्त झाले आहे. या वर्षी जर ५० कोटी वसुली झाली नाही तर हे ६१ कोटीचे उद्दिष्टही कमी होईल. आणि वाढले तर उद्दिष्ट वाढेल. जकात कराची प्रभावी वसुली व्हावी म्हणुन एक वर्षासाठी आपण हा निर्णय घेत आहोत या विभागाचे २००/२२५ कर्मचारी अन्य विभागाच्या कामासाठी उपयोगात आणुन इतर करांची प्रभावी वसुली करता येईल तेंव्हा हा विषय मंजुर करण्यात यावा.

मा. महापौर : आतापर्यंतच्या अहवालावरुन जकात कराचे उद्दिष्ट केव्हाही पुर्ण झाले नाही. तेव्हा हा प्रस्ताव जसाच्या तसा मंजुर करण्यात येतो. आजची सभा

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जकात वसुली खाजगी अभिकर्त्यामार्फत वसुल करण्यासाठी खाली प्रमाणे फेर निविदा मागविण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) शासनाने आदेश क्र. ए.एम.ए/१०९४/प्र क्र इ ९४/नवि -३२ दिनांक २८-२-१९९४ नुसार जकात वसुलीसाठी अभिकर्ता नेमण्यासाठी निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार रक्कम रु. ६१ कोटी जकात वसुलीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात येत आहे.

२) शासन निर्णयानुसार किमान देकार रकमेच्या ५% रुपये ३ रुपये ३ कोटी ५ लक्ष ही रक्कम अनामत रक्कम म्हणुन राहिल.

३) शासन निर्णयानुसार ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होईल त्यात १६% सुरक्षा रक्कम रु ९ कोटी ७६ लक्ष बँक हमी स्वरुपात द्यावी लागेल.

४) निविदाधारकास प्रत्येक आठवडयात २% रक्कम महापालिका ठरवुन देईल त्या बँकेत किंवा कार्यालयात भरावी लागेल. अशा प्रकारे एकुण ५० आठवडयात संपुर्ण रक्कम निविदा धारकामार्फत कार्यालयात जमा होईल.

५) जकात वसुलीसाठी अभिकर्ता नेमल्यानंतर महापालिकेच्या कोणत्याही कर्मचाऱ्याच्या नोकरीवर गदा येणार नाही. सदरील कर्मचारी शासन निर्णयानु १९९४ नुसार इतर कामासाठी वापरण्यात येतील. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या हक्कावर कुढल्याही प्रकारची गदा येणार नाही.

६) जकात वसुलीसाठी अभिकर्त्याने महापालिका कर्मचाऱ्यांची मागणी केल्यास महापालिकेतर्फे सदरील कर्मचाऱ्यांच्या सेवा पुरविण्यात येतील तथापि त्यांचे वेतन व भत्ते खाजगी अभिकर्त्यास महापालिकेकडे जमा करावे लागतील.

७) जकात वसुली महापालिकेच्या नियमानुसार होते किंवा नाही याबाबत दक्षता घेण्यासाठी एक जकात अधिक्षक व चार जकात निरिक्षक पाहणीस्तव नेमण्यात येतील.

८) जकात वसुली करतांना खाजगी अधिकर्ता व्यापारी यांचेमध्ये काही वाद निर्माण सदरील वाद खालील समिती समोर अंतिम करण्यात येईल व तो निर्णय अंतिम राहिल.
   १) आयुक्त --//-- अध्यक्ष
   २) उपआयुक्त --//-- सदस्य
   ३) मुख्यलेखाधिकारी --//-- सदस्य
   ४) मा. महापौरांनी नमलेले दोन प्रतिनिधी. --//-- सदस्य

९) निविदाधारकाने प्रत्येक आठवडयास भरणा करावयाची रक्कम मुदतीच्या आत महापालिकेत भरणा न केल्यास २४% दराने व्याज आकारण्यात येईल. मुदतीच्या आत सुरक्षा रक्कम हमीपत्र सादर न केल्यास अथवा काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१०) खाजगी अभिकर्त्यामार्फत जकात वसुलीचा कालावधी दिनांक १-४-२००१ ते ३१-३-२००२ असा राहिल.

११) जकात वसुलीकरिता प्रशासकीय बाबीसंबंधी अटी व शर्ती स्वतंत्रपणे निवेदेत समाविष्ट केल्या जातील.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : आजची सभा ०५ मिनिटासाठी तहकुब करण्यात येते.(वेळ ५.०० वाजता पुन्हा ५.४० वाजता सभेला सुरुवात.)

## *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्र. १९६/ :**

सौ. अनिता सांडु इंगळे रा, गौतम कॉलनी, न्यायनगर यांचे पती श्री. सांडु इंगळे हे जे जे हॉस्पीटल मुंबई येथे शस्त्रक्रियेसाठी दाखल झालेले आहेत. परंतु त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे. करिता नगरसेवक स्वेच्छा निधीमधुन श्री. सांडु इंगळे यांना रक्कम रुपये ५०,०००/- (पन्नास हजार फक्त) आर्थिक मदत देणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर. व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. मधुकर सावंत
अनुमोदक : श्री. सुदाम सोनवणे, श्री. गणेश तांबे,
श्री भगवान घडामोडे,नंदकुमार घोडेले.
दिनांक : १२-१२-२०००

संवाद

श्री. नंदकुमार घोडेले : तीन आजारा व्यतिरिक्त इतर लहान-लहान आजासाठी आपण आर्थिक मदत देऊ शकत नाही म्हणुन नियमात बदल करुन आर्थिक मदत देण्याबाबतचे प्रस्ताव मंजुर होतात परंतु अंमलबजावणी होत नाही.

मा. महापौर : लहान-लहान आजारांना आपण आर्थिक मदत देऊ शकत नाही.

श्री. नंदकुमार घोडेले : देता येत नसेल तर ठराव मंजुर करतांना तस अधिकारी यांचेकडुन खुलासा व्हावयास पाहिजे.

मा. महापौर : प्रत्येक सर्वसाधारण सभेत स. सदस्या मार्फत रुग्णांना आर्थिक मदत देण्याबाबतचे प्रस्ताव सादर होतात. परंतु काही ठराव मंजुर होऊनही

अंमलबजावणी होत नाही. मदत देऊ शकत नाही. नियमावलीमध्ये सध्या तीनच आजारासाठी आर्थिक मदत देण्याची तरतुद आहे. १. हृदय विकार शस्त्रक्रिया २. किडणीचा आजार ३. ब्लड कॅन्सर इ. यापेक्षाही काही आजार मोठया प्रकारचे आहे. व त्यासाठी नविन नियमावली करणे सुध्दा गरजेचे आहे. व तशी नविन नियमालवली तयार करुन पुढील सर्वसाधारण सभेत सादर करुन त्यास मंजुरी देण्यात येईल.

श्री. नंदकुमार घोडेले : या अगोदरचे आर्थिक मदत देण्यात बाबत ठराव मंजुर झाले त्याचे काय कारणार?

श्री. सुनिल वडागळे : आर्थिक मदत देण्या बाबतचे ठराव मंजुर होतात परंतु रुग्णांना वेळेवर मदत मिळत नाही.

श्री. नंदकुमार फुलारी : ज्या आजारासाठी आर्थिक मदत करता येत नसेल तर ती रक्कम इतर विकास कामासाठी वापरण्याची परवानगी दयावी.

मा. महापौर : वेगवेगळया प्रकारचे लहान-मोठे आजार आहेत. त्यासाठी नवीन नियमावली तयार करण्यात येईल. मुख्यलेखाधिकारी यांनी सविस्तर माहिती दयावी.

मुख्यलेखाधिकारी : स्वेच्छानिधीतुन फक्त ३ आजारसाठी आर्थिक मदत आपण उपलब्ध करुन देतो. खाजगी दवाखान्यातुनच मुख्यत्वे शस्त्रक्रिया किंवा ब्लड चेंज इ केले जाते. यात तीन आजार मध्यत्वे करुन येतात व इतर आजारासाठी घाटी दवाखाना किंवा मनपाचा दवाखान्यामध्ये सेवा उपलब्ध आहे. म्हणुन त्या आजारासाठी आर्थिक मदत आपण देत नाही.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी : वैद्यकिय मदत फक्त तीन गोष्टींना महानगरपालिकांतर्फे देण्यात येते. शासनाने १. हृदयाची बायपास सर्जरी २. किडणी बदलणे ३. ब्लड कॅन्सर इ. आजार येतात या आजारासाठी जवळपास दीड ते दोन लाख रुपयापर्यंत खर्च येतो व अशा आजाराचे उपचार मुंबई/पुणे सारखे ठिकाणीच होतात रुग्णांना खर्चही जास्त येतो. म्हणुन शासनाने सुध्दा विचारपुर्वक वरील तीनच आजारासाठी आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. व तसा शासनाने जी.आर. मध्ये सुध्दा नमुद केलेले आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : आर्थिक मदत देण्याबाबत ज्या प्रस्तावास विशेष बाब म्हणुन मंजुरी दिली त्या प्रस्तावाची अंमलबजावणी झाली पाहिजे.

मा. महापौर : प्रस्ताव येण्या अगोदर प्रशासकीय अभिप्राय येण्याची गरज आहे प्रस्ताव मंजुरीस अडचण येणार नाही.

श्री. जयवंत ओक : स्वेच्छानिधीतुन आर्थिक मदत मिळण्यासाठी ३ आजारासाठी पत्र दिले जाते परंतु बऱ्याचदा असे होते. आर्थिक मदत मिळाण्याची व त्यास चालु असतांना रुग्णांचामृत्यु होतो व त्यास आर्थिक मदत मिळत नाही. नियमावलीत नमुद केलेल्या तीन आजार कुणासही होऊ शकतात. आर्थिक मदतीची मागणी झाल्यावर तात्काळ मदत झाली पाहिजे. त्यासाठी एक ठराविक कालावधी १५ दिवस १ महिना २ महिने ठरविण्यात यावा जेणे करुन या कालावधीत संबंधित रुग्णास पैसे वेळेवर मिळाले पाहिजे.

मा. महापौर : सभागृहापुढे प्रश्न असा की, ज्या रुग्णांची सर्जरी सरकारी दवाखान्यात होते किंवा मेडीकल दवाखान्यात होऊ शकते उदा. किडणी,पाठीच्या कन्याचा आजार इ.साठी बजाज, धुत हॉस्पीटल किंवा मुंबई/पुणे सारखे ठिकाणी जाण्याची गरज नाही. मग अशा रुग्णांना मदत करायची का हा प्रश्न आहे. यात काही ठराव असे आहे की, ब्लड कॅन्सर झाला आर्थिक मदतीची

मागणी केलेली आहे. अशा रुग्णांच्या उपचार जर घाटी दवाखान्यात होत असेल तर महानगरपालिकेचा पैसा खर्च करण्यापेक्षा घाटी दवाखान्यातच उपचार घ्यावयास पाहिजे. ज्या शस्त्रक्रियेसाठी सरकारी किंवा घाटी दवाखान्यात उपकरणे उपलब्ध नाही त्यांना मुंबई/पुणे सारख्या ठिकाणी जावे लागते खरोखरच खर्च येत आहे. पैशाची गरज आहे. तेथे मदत करण्याची गरज आहे. परंतु आपणांस अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, रुग्ण असेल त्यांनी पत्र जमा करायचे सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावयाची मंजुरी मिळुनही आर्थिक मदत देण्यात येत नाही. याला काही अर्थ नाही.

श्री. जयवंत ओक : शासनाने फक्त किडणी,वाल,ब्लड कॅन्सर इ. आजारासाठी मान्यता दिली ब्लड कॅन्सरच्या व्यतिरिक्त इतर कॅन्सरला आर्थिक मदत देता येऊ शकते का? मुखलेखाधिकारी यांचेकडुन खुलासा घ्यावा. गरिब रुग्ण आहे. शासनाचे नियमा व्यतिरिक्त इतर आजारांना आर्थिक मदत देता येऊ शकते. आपली महानगरपालिका सक्षम आहे. हा निर्णय सभागृहाने घ्यावयाचा असतो. शासनाचे डायरेक्त घेण्याची गरज नाही.

मा. महापौर : शासनाने फक्त तीनच आजारासाठी मदत देण्याचे सुचविले आहे. त्या व्यतिरिक्त इतर आजारासाठी आर्थिक मदत दयावयाची किंवा नाही हा प्रश्न सभागृहासमोर आलेला आहे. आजाराची एक लिस्ट तयार करण्यात येईल त्यावेळेस सभागृहाने आपआपल्या भावना व्यक्त कराव्या त्यानुसार मंजुरी देण्यात येईल

श्री. नंदकुमार घोडेले : या अगोदर झालेले निर्णय संकलन करावे व यापुढे एकत्रित प्रस्ताव सादर करावा.

श्री. जयवंत ओक : नियमाने कार्यवाही करता येते असेल तर करावे नसता लेखा परिक्षणामध्ये अडचण निर्माण होऊन वृत्तपत्रात बातम्या झळकु नये. मनपाची बदनामी होऊ नये.

श्री. दत्तात्रय थोरात : रुग्णांना स्वेच्छानिधीतुन आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. जेव्हा रुग्णास चेक देण्यात येतो. तेव्हा रुग्ण मृत्यु झालेला असतो. असा निधी पुन्हा दुसऱ्या कामासाठी वापरण्याची परवानगी दयावी.

मा. महापौर : जो निधी वापरला गेला नाही असा स. सदस्यांचा स्वेच्छानिधी दुसऱ्या एखादया कामासाठी किंवा दुसऱ्या रुग्णांना वापरण्याची परवानगी देण्यात येते. तशी इतवृत्तात नोंद घ्यावी.

श्री. सुदाम सोनवणे : ज्या तीन आजारासाठी आर्थिक मदत देण्यात येते. ठराव मंजुर होतो. परंतु कार्यवाही होत नाही. रुग्णांचा मृत्यु होण्यापुर्वी संचिका मंजुर व्हावी अशी आमची आग्रहाची मागणी आहे. अशा किती संचिका थांबवुन आहेत विचाराणा करण्यात यावी. तात्काळ अशा संचिका निकाली काढण्याचे अधिकाऱ्यांना आदेशीत करावे.

श्री. सुनील वडागळे : रुग्णांना भावना लक्षात घेऊन आर्थिक मदत देण्या बाबतचा प्रस्ताव स. सदस्य मांडतात मागील बैठकीत अनेमिया या आजारासाठी आर्थिक मदत देण्या बाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येऊन संचिका तयार होऊन संबंधीत डॉक्टर व लेखाविभागातुन असे रिमार्क करण्यात आले की, नियमावलीच्या अधिन राहुन आर्थिक मदत देता येत नाही. नुसतेच ठराव पास करायचे व अंमलबजावणी होत नाही. हे योग्य नाही.

मा. महापौर : रुग्णांना निधी वेळेवर उपलब्ध होत नाही असे सर्व स. सभासदांचे मत आहे. एकदा प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर किती दिवसात कार्यवाही होते यासंबंधी आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी खुलासा करावा.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी : स. सदस्यांच्या निधीतुन आर्थिक मदत देण्याबाबतची संचिका आल्यानंतर एन-८ दवाखान्यामध्ये संबंधीत रुग्णांची नोंद होते व त्या रुग्णांस खरोखरच तो रोग आहेत का? तपासणी करण्यात येते तसेच त्यांचेकडील जे कागदपत्र आहेत त्याची सुध्दा तपासणी करण्यात येते. कुठेतरी महानगरपालिकामध्ये रेकॉर्ड पाहिजे ऑडीटसाठी अडचण येऊ नये. म्हणुन दर मंगळवारही एन-८ येथील दवाखान्यात तज्ञ डॉक्टर येतात त्यांच्या मार्फत तपासणी होते व त्यानंतर एक आठवडयाच्या आत संचिका निकाली काढलेल्या आहेत.

श्री. कोकाटे काशिनाथ : आताच संबंधित अधिकारी यांनी खुलासा केला की, रुग्णांची तपासणी झाल्यानंतर ८ दिवसांत संचिका निकाली काढली जाते. परंतु या वर्षाचा ८ महिन्याचा कालावधी गेला किती रुग्णांना मदत केलेली आहे. किती रुग्णाचे ठराव पास केले व त्यानुसार किती संचिका सादर झालेल्या आहेत, याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी : स. श्री. कोकाटे यांनी विचारलेला खुलासा पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह देण्यात येईल. नियमावलीनुसार ज्या तीन रोगासाठी मदत मागविली आहे अशी एकही संचिका माझ्याकडे थांबुन नाहीत. ज्या व्यतिरिक्त इतर रोगावर मदतीची केलेली मागणीच्या संचिका थांबवुन आहेत.

मा. महापौर : मदत देण्याची संचिका संबंधित विभागात सादर झाल्यानंतर १० दिवसात मंजुर होऊन चेक तयार व्हावयास पाहिजे. ज्यांचे प्रस्ताव थांबवुन आहे. त्याची सविस्तर माहिती पुढील सर्वसाधारण सभेत दयावयाची आहे. नियमावलीनुसार तीन आजाराच्या व्यतिरिक्त जे आजार मोठे आहेत, असाह्य आजार आहेत त्याचा उपचार घाटी सारख्या दवाखान्यात होत नाही. त्याची सर्व आजाराची यादी पुढील बैठकीत नांवासह सादर करावी व कोणत्या आजारासाठी किंवा आर्थिक मदत दयावयाची याची चर्चा करुन निर्णय घेतला जाईल.

श्री. नंदकुमार घोडेले : जे ठराव आपण या अगोदर मंजुर केले त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. जे नियम करायचे याचा विचार यापुर्वीच ठराव मंजुर होण्याच्या अगोदर करावयास पाहिजे होते.

मा. महापौर : या सर्वसाधारण सभेत ठरवले की, ज्या रुग्णास २५,०००/- हजार रुपयाची मदत दयावयाची व त्या रुग्णाने २५ स. सदस्यांचे पत्र जमा करावयाचे असो जर असेल तर असा ठराव सर्वसाधारण सभेत आणण्याची गरज नाही. विषय क्र. १ सर्वानमुते मंजुर करण्यात येतो.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गौतम कॉलनी न्यायनगर येथील श्री. सांडु इंगळे यांना शस्त्रक्रियेसाठी नगरसेवक स्वेच्छानिधीतुन रक्कम रु. ५०,०००/- ची आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९७/२ :**

वार्ड क्र. ३९ मो. ज्युबली पार्क मध्ये मनपाच्या पंम्प हाऊसमध्ये रोड लगत मोकळी पडलेली मनपाच्या मोकळया जागेत मनपा तर्फे शॉपिंग सेंटर बांधण्यात यावे ज्यामुळे सुशिक्षित बेरोजगारांना हया ठिकाणी उदरनिर्वाह साठी दुकाने भाडयाने देता येईल व यामुळे बेरोजगारांना रोजगार ही मिळले. व मनपाच्या ही उत्पन्नात वाढ होईल. ज्युबली पार्कमध्ये शॉपिंग सेंटर बांधण्याच्या प्रस्ताव खर्चसह मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. सय्यद मुमताज अली, श्री. काशिनाथ कोकाटे
अनुमोदक : श्री. अ. रशिद
दिनांक : २-१-२००१

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्युबली पार्क येथील पम्प हाऊसमध्ये रोड लगतच्या मोकळया जागेत शॉपिंग सेंटर बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९८/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा चित्रपट आपल्या शाळेतील सर्वस विदयार्थ्यांना मनपातर्फे विनामुल्य दाखविण्यात यावे जेणे करुन विदयार्थ्यांमध्ये शिक्षणामुळे क्रांती घडु शकते हे विदयार्थ्यांना जाणीव होईल व डॉ. बाबासाहेबांचे विचार सर्व विदयार्थ्यांपर्यंत पोहचतील व एवढया संघर्षमय जीवनातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण घेवुन संपुर्ण जगाला एक वेगळा संदेश देवुन देशाकरिता घटना लिहिली अशा मतमानवाचा चित्रपट आपल्यातर्फे ठरववुन एक स्तुत्य उपक्रम राबवावा ही विनंती.

सुचक : श्री. राजु आर. शिंदे, श्री. मधुकर सावंत,
श्री. अंबादास दानवे, श्री. गणेश तांबे.
अनुमोदक : श्री. भगवान घडामोडे, श्री साहेबराव कावडे,
श्री. काशिनाथ कोकाटे.
दिनांक : ८-१-२००१

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका शाळेतील सर्व विदयार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा चित्रपट महानगरपालिकेतर्फे विनामुल्य दाखविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९९/४ :**

सद्य स्थितीत औरंगाबाद शहराला जायकवाडी धरणातुन पाणीपुरवठा होतो जायकवाडी पाणीपुरवठा योजना हा पुर्णपणे विजेवर चालणारी योजना आहे.

शहराला पाणीपुरवठा करण्यापोटी महानगरपालिकेस एकंदर वार्षीक २० ते २२ कोटी रुपये तोटा सहन करावा लागतो. महानगरपालिकेस विजेपायी प्राप्त होणारे मासिक देयक सुमारे २ कोटी म्हणजेच २४ कोटी वार्षिक देयेक होय. सध्या विज बिलाची थकबाकी १०२ कोटी असुन पुढील २-३ वर्षात ती १५० कोटी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही व

हा खर्च टाळणे अशक्यप्राय आहे या विजबिलाच्या वाढत जाणाऱ्या थकबाकी संदर्भात महाराष्ट्र शासनाकडुन दरवेळेस मदत मिळणेही दुरापस्त व अशक्य आहे.

विद्युतबील थकबाकीच्या जोखडातुन मुक्त होण्यासाठी व दिवसेंदिवस विकसित होत जाणाऱ्या शहराच्या पाणीपुरवठयाची तरतुद व वाढती मागणी पुर्ण करण्यासाठी. विजेचा खर्च वाचण्याच्या व कमीत कमी नगण्य विज लागणाऱ्या गुरुत्व पध्दतीने पाणी पुरवठा करु शकणाऱ्या नांदुर मधमेश्वर प्रकल्प पाणीपुरवठा योजनेचा किंवा तत्सम इतर गुरुत्व पध्दतीने पाणीपुरवठा करु शकणाऱ्या याजनेचा अभ्यास करण्यासाठी तज्ञ समिती नेमुन किंवा एखादया खाजगी कंपनी मार्फत (उदा. टाटा कन्सलटन्सी, जोग कन्सलटन्सी, बेनेट कोलमन कन्सलटन्सी) संपर्ण सर्व्हे करुन अहवाल प्राप्त करण्यासाठी त्वरित आर्थिक तरतुद करण्यात यावी व त्यासाठी रु. १०/- २०००-२००१ या आर्थिक वर्षात (टोकन ग्रॅन्ट) सांकेतिक अनुदान मंजुर करण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करत आहे.

सुचक : श्रीमती डॉ. आशा बिनवडे.
अनुमोदक : श्री. सुदाम सोनवणे, श्री. पांडुरंग तायडे पाटील,
सौ. संगिता मैंद.
दिनांक : १०-१-२००१

चर्चा :

श्री. अंबादास दानवे : पाणी पुरवठा संदर्भात प्रस्ताव मांडलेला असुन ठराव मंजुर करण्यास हरकत नसावी परंतु मधमेश्वर प्रकल्पाप्रमाणे अन्य समान हा प्रस्ताव ठेवलेला आहे. नांदुर मधमेश्वर प्रकल्पातील संपुर्ण पाणी हे सिंचनासाठी वापरण्यात येणार आहे. शहरासाठी लागणारे पाणी जेवढे महत्त्वाचे वाटते. तेवढेच शेतीसाठी पाणी असणे महत्त्वाचे वाटते. म्हणुन नांदुर मधमेश्वर प्रकल्पाऐवजी अन्य प्रकल्पातुन पाणी घेण्याचा शोध घ्यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता जायकवाडी धरणातुन पाणी पुरवठा होतो. व भविष्यात आजही जर ४ ते ५ तास विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास निश्चितपणे काही वार्डात जनतेस पाणीपुरवठा करता येत नाही. यापुर्वीही पर्यायी व कमी खर्चाने पाणीपुरवठा होण्याबाबतची चर्चा झालेली आहे. सध्या जायकवाडी धरणातुन जवळपास ६५ कि.मी. अंतरावरुन ३ ठिकाणाहुन पाणी पंपीग करुन शहरात आणावे लागते व त्यामुळे विदयुत देयक जास्त प्रमाणात येते व ते कमी करण्यासाठी पाणी पुरवठयाचे स्त्रोत, साठा तयार करता येईलम्हणुन चर्चा झालेली आहे. त्यानुसार सर्व्हे देखील झालेला असुन हर्सुल तलावाची उंची वाढविण्याचा पत्र व्यवहार सुध्दा संबंधित विभागाशी झालेला आहे. शहराच्या लगतच एम.आय.डी.सी. चिकलठाणा येथे अनेक कारखाने बंद पडलेले असुन त्या कारखान्यास देण्यात येणारे पाणी निश्चित साठवुन असेल ते पाणी तेथे होणाऱ्या पाईलाईन मार्फत घेतले तर कारखान्यास ज्या दराने पाणी दिले जात असे त्यापेक्षा जनतेस पाणीपुरवठा करण्याचा दर फारच जास्त असुन कारखान्याचे पाणी जनतेच्या वापरासाठी दिल्यास फायदयाचेच आहे. नांदुर मधमेश्वर प्रकल्पाच्या माध्यमातुन शहरास माध्यमातुन शहरास पाणीपुरवठा होण्यासाठी अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न स. सदस्यांनी मांडलेला आहे परंतु ज्यावेळेस शहरातील नागरिकांना सुविधा दयावयाच्या त्यावेळेस इतर जनतेवर अन्याय होणार नाही हे बघावे. कारण या प्रकल्पासाठी गंगापुर/वैजापुर येथील शेतकरी

जनता गेल्या २५ वर्षापासुन भांडत आहे. अंदोलने करत आहे. आता त्यांना पाणी मिळेल अशी शाश्वती झालेली आहे. प्रस्ताव टाकतांना सर्वाचे हित लक्षात घेता एवढेच नव्हे तर सुखनातील पाणी एम.आय.डी.सी. ना देण्यात येत होते परंतु शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता पाईपलाईन असतांना सुध्दा शहरास पाणी घेतलेले नाही. नांदुर मधमेश्वर प्रकल्पातुन गंगापुर/वैजापुर शेतकरी जनतेस पाणी पक्त शेतीसाठी मिळणार आहे. पिण्याच्या पाण्याच्या हितासाठी तो कालवा नव्हे. तांत्रिकदृष्ट्या पाहिजे असतांना या प्रकल्पातुन शहरास १२ महिने पाणीपुरवठा होईल काय याची खात्री नाही. म्हणुन तेथील जनतेचे हित पाहता दुसऱ्या जनतेवर उपासमाराची वेळ येणार नाही याचा विचार होणे आवश्यक आहे. याचा विचार करता नांदुर मधमेश्वर प्रकल्पातुन पाणी न घेता जायकवाडीतुनच ४५ एम.एल.डी.पाणी शहरासाठी आणु शकतो या दृष्टीकोनातुन प्रशासनाने कार्यवाही करावी. व प्रस्ताव रद्द करावा व दुसरा पर्यायी मार्ग शोधावा.

श्रीमती डॉ. आशा बिनवडे : प्रस्तावावर ज्या स. सभासदांनी आपले विचार मांडले त्याचा मी आदर करते. वैजापुरच्या शेतकऱ्यांना जे पाणी जाते ते काढुन घ्यावे असा प्रस्ताव मुळीच नाही. प्रस्तावाचा मुळ उद्देश लक्षात घ्यावा या प्रस्तवावाव्दारे मी फक्त सर्व्हे करा असे म्हटले आहे. शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याऐवजी पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यात यावे असे शासनाचे धोरण आहे.

श्री. जयवंत ओक : प्रस्ताव चांगला आहे त्याबद्दल अभिनंदन वैजापुरच्या आमदारांनी शासनाशी भांडुन फक्त जनतेसाठी हे धरण बांधुन घेतले आहे. शेतकऱ्यांना पाणी मिळाले पाहिजे. पण जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी झालेले महाराष्ट्रातील हे पहिले धरण आहे. आपल्या शहरालाही पाणी पुरवठा कसा होईल याचा आपण विचार केला पाहिजे. या प्रस्तावा बरोबरच या शहराला पाणी पुरवठा करणारी मालिकंबर नहरबाबतही काय पतित्रा घेणार याचा विचार झाला पाहिजे. मागिल सभेत हा प्रश्न उपस्थित केला होता. यासाठी केंद्र सरकार राज्य सरकारकडुन काही आर्थिक अनुदान मिळु शकते का हे ही पाहिले पाहिजे. मलिकंबर नहरचे नामोनिशान नष्ट होत आहे. या बरोबर खुलताबादकडे असलेल्या धरणातुन शहराला पाणी मिळेल का याचाही विचार केला पाहिजे याच बरोबर वैजापुर धरणातुन पाणी मिळेल का हेही पाहावे.

श्री. स.अली मिरा सलामी : शहरासाठी लागणारे पाणी कमी खर्चात कसे मिळेल यासाठी यापुर्वी ही सर्व्हे करण्यात आला आहे. त्यासाठी पांच लाख रुपये खर्च झाला आहे. या सर्व्हेबाबत काय कार्यवाही झाली याचा विचार करावा. हा सर्व्हे माझ्या माहितीप्रमाणे नेटवर्क कन्स्ल्टीमार्फत झाला आहे. याबाबत येथील स्थानिक वृत्तपत्रात सविस्तर माहिती आली आहे. सर्व्हेसाठी खर्च झाला आहे त्यानंतर काय कार्यवाही झाली याची माहिती प्रशासनाकडुन घेण्यात यावी. याबाबत मी लेखी माहिती विचारली असता असा सर्व्हे झाला नसल्याची चुकीची माहिती मला देण्यात आली होती. पण हा सर्व्हे झाला आहे माझ्या मते स. सभासदांनी आताच सुचविल्याप्रमाणे हर्सुल तलावाच्या बाजुने फुलंब्री आणि त्या भागात आणखी एखादा तलाव उभा करता येईल का या दृष्टीने पाहाणी झाली आहे.

मा. महापौर : महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री यांनी वालमीमध्ये पाणी परिषद भरवली होती. त्यावेळी हा विषय मी मा. मुख्यमंत्री महोदयासमोर मांडला होता त्यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाचे चीफ इंजिनियर यांनी रिपोर्ट तयार करुन अहवाल सादर करावा अशा सुचना दिल्या होत्या सध्या शहराला होणाऱ्या पाणी पुरवठयासाठी दरमहा २ ते २.५० लक्ष रुपये विज बिल अदा कारावे लागते. यापुढे यात वाढ होत जाणार आहे. ही बाब विचारात घेता या शहराला ग्रॅव्हेटीने पाणी पुरवठा होत असेल तर तसा ठराव मंजुर करण्यास काही हरकत नाही जो सर्व्हे करण्यात आला त्या नुसार पंढपुरपर्यंत ग्रॅव्हेटीने पाणी येणार आहे. फक्त एक लिफ्ट करावी लागणार आहे. आज हा ठराव मंजुर केला म्हणजे लगेच पाईप लाईन टाकली जाणार असा नाही. तर नांदुर मधवेश्वर धरणात वरच्या धरणातील जादा पाणी सोडले तर या शहराला पाणी मिळु शकेल. या दृष्टीने सर्व्हे करण्यासाठी हा ठराव मंजुर करण्यात यावा कार्यकारी अभियंता यांनी महाराष्ट्र जीवन प्रधिकरणांकडे माहिति घेऊन सर्व्हे करण्यात आलेले सर्व्हे रिपोर्ट पुढील सभेचे वेळी सभागृहासमोर माडण्यात यावे.

श्री. स. अली मिरा सलामी : तोपर्यंत सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : सर्व्हे बाबत लोकमत काही लेख आले आहेत याबाबत कार्यकारी अभियंता यांच्याकडुन संपुर्ण खुलासा मागवुन घ्यावा. यात ब्राम्हणगांवहुन पाणी आणल्यास त्यासाठीही कमी खर्च लागेल यासाठी कोणत्या ठिकाणी कमी खर्चात कायम स्वरुपी पाणी मिळेल याबाबत कार्यकारी अभियंता यांचे मत घेण्यात यावे.

श्री. अंबादास दानवे : सुखणचा ही यात समावेश करावा.

मा. महापौर : कार्यकारी अभियंता यांनी महाराष्ट्र जविन प्रधिकरण यांचेकडील सर्व्हे अहवालाची माहिती घेऊन याबाबत पुन्हा ठराव ठेवावा.

**ठराव :**

सर्वानमुते असे ठरले की, वालमी येथील बैठकीतील चर्चेनुसार महाराष्ट्र जविन प्राधिकरण मंडळातर्फे करण्यात झालेला सर्वेबाबत कार्यकारी अभियंता पा.पु. महानगरपालिका औरंगाबाद यांनी माहिती घेऊन सविस्तर प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावा.

**विषय क्र. २००/५** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वार्डात या बारुदगरनाला येथे बी.एम.सी. बॅकेच्या पाटीमागे भागात सध्या मोकळा पडलेला नाला वर मनपातर्फे शॉपिंग सेन्टर बांधुन त्यावर मंगल कार्यालय व दवाखाना व लायबरीच्या वापराकरिता इमारती बांधण्यात यावे जेणे करुन वार्डातील या जागेशिवाय कोणती ही जागा नाही व वार्डातील सर्व नागरिकांना सोय सुविधाचा लाभ होऊन व सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळेल व मनपाच्या उत्पन्नात ही वाढ होईल.

करिता प्रस्ताव मो. बारुदगरनाला येथील नाल्यावर शॉपिंग सेंटर मंगल कार्यालय, लायब्ररी इमारत बांधण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ. निखत परवीन ईजाज अली
श्रीमती शाहीन जफर महमुद जफर.

अनुमोदक : श्री. गाजी सादोद्यीन, श्री. काशिनाथ कोकाटे,

श्री सय्यद अली मिरा सलामी.
दिनांक : ११-१.२००१

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बारुदगर नाला येथील बी एमसी. बॅकेच्या मागील मोकळया जागेत नाल्यावर महापालिकेतर्फे शॉपिंग सेंटर बांधुन त्यावर मंगल कार्यालय, दवाखाना व वाचनालयाची इमारत बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधाधिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२०१/६** :

औरंगाबाद महानगरपालिका विकास योजने अंतर्गत डॉ. बाबासाहेत आंबेडकर विद्यापीठ मकाई गेट पर्यंत हा रस्ता (१००) फुट डि.पी. रोड मध्ये आहे. सदरील रस्त्यामध्ये हनुमान मंदिर व मस्जीद असल्यामुळे या रोडवर कोणत्याही नागरिकांना किंवा अर्जदारांना इमारत बांधण्यासाठी बांधकाम परवानगी देण्यात येऊ नये. कारण सध्या या रोड लगतची मोकळी जागा आहे त्यांना रोडमध्ये बांधीत किंवा रोड विकसित करत्या वेळेस मोबादल्याची रक्कम बांधकामाच्या नुसार त्यांना दयावी लागेल व मनपास जास्तीचे आर्थिक नुकसान होईल व करिता सदरील रोडवर कोणालाही बांधकामाची परवानगी देण्यात येऊ नये. व सदरील रोड तात्काळ विकसीत करण्यात यावे कारण हा रोड औरंगाबाद मध्ये ऐतिहासीक स्थळ म्हणजे मुकबरा. पानचक्की, ओरंगाबाद लेणी इत्यादी ठिकाणी जाणारा रोड असुन या रोडवरुन देशातील व विदेशातील पर्यटक येतात.

तरी सदरील रोडवर कसल्याही प्रकारचे बांधकाम परवानगी देण्यात येऊ नये व तात्काळ विकसित करण्यात यावे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अफसरखॉन
अनुमोदक : श्री. शे. मुनाफ शे. यासीन

संवाद
श्रीमती साजेदा बेगम : सुचक नाहीत प्रस्ताव रद्द करावा
मा. महापौर : प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**ठराव** :

सर्वानुमते असे ठरले की, सदर प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**विषय क्र. २०२/७** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मीख अरविंद मा. जोशी हे कॅन्सरने त्रस्त असुन उपचारार्थ त्यांना आर्थिक मदतीची गरज असुन नगरसवेक स्वेच्छानिधीमधुन रु. २५,०००/- (रु. पंचविस हजार फक्त) ची आर्थिक मदत करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : ॲड सौ. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
अनुमोदक : श्री अंबादास दानवे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. अरविंद मा. जोशी यांना कॅन्सरचे उपचारासाठी नगरसेवक स्वेच्छानिधीतुन रु. २५,०००/- आर्थिक मदत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०३/८** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. सुर्यभान साहेबराव दानवे, रा. हाडको यांना हाडाचा कॅन्सर आहे व त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्यामुळे सदरील व्याधीवर ते वैद्यकिय चिकीत्सा घेऊ शकत नाही. तरी श्री. सुर्यभान साहेबराव दानवे यांना उपचार करण्यासाठी रक्कम रु. २५,०००/- (अक्षरी रु. पंचविस हजार फक्त) नगरसेवक स्वेच्छानिधीमधुन आर्थिक मदत करणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. भाऊसाहेब ताठे
अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. संजय शिरसाठ

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. सुर्यभान साहेबराव दानवे यांना हाडाच्या कॅन्सरवर उपचार करुन घेण्यासाठी नगरसेवक स्वेच्छानिधीतुन रु. २५,०००/- आर्थिक मदत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०४/९** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामानाने औरंगाबाद शहरातील कब्रस्थानची जागा अपुरी पडत आहे. शहरातील पंचकुवा चिताखाना आणि इतर मोठया कब्रस्थानात देखील दफनविधी करण्यासाठी जाग शिल्लक राहिलेली नाही. करिता औरंगाबाद महानगरपालिका श्रेत्रात कब्रस्थानासाठी जागा संपादीत करण्यात यावी. प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक : श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दीन
अनुमोदक : श्री. ठकुजी रामसिंग वाणी. श्री. अशरफ मोतीवाला.

संवाद

श्री. जयवंत ओक : शहरातील कब्रस्थानच्या जागा या वक्फ बोर्डाच्या आहेत. वक्फ बोर्डाने या जागा महानगरपालिकेस हस्तांतर करुन देणे आवश्यक आहे. कब्रस्थानाना सर्वसुविधा द्या. त्या कोणाचाही विरोध नाही. या सुविधा देण्यापुर्वी कब्रस्थानाच्या जागा महानगरपालिकेकडे हस्तांतर करुन घ्या.

मा. महापौर : प्रस्ताव ९ असा आहे की, शहरातील कब्रस्थानासाठी जागा अपुरी पडत आहे तर जी काय जागा शिल्लक असेल त्याची यादी द्यावी आणि ज्या कब्रस्थानात अतिक्रमण झाले असेल ते प्रशासनाने काढुन टाकावे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील कब्रस्थानाची जागा अपुरी पडत आहे. पंचकुआ, चिताखान आणि इतर मोठया कब्रस्थानात दफनविधी करण्यासाठी जागा शिल्लक

नाही. करिता महापालिका क्षेत्रात कब्रस्थानासाठी जागा संपादीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०५/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतील काही स्लम भागामध्ये महानगरपालिकाची खुली जागा किंवा इमारत नसल्याने तेथील नागरिकांना दवाखाने, वाचनाले, अभ्यासिका, शिवण प्रशिक्षण केंद्र बालवाडी किंवा इतर सुविधा पासुन वंचित राहावे लागत आहे. महानगरपालिकाचे संबंधीत विभाग महानगरपालिकाची जागा नसल्याने सुविधा देता येत नसल्याने कारण सांगतात परंतु महानगरपालिकाची जागा किंवा इमारत नसलेल्या ठिकाणी महानगरपालिकेने संबंधीत स्लमच्या विकासाच्या दृष्टीने आणि नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने अधिसुचित झोपडपट्टयामध्ये (महानगरपालिकाची जागा नसलेली झोपडपट्टी) भाडयाने इमारत घेऊन सुविधा पुरवावी.

करिता सर्वधारण सभेत प्रस्ताव सादर.

सुचक : श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दीन

अनुमोदक : श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. ठकुजी रामसिंग वाणी.

संवाद

मा. महापौर : शहरामध्ये काही दवाखाने बांधुन गेल्या दोन वर्षापासुन त्या दवाखान्याचे उद्‌घाटन होत नाही. काही वाचनालयाच्या इमारती बांधुन कुलुप लावले आहे. ४०-५० लाख रुपये खर्च करुन भारतमाता मंदिर बांधण्यात आले तेथे ही काहीच नाही. तेव्हा एखादी वास्तु बांधल्यानंतर सर्व सुविधा पुरवुन ती वास्तु कार्यन्वीत करणार आहेत का त्या ठिकाणी आवश्यक सुविधा देऊ शकतो. का याचा प्रशासनाने विचार करावा. तेंव्हा दवाखाने अभ्यासिका, शिवण केंद्र, वाचनालय किती बांधुन तयार आहेत त्या ठिकाणी आवश्यक कर्मचारी वर्ग आहे का दवाखान्यासाठी लागणारे साहित्य उपलब्ध करुन दिले आहे का या पैकी चालु किती बंद किती याबाबतचा सर्व माहिती पुढील सभेत देण्यात यावी.

श्री. स.अली मिरा सलामी : शहरात एकुण शॉपिंग सेंटर किती भाडयाने दिली आहेत, त्यापैकी किती दुकाने आहेत. त्या पासुन किती उत्पन्न मिळते.

मा. महापौर : काही शॉपिंग सेंटर मध्ये ५-५ हजार रुपये भरुन घेतले आहे पण डिपॉझीट भरलेले नाही अशी मालमत्ता किती याची नोंद देण्यात यावी.

श्री. शेख ईसाक : या प्रस्तावाव्दारे काही स्लम भागात वाचनालय, दवाखाने, अभ्यासिकासाठी भाडयाने जागा घेऊन सुविधा पुरविण्याची मागणी केलेली आहे. यापुर्वी प्रशासनाला पत्राव्दारे माहिती विचारली असता जागा बघा भाडे देणार नाही अशी माहिती मिळाली म्हणुन हा प्रस्ताव सभागृहापुढे मांडला आहे. म्हणुन हा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

मा. महापौर : विषय क्र. १० सर्व सुविधा सह (स्टाफ, फर्निचर,साहित्य यासह) मंजुर करण्यात येतो.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतील काही स्लम भागात खुली जागा किंवा इमारत नसल्याने अशा ठिकाणी दवाखाने, वाचनालय, अभ्यासिका, शिवण प्रशिक्षण केंद्र, बालवाडी इ. सुविधासाठी जागा भाडयाने घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग, फर्निचर, साहित्य इत्यादीसाठी ही सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०६/११** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील नगरनाका चौक ते मीटमिटा वार्ड क्र. १ येथील मुंबई नाका पर्यंत मुंबई महामार्गावरही पथदिवे बसण्यात यावे. कारण सदर रोड वरती जड वाहतुक असल्यामुळे व महामार्ग असल्यामुळे वाहनाची या रोडवरती सतत वर्दळ असल्यामुळे आणि रोड लगत वस्ती असल्यामुळे (पडेगांव, सैनिक कॉलनी, मीरानगर, रामगोपालनगर, मीटमिटा) येथील नागरिकांना रहदारीचा त्रास आहे व रात्री अंधार असल्यामुळे अपघात होतात. तरी नगरनाका चौक ते मीटमिटा वार्ड क्र. १ येथील मुंबई नाक्या पर्यंत पथदिवे लावण्यात यावेत. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. वाणी ठकुजी रामसिंग
अनुमोदक : श्री. मीर हिदायत अली, श्री. काशिनाथ कोकाटे,
श्री. तकीहसनखान, श्री. अशरफ मोतीवाला.
दिनांक : ६-१-२००१

संवाद

मा. महापौर : या प्रस्तावाबाबत प्रशासनाकडुन मत मागविण्यात आले असता सदर रस्ता हा सार्वजनिक बांधकामा विभागाच्या ताब्यात असल्याने सुविधा करता येत नाही असा खुलासा आला आहे.

श्री. जयवंत ओक : स सभासदांनी अपघात होऊ नये. म्हणुन प्रस्ताव ठेवला आहे. शहर सौदर्यकरणाच्या दृष्टीने अंडर ग्राऊंड लाईन टाकुन आपण व्यवस्था करुन शकतो. व्ही.आय.पी. रोड आहे.

मा. महापौर : सर्व सदस्यांच्या भावना विचारात घेऊन हा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगरनाका ते मिटमिटा वार्ड क्र. १ येथील मुंबई नाक्यापर्यंत जड वाहानाची सतत वर्दळ असल्याने रोड लगतच्या वस्त्यातील नागरिकांना रहदारीचा त्रास होत असुन अपघात होत असल्याने नगरनाका ते मिटमिटा येथील मुंबई नाक्यापर्यंत पथदिवे लावण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# ऐनवेळचे विषय

**विषय क्र. २०७/१** :

प्रस्ताव सादर करण्या ात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने दिनांक २७-१-२००१ रोजी महाराष्ट्र महापौर परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदरील परिषदेचे उद्घाटन मा ना श्री. विलासरावजी देशमुख, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शुभहस्ते करण्यात येणार आहे. तद्नुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदय यांना मानपत्र देऊन सत्कार करण्यात यावे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. काशिनाथ हरिभाऊ कोकाटे
अनुमोदक : श्री. अंबादास दानवे

संवाद

श्री. जयवंत ओक : येत्या २७ तारखेला पत्रकार भवनाचे उद्घाटन आहे. मा. मुख्यमंत्री या पत्रकार भवनाचे उद्घाटन करणार आहेत. तेव्हा पत्रकारांना बांधकाम परवानगी देण्यात यावी.

मा. महापौर : पत्रकार भवनाला जागा देण्याबाबत प्रशासकिय ठराव मंजुर झाला आहे या ठरावानुसार प्रति चौ. मिटर रु. १५५/- दराने जागा देण्यास मंजुरी मिळाली आहे. पण रु. १५५/- प्रति चौ. मिटर याप्रमाणे रक्कम देणे शक्य नाही. त्याऐवजी प्रति चौ. मिटर रु. २५/- या दराने जागा देण्यात यावी अशी मागणी पत्रकारांनी केली आहे. तेव्हा आता किती दराने जागा द्यावी हा खरा प्रश्न आहे.

श्री. सुदाम सोनवणे : प्रशाकिय ठराव मंजुर झाल्यानंतर पत्रकारांच्या जागा देण्यात यावी असा ठरावही आम्ही मंजुर केलेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्याची मंजुरी द्यावी.

श्री. कोकाटे काशिनाथ : स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे रु. २५ प्रति चौ.मी. प्रमाणे जागा देण्याचा ठराव मंजुर झाल्या आहे. फक्त त्या ठरावाची अंमलबजावणी होणे बाकी आहे. या शिवाय महापौर परिषदेच्या निमित्ताने या राज्याचे मा. मुख्यमंत्री आपल्या महापालिकेस येत आहेत तेव्हा महापालिकेतर्फे मानपत्र व स्मृतीचिन्ह देऊन मा. मुख्यमंत्री महोदय याचा सत्कार करण्यात यावा. अशी मी सुचना करतो.

श्री. तकी हसनखान : पत्रकार भवनाच्या जागेबाबत सभागृहात चर्चा चालु आहे. तेव्हा शासनांचा रेडी रेकनर तोडुन आपणाला ही कार्यवाही करता येईल का याचाही या ठिकाणी विचार करावा. यासाठी तज्ञांचा सल्ला घेण्यात यावा.

श्री. जयवंत ओक सभा संपल्या नंतर पत्रकार संघाचे अध्यक्षृ मा. महापौर, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता, मा. आयुक्त यांनी एकत्र बसुन याबाबत विचार करावा. व निर्णय घेण्यात यावा.

श्री. माणिक साळवे : महापालिकेतर्फे यापुर्वी अनेक सेवाभावी संस्थांना नामपत्र थाडयाने महापालिकेच्या जागा देण्यात आल्या आहेत. याचा विचार करता पत्रकार भवनासाठी प्रति चौ. मीटर रु. २५/- याप्रमाणे जागा देण्यात यावी.

श्री. नंदकुमार फुलारी : पत्रकार भवनासाठी विनामुल्य जागा देण्यात यावी.

श्री. दानवे अंबादास : पत्रकार भवनाला जागा देण्याचा निर्णय माजी महापौर श्री. सुदाम सोनवणे यांच्या काळात घेण्यात आला होता. परंतु त्या ठरावाचा अंमलबजावणी झालेली नाही. सभागृहाने पत्रकार भवनासाठी ताबडतोब जागा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी केली आहे. पत्रकार भवनाच्या भुमिपुजनासाठी मा. मुख्यमंत्री याची तारिख ही निश्चित झालेली आहे. पत्रकार संस्था ही काही व्यावसायिक संस्था नसुन लोकशाहीतील चौथा स्तंभ म्हणुन वृत्तपत्रकार यांचेकडे बघीतले जाते. लोकशाही मजबुत करण्याची प्रणाली करतात. या पत्रकार संस्थेस कमी दरात जागा उपलब्ध करुन देण्याचा ठराव या सभागृहाने घेतला आहे. यात काही तांत्रिक अडचणी असल्यातरी निर्णय होणे आवश्यक आहे. तेंव्हा अशी विनंती की सर्वांना विश्वासात घेऊन पत्रकार भवनासाठी जागा देण्याबाबत ताबडतोब म्हणजे जास्त वेळ न लावला निर्णय घेऊन पत्रकारास जागा हस्तांतर केली पाहिजे. पत्रकार भवनाचे उद्घाटन आणि महाराष्ट्र महापौर परिषदेचे उद्घाटन मा. मुख्यमंत्र्याचे हस्ते होणार असून त्यावेळी आपल्या सर्व मागण्या मान्य कराव्यात अशी मा. मुख्यमंत्री यांना विनंती करुन महापालिकेतर्फे मा. मुख्यमंत्री यांचा मानपत्र देऊन सत्कार करण्यात यावा अशी विनंती करतो विरोधी पक्षनेता यांच्या तर्फे ठेवण्यात आलेल्या प्रस्तावास मी पुर्णपणे अनुमोदन देतो.

श्री. तकी हसनखान : मा. महापौर मा. विरोधीपक्षनेता, मा. सभागृहनेता, आणि प्रतिनिधी यांनी एकत्र समिती, उद्यापर्यंत निर्णय घ्यावा. त्यास सभागृह आपणास पुर्ण सहकार्य देत आहे.

मा. महापौर : सभागृहाने सुचविल्याप्रमाणे सर्व पदाधिकारी, मा. आयुक्त, पत्रकाराचे पदाधिकारी उद्या सकाळी ११.०० वाजता एकत्र बसुन जागेबद्दल त्यांना पत्र देण्यात येईल. या शिवाय महापालिका झाल्यानंतर महापालिकेच्या कम्पसमध्ये येणारे मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख हे मराठवाडयाचे भुमिपुत्र असुन या महापालिकेत प्रथमच येत आहेत. त्या दृष्टीने मा. मुख्यमंत्री महोदय यांचा मानपत्र देऊन सत्कार करण्यास याठिकाणी मंजुरी देण्यात येत आहे. प्रशासनाने त्यादृष्टीने तयारी करावी.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे आयोजित महाराष्ट्र महापौर परिषदेच्या निमित्ताने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि मराठवाडयाचे भुमिपुत्र मा. श्री. विलासरावजी देशमुख हे या महापालिकेस प्रथमच भेट देत असल्याने औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे मा. विलासरावजी देशमुख यांचा मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा

श्री. निखत परवीन जैदी : महिला बाल कल्याण समिती, प्रभाग समिती बाबत अंमलबजावणी केव्हा करण्यात येणार.

मा. महापौर : महिला बाल कल्याण समिती व प्रभाग समितीच्या निवडणुका लवकरच घेण्यात येतील. त्यासाठी प्रशासनाने तयारी करावी.

श्री. जयवंत ओक : विद्यापीठ, मार्केट कमिटी अशा तिन्ही कमिटयावर महापालिकेचा एक-एक प्रतिनिधी असतो. याबाबत ही निवडणुका घ्यावयास पाहिजे.

मा. महापौर : विद्यापीठाचे नियम बनलले आहेत. नागेश्वरवाडी वार्डात निकाल येईल त्यावेळी किंवा उच्च न्यायालयाचा निकाल लागल्यानंतर उपमहापौर पदाची निवडणुक घेण्यात येईल. ज्या शिवाय घेता येत नाही. याबाबत निवडणुक आयोगाकडे तीन पत्र पाठविण्यात आले आहेत.

श्री. स.अली मिरा सलामी : उच्च न्यालयाकडुन तसे काही आदेश आपणाला आले आहेत का.

मा. महापौर : तशा सुचना नसल्या तरी महाराष्ट्र शासन व निवडणुक आयोग यांना पत्र दिलेले आहे आणि त्याबाबत काहीही उत्तर प्राप्त झाले नाही. हा कायदेशीर प्रश्न असल्यामुळे निवडणुक घेता येत नाही. उद्या पुन्हा याबाबत पत्र दिले जाईल.

श्री. अब्दुल कादीर मौलाना : हे आपल्या अधिकारात आहे काय उत्तर आल्यानंतर करणार आणि ते आपणास बंधनकार आहे का.

मा. महापौर : अधिकार महापौरांचा असला तरी नागेश्वरवाडी वार्डाची निवडणुक झाली असुन एखादे वेळेस माजी उपमहापौर श्री. वसंतराव नरवडे यांच्या बाजुने निकाल लागला तर नगरसेवकही तेच राहतील आणि उपमहापौर ही तेच राहतील. हा कायदेशीर प्रश्न असल्याने उच्च न्यायालयाचे वकील यांचे मत घेतले जाईल. त्यानंतर निर्णय घेतला जाईल.

श्री. कदीर मौलाना : मी विचारलेल्या प्रश्नाचे हे उत्तर नाही. माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे ते आपल्यावर बंधनकारक आहे की, ते अधिकार नागेश्वरवाडी निवडणुक कशी घेतली.

मा. महापौर : मला बंधनकारक वाटतय म्हणुन घेत नाही. निवडणुक आयोगाने सांगितल्याप्रमाणे नागेश्वरवाडीची निवडणुक घेण्यात आली आहे. यासाठी सभागृहात नियम वाचुन दाखवित आहेत.

श्री. अंबादास दानवे : मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम १९४९ चे कलम १९(५) अन्यवे महापौर, उपमहापौर निवडणुकीबाबत मार्गदर्शन केलेले आहे. (नियम वाचुन दाखवतात) या बाबत आपण निर्णय घ्यावा याशिवाय आपली स्थानिक स्वराज्य संस्था असतांना आपण अशाप्रकारे बंधन लाडॅन घेऊ नयेत. स्थायी समितीच्या निवडणुकीचे वेळी उच्च न्यायालयाचे निकाल दिला होता त्यावेळी आपण विधी सल्लागार यांचे मत घेतले होते. निवडणुक आयोगाचे कोठेही मत घेतले. नव्हते मग उपमहापौरांचे वेळीच आवश्यकता का भासली.

मा. महापौर : उपमहापौरांची निवडणुक घेण्यात अथवा न घेण्यात माझा कोणताही हेतु नाही. कायदेशीर मत घेणे गरजेचे आहे. त्यानंतर निवडणुक घेतली जाईल. (यावेळी अनेक स. नगरसेवक एकाच वेळी बोलतात त्यामुळे काही ही एकु येत नाही.)

श्री. फुलारी नंदकुमार : उपमहापौरांची निवडणुक उद्या लावली तरी ज्या ज्या नगरसेवकांचे जातीप्रमाणपत्र तपासणी न्यालयात चालु आहे त्यांना मतदानाचा अधिकार आहे का याचा खुलासा करावा.

मा. महापौर : उपमहापौर निवडणुकीबाबत महापालिकेच्या पॅनलवर असलेल्या विधी सल्लागाराचे मत घेण्यात येईल (अनेक स. नगरसेवक एकाच वेळी बोलतात काही ही ऐकु येत नाही.)

मा. महापौर : उपमहापौर निवडणुकीबाबत कायदेशीर मत घेण्यात येईल आणि उद्या निवडणुक आयोगाला फॅक्स करण्यात येईल. फॅक्सचे उत्तर आल्यानंतर आठ दिवसात निवडणुक घेण्यात येईल.

## *ऐन वेळचे विषय*

**विषय क्र. २०८/१** :

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा येथे शाळा बांधणे व शाळेलगत समोरील भागात दुकाने बांधणे या करिता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन ९९-२००० च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ४९,८९,०००/- लाखाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ११-१-२००० अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च विकास इमारती शाळा दवाखाने या लेखाशिर्षा अंतर्गत शासकीय अनुदान सन २०००-२००१ मधुन करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४९,८९,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा येथे शाळा बांधण्यासाठी व शाळेलगत समोरील भागात दुकाने बांधण्यासाठी रक्कम रु. ४९,८९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०९/२** :

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पैठणगेट बाहेरील सा. शौचालय तोडुन शाळा बांधणस्तव बाधकाम विभागाचे सन ९८-९९ च्या दरसुची नुसार रक्कम रु. २१,१८,३८२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. ११-१-२००१ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च विकास इमारती शाळा दवाखाने लेखाशिर्षा अंतर्गत शासकिय अनुदान २०००-२००१ मधुन करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. २१,१८,३८२/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २०९/२** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणगेट बाहेरील सार्वजनिक शौचालय तोडुन शाळा बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु. २१,१८,३८२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१०/३** :

ओखार्ड कंपनीपासुन नारेगाव व ब्रिजवाडी या भागास पाणीपुरवठा करण्यासाठी २०० मी मी व्यासाची सि.आय. जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

संध्या नारेगांव व ब्रिजवाडी या भागाला अस्तित्वात असलेल्या १०० मी मी व्यासाच्या जलवहिनीव्दारे पाणीपुरवठा करण्यात येतो. परंतु जलवाहिनी कमी व्यासाची असल्याने टाकी भरण्यासाठी आणि पाणीपुरवठा करण्यासाठी जास्त वेळ लागत असल्याने २०० मी मी व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकण्याचे प्रस्तावित केलेले आहे. सदरील जलवाहिनी ही रायजिंग मेनु राहणार आहे.

संकल्पने नुसार नारेगांव व ब्रिजवाडी या दोन्ही परिसराची सन २०१६ ची लोकसंख्या १५००० येते, या लोकसंख्येस या मुख्य जलवाहीनीव्दारे पाणीपुरवठा करता येऊ शकेल. सदरील भागातील टाकी लवकर भरण्यासाठी व पाणीपुरवठा लवकर करण्यासाठी २०० मी मी व्यासाची सि.आय. जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये २४,७९,६७५/- चे तयार करण्यात आले असुन सदर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या १९९९-२००० च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामावर होणारा खर्च भांडवली कामे पाणीपुरवठा शा. अ. दहावा वित्त कार्यक्रम सन २०००-२००१ या तरतुदीमधुन करण्यात येणार आहे.

अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे तरी ओखार्ड कंपनी ते नारेगांव ब्रिजवाडी पर्यंत २०० मी मी व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २४,७९,६७५/- चा मंजुरी बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ओखार्ड ते नारेगांव ब्रिजवाडी पर्यंत २०० मी मी व्यासाची सि. आय. जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रु. २४,७९,६७५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २११/४** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,सकीर्ण -१०/२०००/११६२/प्र.क्र.२७८/नवि-२७ दि.८ डिसेंबर २००० अन्वये नगरपरिषद/महानगरपालि-कांनी महिला संदर्भात करावयाच्या कार्यवाही बाबत सुचना दिलेल्या आहेत.

त्यात ३०% जागा महिलांसाठी आरक्षीत करण्याबाबत सर्व महानगरपालिकाने सेवा प्रवेशाच्या नियमामध्ये दुरुस्ती करावी व त्याला शासनाची मान्यता घ्यावी असे सुचित केले.

औरंगाबाद महानगरपालिकेने सेवा भरती नियम तयार केलेले आहेत. त्यास शासनाने शासन निर्णय क्र. ए एम सी-१६९३/१२१९/प्र.क्र.९७/नवि-२४ दि. १६ मे १९९४ अन्वये मान्यता दिलेली आहे ते दि. ९-६-१९९४ पासुन अंमलात आलेले आहेत.

त्यात ३०% जागा महिलांसाठी आरक्षीत सदर नियम तयार करतेवेळी सेवा भरती नियमात ३०% जागा महिलासाठी आरक्षीत करणेबाबत तरतुद करण्यात आलेली नव्हती.

करिता महिलासाठी वर्ग-१ ते वर्ग-४ या संवर्गात प्रवर्गनिहाय ३०% आरक्षण महानगरपालिकेस लागु करणे बाबत व तसे सेवा भरती नियमात दुरुस्ती करणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

चर्चा

सौ. दाणे चंद्रभागाबाई : ३०% महिला आहेत त्यास आरक्षण आहे काय?

मा. आयुक्त : अतिशय जिव्हाळयाचा विषय आहे मध्यंतरी विधान मंडळाची महिला हक्क कल्याण समितीने या महापालिकेस भेट दिली आहे. वर्ग १ ते ४ यात मिळुन जरी महिलांचे ३०% जास्त प्रमाण असले तरी वर्गनिहाय म्हणजे वर्ग-१,२,३,४ यात ते प्रमाणे काही ठिकाणी ३०% आणि काही ठिकाणी ३०% पेक्षा जास्त आहे. १९९५ आणि दिनांक ८-१२-२००० रोजी शासनाने परिपत्रक काढले आहे यात १९९५ च्या परिपत्रकात शासनाचे स्पष्ट आदेश आहेत की, प्रवर्ग निहाय वर्ग-१,२,३,४ मध्ये प्रत्येक प्रवर्गात अनुक्रमे (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्ग) ३०% आरक्षण राहणार आहे. त्यामुळे प्रत्येक प्रवर्गात समानता राहिल. असे मिळुन एकुण ३०% आरक्षण राहिल. त्यामुळे शासनाच्या आदेशाची अंमल बजावणी राहिल आणि विधान मंडळाच्या महिला हक्क समितीने महापालिकेला दिलेली सुचना आणि महापालिकेने महिला आणि कल्याण समितीला दिलेले आश्वासन पुर्ण होईल. यानंतर नियमावलीची दुरुस्ती करावी लागेल.

मा. महापौर : हा विषय मंजुर करण्यात येतो.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासना परिपत्रक क्र.सकीर्ण - १०/२०००/११६२/प्र.क्र.२७८/नवि-२७ दि.८ डिसेंबर २००० अन्वये महिलासाठी ३०% जागा आरक्षीत करण्याबाबत सेवा प्रवेशाच्या नियमामध्ये दुरुस्ती करण्यात व त्यास शासनाची मान्यता घेण्याबाबत केलेल्या सुचनेप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवा भरती नियमात महिलासाठी वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३, वर्ग-४, या संवर्गात प्रवर्गानिहाय ३०% आरक्षण लागु करण्यास आणि सेवा भरती नियमात दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

चर्चा :

श्री. कोकाटे काशिनाथ : शासनाकडुन जे अनुदान महानगरपालिकेस मिळाले आहे त्यात कोणत्या कामाचा समावेश केला आहे याबाबत लेखाधिकारी यांचेकडुन माहिती मागविण्यात आली आहे. आज जे प्रस्ताव सभागृहापुढे आहेत ते शासकिय अनुदानातुन आहेत का कोणत्या अनुदानातुन आहेत याची माहिती मिळावी शासनाकडुन जे दहा कोटी रुपये अनुदान आले आहे त्यापैकी सात कोटी रुपये जालना रोडसाठी दिलेले आहेत.

मा. महापौर : शासकीय अनुदानातुन घेण्यात येणाऱ्या कामाची यादी सन्माननीय सभासदांना देण्यात यावी. तीन दिवसात यादी देण्यात यावी.

श्री काशिनाथ कोकाटे : सभागृहात सुचविल्याप्रमाणे यादी तयार आहेत ती झेरॉक्स करुन मिळेल पण यादीमध्ये ज्या कामाचा समावेश आहे त्यात आणखी काही कामाचा समावेश आहे काय याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : प्रशासनातर्फे एक प्रोव्हिजनल यादी तयार करण्याचे काम चालु आहे. त्यात प्रामुख्याने पाणी पुरवठा पाईप लाईन, पाण्याची टाकी अशा कामाचा समावेश आहे. बाकी कामाची यादी प्रशासनाकडे तयार आहे. लवकर यादी दिली जाईल.

**विषय क्र. २१२/५ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचेकडुन प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भारताची जनगणना -२००१ हया महत्वपुर्ण राष्ट्रीय कार्यास सुरुवात झालेली असुन पहिल्या घर यादीचे काम पुर्ण झालेले आहे.

प्रत्यक्ष जनगणना करण्याचे काम दि. ९ फेब्रुवारी २००१ ते २८ फेब्रुवारी २००१ हया कालावधीत करण्यात येत आहे. हया जनगणना कार्या संबंधात सर्व स्तरावरील जनतेस/समाजातील सर्व घटकांना माहिती व्हावी. जनगणना कार्याचा मुख्य उद्देश अपेक्षित माहिती त्याची उत्तरे देण्याची सर्व नागरिकाची जबाबदारी, त्यातील गोपनियता इ. बाबत ही अवगत करणे आवश्यक ठरत असल्याने हया संदर्भात व्यापक प्रचार मोहीम हाती घेणे संदर्भात जनगणना मुख्यालयाचे निर्देश आहेत. जनगणना कार्याची व्यापक प्रसार मोहिम करिता- १) सधारणतः प्रत्येक प्रभागात (४ या प्रमाणे बॅनर्स) - ४००

२) प्रमुख मार्ग/चौकामध्ये होर्डींग्ज - १०
३) पोस्टर्स, स्टिकर्स, बॅचेस इ. - किमान प्रमाणात
४) सिनेमा स्लाईडस - १५

या प्रमाणे साहित्य आवश्यक आहे. हयाकरिता तसेच विभागावर प्रसार फेऱ्या व एक प्रमुख प्रचार फेरी (रॅली) काढणे यासाठी अंदाजे खर्च रु. १,००,०००/- अपेक्षित आहे. हयासाठी जनगणना कार्यालयाकडुन वेगळा निधी उपलब्ध होणार नसल्याने असे प्रस्तावीत करण्यात येते की, सर्व स. सदस्यांचे स्वेच्छानिधीतुन प्रत्येकी किमान रु. २०००/- हया प्रचार कार्याकरिता उपलब्ध करुन द्यावेत.

प्रभागामध्ये लावण्यात यावयाचे कापडी फलक/ बॅनर्सवर त्या त्या प्रभागाचे स. सदस्यांचे सौजन्याने म्हणुन नमुद करण्यात येईल. सदर प्रचार मोहिमेमुळे प्रचार साहित्यामुळे जनगणना कार्यासंबंधात सर्वसतरीय जनतेस माहिती मिळाल्याने सदर काम योग्यरितीने व अचुकतेने पुर्ण करण्यास मदत होईल.

संवाद

मा. महापौर : नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतील हा प्रस्ताव प्रशासनातर्फे आला आहे जनगणना करण्यासाठी जो खर्च येत आहे त्यामध्ये प्रत्येक नगरसेवकाच्या स्वेच्छानिधी रु. २,०००/- खर्च करण्यात येणार आहे असा प्रस्ताव आहे हा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भारताची जनगणना या महत्वपुर्ण राष्ट्रिय कार्या बाबत सर्व स्तरातील नागरिकांना/समाजातील घटकांना जनगणना कार्याचा मुख्य उद्देश अपेक्षित माहिती, उत्तर देण्याची जबाबदारी, त्यातील गोपनियता इ. बाबत अवगत करणे. आवशयक ठरत असल्याने या व्यापक प्रचार मोहिमेकरिता

१) सधारणतः प्रत्येक प्रभागात (४ याप्रमाणे बॅनर्स) - ४००
२) प्रमुखमार्ग/चौकामध्ये होर्ल्डींग्ज - १०
३) पोस्टर्स, स्टिकर्स, बॅचेस इत्यादी - किमान प्रमाणात
४) सिनेमा स्लाईडस् - १५

आणि याशिवाय विभागावार प्रचार फेऱ्या एक प्रमुख फेरी (रॅली) काढणे या कामासाठी येणाऱ्या अंदाजे रु. १,००,०००/- अपेक्षित खर्चासाठी सर्व सन्माननीय नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन रु. २,०००/- याप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१३/६** :

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करित आहे की, छावणी हद्यीतील असलेल्या सर्व्हे न. २४,२५,२६ व २७ मधील अभिनंदन कॉलनी भुजबळ नगर, न्यु नंदनवन कॉलनी व अमन कॉलनी इत्यादी वस्तीतील भाग अनाधिकृतपणे विकसित झाला आहे. व पदमपाणी कॉलनी ही अधिकृत वसाहत आहे. सदर वसाहतीतील नागरिकांनी पक्क्या स्वरुपाची घरे बांधलेली आहे. आणि वस्तीच्या पुर्व बाजुस भारतीय सैन्य दलाची हद्द आहे. सदर हद्दीतुन १९९३-९४ मध्ये तत्कालीन महापौर मा. श्री. अशोक सायन्ना यादव यांनी सैन्य दलाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन अंदाजे २२८ मी. लांबीच्या रस्त्याचे खडीकरण मनपाच्या खर्चाने करुन दिले. तेव्हा भारतीय सैन्य दलाच्या अधिकाऱ्याने आपल्या हद्दीची कायम खुन रस्ता सोडुन तारकुंपन स्थलांतरीत केले.

वरील कॉलनी करिता जाणारा हा एकमेव पोच रस्ता आहे. व सदर रस्ता लष्कर खात्याने बंद केल्यास मुख्य रस्त्यावरील अनाधिकृत विकसित वसाहतीतील भुखंड धारकांना रस्ता नाही. तसेच दुसरा पर्यायी रस्ता देखील उपलब्ध नाही. करिता लोकहीताच्या दृष्टीने विचार करता सदरचा मुख्य पोच रस्ता भुसंपादन करुन महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करणे गरजेचे आहे. त्यानुसार मनपाने सदर जागेचा मोबदला लष्कर खात्याला देवुन रस्ता संपादित करणे बाबत बैठकीत चर्चा झाली आहे. त्यानुसार छावणी मंडळास महानगरपालिकेने पत्र देवुन सदर जागेचे मुल्यांकन किती होते. याबाबत माहिती मागविली असता त्यांनी पत्र क्र. ५११५/एन एन सी आर/क्यु दिनांक २७-४-९९ अन्वये कळविले की, सदरील जागेचे क्षेत्रफळ ४९३३.११ चौ.मी. असुन त्याचे मुल्यांकन रु. १४,७९,९३३/- इतके होत आहे.

दिनांक ४-६-९९ रोजी महानगरपालिका यांच्या दालनात छावणी स्टेशन कमांडर कार्यालयाचे ले कर्नल. श्री. डोग्रा मा. आयुक्त मा. उपआयुक्त -१ मा.स.स. नरवि यांची बैठक संपन्न झाली. त्यामध्ये श्री. डोग्रा यांनी सुचविले की, मुल्याकंनाची रक्कम लष्कर खात्यास पैशाच्या अथवा-चेकच्या स्वरुपात नको आहे. त्याऐवजी छावणी लगत एखादी महानगरपालिकेनी जागा द्यावी अथवा लष्करास किंवा रक्कमेच्या अधीन लष्करांच्या पाल्यांना किंवा माजी सैनिकांच्या पाल्यांना उपयुक्त असे बांधकाम (जसे संरक्षित भिंत तारकुंपन, दवाखाना, वस्तीगृह, शाळा इ.) पैकी एक बांधकाम करुन द्यावे व त्यास मा. आयुक्त महानगरपालिका यांनी संमती दर्शविली व तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मांडण्याचे सुचविले व लष्कर खात्यास वास्तु किंवा काम प्रस्तावित करण्याचे देखील सुचविले परंतु अद्याप त्यांच्या कडुन कोणतीही वास्त बद्दल प्रस्ताव आलेला नाही.

तरी श्री. डी.सी. डोग्रा यांचे पत्र दि. ४-५-२००० नुसार सदर प्रकरणी डिफेन्स इस्टेट पुणे यांचे प्रतिनिधी न्यु नंदनवन कॉलनीचे प्रतिनिधी व स्थानिक मिलीटरी अधिकारी यांचे प्रतिनिधी सोबत बैठक आयोजित करुन सदर प्रकरणात निर्णय घेण्याबाद्दल कळविले आहे. रक्कम रु. १४,७९,९३३/- लष्कर खात्यास रस्त्याच्या जागेच्या मोबदल्यात अदा करणे करिता किंवा लष्कर खात्याने प्रस्तावित केलेले काम उक्त रकमेच्या हद्दीपर्यंत महानगरपालिकेने विकसित करणे करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २१३/६** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्व्हे नं. २४,२५,२६ व २७ मधील अभिनंदन कॉलनी, भुजबळनगर, न्यु नंदनवन कॉलनी व बमन कॉलनी इत्यादी वसाहतीकरिता १९९३/९४ मध्ये सैन्य दलाचे हद्दीतुन २८८ मीटर लांबीचा खडी रस्ता लष्कर खात्याने बंद

केल्यास दुसरा पर्यायी रस्ता उपलब्ध होत नसल्याने लोकहिताच्या दृष्टीने सदरचा मुख्य पेच रस्ता भुसंपादन करुन महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यासाठी छावणी मांडळाकडील दिनांक १७-४-१९९९ च्या पत्रकान्वये ४९३३.११ चौ. मीटर क्षेत्रफळाच्या जागेचा मोबदला रक्कम रु. १४,७९,९३३/- लष्कर खात्यास आदा करणे करिता किंवा लष्कर खात्याने प्रस्तावित केलेले वरील रकमेच्या हद्दीपर्यंतचे काम महापालिकेने विकसीत करण्याकरिता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१४/७** :

आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरातील कमलनयन बजाज रुग्णालयात अॅन्ज्ञोग्रॉफी अॅन्जोप्लास्टी, कृत्रिम मुत्रपिंड प्रत्यारोपण, बायपास सर्जरी, सोनोग्राफी आदी रोगांचे उपचार वाजवी दरात करण्याचील सोय उपलब्ध असल्याचे उपचार दरपत्रकासह त्यांचे पत्र क्र. एमएम एन आय/९१५२/९९ दि. ५-२-९९ नुसार सादर करुन महानगरपालिका कर्मचाऱ्यांना या रुग्णालयात उपचार घेणेस मान्यता मिळावा अशी विनंती केली आहे.

औरंगाबाद महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना वैद्यकिय सेवेपोटी होणाऱ्या खर्चाच्या भरपाई संबंधात तयार केलेले विनियमात शहरातील कोणतेही खाजगी रुग्णालयास मनपाच्या कर्मचाऱ्यांना वैद्यकिय उपचार देणे बाबत मनपाने यापुर्वी मान्यता दिली नाही. तरी कमलनयन बजाज या रुग्णालयास वरील उपचारासाठी मान्यता देऊन मनपाच्या कर्मचाऱ्यांना वैद्यकिय सेवेपोटी होणाऱ्या खर्चाच्या भरपाई संबंधात तयार केलेल्या विनियमात कमलनयन बजाज रुग्णालयाचे नांव समाविष्ट करणे बाबतचा प्रस्ताव सर्व साधारण सभेचे मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

चर्चा

श्री. घडामोडे भगवान : कमलनयन बजाज हे शहरातील सगळयात महागडा दवाखाना आहे त्याचे नांव घेऊ नये.

सौ. मानकापे पार्वतीबाई : हेडगेवार हॉस्पीटलच्या नावाचा समावेश करावा.

श्री. अंबादास दानवे : प्रस्तुत प्रस्तावात वेगवेगळया रोगाचा उल्लेख केलेला असुन कर्मचाऱ्यांना या रोगांचा इलाज कमलनयन बजाज हॉस्पीटल मध्येच करावा असा प्रस्ताव आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी सभागृहापुढे ठेवलेला आहे. या सगळया रोगासाठी कमलनयन बजाजच का हा पहिला प्रश्न आहे. यापुर्वी या रोगावर कोणत्या ठिकाणी उपचार करण्यात येत होता याची माहिती देण्यात यावी. कमलनयन बजाज हॉस्पीटल कर्मचाऱ्यांना काही सवलत देणार आहे. का नंदलाल धुत हॉस्पीटल एम.जी.एम. हॉस्पीटल, हेडगेवार हॉस्पीटल असे इतरही काही चांगले हॉस्पीटल शहरात आहेत याचा विचार का करण्यात येऊ नये. सर्व हॉस्पीटलचा विचार करण्यात यावा.

मा. महापौर : या शहरात काही आजारावरील शस्त्रक्रिया ठराविक हॉस्पीटलमध्येच केली जाते. किडनी बदलावयाची असेल तर फक्त कमलनयन बजाज हॉस्पीटल आणि नंदलाल धुत हॉस्पीटलमध्ये केली जाते ह्रदयावरील शस्त्रक्रिया करावयाची असेल तर फक्त बजाज हॉस्पीटलमध्ये केली जाते. महापालिकेतर्फे हॉस्पीटल अधिकृत करतांना महापालिकांना कर्मचाऱ्यांना

सवलत मिळाली पाहिजे. अशी अट टाकण्यात आली पाहिजे. म्हणुन कमलनयन बजाज हॉस्पीटल, हेडगेवार हॉस्पीटल एम.जी.एम. हॉस्पीटल, हेडगेवार हॉस्पीटल या ट्रस्ट हॉस्पीटलला अधिकृत करुन महापालिका कर्मचाऱ्यांना कमीत कमी २५% सवलत देण्यात यावी. अशी अट टाकण्यात यावी. ठराव मंजुर करण्यात येतो.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांना ॲन्जोग्राफी, ॲन्जोप्लास्टी, कृत्रिम मुत्रपिंड प्रत्यारोपण बायपास सर्जरी, सोनोग्राफी आदी रोगाचे उपचारासाठी वैद्यकिय सेवपोटी होणाऱ्या खर्चाच्या भरपाई संबंधात तयार केलेल्या विनिमयात शहरातील कमलनयन बजाज हॉस्पीटल हेडगेवार हॉस्पीटल एम.जी.एम. हॉस्पीटल, सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल या ट्रस्ट हॉस्पीटलची नांव समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या हॉस्पीटलमध्ये महापालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपचार घेतल्यानंतर सदर हॉस्पीटलने वैद्यकिय बीलात महापालिका बंधणकारक राहील. असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१५/८** :

मा. उप आयुक्त (म.) हयांना प्रस्ताव सादर केला आहे की, शासनाने शासन निर्णय क्र. एएमसी-१४९८/२११७/प्र.क्र.-२१९/९८/नवि-२४ दि २ मे २००० अन्वये सिध्दार्थ जलतरणतलावारिता खालील पदे औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवर निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे.

| अ. क्र. | पदाचे नांव | पद संख्या | असुधारित वेतन श्रेणी |
|---|---|---|---|
| १. | व्यवस्थापक | १ पद | १६००-२६०० |
| २. | जलनिर्देशक (कोच) | १ पद | १४००-२३०० |
| ३. | सहजलनिर्देशक (पुरुष/महिला) | २ पदे | १२००-२०४० |
| ४. | प्लॉट ऑपरेटर | २ पदे | १४००-२३०० |
| ५. | लाईट गार्ड (जिवरक्षक) | २ पदे | ९४०-१४०० |
| ६. | विद्युत लाईनमन | १ पद | ९५०-१४०० |
| ७. | लिपिक | १ पद | ९५०-१४०० |
| ८. | सेक्शन स्विपर | २ पद | ८२५-१२०० |
| ९. | साईड ब्रशर | १ पद | ८२५-१२०० |
| १०. | स्वीपर | १ पद | ७५०-९४० |
| | एकुण १४ पदे | | |

सदर निर्माण करण्यात आलेल्या पदापैकी अ.क्र.६,७,१० या पदाचा समावेश सेवा भरती नियमात असल्याने त्यांची अर्हता सेवा भरती नियमानुसार असेल. उपरोक्त पदे भरणेबाबत त्या पदांची अर्हता खालील प्रमाणे प्रस्तावीत करण्यात येते.

१) व्यवस्थापक : १) सरळ सेवेसाठी

१. मनपा सेवेत नसल्यास वय ३० वर्षा पेक्षा जास्त नसावे.
२. पोहण्यासंबंधी विविध शास्त्रीय पध्दतीने शिकविण्याचा अनुभव आणि त्यासंबंधी अचुक माहिती तसेच पोहण्याचा शासन मान्य कोर्स उत्तीर्ण.
३. अपतकालीन परिस्थितीत बचावासंबंधीचे प्रत्यक्ष अनुभव.
४. स्विमींग पुलचा व्यवस्थापकीय काम काजाचा ३ वर्षाचा अनुभव

२) पदोन्नतीने
स्वीमींग पुल व्यवस्थपकीय कामकाजाचा अनुभव असलेले वर्ग-३ मधील कर्मचारी.

२)जलनिर्देश्क (कोच)
१. मनपा सेवेत नसल्यास वय ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.
२. शास्त्रीय पध्दतीने पोहणे व सुर मारणेचे प्रत्यक्ष शिकविण्याचा अनुभव माहिती.
३. आपतकालीन परिस्थितीत बचावासंबंधी प्रत्यक्ष अनुभव.
४. मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान.

३) सहजल निर्देशक (पुरुष/महिला)
१. मनपा सेवेत नसल्यास वय ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.
२. शास्त्रीय पध्दतीने पोहणे व सुर मारणेचे प्रत्यक्ष अनुभव व माहिती.
३. आपतकालीन परिस्थितीत बचावासंबंधीचे प्रत्यक्ष

किंवा

पदोन्नतीने
पोहणे व सुर मारणेचे पध्दतीसंबंधीचे अचुक अनुभव व शिकविण्याचा प्रत्यक्ष अनुभव असलेल कर्मचाऱ्यामधुन

४) प्लॅट ऑपरेटर
१. मनपा सेवेत नसल्यास वय ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.
२. आय.टी.आय. ऑपरेटर परिक्षा पास

५) लाईफ गार्ड (जीवरक्षक)
१. मनपा सेवेत नसल्यास वय ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.
२. इ. ७ वी पास, पोहण्याचे उत्तम ज्ञान

६) सेक्शन स्विपर
१. मनपा सेवेत नसल्यास वय ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.
२. इ. ७ वी पास.

७) साईड ब्रशर
१. मनपा सेवेत नसल्यास वय ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.
२. इ. ७ वी पास.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय क्र. एएमसी-१४९८/२११७/प्र.क्र.२१९/९८/नवि-२४ दिनांक २ मे २००० अन्वये सिध्दार्थ जलतरण तलावाकरिता अ.क्र. १ ते १० प्रमाणेचे पदापैकी खालील पदे भरणे बाबत त्या पदाची अर्हता खालीलप्रमाणे प्रस्तावीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) व्यवस्थापक : १) सरळ सेवेसाठी
१. मनपा सेवेत नसल्यास वय ३० वर्षा पेक्षा जास्त नसावे.

२. पोहण्यासंबंधी विविध शास्त्रीय पध्दतीने शिकविण्याचा अनुभव आणि त्यासंबंधी अचुक माहिती तसेच पोहण्याचा शासन मान्य कोर्स उत्तीर्ण.
३. अपतकालीन परिस्थितीत बचावासंबंधीचे प्रत्यक्ष अनुभव.
४. स्विमींग पुलचा व्यवस्थापकीय काम काजाचा ३ वर्षाचा अनुभव
किंवा

२) पदोन्नतीने
स्वीमींग पुल व्यवस्थपकीय कामकाजाचा अनुभव असलेले वर्ग-३ मधील कर्मचारी.

२) जलनिर्देश्क (कोच)
१. मनपा सेवेत नसल्यास वय ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.
२. शास्त्रीय पध्दतीने पोहणे व सुर मारणेचे प्रत्यक्ष शिकविण्याचा अनुभव माहिती.
३. आपतकालीन परिस्थितीत बचावासंबंधी प्रत्यक्ष अनुभव.
४. मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान.

३) सहजल निर्देशक (पुरुष/महिला)
१. मनपा सेवेत नसल्यास वय ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.
२. शास्त्रीय पध्दतीने पोहणे व सुर मारणेचे प्रत्यक्ष अनुभव व माहिती.
३. आपतकालीन परिस्थितीत बचावासंबंधीचे प्रत्यक्ष अनुभव
किंवा

पदोन्नतीने
पोहणे व सुर मारणेचे पध्दतीसंबंधीचे अचुक अनुभव व शिकविण्याचा प्रत्यक्ष अनुभव असलेल कर्मचाऱ्यामधुन

४)प्लॅट ऑपरेटर
१. मनपा सेवेत नसल्यास वय ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.
२. आय.टी.आय. ऑपरेटर परिक्षा पास

५)लाईफ गार्ड (जीवरक्षक)
१.मनपा सेवेत नसल्यास वय ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.
२.इ. ७ वी पास, पोहण्याचे उत्तम ज्ञान

६)सेक्शन स्विपर
१.मनपा सेवेत नसल्यास वय ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.
२.इ. ७ वी पास.

७)साईड ब्रशर
१.मनपा सेवेत नसल्यास वय ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.
२.इ. ७ वी पास.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१६/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, उद्यान अधिक्षक या पदाची इतर महानगरपालिकेत असलेली वेतनश्रेणी साधारण : रु. २२००-४००० अशी आहे औरंगाबाद महानगरपालिकेत रु. २२०० ते ३७०० ही वेतनश्रेणी आह. इतर महापालिकेशी तुलना करता औरंगाबाद महापालिकेतही उद्यान अधिक्षक हे पद एकाकी स्वरुपाचे असल्याने व शहरातील उद्याने

पाहता उद्यान अधिक्षक या पदास रु. २२०० ते ४००० वेतनश्रेणी लागु करण्यास हरकत नाही.

महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागु केलेला आहे. त्यानुसार सर्व वेतनश्रेण्या सुधारित करण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत उद्यान अधिक्षक यांना रु. २२०० ते ३७०० या वेतनश्रेणीमध्ये पाचव्या वेतन आयोगानुसार रु. ७४५०-११५० वेतनश्रेणी द्यावी लागेल. रु. २२००-४००० वेतनश्रेणी सुधारित केल्यास रु. ८०००-१३५०० ही वेतनश्रेणी द्यावी लागेल. त्यामुळे महानगरपालिकेवर आर्थिक बाबीचा विचार करता फारसा आथ्रिक बोजा पडणार नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) व त्यांचे स्पष्टीकरण विचारात घेता सदर प्रस्तावास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

चर्चा.

श्री. अंबादास दानवे : उद्यान अधिक्षक यांना स्वातंत्र कारभार देण्यात यावा व हा विभाग मा. आयुक्त यांचेकडे देण्यात यावा.

मा. महापौर : पर्यावरणासाठी सभागृहाने काही पद निर्माण करण्यास मंजुरी दिली आहे. तेव्हा पर्यावरण आणि उद्यान असा एक. स्वतंत्र विभाग निर्माण करुन हा विभाग मा. आयुक्त यांचे अधिकारासाठी काम करिल.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इतर महापालिकेशी तुलना करता औरंगाबाद महानगरपालिकेतील उद्यान अधिक्षक या पदाची एकांकी स्वरुप आणि शहरातील वाढती उद्याने पाहाता उद्यान अधिक्षक या पदास रु. २२०० ते ४००० ही वेतनश्रेणी लागु करण्यास आणि पाचव्या वेतन आयोगानुसार रु. ८००० ते १३५०० ही सुधारित वेतनश्रेणी लागु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२१७/१०** :

प्रस्ताव सादर करण्यात की, मा. सर्वसाधारण सभा दिनांक २० जुलै २००० रोजी पुरवणी विषय पत्रिका क्र. २२/९ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशव्दाराजवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारण्यास मंजुरी देण्यात आली. आहे. तसेच जागा निश्चिती करुन अर्थसंकल्पात आवश्यक तरतुद करण्याकरिता देखील मंजुरी देण्यात आली आहे. त्या अन्वये महाराष्ट्र शासनाकडे ना हरकत प्रमाणपत्र मिळणेकरिता पत्र पाठविण्यात आले असता महाराष्ट्र शासन नगरविकास मंत्रालय विभागाकडुन दिनांक ४-१-२००१ रोजी फॅक्स व्दारे माहिती मागविण्यात आली. त्याचे मुद्दे खालील प्रमाणे आहेत :

१) प्रस्तावित पुतळा उभारल्यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार आहे का?
२) पुतळा उभारण्यास परवानगी जर दिली तर त्यामुळे जतियवाद वाढण्याची शक्यता आहे का?
३) पुतळा उभारणीस परवानगी देतांना लोकांच्या ईच्छा (अल्पसंख्याकांच्या) लक्षात घेण्यात याव्यात.

४) ज्या जागेवर पुतळा उभारण्यात येणार आहे. त्या जागेच्या मालकी हक्का बाबत कोणताही वाद नसुन याबाबत सर्व संबंधीतांची परवानगी घेण्यात आली आहे का?
५) पुतळा उभारल्यामुळे वाहतुकीस व रहदारीस अडथळा होणार आहे का?
६) पुतळयाचे मांगल्य व पावित्र्य राखण्याची जबाबदारी संबंधीत पुतळा समितीची असुन या संदर्भात त्यांनी ही जबाबदारी स्विकारल्याचे करारपत्र लिहुन घेण्यात आले आहे का?
७) सदरहु पुतळा उभारण्या संबंधात कोणाचा विरोध नाही याची खात्री करुन घेण्यात आली आहे काय?
८) पुतळयाच्या क्ले मॉडलेला कला संचानालयाची मान्यता घेण्यात आली आहे काय?
९) याशिवाय परिस्थितीनुरुष इतर माहिती.

या पत्राच्या अनुषंगाने मा. पोलिस आयुक्त यांचेकडुन ना हरकत प्रमाणपत्र मागविले असता मा. पोलिस आयुक्त औरंगाबाद यांचेकडुन काही अटीवर ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे त्या अटीची पुर्तता करण्याकरिता लागण्याच्या खर्चास मंजुरी द्यावी.

| अ. क्र. | बाब | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १. | धातुचा पुतळा | रु. १०.०० लाख |
| २. | पुतळा बसवावयाचा संगमरवरी दगडाचा चबुतरा (आरसीसी बांधकामासहित) | रु. ५.०० लाख |
| ३. | मजबु कठडा | रु. ३.०० लाख |
| ४. | विद्युत प्रकाश व्यवस्था रोषणाई (हायमस्टसहीत) | रु. १५.०० लाख |
| ५. | सिंमेट कॉक्रीटची छत्री | रु. २.०० लाख |
| ६. | स्वंयचलित शिडी | रु. ३.०० लाख |
| ७. | अद्यावत पोलिस चौकी बांधण्याकरिता | रु. ६.०० लाख |
| ८. | अजुंबाजुची जागा संपादित करणे व उपलब्ध जागेवर खडीकरण व डांबरीकरण करणे (बेट तयार करणे) | रु. २०.०० लाख |
| ९. | वाहतुक संकेतांक/रहदारीनियम व त्यासंबंधीत इतर बाबी (उदा. झेब्रा कॉसींग, लेन मार्क्रिंग, दिशापदर्शक बोर्ड इ.) | रु. १०.०० लाख |
| एकुण | | रु. ७४.०० लाख |
| अंदाजे | | रु. ७५.०० लाख |

उपरोक्त दर्शविल्यानुसार अर्थतरतुद उपलब्ध करुन दिल्यास व पुतळा बसविणे करिता महाराष्ट्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यास विद्यापीठ मुख्य प्रवेश व्दारा समोरिल अस्तित्वात असलेल्या बेटाच्या ठिकाणी पुतळा बसविण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

चर्चा

श्री. कोकाटे काशिनाथ : या सभागृहाने यापुर्वीही शहरात पुतळे उभारण्याचे ठरावास मंजुरी दिली आहे. त्यावेळी अशा प्रकारे पुतळा उभारण्यासाठी शासनाची मंजुरी घेण्यात आली नव्हती. मग आजच का गरज भासली.

मा. महापौर : विद्यापीठ गेटसमोर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असावा हा ठराव या सभागृहाने मंजुर केला होता. हा ठराव मंजुर झाल्या नंतर विभाग आणि गृह विभागाकडे नाहरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी पत्र पाठवले आहेत. त्यानंतर मी स्वतः श्री. तिवारी साहेब यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांचेकडुन प्राप्त झालेल्या पत्रात काही अटी आहेत. त्यानंतर या पत्राची प्रत मा. पोलिस आयुक्त यांचे कडे दिली असता. काल त्यांच्याकडुन हरकत नसल्याचे पत्र मिळाले आहे. त्या अटीला अधिन राहुन हा ठराव मंजुर करण्यात येतो.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशव्दाराजवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यासाठी महाराष्ट्र शासन नगरविकास मंत्रालय विभागाकडुन दिनांक ४-१-२००१ च्या फॅक्सव्दारे प्रस्तावातील अ.क्र. १ ते ९ मुद्याबाबत मा. पोलिस आयुक्त औरंगाबाद यांनी काही अटीवर दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्रानुसार अटीची पुर्तता करण्याकरिता.

| अ. क्र. | बाब | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १. | धातुचा पुतळा | रु. १०.०० लाख |
| २. | पुतळा बसवावयाचा संगमरवरी दगडाचा चबुतरा (आरसीसी बांधकामासहित) | रु. ५.०० लाख |
| ३. | मजबु कठडा | रु. ३.०० लाख |
| ४. | विद्युत प्रकाश व्यवस्था रोषणाई (हायमस्टसहीत) | रु. १५.०० लाख |
| ५. | सिंमेट कॉक्रीटची छत्री | रु. २.०० लाख |
| ६. | स्वंयचलित शिडी | रु. ३.०० लाख |
| ७. | अद्यावत पोलिस चौकी बांधण्याकरिता | रु. ६.०० लाख |
| ८. | अजुंबाजुची जागा संपादित करणे व उपलब्ध जागेवर खडीकरण व डांबरीकरण करणे (बेट तयार करणे) | रु. २०.०० लाख |
| ९. | वाहतुक संकेतांक/रहदारीनियम व त्यासंबंधीत इतर बाबी (उदा. झेब्रा कॉसींग, लेन मार्किंग, दिशापदर्शक बोर्ड इ.) | रु. १०.०० लाख |
| | एकुण | रु. ७४.०० लाख |
| | अंदाजे | रु. ७५.०० लाख |

वरील नुसार अंदाजे रक्कम रु. ७५.०० लाखाची अर्थ तरतुद उपलब्ध करुन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१८/११** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती सुरेय्या भ्र.शे. शाकेर यांना कॅन्सरच्या शस्त्रक्रियेसाठी नगरसेवक स्वेच्छा निधीतुन आर्थिक मदत म्हणुन त्यांना र.रु. २५,०००/- रुपये देण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. शे. इसाक शे. जैनोद्यीन, श्री. अफसर खान यासीन खान,
श्री. सै. सलीम सै. युसुफ
अनुमोदक : श्री. सैय्यद अली मिरा सलामी, श्री. भगवान रगडे,

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती सुरेय्या भ्र. शे. शाकेर यांना कॅन्सरच्या शस्त्रक्रियेसाठी नगरसेवक स्वेच्छानिधीतुन रु. २५,०००/- ची आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१९/१२** :

माझ्या वार्डातील लेबर कॉलनी ते मा. जिल्हाधिकारी कार्यालय समोरील मार्ग हा व्ही. आय.पी. रोड असुन या ठिकाणी मा. विभागीय आयुक्त यांचे निवास व कार्यालय तसेच मा. जिल्हाधिकारी यांचे निवासस्थान व जिल्हाधिकारी कार्यालय असुन याच मार्गावर मा.मनपा आयुक्तांचे निवासस्थान आहे. सदर ठिकाणी सुभेदारी विश्रामगृह सुध्दा असुन या ठिकाणी नेहमी शासकिय व पदाधिकाऱ्यांची ये-जा-चालु असते.

तसेच या ठिकाणी दरवर्षी मा महाराष्ट्र शासनाच्या मंत्रीमंडळाची बैठक असते म्हणुन या ठिकाणी मा. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळयाजवळ असलेल्या जागेत (आयलँड मध्ये) हायमस्ट पोल लाईटसह बसवुन या मार्गाची शोभा वाढवावी करिता प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. शे. इलियास शे. किरमानी
अनुमोदक : श्री. शे. ईसाक जैनोद्यीन शे., श्री. सै. सलीम सै. युसुफ,
श्री. अफसर खान.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालय समोरील मा. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळयाजवळ असलेल्या जागेत हायमस्ट पोल लाईटसह बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२०/१३** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पदमपुरा वार्ड क्र. ३२ मधील नवि वसति या भागात मागील ४० वर्षापासुन ४ सार्वजनिक संडास होते. त्या संडास मागे एम सेफ्टी टैंक ही होता. सदरील संडास बंद झाल्यामुळे मनपाने ते पुर्णपणे तोडले. यामुळे सदरील जागा मोकळी आहे. या जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणुन या जागेवर व्यायाम शाळे करिता एक मोठी खोली बांधण्यात यावी.

सुचक : सौ. निर्मला कांबळे
अनुमोदक : श्री. नंदकुमार घोडेले. सौ. विमलबाई राजपुत

मा. महापौर : व्यायाम शाळेकरिता महापालिका फंडातुन मंजुरी द्यावयाची नाही असा निर्णय सभागृहाने घेतलेला आहे. तेव्हा या व्यायाम शाळे करिता मा.

आमदार फंड मा. खासदार फंड किंवा नगर सेवक स्वेच्छा निधीतुन फंड उभा करण्यात यावा. ठरावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३२ पदमपुरा येथील नवीवस्ती या भागातील सार्वजनिक संडास बंद झालयामुळे या मोकळया जागेवर व्यायाम शाळा व एक मोठी खोली बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२१/१४** :

श्री. सुजानसिंग चंडोक हे सिंधी कॉलनी येथील रहिवाशी असुन किडणीचे विकाराने आजारी आहेत. त्यांचेवर सेठ नंदलाल धुत रुग्णालय येथे वैद्यकिय उपचार चालु आहेत. किडणी वरील उपचारासाठी संबंधीतास ३५ ते ४० हजार रुपये खर्च येणार आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने ते एवढा खर्च करणेस असमर्थ आहेत.

संबंधीतास किडणीचे आजारा वरील वैद्यकिय उपचारासाठी काही स. नगरसेक स्वेच्छा निधीतुन आर्थिक मदत देणेस तयार आहेत. संबंधीताची आर्थिक परिस्थिती विचारात घेता त्यांना किडणीचे आजारावरील वैद्यकिय उपचार तथा औषध उपचारासाठी नगरसेवक स्वेच्छा निधितुन २५,०००/- रुपये विशेष विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अंबादास दानवे, श्री. जगदिश सिध्द
अनुमोदक : श्री. आनंद तांदुळवाडीकर, श्री. भाऊसाहेब वाघ.

मा. महापौर : सभागृहात निर्णय घेतल्याप्रमाणे किडणी बदलण्याचा आजार असेल तर निधी मंजुर करण्यात यावा.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. सुजानसिंग चंडोक सिंधी कॉलनी यांना किडणी बदलण्याचा आजारावरील उपचार करावयाचा असेल तर नगरसेवक स्वेच्छानिधीतुन रु. २५,०००/- ची आर्थिक मदत करयास विशेष बाब म्हणुन सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२२/१५** :

रोशनगेट येथील रहिवाशी जावेद सिद्यीकी पिता मजीद सिद्यीकी हे अपंग आहेत. संपुर्ण कुटुंबीयांची जबाबदारी त्यांच्यावरच आहे. त्यांना रोजगार प्राप्त व्हावा. या हेतुने एसटीडी/पीसीओ बुथ टाकण्यासाठी म.न.पा. तर्फे रोशनगेट, विनायकराव पाटील उद्यान (दक्षिणेकडे किंवा सिध्दार्थ उद्यान येथे जागा देण्यात यावी. जेणे करुन त्यांची रोजगाराची समस्या दुर होईल. म.न.पा. तर्फे यापुर्वी विनायकराव पाटील उद्यान येथे एसटीडी बुथ साठी जागा देण्यात आलेली आहे. तसेच म.न.पा. च्या सार्वजनिक ठिकाणावर एसटीडी बुथसाठी इतर ठिकाणांची जागा देखील देण्यात आलेली आहे. करिता जावेद सिद्यीकी या अपंगाच्या बाबतीत सहानुभुती पुर्वक विचार करुन उपरोक्त ठिकाणी एसटीडी बुथ साठी जागा देण्यात यावी.

प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक : श्री. शे.च ईसाक जैनोद्यीन शे., श्री. अंबादास दानवे,

श्री. कदिर मोलाना.
अनुमोदक : श्री. नंदकुमार घोडेले, श्री. माणिक साळवे,
श्री. मुमताज अली.

चर्चा

मा. महापौर : हा ठराव नामंजुर करण्यात येत आहे. हा ठराव संयुक्त नाही. एसटीडी पीसीओ ला जागा देणे महानगरपालिकेला परवडणार नाही.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दीन : या जागेवर विनायकराव पुतळा उद्यानात एसटीडी पीसीओ ला जागा देण्यात आली आहे. म्हणुन या अपंगाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन हा ठराव मंजुर करण्यात यावा.

मा. महापौर : सभागृहाने हा ठराव मंजुर केला तर प्रत्येक नगरसेवक वार्डामध्ये जागा मागतील सर्व रस्त्यावर एसटीडी पीसीओ आणि टपऱ्यामागतील कुठेही टपरी अथवा अशा बुथला जागा देऊ नये अशा सुचना मा. उच्च न्यायालयाने महापालिकेस हाऊस या रोड वरील जेव्हढया टपऱ्या आहेत त्याची नोंद उच्च न्यायालयाने घेतली असुन मार्च च्या अगोदर सर्व टपऱ्या काढण्याचे आदेश महानगरपालिकेस दिले आहेत. तेव्हा अशा प्रकारचा पायंडा आपण पाडु नये म्हणुन हा ठराव नामंजुर करण्यात येतो.

श्री. शे. ईसाक जैनोद्दीन शे. : हा ठराव मंजुर करण्यात यावा नाही तर मी उच्च न्यायालयात दाद मागणार आहे यापुर्वी अशी जागा दिली आहे. ती व्यक्ती अपंग आहे.

मा. महापौर : यापुर्वी या पाच वर्षात आपण कुठही जागा दिली नाही.

श्री. शे. ईसाक जैनाद्दीन : जागा देता येत नाही असे रुलींग देण्यात यावे.

मा. महापौर : नवीन जागा देता येत नाही.

**ठराव** :

पस्तुत प्रस्ताव नामंजुर करण्यात यावा सर्व सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २२३/१६** :

सौ. प्रतिभा प्रदिप देशपांडे हया सिडको, एस-२ येथील रहिवाशी असुन ह्दय विकाराने आजारी आहेत. त्यांचेवर सेठ नंदलाल धुत रुग्णालय येथे वैद्यकिय उपचार चालु असुन त्यांचे ह्दयावर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. ह्दय शस्त्रक्रियेसाठी ३०,०००/- रुपये खर्च येणार आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्यामुळे ते एवढा खर्च करणेस असमर्थ आहे. त्यांनी नगरसेवक स्वेच्छा निधीतुन ह्दय शस्त्रक्रियेसाठी भरिव आर्थिक मदत देणे बाबत विनंती केली असुन त्यांना काही स. नगरसेवक त्यांचे स्वेच्छा निधीमधुन ह्दय शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत देणेस तयार आहेत.

सौ. प्रतिभा प्रदिप देशापांडे यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन त्यांना विशेष बाब म्हणुन ह्दय शस्त्रक्रियेसाठी ३०,०००/- रुपये नगरसेवक स्वेच्छा निधी मधुन मंजुर करणेस प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अंबादास दानवे, श्री. काशिनाथ कोकाटे.
अनुमोदक : श्री. नंदकुमार घोडेले, श्री. आनंद तांदुळवाडीकर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सौ. प्रतिभा प्रदिप देशपांडे सिडको एन-२ या हृदय विकाराने आजारी असुन हृदय शस्त्रक्रियेकरिता नगरसेवक स्वेच्छानिधीतुन रु. ३०,०००/- ची आर्थिक मदत विशेष बाब म्हणुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२४/१७** :

वरील विषयी नम्र निवेदन करण्यात येते की, संत शिरोमणी रविदास महाराज हे सर्व धर्मीयांचे राष्ट्रीय संत असुन शिख धार्मीयांचे धर्म ग्रंथ "श्री. गुरुग्रंथ सहिता" मध्ये गुरु रविदासजींचा वाणीचा उल्लेख आहे. शिख समाज ही गुरु रविदासजींचा आदर करतो.

तरी मे महापौर साहेबांनी विनंती करतो की, बन्सीलालनगर येथील सांस्कृतिक सभागृहास संत शिरोमणि गुरु रविदास हे नांव देण्यात यावे ही विनंती.

सुचक : श्री. दलबिदसिंग जबिंदा
अनुमोदक : श्री. शकील पटेल, श्री. रतनकुमार पंडागळे.

मा. महापौर : या वार्डाचे संबंधीत नगरसेवक यांना विश्वासात घेणे आवश्यक आहे.

**ठराव** :

प्रस्तुत प्रस्तावाबाबत या वार्डाचे संबंधीत नगरसेवक यांना विश्वासात घेवुन ठराव ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २२५/१८** :

स्वांतत्र लढयात ज्यांनी प्राणांची आहुती देऊन या भारतभुमीला ब्रिटिशांच्या जोखडातुन मुक्त केले. जालियनवाला बाग हष्याकांड घडवुन आणणाऱ्या जन डायरचा वध करुन सुड उगवला अशा थोर भुमीपुत्राचे बलिदान भारतीयांना सदैव स्मरणात राहील असे स्फुर्तिस्थान रंगीन दरवाजा वाहतुक बेटात निर्माण करण्यात यावे. शहिद उधमसिंग यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा सदर प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा ही विनंती.

सुचक : श्री. दलबीरसिंग जबिंदा
अनुमोदक : श्री. रतनकुमार पंडागळे, श्री. अ. रशिद अ. सत्तार.

चर्चा

मा. महापौर : अत्यंत चांगला ठराव आहे. शहिद कोण आहेत याची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

श्री. जबिंदा दलबीरसिंग : शहिद उधमसिंग हे एक क्रांतीकारक होते. आपल्या देशाला इंग्रजांच्या पारतंत्र्यातुन मुक्त करण्यासाठी जालीयनवाला बाग हत्याकांड घडवुन आणणाऱ्या जनरल डायर यांचा इंग्लंड येथे जाऊन शहिद उधमसिंग यांनी वध केला होता.

श्री. शे. इलियास किरमाणी : सदर जागा माझ्या वार्डातील आहे. माझा याला आक्षेप आहे.

मा. महापौर : या वार्डाचे संबंधीत नगरसेवक यांना विश्वासात घेऊन हा ठराव ठेवावा.

**ठराव** :

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तुत प्रस्तावाबाबत या वार्डाचे संबंधीत नगरसेवक यांना विश्वासात घेऊन ठराव ठेवावा.

चर्चा

श्री. नंदकुमार घोडेले : सुरक्षा रक्षक व जनसंपर्क अधिकारी यांचे निलंबन रद्द करावे. त्वरीत कामावर कामावर घेण्यात यावे.

श्री. दानवे अंबादास : चौकशी सुरु करावी व नंतरच कामावर घेण्यात यावे.

मा. महापौर : ठिक आहे. स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता सुरक्षा रक्षक व जनसंपर्क अधिकारी यांना कामावर घेण्यात यावे.

श्री. सुनिल वडागळे : माझ्या वार्डात दोन गल्ल्यामध्ये १० दिवसापासुन सार्वजनिक, घरगुती नळाला ड्रेनेजचे घाण पाणी येत आहे. यासंबंधी तेथील काही नागरिकांनी झ ोन अधिकाऱ्यांकडे तशी तक्रार ही केलेली आहे परंतु दखल घेतली जात नाही. मी स्वतः प्रत्यक्ष संबंधीत अधिकाऱ्यांची भेट घेतलेली आहे. तक्रार केलेल्याची नोंद संबंधीत झोन कार्यालयात आहे. परंतु काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मा. महापौर : चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईल.

श्री. सुनिल वडागळे : चौकशी अनेकदा झालेल्या आहे. म्हणावी तशी अधिकाऱ्यांवर कार्यवाही होत नाही. चौकशी होत राहतील परंतु जे नागरिक दुषित पाणी पिऊन आजारी पडलेले आहे व घाटी दवाखाना येथे उपचार घेत आहे. त्यांचेसाठी आपण काय मदत करु शकतो. संबंधीत नागरिक महानगरपालिकेकडे कर भरतात दुषित पाणी पिण्यास देऊन त्यांच्या जिवितास धोका निर्माण झालेला आहे.

मा. महापौर : स. सदस्य यांनी सुचना केल्यानुसार त्यांच्या वार्डामध्ये १० दिवसांपासुन दुषित पाणी येते व तशी तक्रार झोन अधिकारी यांचेकडे जाऊनही तेथे जाऊन पाहणी करुन अहवाल मागवला नसेल अशा अधिकाऱ्यांवर चौकशी करुन दोषी आढळल्यास निलबनाची कार्यवाही करण्यात यावी असे हे सभागृह निर्णय घेत आहे. तसेच जे नागरिक दवाखान्यात उपचार घेत आहेत त्यांना मनपाचे डॉक्टर्स भेट देतील व अशा रुग्णांची प्रकृती लवकरात लवकर सुधारेल यासाठी प्रयत्न करतील.

श्री. थोरात दत्तात्रय : एक वर्ष होत आहे परंतु वार्डात उद्याप कोणतेही विकास काम करण्यात आलेले नाही. तेथील जनता वार्डाचा विकास का होत नाही म्हणुन माझ्याकडे तक्रारी करतात. महानगरपालिकेचे काही कर्मचारी कर वसुलीसाठी वार्डात आलेले होते. परंतु जर वार्डात कोणताच विकास नाही व हा वार्ड अनाधिकृत आहे म्हणुन आपणांस कर मागण्याचा कोणताच हक्क नाही असे मी स्वतः सांगितले. जोपर्यंत विकास होत नाही तोपर्यंत तेथील जनता कर भरणार नाही.

मा. महापौर : तेथील जनतेस आपण पाणी देत आहोत पाण्याचा कर भरणे आवश्यक आहे.

श्री. दत्तात्रय थोरात : पाणी देण्यात येते परंतु जास्त प्रमाणात पाणी मिळत नसल्याने येथील नागरिक ५-५ फुट खोल खड्डे करुन पाणी भरत आहे. चांगल्या पध्दतीने पाणी पुरवठा करण्याची उपाययोजना व्हावी म्हणुन पत्र दिलेले आहे. परंतु हा प्रभाग अनाधिकृत असल्यामुळे संबंधीत कानिष्ठ अभियंता यांनी अंदाजपत्रक तयार करुन ही कार्यवाही करता येत नाही. या कारणास्तव जी

विकास कामे होणार ती थांबुन राहत आहे. सर्व्हे कधी होणार व सुविधा कधी मिळणार हे सांगावे.

मा. महापौर : अनाधिकृत वार्डातील सर्व्हे करण्यासाठी सेवायोजन कार्यालयाकडुन ५० अनुभवी लोकांची यादी मागविण्यात आली होती. त्यांना प्रशिक्षण देऊन कार्यवाही होणार होती परंतु ती झालेली नाही. सध्या ५ ते ४ कर्मचारी सर्व्हे करण्याचे काम करतात. जास्तीचे कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी आज पुन्हा वृत्तपत्रात जाहिरात दिलेली आहे जी टीम करावयास पाहिजे. होती ती न केल्यामुळे सर्व्हे करण्यास वेळ लागलेला आहे. याशिवाय १५ जानेवारी पर्यंतच स्वेच्छा निधीतुन काम कराव्याची मुदत असेल तरी त्या तारखेची मुदत वाढतुन घेता येईल. व विकास कामे करण्यात येईल.

श्री. कोकाटे काशिनाथ : माझ्या माहितीप्रमाणे जवळपास ७ वसाहतीमधील सव्हे झाले आहे. परंतु त्या वसाहतीचा उल्लेख येथे करण्यात आलेला नाही. व सर्व्हे करण्याचे काम ज्या गतीने व्हावयास पाहिजे त्या गतीने झालेले नाही. म्हणुन ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. महानगरपालिकेचे जे झोन कार्यालय आहे. त्या त्या झोन कार्यालयात अंतर्गत येणारे प्रभागाचा सर्व्हे करण्याचे आदेश संबंधीत झोन अधिक यांना देण्यात यावे. त्यानुसार झोन अधिकारी त्यांचे अधिपत्त्याखाली कर्मचाऱ्यांकडुन सर्व्हे करण्याचे काम करतील.

मा. महापौर : सर्व्हे झाल्यानंतर अनधिकृत वसाहती अधिकृत करण्यात येतील व त्याभागात विकास कामे करण्यास अडचण येणार नाही.

दत्तात्रय थोरात : माझ्या वार्डात आरक्षण होते ९२ च्या शासन आदेशानुसार उठविण्यात आले त्यानंतर महानगरपालिकाचे निवासी झोन निर्माण करण्यात आले जर हा भाग अनाधिकृत आहे तर कार्यालयाकडुन काही नागरिकांना बांधकाम परवानगी देण्यात आली. याचा खुलासा व्हावा.

श्री. शे. इलियास किरमानी : लेबर कॉलनीतही हीच परिस्थिती आहे. संपुर्ण वार्ड अधिकृत असतांना सुविधा मिळत नाही. महिलांना संडाससाठी बाहेर जावे लागते.

मा. महापौर : संपुर्ण सर्व्हे करण्यात येऊन पुढच्या सर्व साधारण सभेच्या अगोदर सर्वांच्या समोर माहिती सादर करण्यात येईल. त्याचप्रमाणे ज्या ज्या ठिकाणी अनाधिकृत भाग असतांना परवानगी दिली त्यांचा खुलासा संबंधीत अधिकारी यांनी करावा.

श्री. वाणी ठकुजी : नागरिक बेटरमेंट चार्जेस भरतात त्यानुसार सुविधा देण्यात येत नाही.

उपअभियंता (नगररचना) : सन १९७५ साली विकास योजना मंजुर झालेली होती. त्यावेळी झोनींग होते. म्हणजे सार्वजनिक निमसार्वजनिक वापरासाठी अनुज्ञेय होता. त्यानंतर किरकोळ फेरबदलाची कार्यवाही होऊन तेथे निवास क्षेत्र म्हणुन शासनाची ९२-९३ मान्यता झाली. त्यापुर्वीच या ठिकाणी बरीच वस्ती अनाधिकृत होती. व शासनाची मान्यता मिळाल्यानंतर काहिना परवानगी दिलेली आहेत ले-आऊट मंजुर न करताच काही घरे झालेली आहेत. वस्ती लिंगल झालेली नाही.

मा. महापौर ज्या अधिकाऱ्यांनी अनाधिकृत वस्त्यामध्ये परवानगी दिलेली आहे. त्या संबंधी चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईल.

श्री. कोकाटे काशिनाथ : चौकशी न करता परवानगी दिली आहे. ले आऊट मंजुर झालेला आहे. अशा भागात सुविधा देण्यास हरकत नाही.

मा. महापौर : स. सदस्य श्री. थोरात यांच्या वार्डात संबंधीत आधिकारी श्री. खन्ना यांनी जाऊन पाहणी करुन कुणी परवानगी दिली कशी देण्यात आली याबाबत चौकशी करुन सर्व माहिती ८ दिवसात सादर करावी. त्याची प्रत स.स.ना पण देण्यात यावी.

श्री. स. अली मिरा सलामी /: शहरातील सर्व्हे बाबतचा मुद्दा उपस्थित झालेला आहे सन १९९५ ला सर्व्हे करण्यात आलेला होता. त्या संबंधीची माहिती कुठे आहे याचा खुलासा देण्यात यावा. सदर सर्व्हेची माहिती सभागृहात सादर करण्याचे आदेश द्यावे.

मा. महापौर : सदर रिपोर्ट स. सदस्य श्री. जयवंत ओक यांनी सभागृहात दाखवलेला होता परंतु त्यांनतर शहराचा बराचसा विकास झालेला आहे. जनता घरे, प्रभाग वाढलेले आहे. म्हणुन सर्व्हे करण्यात येत आहे.

श्री. ठकुजी वाणी : माझा वार्ड अधिकृत असुन तेथील जनता कर भरतात. परंतु संविधा पुरविल्या जात नाही. नागरिकांवर अन्याय होतो आहे.

श्री. किशोर शिंदे : माझ्या वार्डातील लोक १० वर्षापासुन बेटरमेंट चार्जेस भरतात. त्यानुसार सुविधा द्यावयास पाहिजे हनुमान टेकडी येथे ले-आऊट झालेले असतांना सुविधा दिलेल्या नाही. संबंधीत नागरिकांवर अन्याय होत आहे.

मा. महापौर : जो भाग अधिकृत आहेत तेथे ज्या काही सुविधा आवश्यक आहे त्या देण्यात याव्यात.

श्री. अंबादास दानवे : मागिल वर्षभरापुर्वीपासुन महानगरपालिका अस्थापनेवर अनेक रिक्त पदे आहेत. गेल्या १५ दिवसापुर्वीच उपआयुक्त (म.) चे पद रिक्त झालेले आहे. याचा बरोबर उल्लेख करु इच्छितो कीृ मुख्यलेखा परिक्षक शिक्षणाधिकारी, शहर अभियंता, नगररचनाकार इ. पदे रिक्त आहेत. तसेच इतरही काही पदे रिक्त असल्याचे समजते. अधिकारी वर्गाची पदे रिक्त असुन सुध्दा या पदावर लवकरात लवकर अधिकारी द्यावेत म्हणुन मा. आयुक्त यांनी सुध्दा शासनाकडे वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला आहे. काहीवेळा लोकप्रतिनिधी मार्फतही प्रयत्न झाले असतील पण त्याची दखल घेतली आहे. असे दिसत नाही. विभागातील जबाबदारीचे काम अधिकाऱ्यांवर टाकलेले असते स. सदस्य घोडेले यांनी एका प्रश्नाव्दारे उत्तर मागविले असता धक्कादायक असे उत्तर देण्यात आले की, उप संचालक हे पद रिक्त आहे, नगर रचना कडुन एक पत्र आले आहे त्यात आपल्याकडे उप संचालक नगररचना हे पद नाही असे म्हटले आहे. उपसंचालक नगररचना या पदाचे अधिकारी श्री. व्ही.एस.चौथाई हे होते परंतु त्यांची बदली झाली. सदरचे पद रिक्त नाही. असे उत्तर मिळाले हे पद सभागृहाने निर्माण केले व संबंधीत अधिकारी श्री. चौथाई होते तोपर्यंतच हे पद होते. व त्यांना पदोन्नती देण्यासाठीच तात्पुरते हे पद निर्माण केले होते असे या उत्तरावरुन दिसुन येत आहे. अशी पदे निर्माण करुन शासनाची परवानगी मिळत नसेल व इतर रिक्त पदावरही उपआयुक्तापासुन ते शिक्षणाधिकारी या पदापर्यंत प्रशासकीय पातळीवर प्रयत्न करुन अधिकारी मिळत नसेल तर वेगळया पध्दतीने प्रयत्न करावे लागेल काय? रिक्त पदे भरण्यासाठी ६ ते ७ वेळेस मुख्यमंत्री यांचेशी चर्चा केलेली आहे. सहाय्यक संचालक नगररचना हे पद भरण्यात यावे जर उपसंचालक नगररचना हे पद निर्माण नसतांना त्या पदाचे जास्तीचे वेतनाचा भुर्दंड आपण का सहन करत आहोत हा माझा

पहिला प्रश्न आहे. प्रशासनाच्या वतीने काय कार्यवाही केलेली आहे व सदरची पदे केव्हा भरणार याचा सविस्तर अहवाल सभागृहात मा. आयुक्तांनी स्पष्ट करावा. तसेच उपसंचालक नगररचना याबाबतीत जो मुद्दा मी उपस्थित केला त्यबाबतही मा. आयुक्त यांनी सविस्तर खुलासा करावा.

श्री. तकी हसनखान : मी ही पत्र देऊन प्रश्न विचारलेला होता जसे की, महाराष्ट्र जविन प्राधिकरण विभागाचे २ उपअभियंता ६ क. अभियंता, शाखा अभियंता,१ वर्षाच्या प्रतिनियुक्तीवर घेण्यात आलेले आहे हे खरे आहे काय त्याचे उत्तर होय हे खरे आहे असे आलेले आहे. त्यातील क. अभियंता शाखा अभियंता यांचा कालावधी ३०-५-९९ तसेच उपअभियंता यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी ३१-८-९९ ला संपलेला आहे. हे खरे आहे काय? व ३१-८-९९ पर्यंतच सर्वसाधारण सभेने कालावधी वाढवुन दिला आहे हे खरे आहे काय? त्याचे उत्तर होय म्हणुन आलेले आहे. तसेच उपअभियंता, क अभियंता यांना दि. १-९-९९ पासुन प्रतिनियुक्तीवर ठेवण्याची सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली नाही हे खरे आहे काय, उत्तर होय हे खरे आहे असे आले. तिसरा प्रश्न असा की, संबंधीत कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते महानगरपालिकेतर्फे देण्यात येते काय उत्तर आलेले आहे होय यावरुन असे दिसुन येत की, महानगरपालिकेचया सर्वसाधारण सभेची मंजुरी नसतांना संबंधीत अभियंत्याना प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढवुन देऊन त्यांचे वेतन, भत्ते कशामधुन देण्यात येतात याचा खुलासा व्हावा. संबंधीत अभियंत्याना दि. १९-६-९९ च्या बैठकीत प्रतिनियुक्तीची मुदतवाढ फक्त ३१-८-९९ पर्यंतच झालेली होती त्यानंतर प्रतिनियुक्तींचा कालवधी वाढवुन घेण्यासाठी सर्वसाधारण सभेत प्रस्ताव न आणता मंजुरी न घेता तसा प्रस्ताव शासनाकडे न पाठवता त्याचा प्रतिनियुक्तीचा कालावधीत मंजुरी अपेक्षीत धरण्यात आली असे अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्ती देण्याचा अधिकार आहे काय? प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर संबंधित अभियंत्याना त्यांच्या विभागाकडे का पाठविण्यात आलेले नाही. याचे उत्तर देण्यात यावे तसेच प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यनंतर संबंधीत अधिकाऱ्यांना कोणत्या हेड मधुन वेतन भत्ते देण्यात आले व देता येतात का याचाही खुलासा देण्यात यावा. आजपर्यंत कारवाई का करण्यात आलेली नाही. अशी माहिती मिळाली की, महानगरपालिका अस्थापनेवर २ उपअभियंता ६ क. अभियंता पदाचे प्रस्ताव शासनास सादर करावयाचा आहे. असे असतांना सुध्दा त्याच अभियंत्याना प्रतिनियुक्तीवर ठेवण्यात येते. महानगरपालिका अस्थपनेवर जे पदोन्नतीस पात्र आहे अशा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांनी माहिती घेण्याबाबत ठरविले होते. मा. आयुक्तांना विनंती की, अस्थापनेवरीलच जेष्ठतेनुसार ज्या कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेऊन अनुभव घेतलेला आहे. अशा कर्मचाऱ्यांना या पदावर समावेश करावा.

मा. महापौर : जायकवाडी कडुन शहराला पाणीपुरवठा करणारी पाण्याची पाईप लाईन महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्यात आलेली होती त्यावेळेस तेथील काही अभियंते यांना आपल्या अभियंत्याना प्रशिक्षण देईपर्यंत तात्पुरती प्रतिनियुक्तीवर घ्यावेत असा ठरावच झालेला आहे. व त्यानंतर

आपल्याकडीलच कर्मचाऱ्यांना पदोन्नती देऊन कार्यवाही करण्यात येईल असे ठरले होते. याबाबत कार्यकारी अभियंता यांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : आज तक हम समज के आये है/ की जानकारी हम ही रखते है/ मगर आज तो आपने कमाल की, आप तो हमसे ही बढकर निकले है/ इस लिऐ हम आप सभी को आदरपुर्वक प्रणाम करते है/ स. नगरसेवक यांनी जी सुचना केली त्याचा जरुर प्रशासनातर्फे विचार करुन कार्यवाही होईल व ती आपण पहाल जर सर्वसाधारण सभेची मंजुरी न घेता संबंधीत अभियंत्याचे प्रतिनियुक्तीची मुदत वाढवुन दिलेली नसेल यातही एक चुक झालेली आहे. स.स.नी सांगितल्याप्रमाणे संबंधीत अभियंत्याची मुदत ३१-८-९९ पर्यंत होती. त्यानंतर वाढवलेली नाही. परंतु जोपर्यंत या जागेवर पर्यायी व्यवस्था होत नाही. तोपर्यंत ज्यांना सेवेत ठेवावे लागेल ही कार्यवाही लवकरच करण्यात येईल. दुसरा प्रश्न स. सदस्य श्री. दानवे यांनी उपसंलाचक सहाय्यक संचालक नगररचना या पदाच्या बाबतीत उपस्थित केलेला आहे. परंतु विद्यमान उपसंचालक आज रुजु झालेले आहे व या अगोदर जे श्री. पाठक नावाचे अधिकारी होते हे दोन्हीही अधिकारी श्री. चौथाई गेल्यानंतर उपसंचालक नगररचना या पदाचे होते. आणि जे वरिष्ठ संचालक आहे. त्यांचे आदेशानुसारच आज महानगरपालिकेत सदर अधिकारी अतिरिक्त कार्यभार म्हणुन उपसंचालक नगररचना या पदावर काम करत आहे अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे बरीचशी कामे थांबुन राहिलेली आहे. माझ्र याच कालावधीतील तीन-चार महिण्याचा विचार केल्यावर या विभागामध्ये लहान-लहान भुखंडाच्या बाबतीत जी प्रकरणे आहेत ती मार्गी लावावी म्हणुन आजच अधिकार प्रदानाचा आदेश आपल्याकडील उपअभियंत्यांना देण्यात आले आहे. यामध्ये कलम ४४ व ४५ नुसार बांधकाम विकास परवाने कलम ४८ ते ५१ अंतर्गत असलेली सर्व प्रकरणे नंतर विकास नियंत्रण नियमावली या अंतर्गत जी कामे रिलेक्स करावयाची ती सोडुन जी अनुज्ञेय नियमामध्ये प्रकरणे येतात त्याचे अधिकार दोन उपअभियंता नगररचना यांना प्रदान करण्यात आलेले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २२४,२२५,२३०,२३१,२३२,२६०,२६१ अ २६३ अ,२६४,२६७,२६८,२९९, ३००,३०४,४४५,३७८ अन्वये सर्व अधिकार उप अभियंता नगररचना १,२ यांना बहाल केलेले आहे. यामध्ये मंजुर रेखांकनातील अकृषि म्हणुन या हरकत प्रमाणपत्र देणे, उद्योग धद्यासाठी हरकत प्रमाणपत्र बांधकाम परवानगीचे नुतनीकरण मुदत वाढ, विकास खर्च वसुली तसेच जमीन वापरासंबधीचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच कलम ४४,४५ नुसार ५०० चौ. मीटर पर्यंतच्या क्षेत्रामध्ये बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबतचे अधिकार देण्यात आलेले आहे. यामुळे जी प्रकरणे उपसंचालक नगररचना यांचेकडे जात होते ते थांबेल व त्यानंतर माझ्याकडे संचिका मंजुरीसाठी आल्यावर ४८ तासाच्या वर संचिका थांबवुन राहणार नाही. अशी ग्वाही देतो.

तसेच आजच्या तारखेमध्ये मा. स्थायी समितीच्या पुर्व परवानगीने कलम ६९(१) अन्वये कार्यकारी अभियंता (पा.पु.वज.नि.) यांना ७ लाख, शहर अभियंता यांना ४ लाख तसेच अति. शहर अभियंता यांना ४ लाख असे प्रत्येक महिण्यात खर्च करण्याचे अधिकार दिलेले आहे. यामध्ये

२५,०००/- रु. पर्यंत अंदाजपत्रकास मंजुरी तसेच निविदास मंजुरी व देयक अदा करण्यास मंजुरी देण्याचे अधिकार तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेले आहे या विकेंद्रकिरणामुळे जी लहान -लहान कामे आहेत ती तात्काळ होईल जे करुन २५ हजार आतील रकमेची संचिका मा. आयुक्तांपर्यंत येणार नाही परंतु त्यावरील रकमेची संचिका येण्यास व पुन्हा पाठविण्यास जो वळे जात असो तो वाचेल. व आता वेगाने कामे होतील अशी अपेक्षा आहे.

श्री. दानवे अंबादास : तीत अधिकाऱ्यांना विकास कामे होण्याच्या दृष्टीने मा. आयुक्तांना आर्थिक खर्चाची मर्यादा वाढवुन दिल्याबद्दल अभिनंदन करतो परंतु मी जो प्रश्न उपस्थित केला त्याचे उत्तर मला मिळालेले नाही उप संचालक हे पद येथे नाहीच. बाकीची जी पदे रिक्त आहे त्या संदर्भात प्रशासनाच्या वतीने काय कार्यवाही झालेली आहे.

मा. आयुक्त : रिक्त पदा बाबतीत काय कार्यवाही करावयाची हे मी सांगण्याआधीच आपण खुलासा केलेला आहे. मा. महापौर व आपण स्वतः या संदर्भात भेटी घेतलेल्या आहेत. आजही शासनाचे हेच आदेश आहेत. जी पदे सहा महिण्यापासुन रिक्त आहे शासन आदेशानुसार ती पदे लॅप्स झालेली आहे ती पुन्हा रिवाईज्ड करुन घ्यावी लागेल. २ मार्च २००० नंतर न आज रोजी जी पदे लॅप्स झालेली आहे जे की, सहा महिन्याच्या वरती रिक्त नाहीत यासाठी जी शासनाची बंधने आहेत ती मनपात आज आहेत. या संदर्भात विधान मंडळाने महिला हक्क व कल्याण समितीच्या बैठकीच्या वेळी प्रश्न उपस्थित झालेला होता. विधान मंडळाचे महिला हक्क व कल्याण समितीचे सभापती यांचे समोरही हा प्रश्न मांडलेला असुन मुख्यमंत्री यांचेशी चर्चा करुन रिक्त पदाबाबत कार्यवाही करण्यात येईल. असे आश्वासन दिलेले आहे. येत्या २७ तारखेला आपल्याकडे महापौर परिषदेचे आयोजन केलेले आहे. मा. मुख्यमंत्री महोदय येणार असुन महापौरांच्या ज्या मागण्या आहेत त्यापैकीच सक्षम असे अधिकार महापौर यांना जसे पदोन्नती,बदल्या, प्रतिनियुक्तीचे अधिकार दिले तर योग्यच आहे. परंतु न दिल्यास रिक्त पदावर शासनाच्या नियमानुसारच आपणांस कार्यवाही करावी लागेल. व तोपर्यंत आहे रिक्त पदावर प्र. अधिकारी म्हणुन नेमलेले अधिकाऱ्यांकडुन कामे करुन घ्यावी लागेल.

मा. महापौर : दोन दिवसापुर्वी मी मुंबईला गेलो होतो. रिक्त पदाच्या बाबतीत मा. मुख्यमंत्र्याकडे विषय मांडलेला होता. आपल्याकडे एकुण ८८ रिक्त पदे आहेत. त्यापैकी २५% पदे शिक्षकाची आहेत. या संदर्भात माहिती दिल्यानंतर मुख्यमंत्री यांनी त्यांचे सचिव श्री. बोंगिरवार यांचेकडे दिले. रिक्त पदास दोन सचिवाची मंजुरी पाहिजे. १. वित्त विभागाचे सचिव व दुसरे अर्बन डेव्हलपमेंटचे सचिव सध्या वित्त विभागाचे सचिवाची सही होऊन अर्बन डेव्हलपमेंटचे सचिव यांचेकडे प्रकरण पडलेले आहे. मंजुर झाल्यावर महानगरपालिकेला तसे पत्र येईल.

श्री. सुदाम सोनवणे : शासनाची नवीन पदास मंजुरी घ्यावी लागते रिक्त पदे ही पुर्वीचीच आहे. म्हणुन या पदावर भरती करतांना शासनाची मंजुरी घेण्याची गरज नाही. इतर महानगरपालिकेकडुन याची माहिती घ्यावी.

मा. महापौर : इतर महानगरपालिकाकडे शासनाचा जी.आर. मिळालेला नाही नाशिक,पुणे,मुंबई महानगरपालिकेमध्ये सध्या बदल्या पदोन्नती इ. कार्यवाही

चालु आहे. तेथील महापौर कडुन मी माहिती घेतली. आपल्या महानगरपालिकेत जो शासनाचा जी.आर. प्राप्त झाला त्यानुसार सदर रिक्त पदांना शासनाची मंजुरी घेण्यासाठी कार्यवाही चालु केलेली आहे. आता मध्येचे नियम तोडुन पदे भरणे शक्य नाही. व शासनाकडील कार्यवाही अंतिम टप्प्यात असुन लवकरच कार्यवाही करण्यात येईल.

श्री. कोकाटे काशिनाथ : रिक्त पदावर ६ महिण्याच्या आत नियुक्त न केल्यास पुन्हा शासनाची मंजुरी घ्यावी लागेल. शासनाने मंजुरी दिलेल्या पदावर कर्मचारी भरती न केल्यास पुन्हा शासन मंजुरी घेणे योग्य आहे काय? शहराचा वाढताव्याप लक्षात घेता सहा महिन्यानंतर पुन्हा रिक्त असलेले पदांना मंजुरी घ्यावी आणण्यासाठी २ वर्षाहुन अधिक कालावधी जाईल. जो जी.आर. आला तो इतर महानगरपालिकेत नाही. जर आपल्या महानगरपालिकेत आला कोठुन याची चौकशी होणे आवश्यक आहे. कुणी मागवला का मागवला यामागचा उद्देश काय याचा संपुर्ण खुलासा व्हावयास पाहिजे.

मा. महापौर हा जी.आर. महाराष्ट्र शासनाकडुन उपलब्ध झालेला आहे. पुन्हा या बाबतीत चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईल.

श्री. कोकाटे काशिनाथ : इतर महानगरपालिकाही स्थानिक स्वराज्य संस्था आहेत औरंगाबाद महानगरपालिके शिवाय इतर महानगरपालिकेत बदल्या वगैरे करण्याचा जी.आर. प्राप्त नाही. व या महानगरपालिकेत जी.आर. प्राप्त होतो हे जाणीव पुर्वक केलेले आहे काय

मा. महापौर : स. विरोधी पक्षनेता श्री. कोकाटे यांनी या संदर्भात शासन दरबारी जावे म्हणणे मांडावे पालकमंत्री आहेत राज्यमंत्री श्री. दर्डा साहेब औरंगाबाद आहेत. त्यानी सभापती स्थायी समिती यांना घेऊन दर्डा साहेबांशी चर्चा करावीमी सुध्दा आपणा बरोबर येईल. सध्या रिक्त पदाची मंजुरीची कार्यवाही वित्त सचिचाकडुन झालेली आहे अर्बन डेव्हलपमेंट सचिवाकउे कार्यवाही थांबवुन आहेत या संबधी मी नगरविकास मंत्री श्री. तटकरे यांचेशी चर्चा केली व आलेला जी.आर. रद्द करण्याबाबत कारवाई करण्यात येईल असे मला आश्वासन दिलेले आहे.

श्री. सुदाम सोनवणे : प्रश्न देऊन उत्तर मागविले होते की, शहरामध्ये बीपीएल एटीएनटी चे एकुण किती आहेत त्यांना परवानगी केंव्हा दिली तसेच टावर्सच्या ज्या इमारती आहेत त्या इमारतीवर व्यावसायिक दराने कर आकारण्यात आलेला आहे काय, एकुण ग्राह्य किती व उत्पन्न किती असे प्रश्न विचारले होते. उत्तर देण्यात आले कि एकुण ७ टावर्स आहे. त्यापैकी ४ बीपीएलचे व ३ टावर्स एटीएनटीचे आहे. माझ्या माहिती प्रमाणे शहरात एकुण ८ टावर्स असुन एका टावर्स व्यावसायिकास महिन्याकाठी ३ ते ३.५० लाख (तीन ते साडेतीन लाख) मिळतात व सर्व व्यावसायिक धारक महानगरपालिकेला करापोटी वर्षाला फक्त ३ ते ४ लाख रुपये भरतात. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात घट होत आहे.

मा. महापौर : स. माजी महापौर यांनी सुचना केल्यानुसार शहरातील जे टावर्स आहेत ज्यांनी परवानगी घेतलेली नसेल त्यांना तीन दिवसाची नोटीस काढुन तात्काळ तोडण्यात यावेत. माझ्या माहितीप्रमाणे सर्व टावर्स ११ महिण्यासाठीच परवानगी दिलेली होती त्यानंतर परवानगीचे नुतनीकरण

करुन घेतलेली नाही. ज्या घरावर टावर्स आहेत त्या घराचे कम्पलेशन घेतलेले नाही. याची मला कल्पना आहे. घर अनाधिकृत आहे का परवानगी घेतलेली नाही याची संबंधीत आधिकारी यांनी चौकशी करावी त्यातल्या त्यात पुष्पनगरी येथील झालेल्या टावर्स बाबत काही. नागरिकांच्या तक्रारी आलेल्या होत्या याबाबत प्रशासनाच्या वतीने तीन दिवसाच्या आत योग्य नियमाने कार्यवाही करण्यात यावी. पुढील परवानगी देतांना जो पर्यंत कमर्शियल ब्रेक मिळत नाही तो पर्यंत परवानगी देऊ नये. बीपीएल, एटीएनटी, पेजरसाठी वरीलप्रमाणे घेतलेला निर्णय लागु राहिल.

या बरोबरच "जण गण मण" या राष्ट्र गिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | महापौर, |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरगांबाद*

**मंगळवार दि. ३०-०१-२००१ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधरण सभेचे इतिवृत्त. मंगळवार दि. ३०-०१-२००१ रोजी मा. महापौर श्री. डॉ. भागवत किशनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकाच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधन केशव सिताराम ठाकरे" सभागृहात दुपारी १२.०० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसह खालील स. सदस्या उपस्थित होते.**

१) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
२) स.स.श्री. अंबादास दावने
३) स.स.श्री. काशीनाथ हरिभाऊ कोकाटे
४) स.स.श्री. तांबे गणेश रामच्रंद
५) स.स.सौ. सजेदा बेगम विखार अहेमद
६) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
७) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
८) स.स.सौ. धायातिलक लिलावती बाळासाहेब
९) स.स.सौ. कचराबाई लोखंडे
१०) स.स.श्री. शे. शकिल पटेल शे. बुढण पटेल
११) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
१२) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
१३) स.स.सौ. विजया किशोर राहाटकर
१४) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
१५) स.स.सौ. ॲड सुवर्णा उमेश च्रद्रात्रे
१६) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
१७) स.स.श्री. अय्युब खान सरदार खान
१८) स.स.श्री. अ.रशिद अ. सत्तार
१९) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
२०) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
२१) स.स.सौ. रशिदाबेगम गफार यारखान
२२) स.स.श्री. सुनिल बुथवेल वडागळे
२३) स.स.श्री. नासेरखान सरदार खान
२४) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदत्त
२५) स.स.श्री. खरात कुसुमबाई दैलत
२६) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
२७) स.स.सौ. नुसरत बानो फिरोजखान
२८) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
२९) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
३०) स.स.श्री. सुरगोणिवार नारायण चंद्रय्या
३१) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
३२) स.स.श्री. अ.कदीर मौलाना सय्यद

३३) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
३४) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
३५) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
३६) स.स.सौ. शाहिन जफर महमुद जफर
३७) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
३८) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
३९) स.स.श्री. स. सलीम स.युसुफ
४०) स.स.श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
४१) स.स.श्री. गाजी सादोद्यीन गाजी जहीर अहेमद
४२) स.स.श्री. मिर हिदायत अली मीर बसालत अली
४३) स.स.श्री. शेख ईसाक जैनोद्यीन शे.
४४) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
४५) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
४६) स.स.श्री. सलिम पटेल समशेर पटेल
४७) स.स.श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान
४८) स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर
४९) स.स.सौ. बबीता सुभाष कागडा
५०) स.स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज
५१) स.स.सौ. निखत परवीन ऐजाज मैदी

## *स्विकृत सदस्य*

१) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
२) स.स.श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज
३) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग

संवाद

श्री. अंबादास दावने : भुकंपग्रस्तांना आर्थिक मदत देण्यासाठी आजची सर्वसाधारण सभा आपण आयोजित केलेली आहे. प्रथमतः गुजरात राज्यात झालेल्या भुकंपात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना या सभागृहातर्फे ०२ मिनिटे उभे राहुन स्तब्धतापाळुन श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री. अशरफ मोतिवाला : स. सदस्य श्री. दानवे यांनी मांडलेल्या सुचनेस माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठीक आहे, सर्वांनी ०२ मिनिटे उभे राहावे, श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

यावेळा सभागृहातर्फे राज्यात भुकंपात मृत्यु झालेल्या नागरिकांना ०२ मिनिटे सर्वांनी उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली.

**विषय क्र. २२६/१** :

गुजरात राज्यामधील झालेल्या भुकंपग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत विचार विनियम करणे.

चर्चा

मा. महापौर : गुजरात राज्यात ३-४ दिवसांपुर्वी मोठ भुकंप झालेला आहे. या भुकंपात मोठया प्रामाणात नागरिक मृत्युमुखी पडलेले आहे. अनेक नागरिक बेघर झालेले आहे. भुकोपाबाबतची बातमी समजल्या नंतर देश देश विदेशातील जनता मदत कार्यासाठी धारुन आलेली आहे. सध्या तेथे मोठया प्रमाणात मदत कार्य चालु आहे. देश विदेशातुन रोख स्वरुपात आर्थिक मदत व काही प्रमाणात वस्तु रुपाने मदतीचा मोठया प्रमाणात हातभार लागत आहे. हे आपल्या देशावर मोठे संकट आलेले आहे. भुकंग्रस्तांना मदतीच्या रुपाने अन्न-धान्य, पाणी, निवारा, कपडा इ. सुविधा उपलब्ध होण्यासाठी देशातुन परदेशातुन जगातुन म्हटले तरी चालेल आर्थिक मदत होत आहे. आपल्या शहरातील काही मोठमोठया स्वयंसेवी संघटनांनी सुध्दा भुकंपग्रस्तांना मोठया प्रमाणात मदत देण्याचा निर्णय घेतलेला आहे. आपल्या महानगरपालिकेतर्फे भुकंपग्रस्तांना आर्थिक रुपाने किंवा इतर कोणत्या माध्यमातुन मदत करणे गरजेचे आहे नेमकी कोणती मदत करावयाची याबाबत स. सदस्यांनी सुचना करावयात त्यानुसार निर्णय घेण्यात येईल.

श्री. अविनाश कुमावत : रोख रक्कम देण्यापेक्षा तयार करुन अन्न निवाऱ्यासाठी कपडा व जे जखमी झालेले आहेत. त्यांचेवर उपचार करण्यासाठी औषधी देण्यात यावी.

श्री. कदिर मौलाना : मदत कार्य मोठया प्रमाणात लाभलेले आहे. आपण दुरदर्शनवर बाघितले तर बरेचसे नागरिक मातीच्या ढिगाऱ्याखाली दबलेले आहेत. त्यांना काढल्यावर खुप मोठया प्रमाणात जखमी झालेचे दिसुन येत आहे मदत सर्वच करणे जरुरीचे आहे. यात शंकानाही परंतु जे जखमी झालेले आहेत त्यांचेवर औषधोपचार करण्यासाठी एम.जी.एम. हॉस्पीटलमधील ४० डॉक्टरांचा ग्रुप मदत कार्यासाठी काही कर्मचारी २ ॲम्बुलन्स गाडया व औषधी घेऊन गुजरातकडे रवाना झाला आहे. महानगरपालिकातर्फे त्याच प्रमाणे मदत पाठविण्यात यावी. रोख रक्कम देण्याऐवजी आपल्याकडे डॉक्टर गाडया व आवश्यकतेनुसार सामान सुध्दा उपलब्ध होऊ शकते हिच मदत आपल्या महानगरपालिकातर्फे करणे योग्य होईल असे माझे मत आहे.

श्री. सुरजितसिंग खुंगर : स. सदस्यांनी जी सुचना मांडली त्यास माझी संमती आहे. रोख रक्कम न देता औषधी, डॉक्टर्स व आवश्यक म्हणजे अन्न देणे. जरुरी आहे. जे जखमी झालेले आहेत त्यांच्यावर मोठी मोठी ऑपरेशन होईल प्रकृती सुधारावी. लागेल अशा पध्दतीने साहित्य देण्यात यावे. त्यामुळे अनेकाचे प्राण वाचतिल जखमीवर औषधोपचार करण्याबाबतचा हिस्सा आपल्या महानगरपालिकेने घ्यावा असे माझे मत आहे.

श्री. सुदाम सोनवणे : गुजरात राज्यात झालेल्या भीषण भुकंपग्रस्तांना मदतीचा हात भार व्हावा म्हणुन आज विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली त्यांबद्दल मा. महापौर यांचे प्रथमतः मी मनपुर्वक आभार मानतो मदत ही दोन्ही स्वरुपात देण्यात यावी रोख रक्कम व तुर्त तेथील नागरिकांना खाण्यासाठी ताजे तयार असलेले अन्न याशिवाय बेघर झालेल्या नागरिकांना निवाऱ्याकरिता कपडा, ब्लॅकेट, शाल सतरंजी इत्यादी स्वरुपात मदत पाठवणे आवश्यक आहे. तसेच उपचार करण्यासाठी जो डॉक्टर-जाण्यास इच्छुक असतील अशी डॉक्टरांचे एक पथक पाठवावे किल्लारीला भुकंप झाला त्यावेळी बरेच लोक थंडीने उघडयावर पडुन त्यांचा मृत्यु झाला त्यांना

निवाऱ्यासाठी कपडा नव्हता. या शिवाय काही स. सदस्या जाण्यास इच्छुक असतील तर त्यांचे नेतृत्वाखाली एक पथक पाठवुन अन्न व निवासाठी कपडा पाठवण्याची अत्यंत गरज आहे. असे केल्यास बऱ्याच नागरिकांचे प्राण वाचतिल अशी अशा व्यक्त करतो काही प्रमाणात रोख रक्कम ही पाठवण्यात यावी असे माझे मत आहे.

सौ. विजया राहाटकर : स. सदस्यांनी वेगवेगळया प्रकारे मदत देण्यासंबंधी सुचना मांडलेल्या आहेत. तेथील कुटुंबीयांच्या दु:खात आपण सर्व सहभागी आहोत, भुकंप झाल्याची बातमी समताच शहरातील मोठमोठया हॉस्पीटल जसे हेडगेवार एम.जी.एम. येथील डॉक्टरांचे पथक औषधोपचारासह जखमीवर औषधोपचार करण्यासाठी रवाना झालेले आहे. सदर डॉक्टरांचे पथक कार्यान्वित झाल्यानंतर तिकडील असा निरोप आला की, जखमीवर उपचार करण्यासाठी अस्थीरोग तज्ञ डॉक्टर आवश्यकता आहे. मी प्रत्येक स. सदस्यांना अशी विनंती करेल की त्यांच्या वार्डातील जे डॉक्टर अस्थीरोगाचे तज्ञ असतील त्यांना विनंती करुन महानगरपालिकांच्या खर्चाने गुजरात मध्ये भुकंप स्थळी पाठवण्यात यावे. याशिवाय रोख स्वरुपात किंवा वस्तु स्वरुपात मदत मिळण्यासाठी प्रत्येक स. सदस्य व त्यांचे संपर्कात असलेले कार्यकर्ते यांचेकडुन जास्तीत जास्त निधी जमा होऊ शकेल शहरातुन मोठया प्रमाणात मदत जमा होऊ शकेल त्यासाठी सर्व कार्यकत्यांनी एकत्र पुढाकार घेणे जरुरीचे आहे. असे केल्यास रोख रक्कम व काही आवश्यक लागणाऱ्या वस्तु स्वरुपात येथील जनतेकडुन मदत निश्चित होईल यात शंका नाही.

श्रीमती शाहीन जफर : गुजरात राज्यात २-३ दिवसांपुर्वी झालेल्या भुकंपात मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबीयांच्या दु:खात आपण सर्वजण सहभागी आहोत. स. सदस्यांनी तेथील जखमीवर योग्य व तातडीने औषधोपचार करण्यासाठी डॉक्टरांची आवश्यकता आहे असे सुचविले त्याकरिता डॉक्टरांचे एक पथक पाठवावे व महानगरपालिकेचया फंडातुन रोख रक्कम म्हणुन आर्थिक मदतही देण्यात यावी.

सौ. चंद्रभागाबाई दाणे : रोख स्वरुपात मदत होऊ शकेल. औषधोपचारासाठी डॉक्टरांची अनेक पथके तेथे पाहचली आहेत. परंतु जे नागरिक सध्या बेघर झाले थंडीवाऱ्यापासुन त्यांना त्रास होत असेल खाण्यास अन्न नसेल, कपडा नसेल यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन शहरामध्ये मोठमोठो व्यापारी आहेत. त्यांच्याकडुन जविन उपयोगी आवश्यक वस्तु, धान्य या मदतीची मागणी करावी कुणीही नाही. म्हणणार नाही. परंतु सर्वांनी एकत्र येऊन हे करणे गरजेचे आहे. रोख स्वरुपात निधी दिल्यास तो तिथपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. शहरात कार्यकत्यांनी फिरुन मदत रुपाने जमा झालेले सामान एक पथक तयार करुन सामान तेथील नागरिकांसाठी पोहचते करावे.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : गुजरात मध्ये भुकंपामुळे भयानक परिस्थिती निर्माण झालेली असुन देश विदेशातील जनतेचे लक्ष तेथील परिस्थितीवर लागुन आहे. देश विदेशातुन लाखो लोकांचे मदतीसाठी हात पुढे सरसावत आहे. मदत करण्याचा संपुर्ण देशाने निर्णय घेतलेला आहे. आपल्या महानगरपालिकेने काही प्रमाणात आर्थिक मदत किंवा इतर वस्तु रुपाने का होईना मदत देण्यासाठी मा. महापौर यांनी सभा बोलवली त्याबद्दल या सभागृहाच्या वतीने आपले मनपुर्वक अभिनंदन करतो. भुकंपामुळे सर्व घराची पडझड झालेली

असुन तेथील नागरिक बेघर झालेले आहे व तेथील भागाचे संपुर्णतः पुर्नवसन होणार असुन नागरिकांना निवाऱ्यासाठी सरकारच्या व जनतेच्या मदतीच्या माध्यमातुन सुखसोयी उपलब्ध करुन दयाव्या लागणार व त्यासाठी करोडो रुपये खर्च येणार आहे. म्हणुन आपल्या महानगरपालिकेतर्फे रोख स्वरुपात तेथील मुख्यमंत्री यांचे नावे आर्थिक मदत करावी.

श्री. संजय शिरसाठ : आताच स. सदस्य सोनवणे यांनी सुचना केली, सन १९९३ साली किल्लारी येथे भुकंप झाला होता जनतेस खाण्यासाठी अन्न व निवारासाठी कपडा कमी होता असे सांगण्यात आले. अन्न धान्य व कपडा पाठवणे आवश्यक आहे अशी सुचना केली परंतु गुजरात मधील भुकंप वेगळया प्रकारचा झालेला असुन जाण्यास व्यवस्थित रस्ते नाही मोठमोठया भेगा पडलेल्या आहेत आपण अन्न धान्य कपडा व इतर समान पाठवले तर वेळ लागणार, त्यासाठी वस्तु स्वरुपात अन्न धान्य व कपडा न पाठवता रोख रक्कम रु. २१ लाख चालु बजट मधुन देण्यात यावे असे माझे मत आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : आर्थिक मदत तर आपण देण्यारच आहोत परंतु स. सदस्य श्री. सोनवणे यांनी सांगितल्यानुसार अन्न धान्य, कपडा खरेदी करुन पाठवण्यात यावा. महानगरपालिकाच्या अग्निशमण विभागात कर्मचारी उपलब्ध आहे एक पथक मदत कार्यासाठी देण्यात यावे. तसेच डॉक्टरांचेही एक पथक मदतीसाठी पाठवण्यात यावे. आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी पथक तयार करुन दयावे. व या पथकासोबत जे पदाधिकारी स. सदस्य जाण्यास इच्छुक आहे त्यांचे सोबत अन्न धान्य, वस्त्र व निवारासाठी कपडा दिल्यास आपण तेथे गेल्यावर वाटप करुन चांगल्याप्रकारे तात्काळ तेथील नागरिकांना मदत होईल.

श्री. नंदकुमार फुलारी : जो भुकंप झाला त्यामध्ये भुज येथील परिस्थिती दाखवत आहे. जास्त मदत कार्य सुरु आहे परंतु भुजच्या आसपास जी खेडी आहेत ती संपुर्णतः जमीनदोस्त झाली आहेत. नागरिका बेघर झाले आहेत. बरेच नागरिक ढिगाऱ्याखाली अडकुन आहेत महानगरपालिकातील काही स. सदस्य जाण्यास इच्छुक असुन भुज व आसपासच्या खेडयात रवाना होत आहे. स. सदस्य मानधन तर देणारच आहेत. परंतु प्रत्येक स. सदस्यांनी स्वतःच्या खर्चाने एक-एक ब्लॉकेट मदत म्हणुन देण्यात यावे. मदत म्हणुन करोडो रुपये येणार तरी ते कमी पडणार आहे आपल्या महानगरपालिकातर्फे ही एक कोटी रुपयाचा चेक तेथील भुकंप ग्रस्तांना देण्यात यावा.

श्री. शे. ईसाक जैनाद्दीन शे. : भुकंप होऊन जी भयानक परिस्थिती झाली ती थांवविणे अत्यंत गरजेचे आहे. अशी वेळ येऊ नये प्रार्थना करतो. दुरदर्शनच्या माध्यमातुन तेथील परिस्थिती दाखवण्यात येत आहे. ५०० गावामध्ये अद्यापपर्यंत मदत कार्य सुरु झालेली नाही. खेडयामध्ये मदत कार्यासाठी जायचे होते ते गेलेच नाही. जी रोख स्वरुपात मदत होईल ती तेथील भुकंपग्रस्तापर्यंत गेली पाहिजे. जे ढिगाऱ्याखाली अडकलेले आहेत त्यांना तुर्त काढण्याची आवश्यकता आहे. आपल्या महानगरपालिका मधील वर्कचार्जवर कामे करणारे अभियंत्यांना महानगरपालिकाची परवानगी मिळाल्यास विना मोबदला मदत कार्य करण्यासाठी जाण्यास तयार आहे असे त्यांनी लेखी कळविले आहे. यापैकी एका कर्मचाऱ्याने कारगिल युध्दा साठी एक महिन्याचा पगार दिलेला आहे काही कर्मचाऱ्यांनी किल्लारीत झालेल्या

भुकंपात मदत कार्यही केलेले आहे व या मदत कार्यासाठी (१) एक जे.सी.बी.(२) दोन किंवा तीन ट्रॅक्स (३) एक जीप (४) काम करण्यास १५ मजुर (५) एक पोचलेन (हिटाची) अशी मागणी केलेली आहे. व महानगरपालिकातर्फे जे काही खरेदी करुन जसे साडया ब्लॉकेट औषधी ताजे तयार अन्न ज्या ५०० गावामध्ये कुणीही गेले नाही तेथे वरिल अभियंत्यांसोबत पाठवण्यात यावे व तशी परवानगी सभागृहाच्या वतीने देण्यात यावी.

श्री. प्रशांत देसरडा स. सदस्यांनी वेगवेगळया सुचना केलेल्या आहेत जो निधी दयावयाचा तो किती रक्कमेपर्यंत दयावयाचा हे अगोदर ठरविण्यात यावे. निधी स. सदस्यांचा एक महिन्याचे मानधन दयावयाचा झाल्यास १.२५ लाख रुपये जमा होतात. त्या व्यतिरिक्त काही रोख रक्कम किंवा काही वस्तु रुपाने मदत करावयाची का या संबंधी सविस्तर चर्चा करता येईल.

सौ. ॲड. सुवर्णा चंद्रात्रे : भुकंपग्रस्तांना मदत देण्याच्या दृष्टीने लहान बालकांना प्रामुख्याने विचार व्हावा. लहान मुलांवर शारिरीक व मानसिक आघात झालेला आहे. शासनाकडुन प्राथमिक शाळांना जसा प्रौष्टिक आहार पुरवल्या जातो. त्याप्रमाणे फ्रुट पॅकेज (आयले) तयार करुन तात्काळ तेथील मुलांना खाता येतील अशा पध्दतीने महानगरपालिकेतर्फे सोय करण्यात यावी.

सौ. निखत परवीन एजाज जैदी : गुजरात मधील भुकंप ग्रस्त भागात अत्यंत वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे तेथील नागरिकांच्या जीवाच्यावर झालेले आहे. भुकंपग्रस्त झालेल्यांना ताबडतोब व तातडीची व्यवस्था म्हणुन व अन्न खराब होईल व जे भुकंपातुन वाचलेले आहे. त्यांना खाण्यास दिल्यास जे निरोगी आहे ते बिमार पडतील त्यासाठी गृहउपयोगी वस्तु व कच्चे अन्न पाठवावे जेणे करुन त्यांचे संसार उभे राहतील.

तकी हसनखान : गुजरात येथील भुकंपात किती लोकांचा मृत्यु झाला किती ढिगाऱ्याखाली अडकलेले आहे व कित्येक लोक बेघर झाले याचा अंदाज लागु शकत नाही परिस्थिती फार गंभीर झालेली दिसुन येते जशी मदत कार्य होत आहे तशी परिस्थिती समोर येत आहे. काय मदत हवी आहे हे दिसुन येत आहे. परिस्थिती विचारात घेता २१ लाख रुपये देण्यात हरकत नाही. दुसरा मुद्दा उपस्थित झाला अभियंते मदत कार्यासाठी जाण्यास तयार आहे. साहित्य दयावे यास माझी सम्मती आहे व देण्यास हरकत नसावी रोख रक्कम मुख्यमंत्री रिलीफ फंड मार्फत गेल्यास तात्काळ जाईल. राहिला प्रश्न अन्न धान्य, कपडयाचा वस्तु रुपाने अन्न व कपडा पाठवल्यास व तेथे गेल्या वर अनेक भुकंप ग्रस्त अन्न - पाण्यावाचुन व्याकुळ झालेले आहे कुणाला व कशा पध्दतीने वाटप करावे हे समजणार नाही. अडचण निर्माण होईल. त्यासाठी एक गांव निश्चित करावे काही प्रसंग दुरदर्शनव्दारे दिसत आहे बरीच मदत शेवटपर्यंत होत नाही. आजही काही नागरिक मदतीसाठी व्याकुळतेने वाट पहात आहे. त्यांना मदत मिळत नाही. त्यासाठी या शहराचे ८८ नगरसेवक आहे. ५-६ ग्रुप तयार करुन शहरात मदतीसाठी फिरावे कपडा ब्लॅकेट तसेच अन्न धान्य मोठया प्रमाणात लाखो रुपयाचे मिळु शकेल मोठ मोठे व्यापारी शहरात आहे ४-५ किंवटल पर्यंत धान्य मागवले तरी कुणी देण्यास नकार देणार नाही. तसेच औषधीसाठी मा. महापौर. मा. आयुक्त व इतर स. सदस्य सोबत घेऊन मोठमोठया मेडीकल कंपन्याकडे मागणी केल्यास

औषधी मोठया प्रमाणात मिळु शकेल तसे चालता चालता मेडीकल दुकानाकडे मागणी केल्यास कुणीही नाही म्हणणार नाही रोख रक्कम इतर आवश्यक मदतीसाठी जाईलच यात शंका नाही परंतु वस्तु रुपाने खुप साहित्य जमा होऊ शकते ते घेऊन एक ठराविक ग्रपसह पाठवण्यात यावे व तेथे गेल्यावर एक ठराविक गावास मदत निश्चित करावे जेणे करुन भुकंपग्रस्तांना योग्य व आवश्यक ती मदत केल्याचे समाधान होईल व आपल्या महानगरपालिकाच्या पध्दतीप्रमाणे इतर महानगरपालिका एक-एक गाव हस्तगत करुन मदत कार्य करतील व असे केल्याने एक नियोजन बध्द कार्यवाही झाल्याचे दिसुन येईल. सर्वांची इच्छा असेल तर?

श्री. तुळशी बागवाले किशोर : ४ दिवसांपुर्वी गुजरात मध्ये भयानक असा भुकंप झालेला आहे भुकंपात खुप लोकांचा बळी गेला परंतु जे नागरिक जखमी अवस्थेत आहे त्यांना वाचवण्यासाठी आपल्या महानगरपालिकेतर्फे आरोग्य विभागातील ८-१० डॉक्टरांचे पथक व त्यांचे समवेत सहकार्यासाठी काही कर्मचारी असे एकुण २५-३० कर्मचाऱ्यांचे पथक पाठवण्यात यावे जेणे करुन तेथील जखमीवर उपचार होऊन परिस्थिती सुधारेल.

श्री. कोकाटे काशिनाथ : गेल्या २६ जानेवारी रोजी गुजरात मध्ये मोठा प्रलयकारी भुकंप झालेला आहे या भुकंपात वित्त हानी, प्राण हानी मोठया प्रमाणात झालेली असुन बरीच कुटुंबे बेघर झाले अनेक नागरिक मृत्यु मुखी पडले महाराष्ट्रात आपल्या मराठवाडयात किल्लारी येथे सन १९९३ साली भुकंप झालेला होता त्यापेक्षा हा भुकंप मोठया प्रमाणात झालेला असुन खुप मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. मदत कार्य इतर देशातुन व भारताच्या कानाकोपऱ्यातुन मोठया प्रमाणात होत आहे मदत कशा पध्दतीने पोहचता येईल हे प्रत्येक ठिकाणाहुन प्रयत्न होत आहे. व महानगरपालिकेतर्फे भुकंपग्रस्तांना मदत होण्याकरिता आपण विशेष सर्वसाधारण सभा बोलावाली त्या बद्दल धन्यवाद स सदस्यांची मदत देण्यासाठी वेगवेगळया स्वरुपात आपआपले मत मांडले अन्नधान्य, कपडा रोख रक्कम, मनुष्य बळ, यांत्रिक सामुग्री अशा वेगवेगळया स्वरुपात मदत दयावी म्हणुन सुचना केलेल्या आहेत परंतु आजची परिस्थिती पाहता मदत कार्यासाठी भरपुर प्रमाणात लोक तेथे आलेले आहेत म्हणुन जास्तीचे मनुष्यबळ पाठवुन उपयोग नाही उलट अडथळा निर्माण होईल असे दिसते. एम.जी.एम. व डॉ. हेडगेवार रुग्णालयातर्फे काही पथके उपचारासाठी गेली आहे व गेलेले पथकाकडुन येथे अशी माहिती मिळते औषधी कमी पडत आहे. आताच काही स. सदस्यांनी सुचना केली म्हणुन औषधी खरेदी करुन वैद्याकिय मदत महानगरपालिकातर्फे व्हावी असे माझे मत आहे. आज तेथे सौम्य धक्के होत आहे म्हणुन भितीपोटी नागरिक उघडयावर येऊन बसतात. त्यासाठी ब्लॉकेट, सेड टाईप कपडा, उपलब्ध करुन दयावा. काही प्रमाणात निवाऱ्याची सोय होईल. प्रत्येक स. सदस्य आपआपल्या परिने मदत करणार आहे. परंतु महानगरपालिका फंडातुन २१ लाख रुपये देण्याचे मान्य करावे यातुन कपडा ब्लॉकेट, औषधी किती रक्कमेपर्यंत खरेदी करावयाची तसा निर्णय घ्यावा. जास्तीत जास्त मदत होण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशिल रहावे रोख रक्कम देतांना गुजरात मुख्यमंत्री रिलीफ फंडात जमा करावी. कर्मचाऱ्यांचाएक दिवसांचा पगार महापौर परिषदेच्या वेळी मा. आयुक्त यांनी

मा. ना. सदस्यांचे एक महिन्याचे मानधन एकत्रित करुन गुजरात राज्य मुख्यमंत्री रिलीफ पंडामध्ये लवकरच पाठवण्याची कार्यवाही व्हावी.

श्री. अंबादास दानवे : भुकंप ग्रस्तांना आर्थिक मदत देण्यासंदर्भात वेगवेगळया प्रकारच्या सुचना स. सदस्यांनी मांडलेल्या महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतन रु. ६,९०,५५१/- चा चेक मा. आयुक्त यांनी पुढाकार घेऊन भुकंप झाल्यानंतर दुसऱ्या दिवशीच मा. मुख्यमंत्री यांचेकडे दि. २७ तारखेला देण्यात आला. त्याबद्दल मा. आयुक्तांचे प्रथमतः अभिनंदन करतो जगातील सर्वच देश गुजरात मधील भुकंप ग्रस्तांना मदत करत आहे. महानगरपालिका स. सदस्य श्री. तनवाणी यांनी काल गुलमंडी येथे उपक्रम राबवुन रक्तदान शिबीर आयोजित केले. भरपुर रक्त दात्यांनी मदत केलेली आहे जवळपास २५१ रक्ताच्या बाटल्या रक्त जमा झालेले आहे. आणखी नागरिक रक्त देण्यास तयार होते परंतु त्या रक्त पेढीची जी क्षमता होती तेवढे रक्त जमा झाले यावरुन मदतीसाठी जनतेचा मोठा हात लागत आहे असे चित्र दिसुन आले चांगला उपक्रम राबविल्याबद्दल स. सदस्य श्री. तनवाणी यांचे या सभागृहातर्फे अभिनंदन करावयास पाहिजे. जमा झालेल्या रक्तांच्या बाटल्या आजच एक ॲम्बुलन्स (गाडी) घेवुन गुजरात कडे (अहमदाबादमध्ये रवाना होत आहे. भुकंप झालेला संपुर्ण भाग मिलीटरीच्या ताब्यात देण्यात आलेला आहे. खासदार आमदार जे ज्या ज्या संस्थेचे सदस्य असतील त्यांचे एक महिन्याचे मानधन गुजरात राज्य रिलिफ फंडामध्ये जमा करण्याच्या सुचना मा. मुख्यमंत्री यांनी मंत्रीमंडळाच्या बैठकीत केलेल्या आहे. त्यानुसार महानगरपालिकाचे ८८ स. सदस्य आहेत सर्वाचे मानधन एकत्रित करुन व इतर जास्तीत जास्त वेगळी आर्थिक मदत महानगरपालिकातर्फे देण्याबाबत कार्यवाही व्हावी. सामान खरेदी करुन तेथपर्यंत पोहचण्यास वेळ लागेल म्हणुन रोख रक्कम जास्तीत जास्त देण्याबाबत निर्णय घेण्यात यावा. काही अभियंत्यांनी मदत कार्यासाठी जाण्याची इच्छा दर्शविली आहे त्या संबंधी मा. आयुक्त निर्णय घेतील.

श्री. कदिर मौलाना : जाण्याचा येण्याचा हा प्रश्न नाही. वेळ तशी आलेली आहे जाणे योग्य होईल स. सदस्यांचा निधी तर जाईल परंतु तुर्त तेथील नागरिकांना खाण्यासाठी अन्न नाही करिता एक ट्रक भरुन ब्रेड पाठवण्यात यावे. यात जवळपास २५ -३० हजार पॅकेट असतात तुर्त खाता येतील चांगल्या प्रकारे मदत होऊ शकेल एक दिवसांत ट्रक गाडी भुज पर्यंत पोहचु शकेल.

श्री. नंदकुमार घोडेले : मी.व.स.स. सलीम पटेल आम्ही दोघेही मदत कार्यासाठी स्वःर्ख्चाने जाणार आहोत.

मा.महापौर : स. सदस्य श्री. नंदकुमार घोडेले व श्री. सलीम पटेल स्वखर्चाने भुकंपग्रस्त भागात मदत कार्यासाठी जाणार आहेत आणखी कुणाची इच्छा असेल त्यांनी त्यांची नांवे सुचवावी स. सदस्य श्री. नासेर खान, श्री. सुनिल वडागळे जाण्यास इच्छुक आहे. आर्थिक मदत देण्याच्या संदर्भात सभागृहात झालेल्या चर्चेनुसार स. सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, (१) महानगरपालिका-मार्फत आर्थिक निधी उपलब्ध झाला पाहिजे. (२) डॉक्टराचे पथक पाठवले पाहिजे. (३) ग्रामीण भागात जाऊन ढिगाऱ्या खाली अडकलेल्यांना काढण्यासाठी पथक पाठवले पाहिजे अशा तीन प्रमुख सुचना केलेल्या आहेत. तेच स. सदस्य तकी हसनखान यांनी केलेल्या सुचनेनुसार शहरात

सर्वजण वेगवेगळे ग्रुप करुन फिरल्यास वस्तु रुपात अन्न धान्य कपडा जमा होऊ शकतो. डॉक्टरांचे पथक पाठवावयाचे झाल्यास किती डॉक्टर आपल्या महानगरपालिकाकडे आहे व किती डॉक्टर जाऊ शकतील यांचा संबंधीत डॉ. देशपांडे यांनी खुलासा करावा. सध्या जखमीवर उपचार चालु आहे. परंतु प्रेत कुजल्यानंतर जे रोगी होतील त्यांचेसाठी डॉक्टराचे पथक पाठवणे आवश्यक आहे.

श्री. किशनचंद तनवाणी : मी स्वतः माझ्या खर्चाने जाणार आहे. महानगरपालिकातर्फे डॉक्टरांचे एक पथक आमच्या सोबत दिल्यास आम्ही आमच्या खर्चाने घेऊन जाऊ अशी विनंती आहे.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी : महानगरपालिकतर्फे या नैसगिक आपत्तीला मदत करणे गरजेचे आहे. आपल्याकडे जे खास प्रमुख ४-५ डॉक्टर्स आहेत त्यांना पाठवता येईल व काही महिला डॉक्टर जाण्यास तयार असतील तर त्यांना तशी विनंती करुनही पाठवता येईल असे एकुण ५-६ डॉक्टराचे पथक व त्यांच्या मदतीसाठी काही नर्सेस व कंपाऊडर ही पाठवण्यात येतील एकुण १०-१५ कर्मचाऱ्यांची ग्रुप तयार करुन पाठवण्याची कार्यवाही आज करण्यात येईल.

श्री. कदीर मौलाना : एक पथक डॉक्टरांचे तयार होत आहे परंतु दुसरे एक पथक तयार करुन जे जखमी आहे त व सर्वावर उपचार होतील अशा रितीने पथक पाठवण्याची कार्यवाही व्हावी.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी : सध्यास्थितीत तेथील परिस्थितीचा आढावा घेतल्यास जे जखमी अवस्थेत आहे त्यांचेवर उपचार चालु आहे. परंतु जी प्रेते ढिगाऱ्याखाली आहेत त्याची दुर्गंधी सुटेल व इतर चांगल्या अवस्थेत असलेल्यांना एपीडेमीक ची रोगराई लागु नये म्हणुन तशा प्रकारचे उपचार करण्याच्या दृष्टीने औषधी सोबत न्यावी लागेल. आता सध्या तेथे पाणी सुध्दा दुषित झाले असेल हे सर्व सावरण्यासाठी हॅल्डोजन गोळया जवपास महिनाभर जवळ ठेवुन वापर करावा लागणार आहे.

मा. महापौर : या सभागृहाचे स. सदस्य श्री. तनवाणी व माजी महापौर/खासदार श्री. प्रदिपजी जैस्वाल हे भुकंप ग्रस्तांसाठी काल जमा केलेल्या "ब्लड बॅक" (रक्ताच्या बाटल्या) घेऊन जाणार आहे त्यांच्या सोबत महानगरपालिका डॉक्टरांचे पथक पाठवण्याची तात्काळ कार्यवाही व्हावी. सदर पथकाच्या खर्च स्वतः स. सदस्य करणार आहे. स. सदस्य यांनी रक्तदाने शिबिर घेऊन उपक्रम राबविला व चांगला प्रकारे भुकंपग्रस्तांसाठी मदत केलेली आहे. म्हणुन त्यांचे या सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते

१) सध्या तेथे तातडीच्या औषधोपचाराची मदतीची गरज नाही. परंतु ज्यांचा मृत्यु झालेला आहेत. त्या प्रेताचा वास सुटण्याची संभावना असुन त्यापासुन जे लोक भुकंपातुन वाचलेले आहे त्यांना रोगाची लागण होण्याची भिती आहे त्यासाठी महानगरपालिकातर्फे जे डॉक्टराचे पथक जाणार आहे त्याच्या सोबत आवश्यक ती औषधी देण्यात यावी या पथकाचे नेतृत्व स. स. तनवाणी हे करतील.

२) डॉक्टरांचे पथक ज्या गावात मदत कार्य करणार त्याच गावामध्ये तसे घर पडलेले असेल रस्ता व्यवस्थित नसेल, ढिगाऱ्याखाली जी प्रेते दबलेली आहेत.इ. सर्व मदत करण्यासाठी फिजीकल वर्कची आवश्यकता

आहे म्हणुन अभियंते पाठवुन उपयोग नाही. तेथे अग्निशमन दलाचे जवान व काम करणाऱ्या कामगारांची आवश्यकता आहे. त्यांचे सोबत २/३ गाडया व अग्निशमन दलाचे जावन व त्यांना वाटेल ते कर्मचारी आणि दुसरा १५-२० कामागार कर्मचाऱ्यांचा एक ग्रुप करुन मदतीसाठी पाठवण्याची आवश्यकता आहे तशी कार्यवाही करण्यात यावी.

३) रोख स्वरुपात साहाय्य करावयाचे झाल्यास स. सदस्यांचे एक महिन्याचे मानधन देण्यास मान्यता देण्यात येते या शिवाय महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिकातर्फे २१ लाखाचा चेक देऊन तो गुजरात राज्य रिलीफ फंडात जमा होईल अशा पध्दतीने देण्यात यावा.

४) जी औषधी दयावयाची आहेत त्याची सविस्तर यादी तयार करण्यात यावी त्याप्रमाणे औषधी पाठवण्याचे कार्यवाही व्हावी ज्या गावात डॉक्टरांचे पथक जाईल तेथेच अग्निशमन दलाचे पथक मदत कार्यासाठी जाईल. त्याचे नेतृत्व स. सदस्य श्री. नंदकुमार घोडेले व श्री. सलीम पटेल करतील कोणत्या गावात मदत कार्य चालु आहे याची माहिती संबंधीत नगर सेवक यांनी वेळोवेळी दयावी.

श्री. कदीर मौलाना, श्री. नंदकुमार फुलारी : जी औषधी खरेदी करणार ती किती रक्कमेपर्यंत खरेदी करणार याचा खुलासा करावा. कमीत कमी ५ लाखापर्यंत औषधी खरेदी करावी असे माझे मत आहे.

मा. महापौर : डॉ देशपांडे हे लागणारी आवश्यकत औषधाची यादी बनवतील व किती खर्च येईल याची संचीका करुन मा. आयुकतांची मंजुरी घेतील. २१ लाखरुपयाचा निधी स्वतंत्र रित्या देण्यात येईल व औषधी खरेदीसाठी ५ लाख रुपयाची तरतुद करण्यात येते त्याप्रमाणे औषधी खरेदी करण्याची कार्यवाही व्हावी.

श्री. जयवंत ओक : आर्थिक मदत तर देश-विदेशातुन येणारच यात शंकानाही औषधी येतील घर उपयोगी साहित्य येतील परंतु सध्या तेथे बरेच नागरिकांचे घेरे उध्वस्त झालेली आहेबेघर झालेली आहे अशासाठी निधी न पाठवता किमान १०-२०,५०-१०० घरे उभे राहतील, बांध्ता येतील त्यांचे संपुर्णतः संसार उभे राहतील, अशी काही रक्कमेची तरतुद करावी यामुळे महानगरपालिका औरंगाबादचे नाव निघेल, औषधी, रोख, रक्कम तर भरपुर प्रमाणात जमा होईल, रोख रक्कम न देता घरे बांधण्यासाठी किती रक्कम लागेल त्याची तरतुद करण्यात यावी असे माझे मत आहे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. ओक आपली सुचना माझ्या लक्षात आलेली आहे. महानगरपालिका जे पथक जाणार आहे ते मदत कार्य करणार निवाऱ्याची तात्पुरती व्यवस्था करणार आहे.

श्री. अशरफ मोतीवाला : गुजरात राज्यात झालेल्या भुकंपग्रस्त कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सर्व सहभागी आहोत मा. आयुक्त परवानगी देत असतील तर माझे पुढील २ वर्षांचे मानधन भुकंपग्रस्तांच्या मदतीसाठी देण्यास तयार आहे त्याप्रमाणे प्रशासनाच्या वतीने कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : या शहरात फिरते पथक काढुन आपआपल्या परिने प्रत्येक स. सदस्यांनी भुकंपग्रस्तासाठी आर्थिक मदत जमा होऊ शकेल. जमा निधी जे पथक मदत कार्यासाठी पुढे जाणार आहे त्यांच्याकडे पाठवता येईल किंवा दुसरे पथक

तयार करुन सर्व जमा झालेले सामान पाठवता येईल. या प्रस्तावास सर्वनुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

गुजरात राज्यात झालेल्या भुकंपग्रस्तांना आर्थिक मदत देण्यासंबंधी सभागृहात झालेल्या चर्चेनुसार :

१) गुजरात मध्ये भुकंप झालेल्या ठिकाणी तेथील नागरिकांवर औषधोपचार करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे डॉक्टरांचे एक पथक रवाना करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते तसेच भुकंपग्रस्तांसाठी महानगरपालिकातर्फे करण्यात येणाऱ्या औषधोपचारासाठी रु. ५ लाखाची औषधी खरेददी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. औषधी खरेदी करण्याऐवजी मंजुर करण्यात आलेल्या रु. ५ लाख रक्कम मुख्यमंत्री गुजरात राज्य रिलीफ फंडात जमा करण्यात यावी. महानगरपालिका डॉक्टरांचे पथक स. सदस्य श्री. किशनचंद तनवाणी व स. माजी खासदार श्री. प्रदिपजी जैस्वाल यांचे नेतृत्वाखाली काम करील तसेच गुजरात मध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवकाची गरज असल्यामुळे महानगरपालिकातर्फे अग्निशमन दलाचे एक पथक २/३ गाडयासह रवाना करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते व सदर पथकाचे स. सदस्य श्री. घोडेले व श्री. सलीम पटेल त्यांचे काम करतील . गुजरात मध्ये गेलेल्या पथकाने, आपले पथक नेमके कोणत्या ठिकाणी मदत कार्य करत आहे. याबाबत महानगरपालिकेस त्वरीत माहिती द्यावी असे सर्वानुमते ठरले.

२) औरंगाबाद महानगरपालिकातील ८८ स. सदस्यांचे एक महिन्याचे मानधन मुख्यमंत्री गुजरात राज्य रिलीफ फंडात जमा करुन गुजरात येथील भुकंपग्रस्तांना आर्थिक मदत पुरविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

३) महानगरपालिका फंडातुन २१ लाख रुपयाची आर्थिक मदत मुख्यमंत्री गुजरात राज्य रिलीफ फंडात जमा करुन आर्थिक मदत देण्यास सर्वांनुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जण गण मण" या राष्ट्र गिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १६-२-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त. शुकवार दिनांक १६-२-२००१ रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील. "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात "मा. महापौर डॉ. श्री. भागवत कराड यांचे अध्यक्षते खाली सर्वसाधारण सभेची "वंदेमातरम्" या गीताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकातील अधिकाऱ्यासह खालीले सन्माननीय नगरसेवक उपस्थित होते.**

१) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
२) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
३) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
८) स.स.श्री. शिंदे राजु रामराव
९) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१०) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
११) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१२) स.स.सौ. धायातिलक लिलावती बाळासोहब
१३) स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१४) स.स.श्रीमती. किवळेकर जयश्री सारंग
१५) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१६) स.स.श्री. शे. शकिल पटेल शे. बुढण पटेल
१७) स.स.श्रीमती. डॉ. आशा उत्तम बिनवडे
१८) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१९) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२०) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२१) स.स.सौ. विजया किशोर राहाटकर
२२) स.स.सौ. ॲड सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२३) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२४) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२५) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२६) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२७) स.स.श्री. अय्युबखॉन सरदारखॉन
२८) स.स.श्री. अ. रशिद अ. सत्तार
२९) स.स.श्री. जैन विकास रतनलाल
३०) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
३१) स.स.श्री. शिरसाट संजय पांडुरंग
३२) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर

३३) स.स.श्री. रशिदा बेगम गफ्फार यारखॉन
३४) स.स.श्री. वडागळे सुनिल बुथवेल
३५) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३६) स.स.श्री. स. मुमताज अली मोज्जम अली
३७) स.स.श्री. नासेरखॉन सरदारखॉन
३८) स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव
३९) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४०) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
४१) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४२) स.स.श्री. नुसरत बानो फिरोजखॉन
४३) स.स.श्री. श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
४४) स.स.सो. मोरे जयश्री कुमारराव
४५) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४६) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४७) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
४८) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
४९) स.स.श्री. कदिर मौलाना सय्यद
५०) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
५१) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५२) स.स.श्री. संगिता बाळु मैंद
५३) स.स.श्री. नासरिखॉन अ. रहेमानखॉन कुरेशी
५४) स.स.सौ. शाहिन जफर महमुद जफर
५५) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५६) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५७) स.स.श्री. स. सलीम स. युसुफ
५८) स.स.श्री. तकी हसनखान कासीम हसनखान
५९) स.स.श्री. गाजी सादोद्यीन गाजी जहीर अहेमद
६०) स.स.श्री. मिर हिदायत अली मीर बसालत अली
६१) स.स.श्री. शेख ईसाक जैनोद्यीन शेख
६२) स.स.श्री. अफसरखॉन यासीनखॉन
६३) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६४) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
६५) स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
६६) स.स.श्री. तुळशी बागवाले किशोर
६७) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६८) स.स.सौ. बबीता सुभाष कागडा
६९) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
७०) स.स.सौ. निखत परवीन ऐजाज झैदी

## *स्विकृती सदस्य*

१) स.स.श्री. भगवान देविदास घडामोडे
२) स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनाराण
३) स.स.श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज
४) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५) स.स.सौ. सलमाबानो मिर मो. अली.

थोर साहित्यीक स्व. वसंत कानेटकर अभिनेत्री भक्ती बर्वे, जेष्ठ कार्यकर्ते विठ्ठलराव गाडगीळ तसेच या सभागृहाचे स. सदस्य श्री. अफसर खॉन यांचे वडील पै. यासिनखान यांच्या निधना निमित्त सभागृहाने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली.

संवाद

श्री. नंदकुमार घोडेल : या सभागृहाचे स. सदस्य श्री. दलबीरसिंग जबिंदा यांची गुरुव्दारच्या कमिटीवर निवडुन आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे.

श्री. जयवंत ओक : यास माझे अनुमोदक आहे.

मा. महापौर : सभागृहाचे स. सभासद श्री. दलबीरसिंग जबिंदा याची गुरुव्दार कमिटीवर सदस्य म्हणुन ते निवडुन आलेले आहे त्याबद्दल त्यांचे या सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येतआहे.

श्री. सुरजितसिंग खुंगर : गुजरात मधील भुकंपग्रस्ताच्या मदतीसाठी या सभागृहाचे स. सदस्य श्री. घोडेले, श्री. तनवाणी, श्री. सलीम पटेल तसेच माजी स. सदस्य श्री. प्रदिपजी जैस्वाल यांनी प्रत्यक्ष तेथे जाऊन मदत कार्य केलेले आहे. त्याबद्दलया सभागृहातर्फे त्यांचा अभिनंदन करावे.

मा. महापौर : नुकत्याच गुजरात राज्यात झालेल्या भुकंपात मदत कार्य करण्यासाठी या सभागृहाचे स. स. श्री. घोडेले, श्री. तनवाणी, श्री. सलीम पटेल तसेच माजी स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांनी प्रत्यक्ष तेथे जाऊन चांगल्या प्रकारे मदत कार्य केलेले असल्याने या सर्वाचे या सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते.

श्री. नंदकुमार घोडेले, श्री. जयवंत ओक : विषय पत्रिका सुरु करण्यापुर्वी सर्वसाधारण चर्चा व्हावी.

मा. महापौर : चर्चेसाठी वेळ दिला जाईल. अगोदर विषयपत्रिकेवर चर्चा करावी नियमाप्रमाणे चर्चा सुरु करु शकत नाही. त्या अगोदर विषयपत्रिका मंजुर करणे गरजेचे आहे. चर्चा केल्यानंतर विषयप्रत्रिका मंजुर करण्यास वेळ नसतो. विषयपत्रिकेवर कमी विषय आहेत.

श्री. नंदकुमार घोटेले : या अगोदर विषयपत्रिका सुरु करण्यापुर्वी जनरल चर्चा केलेली आहे. आताच का चर्चा अगोदर घ्यावयाची नाही.

श्री. अंबादास दानवे : अगोदर चर्चा करण्यात यावी नंतरच विषयपत्रिका सुरु करण्यात यावी.

मा. महापौर : ठिक आहे. चर्चा करण्यात यावी चर्चेसाठी फक्त तासाचा अवधी देण्यात येतो.

श्री. कुमावत अविनाश : प्र. शिक्षणधिकारी पदाचा चार्ज ज्यांच्याकडे होता त्यांचेकडुन काढण्यात आलेला आहे व त्यांचे जागेवर लवकरच शासनाचे अधिकारी येणार असल्याची बातमी वृत्तपत्रात आलेली आहे. लवकरच शासनाचे अधिकारी येत असतील तर त्यांनाच तोपर्यंत शिक्षणधिकारी पदावर ठेवावे.

श्री. अंबादास दानवे : मागील दीड वर्षापासुन शिक्षणाधिकारी हे पद महानगरपालिकेत रिक्त असुन या पदावर वर्ग- ३ मध्ये येणार सांस्कृतिक अधिकारी सौ. कुलकर्णी यांचेकडे चार्ज दिलेला होता. एक जबाबदारीचे काम देण्यात आलेले होते. शिक्षणाधिकारी पदावर अधिकारी येणार अशा प्रकारचा फॅक्स आपल्याकडे आलेला आहे. असे मला वाटते. दीड वर्षापासुन सांस्कृतिक अधिकारी यांचेकडे चार्ज होता मागील सर्वसाधारण सभेत त्यांना त्या पदावरुन काढण्या संदर्भात ठराव पास केला त्यानुसार त्यांना काढुन ज्यांचेकडे चार्ज देण्यात आला त्यांची सेवाभरती नियमानुसार पात्रता आहे का? माझ्या माहिती प्रमाणे ज्यांचेकडे चार्ज दिला आहे ते कर्मचारी जि.प. कडुन महानगरपालिकेकडे वर्ग झालेले आहे. व जेष्ठतेचा विचार केल्यास त्याची जेष्ठता येत नसावी असे माझे मत आहे. या पदावर शासनाचे अधिकारी लवकरच येत असतील तर दोन चार दिवसासाठी या पदाचा चार्ज उपआयुक्तांकडे ठेवावा अशी माझी सुचना आहे.

श्री. जयवंत ओक : ज्यांच्याकडे प्र. शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज होता तो काढण्यात आलेला आहे. वृत्तापत्रात तशी बातमी आलेली आहे. महानगरपालिकामध्ये बऱ्याच विभागाचे प्र. अधिकारी म्हणुन चार्ज देण्यात आलेले आहे. त्यांचेकडुनही चार्ज ताबडतोब काढण्यात यावे अशी मा. आयुक्तांना विनंती आहे. आजच्या आज ४.०० वाजेपर्यंत ज्यांचेकडे चार्ज आहेत ते काढण्यात यावे. कुणावर अन्याय होणार नाही याची दक्षता शासनाकडुन लवकरच शिक्षणधिकारी पदावर अधिकारी येणार आहे असे कळते. तर दोन -चार दिवसासाठी प्र. शिक्षणधिकारी यांचा चार्ज काढुन त्यांना अपमानित करण्याचे कारण काय व त्यांचे जागेवर एका शिक्षकांना बसविण्यात आले हे प्रशासनाचे धोरण योग्य नाही. यास माझा विरोध नाही परंतु इतर अधिकाऱ्यांकडे जे अतिरिक्त चार्ज दिलेले आहे. त्यांचेकडुनही आजच्या आजच काढुन घेण्यात यावे नसता ज्या शिक्षकाकडे चार्ज दिला आहे. तो उपआयुक्तांनी घ्यावा. आपल्याकडे उपआयुक्त पदावर २ महिन्यापासुन कुणी नाही. शहर अभियंता नाही, विधी सल्लगार नाही. या पदांवरही जे जेष्ठतेत येत असेल त्यांना अतिरिक्त तात्पुरते कार्यभार देण्यात यावे. एका विभागात कारवाई होते एका विभागत होत नाही हे धोरण योग्य नाही.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : ६-७ दिवसात नवीन शिक्षणधिकारी रुजु होणार असे वृत्तपत्रात आलेले आहे. प्र शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज काढुन एका शिक्षककडे तातडीने देण्याची का गरज भासली या अगोदरही या पदावर एका शिक्षकाची नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यावेळी काय परिस्थिती निर्माण झाली हे प्रशासनास सर्व माहिती असतांना सुध्दा एका शिक्षकाकडे पुन्हा शिक्षणधिकारी पदाचा चार्ज देणे योग्य नाही व नवीन अधिकारी रुजु होईपर्यंत ज्याचेकडे या पदाचा चार्ज होता त्यांचे कडेच ठेवावा.

श्री.अफसरखॉन : प्र शिक्षणांधिकारी यांना या पदावरुन काढण्याचा ठराव गेल्या २ महिण्यापुर्वी पारीत झालेला असतांना आज त्या संबंधीची कार्यवाही झालेली आहे. एवढा उशीर का झालेला आहे. ज्या शिक्षकाकडे चार्ज देण्यात आलेला आहे ते पात्र आहे किंवा काय यांची चौकशी करण्यास हरकत नाही परंतु वर्ग- ३ मधील सांस्कृतिक अधिकारी यांचेकडे दीड वर्षापासुन शिक्षणाधिकारी पदाच्या चार्ज कोणत्या पात्रतेचा निकर्ष लावुन देण्यात आलेला होता याचाही

प्रामुख्याने मा. आयुक्तांनी खुलासा करावा. जास्तीत जास्त ६ महिन्याच्या वर अतिरिक्त अतिरिक्त चार्ज ठेवु शकतो.

मा. महापौर : दोन महिन्यापुर्वी एक ठराव होऊन प्र. शिक्षणाधिकारी पदावर जे कार्यरत आहे त्यांचेकडुन चार्ज काढुन जे जेष्ठ मुख्याध्यापक असतील त्यांचेकडे या पदाचा चार्ज देण्यात यावा असा ठराव एकमताने या सभागृहाने मंजुर केला व पुन्हा इतिवृत्त कायम होत असतांना सुध्दा कुणीही या ठरावाबाबत आक्षेप घेतलेला नाही. इतिवृत्त कायम झाल्यानंतर प्रशासनाच्या माध्यमातुन २ दिवसापुर्वी या संदर्भात कार्यवाही झालेली आहे.

श्री. निकाळजे प्रकाश : ज्या शिक्षकाकडे चार्ज देण्यात आला ते पत्र आहेत काय? कारण की या अगोदर ही या पदावर एका मुख्यध्यापकास चार्ज देण्यात आलेला होता त्या मुख्यध्यापकाने स्वतःचे सी.आर. स्वतःच्या सहीने पाठवले होते. वेळ आता पुन्हा येऊ नये यासाठी प्रशासनाने योग्य ती दखल घ्यावी.

श्री. अंबादास दानवे : नवीन शिक्षणधिकारी २ दिवसात येणारच होते तर तात्काळ चार्ज काढण्याची आवश्यकता प्रशासनास का भासली असे आमचे म्हणणे आहे.

मा. महापौर : आपण शिक्षणाधिकारी पदावरुन चार्ज काढण्याबाबत प्रस्ताव सर्वानुमते पारित केलेला आहे त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही केलेली आहे. (पारीत झालेला ठराव सभागृहात वाचुन दाखवतात) सभागृहाचा विरोध असेल तर पुन्हा निर्णय बदलता येईल.

श्री. अफसरखॉन : सुरक्षा विभागातील कर्मचाऱ्यांना काढुन टाकण्यासंदर्भात सभागृहाच्या निर्णयानुसार दोन दिवसात कारवाई होते परंतु दोन महिण्यापासुन ठराव पारित झालेला असतांना का उशीर झाला दीड वर्षापासुन त्याचेकडे अनधिकृतपणे चार्ज देण्यात आलेला होता.

मा. महापौर : इतिवृत्त कायम व्हायचे होते म्हणुन कारवाई करण्यास उशीर झालेला आहे.

श्री. सुदाम सोनवणे : शिक्षणाधिकारी पदावर प्र. शिक्षणाधिकारी म्हणुन एका जेष्ठ मुख्यध्यापकास चार्ज देण्याचा अशासकिय ठरावानुसार प्रशासनाने महत्व दिले व तात्काळ कार्यवाही केल्याबद्दल प्रशासनाचे तसेच मा. महापौर यांचे की मनपुर्वक अभिनंदन करतो. या अगोदरही अशाप्रकारे ठराव पारीत इ ाालेले आहे परंतु कारवाई केलेली नाही. माहिती घेतली असता सदर प्रस्ताव अशासकीय असल्याचे उत्तर संबंधीत विभागाकडुन येते. शिक्षणाधिकारी पदाच्या संदर्भात ठरावानुसार जी कार्यवाही प्रशासनाने केली ती कौतुकास्पद आहे. महानगरपालिकामध्ये बरेच पदांचे अतिरिक्त पदभार दिलेले आहेत. स्लम विभागाचा विचार केला तर २ वर्षापासुन एकाच अधिकाऱ्याकडे चार्ज दिलेला आहे. अशा प्रकारचे अतिरिक्त चार्ज ज्या ज्या विभागाचे दिलेले असतील ते ताबडतोब काढण्यात यावे. व जी पदे रिक्त आहे ती ताबडतोब भरण्याची कार्यवाही व्हावी. कारण जी पदे रिक्त आहे ती भरण्यास शासनाची मान्यता घेणे गरजेचे नाही असे मला वाटते जर आवश्यकता असेल तर तशी कारवाई प्रशासनाने करावी व तात्काळ रिक्त पदावर अधिकारी नेमावेत तसेच मा. आयुक्तांकडे पत्र देऊन कळविले की, महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाचा व्याप मोठा झालेला असुन महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागातील कार्यकारी अभियंता दर्जाचे आपल्या विभागात एक पद भरावे त्यामुळे कामे करण्यास सोपे जाईल. या विभागातील अधिकाऱ्यांना पाणी पुरवठा संदर्भात चांगल्याप्रकारे अनुभव आहे. त्यामुळे

शहरातील नागरिकांना वेळेवर पाणी मिळेल या दृष्टीने पत्र दिल्या नुसार कार्यवाही व्हावी. ज्या जेष्ठ मुख्यध्यापकाची प्र. शिक्षणाधिकारी म्हणुन नियुक्ती केली ते पात्र आहे किंवा काय याची पुन्हा प्रशासनामार्फत चौकशी करण्यास हरकत नाही. व म. आयुक्तांनी अशासकिय प्रस्तावास प्राधान्य दिले व चांगला निर्णय घेतलेला आहे.

श्री.आनंद तांदुळवाडीकर : स. सदस्य श्री. ओक यांनी सुचनेव्दारे जो प्रश्न विचारला त्याचे उत्तर देण्यात यावे.

श्री. घोडेले नंदकुमार : ठराव पास केल्यानुसार प्रशासनाने कार्यवाही केली, आनंद आहे परंतु ज्याची प्र. शिक्षणाधिकारी म्हणुन नियुक्ती केली त्यासाठी कोणता निकर्ष लावण्यात आला नियमात बसते का याचा मा. आयुक्तांनी खुलासा दयावा.

श्री. जयवंत ओक : अशासकिय ठराव पास होऊन व त्यानुसार अपात्र कर्मचाऱ्यांची अधिकारी पदावर नियुक्त्या होत असतील तर यापुढे असे प्रकारचे प्रस्ताव येऊन मंजुर केल्यास याच पध्दतीचा अवलंब मा. आयुक्तांना करावा लागेल. हा चुकीचा पायंडा पडत असुन प्रशासनाने नियमाने कार्यवाही करणे गरजेचे आहे.

श्री. अफसरखॉन : सांस्कृतिक अधिकारी यांचेकडे दीड वर्षापासुन प्र. शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज कोणत्या नियमाने दिलेला होता. याचाही खुलासा प्रशासनाने करावा.

मा. महापौर : उपआयुक्त यांनी या संदर्भात सविस्तर खुलासा करावा.

मा. उपआयुक्त (प्रशासन) : मागील दोन महिण्यापुर्वी पारीत झालेला सर्वसाधारण सभेच्या ठराव नुसार माध्यमिक शिक्षकामधुन जे जेष्ठ आहेत, व १९९८ ला जी जेष्ठता यादी अंतीम करण्यात आली त्यानुसार १ क्रमांकावर श्री. जैवल होते ते जि. प. कडे गेलेले आहे व दोनच्या क्रमांकावर श्री. शिखरे नावाचे मुख्यध्यापक आहे. जेष्ठतेनुसार व सर्वसाधारण सभेच्या ठरावनुसार तात्पुरत्या स्वरुपात अतिरिक्त शिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार त्यांचेकडे सोपविला आहे. कायमस्वरुपी नाही. महानगरपालिकेमध्ये सध्या उपआयुक्त (म.) २ महिनेपासुन, शहर अभियंता १ वर्षापासुन तसेच विभागीय अधिकारी -३ पदे ६ महिन्यापासुन विधी सल्लागार ३ वर्षापासुन अशी विविध पदे रिक्त आहे. या संदर्भात मा. महापौर तसेच प्रशासनातर्फे शासनाकडे ही पदे भरण्यासाठी वेळोवेळी पत्रव्यवहार झालेला आहे कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. शासनाची मंजुरी मिळल्यावर ताबडतोब कार्यवाही होईल.

मा. महापौर : सभागृहातील स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता शिक्षणाधिकारी पदावर प्र. शिक्षणाधिकारी म्हणुन ज्या शिक्षकाची नियुक्ती केलेली आहे ती नियुक्ती रद्द करुन उपआयुक्त यांचेकडे शिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार तात्काळ देण्यात यावा व उपआयुक्त हे शिक्षणाधिकारी पदाचे काम पाहतील. महानगरपालिकेतील रिक्त असलेल्या पदा संदर्भात माझेसह सर्व महानगरपाीलिकाचे पदाधिकारी मुख्य सचिव तसेच मुख्यमंत्री यांना वारंवार भेटलेले आहे. महानगरपालिकेत एकुण ८८ विविध पदे रिक्त आहे. या पदास शासनाची मंजुरी घेण्यासाठी येत्या २० तारखेला मंत्रालायत बैठक बोलवली आहे. त्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात येणार आहे. आता दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

श्री. जयवंत ओक : शिक्षणाधिकारी पदावर जेष्ठतेनुसार एका मुख्यध्यापकाची २ दिवसासाठी नियुक्ती केली त्याचप्रमाणे इतर विभागात सुध्दा रिक्त असलेल्या पदावरील अधिकारी यांचेकडुन चार्ज काढुन जेष्ठतेनुसार २ दिवसासाठी नियुक्त्या कराव्यात एका विभागात कार्यवाही होते व इतर विभागात का नको माझ्या प्रश्नाचा खुलासा देण्यात यावा.

(याच वेळी स. सभासद मोठमोठयाने बोलतात काही स. सदस्य मा. महापौर यांचे डायस जवळ जाऊन बोलतात. काहीही ऐकावयास येत नाही.)

मा. महापौर : स. सदस्य श्री. ओक यांनी केलेल्या प्रशानावर कार्यवाही करेल शिक्षणाधिकारी पदा संदर्भात विषय आत संपलेला आहे. सर्वांनी खाली बसुन घ्यावे. जर सविस्तर चर्चा करावयाचा नसेल तर विषय क्र. १ वर बोलावे.

श्री. अंबादास दानवे : मागील महिन्यात गुजरात राज्यात मोठा भुकंप होऊन मोठया प्रमाणात जी मनुष्य हानी झाली ती तेथील मोठमोठया शहराचा सुध्दा भुकंपात समावेश आहे. शहरातील जास्तीच्या प्रमाणात नागरिकांना मृत्यु आलेला आहे. मोठमोठया इमारतीचा बांधकामाचा निकृष्ठ दर्जा बांधकामातील दोषामुळे . वेगवेगळया डिझाईनचा दोष, तसेच इमारतीचा देखभालीत झालेला कसुर यामुळे मोठया प्रमाणात नागरिकांचा मृत्यु झालेला आहे असे म्हणता येईल. हा दृष्टीकोन समोर ठेवुन पुर्ण महानगरपालिकेने यापुढे इमारती बांधतांना बांधकाम वास्तुरचनावर तसेच बांधकाम अभियंता हे दोन्ही नोंदणीकृत असावेत. तसेच बांधकामाचा गुजरात राज्यात पायापासुन शेवटपर्यंत देखरेख करणारा पर्यवेक्षक पदवी प्राप्त अभियंता असुन तोही नोंदणीकृत असावा. या तीनही अधिकाऱ्याकडुन चांगल्या कामाचा दर्जा मिळेल अशी लेखी हमी स्वाक्षरीसहीत घेतली जावी. असा निर्णय पुणे महानगरपालिकेने घेतलेला आहे. त्याचा विचार करता या शहरात सुध्दा इमारतीच्या बांधकामात वेगवेगळया प्रकारच्या त्रुटी आढळुन येत आहे. व अशा नागरिकांच्या अनेक तक्रारी सुध्दा प्राप्त झालेल्या आहे. या धरतीवर नैसर्गिक आपत्ती केव्हा होईल हे सांगता येत नाही. महानगरपालिकेमध्ये नगररचना विभागामार्फत अनेक ठिकाणी चुकीच्या बांधकामास परवानगी दिलेली आहे. व अनधिकृत बांधकामे अनेक ठिकाणी झालेली दिसुन येत आहे सभागृहात मी असा प्रश्न करु इच्छितो की, भुकंपाची परिस्थिती समोर ठेवुन भविष्यात इमारतीना बांधकाम परवानगी देण्यासाठी वेगवेगळया इमारतीना वेगवेगळया पध्दतीने निकर्ष लावणार आहात काय? लावणार असाल तर कोणते निकर्ष लावणार याचा खुलासा करावा.

मा. महापौरः गुजरात राज्यात झालेला भुकंप विशेषतः शहरामध्ये झालेल्या भुकंपात इमारती बांधकामाचा दर्जा चांगला नसल्याने बऱ्याच नागरिकांचा मृत्यु झालेला असुन दुदैवाने आपल्याकडे सुध्दा केव्हाही भुकंप होऊ शकतो, नैसर्गिक आपत्तीस आपण रोखु शकत नाही. म्हणुन आपण आपल्या शहराचा विचार करता यापुढे जे बांधकाम परवानगी देणार आहोत व ते देत असतांन कोणकोणती काळजी घ्यावयास पाहिजे. या संबंधी नगररचना विभागाने पुढील बैठकीत सविस्तर माहिती ठेवावी.

श्री. गायकवाड राधाकृष्ण : गुजरात मध्ये झालेल्या भुकंप व त्याच प्रमाणे आपल्या ही दुदैवाने भुकंप होऊन जास्त प्रमाणात प्राणहानी होणार नाही हा दृष्टीकोन

समोर ठेवुन शहरातील ज्या इमारती मोडकळीस आलेल्या आहे. त्याचा सर्व्हे करण्यात यावा व अशा इमारती तातडीने काढण्याची कार्यवाही व्हावी.

सुदाम सोनवणे : भुकंपासारखी नैसर्गिक आपत्ती होऊन जास्तीत जास्त नुकसान होऊन प्राणहानी होणार नाही यासाठी शहरातील इमारतींचा बांधकामाचा दर्जा कसा असावा व त्यासाठी जे नियम इतर महाराष्ट्राच्या महानगरपालिकेने तयार केले त्याप्रमाणे आपल्या महानगरपालिकेने सुध्दा नियम तयार केले पाहिजे. शहरामध्ये किती स्थायी मालमत्ता आहे किती नागरिकांनी बांधकामास परवानगी घेतलेली आहे. जवळ पास ४०% इमारती अधिकृत नाही. ज्यांनी बांधकामाची परवानगीच घेतली नाही व त्यांचेसाठी नियम केले तर बांधकाम परवानगीसाठी येणारे नागरिक येणार नाही. अनाधिकृत कोणत्याही प्रकारचे बांधकाम यापुढे होणार नाही याची काळजी संबंधीत २ ते ३ विभाग आहेत त्यांनी घ्यावी. मागे पत्र देऊन विचारणा केलेली आहे. जाधववाडी येथे महानगरपालिकेने क्रिडांगणासाठी जागा आरक्षीत केलेली होती. परंतु आपल्या अधिकाऱ्याच्या संगणमताने त्या आरक्षीत जागेवर विना परवानगीने मोठमोठया इमारती झालेल्या आहेत. पत्र देऊन एक महिना झाला तरी संबंधीत विभागाकडुन अद्याप काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. अधिकाऱ्यांच्या निष्कांळजीपणाने आरक्षीत जागेवर अनाधिकृतपणे बांधकाम होत असेल तर योग्य नाही. आणि ज्यांना बांधकामाची परवानगी घ्यावयाची आहे त्यांना आता नवीन नियम तयार केले तर ते परवानगी न घेताच बांधकामे करतील. जाधववाडी, सुरेवाडी भागाचा विचार केल्यास सन ८२ ते ८५ दरम्यान २७०० पर्यंत स्थायी मालमत्ता होती आज रोजी तेथे ७ ते ८ हजार स्थायी मालमत्ता झालेल्या आहेत. एका ही घराची परवानगी नाही. अधिकारी पाहणी करत नाही. सन. ८९-९० मध्ये ८ ते ९ एकर क्षेत्र महानगरपालिकेने आरक्षीत केले होते. सध्या त्या ठिकाणी एक इंच जागा शिल्लक नाही. प्रत्येक वेळी चर्चा होऊन संबंधीतावर गुन्हे दाखल करणार योग्य कारवाई न केल्यास अधिकाऱ्यावर कारवाई करणार असे बोलले जाते परंतु अधिकाऱ्यांना पत्र देऊनही सुध्दा कार्यवाही होत नसेल तर योग्य नाही. अनाधिकृत बांधकामे होणार नाही यासाठी आपले विभाग सज्ज असले पाहिजे. जाधववाडी सुरेवाडी मध्ये जी कामे होत आहे ती अधिकारी यांच्या संगणमताने होत आहे. यात जे दोषी असेल त्यांचेवर करवाई व्हावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : गुजरात मध्ये नुकताच भुकंप होऊन मोठया प्रमाणात वित्त, प्राणहानी झालेली आहे व २० दिवसामध्ये असा निष्कर्ष समोर आला की, शहराचा विचार केल्यास ज्या इमारती कोसळल्या त्याच्या बांधकामात दोष असल्याने आढळुन आलेले आहे की, तेथील परिस्थिती आपल्याकडे येऊ शकेल हा दृष्टीकोन समोर ठेवुन आपल्या शहरातील इमारतीना बांधकामाची परवानगी देतांना जी काळजी घ्यावयास पाहिजे. ती घेतली जात नाही. इतर महानगरपालिकेप्रमाणे जे नियम तयार करणार आहोत त्यामध्ये जे लोक तज्ञ आहे. ज्यांनी पदवी मिळविलेली आहे. तसेच अधिकृत नोंदणी प्रमाणपत्र ज्यांना मिळालेले आहे अशानांच यापुढे इमारतीचे बांधकाम करण्याची परवानगी देण्यात यावी. दुसरी बाब अशी की शहराची वाढती लोकसंख्या व त्यानुसार महानगरपालिकेकडे अत्यंत कर्मचारी वर्ग कमी आहे. आताच काही

स. सदस्यांनी शहरातील जुन्या इमारतीसंदर्भात प्रश्न उपस्थित केला सदर इमारती जवळपास ५०,७०,१०० वर्षापासुनच्या इमारती आहे. अशावेळी नैसर्गिक आपत्ती भुकंपासारखी परिस्थिती निर्माण झाली तर मोठया प्रमाणात प्राणहानी होईल. शहराची वाढणारी लोकसंख्या व त्यानुसार वाढीव झालेली घरे याचा विचार करता संबंधीत विभागाकडुन नागरिकांना वेळेवर बांधकामाची परवानगी सुध्दा मिळेनात ज्या भागात अनाधिकृत बांधकामे होत आहे ती जमीन उदा द्यावयाचे झाल्यास भावसींगपुरा, जाधववाडी, सुरेवाडी काही हर्सुलचा भाग ही जमीन काळया मातीची असुन इमारत बांधकामास लायक नसुन ती शेतीसाठी लाभदालक जमीन असतांना सुध्दा सरसिपणे अनाधिकृतपणे, बांधकामे होते. आहे व त्याकडे संपुर्णपणे संबंधीत विभागाने डोळेझाक केलेली आहे. महानगरपालिकाने काही जागा झोपडपट्टी भागातही आरक्षीत केलेल्या आहे त्याचा वापर महानगरपालिका करणार की नाही त्या शासनाच्या नियमाच्या अधिन राहुन ज्या वसाहतीमध्ये अनाधिकृतपणे बांधकामे झालेली आहे. त्या भागात जे कर्मचारी नेमलेले आहे त्या कर्मचाऱ्यांना आपण दोषी ठरणार आहे किंवा नाही ज्यांनी अनाधिकृतपणे बांध्कामे केलेली आहे करुन दिली म्हणुन त्यास प्रशासन सुध्दा दोषी राहील. अनाधिकृतपणे होणाऱ्या बांधकामाकडे आजच लक्ष देणे जरुरीचे आहे व अशा भागातुन महानगरपालिकेस उत्पन्न म्हणुन २५% सुध्दा निधी मिळत नाही. म्हणुन ज्या ठिकाणी विना परवानगी बांधकामे झालेली आहे अशा कुणाचेही वैयक्तिक हित लक्षात न घेता अनाधिकृतपणे झालेली बांधकामे काढण्याची कार्यवाही करावी. तसेच कुणचेही सार्वजनिक मालमत्तेला धक्का लागणार नाही याची सुध्दा काळजी घेणे जरुरीचे आहे.

अफसरखॉन : शहरामध्ये अनेक जुन्या इमारती आहे. भुकंप न होता कोसळु शकतात इमारत पडुन जास्त प्राणहानी होणार नाही यासाठी शहरातील जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीची पाहणी करुन तात्काळ काढण्याची कार्यवाही करावी या अगोदर जुन्या इमारती पडुन प्राणहानी झालेच्या ७-८ केसेस आहे. जाधववाडी येथे महानगरपालिकाचे ७ ते ८ एकर मध्ये आरक्षीत केलेले होते. अनाधिकृतपणे मोठमाठया इमारती झालेल्या आहेत जाधववाडीमध्ये अनाधिकृत बांधकामे होत आहे. म्हणुन ३ वर्षापासुन पत्र दिलेले आहे का कार्यवाही होत नाही. ज्या अधिकाऱ्यांनी अनाधिकृत बांधकास परवानगी दिली त्यांचेवर कार्यवाही व्हावी. व ज्यांनी बांधकामे केलेली आहे. त्यांचेवर पोलिस गुन्हा दाखल करावा.

श्री. प्रकाश निकाळजे : गुजरात मधील भुकंपामुळे मोठया प्रमाणात जिवीत हानी झालेली आहे सर्वाच्याच भावना दुखावल्या गेल्या आहेत. विशेषतः शहरामध्ये इमारतीच्या बांधकामाचा दर्जा चांगला नव्हता म्हणुन मोठया प्रमाणात जीवीत हानी झाली अशा प्रकारच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. महाराष्ट्रातील काही महानगरपालिकेने इमारत बांधकामा संदर्भात जे नियम बनवले आहे व जे लोक या कामामध्ये तज्ञ आहेत त्यांचाच समावेश करण्यात आलेला आहे. परवाच वृत्तपत्रात एक बातमी आली की, औरंगाबाद विभाग हा टेकडीवर असल्याने भुकंप होणार नाही म्हणुन बऱ्याच सर्वसामान्य व्यक्तीचा ओघ या शहरात स्थायीक होत आहे. भुकंपानंतरची जी परिस्थिती झाली व तशी वेळ या ठिकाणी आल्यास जास्त प्रमाणात प्राणहानी न होण्याच्या दृष्टीने

शहरातील ज्या जुन्या इमारती आहे त्यांची पाहणी करावी व यापुढे इमारत बांधकामास कोणती काळजी घ्यावयास पाहिजे. त्यासाठी तज्ञांचा सल्ला घेण्यात यावा. शहरात जे अनाधिकृतपणे बांधकामे होत आहे व ज्यांनी प्लॉट खरेदी केले त्याचे वरच कार्यवाही न होता ज्यांनी विक्री केले. त्या जमीन मालकावर कार्यवाही झाली पाहिजे. प्लॉट खरेदी विक्रीसाठी ज्यांनी मदत केली त्यांचेवर सुध्दा नियमाने कार्यवाही झाली पाहिजे.

तकी हसनाखान : गुजरात मध्ये भुकंप झाला परंतु त्याची जाण औरंगाबाद वासीयांना सुध्दा जाणवत आहे. शरीरातील इमारतीचा दर्जा चांगला नव्हता म्हणुन मोठया प्रमाणात प्राणहानी झाली व हा संदर्भ समोर ठेवुन आपल्याही शहरात इमारतीचे बांधकाम चांगले असावे. म्हणुन चर्चा सुरु आहे. परंतु इमारत कशी असावी भुकंप होईल की नाही नाही याचा अभ्यास करण्यासाठी तज्ञ लोकांची आवश्यकता आहे. या सभागृहाने चर्चा करणे योग्य होईल का? ज्या इमारती पडत आहे त्या कोणत्या आहेत. पडण्याची कारण काय? इमारत जुनी आहे म्हणुन नवीन होऊ शकेल परंतु करणाऱ्यांकडे पैसा नाही म्हणुन शासनाकडुन अनुदान मागण्याची कार्यवाही व्हावी. व अशा जुन्या इमारती महानगरपालिकाकडे हस्तांतरित कराव्यात. जनतेच्या मालमत्तेला चर्चे नुसार हस्तक्षेप करणे योग्य नाही. या सभागृहात आपण सर्व आहोत मा. आयुक्त आहेत. ज्या इमारती या अगोदर झाल्या परंतु यापुढे होणाऱ्या इमारतीसाठी काय करावे लागणार यावर विचार व्हावा. ज्या जुन्या इमारती आहे त्या काढण्यासाठी रोड रुंदीकरणाचे काम करावे. मावेजा अदा करावा अशी कार्यवाही केल्यास इमारत मालक पुन्हा इमारत उभारु शकेल. दुसरी सुचना अशी की, शहरामध्ये मोठमोठे टॉवर्स होत आहेत तेही तोडण्याची कार्यवाही व्हावी. त्यामुळे भविष्यात भुकंपासारखी परिस्थिती निर्माण झाल्यास मोठया प्रमाणात हानी होऊ शकते. वरिल केलेल्या सुचनांची अंमलबजावणी व्हावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : शहरातील इमारतीवर जे टॉवर्स झालेले आहे ते तोडण्याचे आदेश दिलेले होते का कार्यवाही करण्यात आलेली नाही. खुलासा करावा.

मा. महापौर : गुजरात मध्ये झालेल्या भुकंपामुळे मोठया प्रमाणात प्राणहानी तसेच आर्थिक हानी सुध्दा झालेली आहे. तेथील परिस्थिती दुदैवाने आपल्याकडे निर्माण झाल्यास कोणतेही नुकसान होऊ नये म्हणुन काही स्ट्रक्चरल इंजिनियर मा. आयुक्त व पदाधिकाऱ्यांना भेटलेले आहे. व कशा पध्दतीच्या इमारती असाव्यात म्हणुन तसा प्लॅन सादर केलेला आहे. प्रशासनास सुचना देत आहोत की, संबंधीत इंजिनियरच्या काय सुचना आहेत त्या येणाऱ्या सर्वसाधारण सभेत सभागृहात सादर कराव्यात.

२. शहरामध्ये ज्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत अशा इमारतीचा तसेच काही कारणास्तव इमारती काढण्याबाबत ज्यांना नोटीस वगैरे दिली आहे त्याची यादी शहर अभियंता यांनी तयार करुन संबंधीतांना सुचना देऊन कार्यवाही करावी.

३. तिसरा मुद्दा असा उपस्थित झाला की, शहरामध्ये अनाधिकृत बांधकामे मोठया प्रमाणात असुन विशेषतः जाधववाडीमध्ये स. सदस्य श्री. सुदाम सोनवणे यांनी सांगितल्यप्रमाणे महानगरपालिकेच्या ९ एकर आरक्षीत जागेवर बांधकाम झालेले असुन तेथील इमारत निरिक्षक यावेळी काय करत होते

याची प्रशासनाने चौकशी करावी यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. जी बांधकामे झालेली आहे. ती तोडण्यात यावी इतर ठिकाणचीही शहरातील अनधिकृत बांधकामे प्रशासनाने तात्काळ तोडण्याची कार्यवाही व्हावी. असे प्रशासनास आदेश देण्यात येत आहे. यासाठी प्रशासनाने एक कमीटी नेमावी व पुढील सर्वसाधारण सभेमध्ये याचा संपुर्ण अहवाल सादर करावा.

४. शहरामध्ये अनेक ठिकाणी मोबाईलसचे टॉवर्स आहेत. बीपीएल व एटीएनटी चे टॉवर्स आहेत. आणि पेजमध्ये सुध्दा टॉवर्स उभे करण्यासाठी संबंधीतांनी ११ महिन्याचीच परवानगी घेतलेली होती व त्यानंतर महानगरपालिकेकडे संबंधीत टॉवर्स मालकांनी परवानगीसाठी साधा अर्ज सुध्दा केलेला नाही व मागील बैठकीत चर्चेनुसार प्रशासकीय अधिकारी यांनी कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या होत्या त्यांनी एक महिन्यात फक्त नोटीस दिलेली आहे. एवढा उशीर का होतो आहे यानंतर पुन्हा संबधीतांना तीन दिवसाची नोटीस देऊन तात्काळ ते टॉवर्स काढण्याची कार्यवाही व्हावी. संबंधीत टॉवर्स मालकाने महानगरपालिकेची पुन्हा परवानगी घेतलेली नाही.

श्री. प्रशांत देसरडा : माझ्या वार्डामध्ये अनाधिकृतपणे कामे जास्त प्रमाणात होत आहे. नाल्याजवळ तारफिन्सींगचे कामे केलेले आहे. या संदर्भात आपणाकडे मी सुचना दिलेली होती तसेच प्रशासकीय अधिकारी यांना सुध्दा कळविले होते. नगररचना विभागाने तार फिन्सींगसाठी परवानगी दिलेली आहे काय विचारणा करण्यात यावी. वार्डालगत असलेल्या जालना रोडवर अनाधिकृतपणे टपऱ्या बसलेल्या होत्या संबधीत विभागाने सदरच्या टपऱ्या आणलेल्या होत्या पुन्हा का देण्यात आल्या व आता सध्या पुन्हा टपऱ्या कार्यरत आहेत. त्याचा खुलासा व्हावा तसेच जे तारकुंपनचे काम चालु आहे. क्रिडांगणसाठी राखीव झोन आहेत संबंधीत विभागाने परवानगी दिलेली आहे काय?

डॉ. श्रीमती आशा बिनवडे : माझ्या वार्डामध्ये शाळा, क्रिडांगणासाठी आरक्षीत असलेल्या झ ोनमध्ये शॉपिंग सेंटर जवळपास २५-३० दुकानाचे अनाधिकृतपणे बांधकाम चालु आहे. या संदर्भात प्रशासकीय अधिकारी, इमारत निरिक्षक यांना वेळोवेळी सुचना देऊन निदर्शनात आणुन दिलेले आहे. वेळीच कार्यवाही न केल्याने ती दुकाने पुर्ण झालेली असुन सुरु होण्याच्या तयारीत आहे. एकुण ५ महिने काम चालु होते मा. आयुक्तांना सुध्दा या संबंधी सुचना दिलेल्या होत्या त्याच प्रमाणे १ तारखेला आपणाकडे सुचना आपण प्रशासनाला सुचना दिल्या की, या दुकाना संबंधीचे बांधकाम अनाधिकृत असुन कोणीही दुकाने खरेदी करु नये असे जाहिर प्रगटन द्यावयास सांगितले परंतु आज १६ दिवस झाले काहीही कार्यवाही झाली नाही याचा अर्थ संबंधीत अधिकारी या कामात हातभार लावतात असे दिसुन येते का जाहीर प्रगटन देण्यात आले नाही. व प्रशासकीय अधिकारी यांनी का कार्यवाही केलेली नाही याचा खुलासा करावा.

श्रीमती मानकापे पार्वतीबाई : माझ्या वार्डामध्ये ५ ठिकाणी अनाधिकृतपणे कामे चालु आहे या संदर्भात मी पत्रही दिलेले आहे. व पत्र देऊन कार्यवाही न झाल्याने आज पुन्हा पुत्र दिलेले आहे. अद्याप काम बंद केलेले नाही.

श्री. सुनिल वडागळे : माझ्या वार्डात बांधकामे चालु असतांना सदरचे बांधकामे अनाधिकृतपणे होत आहे किंवा काय याची चौकशी व करता प्रशासकीय अधिकारी यांनी संबंधीताचे साहित्य उचलुन आणले मा. आयुक्तांनी तसे आदेश प्रशाकिय अधिकारी यांना दिलेले होते काय खुलासा द्यावा.

मा. महापौर : शहरातील अनधिकृतपणे होत असलेल्या कामा बाबत स. सदस्यांनी सुचना केलेल्या आहे प्रथमतः स.स.श्री. देसरडा यांनी त्यांचे वार्डात क्रिडांगणाची जागा असतांना तारफिन्सींगचे अनधिकृतपणे काम झालेली सुचना केली आहे त्या संदर्भात नगररचना अधिकारी यांनी खुलासा करावयाचा आहे. तसेच जालना रोडवरील अनाधिकृतपणे बसलेल्या टपऱ्या प्रशासकीय अधिकारी यांनी ताबडतोब काढाव्या दुसरा मुद्दा स. सदस्य डॉ. बिनवडे यांनी उपस्थित केला त्यांचे वार्डात शाळेसाठी आरक्षण असतांना तेथे अनाधिकृतपणे दुकानाचे काम चालु आहे या संदर्भात इमारत निरिक्षक प्रशासकिय अधिकारी झोन अधिकारी यांना वेळावेळी सुचना देऊन सुध्दा कार्यवाही केलेली नाही. एकुण ३५ दुकानाचे बाधकाम केले मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. सदरचे दुकानाचे बांधकाम होऊ नये व दुकाने कुणी घेऊ नये कारण सदरचे दुकाने ही अनधिकृतपणे बांधण्यात येते व त्या इमारतीतील दुकाने नागरिकांनी विकत घेतली असती तर इमारत कप्लेशन प्रमाणपत्र दिले गेले नसते तसेच पाणी मिळले नसते व दुकाने घेण्याऱ्यांना त्रास झाला असता म्हणुन या संदर्भात मा. आयुक्तांना मी भेटलो होतो व माझ्या दालनामध्येच विधी सल्लागार श्री. शिरसाठ यांना मा. आयुक्तांनी माझ्या समोर वृत्तपत्रात इमारतीचे नांव सर्व्हे नंबर सहित जाहिर प्रगटन देऊन सदर दुकाने अनाधिकृतपणे होत आहे व कुणीही विकत घेऊ नये असे विधी विभाचे श्री. शिरसाठ यांना सांगण्यात आले असतांनाही सुध्दा त्यांनी सांगितल्या प्रमाणे जाहिर प्रगटन दिले नाही म्हणुन मा. आयुक्तांनी त्यांचेवर नियमाने कार्यवाही करावी आणि ही सभा संपल्यानंतर उद्याच्याच वृत्तापत्रात जाहिर प्रगटन देण्याची कार्यवाही करण्यात यावी. दुसरा प्रश्न स.स. श्रीमती मानकापे यांनी उपस्थित करुन त्यांचे वार्डामध्ये अनाधिकृतपणे स्लॅप्चे काम चालु होते त्यांनी पत्र दिले त्यानुसार महानगरपालिकेचे इमारत निरिक्षक तेथे गेले व मला फोनवरुन कळविले व सदरचे काम हे अनाधिकृतपणे होत असेल तर सुध्दा काम पुर्ण झाले म्हणुन मा. आयुक्तांनी संबंधीत इमारत निरिक्षक यांचेवर तात्काळ कार्यवाही करावी. तसेच स. सदस्य श्री. वडागळे यांनी वार्डामध्ये होत असलेल्या बांधकाम नियमाने असुन तेथील काम चालु असतांना प्रशासकीय विभागाचे कर्मचाऱ्यांनी बांधकाम साहित्य जमा करुन आणले त्याची चौकशी करुन सदरचे सामान परत करण्यात यावे.

श्री. सुदाम सोनवणे : शहरातील जे टॉवर्स आहेत त्या इमारतीचे बांधकामाची परवानगी महानगरपालिकेकडुन घेतली आहे काय तसेच जे जे टॉवर्स आहेत त्यापासुन महानगरपालिकेस ऐकुण किती उत्पन्न मिळते याचा खुलासा नगररचनाकार यांनी द्यावा.

मा. महापौर : स. सदस्य श्री. देसरडा यांनी केलेल्या प्रश्नावर खुलासा करावा त्यानंतर श्री. सुदाम सोनवणे यांनी विचारलेल्या प्रश्नावर खुलासा व्हावा.

उपअभियंता (नगररचना) : सुरुणानगर येथील नाल्याजवळ जी तारफिन्सींग चालु आहे त्यास या विभागाकडुन परवानगी दिलेली नाही तसेच टॉवर्सच्या कराबाबत महसुल विभागाकडुन माहिती मिळेल.

श्री. प्रशांत देसरडा : खुलासा झालेला आहे परवानगी दिलेली नव्हती प्रशासकिय अधिकारी यांचेकडे १५ दिवसापासुन या संबंधी तक्रारी केलेली आहे. फोनवर सुध्दा चर्चा केली. आमचे रिलेशन आहे. बघुन घेवु असे उत्तर मिळते. राजकारण सदस्यांचा करायचे की अधिकाऱ्यांना त्यांना विभागामध्ये योग्य रितीने काम करावयाचे नसेल तर प्रशसाकीय आधिकारी पदाचा चार्ज दुसऱ्या अधिकाऱ्यांना देण्यात यावा.

मा. महापौर : प्रशासकीय अधिकारी त्यांचे विभागाचे काम व्यवस्थित बघत नाही बऱ्याच सन्माननीय सदस्यांच्या तक्रारी आलेल्या आहेत. म्हणुन मा. आयुक्तांना मी सुचना करतो की, प्रशासकीय अधिकारी पदाचा चार्ज इतर कुण्याही अधिकाऱ्याकडे देण्याची कार्यवाही व्हावी.

श्री. सुदाम सोनवणे : शहरात ज्या इमारतीवर टॉवर्स करण्यात आले त्यास नगररचना विभागाने परवानगी दिलेली आहे का हा माझा प्रश्न होता व सदर इमारतीना किती व्यावसयिक कर आकारण्यात येतो उत्पन्न किती मिळते याची सविस्तर माहिती न देता संबंधीत अधिकारी गोलमोल उत्तर देऊन निघुन गेलेले आहे. त्यांचेकडुन पुन्हा खुलासा घेण्यात यावा.

मा. महापौर : शहरात किती टॉवर्सला परवानगी दिलेली आहे याचा खुलासा नगररचनाकार यांनी करावा.

श्रीमती डॉ. आशा बिनवडे : माझ्या वार्डामध्ये अनाधिकृतपणे झालेल्या दुकानास कोण जबाबदार राहणार आहे. न्यायालयात प्रकरण असतांना सुध्दा काम होऊ दिले प्रशासकीय अधिकाऱ्यांचा नुसता चार्ज काढुन चालणार नाही. तर यांची संपुर्ण चौकशी झाली पाहिजे. दोषीवर कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : प्रशासकीय अधिकारी यांचा चार्ज काढला तरी मा. आयुक्तांनी मागील कामाबाबतची प्रशासकीय विभागाची चौकशी करावी.

सौ. संगिता मैंद : वार्डामध्ये आकाशवाणी जवळ बऱ्याच मोठया प्रमाणात बग्गा इंजिनियरिंगचे बांधकाम झालेले आहेत परवानगी दिलेली आहे म्हणुन संबंधीत विभागाकडे मागणी केली होती उत्तर मिळालेले नाही किती चौरस फुट किती उंच परवानगी दिली याची माहिती पाहिजे होती.

मा. महापौर : स. सदस्या सौ. मैंद यांना बग्गा इंजिनियरींगच्या बांधकामाबाबत माहिती पाहिजे होती ती का देण्यात आली नाही. याचा खुलासा देण्यात यावा.

श्री. प्रकाश निकाळजे : प्रशासकिय अधिकारी पदाचा चार्ज काढुन दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे देण्याचा निर्णय घेतला असे प्रत्येक वेळेस होत राहिले तर कुणीही अधिकारी जबाबदारीने त्या पदावर काम करणार नाही त्यांना त्यांचेच पदावर राहु द्यावे. प्रशासनाने नियमाने चौकशी करावी त्यानुसार कार्यवाही व्हावी.

श्री. अंबादास दानवे : अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भात हजारो तक्रारी प्राप्त असतील परंतु या अगोदरच्या काळात प्रशासकीय विभागातर्फे मोठमोठी अतिक्रमणे कुणाच्याही दबावाखाली न येता पाडण्यात आलेली वृत्तपत्रात बातम्या झ ळकल्या होत्या की मुंबई प्रमाणेच औरंगाबादला कार्यवाही होत आहे खैरनार उतरले म्हणुन ही प्रशासकीय बाब आहे व एक काम केले नाही म्हणुन

लगेचच त्याची चार्ज काढणे योग्य नाही चौकशी करण्यात यावी नियमाने कार्यवाही व्हावी.

श्री. कोकाटे काशिनाथ : प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संदर्भात चर्चा चालु आहे त्यांचा चार्ज काढुन दुसऱ्या अधिकाऱ्याकडे देण्याचा आपण निर्णय घेतलेला आहे. सभागृहाच्या माहितीसाठी व मला सुध्दा माहिती हवी आहे म्हणुन सुचना करतो की, प्रशासकीय अधिकाऱ्यांचे वेगळे असे पद महानगरपालिकेमध्ये निर्माण केले होते काय? आशा पध्दतीने महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांना प्रमोशन दिलेले आहे काय? तसेच जर पद निर्माण केले असेल तर संबंधीत अधिकाऱ्यांकडे चार्ज न ठेवता इतर अधिकाऱ्याकडे चार्ज देण्याची वेळ का आली याचा खुलासा देण्यात यावा.

मा. महापौर : जवाहर कॉलनी येथील अनाधिकृतपणे झालेल्या दुकाना संदर्भात शहरात सुध्दा चर्चा झालेली आहे. प्रकरणाची केस न्यायालयात चालु होती व निकालही लागलेला होता त्यानंतर उपआयुक्त यांनी न्यायालयात कन्टेम ऑफ कोर्ट दाखल केलेले आहे. तरी सुध्दा सदर दुकानाचे बांधकाम चालु होते व जाहिर प्रगटन द्यावे दिले गेले पाहिजे असे मी सुचना केली होती त्यानुसार योग्य कार्यवाही करण्याचे काम प्रशासनाचे होते प्रशासकीय अधिकारी यांनी विशेष लक्ष देऊन काम करण्याची गरज आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांची पद कसे असावे याबाबत याचा सभागृहाने मागील एक वर्षाच्या काळामध्ये मागच्या बॉडीने निर्णय घेतलेला आहे तो प्रशासनातर्फे लवकरच सभागृहाला माहिती मिळेल. सभागृहनेतृ स. सदस्य श्री. निकाळजे यांनी सांगितल्याप्रमाणे प्रशासकीय आधिकारी यांचे कामाबाबतची प्रशासनाने चौकशी करावी व त्यानुसार कार्यवाही व्हावी. या विभागामध्ये कर्मचारी वर्ग कमी असेल तर इमारत निरिक्षक सदर भागामध्ये वाढवुन द्यावे. कारण शहरामध्ये बांधकामाचा व्याप वाढलेला आहे व या अगोदर २२ इमारत निरिक्षक होते आता फक्त ७ इमारत निरिक्षक आहेत. म्हणुन कामाचा व्याप व या शहराची लोकसंख्येनुसार बऱ्याच मोठया प्रमाणात बांधकामे होत आहे या संदर्भात मा.आयुक्त यांनी सखोल अभ्यास करुन अनधिकृतपणे कामे होणार नाही या करिता या विभागात आवश्यक तो कर्मचारी वर्ग द्यावा तसेच या विभागात सहाय्यक प्रशासकीय या अधिकारी म्हणुन एक पद भरण्याची कार्यवाही करावी. जेणे करुन जे प्रशासकीय अधिकारी आहेत त्यांचे कामाला मदत होईल. यापुर्वी सर्वसाधारण सभेने प्रशासकीय अधिकारी पदाबाबतचे जे नियम बनवले आहे त्याबद्दल उपआयुक्त यांनी सविस्तर माहिती द्यावी.

श्री. कोकाटे काशिनाथ : काय नियम केलेले आहे यांची माहिती मागविलेली नसुन प्रशासकीय अधिकाऱ्यांची नेमणुक केलेली आहे का? पद निर्माण करुन त्यांना पदोन्नती दिलेली आहे का असा खुलासा मागविला आहे.

मा. महापौर : प्रशासकीय अधिकारी यांना अतिरिक्त चार्ज दिलेला आहे हे आपणास माहिती आहे.

कोकाटे काशिनाथ : या संबंधीची सविस्तर माहिती नाही म्हणुन खुलासा मागविलेला आहे अत्यंत जबाबदारीने प्रश्न मी केलेला त्यांचा सविस्तर खुलासा व्हावयास हवा.

प्रकाश जावळे : स.सदस्य श्री. कोकाटे यांचे म्हणणे असे की, प्रशासकीय अधिकारी पदावर एका विशिष्ट अधिकाऱ्यांना पदोन्नती देऊन ते पद टेक्नीकल केले होते व शासनाच्या डायरक्शेन नुसार संबंधीत अधिकाऱ्यांची बदली झाली व त्यानंतर ते पद रिक्त झाले व तेव्हापासुन त्या पदाचा अतिरिक्त पदभार देण्यात येत आहे. म्हणुन ते पद त्याच अधिकाऱ्यांसाठी रिक्त केले होते का? व ते पद संपुष्टात आले असेल तर पुढील कार्यवाही आतापर्यंत का करण्यात आली नाही याचा खुलासा पाहिजे.

मा. महापौर : प्रशासकीय अधिकारी पदाच्या संदर्भात पुढील बैठकीत सविस्तर माहिती प्रशासनामार्फत देण्यात येईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : प्रशासनास या संबंधी सर्व माहिती आह सदरचे पद एकत्रित केलेले आहे आपण प्रशासनास वगल देण्याचे काहीच कारण नाही. खुलास घ्यावा.

मा. उपआयुक्त (प्र.) : प्रशासकीय अधिकारी हे पद सर्वसाधारण वर्गामधुन तसेच कर्मचाऱ्यामधुन भरण्यात यावे त्यानुसार तुर्कमाने हे प्रशासकीय अधिकारी या पदावर काम पाहत होते यानंतर हे पद टेक्नीकल वर्गातुन भरावे असा ठरावच या सभागृहाने मंजुर केलेला होता त्यानुसार श्री खरवडकर नावाचे अधिकाऱ्यांना प्रशासकीय अधिकारी पदाचा कार्यभार देण्यात आलेला होता आता सध्या खरवडकर यांची नगररचना विभागामध्ये बदली झाल्याने श्री. पानझडे उप अभियंता(स्लम) यांना अतिरिक्त प्रशासकीय अधिकारी म्हणुन कार्यभार दिलेला आहे सध्या ते काम पाहत आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : प्रशासनाकडे ज्या अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात आली प्रशासनास त्याची गरज पडली ते बदलुन गेल्यानंतर पुढील कालावधीत सदर पदाचा इतर अधिकाऱ्यांना का चार्ज देण्यात येत आहे. आमच्याकडे माहिती आहे प्रशासनातील अधिकारी माहिती देऊ शकत नाही यावरुन प्रशासनाचा कारभार कसा चालु हे निदर्शनास येत आहे (याचवेळी सभागृहात स. सदस्य मोठमाठयाने बोलतात काहीही ऐकु येत नाही)

श्री. प्रकाश निकाळजे : सविस्तर माहिती घेण्यासाठी सभा ०५ मिनिटासाठी तहकुब करण्यात यावी.

मा. महापौर : सर्व स. सभासदांनी आपआपल्या जागेवर बसावे. आजची सभा ०५. मिनिटासाठी तहकुब करण्यात येते. (सभा ४.५० वाजता तहकुब सभेला सुरुवात ५.३० वाजता.)

श्री. जयवंत ओक : शहरात बऱ्याच वार्डामध्ये ड्रेनेजची साफसफाई व्यवस्थित होत नाही. त्यासाठी बल्ल्या नाहीत. स. सदस्यांच्या या संबंधी तक्रारी सुध्दा आलेल्या आहेत बल्ल्या विकत घेऊन कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : ज्या कारणाने सभा तहकुब करण्यात आली होती सदर प्रशासकीय अधिकाऱ्या संबंधीचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे चर्चा करता येणार नाही न्यायालयात या संबंधी केस चालु आहे.

श्री. अफसरखॉन : काय केस चालु आहे. सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्री. कोकाटे काशिनाथ मा. उपआयुक्त (प्र.) : प्रशासकीय अधिकारी पदाच्या संदर्भात आपल्याच कार्यालयातील श्री. आय.बी. रवाना यांनी उच्च न्यायालयात केस दाखल केलेली आहे. श्री खरवडकर यांना बेकायदेशीर रित्या पदोन्नती

दिलेली आहे. म्हणुन दिलेली पदोन्नती रद्द करण्यात यावी म्हणुन केस दाखल केलेली आहे.

श्री. अफसरखॉन : न्यायालयाचे काही डायरेक्शन आलेले आहे काय उद्या कुणी न्यायालयात जाईल न्याय मागेल.

मा. उपआयुक्त : (प्र) उच्च न्यायालायाची नोटीस महानगरपालिकेस मिळालेली आहे. महानगरपालिकेने आपली बाजु न्यायालयात मांडलेली आहे तसेच ५-६महिन्यापुर्वी पुन्हा एक कर्मचारी यांनी या प्रकरणामध्ये अर्ज दाखल केलेला आहे की, आम्हालाही प्रमोशन द्यावे या प्रकरणामध्ये न्यायालयाने असे सांगतले की, जो काही निर्णय होईल तो मुळ याचिकेच्या आधिन राहुनच होईल. असे आदेश आपल्याकडे प्राप्त झालेले आहे. (याचवेळा सविस्तर खुलासा व्हावा म्हणुन स. सभासद मोठमोठयाने बोलतात काही ऐकु येत नाही.

मा. महापौर : या पदा संदर्भात न्यायालयात केस चालु आहे म्हणुन यावर चर्चा करणे योग्य होणार नाही न्यालयाच्या निर्णयनुसार कार्यवाही करण्यात येईल या विषयावर आता चर्चा करु नये. दुसरा प्रश्न बल्ल्या संदर्भात उपस्थित केलेला आहे. मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

यावेळी पुन्हा स.सभासद मा. महापौर यांचे डायस जवळ जाऊन सविस्तर खुलासा व्हावा म्हणुन मागणी करतात मोठमोठयाने बोलणे चालु असते. सभासद सभागृहात घोषणाबाजी करतात.

मा. महापौर : प्रशासकीय अधिकारी पदाच्या संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने चर्चा करणे योग्य नाही. आपल्या सर्वाचे काय जे म्हणणे असेल त्यांची नोंद इतिवृत्तात घेतलेली आहे. सर्व सभासदांनी आपआपल्या जागेवर बसावे. चर्चेचा वेळ संपलेला आहे. विषयपत्रिकेवरील विषय मंजुर करण्यात येतात.

**विषय क्र. २२७/१** : दिनांक १९-१-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव क्र. २२७/१** : दिनांक १९-१-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. २२८/२** :

उपसंचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहरातील शहागंज भागात गेल्या ३० वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुन भाजीपाला व फळांचा घाऊक व्यापार होत होता. त्याकरिता मंजुर विकास योजना १९७५ प्रमाणे आरक्षण क्र. ४६ "भाजीमंडई" या आरक्षणात त्यावेळेस नगरपालिकेने तेथे गाळे बांधुन ते गाळे भाजीपाला व फळांच्या घाऊक विक्रेत्यांना भाडेपट्टयावर दिलेले आहेत. या ठिकाणी असे एकुण १४४ गाळे आहेत.

दरम्यानच्या काळात शहराची झपाट्याने वाढ होऊन नगरपालिकेचे महानगरपलिकेत रुपातंर होऊन वाढीव क्षेत्रकरिता सन १९९१ ला विकास योजना मंजुर करण्यात आली.

त्यामुळे शहराची वाढ, लोकसंख्येतील लक्षणीय वाढ व वाढते नागरिकरण, दळवळणाची साधने इत्यादीमुळे पर्यायाने शहरातील वाढता व्यापार याचा विचार करुन औरंगाबाद उच्चतम कृषिउत्पन्न बाजार समितीचे विनंतीचा विचार करुन मो. हर्सुल

जाधववाडी भागात कृषी उत्पन्न बाजार समितीचे बाजार संकुलाकरिता जागा निर्देशित करण्यात आली.

कृषी उत्पन्न बाजार समितीने तेथे विकसित केलेले बाजार संकुल आता पुर्णत्वास आले असुन टप्प्याटप्प्याने शहरातील अन्न, धान्य, भाजीपाला, फळे जनावरे इत्यादीचा घाऊक व्यापार या संकुलांत स्थलांतरीत होत आहे.

नुकताच शहागंज भागातील वर नमुद घाऊक व्यापार कृषि उत्पन्न बाजार समितीचे बाजार संकुलात स्थलांतरित झाला आहे त्यामुळे आता हया ठिकाणी हा उद्योग/व्यापार होणार नसल्याने या महानगरपालिकेच्या जागेचा महानगरपालिकेस इतर किफायतशीर वापराचे दृष्टीने वापर करता यावा व त्या वापराकरिता ही जमीन विकसित करता यावी म्हणुन असे प्रस्तावित करण्यात येते की,

औरंगाबाद मंजुर विकास योजना १९७५ मध्ये आरक्षण क्र. ४६ "भाजीमार्केट विस्तार" व आरक्षण क्र. ४७ "मटनमार्केट" म्हणुन अस्तित्वातील वापर (सविस्तर निर्देश सोबतच्या नकाशानुसार "भाजी मंडई वापर" ) तिचा वापर वाणिज्य वापर म्हणुन मात्र भाजी मार्केट ऐवजी "दुकान केंद्र" असा वापर करण्याचे फेरबदलास शासनाची मान्यता व्हावी व प्रारुप विकास योजने मध्ये तसे फेरबदल सुचवुन योजनेच्या अंतिम मान्यतेवेळी हा फेरबदल करण्यास तसे कळविणेसाठीच प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९७५ च्या विकास आराखड्यानुसार शहागंज येथील आरक्षण क्र. ४६ भाजीमंछडई येथे उभारण्यात आलेल्या १४४ गाळेतील भाजीपाला व फळाचा घाऊक व्यापार, औरंगाबाद उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीने उभरलेल्या बाजार संकुलात स्थालांतरीत झाल्यामुळे औरंगाबाद मंजुर विकास योजना १९७५ मध्ये आरक्षण क्र. ४६ भाजी मार्केट विस्तार व आरक्षण क्र. ४७ मटनमार्केट म्हणुन अस्तित्वास असलेल वापर वाणिज्य वापर म्हणुनच भाजी मार्केट ऐवजी "दुकान केंद्र" या प्रमाणे फेरबदल करण्यास शासनाची मान्यता व्हावी यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

नियमाप्रमाणे प्रारुप विकास योजनेमध्ये तसे फेरबदल सुचवुन योजनेच्या अंतिम मान्यतेवेळी हा फेरबदल करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र२२९/** :

दिनांक ७-२-२००१ रोजी संपन्न झालेल्या समिती सभेमध्ये ठराव क्रमांक ९१/३ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तावरील मालमत्ता कराचे दर निश्चित करण्यासंबंधी प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात कोणताही बदल न करता सर्वसाधारण सभेत शिफारस केलेली आहे प्रशासनाचा प्रस्ताव खाली प्रमाणे.

वित्तीय वर्ष सन २००१-२००२ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ व कलम ९९ अन्वये महानगरपालिकाने दि. २०-२-२००१ रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सन २००१-२००२ या वित्तीय वर्षासाठी खाली प्रमाणे दर प्रस्तावित आहेत.

खालील दर हे करयोग्य मुल्यावर आकारले जातील.

अ) महानगरपालिकेचे दर :

| अ. क्र. | कराचे नांव | सन २००० ते २००१ चे दर | | सन २००१-२००२ चे प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | करयोग्य मुल्य | दर | करयोग्य मुल्य | दर |
| १. | सामान्य कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावार<br>१ ते १०००<br>१००१ ते १०,०००<br>१०००१ ते २०,०००<br>२०००१ ते ५०,०००<br>५०००१ ते १००,०००<br>१००,००० ते पुढे | <br><br>२३%<br>२४%<br>२५%<br>२७%<br><br>२८%<br>२९% | <br><br>१ ते १०००<br>१ ते १०,०००<br>१०००१ ते २०,०००<br>२०००१ ते ५०,०००<br>१००,००० ते पुढे | <br><br>२३%<br>२४%<br>२५%<br><br><br>३०%<br>३५% |
| २. | साफसफाई कर<br><br>अ) निवासी वापर<br>ब) निवासेत्तर वापर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>--//--<br>--//-- | <br><br>३%<br>६% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>--//--<br>--//-- | <br><br>३%<br>८% |
| ३. | वृक्ष कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ४. | अग्निशमन कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ५. | मनपा शिक्षण कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ६. | पथकर | --//-- | १% | --//-- | २% |
| ७. | जलनि:सारण कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ८. | जललाभकर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ९. | मोकळयाजागेचा कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येतील. | | | | |

तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार उपकरण व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मुल्यावर आकारण्यात येतील.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ९ व कलम ९९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तावर खालील दर्शविल्याप्रमाणे दराप्रमाणे मालमत्ता कर निश्चित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

अ) महानगरपालिकेचे दर :

| अ. क्र. | कराचे नांव | सन २००० ते २००१ चे दर | | सन २००१-२००२ चे प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | करयोग्य मुल्य | दर | करयोग्य मुल्य | दर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | कोणत्याही कर योग्य मुल्यावार<br>१ ते १०००<br>१००१ ते १०,०००<br>१०००१ ते २०,०००<br>२०००१ ते ५०,०००<br>५०००१ ते १००,०००<br>१००,००० ते पुढे | <br>२३%<br>२४%<br>२५%<br>२७%<br>२८%<br>२९% | <br>१ ते १०००<br>१ ते १०,०००<br>१०००१ ते २०,०००<br>२०००१ ते ५०,०००<br>१००,००० ते पुढे | <br>२३%<br>२४%<br>२५%<br>३०%<br>३५% |
| २. | साफसफाई कर<br>अ) निवासी वापर<br>ब) निवासेत्तर वापर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>--//--<br>--//-- | <br>३%<br>६% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>--//--<br>--//-- | <br>३%<br>८% |
| ३. | वृक्ष कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ४. | अग्निशमन कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ५. | मनपा शिक्षण कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ६. | पथकर | --//-- | १% | --//-- | २% |
| ७. | जलनिःसारण कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ८. | जललाभकर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ९. | मोकळयाजागेचा कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येतील. | | | | |

याशिवाय राज्य शिक्षण कर रोजगार हमी उपकर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराने कर योग्य मुल्यावर आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३०/४** :

मा. आयुक्त, यांच्या मंजुरीने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २००० नुसार नव्याने निर्माण झालेल्या ८३ प्रभागाकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) अनुसार सन १९९१ च्या जनगणनेनुसार एकंदर चार प्रभाग समित्याची रचना करणे आवश्यक असल्याने प्रशासकीय दृष्टया अस्तित्वात असलेल्या आठ विभागीय कार्यालयांना कोणतीही बांधा येऊ न देता निवडणुक प्रभागाचा समावेश असलेल्या खालील प्रमाणे चार समित्या व त्यांची कार्यालये प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| प्रभाग समिती क्रमांक | निवडणुक प्रभाग क्र. | समिती कार्यालय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |

| | | |
|---|---|---|
| अ. | १ ते ३,३५ ते ४०, ६२ ते ६८ ७९ -२१ प्रभाग | नेहरु भवन (फक्त सभेसाठी) |
| ब. | ४,५,४२,४६,५४ ते ५९, ६९ते ७८८०-२१ प्रभाग | शहांजग (फक्त सभेसाठी) |
| क. | १६ ते ३४,६०६१ -२१ प्रभाग | रेल्वेस्टेशन झोन क्र. १६ (फक्त सभेसाठी) |
| ड. | ६ ते १५,४३,४४,४५,४७ ते ५३ -२१ प्रभाग | (चिकलठाणा कार्यालय) झोन क्र. ५ (फक्त सभेसाठी) |

प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २००० नुसार नव्याने निर्माण झालेल्या ८३ प्रभागाकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) नुसार खालीलप्रमाणे चार प्रभाग समीत्याची रचना व त्याची कार्यालचे प्रस्तावीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| प्रभाग समिती क्रमांक | निवडणुक प्रभाग क्र. | समिती कार्यालय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| अ. | १ ते ३,३५ ते ४०, ६२ ते ६८ ७९ -२१ प्रभाग | नेहरु भवन (फक्त सभेसाठी) |
| ब. | ४,५,४२,४६,५४ ते ५९, ६९ते ७८८०-२१ प्रभाग | शहांजग (फक्त सभेसाठी) |
| क. | १६ ते ३४,६०६१ -२१ प्रभाग | रेल्वेस्टेशन झोन क्र. १६ (फक्त सभेसाठी) |
| ड. | ६ ते १५,४३,४४,४५,४७ ते ५३ -२० प्रभाग | (चिकलठाणा कार्यालय) झोन क्र. ५ (फक्त सभेसाठी) |

## *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्र. २३१/१** :

प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात येते की, कैसर कॉलनी वार्डामध्ये जिन्सी भागात सुमारे अंदाजे ३० वर्षापुर्वी गौतमबुध्दाच्या पुतळा बसविण्यात आलेला आहे.

परंतु पुतळयाची मागील काही दिवसापुर्वी समाजकटकाने चपलांचे हार टाकुन विटंबना केली त्यामुळे येथील व शहरातील वातावरणात खुप तणाव निर्माण झाला होता जिव्हयाचे संपर्कमंत्री मा.ना. राजेंद्र दर्डा यांच्या मध्यस्थीने हे प्रकरण आटोक्यात आले तसेच मा. महापौर यांच्या हस्ते सदरील पुतळयाच्या जागेसाठी भुमीपुजनही केले होते.

तसेच ज्या ठिकाणी हा पुतळा आहे ती जागा ही निजामोद्धीन दर्गाच्या नावावर आहे जर महानगरपालिका जी जागा संपदीत करीत असतील तर दर्गा कमेटी ही जागा मोबदला घेऊन पुतळयासाठी जागा तयार आहे.

म्हणुन पुतळयाची विटंबन ही पुन्हा पुन्हा होऊ नये म्हणुन महानगरपालिकेने ही जागा संपादन करुन गौतम बुध्दाच्या पुतळया भोवती संरक्षण भिंत बांधुन व बाकीच्या जागेवर समाज मंदिर बांधुन द्यावे अशी या वस्तीतील नागरिकांची मागणी आहे करिता हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. सलिम पटेल
अनुमोदक : श्री. शे. ईसाक जैनोद्दीन शे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिन्सी भागातील गौतमबुध्द पुतळयासाठी नियायोद्दीन दर्गाच्या नावावर असलेली जागा महानगरपालिकेने संपादन करुन गौतम आणि उर्वरित जागवेर समाज मंदिर बंधण्याच्या कामासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३२/३** :

प्रभाग क्र. १८ जवाहर कॉलनी गारखेडा येथील मेहेरसिंग नाईक हायस्कुल व डॉ. हेडगेवार रुग्णालय यांच्या समोरिल चौकाचे नामकरण बंजारा समाजाचे एक थोर समाजसेवक स्वर्गिय मेहेरसिंग वर्षिक यांच्या स्मृतिस्तव व गेल्या अनेक वर्षापासुन त्या भागातील नागरिकांच्या मागणीचा व इच्छेचा मान ठेवुन या चौकाचे नामकरण "स्व. मेहेरसिंग नाईक चौक" असे करण्यात यावे असा प्रस्ताव सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : डॉ. आशा उत्तम बिनवडे
अनुमोदक : श्रीमती जयश्री किवळेकर
सौ. जयश्री कुलकर्णी

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मेहेरसिंग नाईक हायस्कुल व डॉ. हेडगेवार रुग्णालय यांच्या समोरिल चौकाचे "स्व मेहेरसिंग नाईक चौक" असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३३/३ :**

जयसिंगपुरा येथील मक्का मस्जिद चौकाला व येथुन छोट मस्जिद व बडी मस्जिद पर्यंत रस्त्याचे नांव अबुलहसन अलीनववी असे नांव देण्यात यावे व मक्का सस्जिद चौरहाला पण हेच नांव देण्यात यावे, सय्यद अबुलहसन अली नववी हे जागातिक उलमा समिती व मुस्लिम प्रसनलालव बोर्डचे अध्यक्ष होते. हयांचा मृत्यु झाल्यानंतर आपल्या महानगरपालिकेतर्फे सर्वसाधारण सभेतर्फे त्यांचा गौरव करुन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली होती. तरी थोर पुरुषांचे नांव (सय्यद अबुलहसन अली नववी ऊर्फे अली मीया) असे नांव देण्यात यावे ही नम्र विनंती

सुचक : सौ. साजेदा बेगम.
अनुमोदक : श्री. अफसरखान, सौ. चंद्रभागाबाई दाणे, श्री. शे.ईसाक जैनोद्दीन शे.
श्री. नासेर खान

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जयसिंगपुरा येथील छोटी मस्जिद ते बडी मस्जिद पर्यंतच्या रस्त्यास "सय्यद अब्दुल हसन नववी" असे नांव देण्यास आणि मस्जिद चौकास सय्यद अब्दुल हसन नदवी चौक असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३४/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात कित्येक घोषित झोपडपट्टया आहेत. तसेच शहरात गरिबांची संख्या जास्त आहे. बहुतांश घरामध्ये नळ कनेक्शन नाहीत. तसेच महानगरपालिकाने नविन "स्टॅन्ड पोस्ट" व बसविण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. ज्यामुळे गरिब आणि सामान्य नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या संकटात तोंड दयावे लागत आहे तसेच महानगरपालिकाच्या जाचक अटीमुळे नविन नळ कनेक्शन नागरिक तयार होत नाहीत. तसेच एक रक्कमी पाणीपट्टी किंवा शुल्क भरणे. सामान्य नागरिकांच्या अवाक्याच्या बाहेर असते. परिणाम काही नागरिक अनधिकृत नळ घेतात. ज्यामुळे महानगरपालिकाचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे.

सामान्य नागरिकांना दिलासा मिळावा आणि महानगरपालिकाच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल त्या दृष्टीने महानगरपालिकाने दोन किंवा तीन हप्ते पाडुन नविन वळ कनेक्शन देण्याची योजना सुरु करावी. तसेच अनधिकृत नळ कनेक्शन घेतलेल्या लोकांना देखील या योजनेच लाभ दयावा. अशा प्रकारची योजना तत्कालीन महानगरपालिका आयुक्त श्री. भोगे यांनी पुर्वी राबाविली आहे. या योजनेमुळे महानगरपालिकाच्या उत्पन्नात भर पडेल तसेच अनधिकृत नळांना देखील आळा बसेल करिता सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर.

सुचक : श्री. शे. ईसाक शे. जैनाद्यीन
अनुमोदक : श्री. सलीम पटेल, श्री. शकील पटेल.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सामान्य नागरिकांना दिलासा मिळावा आणि महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडावी या दृष्टीने महानगरपालिकेने दोन किंवा तीन हप्ते पाडुन नवीन नळ कनेक्शन देण्याची योजना सुरु करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३५/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मध्यवर्ती जकात नाल्यासमोरिल चौकास "परमवीर चक्र अब्दुल हमीद चौक" असे नाव देण्यात यावे. या चौकातुन एक रस्ता जळगाव रोड कडे, पश्चिमेकडे, रोशनगेट, दक्षिणेकडे जालना रोड आणि उत्तरेकडे मध्यवर्ती जकात नाकाकडे जाणारा रस्ता आहे. करिता या चौकास देशासाठी बलिदान देणाऱ्या "परमवीर चक्र अब्दुल हमीद" यांचे नांव देण्यात यावे.

सुचक : श्री. शे. ईसाक शे. जैनोद्यीन, श्री. सलीम पटेल.
अनुमोदक : श्री. अब्दुल कदीर (मौलाना), श्री. सय्यद सलीम,
श्री. शकील पटेल.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका मध्यवर्ती जकात नाक्या समोरिल चौकास "परमवीर चक्र अब्दुल हमीद चौक" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३६/६** :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका हद्दीत प्रमुख चौकास "छत्रपती संभाजी महाराज" यांचा पुतळा महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आलेला नाही. संभाजी महाराज यांचा पुतळा शहरातील प्रमुख चौकास उभारणे बाबत नगर वासियांनी वेळोवेळी मागणी केलेली आहे. छत्रपती संभाजी महाराज या ऐतिहासिक महापुरुषाचे कार्य भावी पिढीला स्मरणात राहणे राहणे तसेच या युग पुरुषाचा आदर्श या शहरात कायम टिकणेसाठी जनतेच्या मागणीनुसार टि.व्ही. सेंटर भागातील प्रमुख चौकात "छत्रपती संभाजी महाराज" यांचा भव्य अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा उभारणेत यावा जेणे करुन लोक भावनेचा आदर. राखला जाईल व टि. व्ही. सेंटर चौकाची शोभा वाढेल तसेच नगरवासियांची मागणी पुर्ण होईल तसेच त्याचे तोच महानगरपालिकेस मिळेल. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अंबादास दानवे, श्री. सुदाम पाटील सोनवणे,
श्री. भगवान घडामोडे, श्री. प्रशांत देसरडा

अनुमोदक : श्री. संजय शिरसाठ, श्री. गणेश तांबे.

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील मो. टी.व्ही. सेंटर चौक सिडको येथे छत्रपती संभाजी महराज यांचा पुतळा उभारण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. पांडुरंग तायडे पाटील.

अनुमोदक : सौ. कुसुमताई खरात, सौ. शंकुतलाताई इंगळे, श्री. भगवान रगडे.

**ठराव** :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जनतेच्या मागणीनुसार छत्रपती संभाजी महाराज या ऐतिहासिक महापुरुषाचे कार्य भावी पिढीच्या स्मरणात राहाण्यासाठी टी.व्ही. सेंटर भागातील प्रमुख चौकात छत्रपती संभाजी महाराज यांचा भव्य अश्वारुढ पुर्णाकृती पुतळा उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जन गण मण" या राष्ट्रगिताने सभा संपल्याने मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव, | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १-०३-२००१ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त. गुरुवार दि. १ -०३- २००१ रोजी मा. महापौर डॉ. भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात सकाळी ११.३० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यासह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) स.स. श्री. अशरफ मोतीवाला
२) स.स. श्री. अंबादास दानवे
३) स.स. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४) स.स. श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स. श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स. सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स. श्री. शे. इलियास किरमानी शे. उमर
८) स.स. श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स. सौ. शकुतला सांडुजी इंगळे
१०) स.स. श्री. रगडे भगवान दगडुजी
११) स.स. श्री. शिंदे राजु रामराव
१२) स.स. श्री. कावडे साहेबराव राणुबा
१३) स.स. श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४) स.स. सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१५) स.स. सौ. धायातीलक लिलावती बाळासाहेब
१६) स.स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१७) स.स. सौ. शिंदे रुख्मीनी राधाकिसन
१८) स.स. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१९) स.स. सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
२०) स.स. श्री. शे. शकील पटेल शे. बुढण पटेल.
२१) स.स. श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
२२) स.स. श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२३) स.स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२४) स.स. सौ. साधना गणेश सुरडकर
२५) स.स. सौ. विजया किशोर रहाटकर
२६) स.स. श्री. सावंत मधुकर दामोधर
२७) स.स. सौ. ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२८) स.स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग
२९) स.स. श्री. साळवे माणिक लक्ष्मण
३०) स.स. श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
३१) स.स. श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
३२) स.स. श्री. अय्युब खान सरदार खान

३३) स.स. श्री. अ. रशिद अ. सत्तार
३४) स.स. श्री. जैन विकास रतनलाल
३५) स.स. सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
३६) स.स. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
३७) स.स. श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३८) स.स. सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखॉन
३९) स.स. श्री. वडागळे सुनिल बुथवेल
४०) स.स. श्री. शिंदे किशोर रावसाहेब
४१) स.स. श्री. मुमताज अली मोज्जम अली
४२) स.स. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
४३) स.स. श्री. नासेरखान सरदार खान
४४) स.स. श्री. थोरात दत्तात्रय रामराव
४५) स.स. श्री. सोनवणे सुदाम रामदास
४६) स.स. सौ. खरात कुसुमबाई दौलत
४७) स.स. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४८) स.स. सौ. नुसरत बानो फिरोजखान
४९) स.स. श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
५०) स.स. सौ. जयश्री कुमारराव मोरे
५१) स.स. श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
५२) स.स. सौ. कुलकर्णी जयश्री विजय
५३) स.स. श्री. सुरगोनिवार नारायण चंद्रय्या
५४) स.स. श्री. राजपुत विमलबाई भिकनसिंग
५५) स.स. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
५६) स.स. श्री. अ. कदीर मौलाना सय्यद
५७) स.स. सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
५८) स.स. श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५९) स.स. सौ. संगिता बाळु मैंद
६०) स.स. श्री. नासिरखान अ. रहेमान खान कुरैशी
६१) स.स. सौ. शाहिन जफर महमुद जफर
६२) स.स. सौ. दाणे चद्रभागाबाई भगीरथ
६३) स.स. श्री. ओक जयवंत केशवराव
६४) स.स. श्री. स. सलीम.स.उ युसुफ
६५) स.स. श्री. तकी हसनखान कासिम हसनखान
६६) स.स. श्री. गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
६७) स.स. श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
६८) स.स. श्री. शे. ईसाक जैनाद्दीन शे.
६९) स.स. श्री. अफसर खान यासीन खान
७०) स.स. श्री. लकडे भरत श्रीपती
७१) स.स. श्री. शे. मुनाफ शे. यासीन
७२) स.स. श्री. सलीम पटेल समशेर पटेल
७३) स.स. श्री. तुळशीबागवाले किशोर
७४) स.स. श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द

७५) स.स. सौ. बबीता सुभाष कागडा
७६) स.स. श्री. स. अली सलमी स. मीरा सलामी
७७) स.स. श्री. तनवाणी किशनचंद लेखराज
७८) स.स. सौ. निखत परवीन ऐजाज झैदी

## स्विकृत सदस्य

१) स.स. श्री. भगवान देविदास घडामोडे
२) स.स. श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
३) स.स. श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज
४) स.स. श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५) स.स. सौ. सलमा बानो मिर मो अली

संवाद

मा. पिठासन अधिकारी : आजची सभा विशेष सभा असुन आपल्या महानगरपालिकेत नव्यानेच महिला व बाल कल्याण समिती स्थापन होत आहे. त्यासाठी आजच्या विशेष सर्वसाधारण सभेत मतदानाव्दारे या समितीसाठी ९ (नऊ) स. सभासदाची निवड कराव्याची आहे. ही समिती कार्यान्वित होत असतांना मला अतिशय आनंद होत आहे. प्रशासनाने सुध्दा समिती स्थापन होण्यासाठी कटाक्षाने प्रयत्न केले त्याबद्दल प्रशासनाचे माझ्या व या सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो. आता निवडणुक प्रक्रीयेस सुरुवात होत आहे.

**विषय क्र. ३३७/१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ३०(१) व (७) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ६८,६९,७० व ७४ महिला व बाल कल्याण समीतीच्या नऊ (९) सभासंदाची निवड करणे बाबत.

मा. पिठासन अधिकारी : आता निवडणुक प्रक्रियेस सुरुवात होत आहे. महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) अन्वये महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी निवड करण्याकरिता दि. १२-२-२००१ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावतलीचे नियम क्रमांक ६८,६९ व ७० अन्वये निवडणुक कार्यक्रम घोषित करण्यात आला. त्यानुसार दि. १५ फेब्रु. २००१ ते २२ फेब्रु २००१ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्वीकारणेची कार्यवाही पुर्ण झाली असुन दि. २२ फेब्रु २००१ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी १६ उमेदवारांची नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेले आहेत. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असुन खालील सर्व उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत. नगरसचिव सभाकामकाज नियमावलीचे नियम वाचुन दाखवतील.

नगर सचिव : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व (७) आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ६८,६९,७० व ७४ अन्वये महिला बालकल्याण समितीच्या नऊ (९) सभासदांची निवड करावयाची आहे.

मा. पिठासन अधिकारी : निवडणुकीत भाग घेणाऱ्या उमेदवाराची नावे, सुचक, अनुमोदकासहित वाचुन दाखविण्यात येते आहे. खालील उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत.

| अ. क्र. | उमेदवारांचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १. | सौ. रुख्मीणी राधाकिसन | श्री. आनंद तांदुळवाडीकर | श्री. तनवाणी किशनचंद लेखराज |
| २. | सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग | १) श्री. अंबादास एकनाथराव दानवे, २) श्री. अंबादास एकनाथराव दानवे | श्री. फुलारी नंदकुमार माधव राव श्री. तनवाणी किशनचंद लेखराज |
| ३. | सौ. कचराबाई उत्तम लोखंडे | श्री. घोडले नंदकुमार राधाकिसन | श्री. तनवाणी किशनचंद लेखराज |
| ४. | सौ. दाणे चंद्रभागाबाई भगरिथ | श्री. साळवे माणिक लक्ष्मण | श्री. सय्यद सलीम सय्यद युसुफ |
| ५. | सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान | श्री. शेख मुनाफ शेख यासीन | श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ |
| ६. | सौ. साजेदा बेगम विखार अहेमद | श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | वाणी ठकुजी रामसिंग |
| ७. | सौ. छायतिलक लिलावती बाळासाहेब | श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव |
| ८. | सौ. निखत परवीन ईजाज अली | श्री. शेख मुनाफ शेख यासीन | श्री. तकी हसनखान कासिम हसनखान |
| ९. | सौ. खरात कुसुमबाई दौलत | श्री. रगडे भगवान दगडुजी | श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी |
| १०. | सौ. शाहीन जफर व महेमुद जफर | श्री. सलीम पटेल समशेर पटेल | श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली |
| ११. | सौ. नुसरत बानो फिरोज खान | श्री. नासिरखान अ. रहेमान खान कुरैशी | श्री. औताडे रावसाहेब ममतु पाटील |
| १२. | सौ. किवळेकर जयश्री सारंग | सौ. साधना गणेश सुरडकर | श्री. पार्वतीबाई लहानु मानकापे |
| १३. | सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश | सौ. जयश्री विजय कुलकर्णी | सौ. मंदा प्रभाकर पवार |
| १४. | सौ. संगिता बाळु मैंद | श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक, श्री. विजया किशोर राहाटकर | श्री. राजु रामराव शिंदे,सौ. मोरे जयश्री कुमारराव |

| | | | |
|---|---|---|---|
| १५. | सौ. फुलारी नंदकुमार माधवराव | श्री. तनवाणी किशनचंद लेखराज | अंबादास एकनाथराव दानवे |
| १६. | सौ. सलमा बानो मिर मोहम्मद अली | श्री.स. सलीम स. युसुफ | श्री.तकी हसनखान कासिम हसनखान |

एकुण १६ उमेदवारी अर्ज महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी प्राप्त झालेली आहेत. ज्यांना उमेदवारी अर्ज (नामनिर्देशन पत्र) मागे घ्यावयाचे आहे. त्यांना त्यांचे सुचक व अनुमोदक यापैकी संम्मत्तीने आपल्या उमेदवारी अर्ज मागे घेता येईल, सभेत सुचक किंवा अनुमोदक यापैकी एकाधा उपस्थिती नसेल तर इच्छुकाला या दोहो पैकी जो कुणी सभेला उपस्थित आहे त्यांच्या सम्मतीने ३० मिनिटाच्या आत नांव परत घेता येईल. आता सभागृहातील घडयाळाप्रमाणे ११.५० वाजले आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी ३० मिनिटाचा वेळ देण्यात येत आहे. म्हणजेच १२.२० पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येईल तरी कृपया ज्यांना महिती व बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सागितल्याप्रमाणे त्यांना आपली नांवे १२.२० वाजेपर्यंत परत घेता येईल. मात्र या वेळेनंतर नामनिर्देशन पत्र परत येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

श्री. कोकाटे काशिनाथ : ज्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केलेले आहे. त्यांची नांवे व त्यांना असलेले सुचक व अनुमोदकाची नांवे पुन्हा वाचुन दाखवण्यात यावी. अशी मा. महापौरांना विनंती आहे.

मा. पिठासन अधिकारी : एक वेळेस नांवे वाचुन दाखवलेली आहे. निवडणुक प्रक्रिया सुरु झ ाली तेव्हा आपण सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक होते. ज्यांनी निवडणुकीत भाग घेतलेला त्यांची नांवे सुचक अनुमोदक सहीत वाचुन दाखवलेली आहे. आता १२.२० पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्यास वेळ दिलेला आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ, श्री. अफसरखान : नांवे वाचुन दाखवली त्यावेळेस आम्ही नव्हतो आता आपणांस विनंती केलेली आहे. पुन्हा नांवे वाचुन दाखववी.

मा. पिठासन अधिकारी निवडणुकीत भाग घेण्याऱ्या व त्यांना सुचक व अनुमोदक असलेल्यांची नांवे पुन्हा वाचुन दाखविण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवारांचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १. | सौ. रुख्मीणी राधाकिसन | श्री. आनंद तांदुळवाडीकर | श्री. तनवाणी किशनचंद लेखराज |
| २. | सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग | १) श्री. अंबादास एकनाथराव दानवे, २) श्री. अंबादास एकनाथराव दानवे | श्री. फुलारी नंदकुमार माधव राव श्री. तनवाणी किशनचंद लेखराज |
| ३. | सौ. कचराबाई उत्तम लोखंडे | श्री. घोडले नंदकुमार राधाकिसन | श्री. तनवाणी किशनचंद लेखराज |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | सौ. दाणे चंद्रभागाबाई भगरिथ | श्री. साळवे माणिक लक्ष्मण | श्री. सय्यद सलीम सय्यद युसुफ |
| ५. | सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान | श्री. शेख मुनाफ शेख यासीन | श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ |
| ६. | सौ. साजेदा बेगम विखार अहेमद | श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | वाणी ठकुजी रामसिंग |
| ७. | सौ. छायतिलक लिलावती बाळासाहेब | श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव |
| ८. | सौ. निखत परवीन ईजाज अली | श्री. शेख मुनाफ शेख यासीन | श्री. तकी हसनखान कासिम हसनखान |
| ९. | सौ. खरात कुसुमबाई दौलत | श्री. रगडे भगवान दगडुजी | श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी |
| १०. | सौ. शाहीन जफर व महेमुद जफर | श्री. सलीम पटेल समशेर पटेल | श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली |
| ११. | सौ. नुसरत बानो फिरोज खान | श्री. नासिरखान अ. रहेमान खान कुरैशी | श्री. औताडे रावसाहेब ममतु पाटील |
| १२. | सौ. किवळेकर जयश्री सारंग | सौ. साधना गणेश सुरडकर | श्री. पार्वतीबाई लहानु मानकापे |
| १३. | सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश | सौ. जयश्री विजय कुलकर्णी | सौ. मंदा प्रभाकर पवार |
| १४. | सौ. संगिता बाळु मैंद | श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक, श्री. विजया किशोर राहाटकर | श्री. राजु रामराव शिंदे,सौ. मोरे जयश्री कुमारराव |
| १५. | श्री. फुलारी नंदकुमार माधवराव | श्री. तनवाणी किशनचंद लेखराज | श्री. अंबादास एकनाथराव दानवे |
| १६. | सौ. सलमा बानो मिर मोहम्मद अली | श्री.स. सलीम स. युसुफ | श्री.तकी हसनखान कासिम हसनखान |

आता घडयाळा प्रमाणे १२.०० वाजले आहे. व ३० मिनिटाचा वेळ उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी देण्यास येत आहे. भरलेला उमेदवारी अर्ज सुचक किंवा अनुमोदकाच्या सम्मतीने मागे घेता येईल. म्हणजेच १२.३० वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल.

मा. पिठासन अधिकारी : आता सभागृहातील घडयाळाप्रमाणे १२.३० वाजले आहे. महिला व बालकल्याण समिती सदस्य पदासाठी एकुण १६ उमेदवारी अर्ज दाखल झाल्यापैकी ३० मिनिटाच्या वेळात ५ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतलेले असुन त्यांची नांवे खाली प्रमाणे आहेत.

१) सौ. संगिता बाळु मैंद
२) श्री. नंदकुमार फुलारी
३) सौ. कुसुमताई खरात

४) सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान
५) सौ. नुसरत बानो फिरोज खान

या वरिल ५ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहे. व आता निवडणुक लढविण्यासाठी फक्त ११ सदस्य निवडणुक रिंगणात असुन त्यांची नांवे खालील प्रमाणे आहेत.

१) सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
२) सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
३) सौ. कचराबाई उत्तम लोखंडे
४) सौ. दाने चंद्रभागाबाई भगिरथ
५) सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
६) सौ. छायातिक लिलावती बाळासाहेब
७) सौ. निखत परवीन ईजाज अली
८) सौ. शाहीन जफर व अहेमद जफर
९) श्रीमती किरवळेकर जयश्री सांरग
१०) सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश
११) सौ. सलमा बानो मिर मोहम्मद अली.

वरील ११ सदस्यांचे महिला व बाल कल्याण समिती सदस्य पदासाठी उमेदवारी अर्ज आहेत मतपत्रिकेवर वरील ११ उमेदवारांची नांवे राहतील मतदानात गोपनियता पाळता यावी म्हणुन मतपत्रिकेच्या स्थळ प्रतिवर अनुक्रमांक राहील. मतपत्रिकेवर अनुक्रमांक राहणार नाही मतपत्रिकांची सरमिसळ करण्यात येईल. तसेच स्थळ प्रतिवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मत पत्रिका कोणास दिली याचा बोध होणार नाही. त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल. मतपत्रिका १ तासत तयार होईल. आता घडयाळया प्रमाणे १२.३५ वाजले आहे मतपत्रिका तयार करण्यासाठी १ तासाचा वेळ देण्यात येत आहे. म्हणजेच १.३५ वाजेपर्यंत मतपत्रिका तयार करण्यात यावी. मतपत्रिका स. सदस्यांना पाहता येईल. अशा पध्दतीने सभागृहात फलकावर लावण्यात यावी. मतपत्रिका तयार केल्या नंतर प्रत्यक्ष मतदानास सुरुवात होईल. तोपर्यंत आजची सभा तहकुब करण्यात यावी. (वेळ १२.३५ वा तहकुब सभेला सुरुवात १.४५ वाजता)

आता सभागृहातील घडयाळाप्रमाणे दुपारचे १.४५ वाजले मतदान प्रक्रियेस आता सुरुवात होत आहे. तत्पुर्वी मतपेटी जवळ असलेले कर्मचारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहाला दाखवुन द्यावे. ( यावेळी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहाला दाखविण्यात येतेग.) मतपेटीस कुलुप लावुन त्याची चावी माझ्याकडे आणुन द्यावी. (कुलप लावुन त्याची चावी मा. पिठासन अधिकाऱ्याकडे दिली जाते मतपेटीला सील करण्यात यावे व सभागृहाला दाखविण्यात यावे(मतदान पेटीस सील करुनन सभागृहाला दाखविण्या येते.) आता निवडणुक प्रक्रियेस सुरुवात होणार आहे. नमुना पत्रिका सभागृहात बोर्डेवर लावण्यात आलेली आहे. नियम ५१ अन्वये जर एखादया उमेदवारास मतमोजणीच्या वेळी प्रत्यक्ष थांबण्याची इच्छा नसेल तर त्यांनी त्याच एका सभासदाला प्रतिनिधी म्हणुन थांबविता येईल. तसे त्यांनी लेखी स्वरुपात आताच नांवे देणे आवश्यक आहेत मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी या शिवाय कुणीही गर्दी करु नये. मतदान

प्रक्रिया चालु होत आहे त्यासाठी काटेकोर नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. नगरसचिव नियम वाचुन दाखवतील.

नगर सचिव : निवडणुक प्रक्रिया पार पाडण्यासाठी खालील नियमाचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

१) मतदान प्रत्यक्ष सुरुवात करतांना प्रभागनिहाय स. सदस्यांनी नांवे पुकारण्यात येतील.

२) महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे.

३) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५(आय) प्रमाणे सभासदाला दिलेली मतपत्रिका खराब झाली तर त्यांना मा. पिठासन अधिकारी यांच्या अनुमतीने मतपत्रिका देता येईल.

४) सभा कामकाज नियमावलीच्या नियम क्र. ६२ प्रमाणे जितक्या जागा भरावयाच्या असतील तितकी मते देण्याचा प्रत्येक सभासदाला अधिकार आहे. आता महिला व बालकल्याण समितीचे ९ (नऊ) सदस्यांसाठी निवडणुक होत असल्यामुळे प्रत्येक सदस्यांना ९ मते देण्याचा अधिकार आहे. मतदान करतेवेळी प्रत्येक सभासद मतपत्रिकेच्या उजव्या बाजुला ज्या इच्छुकाला मते द्यावयाची असतील त्यांच्या नावासमोर गुणाकाराची (X) फुली करावी. सदरची मते एकाच उमेदवारास किंवा एकापेक्षा जास्त उमेदवारास आपल्या इच्छेनुसार देता येतील. मात्र ९ पेक्षा जास्त मते देवु नयेत.

५) सभा कामकाज नियमावलीच्या नियम क्र. ४५ (जे) मधील तरतुदीनुसार खालील परिस्थितीत मतपत्रिका अवैध समजली जाईल.

१) जर मतपत्रिकेवर सभासदाने आपले नांव किंवा लिहिला असेल अथवा तो ओळखता येईल अशी रितीने तिच्यावर काही खुप केलेली असेल अथवा.

२) जी छिद्राकित (परफोरेटेड) नसेल अथवा.

३) जिच्यावर मत नोंदले नसेल अथवा जी संधिम्धतेमुळे निरुपयोगी आहे.

श्री. कुमावत अविनाश : मतदान करतांना मतपत्रिकेवर मतदान कोणत्या बाजुने करावे व उमेदवारांची नांवे कोणत्या बाजुने असवी याबाबतीत उच्च न्यायालयाने जे निर्देश दिले आहे त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

मा. पिठासन अधिकारी : आपण केलेली सुचना लक्षात घेतलेली आहे. परंतु तसी परिस्थिती निर्माण झाल्यास आपण केलेल्या सुचनेप्रमाणे होईल.

श्री. कोकाटे काशिनाथ : महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

मा. पिठासन अधिकारी : नमुना/पत्रिका नोटिस बोर्डवर लावण्यात आलेली आहे आता मतदार यादीप्रमाणे नांवे पुकारण्यात येतील.

श्री. स. अली मिरा सलामी : सभा कामकाज मराठी भाषे व्यतिरिक्त इतर भाषेतुन म्हणजु इंग्रजी, हिंदी भाषेतुन चालवावे कारण काही स. सदस्यांना मराठी भाषा समजत नाही.

मा. पिठासन अधिकारी : महानगरपालिकेचे कामकाज मराठीतुन चालते व म्हणुन आता सुध्दा मराठी भाषेमधुनच कामकाज होईल.

श्री. कुमावत अविनाश : न्यायालयाच्या आदेशाप्रमाणेच मतदान पत्रिका तयार करावी.

श्री. अंबादास दानवे : आपल्या नियमावलीत मराठी भाषेतुनच कामकाज होईल असे दाखवा सभेचे कामकाज मराठीतुन चालेल परंतु कुणाला इतर भाषेतुन बोलण्याची इच्छा झाल्यास तसे बोलता येऊ शकेल.

मा. पिठासन अधिकारी : सभा कामकाज मराठीतुन होईल सुचना करतांना ज्यांना हिन्दीतुन बोलवयाचे त्यांनी बोलावे सभा कामकाजाचे तसेच निवडणुक प्रक्रियेसंबंधीचे नियम समजले नसतील तर नगरसचिव यांनी हिंदीतुन अनुवाद करुन सांगावे.

श्री. अफसरखान : हिन्दी भाषा राष्ट्र भाषा असुन सभागृहात माहिती देतांना हिंदीतुन सुध्दा देण्यात यावी. सभाकामकाज नियमावली व निवडणुक प्रक्रिया पार पाडण्यासाठी काटेकोरपणे ज्या नियमाचे पालन करायचे ते नियम नगरसचिव हिंदी भाषेतुन रुपांतरीत करुन दाखवतात.

श्री. कुमावत अविनाश : न्यायालयाच्या आदेशानुसार मतपत्रिकेवर असलेल्या नावाच्या दोन्ही बाजु पैकी एका बाजुने मतदान करता येईल असे वाचावे. या प्रमाणे कार्यवाही होत नसेल तर मी १० मिनिटासाठी या सभागृहाचा निषेध करुन बाहेर निघुन जात आहे. (याचवेळी स. सभासद सभागृहा बाहेर निघुन जातात. वेळ २.०४ वाजता)

मा. पिठासन अधिकारी : आता सभागृहातील घडयाळाप्रमाणे २.०५ वाजले आहेत मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी १ तासाचा वेळ देण्यात येत आहे. म्हणजेच ३.०५ वाजेपर्यंत मतदान करण्याची वेळ राहील. व त्यानंतर नियम क्र. ४५ (एफ) नुसार कुणासही मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही. याची स. सदस्यांनी नोंद घ्यावी ही निवडणुक प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत आधिकारी वर्ग तसेच कर्मचारी वर्ग यांनी त्यांना नेमुन दिलेली कामे करावी व नियमाचा भंग होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. व आता जनसंपर्क अधिकारी यांनी एक-एक स. सभासदांची नांवे पुकारावीत सर्वांनी मतदान प्रक्रिया पार पाडयासाठीसहकार्य करावे ही सर्वांना विनंती आहे. तसेच नियम क्र. ४५ च्या तरतुदी प्रमाणे मतदान प्रक्रिया पाडण्यासाठी कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा/नस/२२५/२००१ दि. २८-२-२००१ अन्वये महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती केलेली आहे. ही नियुक्ती कायम करण्यात येत असुन या आदेशाव्दारे ज्यांना जी जी कामे नेमुन देण्यात आलेली आहे त्यांनी ती कामे जबाबदारीने पार पाडावीत.

श्री. जयवंत ओक : स. सदस्या सौ. विजया किशोर राहाटकर आजारी असल्याने त्यांना प्रथमतः मतदान करु द्यावे (स. सदस्य श्री. अविनाश कुमावत पुन्हा सभागृहात प्रवेश करतात)

मा. पिठासन अधिकारी : ठिक आहे. स.स. सौ. राहाटकर प्रथम मतदान करतील जनसपर्क अधिकारी यांनी स. सदस्या सौ. राहटकर यांचे नांव पुकारावे नंतर वार्ड क्र.१ पासुन सुरुवात करावी.

जनसंपर्क अधिकारी : सुरुवातीस वार्ड क्र. २२ च्या स. सदस्या यांनी मतदान केले त्यानंतर वार्ड क्र. १ ते १३ च्या स.सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्र. २२ च्या स. सदस्या यांनी मदतनीसची लेखी मागणी केल्यानुसार मा. पिठासन अधिकारी यांचे अनुमती दिल्यानुसार डॉ. दिनकर देशपांडे (आ. वै अधिकारी) यांनी त्यांना मतदान करण्यासाठी मदत केली व त्यांनी मतदान केले यानंतर वार्ड क्र. १५ चे स. सदस्य यांनी मतदान केले तर वार्ड क्र. १६ च्या स. सभासदास यांचे लेखी मागणी नुसार मा. पिठासन अधिकारी यांनी अनुमती दिल्यानुसार मुख्यलेखाधिकारी श्री. खैरनार यांनी त्यांना मतदान करण्यास मदत केले तर वार्ड क्र. १७ ते ३३ ते ४० पर्यंतच्या स. सदस्यांनी मतदानात

भाग घेतला व आपले मतदान केले. यानंतर वार्ड क्र. ४१ चे स. सभासद यांनी मदतनीसाची लेखी मागणी नुसार मा. पिठासन अधिकारी यांनी सुचना केल्यानुसार उपआयुक्त (प्र.) यांचे स्वीय सहाय्यक श्री. पी.के. खोब्रागडे यांनी त्यांना मतदानास मदत केली. व त्यानुसार मतदान केले. यानंतर लागेच वार्ड क्र. ४२, ४३ व ४४ च्या स. सभासदांना मतदानात भाग घेतला यानंतर वार्ड क्र. ६८ चे स. सदस्य यांना न्यायालयात कामनिमित्त जायचे असल्याने मा पिठासन अधिकारी यांचे सुचनेनुसार वार्ड क्र. ६८ च्या सदस्यांनी मतदान केले. तर यानंतर वार्ड क्र. ४५ ते ६२ च्या स. सभासदांनी मतदान केले वार्ड क्र. ६३ चे नगरसेवक पद रिक्त असल्याने नावही पुकारले नाही. असता ही झालेले नाही तर वार्ड क्र. ६४ ते ६७ च्या स. सभासदांनी मतदानाचा हक्क बजावला यानंतर वार्ड क्र. ६९ चे स. सभासदांनी मतदान केले वार्ड क्र. ७० च्या स. सभासदाचे मतदानासाठी नांव पुकारले असता स. सभासद अनुपस्थित असल्याने मतदानाचा हक्क बजाऊ शकेले नाही यानंतर वार्ड क्र. ७०,७२ च्या स. सभासदांच्नी मतदान केले वार्ड क्र . ७३ चे स. सभासदाचे नांव पुकारले असता स. सभासद अनुपस्थित असल्याने मतदानाचा हक्क बजावता आला नाही. वार्ड क्र.७४,७५,७६ च्या स. सभासदांनी मतदान केले तर वार्ड क्र. ७७ चे स.स. सभासदाचे नांव पुकारले परंतु स. सभासद अनुपस्थित असल्याने मतदान होऊ शकले नाही. यानंतर लगेच वार्ड क्र. ७८,७९ चे स. सभासदांनी मतदान केले तर वार्ड क्र. ८० च्या स. सभासदांनी मतदानासाठी मदतनीसाची लेखी मागणी केल्यानुसार मा. पिठासन अधिकारी यांनी विधी सल्लगार श्री. शिरसाठ यांना मदत करण्याचे सुचित केले व वार्ड क्र. ८० च्या स. सभासदांनी मतदान केले यानंतर वार्ड क्र. ८१ ते ८३ च्या स. सभासदांनी मतदानाचा हक्क बजावला यानंतर वार्ड क्र. ३४ चे स. सभासद तथा विद्यमान मा. महापौर पिठासन अधिकारी यांचे नांव पुकारण्यात आले.

श्री. संजय शिरसाठ : मा. महापौर यांना विनंती का, मतदानासाठी आपण जाणार आहात आपल्या पदाचा चार्ज जेष्ठ स. सभासद श्री. कुमावत यांना देण्यात यावा.

मा. पिठासन अधिकारी : ठिक आहे पिठासन अधिकारी म्हणुन तात्पुरता चार्ज जेष्ठ स. सभासद श्री. कुमावत यांना देण्यात येतो. (याचवेळी स. सभासद श्री. कुमावत तात्पुरते पिठासन अधिकारी म्हणुन पदगृहन करतात) यानंतर वार्ड क्र. ३४ चे स. सभासद डॉ. भागवत कराड आपल्या मतदानाचा हक्क बजावतात.

मा. पिठासन अधिकारी : वार्ड निहाय नावे पुकारण्यात येऊन स. सभासदांनी मतदानात भाग घेतला आहे जे स. सभासद मतदान करावयाचे राहिले असतील त्याची नावे मतदानासाठी पुन्हा पुकारण्यात यावी.

जनसंपर्क अधिकारी : वार्ड क्र. ७० चे स. स. श्रीमती नफिसुन्नीसा बेगम हबीब खॉ, वार्ड क्र. ७३ चे स.स. सौ. सुलताना बेगम चांदखॉ व वार्ड क्र. ७७ चे स. श्री. कैसरखान बद्रोद्दीनखान यांची नांवे मतदानासाठी पुकारण्यात येतात. (याच वेळी विद्यमान महापौर तथा पिठासन अधिकारी डॉ. भागवत कराड महापौर पदावर विराजमान होतात.)

मा. पिठासन अधिकारी : ज्यांनी मतदानात भाग घेतलेला नाही अशा वार्ड क्र. ७०,७३,७७ च्या स. सभासदांची पुन्हा मतदानाचा हक्क बजावता यावा म्हणुन नांवे

पुकारण्यात आलेली आहे. मतदान प्रक्रियेसाठी आपण एक तासाचा वेळ दिलेला होता. २.०५ वाजता मतदानास सुरुवात केलेली आहे. म्हणजेच ३.०५ वाजेपर्यंत मतदान करण्याचा वेळ आहे आता २.५५ वाजले आहे. म्हणुन आणखी १० मिनिटे थांबणे आवश्यक आहे. (१० मिनिटाचा वेळ गेल्यानंतर) सभागृहातील घडयाळाप्रमाणे आता दुपारचे ३.०५ वाजले मतदानाची वेळ संपलेली आहे. मी घोषित करतो. नियमाने कुणालाही आता मतदान करता येणार नाही. मतदान अधिकारी यांनी मतदानासाठी मतपत्रिका देण्याचे बंद करावे. मतपेटीजवळील मतदान अधिकारी यांनी मतपत्रिका टाकवयाची फट बंद करावी. व मतपेटी माझ्याकडे आणावी.
उमेदवारांनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीलाच मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे इतर स. सदस्यांनी मतमोजणीच्या ठिकाणी कृपया गर्दी करु नये. ही आपणांस विनंती करण्यात येत आहे.

मा. पिठासन आधिकारी : मत मोजणीचे काम पुर्ण झाले असुन उमेदवारांना पडलेली मते खाली प्रमाणे आहे.

एकुण मतदान --//-- ७११
अवैध मते --//-- ---
वैध मते --//-- ७११

| अ. क्र. | उमेदवारांची नांवे | पडलेली मते | |
|---|---|---|---|
| १. | सौ. साजेदा बेगम विखार अहेमद | ७३ | विजयी घोषित |
| २. | श्रीमती छायतिलक लिलावती बाळासाहेब | ७२ | --//-- |
| ३. | सौ. निखत परवीन ईजाज इली | ७२ | --//-- |
| ४. | सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ | ७२ | --//-- |
| ५. | सौ. शाहीन जफर महमुद जफर | ७१ | --//-- |
| ६. | श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | ७१ | --//-- |
| ७. | सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश | ७१ | --//-- |
| ८. | सौ. कचराबाई उत्तम लोखंडे | ७० | --//-- |
| ९. | सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग | ७० | --//-- |
| १०. | सौ. शिंदे रुख्मीनी राधाकिसन | ६९ | पराभुत घोषित |
| ११. | सौ. सलमाबानो मिर मोहम्मद अली | ०० | --//-- |

मत मोजणीच्या निकालावरुन मी असे घोषित करतो की, महिला व बालकल्याण समिती सदस्य पदासाठी खाली प्रमाणे नऊ (९) सदस्यांची निवड झाली.

| अ. क्र. | उमेदवारांची नांवे | पडलेली मते | |
|---|---|---|---|
| १. | सौ. साजेदा बेगम विखार अहेमद | ७३ | विजयी घोषित |
| २. | श्रीमती छायतिलक लिलावती बाळासाहेब | ७२ | --//-- |
| ३. | सौ. निखत परवीन ईजाज इली | ७२ | --//-- |
| ४. | सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ | ७२ | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | सौ. शाहीन जफर महमुद जफर | ७१ | --//-- |
| ६. | श्रीमती किवळेकर जयश्री सारंग | ७१ | --//-- |
| ७. | सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश | ७१ | --//-- |
| ८. | सौ. कचराबाई उत्तम लोखंडे | ७० | --//-- |
| ९. | सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग | ७० | --//-- |

वरील ९ (नऊ) सदस्यांची निवड झाली आहे असे मी घोषित करतो व त्या सर्वांचे यशोचित स्वागत करण्यात येते.
( विजयी उमेदवारांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत समारंभ कार्यक्रम होते.)

ठराव :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व (७) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ६८,६९,७० व ७४ अन्वये महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांसाठी झालेल्या मतदानानुसार सर्वात जास्त मते मिळालेले खालीप्रमाणे ९ (नऊ) महिला सदस्या विजयी झाल्याचे पिठासन अधिकारी यांनी घोषित केले त्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

१) सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
२) श्रीमती छायतिलक लिलवती बाळासाहेब
३) सौ. निखत परवीन ईजाज अली
४) सौ. दाणे चंद्रभागाबाई भगरिथ
५) सौ. शाहीन जफर महेमुद जफर
६) श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
७) सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश
८) सौ. कचराबाई उत्तम लोखंडे
९) सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग

याच बरोबर "जण गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. पिठासन अधिकारी यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.